


डॉ. स्मिता दामले







# असं घडलं होतं






# असं घडलं होतं

## डॉ. स्मिता दामले

ई साहित्य प्रतिष्ठान

# असं घडलं होतं

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला
पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.
दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# असं घडलं होतं

डॉ. स्मिता दामले
३०३, सुकल्याण, २९, आयडियल कॉलनी,
कोथरूड, पुणे, ४११०३८.
मोबाईल :- ९८६७३६४६३४.
Presently:
4212, fishermans Pier Court,
Lutz,
Florida, 33558.
U.S.A.
Emails:
smitasuhas67@rediffmail.com
suhasdamle341@hotmail.com
Mobile: 9867364634

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**प्रकाशन : १५ जानेवारी २०२२ (मकरसंक्रांती)**



©esahity Pratishthan®2022

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. स्मिता दामले



ई साहित्यतर्फे आज डॉ. स्मिता दामले यांचे नववे पुस्तक, “असं घडलं होतं” प्रकाशित होत आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान हा अनेक कवी व लेखकांनी सुरू केलेला एक नवीन प्रयोग. मराठी मध्ये वाचक आणि साहित्यिक अधिक जवळ यावेत आणि एक मोठी चळवळ इंटरनेटच्या माध्यमातून सुरू व्हावी अशी इच्छा होती. मराठी भाषेत उत्तम दर्जेदार साहित्य निर्मिती व्हावी, चांगले वाचक एकत्र यावेत, त्यांना चांगल्या दर्जाचे साहित्य मिळावे आणि दर्जेदार लिहू इच्छिणाऱ्या लेखकांना असे वाचक मिळावेत. एवढेच काय ते आमचे छोटेसे स्वप्न. हिंमते मर्दा. मददे खुदा. आमच्या छोट्याशा स्वप्नाला लाखो वाचकांची आणि दर्जेदार लेखकांची साथ मिळत गेली आणि कारवां बनता गया. डॉ. स्मिता दामले या त्यातीलच एक. “सुर्यपुत्र लोकमान्य” हे लोकमान्य टिळकांचे एक वेगळ्या अंगाचे, त्यांच्या मानवी कंगोऱ्यांचे दर्शन घडवणारे चरित्र, “रक्षा” हा रक्षा या शब्दाच्या विविध सात अर्थांतून निर्माण होणाऱ्या कथांच्या संग्रहानंतर त्यांनी “कलाटणी" हे भारताच्या हजारो वर्षांच्या भव्य इतिहासाचे मिनिएचर दर्शन घडवणारे पुस्तक लिहीले. अशा पुस्तकांनी ई साहित्य चे पुस्तक संग्रहालय समृद्ध होत आहे. त्यांचे “मनसोक्त” हे वर्तमानपत्रातील बातम्या वाचल्यानंतर उमटलेल्या तरंगांचे पुस्तक हे. ई साहित्य तर्फे डॉ. स्मिता दामले यांचे हे चौथे पुस्तक. पाचवे पुस्तक होते “इतिहासाची विलग पाने”. इतिहासातील काही महत्त्वाच्या पण कमी प्रसिद्ध अशा घटना व व्यक्तींभोवती हे पुस्तक आहे. पाचही पुस्तके वेगवेगळी आणि तरीही एकाच धाग्यातली. तो धागा म्हणजे इतिहास. आणि त्यातली फ़ुले मात्र दुर्मिळ, अप्रसिद्ध व्यक्ती आणि घटना. सल्तनत ए दिल्ली हे सहावे पुस्तकही याला अपवाद नाही.  त्यांचे आठवे पुस्तक कावेरीचा दुभंग: लाही वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

डॉ स्मिता दामले यांना  राजकारणाची आवड असल्यामुळे आजवर इतिहासाचा अभ्यास करून त्यातच लेखन केलं. इतिहास म्हणजे पूर्वकालीन सत्ताधीशांच्या यशापयाशाची कहाणी. इतिहास विषयातच त्यांनी Ph.D केलं. इतिहास वाचत असताना त्यांच्या एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे १७ व्या आणि १८ व्या शतकातील उत्तर भारतातील राजकारणावर आणि शिंदे-होळकर-मोगल आणि थोरले बाजीराव यांच्यातील सत्तेच्या रस्सिखेचावर विपुल लेखन लिहिलं गेलं आहे. पण १८ व्या शतकात दक्षिण भारतात मोठं राजकारण खेळणाऱ्या संभाजी पुत्र शाहू, पेशवाईचे संस्थापक बाळाजी विश्वनाथ, हैदर अली, त्याचा  पुत्र टिपू सुलतान आणि या सर्वांचा लढा झाला  त्या प्रबळ इंग्रजांवर मराठीत लेखन झालेलं नाही. म्हणून मनोव्यापाराच्या आधाराने, कादंबरी अंगाने, इतिहास मांडणारं लेखन त्यांनी अभ्यासपुर्वक केलं. ते लेखन म्हणजे, शिवरायांच्या पश्चात संभाजी-राजाराम-शाहू या त्यांच्या तीन वारसांचा आणि पेशवाई शतकाची स्थापना करणाऱ्या बाळाजी विश्वनाथ- पुत्र बाजीराव - आणि नानासाहेब पेशवा यांच्या कारकीर्दीचा, बाजीरावांच्या मातोश्री राधाबाई ज्यांनी ७५ वर्षाचं दीर्घायुष्य मिळाल्यामुळे राजकारण फार जवळून पाहिलं त्यांना  नायिका करून इतिहास सांगणारी "मातोश्री"  ही कादंबरी. त्यानंतर त्यांनी मिरजेचे सरदार पटवर्धन  यांच्या घराण्याचा इतिहास मांडणारी " उदयास्त " ही कादंबरी लिहीली. त्यांनी लिहीलेलं " मी टिपू सुलतान " हे टिपू सुलतानचं राजकीय, व्यक्तिगत चरित्र प्रसिध्द  आहे.

ई साहित्य ही संस्था कोणतेही धन देत नसताना त्यांनी आपली नऊ मौल्यवान पुस्तकं ई साहित्यच्या वाचकांसाठी विनामूल्य दिली ही आमच्यासाठी डॉ. स्मिता दामलेंची खरी ओळख.

ई साहित्य प्रतिष्ठान डॉ. स्मिता दामले यांचे कायम ऋणी राहील.

**टीम ई साहित्य**

या पुस्तकातील माहिती, संदर्भ व मते सर्वस्वी लेखिकेची स्वतःची आहेत. या सर्वांशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.

या पुस्तकातील चित्रे गुगलवरून घेतली आहेत. ती अपलोड करणाऱ्यांचे आभार.

टीम ई साहित्य

**ज्या सर्व तरुणाईने भारतीय वीरांच्या देशात मुलुखगिरी करायला लावली,**

**आप्तस्वकीयांनी त्या लेखनाला प्रोत्साहन दिलं.**

**त्या सर्वांना अर्पण.**




The approximate extent of Iron Age (Vedic civilization) 'Āryāvarta' is highlighted in pale yellow

हा वेदिक काळातील भारत. गंगा-यमुना आणि त्यांच्या उपनद्यांच्या जीवनरसावर, सुजलाम सुफलाम सरितांच्या काठाने अनेक संगर घडले.. त्रेता युगातील वाल्मिकी रामायण ही राम रावणांच्या युध्दाची पहिली कहाणी. मग घडलं ते कौरव पांडव महायुध्द. जयद्रथाचा सिंधू-आजचा सिंध, गांधारीचा गांधार-कंदाहार, कंबोजची राजकन्या भानुमती ही दुर्योधनाची राणी, मद्र देशाची माद्री, मत्स्य देश-मथुरेवरुन या देशावरुन कृष्ण द्वारकेला जात असे. कुरु, वैदेहीचा विदेह, जरासंधाचा मगध, या नकाशात त्यावेळचे सर्व देश दिसत आहेत. तलवारींच्या जोरावर त्रेता युगाच्या आधी कितीतरी शतके ही राज्ये उदयाला आली. सर्व देश संपन्न होते. संस्कार-संस्कृतीने बहरलेले होते.

# प्रस्तावना.

अनादि अनंत कालापासून हा भरत देश तीन बाजूंनी खळाळणाऱ्या सागरी लाटांमधे उभा आहे. त्याच्या कटिप्रदेशापासून निघणारे, पूर्व आणि पश्चिम दीर्घ, लांब, किनारे, दक्षिणेला जाऊन चरणयुगुलासारखे जुळतात. आपले चरण या सागरी लाटांमधे हा द्वीपकल्प भिजवतो आहे. या भरतवर्षात ज्ञान, विज्ञान, संत, माहात्मे, धर्मसंस्थापकांची मांदियाळी होत गेली. सिंधदेशापासून बंगालपर्यंत आपले दीर्घ बाहू पसरुन हा द्वीपकल्प सुवर्णाची, मोत्यांची, रास उधळतो आहे. मोत्यांच्या कणसांच्या दाण्यांनी असंख्य जीवांना तृप्त करतो आहे. अमृतजलाने वाहणाऱ्या नद्यांनी पांथस्थाची तहान शमवतो आहे. इथल्या मातीत शूरांची, वीरांची समशेर समरांगणात तळपली. त्यांच्या राजसत्तांच्याही अनेक लाटा या भूमीवर उसळल्या. साम्राज्ये उदयाला आली आणि विलय पावली. पुढच्या लाटेला मागची नवी लाट बुजवत गेली. नवीन लाटाही कालांतराने विरघळून गेल्या. इथल्या नद्यांचं अमृतजल तरुणांच्या रक्तांनी रंगलं. मातृभूमीच्या रक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या वीरांची रक्षा या भरतवर्षाच्या मातीत मिसळली. त्या देहांच्या रुजलेल्या रक्षेधूनच पुढची नवीन पिढी बहादूरी गाजवायला हिरव्यागार पिकासारखी उभी राहिली.

वीरांचे ज्वालामुखी या भूमीवर लढत राहिले. वीररसाचा तप्त लाव्हारस सांडत राहिला. अनेकानेक वीरांच्या, वीरांगनांच्या कथा घराघरात सांगितल्या गेल्या. शाहिरांनी डफांच्या तालावर या युध्दकथा तरुणांच्या कानात फुंकरल्या. कानगोष्टीसारख्या पसरत राहिल्या. गावागावात, वाळवंटात, विहिरीवर,

पाणवठ्यावर, चावडीवर रंगल्या. पिढ्यानपिढ्या पुढे सरकत राहिल्या. सारं माहीत होतं. ऐकलं होतं. पण कशामुळे, काय घडलं ते काळाच्या प्रवाहात वाहून गेलं होतं, विस्मृतीत गेलं होतं. त्यांच्याच या असं घडलं होतं हे सांगणाऱ्या कहाण्या.. इतिहास घडवणाऱ्या त्या शूरांची ही चरित्रं.

यासाठी अनेक संदर्भग्रंथांचा आधार घेतला. त्यातून महत्त्वाची माहिती मांडली. पहिल्या महाभारत युध्दापासून ते १८५७ च्या स्वातंत्र्ययुध्दापर्यंतच्या ज्या घटनांनी भारतीय राजप्रवाहाने नवीन वळण घेतलं, त्यांचं वर्णन लिहिलं. भारताच्या पारतंत्र्याच्या ग्रहण दशेतलं वास्तव मांडलं आहे. ७५० वर्षांच्या साडेसातीतून हे राष्ट्र कसं बाहेर पडलं याचा हा इतिहास आहे. युगानुयुगे, शतकानुशतके, सर्वांना यातून काय घडलं होतं, का घडलं होतं आणि असं घडलं होतं, हे सांगण्याचा हा प्रयत्न आहे.

स्मिता दामले.

**अनुक्रमणिका.**


१. गोकुळीचा राजा.

२. भीष्माष्टमी. उत्तरायण.

३. काश्मीर.

४. प्राचीन सिंध देश.

५. जो जीता वही सिकंदर

६. भारतीय युध्दशास्त्राचा इतिहास.

७. हर्षवर्धन.

८. पृथ्वीराज चौहान- महंमद घोरी.

९. अल्लाउद्दीन खिलजी-

१०. रझिया सुलतान-

११. राणा संग-बाबर.

१२. राणा प्रताप

१३. चांदबिबी –

१४. औरंगजेबाचे सत्ताग्रहण-

१५. शिवरायांचा आग्रा ते राजगड प्रवास.

१६. महाराणी येसूबाई.

१७. महाराणी ताराबाई

१८. पेशवे बाजीराऊ.

१९. पानिपत.

२०. थोरले माधवरावांचा कैलासवास.

२१. त्र्यंबकराव पेठे-मोतीतलावाची लढाई.

२२. स्थळ शनीवारवाडा.

२३. अहिल्याबाई होळकर.

२४. महादजी शिंदे.

२५. नाना फडणीस-पुण्यातील चातुर्य संपले.

२६. शहीद मंगल पांडे.

२७. झांशीची राणी लक्ष्मीबाई.

२८. समारोप.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

## कालानुक्रम

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **क्र.** | **नाव** | **स्थळ आताचे** | **काळ** | **वैशिष्ट्य.** |
| १. | **गोकुळीचा राजा.** | **वृंदावन-द्वारका-कुरुक्षेत्र-दिल्लीपासून अंबालापर्यंतचा मुलूख.** | **द्वापार युग.ख्रिस्तपूर्व ३१०२. या युद्धानंतर कलियुगाला सुरुवात झाली.** | कृष्ण चरित्र-महायुद्ध. योगेश्वराचा न धरी शस्त्र करी मी हा निर्णय.अर्जुनाचे रथ सारथ्य आणि पांडवांना रण नीतीचा सल्ला. |
| २. | **भीष्माष्टमी-एक उत्तरायण.** | **मीरत-पुरातन हस्तिनापूर.** | **महाभारतकाल . माघ अष्टमी .** | भीष्म चरित्र. शंतनुपुत्र देवदत्त. भीष्मांचे स्वर्गारोहण. |
| ३. | **काश्मीर.** | **काश्मीर. भारताचे शीर्षस्थान.** | **कश्यप ते १९४७ काल** | काश्मीरची निर्मिती. सर्व धर्मीय सत्तापालट. |
| ४. | **सिंध प्रांताची ओळख.** | **देबाल-आताचे पाकिस्तानातील कराची. अरोर येथे लढाई. -आता पाकिस्तानातील** | **इसवी सन ७११.** | सिंधचा हिंदू राजा दाहिर आणि अरब सेनापति मीरकासीम यांची अरोर येथे लढाई. दाहिरचा पराभव आणि मृत्यू. सिंधमध्ये मुसलमान राजवटीला सुरुवात. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **हैद्राबादजवळ.** | | |
| ५. | **भारतीय युद्धशास्त्राचा इतिहास.** | **भारतातील रणक्षेत्रे आणि जगातील युद्धकाळ.** | **प्राचीन ते अर्वाचीन काळ.** | भारत आणि जगाची शस्त्रास्त्रांची तुलना. |
| ६. | **जो जीता वही सिकंदर.** | **झेलमचा तीर-पंजाबचा भाग.** | **ख्रिस्तपूर्व ३२६.** | पंजाबचा राजा पौरव-पोरस आणि जगज्जेता सिकंदरचे युद्ध. पहिले भारतीय परकीय आक्रमणाचे युद्ध. |
| ७. | **चक्रवर्ती हर्षवर्धन.** | **कनोज-श्रीठाणेश्वर. आता पानिपताजवळ.पंजाब** | **इ. स. ५९० ते ६४७** | हर्ष चरित्र. चक्रवर्ती दानशूर राजा. |
| ८. | **पृथ्वीराज चौहान-महंमद घोरी.** | **भटिंडाजवळ, तराइनची दुसरी लढाई.. आजचा पंजाबचा उत्तरेचा भाग.** | **सन ११९२.** | अफगाणी महंमद घोरी-दिल्लीचा पृथ्वीराज चाहमान-चौहान यांच्यातील  युद्ध. चौहानचा पराभव. हिंदू राजवटीचा अंत. दिल्लीमध्ये  पुढे १५२६ सालापर्यंत सुलतानी राजवट सुरू. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९. | **रझिया सुलताना** | **दिल्लीजवळ कठियाल.** | **जन्म-सन १२०५ ते मृत्यू-१२४०.** | दिल्ली सल्तनतीतील शूर लढाऊ पहिली स्त्री सुलताना ..स्त्री सत्ताधिशाविरुद्धची लढाई. |
| १०. | **अल्लाउद्दीन खिलजी.** | **देवगिरि-दौलताबाद महाराष्ट्र.** | **पहिली स्वारी १२९६ साली. तेव्हा रामदेव यादवांशी खंडणीचा तह. दुसरी स्वारी सन १३०६मद्धे .तेव्हा पूर्ण पराभव. खिलजी सत्ता सुरू.** | २१ ऑक्टोबर १२९६ मध्ये अल्लाउद्दीन खिलजी तखतावर बसला. विंध्य पर्वत ओलांडून दक्षिण भारतात पाय ठेवणारा पहिला दिल्ली सुलतान. |
| ११. | **राणा संग-बाबर.** | **पानिपत-पंजाब.** | **२१ एप्रिल सन१५२६.** | मेवाडचा राणा संग आणि मंगोल सेनापति बाबर यांच्यात युद्ध. दिल्लीतील अफगाणी -तुर्की सल्तनत संपून मुघल राजवटीची सुरुवात. |
| १२. | **महाराणा प्रताप.** | **उदेपूर-कुंभाळगडा जवळ हलदी घाटीची लढाई.** | **१८ जून १५७६** | राणा संगचा नातू, उदेपूरचा महाराणा प्रताप आणि बाबरचा नातू, सम्राट अकबर यांची हलदी घाटाची लढाई. |
| १३. | **सुलताना चांदबिबी –** | **अहमदनगर** | **सन १५९९.** | अहमदनगरच्या निजामची राजकन्या आणि आदिलशाहची सून चांदबिबी आणि अकबर पुत्र दानियल यांची  लढाई.. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | **औरंगजेबाचे सत्ताग्रहण-** | **दिल्ली.** | **१३ जून १६५९. शालिमार बागेत सत्ता ग्रहणाचा सोहळा झाला.** | कपट-कारस्थानांनी, दाराशुको, मुराद आणि शाहाशूजा या आपल्या तीन भावांना ठार करून औरंगजेबाचे सत्ता ग्रहण. |
| १५. | **शिवरायांचा आग्रा ते राजगड प्रवास.** | **आग्रा ते राजगड.** | **१७ ऑगस्ट ते २० नोव्हेंबर १६६६ .** | महाराजांचा  आग्रा ते राजगड सुटकेचा मार्ग |
| १६. | **महाराणी येसूबाई.** | **रायगड. सातारा.** | **सन १६६२ ते १७२८.** | शिवरायांची सून. संभाजीराजांची महाराणी. शाहूराजांची माता.औरंगजेबाच्या कैदेत राहिल्या. बाळाजी विश्वनाथ पेशव्यांनी मायदेशी आणलं. |
| १७. | **महाराणी ताराबाई - एक अग्निरेखा** | **कोल्हापूर** | **सन १६७५ ते १७६१.** | शिवरायांची सून,राजराममहाराजांची महाराणी, कोल्हापूर गादीची निर्मिती. औरंगजेबाशी बहादुरीने लढा. |
| १८. | **बाजीराऊ. एक तेजस्वी तारा.** | **पुणे शनिवार वाडा.** | **पेशवेपद-१७ एप्रिल १७२० ते २८ एप्रिल १७४०.** | अद्‌भूत , अचाट, पराक्रमाने स्वराज्याच्या सीमा यमुनेपर्यंत नेल्या. माळवा-बुंदेलखंडाची स्थापना. निजामचा पराभव. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९. | **पानिपत. १४ जानेवारी १७६१.** | **पानीपत.** | **१४ जानेवारी १७६१. मकर संक्रांत.** | अहमदशहा अब्दालीच्या दिल्लीवरील आक्रमणाविरुद्ध, बादशहाच्या मदतीला सदाशिवभाऊ मराठी सैन्य घेऊन गेले. तिथे पराक्रम गाजवूनही पराभव झाला. |
| २०. | **थोरले माधवराव पेशवे.** | **थेऊर येथील गणपति मंदिरात कैलासवास.** | **१८ नोव्हेंबर १७७२.** | १६ व्या वर्षी पेशवेपदावर आले.पानिपता नंतरच्या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत १० वर्षे समर्थपणे कारभार केला. आणि २८ व्या वर्षी थेऊरच्या गणपति मंदिरात कैलासवास झाला. |
| २१. | **मोतीतलावाची लढाई.** | **कर्नाटकातील श्रीरंगपट्टणजवळील तलाव.** | **६ मार्च १७७१.** | मराठे आणि मैसूरचा सर्वेसर्वा हैदरअली यांच्यात मेलूकोटे डोंगरात लढाई सुरू झाली आणि श्रीरंगपट्टण जवळच्या मोती तलावापाशी संपली. सेनापति त्र्यंबकमामा पेठे यांनी हैदराचा पूर्ण पराभव केला. |
| २२. | **स्थळ शनीवारवाडा.** | **पुणे-शनिवार वाडा.** | **३० ऑगस्ट १७७३.** | शनिवार वाड्यात नारायणराव पेशव्यांचा गारद्यांकडून खून झाला. आनंदीबाईंनी धरावेच्या मारावे केलं असा आळ आला.. |
| २३. | **अहिल्याबाई होळकर.** | **इंदूर.** | **जन्म सन १७२५ -मृत्यू १३ ऑगस्ट १७९५.** | मल्हार राव होळकरांची सून, महान दानशूर. इंदूरच्या कारभारी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४. | **महादजी शिंदे.** | **ग्वाल्हेरचे संस्थापक.** | **जन्म-१७३३ मृत्यू १२ फेब्रुवारी १७९४.** | राणोजी शिंदे यांचे पुत्र. दिल्लीच्या बादशहाचे मिरबक्षी- वकील इ- मुतलक. नाना फडणीस आणि महादजी शिंदे यांनी दोघांनी मिळून स्वराज्य सांभाळलं. |
| २५. | **नाना फडणीस- पुण्यातील चातुर्य संपले.** | **पुणे.** | **जन्म- १७४३ मृत्यू १३ मार्च १८००.** | माधवराव पेशवे यांच्या मृत्यूनंतर कारभार सांभाळला. |
| २६. | **शहीद मंगल पांडे.** | **बराकपूर. बंगाल.** | **२९ मार्च १८५७.** | १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धात काडतूसांच्या प्रकाराने लष्करात उठाव- त्यातून ८ एप्रिलला फाशी. |
| २७. | **झांशीची राणी लक्ष्मीबाई. पराक्रमाची ज्योत.** | **ग्वाल्हेर मधील कोटाकी सराई.** | **१७ जून १८५८.** | झाशीची राणी. इंग्रजांशी सामना. ग्वाल्हेर येथील लढाईत मृत्यू.. |
| | **समारोप** | | | |

# गोकुळीचा राजा.



चारही युगांचा नायक युगंधर श्रीकृष्ण. या चराचराचा निर्माता आणि आणि ते खेळवणारा जगन्नियंता जगन्नाथ श्रीकृष्ण. याने केवळ अर्जुनालाच प्रवृत्तीपर गीता सांगितली नाही तर आजवरच्या सर्व मानवजातीला उद्योगाला लावलं. बालगोपाळांना दहीहंडीचा आनंद दिला, तरुणाईने रासगरबाच्या टिपऱ्यांवर आपली रग उधळली. कुणी त्याच्यासारखंच रुक्मिणींना पळवलं. कुणी द्रौपदीच्या वस्त्रपुरवठ्यापासून स्फूर्ती घेऊन, सुरतेला वस्त्रांचा उद्योग सुरु केला. कुणी कलाकाराने त्याचा पावा वाजवून कलेतून प्रसिध्दी मिळवली. त्याने सांगितलेल्या गीतेतील रहस्याचा वेध पिढ्यानपिढ्या अनेकानेक पंडितांनी घेतला. तुरुंगात जन्मलेल्या भगवंतांच्या गीतेचं रहस्यही लोकमान्यांनी तुरुंगात

बसूनच पूर्ण केलं. भारतीय संस्कृतीचा आत्मा भगवंत श्रीकृष्ण. तो गोपाळ, गिरिधारी, देवकीनंदन, सर्वांना माहिती आहे पण त्याचा बायोडेटा माहिती आहे?

श्रीकृष्ण म्हणजे वसुदेव-देवकी-नंद-यशोदा-पांडव-आणि कौरव हे तर सर्वतोमुखी आहे.

श्रीकृष्ण जिथे वाढला त्या गोकुळाचा नंद हा गोकुळचा मुखिया होता. त्याचं घराणं हे अभिरभानूचं. नंदाच्या वडिलांचं नाव चित्रसेन. नंदाला दहा भाऊ होते. सर्वजण एकोप्याने गोकुळात राहात होते. नंदराजाला दोन बायका होत्या. एक यशोदा आणि दुसरी रोहिणी. यशोदेला एक मुलगी होती, एकानंगा. आणि रोहिणीचे ३ मुलगे, मोठा बलराम, दुसरा गद आणि तिसरा सारण. एक मुलगी म्हणजे सुभद्रा. नंद राजा यादवांचा मांडलिक होता. देवकी आणि वसुदेवाच्या लग्नात आकाशवाणी झाली आणि यांचा मुलगा कंसाला मारणार हे कळल्यावर कंसाने दोघांना नजरकैदेत ठेवलं आणि त्यांच्या मुलांना जन्मल्याबरोबर ठार केलं, तान्ह्या कृष्णाला वसुदेवाने नंदराजाकडे पोचवलं. हा कंस म्हणजे मथुरेचा राजा उग्रसेन याचा मुलगा. कंसाने आपल्या आईवडिलांना तुरुंगात टाकून राज्य हिसकावलं. याच कंसाची चुलत बहीण ही देवकी आणि कंसाचा सासरा हा जरासंध. याच कंसाच्या जुलमाला प्रजा कंटाळली आणि मग कंसाचा सेनापती, कृष्ण बलरामाचा पराक्रम ऐकून कंसाच्या नाशासाठी कृष्णाला मथुरेत घेऊन गेला. कृष्ण बलरामाने कंसाचा वध केल्यावर उग्रसेनला आणि वसुदेव देवकीला कैदेतून मुक्त केलं. नंतर कंसाचा सेनापती सात्यकी, सारथी दारुकी हे कृष्णाला येऊन मिळाले.

कृष्णाला दोन माता आणि २ पिता होते तसे गुरुही दोन होते. सांदिपनी आणि अंगिरस. यातील सांदिपनींच्या आश्रमात बलरामाबरोबर तो राहिला. त्याचा तिथला मित्र हा सौराष्ट्रातील कुचैल गावचा ब्रह्मकुमार सुदामा. उज्जयनीजवळ क्षिप्रेच्या काठावर, अवंति गावात सांदिपनींचा अंकपाद आश्रम होता.

कृष्ण हा यादवांची जी १८ कुळं होती त्यातल्या वृष्णि कुलातला. शूरसेनाच्या वंशातला. त्याला दहा काका आणि ४ आत्या. या चार आत्या – १. चेदि देशाचा राजा दमघोष याची पत्नी श्रुतश्रवा. यांचा मुलगा शिशुपाल. २.अवंति नगराची राणी राजाधिदेवी. तिचा नवरा जयसेन आणि २ मुलगे विंद – अनुविंद.३. करुष देशाची राणी श्रुतदेवा. तिचा पती वृध्दशर्मा आणि मुलगा दंतवक्रा. ४. कुंती आणि तिचा पती पंडू. मुलगे पांडव. कुंतीला तिच्या पित्याने, शूरसेनने कुंतिभोजाला देऊन टाकली त्यामुळे ती आपल्या भावंडांबरोबर वाढली नाही. कृष्णाच्या चुलतभावाचं नाव उध्दव. म्हणजे उत् - धव, वर जाणारी ज्योत. उध्दवाला २ भाऊ होते, एक चित्रकेतु आणि बृहतबल.

मथुरा ही मूळ शत्रुघ्नाने वसवलेली मधुपुरी नगरी असं मानतात. पुढे ही नगरी यादवांनी जिंकली आणि तिचं नाव मधुरा केलं. त्याचाच अपभ्रंश मथुरा. कंसाचा सासरा जरासंध याने मथुरेवर सतत हल्ले करुन यादवांना त्रास दिला तेव्हा यादवांना नवीन वस्ती शोधणं जरुरीचं झालं. तेव्हा सगळे यादव वृंदावनात जाऊन राहिले. कृष्ण गोकुळात वाढला. मोठा पुत्र म्हणून बलरामाला गोकुळ आणि वृंदावन मिळाल्यावर कृष्णाने स्वत:साठी आणि यादवांसाठी आणखी एक राज्य तयार केलं ते द्वारका. हिचं मूळ नाव कुशस्थली. मथुरेतील अनेक

यादव मग द्वारकेला राहायला आले. अनेक दारं या नगरीला होती म्हणून द्वारका. कुशस्थली आणि शंखासूराचं द्वीप अशी दोन बेटं मिळून द्वारका बनली. गर्ग ऋषींनी या नगरीची रचना आणि बांधकाम केलं.

यादवांची आणखी ४ राज्यं होती. १. मुचकुंदाने वसवलेलं महिष्मती म्हणजे आजचं महेश्वर. २. पद्मवर्णाने वसवलेलं वेण्णा काठचं महाबळेश्वर आणि करवीर. करवीरचा राजा शृगाल होता. शृगाल म्हणजे कोल्हा. म्हणून त्या नगरीचं नाव कालांतराने कोल्हापूर झालं. ३. यदुपुत्र सारस याने निर्माण केलेलं क्रौंचपूर. ४. हरित राजाने वसवलेलं पश्चिम किनाऱ्यावरचं राज्य.

कृष्णाला आठ बायका होत्या. पण राधेचं अस्तित्त्व सापडत नाही.

कृष्णाच्या राण्यांची नावे -

१. सत्यभामा - ही पट्टराणी होती म्हणजे इतर सर्व राण्यांमधे ओळखता यावी म्हणून मुख्य राणी कपाळावर सोन्याचा पट्टा बांधत असे. ही द्वारकेचा एक मंत्री सत्राजित आणि त्याची पत्नी वीरवती यांची कन्या. याच सत्राजिताकडे स्यमंतक नावाचा अति मौल्यवान मणि होता. सत्यभामेला ३ मुलगे होते. ते म्हणजे सुभानु, स्वर्भानु आणि प्रभानु.

२. रुक्मिणी - ही विदर्भाचा राजा भिष्मक आणि त्याची पत्नी शुध्दमती यांची कन्या. हिला ५ भाऊ होते. रुक्मिणीच्या मुलांची नावं – प्रद्युम्न, चारुदेष्ण, सुदेष्ण, चारुदेव, आणि कन्या - चारुमति.

३. जांबवती – ऋक्षवान अरण्यातील आदिवासी जांबवंत याची आदिवासी कन्या. हिच्या मुलांची नावं- सुमित्र, सांब, पुरुजित, कन्या- गिरिजा.

४. मित्रविंदा – ही कृष्णाची अवंतिची आत्तेबहिण होती. हिचे मुलगे- वृक, हर्ष, अनिल.
५. सत्या – कोसलराज नग्नजिती कन्या. वीर, चंद्र, अश्वसेन हे तिचे पुत्र.
६. लक्ष्मणा – मद्र देशाची राजकन्या. प्रद्योष, गात्रवत, उर्ध्वांग हे पुत्र.
७. कालिंदी -खांडव वनातील राजकन्या. हिचे पुत्र – श्रुत, पूर्णमास, दर्श,
८. भद्रा – केकेय देशाची राजकन्या. संग्रामजित, शूरसेन, शूर.

कृष्णाच्या गरुडध्वज रथाच्या घोड्यांची नावं – शैब्य, सुग्रीव, बलाहक, मेघपुष्प. कृष्णाचा शंख पांचजन्य. कृष्णाच्या रथाला दोन चाकं होती हे लोकमान्यांनी संस्कृत श्लोकावरुन सांगितलं कारण संस्कृतमधे एकवचन-द्विवचन-अनेकवचन असतं आणि कृष्णाच्या रथाला द्विवचन लावलेलं आहे.

कृष्णाची नावं – १. मुरारि – नरकासूराचा सेनापती मुरा याचा वध केला म्हणून मुरारि. अरि म्हणजे शत्रू. नरकासूर हा प्राग्ज्योतिषपूरचा राजा, (आताचं गौहाटी) ब्रह्मपुत्रेच्या काठी याचं राज्य होतं. नरकासूराचा वध अश्विन वद्य १४ या दिवशी झाला. नरकचतुर्दशी ही आपली दिवाळी. २. दामोदर – यशोदा कृष्णाच्या पोटाभोवती दोरीने बांधून ठेवत असे म्हणून दामोदर.३. शूरसेनाचा वंशज म्हणून शौरी. ४. पार्थाचा म्हणजे अर्जुनाचा सारथी म्हणून पार्थसारथी. शिवाय गोपाल, गिरिधारी, मोहन ही नावं होतीच.

कौरव पांडवांच्या महायुध्दात कृष्णाने पांडवांच्या बाजूने युध्द जिंकण्याच्या युक्त्या सांगितल्या. त्याची सेना दुर्योधनाने घेतली. महायुध्दात सर्व

पुत्रांचा नाश झाल्यामुळे दु:खाने पोळलेल्या गांधारीने कृष्णाला शाप दिला. जरा नावाच्या व्याधाचा पायाला बाण लागून द्वारकेजवळ, भालकी तीर्थावर, आताच्या वेरावळजवळ, कृष्णाची अवतारसमाप्ती झाली. महाभारतातील कौरव पांडव यांच्यातील युध्द हे भारतीय इतिहासात गाजलेलं कुरुक्षेत्रावरील पहिलं युध्द. त्यानंतर त्या भूमीवर सत्तापालट घडवणारी इतिहास निर्माण करणारी खूप युध्दं खेळली गेली. तेव्हा गांधार देश आर्यांचा होता. गांधारीचा भाऊ म्हणून शकुनी हस्तिनापुरात आला. आपल्या बहिणीच्या मुलांच्या हितासाठी या शकुनीमामाने, पांडवांना कपटीपणाने द्यूतात हरवलं आणि वनवास भोगायला लावला. तेव्हापासून पुढे भारतीयांच्या मानसिकतेत काहीही फरक पडला नाही. परक्यांनी आपल्या देशात यायचं, भावाभावांमधे भांडणं लावायची आणि राज्य बळकवायची, भारतातील आपली संपत्ती लुटून आपल्या देशात न्यायची ही परंपरा शतकानुशतके चालू राहिली. अज्ञातवासातून यशस्वीपणे प्रकटल्यानंतर पांडवांनी ५ भावांसाठी, इंद्रप्रस्थ, तिलपत, (स्थलपत), सोनपत, पानिपत, बागपत, ही ५ गावं हक्काची म्हणून मागितली. ती देण्याचं दुर्योधनाने नाकारलं. श्रीकृष्णाची मध्यस्थीही यशस्वी झाली नाही. शेवटी युध्द हा एकच मार्ग राहिला. दुर्योधनाने कृष्णाची फौज घेतली आणि पांडवांच्या मागे स्वत: भगवान कृष्ण रणनीती सांगायला उभे रहिले. अर्जुनाचं सारथ्य करायला श्रीकृष्ण उभे राहिले. युध्द चालू असेपर्यंत हाती शस्त्र न धरण्याची प्रतिज्ञा त्यांनी केली.

दुसरीकडे, दुर्योधनाच्या दरबारात, जोपर्यंत कृष्ण उभा आहे, तोपर्यंत तुम्हाला जय मिळणे अशक्य आहे हे भीष्मांनी भर दरबारात दुर्योधनाला

सांगितलं. त्यावर दुर्योधनाला पाठिंबा देणाऱ्या कर्णाने प्रतिज्ञा केली की जोपर्यंत भीष्म मैदानात आहेत तोवर मी लढणार नाही. भीष्मांनी दुर्योधनाला २ अटी घातल्या. त्यात पहिली अट म्हणजे एकतर मी किंवा कर्ण सेनापती राहील. तेव्हा दुर्योधनाने भीष्मांना सेनापती केलं. दुसऱ्या अटीप्रमाणे पांडवांना ठार करणं जमलं नाही तरी त्यांचे १० हजार सैनिक रोज मारीन हे भीष्मांनी सांगितलं. मग कुरुक्षेत्र ही युध्दभूमी निवडली गेली. कौरवांचा मूळ पुरुष कुरु यानेच हे तीर्थस्थान निर्माण केलं होतं. हाच प्रदेश समंतपंचक या नावाने प्रसिध्द झाला होता. त्यावेळी कुरुक्षेत्र हे आजच्या दिल्लीपासून अंबाला एवढ्या भागात पसरलं होतं. त्यात अनेक गावं, डोंगर, नद्या होत्या. प्रत्येक देशाच्या राजाने आपला तळ, सेना-हत्ती-घोडे, एकेका भागात लावला होता. त्यामुळे एवढी मोठी १८ अक्षौहिणी सेना खूप मोठ्या मुलखात पसरली होती. शिवाय या सेनेत सगळेच लढवय्ये नव्हते. त्यात वाद्यं वाजवणारे, सैनिकाला बाण पुरवणारे, शंख करणारे, लढाईच्या जागी सेनेला पाणी पुरवणारे, बाजार बुणगे, असेही होते.

एका अक्षौहिणीची संख्या किती? तर एक अक्षौहिणी म्हणजे २१,८७० रथ, २१८७० गज, ६५६१० घोडे, १०९३५० फौज. त्यांचे पत्ती, सेनामुख, गुल्म, गण, वाहिनी, पृतन, चमू, अनिकिनि आणि अक्षौहिणि असे भाग होते. त्यात एक पत्ती म्हणजे १ हत्ती, एक रथ, त्याचे ३ घोडे, आणि ५ पदाती म्हणजे सैनिक. आणि त्यानंतर पुढील प्रत्येक पायरीची तिप्पट आणि शेवटची अक्षौहिणी म्हणजे १० अनिकिनी म्हणजे १ अक्षौहिणी,असं गणित होतं.

स्मशान, देवळं, पवित्र स्थळं, आश्रम सोडून सपाट मैदानावर हिरण्यावती नदीच्या दोन्ही फौजांचे तळ पडले. हस्तिनापूरावरुन म्हणजे

आजच्या मीरत वरुन दुर्योधन कुरुक्षेत्रावर आला. आपापल्या फौजेला खुणेचे शब्द, दागिने, कपडे, परवलीचे शब्द दिले गेले. कृष्णाचा गरुडध्वज, अर्जुनाचा नंदीघोष, भीष्मांचा गंगौघ, हे रथ युध्दभूमीवर हिंडायला लागले.सूर्योदयाबरोबर युध्दाला सुरुवात होऊन सूर्यास्ताला युध्द थांबणार होतं. कृष्णाचा पांचजन्य, भीष्मांचा गंगनाभ, अर्जुनाचा देदत्त, भीमाचा पौड्र, धर्माचा अनंतविजय, नकुलाचा सुघोष, आणि सहदेवाचा मणिपुष्पक , धृष्टद्युम्नाचा यज्ञदत्त शंख वाजले की युध्दाला सुरुवात होणार होती. कौरवांची सेना ११ अक्षौहिणी आणि पांडवांची ७ अक्षौहिणी सेना होती. कौरवांची ११ अक्षौहिणी आणि पांडवांची ७ अक्षौहिणी.

मार्गशीर्ष वद्य द्वितियेला युध्द सुरु झालं.

युध्दाला सुरुवात करण्यासाठी दोन्ही फौजा एकमेकींच्या समोर आल्या तेव्हा आपल्याच लोकांना पाहून, यांना कसं मारायचं असा प्रश्न अर्जुनाला पडला तेव्हा खचलेल्या मनाच्या सव्यसाचीला (जो दोन्ही हातांनी बाण मारु शकतो) भगवंतांनी प्रवृत्तीपर गीता सांगितली. पहिले दिवशी विराटपुत्र श्वेत आणि उत्तर हे पुत्र मारले गेले.

पहिले ७ दिवस घनघोर युध्द झालं. दुर्योधनाचे ४० भाऊ, विराटपुत्र, शल्यपुत्र, असे अनेक वीर मारले गेले. अर्जुन, भीष्म यांच्यात पराक्रमी युध्द झालं. पण त्या रात्री, दुर्योधनाने भीष्मांना दोष दिला की ते पांडवांशी ममतेने वागत आहेत. तेव्हा ८ व्या दिवशी भीष्मांनी प्रतिज्ञा केली की उद्या कृष्णाला शस्त्र हाती घ्यायला लावीन. ९ व्या दिवशी भीष्मांनी, अर्जुनाला ठार करीन अशी प्रतिज्ञा केली.

त्या दिवसापासून कृष्णाची कूटनीती सुरु झाली. तोपर्यंत अर्जुनाच्या रथाचं सारथ्य करणं एवढंच काम त्याने केलं. रथ शत्रूच्या फौजेत घुसवायचा, सैनिक मारायचे, अर्जुनाला हवं असेल तिथे अलोट गर्दीतून न्यायचा हे सारथ्याचं काम..ते कृष्णाने उत्तम केलं.

रोज लढाई थांबल्यावर रात्री कृष्णाच्या डेऱ्यात सभा भरत असे आणि गुप्तहेरांकडून आलेल्या बातम्यांवर विचार केला जात असे. ९व्या रात्री अर्जुनाला ठार करण्याची भीष्मांची प्रतिज्ञा कळल्यावर कृष्णाने. द्रौपदीला चेहरा झाकेल असा पदर ओढून भीष्मांकडे जायला सांगितलं. द्रौपदी तशी भीष्मांकडे गेली. तिने वंदन केल्यावर भीष्मांनी तिला सौभाग्यवती भव असा आशीर्वाद दिला. तेव्हा द्रौपदीने आपलं रुप उघड करत आपल्या पतीला मारण्याची प्रतिज्ञा केली असल्याचं सांगितलं. त्यावर भीष्म म्हणाले की मी माझी प्रतिज्ञा मोडणार नाही. तुला दिलेला आशीर्वादही खोटा होणार नाही म्हणून उद्या रथात शिखंडीला अर्जुनाच्या पुढे उभं करायला कृष्णाला सांग. मी स्त्रीवर बाण मारत नाही. शिखंडी आधी स्त्री होती, मग पुरुष झालेली आहे.

**१० वा** दिवस उजाडला. कृष्णाच्या रथावर शिखंडी आणि त्याच्यामागे अर्जुन उभे राहिले. बाणांच्या वर्षावात शिखंडीने भीष्मांचा सारथी मारला. भीष्मांनी आपल्या भात्यातून वेगवेगळे बाण काढत, भीष्मांनी वेगवेगळ्या आकाराचे बाण मारले, तेव्हा कृष्णाने रथ अधांतरी उचलला. कृष्णाचं हेच सारथ्य करण्यातलं नैपुण्य. रथ उंच गेल्यामुळे भीष्मांना फक्त कृष्णच दिसला. शिखंडी आणि अर्जुन दिसलेच नाहीत. थक्क करणारं युध्द सैनिकांनी त्यादिवशी पाहिलं. सूर्यास्त जवळ आला. तेव्हा भीष्म घायाळ होऊन रथात पडले होते.

शंतनुने त्यांना इच्छामरणाचा वर दिला होता, त्याप्रमाणे उत्तरायण सुरु झाल्यावर ५६ दिवसांनी त्यांनी प्राणत्याग करायचं ठरवलं. तोपर्यंत ते शरांच्या ढीगावर पडून राहिले. त्या रात्री गुप्तहेरांनी बातमी आणली की भीष्म पडले म्हणून आता कर्ण रणांगणात येणार.

**११ वा दिवस** – भीष्मांच्या जागी द्रोणाचार्य सेनापती झाले. कर्णाची शक्ती कमी करणं आता महत्त्वाचं होतं. त्यादिवशी कृष्णाच्या सल्ल्यानुसार कुंती सकाळी नदीवर गेली. तिथे कर्ण सूर्योपासना करत होता. तू माझा पुत्र आहेस आणि पांडव तुझे भाऊ आहेत, त्यांना मारू नकोस, असं कुंतीने त्याला विनवलं. तेव्हा अर्जुनाला सोडून मी बाकीच्यांना अभय देत आहे असं कर्ण म्हणाला. कुंतीच्या निदान ४ मुलांचे तरी प्राण यामुळे वाचले. त्यादिवशी दुर्योधनाने धर्माला जिवंत पकडून आणण्याची जबाबदारी द्रोणांवर टाकली. ही बातमी कृष्णापर्यंत रात्री पोचली.

**१२ वा दिवस** - सकाळी युध्दाला सुरुवात झाल्यावर भीम आणि अर्जुन द्रोणांसमोर आले. भीम द्रोणांना मारायला धावला तेव्हाच नरकासूराचा पुत्र भगदत्त हा धर्मराजाला मारायला धावला. त्याच्या डोक्यावर केसांचं दाट जाळं होतं. त्याच्या भुवयाही जाड जाड होत्या, म्हणून त्याने कपाळावर कापडी पट्टी बांधली होती. कृष्णाने ती पट्टी तोडायला अर्जुनाला सांगितलं. अर्जुनाने आपल्या बाणाने ती पट्टी तोडली तेव्हा ती घसरली आणि भगदत्ताच्या डोळ्यांवर आली. भगदत्ताला काही दिसेना, तेव्हा तो पळून गेला. धर्मराजाचा जीव वाचला.

**१३ वा दिवस.** – हा चक्रव्यूहाचा दिवस होता. व्यूह कसा भेदायचा ते कृष्णाने अभिनन्यूला आदल्या रात्री शिकवून ठेवलं होतं. दुर्योधनपुत्र लक्ष्मण आणि अभिमन्यूचं त्यादिवशी गदायुध्द झालं. यात दोघेही बेशुध्द झाले. पण लक्ष्मण आधी शुध्दीवर आला. त्याने अभिमन्यूला ठार केलं. तेव्हा अभिमन्यूचं शव जयद्रथाने लाथेने सरळ केलं. ते पाहून संतापलेल्या अर्जुनाने दुसरे दिवशी सूर्यास्ताच्या आधी जयद्रथाला ठार करण्याची नाहीतर प्राणत्याग करण्याची प्रतिज्ञा केली. त्या रात्रीच्या सभेत अर्जुनाच्या आततायी वागण्यावर कृष्णाने अर्जुनाला खूप दोष दिला. युध्दात डोकं थंड ठेव असं बजावलं. अर्जुनाला शंकराला शरण जाण्याचा सल्ला दिला. अर्जुनाने ते केल्यावर शंकराने प्रसन्न होऊन पाशुपत अस्त्र अर्जुनाला दिलं.

**१४ वा दिवस** – कौरवांनी जयद्रथाला दिवसभर लपवून ठेवलं. अर्जुनाला जयद्रथ सापडला नाही. तेव्हा सूर्यास्ताला अर्जुनाने चिता रचली आणि तो सरणावर झोपला. इतक्यात सूर्याभोवतीचं पटल बाजूला झालं आणि सूर्य अजून आकाशातच आहे हे सर्वांनी पाहिलं. अर्जुन जळून खाक होणार हे पाहायला जयद्रथ त्या जागी आलेला होता.. सूर्य वरतीच आहे आणि जयद्रथ समोर आहे हे पाहिल्याबरोबर अर्जुनाने सरणावरूनच जयद्रथावर बाण सोडला आणि त्याला ठार केलं. त्यादिवशी कृष्णाने मायावी अंधार केला होता आणि अर्जुनाचा प्राण वाचवला होता हे सर्वांना दिसलं. त्याच दिवशी घटोत्कच आणि दुर्योधनामधेही युध्द झालेलं होतं. पांडवांना मारण्यासाठी राखून ठेवलेलं अमोघ वैजयंती अस्त्र दुर्योधनाने घटोत्कचावर सोडलं. घटोत्कच भूमीवर कोसळला आणि मरता मरता अनेकांना चिरडून मारुन मेला.

**१५ वा दिवस...**जेव्हा दुसरे दिवशीची रणनीती ठरवायला सभा झाली, तेव्हा कृष्णाने भीमाला सांगितलं की उद्या सकाळी तू मालव राजाचा अश्वथ्थामा नावाचा हत्ती मारायचा आणि अश्वत्थामा मेला अशी बातमी सगळीकडे पसरवायची. द्रोण धर्माकडे खरं खोटं विचारायला येतील तेव्हा धर्माने फक्त नरो वा कुंजरोवा, म्हणजे नर की हत्ती ते माहीत नाही एवढंच म्हणायचं. भीमाने ते काम केलं. द्रोण धर्माकडे खरं खोटं विचारायला आले. धर्मानेही कृष्णाने पढवल्याप्रमाणेच उत्तर दिलं. द्रोणाचार्य हे ऐकून खचले आणि रथात बसले तेव्हा द्रुपदपुत्राने त्याचं शीर उडवलं. आणि द्रोणाचार्यांना ठार केलं दुर्योधनाची शक्ती आणखीनच क्षीण झाली. त्या दिवशी कर्ण सेनापती झाला. १६ व्या दिवशी आता कर्ण आणि अर्जुनात युध्द होणार हे नक्की झालं.

१६ **वा दिवस....** १६ व्या दिवशी सकाळपासून कर्ण आणि अर्जुनात अनिर्णित असं तुंबळ युध्द झालं. कर्णाचा सारथी सत्यसेन ठार झाला. लढाई मूळ जागेपासून ३ कोसांवर झाली. तो दिवस अनिर्णित राहिला. रात्री बातमी मिळाली की कर्णाच्या रथाचं सारथ्य उद्या नकुल सहदेवांचा मामा शल्य हा करणार आहे. मग श्रीकृष्णांनी सहदेवाला शल्याकडे पाठवलं आणि निरोप दिला की उद्या कर्णाची मन:शांती ढळेल असं काहीतरी शल्याने बोलायचं आणि कर्णाच्या मनाला ठेच लागेल असं काम करायचं. उद्या कर्णाच्या मनाची एकाग्रता मोडली पाहिजे. सहदेवाने मामाला हा निरोप पोचवण्याचं काम चोख केलं.

**१७ वा दिवस. ....** या दिवशी दोन्ही फौजा अमिन नावाच्या टेकडीपाशी जमल्या. कौरवांनी आपल्या सेनेची व्यूहरचना सूर्यबिंबाप्रमाणे गोल

केली होती. त्या दिवशी भीमाने कर्णपुत्र प्रसेन याला मारलं. दुसरा मुलगा वृषसेनाला बेशुध्द केलं. आणि मग तो दु:शासनाला भिडला. मुष्टीयुध्दात दु:शासनाला ठार करुन त्याच्या रक्ताने भरलेल्या हातांनी त्याने द्रौपदीचे केस बांधले. वस्त्रहरणाच्या दिवसापासून द्रौपदीने आपले केस मोकळे ठेवले होते. या दिवशी कर्ण आणि अर्जुन याच्यात महाभयंकर युध्द झालं. कृष्णाने कर्णासाठी ती जागा मुद्दाम निवडली होती कारण तिथे दलदल होती. सूर्य जसजसा वर यायला लागला तसतशी माती घट्ट व्हायला लागली आणि कर्णाचं चाक त्यात अडकायला लागलं. रथ हलेनासा झाला तेव्हा कर्ण खाली उतरला आणि मी नि:शस्त्र आहे, माझ्यावर बाण मारु नकोस असं अर्जुनाला म्हणाला. तेव्हा आजवर कर्णाने केलेल्या अन्याय्य वर्तनाचा पाढा वाचत तेव्हा कुठे गेला होता तुझा क्षात्रधर्म असं विचारत कर्णाला निरुत्तर केलं. अर्जुनाने मग आपला अंजलिक बाण कर्णावर टाकून त्याला ठार केलं. मरतांना कर्णाने आपल्या देहावर अंत्यसंस्कार कृष्णानेच करावेत असं सांगून त्याने प्राण सोडला. त्याप्रमाणे कृष्णाने कर्णाचं शव कुमारी टेकडीवर नेऊन दहनसंस्कार केले.

सर्व कौरव ठार झाले आहेत, आता एकटा दुर्योधनच जिवंत राहिला आहे हे कळल्यावर गांधारीने दुर्योधनाला निरोप पाठवला की जन्मवेळेस होतास तसा भेटायला ये. लगेच कृष्ण सहज म्हणून दुर्योधनाला भेटायला गेला. गप्पा मारतांना आईकडे जातांना निदान केळीचं पान तरी झाकून जा असा सल्ला दिला. त्याप्रमाणे दुर्योधन गांधारीला भेटायला फक्त केळीचं पान तेवढं लावून गेला. तेव्हा गांधारी म्हणाली की माझ्या पातिव्रत्याच्या सामर्थ्यावर मी तुला वज्रदेही करणार आहे. आता तुझा झाकलेला तेवढा भाग दुर्बल राहील. इतर

भाग वज्रदेही होईल. कृष्णाने तुला फसवलं दिसतंय. नाहीतर उद्याच्या भीमाबरोबरच्या युध्दात तुझाच जय झाला असता.

**१८ वा दिवस -** या दिवशी दुर्योधन सूर्यकुंड तलावात लपून बसला. त्याला भीमाने द्वंद्व खेळायला बोलावलं. बाहेर आला नाहीस तर तलावाचं पाणी विषारी करीन असं धमकावलं. तेव्हा दुर्योधन तलावाच्या बाहेर आला. पण त्याच्या वज्रदेहामुळे भीमाचे ठोसे फुकट जायला लागले. तेव्हा कृष्णाने सतत मांडीवर ठोसे मारायच्या खुणा केल्या, पण भीमाला त्या कळल्या नाहीत. तेव्हा अर्जुनाने आपलं पितांबर बाजूला करुन वार करण्याची जागा दाखवली. तो इशारा कळताच भीमाने केळीचं पान झाकलेल्या भागावर तडाखा मारला. त्याबरोबर दुर्योधनाचा अंत जवळ आला. पण मरता मरता त्याने अश्वत्थाम्याला सेनापती केलं आणि मग प्राण सोडला. दुर्योधन संपल्यावर १८ दिवस चाललेलं महायुध्द संपलं. कौरवांचा नाश झाला.

दुसरे दिवशी कृष्ण, पांडवांना घेऊन सांत्वनासाठी धृतराष्ट्र गांधारीला भेटायला गेला. त्यांना राजवाड्याच्या बाहेर भीमाचा चेपलेला पुतळा दिसला. दुर्योधनाने मुष्टीयुध्द खेळण्याच्या सरावासाठी तो धातूचा पुतळा तयार केला होता. कृष्णाने तो पुतळा बरोबर घेतला. राजवाड्यात गेल्यावर अंध धृतराष्ट्राने भीमाला मिठी मारण्यासाठी जवळ बोलावलं तेव्हा कृष्णाने तो पुतळा आलिंगनासाठी पुढे केला. राजाने तो इतका जोरात आवळला की भीम त्या जागी असता तर मेलाच असता. मग सगळे गांधारीला भेटायला गेले. दु:खाने विकल झालेल्या गांधारीने कृष्णाला शाप देत म्हटलं की तूही असाच व्याधाच्या

बाणाने रानावनात एकाकी मरण पावशील. श्रीयोगेश्वराला ते माहीत होतं. त्याने शांत मनाने तो शाप स्विकारला.

आपल्या तळावर आल्यावर रात्री कृष्ण आणि पांडव शांत गारव्यात नदीकाठी गेले. तेव्हा अश्वत्थामा आपल्या पित्याच्या मृत्यूचा सूड

घेण्यासाठी पांडवांच्या छावणीत आला. छावणीच्या दारापाशी कृष्णाने एक मांत्रित यंत्रपुतळा ठेवलेला होता. अश्वत्थाम्याने अंदाजाने शिवस्तुती मंत्र म्हटला. त्याबरोबर पुतळा बाजूला झाला. अश्वत्थाम्याने आत शिरून गाढ झोपलेल्या सर्व पांडवपुत्रांना निर्दयीपणे कापून काढलं. अभिमन्यूची विधवा गर्भवती पत्नी उत्तरा हिच्या पोटावर ब्रह्मास्त्र टाकलं आणि द्रोणाचार्यांच्या मरणाचा सूड घेऊनतो निघून गेला. ही बातमी कृष्णाला कळल्याबरोबर सर्वजण धावत आले. कृष्णाने, त्या क्षीण होत चाललेल्या गर्भावर मंत्र म्हणून जिवंत केलं. तोच परिक्षीण होत चाललेला जीव, परिक्षित नावाने जगला. आणि पांडवांचा वंश चालू राहिला. त्या युध्दानंतर कुरुक्षेत्रावर उरलं ते, भयाण कलेवरं, तुटक्या मणिमोत्यांचे हार, बाजूबंद, हत्तींच्या शुंड, जखमी घोडे, मोडलेले रथ, मोडक्या बाणांचा खच, रक्तामांसाचा चिखल.... आणि अनेक विधवांचे, मातापित्यांचे गांधारी, कुंती, द्रौपदीचे विलाप.

आपल्या विजयानंतर धर्माने हस्तिनापुरात येऊन राज्याभिषेक करुन घेतला. विजयासाठी, राज्यवर्धनासाठी कृष्ण-अर्जुन, चंद्रगुप्त - चाणक्य, यांच्या बुध्दी शक्ती आणि गुप्तहेरांच्या कामगिरीवर युध्दं जिंकली जातात त्याचं पहिलं उदाहरण म्हणजे महान महाभारत युध्द. भगवंताने शेवटच्या आठ दिवसांमधे विजय आपल्याकडे वळवला. शिवाजी महाराज एकटेच असे ज्यांना

चाणक्याची गरज भासली नाही. एक बहिर्जीनाईक गुप्तहेर त्यांच्यासाठी पुरेसा होता.

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss

# शंतनुनंदन देवदत्त

# भीष्म.



भारतीय राजघराण्यांच्या इतिहासाला त्रेता युगातील रामायणापासून सुरुवात होते. द्वापार युगातील महाभारतातील कुरु कुलाच्या क्षयाने ती कथा रंगते. पितामह भीष्म हा पृथ्वीतलावरील होऊन गेलेल्या आजवरच्या सर्व महायुध्दांमधला आद्य सेनापती.

भारतीय इतिहास कथनाला तशी तर सुरुवात होते ती त्रेता युगातील रामायणाने. राजकुमार राम आणि रावण म्हणजेच भारत विरुध्द श्रीलंका अशी ही युध्दकथा वाल्मिकी ऋषींनी रामायणात वर्णन केली आणि राजकीय कादंबरीच्या आद्य लेखनाला सुरुवात केली. एक बाणाने विध्द झालेल्या क्रौंच पक्ष्याच्या युगुलाला पाहून वाल्मिकींना ही कथा सुचली. मा निषाद प्रतिष्ठां त्वं..अगम: शाश्वती: समा: ..यत् क्रौंच मिथुनादेकं..अवधी: काममोहित: हा त्यांचा श्लोक हा भारतीय साहित्यातील आद्य श्लोक.

त्यानंतर द्वापार युगात घडलं ते महाभारत. देवव्रत, कुरुवृध्द, गांगेय, पितामह, भीष्म, या नावांनी परिचित, कुरुकुलाचा एक भक्कम आधारस्तंभ. माघ अष्टमीला उत्तरायण सुरु झाल्यावर हे भीष्म स्वर्गस्थ झाले. कुलरक्षणासाठी, विस्तारासाठी, स्वत:च्या निस्सीम, कर्तव्यकोषातच गुरफटत आणि अडकत गेले रेशीम किड्यासारखे.. शेवटी कुरुकुलाचा नाश पाहात स्वर्गस्थ झाले.

भीष्मांची जन्मकथा सुरु होते ती इंद्राच्या दरबारात. इंद्राचा दरबार भरला होता. त्यातच बसला होता शूर पराक्रमी राजा महाभिष ज्याने १ हजार अश्वमेध यज्ञ आणि १०० राजसूय यज्ञ करुन इंद्राला खूष केलं होतं. तेवढ्यात चांदण्याच्या रंगाचं वस्त्र नेसलेली सुंदर गंगा सभेत आली. त्याचवेळी वाऱ्याने तिचं वस्त्र सरकलं. सर्व राजांनी मान खाली घातली पण महाभिष मात्र तिच्याकडे एकटक पाहात राहिला..ब्रह्मदेव या असभ्यपणाने संतापले आणि राजाला शाप दिला की तू मृत्यूलोकात जाशील, ही गंगा तुझी बायको म्हणून तिकडे येईल..तुला न आवडणाऱ्या गोष्टी करेल. तुला तिच्या वागण्याचा राग येईल..मग त्यातून तुला मुक्ती मिळेल आणि तू परत स्वर्गात येशील. मर्त्यलोकामधे कुणाच्या आसऱ्याने रहावं या विचारात जात असतांना गंगेला आठ वसुकुमार गंभीर चेहऱ्याने जातांना दिसले.. ती त्यांना भेटली आणि त्यांच्या चिंतेचं कारण विचारलं. त्या वसूंपैकी द्यू नावाच्या वसूने वसिष्ठ ऋषींची कामधेनू नावाची गाय चोरलेली होती. आपली गाय चोरली हे वसिष्ठांना कळल्यावर त्यांनी सर्व वसूंना तुम्ही एकेक वर्ष मनुष्यलोकात जाऊन पडाल असा शाप दिला आणि त्यातल्या द्यू वसूला मात्र तुला खूप वर्षे मृत्यूलोकात रहावं लागेल. तुला राजवैभव मिळेल पण स्त्रीसुख मिळणार नाही, असा शाप दिला. हे त्यांच्या चिंतेचं कारण

कळल्यावर गंगेने आपली कहाणी सांगत चर्चा केली. मग सर्वांनी मिळून निर्णय घेतला की भूलोकात प्रतीप नावाचा राजा आहे, त्याला शंतनु नावाचा जो पुत्र होणार आहे, तो या वसूंचा पिता होण्याला योग्य आहे. म्हणून गंगेने राजा शंतनूशी विवाह करायचा, आठ वसूंनी गंगेच्या पोटी जन्म घ्यायचा, दरवेळी गंगेने एकेका वसूला पाण्यात बुडवून मारायचं आणि मुक्त करायचं. शेवटच्या द्यू वसूला मात्र प्रतीपाच्या राज्याला वारस म्हणून जिवंत ठेवायचं. पण त्याला संतती होणार नाही. तो अतिशय पराक्रमी असेल. एवढं ठरल्यावर गंगा आणि आठही वसू आपापल्या दिशेने निघून गेले..

मग एक दिवस गंगा स्त्रीरूप घेऊन हरिद्वारला आली.. तिथे राजा प्रतीप ध्यानस्थ बसलेला होता त्याच्यासमोर येऊन त्याच्या उजव्या मांडीवर बसली. राजा ध्यानातून बाहेर आला आणि मांडीवर बसलेल्या त्या सुंदरीला म्हणाला की उजव्या मांडीवर मुलांना आणि सुनेला बसवायचं आणि डाव्या मांडीवर लग्नाच्या स्त्रीला बसवायचं असा नियम आहे.. मला पुत्र झाला की तू माझ्या मुलाशी लग्न करून माझी सून हो. गंगेने ते मान्य केलं आणि नाहीशी झाली. त्यानंतर प्रतीपाला जो मुलगा झाला तो हा महाभिष. राजा प्रतीपला तपश्चर्येच्या योगाने मन शांत झाल्यावर झालेला मुलगा म्हणून त्याचं नाव शंतनु असं नाव ठेवलं. प्रतीपचा मुलगा शंतनू याच्याशी गंगेने विवाह करतांना लग्नाच्या वेळी ती एक अट राजाला घातली. ती म्हणाली की मी जे काही करीन त्याचं कारण तू मला विचारायचं नाहीस..ज्यादिवशी विचारशील त्यादिवशी मी तुला सोडून जाईन. शंतनूने ते मान्य केलं. शंतनूच्या हाती राज्य सोपवून राजा प्रतीप वानप्रस्थाला निघून गेला..शंतनू आणि गंगा यांना लग्नानंतर गंगेला एकेक पुत्र

होत गेला आणि गंगा दरवेळी त्या बाळाला पाण्यात बुडवून टाकत मारत गेली..गंगा निघून जाईल या भीतीने राजा असहायपणे ते सोसत राहिला. सात वसू शापमुक्त झाले पण आठव्या बाळाला गंगा पाण्यात बुडवून मारायला निघाली तेव्हा शंतनूला राहवलं नाही. त्याने तिला असं करु नकोस म्हटलं तेव्हा गंगा त्या बाळाला घेऊन निघून गेली. जातांना तिने आपलं खरं रुप, अष्टवसूंची कहाणी, शंतनूचा जन्म आणि द्यू वसूचा हा जन्म त्याला सांगून गेली. गंगेच्या मुलासकट जाण्याने दु:खी झालेला शंतनू परत राज्य समर्थपणे चालवायला लागला. शंतनूने हस्तिनापूर (आताचं मिरत) ही आपली राजधानी केली. अशी ३६ वर्षे गेली. एक दिवस राजा शंतनू शिकारीसाठी वनात गेलेला असतांना एके ठिकाणी भागिरथी नदीचं पाणी अडवल्यासारखं त्याला वाटलं. म्हणून त्याने शोध घेतला तेव्हा एक लहान मुलगा बाणांच्या सहाय्याने पाण्याचा प्रवाह अडवतोय हे त्याला दिसलं. जो गंगेच्या पाण्याला अडवू शकतो तो आपला मुलगा तर नसेल ना? असं त्याला वाटलं. त्याने गंगेचं स्मरण केलं तेव्हा ती प्रगट झाली. ती स्त्रीरुप घेऊन त्याच्यासमोर आली आणि हा तुझाच मुलगा आहे, आजवर मी याला सांभाळून सर्व शास्त्रात हुशार केलं, आता तू याचा सांभाळ कर असं सांगून नाहीशी झाली. शंतनू देवव्रतला घेऊन हस्तिनापूरला आला. त्याचा युवराज्याभिषेक केला आणि चार वर्ष त्याच्याबरोबर राहून त्याच्या हाती सर्व कारभार सोपवून आपल्या जबाबदारीतून मुक्त झाला.

एक दिवस शंतनू शिकारीसाठी वनात फिरत असतांना त्याला एक प्रकारचा वेगळाच सुगंध आला. तो कुठून येतोय हे पाहण्यासाठी सुगंधाच्या दिशेने गेल्यावर त्याला नाव चालवत असलेली एक अत्यंत सुंदर मुलगी

दिसली. तिच्या अंगाला तो सुगंध येत होता. तो त्या मुलीला मागणी घालायला तिच्या बापाकडे गेला. तो दाशराज शंतनूला म्हणाला की माझ्या मुलीशी सत्यवतीशी लग्न करायचं असेल तर माझी एक अट आहे. माझ्या मुलीच्या मुलांचाच राज्याभिषेक झाला पाहिजे. हे ऐकून निराश होऊन शंतनू परत आला आणि उदास राहायला लागला. देवव्रताला आपले वडील उदास आहेत याचं कारण कळेना...त्याने राजाच्या हितचिंतक वृध्द मंत्र्याकडे चौकशी केली तेव्हा त्याला सत्यवतीची कहाणी कळली. मग देवव्रत त्या मंत्र्याला घेऊन दाशराज कोळ्याकडे गेला आणि त्याच्या मुलीला शंतनूसाठी मागणी घातली..पण त्याने आपली अट त्यालाही सांगितली.. तेव्हा देवव्रत सर्वांसमोर प्रतिज्ञा करत म्हणाला की आजवर कोणत्याही पुरुषाने केली नसेल किंवा पुढेही कोणी पुरुष करणार नाही अशी प्रतिज्ञा करत मी सांगतो की तुझ्या इच्छेप्रमाणेच सर्व गोष्टी होतील. तुझाच नातू गादीवर बसेल. मी राजत्याग करत आहे. तेव्हा दाशराज म्हणाला की तू राजा होणार नाहीस पण तुझी मुलं हक्क सांगतील त्याचं काय ? तेव्हा देवव्रत परत सर्वांसमोर प्रतिज्ञा करत म्हणाला की धीवरा, राज्यावर मी पाणी सोडलंच आहे आता मी कधीही विवाह करणार नाही, स्त्रीसुख अनुभवणार नाही. ही दुसरी प्रतिज्ञा केली तेव्हा आकाशातून देव-ऋषी यांनी देवव्रतावर पुष्पवृष्टी करत “ हा भीष्म ” म्हणजे भयंकर कृत्य करणारा असा त्याचा गौरव केला...मग सत्यवतीला घेऊन देवव्रत हस्तिनापूरला आला आणि त्याने शंतनूला सत्यवती अर्पण केली. त्याची ही प्रतिज्ञा ऐकून शंतनू थक्क झाला आणि त्याला भीष्म नाव देऊन जेव्हा हवं असेल तेव्हाच मरण येईल असा इच्छामरणाचा वर दिला.

शंतनू आणि सत्यवतीचा विवाह झाला…त्यांना चित्रांगद, विचित्रवीर्य. हे दोन मुलगे झाले. यानंतर शंतनू मरण पावला. चित्रांगदाला गादीवर बसवून भीष्म राज्य चालवू लागले..पण अचानक एक दिवस गंधर्वांबरोबर झालेल्या लढाईत चित्रांगद मारला गेला. म्हणून भीष्मांनी लहान विचित्रवीर्याला गादीवर बसवलं. त्याचं योग्य वयात लग्न करण्यासाठी मुलगी शोधत असतांना वाराणसीचा काशिराजा आपल्या तीन मुलींचं स्वयंवर करतो आहे हे भीष्मांना कळलं म्हणून ते तिथे गेले, प्रतिज्ञा मोडून म्हातारा लग्नाला आलाय अशी त्यांची भरसभेत चेष्टा झाली तेव्हा संतापलेल्या भीष्मांनी त्या तिन्ही मुलींना रथात घालून हस्तिनापूरला आणलं आणि विचित्रवीर्याशी अंबिका आणि अंबालिका या दोन मुलींशी लग्न लावून दिलं. अंबा या मुलीला शाल्वराजाशी लग्न करायचं होतं म्हणून तिला शाल्वराजाकडे पाठवलं. पण अंबेला शाल्वाने नाकारलं, तिने भीष्मांना आपल्याशी लग्न करण्याची विनंती केली पण प्रतिज्ञेमुळे भीष्मांनी नाकारलं, आणि ती मनाने माझी होणार नाही या कारणाने विचित्रवीर्यानेही नाकारलं. तेव्हा अपमानित आणि उध्वस्त मनाने शेवटी अंबेने अग्नीत देह भस्मसात केला तो भीष्मांचा सूड घ्यायचा याच भावनेने.. तीच द्रुपद राजाच्या पोटी जन्मली शिखंडी या नावाने आणि तिने भीष्मांचा वध करून सूड घेतला. अंबिका अंबालिकेच्या लग्नानंतर लौकरच राजयक्ष्मा रोगाने विचित्रवीर्यही मुलं होण्याआधीच मरण पावला.

आता गादीला वारस नाही, राज्याला राजा नाही या चिंतेत भीष्म आणि सत्यवती सापडले..वंशवृक्ष टिकण्यासाठी सुनांना पुत्र व्हावेत म्हणून सत्यवतीने मग कुमार अवस्थेत झालेल्या आपल्या व्यास या पुत्रालागर्भदानासाठी आमंत्रित

केलं. त्याकाळात या नियोग पध्दतीने संतती मान्य होती. अंबिकेने व्यासांचं भयंकर रूप पाहून डोळे मिटले म्हणून धृतराष्ट्र आंधळा जन्मला, व्यासांना घाबरुन पांढरीफटक पडल्यामुळे जन्मलेला अंबालिकेचा पंडु आणि दासीला पुढे केल्यामुळे जन्मलेला दासीपुत्र विदुर यांची जन्मकथा सर्वांना माहीत आहे. राज्यासाठी, कुलाच्या रक्षणासाठी प्रश्न सोडवता सोडवता भीष्म संसारात गुरफटत गेले. बापाने खूष होऊन काय दिलं तर इच्छामरण, शिवाय अंबेचा शाप. गांधारीच्या येण्यानंतर तिच्या शकुनी या भावाच्या कुरुकुलात झालेल्या प्रवेशामुळे सुरु झालेला कुलाचा नाश होतांना पाहात राहिले, आपण सेनापती झालो तर दोन्ही पक्ष युध्द करणार नाहीत या विचाराने वयाच्या शंभरीच्या आसपास शेवटच्या महायुध्दात सेनापती झाले. आणि अर्जुनाच्या हातून मृत्यू येण्याचं भाग्य मिळावं म्हणून शिखंडीच्या आडून होणाऱ्या शरवर्षावाने घायाळ होऊन त्या शरांच्या ढीगावर रथात पडले. इच्छामरणाच्या वराचा उपयोग करत उत्तरायण सुरु होण्याची वाट पाहात शरपंजरी पडून राहिले..संक्रांत संपली. रथसप्तमी संपली. माघ अष्टमीला त्यांनी स्वर्गवास केला. स्वर्गातल्याही अक्षय लोकात स्थान मिळवलं. म्हणून आजवर भीष्मप्रतिज्ञा ही त्यांची कीर्ती जिवंत आहे. पण मनात प्रश्न उभा राहतो.... एक सेनापती, एक योध्दा, एक पितामह म्हणून आपल्या नातवंडांच्या दोन पक्षातील कुणाला जय मिळतो हे पाहण्यासाठी तर त्यांनी आपला मृत्यू लांबवला नसेल ना ?

**माघ अष्टमी हा भीष्माचार्यांचा स्वर्गारोहणदिन. त्याला भीष्माष्टमी दिन म्हणून ओळखलं जातं.**

**ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss**

# काश्मीर.



हिमशिखरांचा मुकुट घातलेल्या आपल्या राष्ट्राचा चेहरा खूप सुंदर आहे. काश्मीर म्हणतात त्याला. तिथल्या पर्वतकुशीमधे गंगा-यमुना-सरस्वतीचे निर्झर जन्मले. ऋषीमुनींनी तपश्चर्या करण्यासाठी हिमालयाकडेच धाव घेतली. राजत्याग करुन वानप्रस्थासाठी हिमालयाच्या अरण्यांमधे निवास करण्याची प्रथा कुरुकुलापासून चालत आली आहे. फळाफुलांनी बहरलेल्या या काश्मीरचा शंकर हा अधिपती. पार्वतीबरोबर संसार करतांना ह्या शिवाने तांडव नृत्य केलं. कालिदासाने हिमालय पाहिला की नाही माहीत नाही पण त्याच्या प्रतिभेने मात्र हिमालयाची स्वच्छंदी सैर केली. याच हिमपर्वतांना ओलांडत अनेक साहसी भटक्या जमाती, अरबी घोड्यांवरुन वैभवाच्या ओढीने भारतात आल्या आणि भारत रक्तरंजित झाला. त्या हिमालयाच्या कुशीत जन्मलेल्या काश्मीरची ही ओळख.

आपल्या देशाचा चेहरा फार सुंदर आहे.. सुंदर निसर्गाने नटलेला केशरी रंगाचा काश्मीर. काश्मीर शब्दाचा केशरी असा संस्कृत अर्थ आहे. केशराला संस्कृतमधे कश्मिरज म्हणतात. सुंदर निसर्गाने नटलेलं हे खोरं बौध्द, हिंदू आणि मुसलमान संस्कृतीने मिसळलेलं होतं. काश्मीरमधे यायला तुर्कांना, मंगोल आक्रमकांना बारामुल्ला - स्वातवरुन येणं सहज सोपं होतं. भारताची नैसर्गिक आणि सोन्याचांदीची साधनसंपत्ती परकीयांना खुणावत होती. लडाख-बाल्तिस्तान-गिलगिट-राजौरी-पूँछ-किश्तवार आणि जम्मू या मुलखांचा काश्मीर राज्यात समावेश होता. काश्मीरबद्दल पहिला उल्लेख पुराणात सापडतो. काश्मीरला वराहमूलाजवळ प्रचंड मोठा तलाव होता. वराहमूलचं आताचं नाव बारामुल्ला. या गावाजवळची खिंड कश्यप ऋषींनी फोडली. त्यातून तलावातील पाण्याचे लोट वाहून गेल्यावर तिथे जी रिकामी जमीन तयार झाली, त्यावर लोकांनी वस्ती केली. महाभारताच्या काळात कुरुक्षेत्राच्या वरचं काश्मीर हे कांबोज राजाच्या हाती होतं. काश्मीरच्या उत्तरेला मद्र देश, मद्र देशाच्या उत्तरेला गांधार-कंदाहार होतं. गांधारच्या वर पश्चिमेला कांबोज होतं. दुर्योधनाची बायको भानुमती ही कांबोजची राजकन्या होती. कुरुवंश संपला. युगांतर झालं. ख्रि.पू. सन ३२६ मधला सिकंदरशी लढणारा पोरस राजा तर सर्वांनाच माहीत आहे. त्याच्या हाताखाली काश्मीर आलं. पोरसनंतर सम्राट अशोकाचा काश्मीरवर अंमल सुरु झाला. याच्या काळात काश्मीरमधे बौध्द धर्माची स्थापना झाली. अनेक स्तूप बांधले गेले. काश्मीरबद्दल लिहून ठेवणाऱ्या संस्कृत पंडिताचं नाव कल्हण असं होतं आणि त्याच्या संस्कृत ग्रंथाचं नाव होतं राजतरंगिणी. काश्मीरचा इतिहास त्याच्यामुळेच सगळ्यांना कळला. त्याने

आपल्या आधीच्या सर्व बखरींचा अभ्यास करुन इ. स. ११४८ मधे हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. त्यात ७ व्या शतकापासूनचा इतिहास लिहिला आहे.

सम्राट अशोकानंतर तिथे गोनर्दिय घराणं राज्य करत होतं. या घराण्यातील सन १११ सालातील प्रवरसेन नावाच्या राजाने हिंदू धर्माला उत्तेजन दिलं आणि आताच्या श्रीनगर या शहराची स्थापना केली. शिव-विष्णूची अनेक मंदिरं या घराण्याच्या काळात बांधली गेली. श्रीनगरचा जुना भाग सम्राट अशोकाने वसवला आणि नवीन भाग प्रवरसेनने. त्यावेळी त्याचं नाव प्रवरपूर ठेवलं. गोनर्दिय घराण्याच्या काळात बौध्द धर्मही हळूहळू लोप पावत चालला होता. गोनर्दिय घराण्याचा शेवटचा राजा बालादित्य हा इ. स. ६०२ मधे मरण पावला. त्याला मुलगा नव्हता, त्यामुळे त्याचा जावई दुर्लभवर्धन हा गादीवर आला. दुर्लभवर्धनपासून काश्मीरमधे कर्कोटक वंशाला सुरुवात झाली. हा दुर्लभवर्धन राजघराण्यातील नसून बालादित्यचा अधिकारी होता. त्याच्या १७ वारसांनी सन ६०२ ते ८५६ या काळात, २५४ वर्षे राज्य केलं. त्या काळात भारतात ब्राह्मण-वैश्य आणि क्षत्रिय या तीनही वर्णांचे राजे राज्य करत होते. शिवाय ब्राह्मण हे ज्ञानदान आणि अधिकारी पदावर असत..शेतकीचे काम त्यावेळी डामर समाज करत असे. काश्मिरी लोकांचं वर्णन चिनी प्रवासी ह्युएन त्संग याने, देखणे, बुध्दीमान पण कपटी असं केलं होतं. दुर्लभानंतर दुर्लभक-प्रताप, त्याचे तीन मुलगे चंद्रपीड-तारापीड-मुक्तापीड हे एकापाठोपाठ गादीवर आले. मुक्तापीडने ललितादित्य हे नाव धारण केलं. या राजाने दिग्विजय केला आणि आपलं साम्राज्य विंध्य पर्वतापर्यंत नेलं. या ललितादित्याचा पराक्रम असा की याने तिबेटही जिंकलं आणि एवढंच नव्हे तर बलुचिस्तान आणि

तुराणही ३ वेळा जिंकलं. ललितादित्याला राजा ही पदवी देण्यासाठी चीनच्या राजाकडून एक प्रतिनिधी मंडळ इ. स. ७३६ मधे ललितादित्याकडे आलेलं होतं. ललितादित्य स्वारीसाठी गोबीचं वाळवंट ओलांडून जिथे गेला तिथेच मरण पावला. त्यानंतर त्याचा नातू जयपीड हा आजोबांसारखा पराक्रमी निघाला. जेव्हा एखाद्या घराण्याचा अंतकाळ जवळ येतो, तेव्हा राजे नीतीभ्रष्ट, कमकुवत आणि दुष्ट निघणं हीसुध्दा एक कायम मालिका आहे. त्याचप्रमाणे कर्कोटक हे दुर्लभवर्धनाचं घराणं संपलं.

मग सुरु झाला तो उत्पल नावाच्या घराण्याचा अंमल. तिसरं घराणं वीरदेवाचे, चौथं दिवीर वंश संग्राम राजाचं, पाचवं लोहर वंश, ते घराणे ११२८ सालापर्यंत चाललं. १०८९ ते ११०१ पर्यंत हर्षदेव राजा होता. त्याचा वंश बराच काळ टिकला. सन १२८६ मधे नवीन घराणं सत्तेत आलं ते सिंहदेवाचं. सिंहदेवाने मंदिरात असलेल्या सोन्याच्या मूर्ती, पैसा सारंच पळवलं त्यामुळे लोकांचा त्याच्यावर राग होता. जमीनदारांबरोबर झालेल्या झगड्यात सिंहदेव मारला गेला. त्याच्यानंतर त्याचा भाऊ सहदेव काश्मीरचा राजा बनला.

सहदेवाच्या काळात तीन निर्वासित सहदेवाच्या आश्रयाला आले. पुढे घडणाऱ्या कलाटणीसाठी ही घटना महत्त्वाची ठरली. एक लडाखच्या मुखियाचा मुलगा रिंचन, तो गगनगिरमधे राहिला. दुसरा दर्दिस्थानचा लांगर छाक त्राहग्राम मधे स्थिरावला आणि तिसरा होता स्वातचा शाहमीर. याला सहदेवाने बारामुल्लाला वस्ती करायची परवानगी दिली. एरवी काश्मीरमधे कोणत्याही परकीयाला प्रवेश दिला जात नसे. १३२० साली दलुचा नावाच्या मंगोलाने खूप मोठी फौज घेऊन काश्मीरवर हल्ला केला. खूप मोठी लूट

मिळवली. पण सहदेव काहीही करु शकला नाही. काश्मीरचं खोरं वाचवू शकला नाही. सर्व नागरिक भीतीने लपून बसले आणि दलुचा निघून गेल्यावर बाहेर आले तेव्हा सगळं काश्मीर खोरं मंगोलांच्या हल्ल्याने उध्वस्त झालं होतं. मग सहदेवाचा कुणी वारस आहे का ते लोकांनी शोधलं पण तसा कुणी मिळाला नाही.

सहदेवाच्या उदयनदेव या चुलतभावाच्या मदतीने लडाखचा रिंचन मारला गेला. रिंचनने इस्लाम धर्म आपल्यापुरताच ठेवला होता. त्याच्या मागे त्याची बायको कोटाराणी आणि मुलगा हैदर जिवंत राहिले. रिंचनने आपला मुलगा हैदर हा वजीर शाहमीरकडे वाढवण्यासाठी सोपवला होता. शाहमीर तेव्हाच सत्ता हाती घेऊ शकला असता, पण धूर्तपणाने, ही वेळ आपल्या हाती सत्ता घ्यायची नाही हे ओळखून शाहमीरने उदयनदेवाला राजा केलं. कोटाराणीशी उदयनदेवने लग्नही केलं. काश्मीरमधे परत हिंदू धर्माला वर आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. पण तेवढ्यात परत मंगोलांच्या हल्ल्यात उदयनदेव घाबरुन पळून गेला. कोटाराणीने बहादूरीने सर्व काश्मीरी लोकांना एकत्र करुन मंगोलांना पळवून लावलं. आणि उदयनदेवला परत आणलं. ते जनतेला आवडलं नाही. उदयनदेव मेल्यावर कोटाराणीने परत एकदा भिक्षण्णा भट्टच्या मदतीने सत्ता हाती घेतली. ही सुवर्णसंधीमात्र शाहमीरने घालवली नाही. त्याने मुत्सद्दीपणाने कोटाराणीच्या हैदर या मुलाला हाती धरुन आपली सत्ता सुरु केली. शाहमीरने कपटाने भिक्षण्णा भट्टला ठार केलं हे पाहून कोटाराणीनेही खंजिर खुपसून आत्महत्या केली. शाहमीरच्या हाती पूर्ण सत्ता आली. त्याने स्वत:ला शहाबुद्दीन हा किताब घेतला. हिंदू कोटाराणीची सत्ता १३३९

सालापासून काश्मीरमधून संपली. तेव्हापासून मुसलमानांच्या हाताखाली काश्मीर गेलं. काश्मीरच्या धार्मिक राजसत्तेला ही कलाटणी होती.

सन १३३९ पासून सन १५२८ पर्यंत म्हणजे शाहमीरपासून सतत मुसलमान राज्यकर्त्यांच्या हातीच काश्मीर राहिलं. त्यानंतर १५२८ मधे हुमायूँचा सरदार मिर्झा दुघलत याने मुघलांचा कारभार काश्मीरमधे सुरु केला तो औरंगजेबापर्यंत चालला. औरंगजेबाची एक बेगम नवाबबाई ही काश्मीरमधल्या राजौरीच्या राजाची मुलगी होती. तिला शाह आलम, सुलतान महंमद आणि झेबुन्निसा बेगम ही ३ मुलं होती. पैगंबराचा पवित्र केस सईद अब्दुल्ला याने मदिनाहून काश्मीरमधे आणला मग तो विजापुरात जाऊन राहिला. पण तिथे त्याच्या संपत्तीवर संकट आलं तेव्हा ती पवित्र, लाख मोलाची वस्तू सांभाळणं जड व्हायला लागलं म्हणून त्याने तो केस ख्वाजा नूर उद्दीन इशाई या श्रीमंताला विकला. त्याने इ. स. १७०० मधे दाल सरोवराच्या काठी हजरतबल इथे स्थापन केला. हजरतांचं बल म्हणजे स्थान एक पवित्र क्षेत्र बनलं. हळूहळू मुघलही कमकुवत झाले.

सन १७५२ पासून अफगाणी दुराणींचं साम्राज्य तिथे निर्माण झालं. दुराणी सत्ता पराभूत केली ती सन १८१९च्या शोपियाँ युध्दात. आझमखान या दुराणी सत्ताधीशाने काबूलवर जेव्हा फौजा नेल्या तेव्हा ती संधी साधून दुराणीचा महसूल मंत्री बिरबल धर रणजिंतसिंगला भेटायला लाहोरला गेला आणि काश्मीरवर स्वारी करायला सांगून आला. रणजितसिंगने फौज जमवली आणि काश्मीरवर स्वारी केली. ३ जुलै १८१९ मधे शोपियाँ इथे दुराणी फौजेचा पराभव करुन काश्मीरमधे शीख सत्ता सुरु झाली. सन १८८० मधे रणजितसिंगांच्या

मृत्यूनंतर त्यांचा नातू गुलाबसिंग सत्तेत आला. गुलाबसिंगांच्या काळातच १८४५ सालामधे पहिलं इंग्रज-शीख युध्द घडलं. ब्रिगेडयर जनरल हेनरि माँटगोमेरिच्या हाताखाली इंग्रजी फौजांनी शीख सेनेचा पराभव केला. गुलाबसिंग आणि ईस्ट इंडिया कंपनीमधे दोन करार झाले. पहिल्या कलमानुसार लाहोर सुभा आणि बियास- सिंधू नद्यांमधला प्रदेश इंग्रजांकडे गेला. दुसऱ्या कलमानुसार सिंधू नदीचा पूर्व तीर आणि रावी नदीचा पश्चिम तीर यामधला मुलूख शीखांकडे राहिला. म्हणजेच काश्मीर गुलाबसिंगकडे आलं. जम्मू आणि काश्मीरचे महाराज म्हणून गुलाबसिंग यांना मान्यता मिळाली. त्यांचा १८५७ मधे मृत्यू झाला. त्यानंतरचा रणबीरसिंग आणि त्यांच्यानंतर त्यांचा नातू हरिसिंग यांचा,आणि सन १९४७ नंतरचा इतिहास तर ताजाच आहे.

काश्मीरचे लोक विद्येचे व्यासंगी होते. त्यांच्या विद्वत्तेची ख्याती भारतभर होती. नाण्यांची दशांश पध्दतीने मोजण्याची मूळ कल्पना काश्मीरी लोकांची असं सिध्द झालंय. काश्मीरी हिंदू पंडितांचा राजदरबारात मोठा सन्मान होता. त्यांना अधिकाराच्या जागा होत्या. पण सततच्या तुर्की, अफगाणी, मंगोल हल्ल्यांमुळे पाठीशी असलेल्या महान हिमालयाचाच काश्मीरच्या राजांना सतत त्रास झाला. काश्मीरचा निसर्ग जितका सुंदर, तितकं तिथलं राजकारण आजही ठेचाळणारं, रक्तरंजित आहे.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss.....ss

# सिंध प्रांताची ओळख.



या हिंदू भरतपुरुषाने स्वागतच केलं आहे अतिथींचं. ओम सहना ववतु, सहनौ भुनक्तु हा त्यांचा मंत्र. कारण हिंदू हा धर्म नव्हे. विचार पंथ आहे. तत्त्वप्रणाली आहे. थंड जलाचं महापात्र असलेल्या सिंधू नदीवर मानवाची संस्कृती बहरली. आधी इथे हिंदूंचं वास्तव्य होतं. पण कालांतराने इथे इस्लाम धर्माने प्रवेश केला आणि हिंदूंचं अस्तित्त्व संपलं.

सिंधवर महाभारताच्या काळापासून म्हणजे जयद्रथाचं हिंदूंचं राज्य होतं. सिंधू नदीच्या पश्चिमेला सिबिस्तान नावाचं राज्य म्हणजे महाभारतकालीन शिबी राजाचं राज्य. ७ व्या शतकात हर्षवर्धनाच्या काळात त्याच्या हाताखाली या सिंधमधे साहसीराय नावाच्या मौर्याचं राज्य होतं. त्यांची दुसरी शाखा

चितोडची. अलोर ही सिंधची राजधानी होती. या राज्याच्या आजूबाजूला जाट, लुहाणा असे राजे राज्य करत होते. या साहसी राजाच्या आजारपणाच्या अंतिम काळात चच नावाच्या मंत्र्याने राज्य बळकावलं. या चचाने लिहिलेली बखर ती चचनामा फारसी भाषेत होती. ती अभ्यासकांच्या हाती आली आणि सिंध प्रांताचा इतिहास उलगडत गेला. त्यात भर पडली ती ह्युएनत्संग या प्रवाशाने लिहिलेल्या सिंधच्या वर्णनाची. हा प्रवासी इ. स. ६४१ मधे सिंध प्रांती गेला होता.

साहसीराय राजाचा इ. स. ६५० मधे मृत्यू झाला. तो निपुत्रिक मरण पावला. तेव्हा या महत्त्वाकांक्षी मंत्री चच याने साहसीरायचा मृत्यू झाल्याची बातमी गुप्त ठेवली. त्याने आपल्या विरोधकांना राजधानीत बोलावून कैद करुन ठेवलं. मग जे त्याच्या पक्षात नव्हते, त्यांना मोठी मोठी बक्षिसं देऊन आपल्याकडे वळवलं. साहसीराय मृत्यूशय्येवर असतांना त्याच्या नावे फर्मान काढून आपली बाजू बळकट केली आणि नंतर सत्ता हाती घेतली. चचराजाने साहसीरायच्या राणीशी लग्न लावलं. मग सिंधू नदीच्या पलिकडे आणि पूर्वेकडे मुलतानपर्यंत आपलं राज्य वाढवलं. लुहाणा राजाचा पराभव करुन त्यांच्या ब्राह्मणाबाद शहराची (हे अरबी नाव आहे) राजधानी केली. त्याने जाट आणि लुहाणा यांची प्रतिष्ठा कमी करण्यासाठी, या जमातींना लाल आणि काळे कपडे घालावेत, रेशमी वस्त्रं नेसू नयेत, घोड्यावर खोगिर घालू नये, बाहेर हिंडतांना पायात जोडे आणि पागोटं नसावं आणि खूण म्हणून नेहमी एक कुत्रा बरोबर बाळगावा, असे अनेक नियम केले. जाट लुहाणा बेडर आणि लढवय्ये होते. चचराजा कट्टर हिंदूधर्माभिमानी होता. चचराजा २२ वर्षे राज्य करुन मेल. तो

मेल्यावर पुढे ७ वर्षे त्याचा भाऊ राज्य सांभाळत होता आणि मग ६७९ सालात चचाचा मुलगा दाहर याने राज्य केलं.

त्याकाळात हिमालयातून वाट न काढता अफगाणी, अरबी इतर व्यापारी हे सिंधू नदी जिथे समुद्राला मिळते त्या रस्त्याने वाळवंटातून येत. अरबांनी त्याआधीही सिंध प्रांत जिंकायचा असफल प्रयत्न केला होता. पण जेव्हा अरबांनी इराण जिंकलं, त्यानंतर सिंधच्या जवळ त्यांना एक भक्कम पायासाठी जागा झाली. याकाळात इस्लाम धर्माचा प्रसार सिलोनपर्यंत झाला होता. बगदादमधे तेव्हा खलिफ वालिद हा राज्य करत होता. त्याला भेटण्यासाठी श्रीलंकेतून काही मुसलमान यात्रेकरू सिंधू नदीतून प्रवास करत असतांना वादळामुळे सिंधू नदीच्या काठच्या देबाल बंदरावर लागली. तिथल्या दरोडेखोरांनी यात्रेकरूंना लुटलं आणि त्यांना कैदेत टाकलं. तेव्हा इराणचा सुभेदार हज्जाज याने दाहरकडे तक्रार केली. दाहर म्हणाला की ते फार सामर्थ्यवान दरोडेखोर आहेत, मला त्यांना आवरता येत नाही. तेव्हा हज्जाजने खलिफ वलिदला सिंधवर धार्मिक युध्द करायला भडकावलं आणि जी लूट मिळेल ती अर्धी अर्धी वाटून घ्यायचा लोभ दाखवला. खलिफ वालिद तयार झाला.

त्याची परवानगी मिळाल्यावर इराणची राजधानी कूफा इथे हज्जाजने फौज जमवली, आपला भाचा महंमद कासीमला सेनापती केलं. महंमद कासीमने किल्ले पाडायची मारा करणारी यंत्रं- कॅटापल्टस् - जहाजातून सिंधवर पाठवली आणि तो स्वत: जमिनीच्या मार्गाने सिंधवर चालून आला. देबालला त्याने वेढा घातला. त्या गावात एक मंदिर होतं आणि त्यावर एक ध्वज फडकत

होता. तो ध्वज आहे तोवर देबालला धोका नाही अशी तिथल्या लोकांची समजूत होती. महंमद कासीमला हे कळल्यावर त्याने मारायंत्रांचा मारा केला आणि तो ध्वज पाडला. त्याबरोबर श्रध्दाळू लोक खचले. हिंदू लोकांना ही मशिनं माहीतही नव्हती. देबालवर अनेकवेळा हल्ले झाले होते, त्यात देबाल जिंकलं होतं म्हणून दाहरनेही काहीही तयारी केली नव्हती. त्याला शत्रूची ताकद माहीतच नव्हती..पोरसविरुध्द सिकंदरने भारतीयांना माहीत नसलेली शस्त्रं आणून त्यांचा पराभव केला, पुढे ९०० वर्षांनीही देबालमधे दाहरचा याच नवीन शस्त्राने पराभव केला. महंमद कासीम जिंकला. मग शहरात मोठी कत्तल झाली, धर्मांतरं झाली. हिंदू लोक गुलाम बनले, स्त्रिया दासी झाल्या, किंवा जनानखान्यात गेल्या..प्रचंड मोठी लूट झाली. देबालमधल्या बौध्दविहारातील ७०० स्त्रिया दासी झाल्या. मग महंमद कासीमने आपल्या मार्गातील इतरही राज्यं जिंकली. तिथेही प्रचंड लूट मिळवली. बौध्द धर्मियांनी शस्त्र हाती धरलंच नाही. त्यामुळे त्यांची राज्यं जिंकणं महंमद कासीमला फार सोपं गेलं.

त्यानंतर महंमद कासीम आजच्या पाकिस्तानातील हैद्राबादला म्हणजे तेव्हाच्या नेरुनला गेला. तेही जिंकलं. तिथल्या मंदिराचं मशिदीत रुपांतर झालं. पण सिंधू ओलांडायला जहाजांची सोय न झाल्याने नेरुनला मात्र तो अडकून पडला. पण त्या संधीचं सोनं करत दाहराने कासीमशी लढण्याची पूर्ण तयारी केली. कासीमकडचा अन्नसाठा संपत आला होता. काय करावं या विवंचनेत असतांना साम दाम दंड भेद नीतीचा उपयोग करायचं त्याने ठरवलं. कासीमचा हा हेतू यशस्वी झाला कारण दाहराचा, बेट प्रांताचा एक अधिकारी मोका बस्सया, बेटाचा मालक होण्याच्या सौद्यावर त्याला सामील झाला. त्याने

कासिमला नावा पुरवल्या. ह्या फितूरीमुळे कासीमची सिंधू नदी ओलांडायची मोठी सोय झाली. त्याउलट दाहराकडे जी ५०० अरबांची लष्करी तुकडी होती तिने आपल्या बांधवांविरुध्द शस्त्र उचलणं नाकारलं. हा मोठा फरक आपल्यात आणि त्यांच्यात होता. हे परकियांना सामील न होणं भारतीयांनी केलं असतं तर भारतात परकीय आक्रमक कधी टिकलेच नसते. पण उलट आपलेच लोक तुर्कांना आणि इंग्रजांना फितूर झाले.

महंमद कासीम दाहरासमोर येऊन उभा राहिला. दाहराचा मुलगा जयसिंह हाही शूरच होता. महा भयंकर, घनघोर युध्द झालं. दाहर स्वत: चिलखतात होता, त्याच्या हत्तीवरही काटेरी झूल होती. दाहरकडे एक चक्र होतं. तो ज्याच्यावर ते टाके त्याचं मुंडकं धडापासून दूर होई. दाहर जिंकणार हे नक्की होतं पण नियतीची इच्छा वेगळी होती. एका अरबाने टाकलेला आगीचा पेटता जळका बाण दाहरच्या अंबारीवर येऊन पडला. दाहरची अंबारी जळायला लागली. त्यामुळे हत्ती बिथरला तो आगीने भाजायला लागला तेव्हा जवळच्या तलावात घुसला. त्याबरोबर दाहर अंबारीतून खाली पडला आणि मारला गेला. आणि मग सेनापती पडल्यावर जे होतं तेच झालं. राजाची फौज पळायला लागली आणि कापली गेली..प्रचंड लूट झाली. दाहरची राणी, पुतणी आणि राजस्त्रियांना कासीमने खलिफाकडे पाठवलं. महंमद कासीमने इतरही प्रांत जिंकले. दाहरला वीरगती मिळाल्यावर त्याचा मुलगा जयसिंह हा रणांगणावरुन राऊरला जाऊन पोचला. तिथे दाहरची दुसरी राणी बाई नावाची होती. तिने महंमद कासीमशी लढा दिला पण शेवटी राणीवशातील सर्व स्त्रियांबरोबर

खोलीला आग लावून जोहार केला. राऊरमधून कासीमने ६०,००० स्त्रियांना गुलाम केलं किंवा जनानखान्यात नेलं.

राऊर जिंकून महंमद कासीम दाहरपुत्र जयसिंहाच्या मागे, ब्राह्मणाबादला पोचला. जयसिंह तिथूनही पळाला आणि वाळवंटात गेला. ब्राह्मणाबादच्या शूरांनी ६ महिनेपर्यंत शहर लढवलं पण शेवटी हरले. कारण परत मोका बस्सयाने त्या शहराची खडान् खडा बातमी कासीमला पोचवली. त्यामुळे कासीम जिंकला. जयसिंह मग रजपूतांच्या आश्रयाला गेला. या शहरात कासीमला दाहरच्या २ अविवाहित मुली सापडल्या, त्या त्याने खलिफाकडे पोचवल्या. आता सिंधमधलं एकच शहर हाती यायचं राहिलं होता. ते म्हणजे अलूर. तेही महंमद कासीमने सहज घेऊन टाकलं. लाखो लोकांचा नरसंहार करुन, अमाप लूट घेऊन, हजारो स्त्रियांना दासी-गुलाम-जनानखान्यातील रखेल बनवून, महदंमद कासीम आता कनोजवर जायच्या विचाराला लागला.

सिंध पूर्णपणे जिंकून कासीम आता श्रीमंत कनोजवर हल्ला करायच्या तयारीला लागला. तो कनोजला कूच करणार इतक्यात खलिफाकडून त्याला एक तातडीचं पत्र आलं. त्यात लिहिलं होतं की असशील तसा मी पाठवलेल्या या कच्च्या कातड्यात बसून हाजीर हो. खलिफाची आज्ञा म्हणून लगेच महंमद कासीम त्या कातड्यात लपेटून बसला आणि त्याला त्याच्या नोकरांनी पेटाऱ्यात घातलं मग पेटारा खलिफाकडे गेला. खलिफाने हे काय सामान आलं म्हणून पेटी उघडली तर आतमधे मरुन पडलेला महंमद कासीम होता. खलिफाकडे पाठवण्यात आलेल्या दाहराच्या मुलीने आपल्या बापाची आणि आपली अशी दैन्यावस्था करणाऱ्या कासीमचा कपटाने शेवट केला होता. इ.

स. ७१२, रमझानच्या १० व्या दिवशी हिंदूंच्या हातून मुसलमानांकडे सत्ता जाण्याचा सिंध हा पहिला बळी. आणि दाहराच्या स्त्रियांनी अब्रूरक्षणासाठी केलेला कदाचित भारतीय इतिहासातील पहिला जोहार असेल असं अभ्यासकांना वाटतं. क्षुल्लक मोबदल्यासाठी इमान आणि देश विकणारा मोका बस्सया हेही आता काही नवीन उदाहरण नाही…

भारतातील देवळांमधे किती संपत्ती होती त्याचं एक उदाहरण म्हणजे मुलतान काबीज केल्यावर महंमद कासीमने एक मंदिर लुटलं. एका देवळाच्या आवारात आणखी एक लहान देऊळ होतं. त्यात सोन्याच्या नाण्यांनी भरलेल्या तांब्यांच्या ४० हंड्यावर एक पूर्ण पुरुषाची उंची असलेली निखळ सोन्याची मूर्ती होती. तिचे डोळे भारी किंमतीच्या माणकांचे होते. तिंचं वजन २३० मण होतं. आणि खाली जे ४० हंडे होते त्यात १३२० मण सोन्याची नाणी होती. आजही आपली देवळं सोन्याचांदीने तुडुंब भरलेली आहेत..का नाही येणार एखादा परकीय, भारतातला एवढा खजिना आणि देशाची गद्दारी करणाऱ्या लोकांना लुटायला..?

**ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss....**

# जो जीता वही सिकंदर.

**ख्रिस्तपूर्व सन ३२६.**



आपल्या अभूतपूर्व पराक्रमाने आजवर कुणालाही आपल्यापेक्षा वरचढ होऊ न देणारा अक्षय कीर्तीचा ग्रीसचा सम्राट अलेक्झांडर. आपण त्याला सिकंदर म्हणून ओळखतो. जग जिंकायचं स्वप्न घेऊन तो भारतात पोचला तेव्हा भारतात लहान लहान गणराज्यं सुखाने नांदत होती. आर्यावर्त या नावाने हा भाग प्रसिध्द होता. तिथे हुकूमशाही नव्हती, ही लक्षात घेण्यासारखी गोष्ट आहे. प्रत्येक राजाच्या हुकुमतीखाली प्रजा, साहित्य, कला शौर्याचा सत्कार होत होता. सीमेला लागून असलेल्या राजाशी त्याचं भांडण आणि त्याचा शत्रू तो या राजाचा मित्र एवढंच त्याचं स्वरुप असे. आपल्या सीमा विस्तारण्याचा प्रयत्न करणारे राजे, महाराज, सम्राट, चक्रवर्ती अशा पदांना पोचत. त्यांचं रथ, घोडदळ, हत्तीदळ, पायदळ या चतुरंग सेनेचं बळ मोठं असे. राजाचं देहावसान झाल्यावर त्याच्या मुलांमधे त्याचं राज्य वाटलं जाई आणि मग तेच एकमेकांमधे पूर्ण सत्ता बळकवायला भांडत राहात. ही राज्यनिर्मितीची पध्दत होती.

असा राजसत्तांना छेद देणारा राजा सिकंदर भारताच्या सीमेवर येऊन उभा राहिला तेव्हा भारतात पौरव राजा उत्तर हद्दीवर सत्ता चालवत होता. झेलम (संस्कृत नाव वितस्ता) नदी ते चिनाब नद्यांच्या दुआबातला मुलूख त्याच्या हाताखाली होता. ७ फूट उंच धिप्पाड राजाचा हत्तीही तसाच धिप्पाड होता. हे सर्व पंजाबचे तगडे पुरुष धिपाडच होते. राजा पौरवाचं ग्रीकांनी पोरस असं नामकरण केलं. तक्षशीलाच्या अंभी राजाशी त्याची स्पर्धा चाले. (तक्षशीला म्हणजे आताचं अटक. पुढे या अटकेपर्यंत राघोबादादांच्या हाताखाली मराठी फौजा अहमदशहा अब्दालीचा पाठलाग करत गेल्या होत्या पण नदीच्या प्रचंड प्रवाहामुळे तिथेच थांबल्या.) आणि राजौर-जम्मूच्या अभिसार राजाशी त्याचा सलोखा होता.

जगज्जेता होण्याचं स्वप्न घेऊन सिकंदर स्वत:च्या देशातून निघाला आणि वाटेतील एकेक राज्य, समाज, समुदाय जिंकत भारताच्या दिशेने यायला लागला. स्वात खोऱ्यावरुन भारतावर त्याने आपली नजर रोखली. त्याने तक्षशीलेचा अंभी आणि राजौरीचा अभिसार या राजांचा पराभव केला आणि मग पोरसकडे खंडणी मागितली. पोरसने सरळ नकार दिला आणि तो सिकंदरशी युध्दाला तयार झाला. हे ऐतिहासिक युध्द स्मरणीय का झालं आणि कुठे झालं याच्या नोंदी भारतीय साहित्यात सापडत नाहीत. तर फक्त ग्रीक साहित्यातून याची माहिती मिळते. सिकंदर अत्यंत सुसंस्कृत मॅसेडोनियाचा राजा फिलिप याचा मुलगा.आणि तत्त्ववेत्ता आरिस्टोटलचा शिष्य. फिलिप राजाचा खून होऊन मृत्यू झाल्यावर ख्रिस्तपूर्व ३३६ मधे २० व्या वर्षी हा तख्तावर आला. लगेच, १० वर्षे स्वाऱ्या करत जगभर फिरला. भारतात झेलमच्या काठावर पौरवाची आणि त्याची तलवार भिडली. पौरवही पराक्रमात तसूभरही कमी नव्हता. सिकंदरचं आव्हान त्याने स्वीकारलं आणि प्रचंड मोठी चतुरंग सेना

घेऊन तो सिकंदरला सामोरा गेला. त्या लढाईचं नुसतं वर्णन वाचणंही अत्यंत थरारक आहे.

आपल्या जहाजांमधून शास्त्रज्ञ, विद्वान, वैद्य, इंजिनियर्स, दगडांचा मारा करणारी कॅटापल्टस् मशिनं, त्यावरचे मजूर, ३० वल्ही चालतील अशा उथळ, लढाऊ बोटी, हे सर्व सिकंदरने आणलं होतं. त्याच्या या लढाऊ हलक्या बोटींचे भाग वेगळे करुन परत जुळवता येत होते. त्यामुळे गाडीवर टाकून कुठेही या बोटी नेता येत होत्या. जलद वेगासाठी बैलगाडीपेक्षा, त्याने खेचरांचा वापर गाड्या ओढायला केला. शिवाय सक्षम गुप्तहेरखातं, अत्यंत शूर, तिरंदाज, युध्दकलेत तरबेज अशी प्रशिक्षित पायदळ फौजही त्याच्या सेवेला एकनिष्ठ होती. या प्रत्येक सैनिकाच्या छातीवर लोखंडी उरस्त्राण, डोक्याला हेलमेट, मांडीला संरक्षण करणारे धातूचे पत्रे होते, हातात लांब तलवारी, १६ फूट उंच भाले होते. ही कवायती फौज एकापाठीमागे एक ३ फूटांचं अंतर ठेवून रांग करुन उभी राही. सिकंदरच्या वडिलांनी, राजा फिलीपने ही राष्ट्रीय तोलाची फौज प्रशिक्षित केली होती. सिकंदरकडे घोड्यांवर स्वार असलेले उत्कृष्ट तिरंदाजही होते. त्यांच्या हातात भालेही असत. त्याचे घोडेही संरक्षण कवचाने सुरक्षित होते. हे घोडे काबूल आणि अरबी नसलीचे होते. ५ दिवसांमधे ६५० मैल पार करण्याची यांची क्षमता होती. शिवाय दूरून दगडांचा मारा करणारी मारायंत्र, कॅटापल्टस् होती.

आणि पौरवाची फौज तुलनेत कशी होती?

भारतीय फौजेत सरदारांचे चारचाकी रथ होते. या रथांना ४ घोडे असत. यावर २ तीरंदाज, २ भाला फेकणारे, आणि २ रथ चालवणारे असे ६ सैनिक असत. शस्त्रांच्या आणि ६ सैनिकांच्या वजनांमुळे हे लाकडी रथ भक्कम करावे

लागत. त्यामुळे त्यांची गती मंद असे. रणांगणावर पाऊस पडला तर त्यांची चाकं मातीवर घसरत आणि एका जागी अडकून रुतत. प्रचंड मोठं हत्तीदल हे पोरसचं बलस्थान होतं. या प्रत्येक हत्तीवरील हौद्यात ३ तीरंदाज आणि माहूत बसत असे. पण माहूत ठार झाला तर हत्तीवर काबू ठेवणे कुणाला शक्य होत नसे. पायदळाचे सैनिक आपलं धनुष्य जमिनीवर गाडत. आपला डावा पाय पुढे करुन धनुष्याची दोरी ओढत आणि मग बाण सोडत. त्यांच्या शरीर रक्षणासाठी कोणतंही धातूचं कवच नव्हतं. पोरसच्या घोडदळाची अवस्था तर सिकंदरच्या तुलनेत आणखीनच वाईट होती. ते लहान चणीचे लहान ताकदीचे होते. पोरस आणि सिकंदरची भेट रणांगणावर होणार हे निश्चित झालं. मे महिन्याच्या सुरुवातीला, झेलम नदीच्या पश्चिम तीरावर सिकंदरची फौज पसरली होती. आणि पूर्व तीरावर पोरसच्या फौजेचा तळ पडला होता. दोन्ही छावण्यांच्या मधून अर्धा मैल रुंदीचा झेलमचा अलोट पाण्याचा प्रवाह वाहात होता. पावसाळ्यात ही नदी उग्र रूप धारण करणार होती.

सिकंदरची फौज १२०००होती. आणि समोर उभी होती पोरसच्या महाकाय, झुलणाऱ्या हत्तींची रांग. त्यामागे होते तीरंदाज, घोडदळ आणि पायदळाचे सैनिक. हा महाकाय प्राणी सिकंदरच्या फौजेने प्रथमच पाहिला होतं. या प्रचंड हत्तींच्या चित्कारण्याने आपले घोडे घाबरून पळून जातील याची सिकंदरला खात्री झाली. आपल्याला नदी ओलांडून पोरसच्या हत्तींची रांग भेदणं अशक्य आहे हे सिकंदरच्या लक्षात आलं.

मग त्याने आपली रणनीती बदलली. नदीचा उतार मिळण्यासाठी दुसरी जागा तो शोधायला लागला. ही त्याची खेळी कसलेल्या धाडसी, सेनापतीला शोभेशी होती. त्याची फौज रोज नदी पार करण्याचं नाटक करत राहिली.

त्यावेळात सिकंदरने गुप्तपणे नदीच्या वरच्या अंगाला, १७ मैलांवर उतार मिळवला. ही जागा त्याच्यासाठी अत्यंत मोक्याची होती कारण नदीला तिथे वळण होतं. त्या वळणावर, अर्ध्या पात्रात माजलेल्या झाडा, झुडुपांचं एक बेट होतं. त्या बेटावर छोट्या नावांमधून पोचता येत होतं. तिथून उरलेलं अर्ध अंतर कापून, नदी पार करणं सोपं होतं. आपल्या तळावर सिकंदर नदी पार करु शकत नाही आहे या भ्रमात पोरस राहिला. सिकंदरची फौज आपल्यावर येऊ शकत नाही ह्या भ्रमात पोरस राहिल्यामुळे त्याची फौज गाफील झाली. गस्तही मंदावली, आणि तोपर्यंत सिंकंदरने आपल्या सर्व लढाऊ नावांचे भाग मोकळे करुन, ते गाड्यांवरुन लादून, तिकडे नेले. तिथे जाऊन जहाजांची जुळणी केली. या बेटावर फौजेला लपून बसणं सहज शक्य होतं. याशिवाय आपले घोडे नदीपार नेण्यासाठी सिकंदरने शवांमधे भुसा भरून ते एकमेकांना शिवले. त्याचा एक तरंगता पूल बनवला आणि त्यावर फळ्या टाकून आपलं घोडदळ नदीपलिकडे नेण्याची योजना आखली. ही सर्व तयारी झाल्यावर सिकंदर मोक्याच्या दिवसाची वाट पाहात बसला. पोरसला अजूनही या तयारीचा मागमूसही नव्हता.

काही फौज पोरसच्या समोरच्या काठावर ठेऊन, मग योग्य वेळ साधून एका अंधाऱ्या रात्री, सिकंदरने गुप्तपणे आपली मोठी फौज १७ मैलांवर नेली. तिथे खडकाळ मार्गावरुन, नदीला समांतर चालल्यावर मग नदी पार करुन अर्ध्या पात्रात असलेल्या बेटावर त्याने आपली फौज उतरवली. त्या अंधाऱ्या जंगलात, अंधाऱ्या रात्री निसर्गानेही या ग्रीक फौजेला दगा दिला. सोसाट्याच्या पावसाचा तडाखा नवीन देशात आलेल्या या साहसी सेनेला सोसावा लागला. मग आणखी एक संकट समोर उभं राहिलं. आपण अर्धी नदी पार केली हा भ्रम होता हे सिकंदरच्या लगेच लक्षात आलं. कारण त्याला जो उरलेला पाण्याचा प्रवाह

दिसत होता, तो पूर्व किनाऱ्यावरचा नव्हताच. तो होता डोंगरावरुन वाहात येणारा पाण्याचा एक मोठा प्रवाह. हा प्रवाह पार करणं गरजेचं होतं. हा प्रवाह पूर्व किनाऱ्यावर घेऊन जाणारा होता. शेवटी आपल्या सैनिकांना प्रोत्साहन देण्यासाठी त्याने पाण्यामधे, पहिली नाव आपली सोडली. पाठोपाठ सगळे सैनिक धुवाँधार पावसात उतरले. शवांच्या तरंगत्या पूलावरुन घोडेही साहसी कृत्याला सामोरे गेले. मग किनारा जवळ आला तेव्हा छातीभर पाण्यातून पोहत सिकंदर आपल्या सेनेसह पूर्व किनाऱ्याला लागला. तेव्हा झुंजुमुंजु व्हायला लागलं होतं. सूर्याचं अस्तित्त्व जाणवायला लागलं होतं. सिकंदरची फक्त एक बोट खडकावर आपटून फुटल्यामुळे बुडली. बाकी सर्व नावा तरुन गेल्या. पोरसच्या बाजूला आल्यावर, आता सिकंदर पोरसवर हल्ला करायला सिध्द झाला. अनोळखी मुलखात, अंधाऱ्या रात्री, भीषण वादळी पावसात, एवढी जिगर, एवढी मेहनत आणि एवढं समर्थ नेतृत्त्व असलेलं ते सैन्य होतं.

सिकंदरची फौज पोरसच्या तळाच्या दिशेने चालायला लागली. अर्ध अंतर पार होत असतांनाच सिकंदरवर पोरसचा राजपुत्र, पोरसचे ६० रथी आणि १००० सैनिक चालून आले. दोन्ही फौजांची गाठ पडली. तुफान हाणामारी झाली. सिकंदरच्या घोडदळाच्या माऱ्यात पोरसचा राजपुत्र आणि ४०० सैनिक ठार झाले. इतर फौज पळून गेली. काही रथही सिकंदरच्या हाती लागले. हार होऊन पोरसकडे पोचलेल्या फौजेने, सिकंदर आपल्या बाजूच्या तीरावर आल्याची आणि युध्दाची हकीकत पोरसला सांगितली. काही फौज तळावर ठेवून, पोरस लगेच आपली फौज घेऊन सिकंदरशी लढायला निघाला. दोन्ही फौजांची गाठ कारीच्या मैदानावर पडली. पोरसच्या ८५ लढाऊ हत्तींची रांग सिकंदरच्या समोर उभी होती. त्यांच्यावर हौद्यात तीरंदाज बसले होते. हत्तींच्या पाठीमागे, पोरसचे २०० रथ दोन भागात विभागून लावलेले होते. या रथांच्या

मागे पायदळ उभं होतं. दोन फळ्यांमधे उभ्या असलेल्या या पायदळामागे, पोरसचं दोन भागात विभागलं गेलेलं ३००० घोडदळ उभं होतं. पोरसची एकूण फौज ३३००० होती. त्या सर्वांच्या मधे धिप्पाड हत्तीवर त्याच्यासारखाच ७ फूट उंचीचा, त्याचा स्वामी राजा पोरस दिमाखाने उभा होता. त्याच्या अंगावरचं सोनं चांदी तळपत्या उन्हात चमकत होतं.

सिकंदरने शत्रूच्या ताकदीचा अंदाज घेतला. त्याच्याकडे १५००० घोडदळ आणि उत्कृष्ट चिलखती पायदळ होतं. त्यात रथ आणि हत्ती नव्हते. आता त्याला आपल्या फौजेची व्यूहरचना करायची होती. सिकंदरने फौजेच्या मध्यावर आपलं पायदळ उभं केलं. आपल्या उजव्या हाताला, दोन भागात विभागलेलं पराक्रमी सेनानींच्या हाताखाली, ५००० सर्वोत्कृष्ट घोडदळ लावलं. त्यांच्यामागे १००० तीरंदाज उभे होते. डाव्या हाताला दुसरं पायदळ लावलं. दोन्ही नायक एकमेकांच्या चालींचा अंदाज घ्यायला लागले आणि प्रतिस्पर्ध्याच्या पहिल्या आक्रमणाची वाट पाहायला लागले. दोन्हीकडील पायदळाची चकमक सुरु झाली. बघताबघता लढाईला तोंड फुटलं. पोरसचे रथ अत्यंत वेगाने शत्रूवर चालून गेले. अंगावर येणाऱ्या या वाहनांनी सिकंदरच्या पायदळात मुसंडी मारली. त्यांनी शत्रूच्या गोटात शिरून पायदळाचे काही सैनिक चेंगरुन ठार केले. पण सिकंदरच्या तीरंदाजांच्या बाणांनी जखमी झालेले रथांचे घोडे फार काळ दम धरू शकले नाहीत. त्यातच पाण्याचा चिखल झालेल्या त्या भूमीवर रथांची चाकं रुतायला लागली. घोड्यांवरही नियंत्रण न राहिल्यांमुळे रथ कोलमडून पडले आणि सारथी घायाळ झाले. उरलेले रथ आणि सारथी तळावर परतले. पोरसची रथांची बाजू कमकुवत झाल्यामुळे पोरसची शक्ती कमी झाली. पोरसची रथ शाखा निकामी झाल्यामुळे तेवढी ताकद कमी झाली. आता सिकंदरसमोर हत्तींची फौज उभी होती. हा प्राणी सिकंदरने कधीही पाहिला

नव्हता. त्यामुळे त्यांची ताकद कशी कमी करायची याचा त्याला अंदाज लागत नव्हता.

सिकंदरने मग आपलं सामर्थ्यवान घोडदळ बाहेर काढलं. रथांची जागा रिकामी झाल्यामुळे त्याला पोरसच्या घोडदळावरच्या हल्ल्याला अवसर मिळाला. सिकंदरकडून बाणांचा पाऊस पडला. पोरसचे महाकाय हत्ती प्रचंड चित्कार करत, मॅसेडोनियन सैनिकांवर चालून गेले. त्यांचं ते रौद्र स्वरुप पाहिल्यावर त्यांना हत्तींची ताकद कळली. त्या हत्तींनी वाटेत येणाऱ्या सैनिकांना आपल्या सोंडेत धरून भिरकावून द्यायला सुरुवात केली. अनेकजण त्या हत्तींच्या झुंडींच्या पायाखाली चिरडले गेले. त्यामुळे सिकंदरच्या बाजूला मोठी भागदौड झाली. काही वेळापुरतं शत्रूला भीषण संकटांचं आव्हान उभं राहिलं.

पण लगेच सिकंदरने यावर विचार केला आणि आपले घोडेस्वार त्या हत्तींवर बाणांचा मारा करायला पाठवले. त्याबरोबरच पायदळही त्यांच्या मदतीला धावले. या पायदळ-घोडदळाने मिळून हत्तींना आणि हत्तींच्या माहूतांना ठार करायला सुरुवात केली. त्याबरोबर लढाईचं चित्र पालटलं. माहूत ठार झाल्यावर ते हत्ती सैरभैर झाले. वाटेल तसे धावायला लागले. बाणांच्या जखमांनी पिसाळलेले आणि आपले, परके न मानता, वाटेत येईल त्याला ठार करायला लागले. हळूहळू मॅसेडोनियन फौजेने हत्तींच्या आक्रमणावर अंकुश लावला. या सगळ्या संग्रामात पोरसचे सैनिक जास्त मेले कारण ते हत्तींच्या मधे सापडले. सिकंदरची फौज त्यांच्यावर हल्ला झाला की माघारी आपल्या स्थळावर पोचत होती. शेवटी या झंजावातात ३ तासांच्यानंतर हत्तीच थकले आणि मागे फिरले. पण मागे फितांनाही ते सेनेकडे पाहातच पाठीमागे सरकले. पोरसची आता हत्तींची ताकद कमी झाली. अर्धंअधिक पायदळ तर शत्रूच्या

बाणांनी आणि भाल्यांनी रणांगणावर पडलं होतं. आता सिकंदरने पोरसच्या त्या उरल्या सुरल्या फौजेला संपवण्यासाठी आपलं संपूर्ण घोडदळ एकत्र केलं. पायदळही बोलावलं आणि मग आपल्या सेनेला पोरसच्या फौजेला घेराव घालायला सांगितलं. पोरसचे कितीतरी साथीदार आणि राजपुत्र वीरगतीला मिळाले. पोरसवरही बाणांचा आणि भाल्याचा हल्ला होतच होता. तोही प्राणपणाने लढत होता. त्याच्या अंगावर ९ जखमा झाल्या होत्या. पण शेवटी एक बाण त्याच्या उजव्या खांद्यात घुसला आणि तो हौद्यात कोसळला. त्याने आपला हत्ती वळवला आणि हत्तीनेही आपल्या धन्याला सुखरुपपणे तळावरआणलं. .

नंतर पोरस आणि सिकंदरमधे झालेले संवाद तर जगप्रसिध्दच आहेत. सिकंदरकडेही जिंकलेल्या पोरसच्या राज्याचा सांभाळ करायला पोरसशिवाय दुसरा लायक समर्थ अधिकारी नव्हताच. त्याला आणखी पुढे दिग्विजय करत जायचं होतं. पोरसच्या राज्यात अडकून पडायचं नव्हतंच. त्यामुळे पोरसला राज्य परत देऊन सिकंदर तिथून पुढे गेला.

तो दिवस. सिकंदर आणि पोरस आमनेसामने उभे ठाकले. ८ तास लढाई चालली. इतिहासकार या लढाईला बांबू युग विरुध्द स्टील युग असं नाव देतात. शस्त्रास्त्रांमधे आपल्याकडे बांबू होते आणि सिकंदरच्या लोखंडी सळ्यांविरुध्द पोरस लढत होता. युध्दसाहित्यात आपण इतके मागे होतो.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

# भारतीय युध्दशास्त्राचा इतिहास.

भारतीय उपखंडावर अनेकानेक घराण्यांनी सत्ता गाजवली. भारत हा कृषीवलांचा देश. शेतकरी-जमीनदार-जहागिरदार-राजा-महाराजा-सम्राट अशा पायऱ्यांनी राजसत्ता बहरल्या. ज्याच्या अंगी पराक्रम, धाडस, महत्त्वाकांक्षा, त्याने विजय मिळवत आपल्या सीमा विस्तारत नेल्या. दक्षिणेकडे सातवाहन, होयसाळ, राष्ट्रकूट, चोला, पंड्या अशी घराणी उदायाला आली आणि उत्तरेत पोरस, मौर्य, सुंग, गुप्त घराणं, रजपूतांचे अनेक राणा आणि रावळ वारस यांनी राज्याची धुरा सांभाळली. दोन रजपूत तरुण लष्करी चाकरीच्या शोधात महाराष्ट्रात आले तेव्हा भोसले घोरपडे घराण्यांचा उदय झाला. काठीयावाडचे यदुराय आणि कृष्णराय हे दोन बंधू विजयनगर साम्राज्यात चाकरीसाठी गेले त्यांनी मैसूरच्या वोडियार घराण्याचा पाया घातला. युध्दं जिंकली जातात ती आक्रमकता, गुप्तता, गुप्तहेर, युध्दसाहित्य, गनिमांचा शत्रूचा कावा ओळखून त्यावर अचूक नियोजन करणं आणि साम-दाम-दंड-भेद यावर. शत्रूची आणि कमतरता ओळखणं हा आणखी एक महत्त्वाचा भाग. राजांच्या वारसांच्या पराक्रमांवर ही घराणी उदयाला आली आणि वारसांच्याच नाकर्तेपणामुळे लयाला गेली. आक्रमण आणि संरक्षण या द्वंदात ही युध्दं घडत गेली. लष्करी सामर्थ्य वाढत गेलं ते विज्ञानाने लावलेल्या निरनिराळया युध्दसाहित्यांमुळे. विजय त्यांचाच झाला.

आदिमानवाच्या जन्मापासूनच शस्त्रांचा जन्म सुरु झाला. जंगलात राहणारा माणूस जनावर मारण्यासाठी आणि जंगली जनावरांपासून बचावासाठी दगड मारत होता तो वस्ती वाढल्यावर जेव्हा दुसऱ्या लोकांशी भांडायला लागला तेव्हा मारा शब्दाला आणखी एक शब्द जोडला गेला तो मारामारी. त्यातूनच काळाच्या ओघात विस्तारल्या रोमन, चिनी, इजिप्त आणि ग्रीक प्राचीन संस्कृती म्हणजे सिविलायझेशनस्. भारतीय महाभारत युध्द हे आपलं पहिलं महायुध्द..युध्द चालू असतांना, अर्जुनाला हवं असेल तसा रथ वाटेल तसा वळवायचा, समोरच्या शत्रूच्या फौजेत घुसवून त्यांना ठार करायचं हे सारथ्याचं काम..त्यात अनेक प्रकारच्या बाणांचा मोठा साठा करण्यासाठी जागा होती. गदा, धनुष्यबाण ही त्याकाळातील शस्त्रं. डोळ्यांना मारण्याचे छोटे बाण इथपासून मोठमोठी वेगवेगळी अस्त्रं त्यावेळी होती. द्रौपदी स्वयंवराच्या वेळी प्रेक्षकांच्यामधे बसलेल्या कृष्णाची आणि पांडवांची पहिली भेट होते. ही भेट मुद्दाम कृष्णाने घडवून आणली असेल का? कारण कृष्णाला यांची मैत्री हवीच होती. कृष्णाची मथुरा त्याच्या कंसाचा सासरा, जरासंधाने बळकावली होती म्हणून त्याला क्षत्रियांची मदत हवी होती. आणि पांडवांनाही मुत्सद्दी माणसाची कौरवांशी लढायला गरज होतीच. भारतीय राजकारणातील ही पहिली युती. चाणक्याला चंद्रगुप्त हवा आणि चंद्रगुप्ताला चाणक्य हवा, अशीच ती राजकीय परिस्थिती होती.

सततच्या सीमातंट्यांमुळे रोमन, इजिप्शिअन, ग्रीक, चीनी लोकांनी युध्दसाहित्यात शोध लावणं चालूच ठेवलं. या सर्वांचं नाविक दलही प्रचंड सुधारलेलं होतं. त्यांच्याकडे ९ मजली फिरते मनोरे, moving tower होते

ज्यात अनेक सैनिक लपून बसून बाणांचा मारा करत असत. पण समोरचा शत्रू मात्र यांना मारू शकत नसे. अग्नी बाण, रथ, आर्किमेडिज claw अशी साधनं निघाली. आर्केमेडिजने fishing rod सारख उंच काठी आणि त्याला लांब दोरखंड बनवला. दोरखंडाच्या टोकाशी लोखंडी पंजा लावला. शत्रूच्या बोटी किनाऱ्याशी तटबंदीजवळ आल्या की हा पंजा जहाजात अडकून जहाजं उलटवत असत आणि बेसावध असलेले शत्रू पाण्यात बुडत. मध्य आशियातील टोळयांनी रिकिबिचा शोध लावला. रिकिब म्हणजे stirrups. रिकिबित पाय अडकल्यामुळे घोड्यावर बसल्यावर तुर्कांचे हात मोकळे झाले आणि तुर्कांच्या तीरंदाजीला वेग आला. शत्रूला आपल्यामागे पळत यायला लावायचं आणि मग एका तुकडीने शत्रूच्या मागच्या बाजूला जाऊन त्यांना कापून काढायचं ही तुर्कांनी तुलुगामी पध्दत शोधून काढली होती. मात्र अकराव्या शतकाच्या जवळपास चीनने गनपावडरचा शोध लावला आणि युध्दसाहित्यात प्रचंड क्रांती झाली. सॅलपिटर, कार्बन आणि सल्फर यातून पहिली गनपावडर बनली त्याला ब्लॅक पावडर नाव पडलं. चीनमधे सुरुवातीला फटाका म्हणून बांबूमधे पावडर भरून तो दूर फेकला जायचा. त्यातूनच पुढे तोफांचा शोध लागला. आपल्याकडेही गन पावडरला कृष्ण मृत्तिकाच म्हणत.

स्पेन, इटाली, फ्रान्स, तुर्की,चीन सगळेच देश नवीन नवीन सुधारत गेलेली शस्त्रं बनवू लागले. तोफांच्या नंतर १४५० मधे पहिली बंदूक बनली मॅचलॉक्स नावाची. ती अगदी प्राथमिक अवस्थेत होती. त्यानंतर ऑर्किबस, ब्लंडरबस बंदुका निघाल्या. लांबी-वजन आणि लॉक सिस्टीम आणि बंदूका भरभर लोड करणं, यात सुधारणा होत गेल्या.. टिपू सुलतानने आपल्या १७९९

सालच्या शेवटच्या दिवशीच्या लढाईत ही ब्लंडरबस बंदूक वापरली होती. मग मस्केट निघाल्या. मग घोडदळाला उपयोगी पडेल अशी कमी वजनाची बंदूक निघाली. शिपायाला खांद्यावर बंदूक ठेवून उडवायचा शोध लागला. हे सगळं १७/१८ व्या शतकापर्यंत भरभर वाढत गेलं. आपला शस्त्रांचा माल विकायला पोर्तुगीज, स्पॅनिश, युरोपियन दलाल, इतर देशांमधे घिरट्या घालायला लागले तसे इथे भारतातही आले. त्यांना इथे खूप व्यवसाय मिळाला. या फिरंग्यांना आपल्या राजांकडे मोठ्या पगारांच्या नोकऱ्याही मिळाल्या. कारण या तोफा उडवणारे इथे कुणीच नव्हतं. तलवारींमधेही त्या हलक्या आणि लांब बनण्याचे शोध लागले. ग्रेट वॉलवर तोफा चढवून चीनने मंगोलांवर तोफांनी हल्ला केला होता. १४ व्या शतकात तोफांची निर्मिती प्रचंड वाढली.

ऑटोमन सुलतान महंमद द्वितीय हा कॉंस्टंटिनोपल जिंकायच्या प्रतिज्ञेने झपाटला गेला होता. कॉंस्टंटिनोपलच्या अभेद्य भिंती फोडायच्या तर ताकदवान तोफांची गरज होती. तोपर्यंत तोफा बनवण्याच्या पध्दतीतही सुधारणा होऊन लोखंडाऐवजी ब्रॉंझच्या तोफा बनायला लागल्या होत्या. पण दारुगोळा पटकन स्फोट होणारा नव्हता. सुलतान महंमदने ७५० पौंड वजनाचे गोळे उडवणाऱ्या ६० तोफा तयार केल्या. त्याला आता आस होती ती प्रचंड ताकदीची जबरदस्त तोफ बनवणाऱ्या फाऊंड्री इंजिनियरची. आणि ती पूर्ण केली एका ओरबन नावाच्या टेक्निशियनने. हा हंगेरीचा इंजिनियर तोफा बनवण्यात माहीर होता. त्याला प्रचंड मोठी तोफ बनवण्याचं कसब होतं म्हणून तो आधी रोमन सम्राटाकडे गेला. पण सम्राटाकडे ओरबनने मागितलेला पगार द्यायची ताकद नव्हती. मग ओरबन सुलतान महंमदकडे गेला. ओरबानच्या मुलाखतीतून प्रचंड

मोठी तोफ तो बनवू शकतो याची खात्री झाल्यावर सुलतानाने ओरबनेन मागितलेल्या पगारापेक्षा चौपट पगार देण्याची तयारी दाखवली.

एदिर्नाच्या बाहेर दूर ओरबन लगेच तयारीला लागला. तोफ बनवण्यासाठी लागणारं ब्राँझ मिळवणं सुलतानासाठी फक्त एक फतवा काढण्याची गरज होती. तसा फतवा त्याने काढल्याबरोबर त्याच्या साम्राज्यातील सर्व चर्चमधल्या ब्राँझच्या घंटा ताबडतोब उतरवण्यात आल्या. आणि एदिर्नाला पाठवण्यात आल्या. मग ओरबनने २७ फूट लांब खड्डा जमिनीत तयार केला. त्यात दगड, कोळसे, लाकडं, घालून खड्ड्याच्या दोन्ही बाजूला कोळशाच्या उंच राशी रचण्यात आल्या. ही फर्नेस तयार झाली. मग त्यात त्या सर्व ब्राँझच्या घंटा ठेवण्यात आल्या. या भट्टीला मग विस्तवाने पेटवण्यात आलं. सुलतानाने आपल्या सर्व सरदारांना त्यादिवशी बोलावलं, आणि आपापलं सोनंही त्यात टाकायला सांगितलं. सरदारांनी आपले चांदीचे सिक्के आणि सोनंनाणं त्या भट्टीत टाकलं. १००० सेंटिग्रेडला ती फर्नेस तापवण्यात आली. त्या भट्टीतून तयार झाली एक महाप्रचंड ताकदीची २७ फूट लांब आणि ३० इंच तोंडाची डायमिटरची, ब्राँझची तोफ. ही महाकाय तोफ बघून सुलतान प्रचंड खूष झाला. त्याने ही तोफ बनवल्याची बातमी मुद्दामच बाहेरच्या जगात, विशेषत: रोमन सम्राटापर्यंत पसरवली. या महाकाय तोफेचं नाव होतं, बेसिलिका.

आता ती तोफ उडवून बघायची परीक्षा घ्यायची होती. तीही लवकरच झाली. या तोफेसाठी १५०० पौंडाचा ग्रॅनाईटचा एक गोल गोळा बनवण्यात आला. त्यादिवशी शहरातील सर्व वयोवृध्द लोकांना धमाक्याची पूर्व सूचना

देण्यात आली. गर्भवती बायकांना गर्भपात होऊ नये म्हणून दूर पाठवण्यात आलं. तो गोल दगड तोफेत ठेवायलाच मुळी ५०० मजूरांची मदत लागली. मग शहराबाहेर ती तोफ नेऊन त्याला बत्ती देण्यात आली. तोफेतून तो १५०० पौंड गोळा उडाला आणि जिथे पडला तिथे जमिनीवर ६ फूट खोल खड्डा पडला आणि त्याचा दणदणीत आवाज १० मैलांवर जाऊन पोचला. त्यादिवशी सुलतान महंमदाचं स्वप्न यशस्वी होणार हे नक्की झालं. सुलतानाने मग आपल्या सर्व मांडलिकांनाही फौज घेऊन कॉंस्टटिनोपल समोर यायला सांगितलं. १ एप्रिल १४५३ या दिवशी सुलतान महंमदाची फौज आणि जानिसेरिज सैनिक, कॉंस्टटिनोपलच्या स्वारीसाठी एदिर्नामधून बाहेर पडले. त्याच्या ६० तोफाही चालायला लागल्या. त्या प्रचंड मोठ्या तोफेसाठी सुलतानाने ५० बैलजोड्या आणि गाडी ओढणारे ४०० गुलाम यांची वेगळी सोय केली. ती तोफ सर्वात शेवटी निघाली पण त्यासाठी लागणारे, सुतार- चांभार- वाटेतील रस्ते सरळ करणारे पाथरवट, आधीच पुढे गेलेले होते. ते मजूर जमीन उंच असेल तिथे सरळ करत होते, पाणी लागलं तर ते बुजवून, तिथे रस्ता तयार करत होते, जंगल आलं तर ते साफ करत होते. एप्रिलमधे या तोफा राजधानीसमोर उभ्या राहिल्या. महाकाय बेसिलिका तोफ दारुगोळयांनी भरायला दोन तास लागत, आणि ती दिवसातून ७ वेळाच वापरता येत होती. तोफ उडल्यावर तिला फुटण्यापासून वाचवण्यासाठी प्रचंड तेल लावावं लागायचं. शेवटी ६ आठवड्यांच्या वापरानंतर ती तोफ फुटली. पण परत एकदा दोन लोखंडी कडी त्याभोवती चढवून ती वापरली गेली. ज्या दिवशी ती तडकून फुटली त्यात ओरबनही ठार झाला. ही तोफही ऐतिहासिक ठरली. या सुलतान महंमदने कॉंस्टंटिनोपल जिंकून इ. स. १४५३ मधे इतिहासाला नवीन वळण

लावलं. रोमन साम्राज्याचा अस्त झाला. युरोपमधे तुर्कांचं वर्चस्व श्रेष्ठ ठरलं आणि कॉंस्टंटिनोपलचं इस्तंबूल या नवीन नावाने बारसं झालं.

युरोपियन देशांमधे नाविक दलही प्रगत होत चाललं होतं. कंपासच्या शोधामुळे जहाजं भरकटत न जाता हव्या त्या ठिकाणी वळवली जायला लागली आणि किनाऱ्याला लागायला लागली होती. स्पेनच्या राजाने १७ व्या शतकात नाविक स्कूल चालू केलं होतं. त्यामुळेच अमेरिकेचा शोध लावणाऱ्या कोलंबससारखा धाडसी नायक त्या देशात जन्मला. त्यांचं नाविक दलही प्रचंड सुधारलेलं होतं. १५-१६-१७ व्या शतकात दक्षिण भारतात समुद्र किनाऱ्याने डच-इंग्रज-पोर्तुगीज-फ्रेंचांच्या युध्दसाहित्यांनी विळखा घातला. उत्तरेत तर आधीच हिमालय ओलांडून येणाऱ्या साहसी तुर्कांचं-अफगाण्याचं बूच बसलं होतं. भारत उपखंडाला आता युरोपियन गोऱ्या लोकांनी ग्रासलं. फ्रेंचांनी पश्चिम तीरावरचं माहे आणि पूर्व समुद्रकाठचं पाँडेचेरी बळकावलं. इंग्रजांनी कलकत्ता आणि मद्रास...पाठोपाठ डच आले. ह्या परकीयांच्या येण्याने भारत चहूंबाजूंनी परकीयांच्या घेऱ्यात बंदिस्त झाला होता. हे सारे समर्थ झाले ते शस्त्रांमुळे.

भारत या युध्दशास्त्रात कुठे होता?

भारतात हल्ला करायला आलेला पहिला परकीय राजा म्हणजे इ. स. पूर्व ३२६ मधे आलेला अलेक्झांडर द ग्रेट. याने आपल्याबरोबर folding बोटी आणल्या होत्या, हालचालीची गती वाढवण्यासाठी त्याच्या गाड्यांना त्याने बैल न जोडता घोडे जोडले होते. या बोटी त्या गाड्यांमधे घालून तो स्वारीवर नेत असे. त्याच्या रथांना त्याने कोयते लावले होते ते आपण बेनहर या जुन्या इंग्लीश सिनेमातून पाहिलं आहे. भारतीय राजांचं बलस्थान हत्ती आहे हे

त्याला माहीत होतं, म्हणून त्याने caltrop नावाचे आपल्या त्रिशूळासारखे पण ४ नखांचे छोटे लोखंडी तुकडे आणले होते. ते त्याने पोरसच्या मार्गावर फेकले. पोरसचे हत्ती हे टोकदार खिळे पायात घुसल्यावर जखमी झाले आणि पळून गेले. त्याच्यावर बसलेले सैनिक खाली पडले आणि ठार झाले. प्रचंड फौज असूनही ७ फूट उंच धिप्पाड पोरस युध्द हरला ते war weapons च्या जुनेपणामुळे.

भारताच्या उत्तरेला गुप्त, मौर्य, पश्चिमेला रजपूत, आणि दक्षिणेत राष्ट्रकूट, होयसाळ, चोला, पंड्या राजघराण्यांनी इ. स. पूर्वच्या अखेरीच्या काळात आपलं स्थान भक्कम केलं होतं. उदय आणि विलय या दोन्ही अवस्थांमधून ही घराणी विस्तारत होती आणि लयाला जात होती. सिकंदरसारख्या परकीय आक्रमणाशी त्यांचा संबंध आला नव्हता. त्यांच्या एकमेकातच लढाया चालू होत्या.

नंतर भारतात खुष्कीच्या मार्गाने तुर्की आले. भारत त्यांना जवळच होता. मग आले ते युरोपियन डच, पोर्तुगीज, फ्रेंच आणि इंग्लीश. हे दर्यावर्दी लोक. १४९८ सालाच्या मे महिन्यात वास्को द गामा पश्चिम किनाऱ्यावर उतरला. तोपर्यंत केप ऑफ गुड होपपर्यंत ते जहाज घेऊन प्रवास करत होते. पण वास्को द गामाला तिथे एक अरब भेटला. घोडे विकायला आधीपासून अरब भारतात येतच होते. त्याने वास्को द गामाला भारताचा मार्ग दाखवला. आणि मग साऱ्या युरोपला भारताचा व्यापार खुला झाला. ह्या युरोपियनांचं वैशिष्ट्य म्हणजे यांनी भारताचे किनारे गाठले, ताब्यात घेतले, किल्ले बांधून ते मोकळे झाले आणि मग इथल्या राजकारणात शिरले. यांच्याकडे त्यांची स्वत:ची फौज होती. ते सर्व लोक युध्दशस्त्रांमधे कमालीचे प्रगत होते.

आपल्याकडे निघालेली नवीन युध्दशस्त्रं ते भारतात मसाल्याचा व्यापार करण्यासाठी येतांना घेऊन येऊ लागले. भारतातील राजांमधे खपवू लागले. भारतातील राजे आपल्याच भाऊबंदांविरुध्द ती शस्त्रे वापरण्यासाठी फिरंग्यांना कामावर ठेवायला लागले. इथली राजकारणाची माती खणायला अगदी सोपी आहे हे त्यांना लगेच कळलं. महंमद घोरी, बाबरही आले ते भारतीयांच्या बोलावण्यावरुनच आले. इब्राहिम लोदीबरोबरच्या लढाईत बाबर जिंकला कारण त्याने तुर्कांकडून तोफा आणल्या होत्या. भारतीयांना त्या माहीत नव्हत्या. त्यानंतर मात्र अहमदनगर, विजापूरच्या मोठ्या तोफांनी कमाल केली जयसिंग राजाची जयवाण तोफही प्रसिध्द झाली. फ्रेंचांचा बुसी, डुप्ले, यांची तोफांची करामत भारतीयांना नवीन होती. मोठे पगार घेत हे सेनाधिकारी भारतीय राजकारणात शिरले. नानासाहेब पेशव्याने या बुसीचा शिष्य गोलंदाज मुझ्झफरखान गारदी याला आपल्याकडे घेतलं आणि त्याच्या हाताखाली यशवंतराव पानसे यांना गोलंदाज बनवलं. पानिपतावर इब्राहिमखान गार्दीने तोफांची कमाल केली.

एवढे परकीय लोकांचे तांडे आल्यावर आपण त्यांच्याशी युध्द हरलो. त्यांनी भारतातील सत्ता बळकावली. त्यांच्या कारणांची बैठक जदुनाथ सरकार यांनी मांडली आहे. इतिहास तपस्वी सर जदुनाथ सरकार यांनी भारतीय युध्दशास्त्राचे काही दोष मांडले होते. १. त्यातला पहिला होता चातुर्वर्ण्य. भारतीय समाजव्यवस्थेत, चार पुरुषांमधे फक्त एकच क्षत्रिय वर्ग लढणारा होता. बाकी तीन ब्राह्मण, वैश्य, शूद्र तीन पुरुष बिनलढाऊ होते. २. दुसरा दोष भारतीय युध्द संध्याकाळी थांबत असे. त्यामुळे तुर्कांचे हल्ले रात्रीच होत.

महाभारतातील युध्दही संध्याकाळी थांबत असे. ३. तिसरा दोष संध्याकाळी छावणीमधे भारतीय फौजांमधे मौजमजा चालायची. ४. लष्करात असतांना, लढाया चालू असतांना देवपूजा, सोयर-सुतक-श्राध्द, अशी भारतीयांचं धार्मिक कार्यही चालत असत. ५. युध्दसाहित्यात आपण कमालीचे मागे होतो.

जदुनाथ सरकारांनी सांगितलेले सगळे दोष मोडून काढले ते एक महामानवाने. १७ व्या शतकात महाराष्ट्राला जन्माला घालणारा जन्मला एक युगपुरुष... शिवाजीमहाराज! दिल्लीच्या सुलतानी आक्रमणामुळे पाठीचे स्ट्रॉसारखे मरगळलेले कणे ताठ केले या राजाने. धाडस, आत्मविश्वास, आणि गनिमीकावा हे तीन मंत्र त्याने मराठ्यांना शिकवले. चातुर्वर्ण्य मोडून राष्ट्र उभारणीसाठी प्रत्येकाला कामाला लावलं या राजाने. जन्माचा दाखला फाडला, गुणांचा दाखला पाहिला. रामोशांना किल्ल्याच्या खाली रक्षणाचं काम दिलं, त्यांच्यातील एकाला बहिर्जी नाईक केलं. मावळयांना सह्याद्री चढायला लावला. महाराजांसारखा धाडसाला आसरा देणारा राजा मिळाल्यावर ब्राह्मणांनी आपली पळीपंचपात्री टाकून तलवार हाती घेतली. एका सासवडातून पुरंदरे-बोकील-अत्रे हे तीन पुरुष महाराजांना येऊन मिळाले. या रयतेच्या राजाने सह्याद्रीच्या जांभा दगडालाही कामाला लावलं. किल्ल्यावर तळी खोदली आणि निघालेल्या दगडातून कोठारं आणि निवारे बांधले. युध्दातलं दुसरं बळ घोडदळ. आपल्या कमजोर घोड्यांमधे अरबी घोड्यांची नसल मिळवून भीमथडीची घोडी ताकदवान बनली, ती गनिमीकाव्यात जंगलातही घुसू लागली आणि सरळ रस्त्यावर वाऱ्यासारखी धावायला लागली. बाळाजी आवजींच्या सुंदर हस्ताक्षराचा उपयोग करून त्यांना आपलं पत्रलेखनिक

बनवलं. कायस्थांना हिशेबाला ठेवलं. येसूबाई राणीने दोनच शब्दांमधे बाळाजींचं वर्णन केलं होतं. बाळाजी आवजी महाराजांचं मन होते. कारण महाराज पत्र लिहितांना त्यांचं मन बोलून दाखवायचे. समर्थांचे संन्यासीसुध्दा चावडीवर, नदीवर, मठांमधे मिळणारी माहिती आणू लागले. संध्याकाळ झाली की युध्द थांबवलं जायचं पण महाराजांनी मात्र मध्यरात्री महाराजांनी शाहिस्तेखानावर हल्ला चढवला. महाराजांच्या कोणत्याही मावळ्याची हिंमतच नव्हती रात्री मजा करण्याची. सागरी मार्गाचं महत्त्व ओळखून महाराजांनी नाविक दल भक्कम केलं. वेगवेगळया वजनाची आणि आकारांची त्यांच्याकडे ४/५ शे जहाजं होती.

अद्ययावत युध्दसाहित्य हे लष्कराचं प्रमुख अंग. महाराजांना तोफांचं महत्त्व लगेच कळलं. युरोपात होणाऱ्या नवीन शस्त्रांसाठी पोर्तुगीज, इंग्लीश दलालांशी महाराजांनी संपर्क करायला सुरुवात केली. इंग्रज म्हणाले, आम्ही मुघलांशी कराराने बांधील आहोत..त्यामुळे तुम्हाला तोफा देऊ शकत नाही.. मग महाराजांनी त्यांना पर्याय सुचवला..तुम्ही पोर्तुगीजांना विका मी त्यांच्याकडून बंदुका तोफा विकत घेतो.. लगेच महाराजांनी भक्कम तोफखाना उभारला. ५ रुपये ४ आणे मण या भावाने मुंबईचे दलाल तोफा विकत त्याही दुय्यम प्रतीच्या..पण शतकानुशतके भारत तलवार-खंजीर-बर्ची वगैरे धारदार शस्त्रं बनवण्यात कुशल होता. घोड्यांचे नालही स्टीलसारख्या धातूंचे बनत असत. मद्रासजवळ सुंदर हलक्या तलवारी बनत. आपल्या कोकणातील स्वारीच्या वेळी, गोवेकर सावंतांकडे युरोपात बनलेली सुंदर तलवार होती, ती महाराजांनी त्यांच्याकडून ३०० होन आणि पोशाख देऊन विकत घेतली. तिचं

नाव भवानी ठेवलं. ती आल्यावर महाराजांना यशच मिळत गेलं म्हणून ते नित्यनेमाने तिची पूजा करत. पण मोहिमेत मात्र महाराजांनी पूजेचं स्तोम माजवलं नाही. शिवाजी महाराजांनी आपल्या स्वाऱ्यांमधे तोफा आणि हत्ती हे गतीला अडथळे आणणारे दोन्ही प्रकार कधीही वापरले नाहीत. त्यामुळे त्यांच्या हालचाली जलद झाल्या आणि शत्रूला पाठलाग करण्याला असाध्य झाल्या. गनिमीकावा, धाडस, आत्मविश्वास या तीन महाराजांनी दिलेल्या मार्गावरुन मराठ्यांनी पुढे १०० वर्षे माधवराव पेशव्यांच्या पिढीपर्यंत विजयच मिळवला. मराठे म्हणजे शौर्य आणि दरारा ही कीर्ती पानिपतानंतरही होती. महादजी शिंद्यांनी मीरबक्षी आणि वकील ई मुतलक ही दोन पदे मिळवून, दिल्लीच्या बादशहाला संरक्षण देऊन दिल्लीवर राज्य करण्याचं बाजीरावांचं स्वप्न सत्यात उतरवलं. १६०० सालात व्यापाराच्या बहाण्याने भारतात आलेल्या ईस्ट इंडियाच्या इथल्या लष्करी अधिकाऱ्याचं धाडस इतकं की पन्हाळयावर शिवाजी महाराज असतांना सिद्दी जोहारतर्फे तोफा डागायला इंग्रज आपल्या तोफा घेऊन आला होता. महाराजांच्या कडक धोरणामुळे त्याने मग आपले हात पोळून घेतले होते.

जे फ्रेंच आणि इंग्रज इथल्या राजांना खेळवत होते, त्या फ्रेंचांनाच टिपू सुलतान आणि महादजी शिंदे यांनी इंग्रजांविरुध्द वापरलं.

युरोपियनानी बंदूका भारतात आणल्या. बघता बघता डच, पोर्तुगिज, फ्रेंच आणि इंग्रजांच्याच एकमेकांविरुध्द लढाया या भूमीवर सुरु झाल्या. भारतीय राजांकडे पैसा प्रचंड होता पण बंदूका, तोफांचं तंत्र, मेकॅनिझम जाणून घ्यायची बुध्दी कुणालाच नव्हती. हैदरअली आणि टिपू सुलतानने मात्र

फ्रेंचांकडून शस्त्रकला उचलली. टिपूचा बंगलोरमधे शस्त्रांचा कारखाना तारामंडल इथे होता. त्यातलं इंजिनिअरिंग त्याला माहीत होतं. त्यात त्याने स्वत: अनेक सुधारणा केल्या होत्या. टिपू सुलतानची भारताला देणगी म्हणजे त्याने बनवलेलं शुहाब नावाचं रॉकेट. यात त्याने एक ८ इंची लोखंडी नळकांड बनवलं, एका बाजूने ते बंद करुन त्यात गनपावडर भरली. बांबूच्या एका त्रिकोणी स्टँडवर ते नळकांड ठेऊन अंतराप्रमाणे त्याला अँगल दिला जायचा. आणि त्या नळकांड्याला एक तलवारही त्याने जोडली होती. शत्रूचं घोडदळ दूर असतांनाच ही रॉकेट्स निळा प्रकाश टाकत त्यांच्यावर येऊन पडायची. घोडेस्वार भाजला नाही तर निदान तलवारीने तरी जखमी व्हायचा. टिपूने ६००० लोकांना खास शिक्षण दिलं आणि दळ बनवलं. इंग्रजांनी ही रॉकेट्स सुधरवून नेपोलियन विरुध्द वापरली.टिपूने तोफांचं नाव विज आणि बंदुकीला तफंग नावं दिली. इ. स. १७८० च्या लढाईत त्याने इंग्रजांच्या विरुध्द ही रॉकेट्स वापरली आणि इंग्रजांना शरण आणलं. पण त्याचवेळी टिपूविरुध्द इंग्रजांना सामील झालेल्या मराठ्यांच्या तोफा कशा होत्या?

आपल्याकडील तोफखाना कसा होता त्याचं वर्णन धारवाडच्या वेढ्यातील इंग्रजाने कॉर्नवॉलिसला लिहिलं, “मराठ्यांच्या तोफा किल्ल्यासमोर आहेत. सकाळी तोफा उडवणारे गोळा होतात. तोफेत गनपावडर भरतात.. विड्या ओढतात. त्यात अर्धा तास गेला की उठतात. एकदा तोफ डागतात. तोफा खूप जुन्या आणि निकृष्ट दर्जाच्या आहेत. काहींच्यामधून नुसता धूर येतो, त्यानेही फौजेला समाधान मिळतं. काही तोफा स्वत:च आगीने फुटतात. तोफा नेमक्या तटबंदीवर न लागता, कुठेही लागतात. दुपारी तोफा बंद. संध्याकाळी

बंदूकाच जास्त चालतात. त्यांच्याकडे २० तोफा आहेत त्याने २० वर्षांनी काम होईल. दारूगोळा संपला की पुण्याहून मागवावा लागतो. तोपर्यंत तोफा बंद. रसद संपवून किल्लेदाराला शरण आणण्यावरच त्यांचा भर होता. मराठ्यांनी याच मार्गाने धारवाड किल्ला जिंकला. ही परिस्थिती १७६१ मधलं पानिपत हरल्यावर २० वर्षांच्यानंतरची..पानिपतावर अब्दालीकडे मात्र उंटांवर बसवलेल्या स्विवेल गन्स, त्या सर्व दिशेने फिरत, उंटावरुन कुठेही नेता येत असत..

युरोपियन आपली पलटणे घेऊन भारतीय फौजेसमोर लढायला उभे राहिले तेव्हा एक फार मोठा फरक आपल्या सर्व सेनापतींनी ओळखला. तो म्हणजे त्यांची प्रगत झालेली कवायती शिस्त. त्यांचे गणवेश, त्यांना दिलेलं सैनिकी शिक्षण या सर्व गोष्टीत आपल्या फौजा कमालीच्या गबाळया आणि बेशिस्त होत्या. ह्या फौजा पाहिल्यावर अनेक लहान मोठ्या सत्ताधिशांना आपलं सामर्थ्य वाढवायला या परकीय सेनापतींची गरज भासायला लागली. त्यामुळे भारतात फ्रेंच सेनानायकांचं प्रमाण खूप वाढलं. इंग्रजांना टक्कर देण्यासाठी फ्रेंचांची मदत घेणं सुरु झालं आणि त्यांची युरोपियन भूमीवर चालणारी युध्दं आता भारतीय भूमीवर वर्चस्वासाठी सुरु झाली. या लढायांमधे फक्त चाकरीला ठेवलेली भारतीय फौज एवढ्याच लायकीची राहिली.

लष्करात असतांना भारतीयांचं धार्मिक कार्यही चालत असे. निजामाच्या स्वारीवर असतांना ग्रहण आलं तेव्हा पेशवा स्नानासाठी नदीत उतरला. ही संधी साधत निजामाच्या फौजांनी मराठ्यांवर हल्ला चढवला तेव्हा पेशवा घोड्यावर बसून निघून गेला. शत्रूने मग सर्व चांदीची पूजेची भांडी

पळवली. सोयर सुतक आलं की तो सैनिक कामावर येत नसे. श्राध्दपक्षही होत असे. हैदरने हावेरीवर हल्ला केला तेव्हा ७० वर्षांचे विंचूरकर दुसरीकडे सरदार वडिलांचं श्राध्द करत होते ते धावत हावेरीवर आले. मुघल आणि इंग्रजांना लष्करात एकच धर्म माहीत होता. Kill Him. bravery and brutality या दोन बाजू होत्या एकाच यश नावाच्या नाण्याच्या. संस्थानं खालसा करतांना डलहौसीचे इंग्रज लष्करी सेनापती लढाई जिंकली की ५ ते ८० वर्षांच्या सर्व निरपराध्यांना कापून काढायचे..त्याला विजन म्हणत. भयानक क्रौर्य..पण लढाई जिंकायला महत्त्वाचं होतं ते. शत्रूने परत उभं राहता कामा नये. इंग्रजही तुर्कांच्या एवढेच क्रूर होते. १७ वेळा सोमनाथावर गझनीच्या महंमदाने स्वारी केली पण एकही भारतीय राजा सावध होऊन त्याच्या प्रतिकाराला उभा राहिला नाही की जिंकला नाही. अत्यंत शूर, अत्यंत चपळ असूनही आपण युध्दसाहित्याच्या अपंगत्वामुळे पारतंत्र्यात पडलो.

मुघलांनी आणि वॉरन हेस्टींगने लिहून ठेवलंय की सर्व भारतीय एक झाले असते तर आम्हाला देश सोडावा लागला असता...राणा प्रताप एकटाच लढला, काँग्रेसही जहाल आणि नेमस्तांमधे विभागली. एक होऊन लढलेच नाहीत शत्रूशी भारतीय कधी! उलट परकियांनी आपल्याच लोकांची फौजेत भरती करुन आपल्याच लोकांविरुध्द वापरलं. आपणच आपल्या राजांना मारलं, क्रांतीकारकांना मारलं. तुर्कांनी, मुघलांनी, इंग्रजांनी आपले लोक तरी कुठे आणले होते? आपल्याच लोकांच्या फितुरीमुळे परकियांना विजय मिळणं आपण सोपं करुन दिलं. आपणच त्यांच्या गुलामीत जाऊन पडलो. का नाही परकीय आक्रमक फायदा घणार आपल्या या मानसिकतेचा? त्यामुळेच ११९१

सालापासून म्हणजे १९४७ या सालापर्यंत आपण आपलं स्वातंत्र्य गमावून बसलो.

इंग्रजांनी भारत एकत्र केला तो त्यांच्या कारभारासाठी. परत स्वतंत्र भारतात चीनबरोबर आपण युध्द हरलो ते याच कारणांमुळे. हा आपला युध्दशास्त्राचा इतिहास आहे.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

# चक्रवर्ती हर्षवर्धन

## जन्म ४ जून ५९० -मृत्यू- ६४७




भारताच्या मध्ययुगीन काळातील म्हणजे इ. सनाच्या उत्तर काळातील एक अत्यंत शूर चक्रवर्ती राजा म्हणजे हर्षवर्धन. उत्तरेत यांचं स्थान मोठं होतं तर विंध्य पर्वताच्या खाली दक्षिणेकडे पुलकेशी द्वितीय सम्राट म्हणून ओळखला जात होता.

आपला देश फार प्राचीन आहे म्हणजे काय? तर फार प्राचीन काळापासून विद्या, कला, गणित, भाषा यामधे आपल्या देशाने प्रगती केली आहे. संस्कृती निर्माण झालेली आहे. अपौरुषेय वाटावेत असे वेद निर्माण झालेले आहेत, बुध्दीवादावर आधारित असे पंथ निर्माण झालेले आहेत. पंडित- ऋषी- मुनि अशी बौध्दिक पातळी मोजणारे दंडक आपल्या पूर्वजांनी कधीच

तयार करुन ठेवलेले आहेत. ऋषी आणि मुनि यांच्यात फरक काय? तर मुनि ही विद्वत्तेची अत्युच्च बौध्दिक पातळी होती. क्षमा हाच मुनिंचा धर्म होता. त्यांनी कुणाला शाप दिला नाही. म्हणूनच दुर्वास वगैरे संतापणारे ऋषी शाप देणारे, ही बुध्दिमत्तेची थोडी खालची पातळी. आपण विद्वान व्यक्तीला बहुश्रुत म्हणतो कारण गुरुमुखातून विद्या पुढच्या पिढीकडे पोचवली जायची. इंग्लिशमधे वेल रेड म्हणतात कारण त्यांची संस्कृती अर्वाचीन..लिपी निर्माण झाल्यानंतरची..

तर, आपल्या पूर्वजांनी काळाचे ४ भाग केले. कृतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग, कलियुग. यात कृतयुगाच्या ५००० वर्षांच्यानंतर त्रेता युग, ३००० वर्षांच्यानंतर द्वापारयुग, २००० वर्षांच्यानंतर कलियुग असे भाग झाले. कलियुग केव्हा संपणार ते महाभारत सांगत नाही. पण कलियुग हे इ. स. पूर्व ३१०१ साली सुरु झालं हे नक्षत्र, ज्योतिष गणित यांच्या आधारे विद्वानांनी नक्की केलंय. भारतातील राजघराण्याच्या इतिहासाचे विद्वान पंडित चिंतामणराव वैद्यांनी तीन भाग केले आहेत प्राचीन काळ इसवीसन पूर्व काळ. म्हणजे राष्ट्रकूट, होयसाळ, चोला,चालुक्य यांचा दक्षिणेतील आणि पोरस, मौर्य, काश्मीरातील गोनर्दीय घराणे यांचा इ. स. पूर्व काळ. मग आला तो मध्ययुगातील ५०० ते १२०० एवढा इसवी सनातला हर्षवर्धन, पुलकेशी, गेहेलोत रजपूतांचा काळ. त्यानंतरचा अर्वाचीन म्हणजे सुलतानी, मुघली सत्तेचा काळ.

हर्षवर्धन राजा हा या मध्ययुगातील एक पराक्रमी नायक. राजकीय सत्तांतराची रीत अशी होती की एकाच घराण्यात सत्ता राहात असे. पण वारस कमकुवत झाला की सत्तांतर होई. जो सामर्थ्यवान सुभेदार असे तो आपलं राज्य स्थापन करत असे. असंच घडलं ते मौर्यानंतरच्या काळात. मौर्य घराणं कमकुवत

झालं तेव्हा पंजाबमधील आजच्या पानिपताजवळचा, श्रीकंठेश्वरचा - श्रीस्थानेश्वरचा मुखिया- मुख्य सुभेदार स्वतंत्र झाला. त्याचं नाव प्रभाकरवर्धन. त्याला दोन मुलगे होते, राज्यवर्धन आणि हर्षवर्धन आणि कन्या राजश्री. राजश्रीचं लग्न कनोजच्या मौखरी घराण्यातील राजपुत्र गृहवर्मा याच्याशी झालं होतं. त्याकाळात कनोज हे एक समृध्द, समर्थ राज्य होतं. दिल्ली हे एक खेड होतं. इ. स. ६०५ मधे हूणांचा हल्ला भारतावर झाला तेव्हा त्या लढाईत १८ वर्षांचा राज्यवर्धन मारला गेला. दुर्दैवाने पाठोपाठ प्रभाकरवर्धनही मरण पावला आणि १६ वर्षांच्या हर्षवर्धनाच्या हाती राज्यकारभार आला. त्याने आजच्या पाकिस्तानातील सिंधपासून बंगालपर्यंत आणि दक्षिणेला विंध्यापर्यंत राज्यविस्तार केला. एवढ्या मोठ्या मुलुखाच्या संरक्षणासाठी त्याच्याकडे १ लाख सैन्य आणि ६०,००० हत्ती होते म्हणतात. त्याकाळी काश्मीरपर्यंत सगळं जंगलच होतं.त्यात रानटी हत्ती भरपूर होते. माणसाळलेल्या हत्तीणींना घेऊन लोक जंगलात जात हत्तिणींच्या मागे हत्ती आले की (फुसलावून) त्यांना पकडून माणसाळवत आणि लष्करी शिक्षण देत. त्यांना झुंज शिकवण्यासाठी चामड्याचे हत्ती तयार करत असत. हत्ती धावू लागले की त्यांच्या पायाखाली शत्रूचे अनेक सैनिक चेंगरुन मरत. त्यामुळे हत्तीदल ही राजांची मोठी ताकद होती. दुसरं घोडदळ. हे घोडे काबूल, इराण ( पारसिक), इथून आणले जात. त्यांना शिक्षण देऊन तयार केलं जाई. तिसरं पायदळ.

हर्षवर्धनाने आपल्या राज्याचा चारी दिशांना विस्तार केला आणि मग चक्रवर्ती हा किताब घेतला. मधल्या काळात कनोजचा राजा गृहवर्मा याच्यावर माळव्याचा राजा देवगुप्तने स्वारी करुन त्याला ठार केलं आणि राजश्रीला कैद

केलं. तेव्हा हर्षवर्धन आपल्या बहिणीच्या शोधार्थ बाहेर पडला. राजश्रीने कैदेतून आपली सुटका करुन घेतली होती, एका जंगलात त्याला राजश्री सती जातांना दिसली तेव्हा तिला घेऊन तो कनोजला आला आणि श्रीस्थानेश्वरचा आपला कारभार तो कनोजहून चालवायला लागला. राजश्रीला स्वत:चा मुलगा नव्हता, त्यामुळे हर्षवर्धनच कनोजचाही कारभार पाहू लागला.

हर्षवर्धनाच्या काळात सर्व लोक पांढरं एकवस्त्र आपल्या अंगाभोवती गुंडाळत असत. स्त्रियाही एक लांबलचक वस्त्रच अंगाभोवती लपेटत असत. ग्रीक सिनेमातून ते आपल्याला पाहायला मिळतं. तसेच कपडे आपले लोकही वापरत. कापूस, लोकर, रेशीम यापासून ही वस्त्रं बनत.. त्यातही उत्तम कापड, गरिबांचं जाडंभरडं कापड असे प्रकार होते. कापड रंगवण्याची कला त्याकाळी माहीत होती. कपडे शिवून घालण्याची प्रथा अरबांनी आणली असावी असं चिंतामणराव वैद्यांचं मत आहे. हिंदूंची तांबडी, बौध्दांची लाल आणि जैनांची पिवळी वस्त्रे असत. त्यामुळे व्यक्तीचा धर्म कळायचा. सर्व धर्म एकोप्याने राहात. त्यांच्यात रोटी बेटीचाही संबंध चालू होता. पुरुष डोक्यावर फुलांच्या माळा बांधत, अंगावर हिरे, मोती, रत्नांचे दागिने घालत. हर्षवर्धनाने आपल्या चक्रवर्तीपणाची खूण म्हणून हातात सोन्याचं कडं घातलं होतं. हिंदू लोक कान टोचत असत आणि कानात दागिना घालत असत. हिंदू सोडून बाकीचे म्हणजे मुसलमानांचे कान टोचलेले नसत म्हणून ते अविंध नावाने ओळखले जात..विंधणे म्हणजे कापणे.. हिंदू, मुसलमान युध्दांमधे, मृत सैनिकांच्या शवांची परिक्षा त्याच खूणेवरुन केली जाई..मुलींचा विवाह त्या वयात आल्यावरच केला जाई. बालवयात नाही. लग्नात सात फेरे, लाजाहोम हे शास्त्रोक्त विधी होत

असत. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी गर्भादान विधी केला जाई. मुलींना शिक्षणही दिलं जाई. पण नवरा वारला की विधवा स्त्रियांना राजवाड्यावर सेवेला जावं लागे. त्यामुळे अनेक स्त्रिया सती जाऊन आपलं आयुष्य संपवून टाकत असत. विधवा स्त्रीचं आयुष्य दु:खी असे.

हर्षाचा राजवाडा भव्य होता. या इमारती अनेक मजली होत्या. त्यांच्यामधे चौक होते आणि त्यात सुवासिक फुलांच्या बागा होत्या. त्याच्या महालांची फरशी चकचकीत आणि गुळगुळीत होती. म्हणजे ग्रॅनाईट सारखे दगड असावेत. भिंतींवर चित्रं काढलेली होती आणि, त्यात रत्नं जडवलेली होती. खांबांवर रंगबिरंगी वेलबुट्टी काढलेली होती. एक चौक न्यायदानाचा होता. तिथे सिंहासनावर बसून हर्षवर्धन राजा न्यायदान करत असे. शिवाय नागरिकांसाठी एक घंटा ठेवलेली होती. तक्रारदारांना ती वाजवून न्याय मिळावा अशी मागणी करता येत असे. दरबारात हर्षवर्धनाच्या अवतीभोवती, त्याच्या सेवेसाठी सुंदर स्त्रियांची निवड केली जाई. चवरी ढाळण्यापासून राजाला विडा देण्यापर्यंत सर्व कामं त्या करत असत. दिवसाच्या तीन भागात त्याने आपली कामं विभागली होती. पहिल्या भागात एकांतात घेण्याचे महत्त्वाचे निर्णय, दुसऱ्या भागात राज्यकारभार आणि तिसरा भाग त्याच्या स्वत:साठी करमणुकीसाठी ठेवला होता. त्यासाठी त्याच्याकडे एक पाण्याचं घड्याळ होतं. त्यामुळे प्रहर कळत असे आणि त्यावेळी भेरी म्हणजे नगारा, शंख वाजवला जाई. तो राजधानीतील लोकांना ऐकू येत असे आणि आता राजा काय काम करत असेल त्याची जनतेला कल्पना येत असे. हर्षवर्धन चक्रवर्ती असल्यामुळे तो चालत असतांना, त्याच्या प्रत्येक पावलाबरोबर सोन्याच्या टिपरीने

नौबतीवर आवाज केला जाई. हर्षवर्धनाचं सिंहासन चार पायांचं आणि हस्तीदंताने मढवलेलं होतं. त्यावर बसण्यासाठी चंदनाने सारवलेला गुळगुळीत दगडाचा पाट ठेवलेला होता. सिंहासनावर बसल्यावर पाय ठेवण्यासाठी खाली रत्नजडीत पादपीठ होतं. शिवाय राजप्रासादात सर्वत्र जाण्यासाठी आसन्दी नावाचं वाहन होतं. त्यात बसून हर्षवर्धन परिसरात हिंडायचा. भारतातील प्रत्येक राजघराण्याचा गुप्ताचा, मौर्यांचा, एक ध्वज होता. शिवाय एक लांछन म्हणजे विशिष्ट खूण असे. बहुतेक हे लांछन पशुपक्षांची चित्रं असे. हे लांछन नाण्यावर आणि मुद्रेवर असे. मुद्रा म्हणजे सही. दुसरा शब्द स्वहस्त असा शब्द होता. हर्षवर्धनाचं लांछन वृषभ होतं.

अत्यंत दानशूर म्हणून याचा मोठा लौकिक होता. दर ५ वर्षांनी तो मोठा समारंभ करुन दानयज्ञ चालवत असे. एकदा तर कुणा भिक्षुकाने त्याची वस्त्रे मागितली तर तीही हर्षवर्धनाने देऊन टाकली आणि त्यासाठी राजश्रीकडे दुसरे कपडे मागितले. तो अत्यंत विद्वान होता. त्याने नागानंद, रत्नावली, प्रियदर्शिका ही नाटकं लिहिली. ४ जून ५९० मधे याचा जन्म झाला. आणि ६४७ साली हा मरण पावला. महाराष्ट्रातील राजा पुलकेशी द्वितिय याने हर्षवर्धनाचा पराभव केला. हर्षवर्धनानंतर त्याचे मुलगे गादीवर आले पण लौकरच त्यांचं घराणं नामशेष झालं.

संस्कृत पंडित बाणभट्टाने लिहिलेलं हर्षचरित्र आणि चिनी प्रवासी ह्युएन त्संग याने लिहिलेलं भारतातील प्रवासवर्णन यामुळे हर्षवर्धनाचं चरित्र लोकांपर्यंत पोचलं.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

## पृथ्वीराज चौहान-महंमद घोरी

## मुसलमानी सत्तांतर सन ११९४.




आर्यावर्तावरचं हिंदू सम्राटांचं वर्चस्व मोडून भारतात मुसलमानी सत्तेचा पाया घातला गेला तो १२ व्या शतकाच्या अखेरीच्या दशकात. त्याला निमित्त ठरला तो दिल्लीपती पृथ्वीराज चाहमान-चौहान. पृथ्वीराज चौहान आणि संयोगितेच्या एका प्रेमकहाणीतून या सत्तांतराला कलाटणी मिळाली. तेव्हापासून भारतात साडेसातशे वर्षांच्या पारतंत्र्याच्या साडेसातीला सुरुवात झाली. पृथ्वीराज चाहमानची दिल्ली हे अफगाणी सत्ततेचं मुख्य केंद्र बनलं. तीच आज आजपर्यंत भारताच्या राजधानीचं महत्त्व घेऊन उभी आहे.

प्रेम कथा सर्वांना आवडतात. कारण त्यात प्रेमाचे लहान मोठे त्रिकोण भरलेलेले असतात. निझामी गझनवी यांनी लिहिलेल्या शिरीन खुस्रो, लैला मजनू, या दिलखेचक पण काल्पनिक प्रेमकथा. कृष्ण रुक्मिणि ही

आपल्याकडील आद्य प्रेमकथा. पण १ हजार वर्षांपूर्वी, कनोजच्या राजा जयचंदच्या कन्येला, संयोगितेला पळवून नेणारा एक खराखुरा नायक झाला. पृथ्वीराज चौहान नाव होतं त्याचं. ही खरं तर ऐतिहासिक कहाणी आहे. ज्यांना इतिहास आवडत नाही, त्यांनी प्रेमकथा म्हणून वाचावी. एक होता राजा,. एक राणी असं म्हणावं. ज्यांना इतिहास आवडतो, त्यांनी हिस्टरि ऑफ महंमद घोरी, फॉल ऑफ पृथ्वीराज चाहमान या नावाने ऐकावी. कथा एकच आहे. प्रेमी युगुल, सूड घेणारा बाप आणि संकटात सापडलेला नायक यांची. पण या एका प्रेमकथेचा दुष्परिणाम साऱ्या भारताला शतकानुशतके भोगावा लागला.. १२ वं सतक संपत असतांना सन ११९४ मधे हिंदू सत्ता संपली. ही लढाई झाली ती भटिंडा किल्ल्याजवळच्या गावाजवळ तराईन जवळ..लाहोर-पतियाळावरुन भारतात शिरण्याच्या सर्वात जवळच्या रस्यावर भटिंडा किल्ला होता. त्याच्याजवळ हे गाव होतं. यावेळी युध्दाचा खलनायक गांधार देशाचा शकुनी नव्हता तर गझनीचा महंमद घोरी होता. भारतातील समृध्दी लुटायला, मध्य आशियातील भटक्या टोळ्या वरचेवर भारतात येत. या महंमद घोरीला भारतात आल्यावर कारण ठरलं ते जयचंदची घोरीला मिळाललेली मदत. महंमद घोरीने मग जयचंदलाही संपवलं. मानसिकता तीच कौरवांसारखी. परक्यांच्या मदतीने आपापसात लढून आपलाच घात करुन घ्यायचा.

पृथ्वीराज चाहमान हा दिल्लीच्या राजा अनंगपालचा नातू. या अनंगपालने दिल्ली शहराला राजधानीची प्रतिष्ठा आपल्या बहादूरीवर दिली. त्यावेळी दिल्ली हे एक खेडं होतं. शेजारचं कनोज हे समृध्दीचं केंद्र होतं. तिथे राठोड घराणं नांदत होतं. या अनंगपालला दोन कन्या होत्या. एक कमलावती,

ती अजमेरचा राजा सोमेश्वरला दिली होती. आणि दुसरी रुपसुंदरी ही कनोजच्या राजघराण्यातील विजयसिंग राठोडला दिली होती. अजमेरचा पृथ्वीराज आणि कनोजचा जयचंद हे सख्खे मावसभाऊ. पृथ्वीराज आणि कनोजचा जयचंद हे अनंगपालचे दोन नातू. अनंगपालला मुलगा नव्हता. सोमेश्वर तरुण वयात वारला तेव्हा पृथ्वीराज १२ वर्षांचा होता. तेव्हाच तो गादीवर आला. आपली आई आणि प्रधान मंत्री यांच्या मदतीने कारभार शिकायला लागला. पण नंतर आपल्या पराक्रमाने तळपायला लागला. आपल्या आजूबजूच्या सर्व राजांना त्याने जिंकून घेतलं. आपला चुलतभाऊ नागपाल याला जिंकल्यावर त्याने मृत शत्रूची मुंडकी आपल्या वेशीवर टांगून आपल्या सामर्थ्याचं प्रदर्शन केलं. त्याच्या वर्तनावर खूष होऊन, अनंगपालने दिल्लीचं राज्य पृथ्वीराजच्या हाती सोपवलं, तेव्हा जयचंद मत्सराने चडफडला. पण आजोबांसमोर काहीही चालणार नव्हतं.

त्यातच त्याच्या लक्षात आलं की आपली मुलगी संयोगिता ही पृथ्वीराजच्या प्रेमात पडली आहे. तेव्हा जयचंदने घाईघाईने संयोगितेचं स्वयंवर मांडलं. सर्व राजांना बोलावलं पण पृथ्वीराजला आमंत्रण दिलं नाही. पृथ्वीराजला ही बातमी कळताच त्याने आपला मित्र आणि कवी चंदवरदाई याला समारंभाला पाठवलं आणि संयोगितेला निरोप दिला की तो वेषांतर करुन येईल आणि तिला घेऊन जाईल. संयोगिता खूष झाली. जयचंदने पृथ्वीराजचा अपमान करण्यासाठी त्याचा पुतळा बनवून तो दाराशी पहारेकरी म्हणून ठेवला. स्वयंवराचा दिवस उजाडला. स्वयंवर सुरु झालं. देशोदेशीच्या राजामहाराजांनी भरलेल्या दरबारात संयोगिता एकेक राजासमोरुन पुढे जायला लागली. तिला

पृथ्वीराज दिसलाच नाही. शेवटी ती महाद्वाराजवळ गेली आणि त्या पुतळ्याला तिने हार घातला. त्याबरोबर अचानक पृथ्वीराज तिथे आला. त्याने संयोगितेला घोड्यावर घातलं आणि तो वेगाने निघून गेला. या सनसनाटी घटनेने जयचंद कमालीचा संतापला. अजमेरला पोचल्यावर पृथ्वीराजने मोठ्या धूमधडाक्याने विवाह सोहाळा पार पाडला. आता जयचंदला पृथ्वीराजचा सूड घ्यायचाच होता, तेव्हा त्याला आठवला तो गझनीचा महंमद घोरी. घोरी आतापर्यंत भारतात येऊन स्वाऱ्या करुन गेला होता. त्याला जयचंदचं आमंत्रण मिळालं.

खरं तर अफगाण्यांच्या या टोळया. इ. स. ११९१ मधे दिल्लीपासून १०० मैलांवर असलेल्या भटिंडा किल्ल्यावर घोरीने स्वारी केली होती. तो किल्ला जिंकून, तिथली लूट घेऊन तो परत चालला होता. जातांना त्याने झियाउद्दीन काझी याची कारभारावर नेमणूक केली होती. या काझीने हिंदूंचा छळ चालवला. हे कळल्यावर, पृथ्वीराज चव्हाण, २ लाख घोडदळ, आणि ३०,००० हत्ती घेऊन भटिंडावर चाल करुन गेला. महंमद घोरीला प्रवासात बातमी कळल्यावर तो माघारी फिरला आणि त्याने तराईन वर आपली छावणी केली. दोन्ही फौजांची गाठ पडली.पृथ्वीराजच्या सैन्याने घोरीची फौज दोन्ही बाजूंनी पृथ्वीराजचा भाऊ गोविंदराय घोरीच्या समोर आला. दोघांनी भाले फेकले. गोविंदरायचे पुढचे दात पडले आणि गोविंदरायचा भाला घोरीच्या खांद्यात शिरला. जखमी झालेल्या घोरीला त्याच्या खिलजी नावाच्या सैनिकाने आपल्या घोड्यावर टाकलं आणि तळावर सुखरुप आणलं. काही दिवस लाहोरला राहून बरं वाटल्यावर घोरी गझनीला परतला. त्याला आता पराभवाचा बदला घ्यायचा होता. त्याने पळून गेलेल्या सर्व सैनिकांना घरी बसवलं. त्यांना

कडक शिक्षा दिल्या. नवीन फौज तयार केली. अफगाण तुर्की तरुण फोजेत घेतले. त्यांना प्रशिक्षण दिलं. १ लाख, २० हजार घडदळ नव्याने तयार केलं. आणि मग नवीन रणनीती घेऊन तो भारताच्या मार्गाला लागला.

परत लाहोरच्या मैदानावर त्याने तळ ठोकला. तिथून त्याने आपला हमझवी नावाचा वकील पृथ्वीराजकडे पाठवला. त्याने पृथ्वीराजला सांगितलं की मुसलमान व्हायचं नसेल तर लढायला तयार हो. त्यावर पृथ्वीराजने उत्तर पाठवलं की माझे शूर सैनिक गोळा झालेलेच आहेत. आयुष्याचा तुला कंटाळा आला असला तरी जगण्याची मजा घ्यायला परत जा. तुझ्या सुखरुप परत जाण्याची जबाबदारी आम्ही घेतो. शेवटी युध्द अटळ आहे हे दोघांनाही माहीत होतं. आपण त्यांच्यासमोर हरणार याचा अंदाज आल्यावर घोरीने लबाडीचा आसरा घ्यायचं ठरवलं. पृथ्वीराजला निरोप पाठवला की , मी केवळ माझ्या भावाच्या सांगण्यावरुन ही मोहीम काढली आहे. मी त्याच्याकडून उत्तर मागवतो. तोपर्यंत शस्त्रसंधी करुया. त्याबरोबर घोरी घाबरलाय आणि परत जाणार म्हणून पृथ्वीराज आणि त्याची फौज मौजमजेत बुडली.

घोरी या अविचाराची वाटच पाहात होता. त्याने लगेच दोन तुकड्या केल्या. जड सामान लाहोरला ठेवलं. आपण लाहोरमधेच आहोत हे दाखवण्यासाठी भडिंड्याहून दिसेल एवढा मोठा जाळ केला. मग अतिचपळ घोडे घेऊन लांब लांब मजला मारत तो पृथ्वीराजच्या छावणीवर पोचला. पहाटे पहाटे झालेल्या या हल्ल्याने सारी फौज गोंधळली. कसेबसे घोड्यावर स्वार होत ते लढायला उतरले. पण तरीही, बघताबघता पृथ्वीराजच्या शूरांनी युध्दावर आपला ताबा मिळवला. त्याबरोबर घोरीने आपली चाल बदलली. आपले

चिलखत घातलेले घोडे आणि फौज मैदानात आणले. मग पृथ्वीराजच्या फौजेला आपल्या अंगावर येऊ दिलं. शत्रू आपल्या कह्यात आला हे पाहिल्याबरोबर आपल्या फौजेच्या दोन्ही बाजूंनी बाणांच्या वर्षावाने रजपूत फौजेभोवती फास आवळला. त्यांना पाठशिवणीने दमवलं. परत दुपारी १२००० सैनिकांची ताज्य दमाची तुकडी रणांगणावर आणली. तोपर्यंत रजपूत फौज थकून गेली होती. रजपूत पार हरले. मोठा नरसंहार झाला. लाखभर रजपूत ठार झाले. पृथ्वीराज मारला गेला की पकडला गेला ते स्पष्ट नाही. काहींच्या मते घोरी त्याला गझनीला घेऊन गेला. युध्दात विजय मिळाल्यावर घोरीने पृथ्वीराजच्या मुलाला तख्तावर बसवलं.

दिल्ली घोरीच्या ताब्यात आली होती. प्रचंड मोठी लूट घोरीला मिळाली. पृथ्वीराजच्या मृत्यूबद्दल एक आख्यायिका प्रसिध्द आहे. ती त्याच्या चंदवरदाई मित्राने आपल्या पृथ्वीराजच्या चरित्रात रासोमधे लिहिली आहे. त्याप्रमाणे घोरी पृथ्वीराजला घेऊन गझनीला गेला. त्याचे डोळे काढून त्याला कैदेत टाकलं. युध्द संपल्यावर चंदवरदाई पृथ्वीराजच्या शोधात गझनीला पोचला. आपली ओळख लपवून त्याने घोरीची मर्जी संपादन केली. मग पृथ्वीराजचा कैदेतला ठावठिकाणा शोधून काढला. त्याला गुप्तपणे भेटला. एक दिवस सहजपणे महंमद घोरीला म्हणाला की आपण तिरंदाजीची स्पर्धा घेऊ. घोरी लगेच तयार झाला आणि प्रासादाच्या पटांगणात स्पर्धा सुरु झाली. मधेच चंदवरदाई घोरीला म्हणला की मी इतके दिवस पृथ्वीराज चौहानचं नाव ऐकून होतो. त्याच्यासारखा नेमबाज कुणी झाला नाही म्हणतात. त्याबरोबर महंमद

घोरीने पृथ्वीराजला कैदेतून आणलं. त्याच्या हातात तीरकमान देऊन लक्ष्य सांगितलं.

तेव्हा चंदवरदाई अंध पृथ्वीराजच्या जवळ गेला.आणि हळू आवाजात त्याने दोन ओळी म्हटल्या.

चार बाँस, चोबीस गज, अष्ट अंगुली प्रमाण। ता उपर सुलतान हैं मत चुको चौहान।

४ बांबू किती फूट ? २४ गज-यार्डस किती फूट? ८ अंगुली किती इंच - फूट?

घोरीने हुकूम सोडला. पृथ्वीराजाने त्या आवाजाच्या रोखाने तीर सोडला तो सरळ सुलतानाच्या छातीत घुसला. सुलतान तिथल्या तिथे कोसळला. अचानक झालेल्या या मौतमुळे शिपायांमधे भगदड झाली. पृथ्वीराजला धरायला संरक्षक धावले. तेवढ्यात चंदवरदाई आणि पृथ्वीराजने एकमेकांच्या पोटात खंजीर खुपसून दोघांनी प्राण दिला. तरुण वयात दोन्ही मित्र डोळयांवर पट्टी बांधून तीरंदाजीचा सराव करत असत. ती विद्या आज उपयोगी पडली. खरं काय झालं ते इतिहासाच्या पोटातच राहिलं.

महंमद घोरी का जिंकला, कसा जिंकला याचं सविस्तर वर्णन सर जदुनाथ सरदारांनी करुन ठेवलं आहे. ते लिहितात की आजवरच्या लढाया इथल्याच राजांमधे आपापसात होत असत. त्यामुळे लढण्याची पध्दत सर्वांना माहीत होती. परक्या अनोळखी देशातून आलेल्या जमातीशी पहिल्यांदाच पृथ्वीराजची गाठ पडत होती. हे आक्रमण मुसलमानांचं होतं. त्यांच्या आणि आपल्या संस्कृतीमधे खूप तफावत होती. दुसऱ्या टोळयांबरोबर त्यांच्या सतत

झुंजी चालायच्या त्यामुळे लढणं हा त्यांचा नेहमीचा सरावाचा भाग होता. १. आपल्याकडे चातुवर्णिय पध्दतीमुळे ४ पुरुषांमधील फक्त क्षत्रियांनाच लढता येत होतं. बाकीच्यांना हत्यार कसं चालवायचं याचा सराव नव्हता. त्यामुळे व्यापारी, बाजारबुणगे मोठ्या प्रमाणावर कापले गेले. त्यांच्याकडे प्रत्येकाला लष्करी शिक्षण होतं. २. आपल्या फौजेमधे उंट आणि हत्तींचा भरणा मोठा होता. यांच्या खुराकावर खूप मोठा खर्च होत होता. त्यामुळे त्यांच्या कडब्याची सोय करणं वेळखाऊ होतं. शिवाय लष्कराच्या हालचालीवर बंधनं पडत होती. त्याउलट अफगाण्यांकडे उत्तम अरबी घोडे होते, ज्यांची ताकद आपल्या घोड्यांपेक्षा जास्त होती. त्यांच्या वेगाने जाणं आपल्या घोड्यांना थकवणारं होतं. त्यांच्या घोड्यांना चामड्याचं चिलखत घातलेलं होतं. घोडे कुठेही चरायला सोडले की त्याचं काम होत होतं, शिवाय त्यांच्यावर सामान वाहून नेणंही सोपं होतं. ३. युध्दकलेत ते जास्त प्रविण होते. त्यांनी तुलुगामी पध्दत शोधून काढली होती. हा उझबेखी शब्द होता. त्यात ते शत्रूला आपल्यामागे धावायला लावत दूर न्यायचे आणि मग त्यांची एक तुकडी शत्रूच्या मागील बाजूला जाऊन पाठिमागे हल्ला करायची यामुळे बेसावध फौज अचानक हल्ल्यात कापली जायची. ४. मध्य आशियातील या भटक्या टोळयांनी रिकिबीचा शोध लावला. त्यामुळे त्यांचे पाय अडकलेले राहिले, घोड्यावरुन पडण्याचा धोका संपला. लगाम पकडण्याची गरज उरली नाही, त्यामुळे दोन्ही हात मोकळे होऊन तिरंदाजी करता यायला लागली. ५. भारतीयांना दाणागोटा मिळवायला लमाणांवर अवलंबून राहावं लागे. त्यांची गती फार मंद होती. ६. आपली लढाई संध्याकाळी थांबत असे. तो नियम त्यांच्याकडे नव्हता. त्यामुळे रात्रीचा छापा पडणं रजपूतांना माहीत नव्हतं. ७. आपल्या फौजेत संध्याकाळी

मौजमजा चालायची. मद्य घेतलं जायचं. पण या अफगाणी फौजेत मद्य निषिध्द होतं. पृथ्वीराज चौहानच्या रजपूतांना यामुळे पराभव पत्करावा लागला.

अजमेरच्या गादीवर पृथ्वीराजच्या मुलाला मांडलिक बनवून बसवलं आणि महंमद घोरी परत दिल्लीला गेला. ज्या दरवाजाने तो राजवाड्यात शिरला, त्या दरवाजाला गझनी दरवाजा नाव पडलं. घोरीच्या मदतीला जयचंद गेला होता. तो पृथ्वीराजच्या पराभवाने खूष झाला. पण कवकरच जयचंदचा घास घोरीने गिळला. घोरीने कनोज जंकलं. यमुनेच्या काठी चांदवड इथे जयचंद मारला गेला. मग घोरी काशीला गेला. आपल्या पवित्र मंदिरांची त्याने नासधूस केली. बनारसला त्याला अत्यंत दुर्मिळ असा पांढरा हत्ती मिळाला. तो त्याने त्याचा विश्वासू हस्तक कुतुबुद्दीन ऐबकला दिला. असा हत्ती जवळ असणं वैभवाचं लक्षण होतं.सम्राट अकबर अशा हत्तीच्या शोधात होता, पण त्याल तो कधी मिळाला नाही, पण शाहजहानकडे मात्र पांढरा हत्ती होता. महंमद घोरीचं हे वादळ बंगालपर्यंत गेलं. उत्तरेतील अनेक राज्यं पत्त्यासारखी कोसळली. घोरौ परत परत येत राहिला आणि जवळपासची राज्यं जिंकत राहिला. ग्वाल्हेरही त्याने जिंकलं. लाहोर जरी अफगाणहून येतांना जवळ पडत असलं तरी दिल्ली शहर जवळपासची राज्यं जिंकायला मोक्याचं होतं.

पण इ. स. १२०२ मधे महंमद घोरीचा भाऊ घियासुद्दीन मेला, त्यामुळे गझनीचं राज्य सांभाळायला घोरी परत गेला. कुतुबुद्दीन ऐबकला त्याने कारभार सांभाळायला मागे ठेवलं. पंजाबची स्वारी करुन परत जातांना तो छावणीमधे नमाज अदा करत असतांना अचानक शत्रूचे लोक त्याच्या शामियानात शिरले आणि घोरीचा खून करुन पळून गेले. सिंधू नदीच्या काठावर दमयाक गावात

१५ मार्च १२०६ हा त्याचा अंतकाल दिवस होता. त्याचं शव गझनीला नेण्यात आलं. १० एप्रिलला दफन विधी पार पडला. छावणीमधे कडेकोट बंदोबस्त असतांना बाहेरचे लोक कसे आत शिरले हेही कोडंच आहे.

महंमद घोरीच्या जागी त्याचा पुतण्या तख्तावर आला. त्याने कुतुबुद्दीन ऐबकला दिल्लीचा बादशहा म्हणून घोषित केलं आणि जरीपटका, नौबत शाही छत्री, शाही शिक्के त्याच्याकडे पाठवून दिले. गुलाम वंशातील कुतुबुद्दीन ऐबक दिल्लीचा पहिला सुलतान. त्यानंतर सल्तनत सुरुच झाली. हिंदूंचं सिंहासन मोडून पडलं. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे, कुणीही हिंदूराजे या परकीयांना घालवायला एकत्र आले नाहीत.

भारतातील हिंदू राजांच्या देदीप्यमान सुवर्णकाळाने कूस बदलली.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

# रझिया सुलतान

## जन्म १२०५. मृत्यू १४ ऑक्टोबर १२४०.



दिल्लीला अफगाणिस्तानातून आलेल्या घोरीमुळे इ. स. ११९४ मधे मुसलमानी सल्तनत सुरु झाली. इ. स. १२०८ मधे कुतुबुद्दीन ऐबकच्या अपघाती निधनानंतर त्याचा वारस अल्तमशच्या हाती कारभार आला. अल्तमशची आयुष्याची संध्याकाळ जवळ आली तेव्हा, त्या काळाच्या रीतीच्या पलिकडे जाऊन आपली कन्या रझिया हिला आपल्यानंतरची वारस ठरवलं. या काळात या परकीय आक्रमणाविरुध्द कुणीच भारतीय सत्ताधीश

एकत्र आले नाहीत. काय करणार ते परकीय तरी. हुकुमत गाजवत राहावंच लागलं त्यांना. आपापसात भांडायचं, आपल्या हद्दीत कुणी आलं तरच त्यांच्याशी लढायचं, एकराष्ट्र भावनेचा अभाव, ही मानसिकता असल्यामुळे दिल्ली आपण परत मिळवायची, या आक्रमकांना घालवून द्यायचं, ही कोणत्याही भारतीय सत्ताधीशाला इच्छा नव्हती. परिणाम एकच झाला. तो म्हणजे दिल्लीला मुसलमानी सल्तनत सुरु झाली. त्यांची घराणी बदलली, पण हिंदू दिल्लीहून सरकून स्वस्थ बसले.

अहमदनगरच्या सुलतानशाहीतील जशी चांदबीबी, तशी दिल्लीच्या सल्तनतीतील पराक्रमी, लढाऊ, शूर रझिया सुलताना. हुशार, पाणीदार, धाडसी, राजकारण चतुर, कर्तृत्ववान, शहजादी. सुलतान अल्तमश दूरदर्शी आणि शहाणा होता. म्हणून सुलतानाने, राज्य चालावं आणि टिकावं म्हणून आपल्यानंतर तख्तासाठी तिची योजना केली. आपले नालायक मुलगे पात्र नाहीत हे त्याला माहीत होतं. पण चांदबिबी, झांशीची राणी यांच्याप्रमाणे ही आपल्याविरुध्दच्या बलाढ्य शत्रूसाठी लढली नाही. हिचा सामना हिच्याच नातेवाईकांबरोबर झाला. दरबारातील प्रस्थापित पुरुषप्रधान मानसिकतेच्या उमरावांशी झाला. त्यांच्याबरोबर लढतांना हिलाही वीरगती मिळाली. रणांगणावर लढतांनाच हिचं वीरपतन झालं.

कुतुबुद्दीन ऐबकनंतर अल्तमश तख्त सांभाळायला लागला. याचं पूर्ण नाव शमसुद्दीन दाऊद्दीन अबुल फझल इल्तुन्मिश. त्या नावाचा अपभ्रंश होऊन अल्तमश हे नाव रुढ झालं. याच्या घराण्याला इल्वरी घराणं असं नाव होतं. याचे वडील ऐलमखान हे मोठे तुर्की सरदार होते. त्या घरातील दुष्ट मुलांनी

घोड्यांचा बाजार दाखवायला म्हणून अल्तमशला नेलं आणि गुलामांच्या व्यापाऱ्याला विकून टाकलं. हा छोटा मुलगा सद्र इ जान कुटुंबात कामाला राहिला. एकदा त्यांनी अल्तमशला द्राक्षं आणायला बाजारात पाठवलं. त्याने द्राक्षं घेतली पण पैसे द्यायला गेला तेव्हा त्याचा खिसा फाटलेला आणि पैसे गायब झाल्याचं कळल्यावर तो छोटा अल्तमश रडायला लागला. तेव्हा एक फकिर त्याच्याजवळ आला आणि म्हणाला, रडू नकोस. तुला अल्ला खूप देणार आहे. पण तू गरिबांना कधी विसरु नकोस.

असा हा अल्तमश परत परत गुलामांच्या बाजारात उभा राहिला आणि घरं बदलत विकला गेला. जेव्हा तरुणपणी गुलामांच्या बाजारात उभा राहिला तेव्हा महंमद घोरीला हा तरुण, अत्यंत देखणा, मर्दानी मुलगा इतका आवडला की व्यापाऱ्याला त्याने खूप पैसे दिले तरी सौदा पटला नाही. तेव्हा घोरीने फर्मान काढून कुणीही त्याला विकत घ्यायचं नाही असं राज्यात जाहीर केलं. तेव्हा तो व्यापारी लाहोरला गेला. घोरीने कुतुबुद्दीन ऐबकला अल्तमशला विकत घ्यायची परवानगी दिली. ऐबकने भरपूर किंमत मोजून अल्तमशला विकत घेतलं आणि आपला अंगरक्षक बनवलं. त्यानंतर अल्तमश आपले हुशारीचे गुण दाखवत गेला आणि कुतुबुद्दीन ऐबकचा मानसपुत्र बनला. अत्यंत शूर, दयाळू, दानशूर म्हणून याची प्रसिध्दी होती. कुतुबुद्दीन ऐबकने लाहोर ही आपली राजधानी केली होती. अल्तमशने दिल्ली ही आपली राजधानी करुन भारतात सल्तनतीचा पाया घातला.

अल्तमश म्हातारा व्हायला लागला. आपल्यामागे हे राज्य कोण सांभाळेल याची काळजी करायला लागला तेव्हा आपली कन्या शहजादी

रझियालाच तख्यावर नेमावं या विचारावर तो थांबला. कारण तो ग्वाल्हेरच्या मोहिमेवर असतांना त्याने रझियाच्च्या हाती कारभार सोपवलाहहोता. आणि तिचा वकुब पाहून तो खूष झाला होता. त्याचा आवडता हुशार, नसरुद्दीन महंमद हा मुलगा मरण पावला होता आणि जे होते ते नालायक होते. आपला वारस म्हणूनफर्मानावर तो तिचं नाव घालायला लागला तेव्हा दरबारातील अमिर नाराज झाले. त्याची बेगम शाहतुर्कान ही नाराज झाली कारण रुकनुद्दीन आणि मौजुद्दीन हे तिचे २ मुलगे तख्ताची वाट पाहात होते. शाहतुर्कान जनानखान्यातील एक दासी होती. मग ती बेगम झाली होती. सुलतानाचा रझियाबद्दलचा हा निर्णय फिरावा म्हणून दरबारी उमराव त्याच्याकडे गेले.

सुलतानाने त्यांना विचारलं की तुम्हाला ती का नको आहे.?

दरबारी म्हणाले की रझिया हुशार आहे, चतुर आहे, पण स्त्रीची जागा दरबारात नाही. ती शहजादा असती तर चाललं असतं. दरबारी मंडळी आपल्या या मुलीला गादीवर बसवणार नाहीत हे सुलतानाला कळून चुकलं. अमिर उमरावांनीही ठरवलं की बाईच्या हाताखाली राहण्यापेक्षा कमकुवत युवराजच बरे. हे कळल्यावर शाहतुर्कानच्या आशा वाढल्या. लवकरच सुलतान अल्तमश मरण पावला. त्याबरोबर, तख्तावर कुणाला बसवायचं यावर प्रचंड वाद झाले. रझिया कुणालाच नको होती. तेव्हा रझियाच पुढे झाली आणि सर्व उमरावांना बोलावून म्हणाली,

“ही वेळ भांडणाची नव्हे. एकमताने चालायची आहे. तुमच्या इच्छेप्रमाणेच होईल.माझा भाऊच सुलतान बनेल. एवढ्याशा कारणासाठी वातावरण बिघडणं ठीक नाही.”

मग रुकनुद्दीन सुलतान बनला. पण काही काळातच तो नाच गाणी आणि त्यावर खजिना उधळण्यात मश्गूल झाला. तेव्हा अमिर उमरावांना आपली चूक कळली. सुलतानाची आईही कारस्थानी होती. तिने रझियाच्या आईला, आपल्याला मारण्याचा कट केला या खोट्या आरोपावरुन फाशी दिली. रझियाच्या भावांना ठार केलं, किंवा देशोधडीला लावलं. फक्त रझिया जीवंत राहिली. तीही बेगमला सलतच होती म्हणून तिने गुंडांना बोलावून तिला ठार करण्याचा कट केला. त्याप्रमाणे गुंडांनी रझियाच्या महालात जाऊन तिथे झोपलेल्या मुलीला ठार केलं आणि यमुनेत फेकून दिलं. दुसरे दिवशी नागरिकांना हे कळल्यावर त्यांनी राजवाड्यासमोर गलका करायला सुरुवात केली तेव्हा रझिया तिथे अचानक प्रकट झाली आणि तिने आपण जीवंत आहोत हे जाहीर केलं. आपल्या हत्येचा तिला आधीच सुगावा लागल्याने तिने एका मुलीला आपल्या महालात झोपवलं होतं आणि स्वत:ला वाचवलं होतं.

जनतेला हे कळल्याबरोबर लोकांनी जयजयकार करायला सुरवात केली. शाहतुर्कानला ठार करायला लोक निघाले तेव्हा रझियाने त्यांना थांबवलं आणि न्यायालयासमोर काझी याचा निकाल करतील असं जाहीर केलं. पुढच्या सहा महिन्यात शाहतुर्कान मारली गेली.

इ. स. १२३६ च्या १० ऑक्टोबरला रझियाच्या मस्तकावर ताज ठेवला गेला. गुलाम वंशातील ती पहिली मलिका बनली. अल्तमश जे सांगत होता ते आता दरबारी मंडळींना पटलं पण दरबारातील निजाम तिच्या विरुध्द होता. आपल्या विरोधकांविरुध्द तिने आपलीही फौज उभारली. तिला तरुण वर्गाचा पाठिंबा होता. तेच तिला बारीकसारीक बातम्या पुरवत होते. तिच्या

विश्वासातील साथीदारांमधे होते ते अली इस्माईल, ताजुक मुल्क, मलिक अल्तुनिया आणि हबशी जमालुद्दीन याकूत. मलिक अल्तुनिया लहानपणापासूनचा तिचा सवंगडी होता. राजवाड्यात वाढला होता. जन्माने तुर्की होता. आपल्या हुशारीवर पागेचा मुख्य बनला. मग अमिर बनला. नंतर त्याची नेमणूक भटिंड्याला झाल्यावर तो निघून गेला. दुसरा याकूत हबशी हा तिचा संरक्षक होता, तिच्याबरोबर सदासर्वदा हजर राहायचा. रझिया तीरंदाजीत आणि घोडेस्वारीत अत्यंत तरबेज होती. ती रपेटीला निघाली की हाही तिच्याबरोबर असायचा. रझियाने निजाम जुनैदीला पळवून लावलं. आणि आपल्या पक्षातल्या ऐजुद्दीन कबीरखान ऐयाजला निजाम नेमला.

रझिया आता स्वत:ला सुलताना च्या ऐवजी सुलतान म्हणवून घ्यायला लागली. पुरुषी कपड्यांमधे दरबारात यायला लागली. विश्वासू साथीदारांसह कारभारावर नियंत्रण ठेवलं. महत्त्वाच्या पदांवर तुर्कांची नेमणूक केली. हत्तीवरुन जातांना लोकांच्या नजरेस पडायला लागली. अल्तमशसारखाच न्यायनिवाडा करायला लागली. अल्तमशने आपल्या काळात एक फतवा काढला होता की ज्याला सुलातानाकडे काही तक्रार करायची आहे त्याने रंगीत कपडे घालावेत म्हणजे रस्त्याने सुलतान जात असतांना त्याच्या नजरेत ते लोक भरतील आणि त्यांना न्याय दिला जाईल. त्याकाळात सर्व लोक पांढरे कपडे घालत असत. रझियाने ही पध्दत चालू ठेवली. दरबारी मंडळींचं मत जाणून मग स्वत:च्या मताने कारभार करायला लागली. यामुळे जनता अगदी खूष होऊन गेली. पण विरोधक जास्तच अस्वस्थ व्हायला लागले.

अशी ४ वर्षे संपली. भारतभर तिचं नाव पसरलं. या यशामुळे विरोधक गट अस्वस्थ व्हायला लागला. तिला पदच्युत करायला निमित्त शोधायला लागला. या तिच्या निर्णयावर त्यांनी आपला विरोध दर्शवला, तेव्हा ती म्हणाली की हिंदूसुध्दा माझीच प्रजा आहे. आपणच इथे परके आहोत. इथल्या लोकांना जिंकायचा हाच मार्ग आहे. रझियाने रस्ते-पाणी परवठा ही लोकोपयोगी कामं करतांना प्रचंड भ्रष्टाचार चाललेल्यांचा तो मलिदा बंद केला. त्यामुळे ते लोक खवळले. विरोधकांची शक्ती कमी करण्यसाठी त्यांना दूरच्या सुभ्यांवर पाठवलं. मग तिचा कारभार सुरळीत सुरु झाला.

एवढ्यात रणथंबोरवर रजपूतांनी हल्ला केल्याची बातमी आल्यावर तिने हुजुरातीची फौज तिथे पाठवली. पण या फौजेचा प्रचंड पराभव झाला तेव्हा फौजेला तिने परत बोलावलं. त्यावरुन दरबारी विरोधक चिडले. तू हिंदूंना जिंकू देतेस असा तिच्यावर आरोप केला. मी आपल्या फौजेला फुकट मरु देणार नाही असं तिने शांतपणे सांगितलं. त्यावर विरोधकांनी तिचे याकूत हबशाबरोबर संबंध असल्याची अफवा उठवायला सुरुवात केली. दरबारी लोकांचे कान भरायला सुरुवात केली. एवढंच नव्हे तर भटिंड्याच्या मलिक अल्तुनियापर्यंत ती बातमी पोचवली. त्याने सरळच रझियाच्या कानावर ही अफवा घातली, तेव्हा तिने स्पष्ट शब्दात नाकारलं. मग बलबन नावाच्या सरदाराने (हाच तिच्यानंतर सुलतान बनला.) मलिक अल्तुनियाच्या मनात, तूच खरा सुलतान बनायला लायक आहेस हे भरवायला सुरुवात केली. त्याचा मात्र हवा तसा परिणाम झाला. मलिक सुलतान बनण्याची स्वप्नं पाहायला लागला.

मलिकने रझियाविरुध्द बंड पुकारलं तेव्हा रझिया हादरुन गेली. तिच्या अति विश्वासातील माणूस असा फुटला होता. आपली फौज घेऊन रझिया

भटिंड्यावर चालून गेली. दोघे एकमेकांविरुध्द भिडले. रझिया पकडली गेली आणि जमालुद्दीन याकूत ठार झाला. दिल्लीत ही बातमी पोचल्यावर दरबारी मंडळींनी घाईघाईने शाहतुर्कानच्या दुसऱ्या शहजाद्याला सुलतान बनवलं. आता मलिकचे डोळे उघडले. आपल्याला फसवलं गेलं हे लक्षात आल्यावर रझियाची मनधरणी केली. तिच्या हालांना आपण कारण ठरलो याचं दु:ख होऊन, दिल्लीवर जायचं ठरवलं. मलिक अल्तुनिया दिल्लीवर चालून गेले. या मोहिमेआधी त्यांनी लग्न केलं. त्यामुळे विरोधकांची बाजू लंगडी पडली.

दिल्लीजवळ कथियाल भागात सुलतानाची आणि रझियाच्या फौजेची गाठ पडली. सुलतानाच्या प्रचंड फौजेसमोर रझिया हरली. मलिकही मारला गेला. तीही रणांगणावर कोसळली. एक आख्यायिका असं सांगते की लढता लढता रझिया दूर गेली. तिला भूक लागली म्हणून अन्न शोधायला सुरुवात केली. तेव्हा तिला एक फकिर दिसला. त्याच्याकडे रोटी मागतांना त्याला रझियाच्या बोटातली हिऱ्याची अंगठी दिसली तेव्हा ही कुणीतरी मोठी आहे हे त्याच्या लक्षात आलं. त्याने जवळच्या दरोग्याकडे ही बातमी पोचवली. दरोग्याने तिला पकडून बादशहाच्या हवाली केलं. त्याने रझियाला ठार केलं.

रझिया सुलतानाची ४ वर्षांची सत्ता संपली. इ. स. १२०५ मधे उत्तर प्रदेशातील बदायुनमधे जन्मलेली रझिया, कथियालच्या समरागंणावर १४ ऑक्टोबर, १२४० मधे संपली. तिची कबर तुर्कमानगेटाजवळ आहे. तिच्या बहिणीची कबरही तिथेच आहे. आजही रझिया तिथे चिरनिद्रा घेत आहे.

SS....SS....SS....SS....SS....SS....SS....SS....SS....

# अल्लाउद्दीन खिलजी.

## देवगिरीवर विजय-इ. स. १३०६.



दिल्ली असो, अफगाणिस्तान असो, वा तुर्की देश असो, सत्तांतरं झाली ती विषप्रयोग, दगाफटका, हिंसा, खून आणि कपटकारस्थान याच मार्गाने. खून होऊन मरण येणे हा सुलतानांचा सहज नैसर्गिक अंत म्हणावा लागेल. ज्याच्याकडे महत्त्वाकांक्षा, त्याच्या हाती खंजीर आणि त्याच्या हाती कारभाराची सूत्रं याच मार्गाने दिल्लीतील सल्तनतीवर वेगवेगळी घराणी तख्त बळकावून बसली आणि काही काळाने कुणा शिरजोराच्या कट्यारीने संपली. महंमद घोरी - कुतुबुद्दीन ऐबक – अल्तमश – रझिया सुलतान – बलबन अशी सत्तांतरं दिल्लीच्या तख्तावर होत गेली. सुलतान बलबनच्या घराण्याचा शेवट जलालुद्दीन खिलजी याने केला. तेव्हापासून खिलजी घराण्याचा उदय झाला. त्याचाच जावई अल्लाउद्दीन खिलजी. याने विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेत आपल्या सत्तेचा पाया घालून

सारा भारत काळवंडून टाकला. जलालुद्दीन खिलजी याच्यापासून दिल्लीमधे अफगाणी वंशाची सत्ता संपून तुर्की राजवट सुरु झाली. पण जलालुद्दीनची जमातही अफगाणिस्तानात २०० वर्षांपासून राहिलेली होती.

सुलतान बलबनच्या कैकाबाद या नातवाला संपवून जलालुद्दीन खिलजीने तख्त ताब्यात घेतलं तेव्हा त्याचं वय ७० वर्षे होतं. कबरीत पाय लटकवूनच तो सत्तेत आला. अर्ध्या गोवऱ्या मसणात गेलेल्या असल्या तरी सत्तेची नशा गेलेली नव्हती. दिल्ली सल्तनतीमधे आता ममलक-गुलाम वंशांच्या राजवटीचा शेवट झाला. जलालुद्दीन खिलजीने शहाबुद्दीन मसूद या आपल्या मोठ्या भावाचा मुलगा आणि जावई अली गुर्हस्प जुनाखान याला अहमदाबादजवळच्या कडामाणिकपूर प्रांताचा सुभेदार केलं. इतिहास त्याला अल्लाउद्दीन खिलजी नावाने ओळखतो. याला साथ मिळाली ती मलिक छज्जू या साथीदाराची. अल्लाउद्दीन खिलजीच्या महत्त्वाकांक्षेला, पराक्रमाला आणि सत्ता मिळवण्याच्या स्वप्नाला पहिली आत्यंतिक गरज होती ती प्रचंड पैशाची. तो कसा मिळवायचा यामागे दोघे लागले. तेव्हा भारताच्या दक्षिणेला देवगिरीच्या रामदेव यादवाकडे प्रचंड दौलत आहे ही बातमी गुप्तहेरांनी अल्लाउद्दीनला आणून दिली. आजवरच्या पहिल्या सुलतानांनी दिल्लीपर्यंतची राज्यं मिळवून सीमा विस्तारल्या होत्या. पण प्रचंड पल्ला गाठून, विंध्य ओलांडायची गरज त्यांना भासली नव्हती. त्याला धाडसाचीही गरज होती. ते या खिलजीत होतं. त्याने पहिली स्वारी केली ती माळव्यातील भेलसावर.

घसरणीला लागलेल्या माळव्याला जिंकून त्याने प्रचंड मोठी लूट आणून जलालुद्दीन खिलजी सुलतानाला खूष करुन टाकलं.

तोपर्यंत जलालुद्दीनच्या क्षमाशील स्वभावाला जनताही कंटाळली होती. कारण तो गुन्हेगारांना कठोर शिक्षा करतच नव्हता. त्यामुळे गुन्हेगारी प्रचंड वाढली होती. सुलतानाने अल्लाउद्दीनला फौज वाढवण्याचीही परवानगी दिली. त्याबरोबर मिळवून आणलेल्या आणि सुलतानाला न दाखवलेल्या खजिन्यातून मोठी फौज उभारुन आपली ताकद वाढवली. मग त्याची नजर वळली ती देवगिरीकडे. इ. स. १२९६ मध्ये अल्लाउद्दिन खिलजीने देवगिरीची स्वारी केली. निवडक उत्तम ८००० घोडदळ घेऊन तो बाहेर पडला. त्याआधी कोणत्याही सुलतानाने विंध्य पर्वत ओलांडून दक्षिणेत पाय ठेवला नव्हता.

हा अत्यंत अवघड ७०० मैलांचा प्रवास अनेक जंगलं, प्रदेश, पार करत, ७अत्यंत गुप्तपणे आखलेल्या या मोहिमेत अनेक प्रदेश, जंगलं, यांना पार करत, माणिकपूरहून अचलापूरला पोचला. मग २ दिवसांची विश्रांती घेऊन, लासूरी घाटाने, देवगिरीकडे निघाला. या ठिकाणी त्याचा देवगिरीच्या रामदेवरायाचा जहागिरदार, कन्हान यांच्याशी सामना झाला. त्याचा पराभव करुन खिलजी देवगिरीवर पोचला तेव्हा रामदेवरायाचा मुलगा, सिंघम हा स्वारीसाठी बाहेर गेलेला होता. म्हणून रामदेवराय किल्ल्याच्या आसऱ्याला गेला आणि त्याने खिलजीबरोबर तहाची बोलणी लावली, कारण पुरेशी फौज त्याच्याकडे नव्हती. अल्लाउद्दीनच्या फौजेने किल्ल्याच्या खालची सर्व गावं लुटली. किल्ल्यातील शिधाही संपत आला. इतक्यात सिंघम परत आला. त्याने अल्लाउद्दीनशी लढायचं ठरवलं. त्यात सिंघम हरला. ज्यावेळी सिंघमने तहाचा प्रस्ताव

खिलजीकडे पाठवला, त्यावेळी खिलजीने आधीची रामदेवरायाच्या वेळची रक्कम दुप्पट केली. ६०० मण सोनं, १००० मण चांदी, ७ मण मोती, २ मण बहुमोल रत्नं, ४०,००० रेशमी वस्त्रं , एव: लूट घेऊन खिलजी कडामाणिकपूरला परतला. .

सुलतान जलालुद्दीनला ही बातमी कळल्याबरोबर, ती लूट पाहायला तो ग्वाल्हेरपर्यंत आला, पण अल्लाउद्दीनने त्याची भेट टाळली. पण आपल्या सुभ्यात गेल्यावर अल्लाउद्दीनने सुलतानाला लूट पाहायला बोलावलं. खिलजीने सुलतानाला एकट्यालाच आमंत्रण दिलं त्यातला धोका बेगमने आणि इतर दरबारी लोकांनी ओळखला. सुलतानाला भेटीला न जाण्याचा आग्रह केला पण, जलालुद्दीनने कुणाचंही ऐकलं नाही. अल्लाउद्दीनचा भाऊ सुलतानाचा दुसरा जावई होता, त्याने सुलतानाचं मन वळवलं होतं. मग सुलतानाला एकट्यालाच महालात नेलं. सुलतानाचं अल्उद्दीनने स्वागत केलं, त्याला मिठी मारतजलमार्गाने प्रवास करुन जलालुद्दीन गंगेतून नावेने गेला. अल्लाउद्दीनच्या भवाने त्याचं स्वागत केलं. अलमास बेगने त्याचं स्वागत केलं. त्याचं स्वागत होऊन त्याला एकट्यालाच अल्लाउद्दिनच्या भेटीला नेलं असतांना, त्याला मिठी मारत असतांना अंगरक्षकाला इशारा केला. त्याबरोबर त्या अंगरक्षकाने सुलतानाच्या पाठीत मागून खंजीर खुपसला. पण त्याचा वार चुकला, तेव्हा हे तू काय केलंस असं ओरडत सुलतान पळायला लागला. त्याचा पाठलाग होऊन मुंडकं छाटलं गेलं, आणि अल्लाउद्दीनच्या पायाशी ठेवलं गेलं. सत्तापालटाचा खेळ संपला होता. अल्लाउद्दीनच्या हाती दिल्ली आली.

**ती तारीख होती २० जुलै १२९६.**

२० जुलै, १२९६. या दिवशी भारतात उत्तरेत पसरलेली पारतंत्र्याची सावली आता दक्षिणेत पसरायचा दिवस होता तो. अल्लाउद्दीनच्या देवगिरी स्वारीचा तो परिणाम होता. त्याचे पडसाद दक्षिणेत अनेक सत्तातरांचे खेळ रंगण्यात झाला. दक्षिणेत अनेक साम्राज्यं उदयाला आली, काही विलयाला गेली, काही प्यादांचे वजीर झाले, काही वजीर काळाआड गेले. दक्षिण भारतीय समरांगणं आणि समशेरी हिंदू-मुसलमान धर्मयुध्दात त्या झगड्यात लाल झाल्या. भारतीय आचार-विचार-धर्म सारं ढवळून निघालं. सुलतानाचं शीर अल्लाउद्दीनने छावणीत फिरवून आपण सुलतान बनल्याचं घोषित केलं मग दिल्लीकडे निघाला. पण जुलैच्या पावसाने गंगा, यमुना दुथडी भरुन वाहात होत्या त्यामुळे दिल्ली गाठायला त्याला वेळ लागला. तोपर्यंत सुलतानाच्या कजाख बायकोने आपला मुलगा, रुकनुद्दीनला तख्तावर बसवलं होतं. अल्लाउद्दीनला हे कळल्यावर तो संतापला. दिल्लीत पोचल्याबरोबर त्याने जलालुद्दीनच्या दोन्ही शहजादांना ठार करुन त्याचा वंश संपवला. जलालुद्दीनच्या सरदारांनाही ठार केलं. २१ ऑक्टोबर १२९६ या दिवशी अल्लाउद्दीन खिलजी तख्तनशिन झाला.

अल्लाउददीनने मग राज्यविस्ताराला सुरुवात केली. त्याच्या झंजावाती वादळात गुजरात, सौराष्ट्र, खंबायत बंदर, सोमनाथाचं देऊळ, सगळं उध्वस्त झालं. खंबायतच्या लुटीत त्याला एक मळकं, कुळकं, पण देखणं रत्न मिळालं. १००० दिनारांना खिलजीने गुलाम म्हणून ते विकत घेतलं. त्या गुलामाचा वकूब काही वेगळाच होता. त्याने आपल्या हुशारीचं पाणी दाखवायला सुरुवात केली आणि बघता बघता तो वर चढत गेला. मलिक काफूर हे त्याचं नाव. या एका

जीवामुळे भारतीय राजप्रवाहाला परत एकदा वळण मिळालं. मलिक काफूर सुलतानाचा उजवा हात बनला. अल्लाउद्दीन विजय मिळवत गेला. या यशाने गर्वित होऊन त्याने स्वत:ला छोटा सिंकदर म्हणजे सिकंदर सानी ही उपाधी घेतली. एवढंच नव्हे तर नवीन धर्म स्थापण्याची हालचाल सुरु केली. त्याच्या विरुध्द जाण्याची हिंमत एका दल्लीच्या सुलतानाने केली आणि असं करु नका म्हणून बजावलं तेव्हा अल्लाउद्दीनने तो विचार सोडून दिला.

इ. स. १३०१ मधे रणथंबोर, शिवानी, १३०५ मधे माळवा, १३०८ मधे देवगिरी आणि शिवानी, १३१० मधे वारंगळ, सनाश पावली. परमार, चौहान, वाघेला, पंड्या घराण्यांचा अस्त झाला. चितोडचा राजा रतनसिंग मारला गेला. त्या युध्दात ३०.००० सैनिकांचं शिरकाण झालं असं इतिहास सांगतो. मंगोलांनी केलेल्या स्वाऱ्यांमधे अल्लाउद्दीनने २०,००० मंगोल ठार केले.

अल्लाउद्दीनला देवगिरीवर परत दुसऱ्यांदा स्वारी करावी लागली. कारण सतत ३ वर्षे रामदेवरायने आधीच्या पराभवात कबूल केलेली खंडणी चुकवली नव्हती. म्हणून त्याने यावेळी आपला विश्वासू सेनापती मलिक काफूरला निवडलं आणि ३०,००० फौज देऊन त्याला देवगिरीवर हल्ला करायला पाठवलं. तिलपतवरुन काफूरने दिल्ली सोडली. तो देवगिरीला पोचला तेव्हा रामदेवराय आणि त्याचा मुलगा सिंघम यांच्यात फूट पडली होती आणि फौज दोघांच्यात वाटली गेली होती. यामुळे निकाल जसा अपेक्षित तसाच लागला. सिंघम पळून गेला आणि रामदेवरायाचा पराभव झाला. रामदेवरायाला कैद करुन मलिक काफूर दिल्लीला आला. वाटेतील प्रवासात रामदेवरायाने मलिक काफूरचं मन इतकं जिंकलं की त्याला दरबारात आणलं गेलं तेव्हा

त्याच्यावर बहुमोल जवाहीर आणि मोती उधळले गेले. पुढचे ६ महिने त्याची उत्तम बडदास्त ठेवली गेली. दरबारातील त्याची प्रतिष्ठा दिवसेंदिवस इतकी वाढली की रामदेवरायाला अल्लाउद्दीन खिलजीच्या बरोबरीने मान मिळायला लागला. शेवटी वृध्द रामदेवरायाला २ लाख सुवर्णमुद्रा देऊन खिलजीने त्याला परत पाठवलं. गुजरातेतील नवसारी सुभा त्याला भेट म्हणून दिला आणि राय रायान हा किताबही दिला. त्याला प्रभात रंगाचा शामियाना वापरण्याचा सन्मान देण्यात आला.

याच काळात साहित्यक्षेत्रातही एका नव्या विश्वाचा जन्म झाला. ते विश्व म्हणजे उर्दू भाषेचा जन्म. आणि तिचा जन्मदाता होता, विश्वविख्यात कवी आणि सरस्वतीपुत्र, अमिर खुस्रो. हा भारतात जन्मला, आणि भाषांमधे रमला. भारतीय संगीतातील सतारीचा आणि तराण्याचा शोध यानेच लावला. अफगाणी आणि तुर्की सुलतांनाना रोजच्या कारभारासाठी आणि फौजेला हिंदी लोकांची गरज लागायची. पण व्यवहारासाठी भाषेचा अडथळा मोठा होता. तो अमिर खुस्रोने सोडवला. अवध, भ्रज, फारसी, अरबी भाषांच्या मिलाफाने त्याने उर्दू ही भारतीयांना आणि तुर्कांना, दुराण्यांना सोपी होईल अशी भाषा निर्माण केली. या भाषेमुळे फौजेला हुकूम देणंही सेनाधिकाऱ्यांना सोपं व्हायला लागलं.

देवगिरी संपली. देशभर अल्लाउद्दीन खिलजीची हुकूमत सुरु झाली. चालुक्यांचा जहागिरदार म्हणून भिलाण्णा पंचम याने १२ व्या शतकात गवळी कुळातील यादवाने सिवुनरु- राजसत्ता सिन्नरमधे सुरु केली. त्याच्या वारसांनी पुढील काळात तुंगभद्रा ते नर्मदेपर्यंत राज्यविस्तार केला. आणि एक प्रमुख सत्ता म्हणून देवगिरीचं घराणं उदयाला आलं. यांच्या काळात मराठीला दरबारात फार

मोठं स्थान मिळालं. ज्ञानोबा माऊली याच काळातले. देवगिरी नावाची एक राजसत्तेची एक फार मोठी लाट काळाच्या ओघात विरुन गेली.

भारताच्या दृष्टीने ११९४ मधे दिल्लीत सुरु झालेली मुसलमानी सल्तनत, अल्लाउद्दीन खिलजीच्या पराक्रमामुळे आता देशभर पोचली. ही फार महत्त्वाची कलाटणी होती. संपूर्ण भारतातील हिंदू राजे आपलं स्वातंत्र्य गमावून बसले. .खिलजीच्या अंतानंतर परत त्यातूनच पुढे उदयाला आलं ते विजयनगरचं साम्राज्य, मग पाच शाह्या. संपूर्ण भारत गुलामगिरीत काळवंडला. राजप्रवाहाच्या लाटा उसळतच होत्या.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

# राणा संग

## जन्म १४८२ मृत्यू १५२८



शूरांचीच भूमी आहे ती. तिला राजस्थान नाव आहे. राजपुत्रांची भूमी ती राजपुताना. भारताच्या विविध नैसर्गिक सौंदर्याने नटलेला हा प्रदेश. इथे पश्चिमेला मरुभूमी आहे. इथल्या तप्त भूमीत हिरवळही आहे. तिथेच मनुष्यवस्ती दाटली आहे. सूर्याच्या तापापासून रक्षण करायला इथल्या स्त्रिया मनगटापासून खांद्यापर्यंत हातात हस्तीदंती चुडा घालून त्वचेचं रक्षण करतात, वस्त्रांवर काचा बसवून किरणांना परत पाठवतात, पुरुष मंदिल बांधून स्वत:चं रक्षण करतात. हा त्यांचा पोशाख भडक रंगांनी रंगलेला असतो. या भूमीत, अरवलीच्या डोंगर रांगा आहेत. उत्तर भारताच्या तुलनेत क्षीण नद्या आहेत. इथल्या क्षत्रियांचं पाणी मात्र तेजस्वी आहे. इथल्या पत्थरांमधेही तेजस्वी रत्नं आहेत.

या भरतवर्षात इथे आधी आर्य आले. मग खूप शतकांपासून या देशात शक, हूण, असे परकीय लोंढे आले. त्यातले काही परत गेले, काही इथेच स्थिरावले. जे इथे राहिले त्यांनी इथल्या स्त्रियांशी संसार थाटला. हळूहळू ते या

मातीचेच झाले आणि त्यांच्या वंशानी सत्ता गाजवली. त्या सर्व राजसत्तांचा पुढे चालत राहिलेला वंश म्हणजे राजपुत्र - राजपूत. ही सर्व घराणी शूरांचीच. त्यातच होतं मेवाडचं सिसोदिया घराणं आणि त्यातला राणा संग, ज्याने मुघल शत्रू बाबराशी सामना केला. एकूण १०० युध्द तो लढला असं आख्यायिका सांगतात. त्यात त्याने आपला हात, डोळा आणि पाय गमावला पण तिथल्या वीरांना असाच वीर आदर्श सेनापती म्हणून हवा होता. परकीयांशी लढणारा हा महापराक्रमी योध्दा.

राजा रायमल आणि राणी रतनकुमारी च्या पोटी संग्रामसिंगचा १४८२ मधे जन्म झाला. मेवाडचा राणा रायमल हा १५०८ मधे मरण पावला. त्याच्या मुलांमधे सिंहासन मिळवण्यासाठी मोठी युध्दं झाली. त्यात मिळालेल्या विजयानंतर राजलक्ष्मीने युवराज संग्राम सिंगला सिंहासनावर बसवलं. अत्यंत शूर, महत्त्वाकांक्षी, उत्तम योध्दा, चतुर राजकारणी आणि मुत्सद्दी ही त्याची ओळख होती तोच हा राणा संग. भांवांशी लढतांना त्याचा एक डोळा बाणामुळे निकामी झाला. तो गादीवर आला पण त्याचं तख्त तेव्हा मखमली नव्हतं. घराण्यातील भाईबंदांची भांडणं चालू होती. सीमेवर माळवा, उत्तरेला सुलतानी राजवट चालू होती. राणा संगने सर्व रजपूत केशरी झेंड्याखाली एकत्र आणले आणि आपली ताकद वाढवली. गुजरात, माळवा आणि उत्तर सीमेवरील अफगाण विजयानंतर राणा विजयाने तळपायला लागला.

यावेळी दिल्लीत सिकंदरशाह लोदी मरण पावला होता आणि त्याचे दोन मुलगे इब्ताहिमखान लोदी आणि जलालुद्दीन लोदी राज्यकारभार करायला लागले होते. राणासंग आणि इब्राहिमखान लोदीची गाठ पडणं स्वाभाविकच

होतं. दोन्ही फौजांची खतौलीच्या रणांगणावर गाठ पडली. घनघोर संग्राम घडला दोन्हीकडील फौजांनी मार खाल्ला. राणा संगचा एक हात तुटला. पण युध्द थांबलं नाही. इब्राहिमखान लोदीबरोबर राणाने अनेक चकमकींमधे पराक्रम गाजवला. दोघांना माळव्यावर हात ठेवायचाच होता. पण या वेळी दिल्लीत वेगळ्याच घटना घडत होत्या. इब्राहिमखान लोदीविरुध्द सर्व उमराव गोळा झाले होते. आणि त्यातून घडलं ते परत एकदा कालप्रवर्तक बाबर आणि इब्राहिमखान लोदी यांच्यातील कलाटणी देणारं युध्द.

इब्राहिमखानचा पराभव करण्यासाठी समरकंदचा बाबर हिंदुस्थानात आला. मुळात त्याचाच त्याच्या परगण्यात निभाव लागत नव्हता, म्हणून कुठेतरी आपला जम बसवायला तो लक्ष ठेवून होता. त्याच्यासमोर दिल्लीतून बोलावणं आल्याची सुवर्णसंधी चालून आली. तो मोठी फौज घेऊन पानिपतावर आला. २१ एप्रिल १५२६ या दिवशी दोन्ही फौजा एकमेकींना भिडल्या. इब्राहिम खानाचा सपशेल पराभव झाला. तो स्वत: मारला गेला. त्याची ५००० फौज रणांगणावर पडली. बाबरने युध्द जिंकलं ते तोफा आणि बंदुकांच्या युध्दसाहित्यावर. ही शस्त्रे इथल्या सत्ताधीशांना माहीतही नव्हती. बाबरने ७०० तोफांच्या गाड्या ४० फूटांच्य अंतराने कातडी दोराने एकमेकींना बांधल्या होत्या. त्या गाड्यांना संरक्षक भिंतीसारखं आच्छादन होतं. त्यामागे बंदूकधारी आश्रय घेऊन उभे होते. उत्तम गोलंदाज ६/७ तोफांवर ठेवले होते. या गाड्यांच्या मागे धनुर्धारी उभे होते. त्यांच्यामागे लहान तोफाधारी होते, आणि शेवटची रांग घोडदळाची होती. या तोफांच्या रांगांमधे भरपूर मोकळी जागा होती, ज्यात सैन्याला धावपळ करायला जागा होती. रक्षण करणाऱ्या गाड्या आणि फौज

धावत होती. इब्राहिमखान पडला. दिल्लीवर बाबरची सत्ता सुरु झाली. अफगाण आणि तुर्कांची राजवट संपली. उत्तर भारतात मुघल नावाची जमात राज्यावर आली.

राणा संगला कळतच होती ही सारी हकीकत. त्याचंही लक्ष होतंच. लोदी घराण्याचा शेवट झाला ही बातमी मिळाल्याबरोबर राण्याने सगळी फौज जमवली. आपले रणथंबोरसारखे महत्त्वाचे किल्ले त्याने बळकट केले. आणि मोठी फौज घेऊन तो खनवाला जाऊन थांबला. बाबरलाही राणा संग हा आपल्या यशातला मोठा अडथळा आहे हे माहीत होतं. अत्यंत हुशारीने राणा संगला संपवायला त्याने आग्र्याला मोठी ताज्या दमाची फौज गोळा करायला सुरुवात केली. सिक्रीवर जाऊन बाबर थांबला. मग दोन्ही फौजांमधे आग्र्यापासून ३७ मैलावर खनवात घनघोर संग्राम सुरु झाला. बाबरच्याविरुध्द सारे मुसलमान सरदार राणा संगच्या बाजूने होते. १७ मार्च १५२७ या दिवशी सकाळी ९.३० ला युध्दाला तोंड फुटलं. दोन्हीकडच्या फौजांचं शौर्य पाहून ही लढाई निर्णायक होईल की नाही असं वाटत असतांनाच राणा संग जबर जखमी झाला. त्याला रणांगणातून उचलून बसवा इथे नेण्यात आलं. राण अजने फौजेची सूत्रं हातात घेतली. इथेही तुलुगामी पध्दतीनेच बाबरने युध्द जिंकलं. प्रचंड नरसंहार दोन्ही बाजूंना झाला. राणा संगच्या पक्षातला माळव्याचा शिलादित्य तोमर बाबरला जाऊन मिळाला, त्यामुळे राण्याची बाजू आणखीनच खचली.

बसवा गावात असतांना राणा संग शुध्दीवर आल्यावर त्याला खनवाच्या पराभवाची बातमी कळली. त्याने तिथेच प्रतिज्ञा केली की परत यश मिळेपर्यंत चितोडमधे पाय ठेवायचा नाही. त्याने आपला फेटा सोडून टाकला

आणि एक कापड डोक्याभोवती बांधायला सुरुवात केली. राण्याने रणथंबोर हे मुख्य केंद्र केलं. परत फौज जमवली. बाबर चंदेरीमधे लढतो आहे ही बातमी राणा संगला मिळाली. तो त्याच्याशी झुजायला एरिचवर पोचला. पण कुणा घातकी माणसाने राणा संगवर विषप्रयोग केला. राणा संगला त्याच परिस्थितीत मग कालपीला नेलं. तिथेच त्याने शेवटचा श्वास घेतला. ३० जानेवारी, १५२८ या दिवशी एक शूराचा अंत झाला. राणा संगचं शव मंडणगडला नेण्यात आलं आणि तिथे त्याच्यावर अंत्यसंस्कार झाला. परकीयांशी लढणारा शेवटचा मालुसरा संपला.

दिल्लीत बाबरचा वंश कायम झाला. कसा जिंकला बाबर..तर त्याच्या युध्दसाहित्यामुळे. लोदीची आणि रजपूतांची फौज बाबरच्या सैन्यासमोर उभी राहिली तेव्हा त्यांना तोफांची रांग समोर दिसली. तोपर्यंत त्यांना हे काय आहे ते माहीतच नव्हतं. पण तोफांना बत्ती दिल्यावर जो भडका उडाला, जो प्रचंड जाळ झाला आणि प्रचंड स्फोटाचा आवाज झाला त्याने समोरचे शिपाई मुंग्यांसारखे जमिनीवर आडवे झाले. पाठोपाठ बंदुकीतून निघणाऱ्या गोळया सटासट येऊन छातीत घुसायला लागल्य आणि बघता बघता सैन्य प्राण गमावायला लागलं. हिंदी फौजांना हे माहीतही नव्हतं. बाबरने आपल्या लोकांशी लढायला तुर्कांकडून मागून आणल्या होत्या या तोफा. युध्द जिंकली जातात ती युध्दसाहित्यावर. भारत कायमच त्यात मागे राहिला.

पारतंत्र्यात राहायची नवीन सवय भारतीयांनी लावून घेतली. तुर्की गेले, मुघल आले. काय फरक पडला ?

ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss

# राणा प्रताप

## जन्म-९ मे १५४० मृत्यू १९ फेब्रुवारी १५९७.



खरं तर राणा प्रतापची अकबराशी ओळख आणि झुंज वयाच्या चौथ्या वर्षीच झाली. वयाच्या १३ व्या वर्षी बादशाहीचं तख्त आणि सन्मान घेणारा अकबर सम्राटपदाला नंतर पोचला. आधी त्याने सर्व राज्ये आपल्या एकछत्री अंमलाखाली आणण्यासाठी मोहिमा सुरु केल्या. पण दिल्लीच्या आणि आग्र्याच्या लगत असणारा राजस्थान जिंकल्याशिवाय आपण सार्वभौम सम्राट होणार नाही याची अकबराला पूर्ण खात्री होती. गुजराथवर स्वारी करण्यासाठी राजस्थान जिंकणं महत्त्वाचं होतं. म्हणूनच राजस्थानातील अंबरचा राजा भारमल (जयपूर), मेरटा, जोधपूर अशी एकेक राज्यं जिंकत जात असतांना त्याला अडसर आला तो मेवाडच्या राणा उदयसिंगाचा. मुळात रजपूत जमात म्हणजे शौर्याचं, धगधगतं कुंडच. राजस्थान जिंकायचं असेल तर सिसोदिया हे प्राचीन राजवंश असलेलं मेवाड जिंकणं

गरजेचं होतं. या मेवाड घराण्यातील राणा संगाने अकबराच्या आज्याबरोबर म्हणजे बाबरबरोबर अतुल सामना केला होता. या घराण्याने अकबराकडे आपल्या मुली देऊन शरीरसंबंधही जोडले नव्हते. अकबराशी धार्मिक अभिमान त्यात नव्हता कारण अकबर सर्व धर्मांना समानतेने वागवत होता. राष्ट्राभिमान आणि वंशाभिमान, दिल्ली तख्तापुढे न झुकण्याचा गर्व एवढंच मेवाड घराण्याचं त्यामागे कारण होतं.

म्हणून ३० ऑगस्ट १५६७ मधे तो शिकारीच्या बहाण्याने बाहेर पडला पण मुख्य हेतू चितोड जिंकण्याचाच होता. राणा संगच्या राजपुत्राशी, उदयसिंगशी लढणं आता गरजेचं होतं. हा उदयसिंग कुंभाळगडचा राणा म्हणून सत्तेत आला. यानेच उदेपूर ही राजधानी म्हणून नगर वसवलं. बालवयातील उदयसिंगला ठार करायला त्याचा काका आला असतांना, पन्ना दाईने आपल्या चंदन या मुलाचं बलिदान करून वाचवलं होतं. हे मेवाडचं घराणं अकबराच्या मुघल सत्तेपुढे झुकलं नाही. त्यामुळे उदयसिंगला जिंकणं महत्त्वाचं होतं. आपल्यावर स्वारी करण्यासाठी अकबर निघाला आहे ही बातमी मिळाल्यावर, दरबारी मुत्सद्यांनी केलेल्या विनंतीनुसार चितोडच्या रक्षणाची जबाबदारी जयमल राठोडवर सोपवून राणा उदयसिंग कुटुंबासह गिरव्याच्या डोंगर रांगांमधे (उदेपूर) आश्रयाला गेला. अकबर चितोडला पोचला तेव्हा राणा तिथे नसल्याचं त्याला कळलं. त्याने चितोडचा किल्ला गोल फेरी मारून पाहिला. त्याच्या तंत्रज्ञांनी कमकुवत तटबंदी कुठे असेल याचाही शोध घेतला. सपाट मैदानावरील सरळसोट डोंगराच्या माथ्यावर बांधलेला हा किल्ला जिंकणं कठीण आहे हे त्याच्या लगेच लक्षात आलं. सुरक्षेसाठी वळणावळणाचे ७ दरवाजे या पहाडी

किल्ल्याला होते. प्रत्येक वळणावर रजपुत फौज दबा धरून बसलेली होती. अनेक वर्षे पुरेल असा धान्यसाठा यात होता आणि ८००० शूरांची स्वाभिमानी पुरुषांची फौज तिथे होती. शिवाय उदयसिंगने मुघल फौजेला दाणा-पाणी मिळू नये म्हणून आजूबाजूचा मुलूख जाळून टाकला होता. तरी अकबर तिथे पोचला. किल्ल्याची पहाणी केल्यावर किल्ल्याचे बुरुज उडवण्यासाठी पायथ्याशी ३ ठिकाणी सुरुंग लावले गेले. अकबराने अर्धा मण लोखंडाचा गोळा उडवेल अशी उखळी तोफ तिथेच तयार केली. ती तोफ पाहिल्यावर जयमल राठोडने तहाच्या बोलण्याची आणि खंडणी देण्याची  तयारी दाखवली. पण त्यासाठी उदयसिंगने हजर राहिले पाहिजे या अकबराच्या अटीमुळे बोलणी फिसकटली.

अकबराच्या मुघल फौजेशी जयमलचा संग्राम सुरु झाला. १७ डिसेंबरला एक बुरुज सुरुंगामुळे ढासळला, त्याबरोबर मुघल फौज आत घुसली. पाठोपाठ, तीनही सुरुंगांचा स्फोट झाला. जागोजाग खिंडारं पडली. किल्ल्याच्या आतील सामान्य लोकांच्या घरांना आता अकबराने लक्ष्य केलं कारण त्यांना नुकसान पोचवल्याशिवाय जयमलवर शरण येण्याचा ताण येणार नव्हता. हा संग्राम ऐन भरात चालू असतांना, शत्रूला रोखण्यासाठी उत्तरेच्या बुरुजाच्या खिंडारावर जयमल राठोड उभा असतांना, अकबराने एक रजपूत सैनिक म्हणून अचूक गोळी मारली. त्या निशाण्याने जयमल ठार झाला हे अकबरला रात्री किल्ल्यावरुन अंत्यसंस्कारांच्या दिसणाऱ्या ज्वाळांमुळे कळलं. भूतो न भविष्यती अशा या संग्रामात जयमल राठोड ठार झाल्याबरोबर रजपूत सैन्याचा धीर सुटला. आता मुघल फौजेचा हल्ला होणार हे लक्षात आल्यावर किल्ल्यातील ३०० स्त्रियांनी जोहार केला. लगेच सेनेचं पुढारीपण पट्टा

सिसोदिया घराण्याच्या दुसऱ्या पुरूषाकडे आलं. या गडाचे दरवाजे उघडले गेले तेव्हा केशरी वस्त्रे घालून आत्मसमर्पणासाठी तयार झालेल्या रजपूतांनी, अकबराच्या हत्तींचे सुळके हातात धरुन त्यांना मागे रेटण्याइतकी हिंमत दाखवली.

चितोडचा मजबूत किल्ला अकबराच्या हाती पडला. जेव्हा या जिंकलेल्या चितोड किल्ल्यात अकबराने पाय ठेवला तेव्हा घराघरात प्रेतांचे ढीग पडले होते. अंबर घराण्यावर लिहिलेल्या अपमानास्पद मजकूरांनी अकबर इतका संतापला की त्याने गडावरच्या ३००००निष्पाप नागारिकांची कत्तल करवली. सर्वच राजपूतांनी जोहार केला होता. चितोड हाती आलं पण उदयसिंग शरण आला नव्हता. मग अकबर ३ दिवस चितोडमधे राहिला. त्याने त्या सुभ्याची आसफखानकडे जबाबदारी सोपवली. चितोडच्या विजयाचं चिन्हं म्हणून तिथला प्रचंड नगारा, देवळातली महान झुंबरं आणि सिंहदरवाजा आपल्याबरोबर आग्र्यामधे नेला. उदयसिंगाने दिलेला लढा अकबराचं राजस्थान जिंकण्याचं यश अनिर्णित अवस्थेला घेऊन गेला. अकबर मग इतर स्वाऱ्यांमधे गुंतला तरी मेवाड मिळवायचं लक्ष्य त्याच्या डोक्यातून गेलं नव्हतं. उदयसिंग अजून शरण आला नव्हता.

इ. स. १५७२ पासून अकबराने परत संपूर्ण मेवाड हातात घेण्याचे प्रयत्न सुरू केले. तेव्हा राणा प्रताप हा गादीवर आलेला होता. राणा उदयसिंग इ. स. १५७२ मधे मरण पावला. त्याचा सर्वात मोठा मुलगा म्हणून सरदारांनी ३२ वर्षांच्या राणा प्रतापलाच गादी देण्याला मान्यता दिली. राणा प्रतापचा जन्म ९ मे, १५४० मधे झाला. चितोडच्या रक्षणाची जबाबदारी जयमल राठोडवर

सोपवून, उदयसिंग जेव्हा गिरवाच्या डोंगरांमधे आश्रयाला होता, तेव्हा प्रताप अवघा ४ वर्षांचा होता. राणा उदयसिंगामुळे या रानोमाळ फिरण्याच्या काळात त्याची भिल्ल जमातीशी छान मैत्री झाली. त्या लोकांनी राणा प्रतापला किका नाव दिलं होतं. सामान्याचं आणि गरीबांचं आयुष्य त्याने जवळून पाहिलं होतं. आपल्या वंशाबद्दल आणि राज्याबद्दल कडवा अभिमान हेच त्याचं मुख्य लक्ष्य होतं. बापाने गमावलेला चितोडसह संपूर्ण मेवाड परत जिंकून घेण्याचा त्याचा ध्यास होता. अकबराशी त्याचाही कडवा विरोध होता. म्हणूनच अकबराने सामोपचाराने, गोड बोलून प्रतापला आपला मांडलिक करुन घेण्यासाठी आपल्या दरबारातील अंबरचा राजा मानसिंग, त्याचे वडील भगवानदास, शिवाय तोडरमल, अशांसारखे मोठे मुत्सद्दी राणा प्रतापकडे पाठवले पण राण्याने त्यांना हात हालवत परत पाठवलं. तेव्हा लढून जिंकण्याशिवाय पर्याय नाही हे अकबराच्या लक्षात आलं.

शेवटी राजा मानसिंगच्या हाताखाली ५००० निवडक फौज देऊन १५७६ सालच्या मार्च महिन्यात अकबराने त्याला राणा प्रतापवर पाठवलं. माधोसिंग, जगन्नाथ कछवा, अनेक मोठे मुसलमान सरदारांना घेऊन १ एप्रिलला अंबरचा राजा मानसिंग निघाला आणि सरळ मंडलगडावर जाऊन पोचला. राणा प्रतापची आता दुसरी राजधानी गोगुंडा ही होती. मग बनास नदीच्या काठाने तो मोलुलावर पोचला. राण्याने आपला सर्व सपाट मुलुख शत्रूला दाणापाणी मिळू नये म्हणून जाळून राख करुन टाकला होता. उदेपूरच्या उत्तरेला असलेल्या कुंभळगडच्या पायथ्याशी उतरून हळदीघाटाच्या पश्चिमेला ८ मैलांवर लोहसिंग या गावात राण्याने आपली छावणी केली. या भागाला

हलदी घाटी नाव पडण्याचं कारण म्हणजे या फत्तरांचा रंग हळदीसारखा पिवळाजर्द आहे. ही घाटी इतकी अरुंद होती की एकावेळी फक्त एकच माणूस जाऊ शकत होता. खिंडीच्या टोकाला खामनौर गाव होता, तिथून खिंडीपर्यंतच्या भागामधे जे खाचखळग्याचं मैदान होतं त्यावर ही लढाई झाली. मुघल फौज घाटीच्या तोंडाशी पसरली होती. यामधे थोडी खडबडीत जमीन आणि झुडपांचा मैदानी भाग होता. मुघल फौजेकडे हलक्या तोफा होत्या. राण्याकडे त्याही  नव्हत्या.त्याच्याकडे होते ते घोडदळ, पायदळ आणि भिल्ल जमातीचे तीरंदाज सैनिक. राण्याने जवळपासचे किल्ले मजबूत करुन ठेवले होते.

१८ जून १५७६ रोजी ही इतिहास प्रसिध्द लढाई सुरु झाली.  डोंगराळ प्रदेश, जून महिन्यातलं तापलेलं ऊन अशा गरम हवेत, प्रतापचे सैन्य दोन तुकड्यांनी खिंडीतून बाहेर आलं. पुढे होता तो आपल्या फौजेसह अफगाणी हकीमसूर आणि त्याच्यामागे राणा प्रतापची फौज होती. राणा प्रतापबरोबर साथ द्यायला होता तो सालंबुरचा किसानसिंग चुंदावत, सरदारगडचा भीमसिंग, देवगडचा संग आणि बदनोरचा रामदास, ग्वाल्हेरचा राजा रामसिंग आणि मानसिंग झाला. या आपल्या शूर साथीदारांबरोबर राणा सैन्याच्या मध्यभागी उभा होता. राण्याला साथ द्यायला पनर्वाचा भिल्ल राजा पुंजा हा डोंगरांमधे आपली सेना लपवून लढण्याला सिध्द झाला होता. पण राण्याकडे राखीव फौज नव्हती. समोरासमोर आल्यावर राण्यानेच प्रथम आक्रमक हल्ला चढवला. ती मुसंडी इतकी जोरात होती की जगन्नाथ, सय्यद हशीम आणि आसफखान या सरदारांच्या हाताखालचे मुघल सैनिक मागे रेटले गेले आणि राण्याचा जोरदार

हल्लाचा तडाखा त्यांनी सोसला. राजा राम शहाने डावीकडील मुघल फौजेवर एवढा जोराचा हल्ला चढवला की ते अक्षरश: मेंढरांसारखे पळत सुटले. शेख मन्सूर नावाच्या सरदाराच्या ढुंगणात इतक्या जोरात बाण घुसला की तो नंतर अनेक दिवस विव्हळत होता.

या पहिल्या तडाख्यात मुघलांनी इतका जोरात मार खाल्ला की सैरावैरा धावणारी फौज बनासच्या नदीच्या पलिकडे १०/ १५ मैल आत गेली. आता राणा प्रताप मधल्या फळीवर धावून गेला. तिथे हत्तीवर हौद्यात बसलेला स्वत: राजा मानसिंग राण्यासमोर उभा होता. तेव्हा त्याच्यापर्यंत पोचण्यासाठी प्रतापने आपले हत्ती त्यांच्यावर घुसवले. शत्रूच्या मध्यावर सोडले. शिसोदियांचा प्रसिध्द हत्ती लोना याने मुघलांच्या गजमुख हत्तीला घायाळ करुन टाकलं. गजमुख पळून जायला लागला तर लोनाने त्याचा पाठलाग केला पण इतक्यात लोनाच्या माहुताला गोळी लागली तेव्हा तो मागे फिरला आणि लोनाची जागा राणा प्रतापच्या अत्यंत देखण्या रामप्रसादने घेतली. त्याच्याशी भिडण्यासाठी मुघलांनी आपला राममदार हत्ती सोडला. राममदार पळून जायला लागला इतक्यात रामप्रसादचा माहूतही बाणाने ठार झाला. तेव्हा मुघलांचा हत्तीदलाचा प्रमुख हुसेनखान हा चपळाईने आपल्या हत्तीवरुन रामप्रसादवर चढला आणि त्याने रामप्रसादला आपल्या बाजूला नेलं. याचं कारण म्हणजे अकबराचा या रामप्रसादवर खूप दिवसांपासून डोळा होता. आता दोन्हीकडील मधल्या फळीच्या सैनिकांची झुंज सुरु झाली. त्यात राम शहाचे तीन मुलगे ठार झाले. जयमलराजाचा मुलगाही पडला.

राणा प्रताप आपल्या चेतक घोड्यावर आणि राजा मानसिंग हत्तीवर होते. दोघेही अतुल, अवर्णनीय पराक्रम गाजवत होते. दोघेही समोरासमोर आले. तेव्हा चेतकचं तर एवढं धाडस की भुकेल्या वाघासारखा तो मानसिंगच्या हत्तीच्या गंडस्थळावर चढला आणि त्याचवेळी राण्याने मानसिंगवर आपला भाला फेकला. अत्यंत चित्तथरारक अशी ही, दोघांच्या शौर्याची आणि त्यांना पाठीवर सांभाळणाऱ्या जनावरांचीही ती कमाल होती. मानसिंगने खाली झुकून राण्याचा भाला वाचवला आणि आपला जीव वाचवला. तेवढ्यात कछवाहच्या माधोसिंगने मानसिंगाभोवती कडं केलं आणि त्याचा जीव वाचवला. बाणांनी आणि भाल्याच्या तीक्ष्ण टोकांनी प्रताप जखमी अवस्थेतही लढत होता. चेतकचा पाय जखमी झाला. तेवढ्यात आपला पराभव होतो आहे हे पाहून मुघलांचा राखीव फौजेचा सेनाधिकारी नगारा वाजवत अकबर येतो आहे हे ओरडत सांगत आला. ती त्याची लबाडी आणि चतुराईही होती. रणांगणावरची ती काही मिनिटं शौर्याचा, पराक्रमाचा राणा आणि राजाच्या, दोघांच्या झुंजीचा कल्लोळ होता.

राणा प्रतापची फौज पहाटेपासून लढण्याने थकून गेली होती. जून महिन्यातीलप्रचंड उन्हाने सैनिकांचं रक्त उसळण्याइतं तापलं होतं. त्यातच मुघल फौज त्यांना वेढायला लागली. अकबर स्वत: येतो आहे हे ऐकल्याबरोबर राण्याच्या एकनिष्ठ सेवकांनी स्वत: चेतकचे लगाम हाती धरून जखमी राण्याला माघारी नेलं. त्यावेळी आपल्या धन्याला सुखरूप दूर नेण्यासाठी आपल्या तीन पायांवर चेतक इतक्या जोरात, सुसाट धवला की वाटेतला एक ओढाही त्याने एका छलांगात ओलांडला आणि आपल्या स्वामीनिष्ठचं प्रदर्शन केलं. तेवढ्यात

एक विलक्षण घटना घडली. झाला बिदा हा राणा प्रतापची छत्री घेऊन, मी राणा आहे असं ओरडत शत्रूच्या फौजेत शिरला. या गोंधळामुळे राणा आणि हकीम सूर यांना फुरसत मिळून हळदी घाटीकडे ते सुखरुप जाऊ शकले. बिदाही मारला गेला आणि धरणीवर कोसळला. त्यानंतर लढाई संपली.

चेतक घोडाही लढाईनंतर ३ दिवसांनी, २१ जूनला जखमांमुळे प्राण गमावून बसला.

सकाळी ८ वाजता सुरु झालेली ही हलदी घाट लढाई मध्यान्हीला संपली. राजा मानसिंगचा विजय झाला. पण राणा प्रतापला कैद किंवा त्याचं मरण हे काहीही झालं नाही. राणा प्रताप गोगुंडाला पोचला. तिथे त्याने त्या रात्री विश्रांती घेतली. राजा मानसिंग गोगुंड्याला पोचेपर्यंत राणा कोलियारला निघून गेला होता. राजा मानसिंगने गोगुंडा शहर आपल्या ताब्यात घेतलं. राणा परत येईल या भीतीने शहराभोवती उंच भिंत बांधली. राण्याचे डोंगरात लपून बसलेले भिल्ल सैनिक आपल्यावर हल्ला करतील म्हणून त्याला हलदी घाटीही हाती घेता आली नाही. त्याचे आणि त्याच्या सैन्याचे तिथे फार हाल झाले. उजाड भागामुळे अन्नही मिळेना, पाणीही मिळेना. शेवटी मानसिंगला गोगुंडा सोडावं लागलं. मानसिंग निघून गेल्यावर राण्याने ते शहर आणि आसपासचा भाग परत मिळवला. या लढाईमुळे झाल्या प्रकाराने अकबरचंही समाधान झालं नाही. धड ना विजय, धड ना हार अशी ही झुंज होती.

त्याउलट राणा प्रतापचा आत्मविश्वास मात्र प्रचंड वाढला. आपण अकबराच्या प्रचंड फौजेशी टक्कर देऊ शकतो हा साक्षात्कार त्याला झाला. डोंगराळ भागाचा आश्रय घेऊन राण्याने गनिमीकाव्याने हे युध्द केलं. पुढे २५


वर्षे राणा आयुष्यभर अकबराशी लढत राहिला. अकबरानेही राण्याला जिंकण्यासाठी परिश्रम घेतले पण राणा प्रताप शरण आलाच नाही. त्यासाठी तो जंगलावनात हिंडत राहिला. आपला गेलेला मुलूख मिळवत राहिला. त्याने चावंड ही आपली नवीन राजधानी केली आणि तिथून कारभार चालवायला लागला. आपल्या राज्याचा आणि वंशाचा अभिमान बाळगत राहिला. स्वतंत्रपणे जगला. राज्याची घडी स्थिरस्थावर करण्यात पुढची वर्षं त्याने घालवली. आणि १९ फेब्रुवारी १५९७ या दिवशी धनुष्य वाकवतांना झालेल्या जखमेमुळे तो शांतपणे मरण पावला.

राणा प्रताप स्वाभिमानाचं, धैर्याचं, मुघलांपुढे न झुकण्याच्या तेजाचं, हिंदुत्त्वाचं एक झळाळतं चैतन्य म्हणून इतिहासात अमर झाला. त्याच्या चेतक घोड्यानेही आपलं नाव रोशन केलं. इतिहासकार टॉडने या लढ्याला थर्मोपिलीच्या युध्दाची उपमा दिली आहे. ख्रिस्तपूर्व ४८० मधे ग्रीसवर पर्शियाने जेव्हा हल्ला केला होता तेव्हा थर्मोपिलिच्या डोंगरखिंडीजवळ अशीच दोन्ही देशांची लढाई झाली होती. त्यात पर्शियाच्या प्रचंड फौजेसमोर मूठभर ग्रीक सैनिक असेच बहादूरीने लढले होते. राण्याची लढाई त्याची आठवण करून देणारी ठरली.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

# चांदबिबी.

## जन्म १५४७. मृत्यू १५९९.



अल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिणेतील सत्ताविस्तारानंतर खिलजी घराणंही संपलं. मूळचा गुजराती पण खुस्रोखान या नावाने दरबारी वजीर असलेला, अल्लाउद्दीनच्या नातवाचा खून करुन सत्तेत आला पण लगेचच खुस्रोखानचाही खून करुन गियासुद्दीन तुघलकने दिल्लीची सूत्रं हाती घेतली. आता दिल्लीत तुघलक राजवटीला सुरुवात केली. गियासुद्दीनचा मुलगा सुलतान महंमद तुघलक हा इतिहासात खूप गाजला. देवगिरी या भारताच्या मध्यवर्ती ठिकाणी महंमद तुघलकाने आपली राजधानी आणली पण शत्रूच्या उत्तर सीमेवरच्या हल्ल्यांमुळे त्याला राजधानी परत दिल्लीला न्यावी लागली. याच्याच घसरणीच्या काळात, दक्षिणेत त्याचा बंडखोर सुभेदार हसन गंगू बहामनी हा दक्षिणेत स्वतंत्र झाला. त्या मुसलमानी

लाटेला थोपवण्यासाठी हरिहर आणि बुक्क यांनी विद्यारण्यांच्या मार्गदर्शनाखाली इ. स. १३३६ मधे विजयनगर साम्राज्याची स्थापना केली. वारंगळ, मदुरा, त्रिचनापल्ली, त्रावणकोर अशी हिंदू राष्ट्रं अस्तित्त्वासाठी यवनांच्याविरुध्द झुंजायला लागली. हसन गंगू बहामनीनंतर त्याचे दक्षिणेतील सुभेदार स्वतंत्र झाले आणि त्यातून निर्माण झाल्या त्या अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही, गोवळकोंड्याची कुतुबशाही, वऱ्हाडची इमादशाही, आणि बिदरची बिदरशाही. हे शहा स्वतंत्र होईपर्यंत दिल्लीतील अफगाणी आणि तुर्की सल्तनत संपली. इ. स. १५२६ मधे इब्राहिमखान लोदी या शेवटच्या लोदीचा पराभव करुन बाबर या मुघलाने दिल्लीवर कब्जा केला. बाबरनंतर हुमायूँ आणि त्याच्यानंतर अवघ्या १३ व्या वर्षी अकबराकडे साम्राज्याची सूत्रं आली. या वारसांच्या महत्त्वाकांक्षेला टक्कर द्यायच्या चक्रव्यूहात दक्षिण भारत परत अडकला. २६ जानेवारी, इ. स. १५६६ मधे तालिकोट्याच्या युध्दात सर्व शहा विजयनगर साम्राज्य गिळण्यासाठी एकत्र आले आणि विजयनगर साम्राज्याचा अंत झाला. या निजामशाहीतील राजकन्या आणि आदिलशाहीतील सून असलेलं एक रत्न म्हणजे सुलताना चांदबिबी, अकबराशी थेट सामना करुन सासर आणि माहेरच्या राज्यरक्षणासाठी बलिदान करणारी वीरांगना.

जशी ग्वाल्हेरजवळ, कोटाकी सराईच्या रणांगणावर वीजेसारखी तळपणारी झांशीची राणी लक्ष्मीबाई, तशीच अहमदनगरच्या रणांगणावर चमकणारी चांदबिबी. राणी लक्ष्मीबाई बलवान इंग्रजांशी लढली, तर सुलताना चांदबिबीने सामर्थ्यवान मुघल सम्राट अकबराशी सामना केला. निजामशाही

आणि आदिलशाही या दोन राजघराण्यांशी जोडलेला चांदबिबी हा महत्त्वाचा दुवा होता. तिने आपल्या आयुष्यात या दोन राज्यांचा कारभार पाहिला. विजापूर सासर म्हणून आणि अहमदनगर माहेर म्हणून. दक्षिण भारतात विजापूर, गोवळकोंडा, अहमदनगर, वऱ्हाड आणि बेदर या ज्या पाच शाह्या होऊन गेल्या त्यातील अहमदनगरच्या निजामशाहीचा संस्थापक, निजाम-उल-मुल्क मलिक अहमद बाहरी हा होता. हा खरं तर बहिरंभट म्हणजेच भैरवभट कुलकर्णी, पाथरी गावच्या कुलकर्ण्याचा नातू. बहिरंभटाचा मुलगा तिम्मप्पा याचं धर्मांतर झालं आणि बहिरभटाचं बाहरी हे नाव त्याने कायम आपल्या घराण्याला जोडलं. या तिमाभटाच्या अहमद या मुलाने जुन्नर ही आपली राजधानी केली. पुढे १० वर्षांनी १४९० सालात, मलिक अहमदने बहामनीच्या फौजेचा इमाम घाटाजवळ, एका भिंगार गावाजवळ पराभव केला. त्या विजयाचं प्रतिक म्हणून जवळपासच्या भागात त्याने गाव वसवला आणि आपलं नाव त्या शहराला दिलं. तेच अहमदनगर. या घराण्यातील बादशहाने स्वत:ला निजामशहा म्हणवून घेतलं. मुळात निजाम म्हणजे जमिनीची व्यवस्था पाहणे आणि ती व्यवस्था ठेवणारा अधिकारी तो निजाम-उल-मुल्क. म्हणूनच पुढे शाहूच्या काळात दक्षिणेला आलेला हैद्राबादचा चिनकिलिचखानही निजाम उल-मुल्क या नावाने गाजला.

चांद ही, बादशहा हुसेन निजामशहा याची कन्या. हिचा जन्म सन १५४७ मधे अहमदनगरमधेच झाला आणि इथेच तिचं बालपण गेलं. बुध्दिचतुर, राजकारण कुशल, शूर, धाडसी, सुशिक्षित, फारसी-अरबी-कानडी-मराठी भाषा सहज बोलू शकणारी, संगीताची जाण असणारी, आणि उत्तम सतार

वाजवणारी, चित्रकला आणि लष्करी शिक्षणातही प्रवीण, या उपजत कलागुणांनी संपन्न अशी ही नायिका आपलं आयुष्य सुवर्ण अक्षरांनी लिहून गेली. त्यावेळी विजापूरचा बादशहा अली आदिलशहा हाही तरुण झाला होता. तो १५५७ मधे गादीवर आला. लगेच ७ वर्षांनी १५६४ सालामधे, अहमदनगर आणि विजापूरच्या बादशहांनी तह केला आणि मैत्री जोडली. नंतर अत्यंत सुंदर चांद, अली आदिलशहाची बेगम म्हणून लग्न होऊन विजापूरला आली. हुसेन निजामशहाने सोलापूरचा किल्ला लग्नाची भेट म्हणून आपल्या मुलीला, चांदबिबीला दिला.

विजापूरला आल्यावर तिचं वैवाहिक जीवन सुरु झालं. अली आदिलशहाबरोबर ती दरबारी कामकाजात लक्ष घालायला लागली. त्याचवेळी प्रत्येक स्वारीमधे आपल्या पतीबरोबर हजर राहून आपलं लष्करी बुध्दिकौशल्यही दाखवू लागली. १५८० सालात अली आदिलशहा मरण पावला. तोपर्यंत त्याला मुलगा झाला नव्हता, म्हणून बादशहाने आपल्या भावाचा मुलगा इब्राहिम याला तख्तावर बसवून, चांदबिबीने राज्य चालवायचं अशी योजना केली. चांदबिबी आपल्या ९ वर्षांच्या पुतण्याला, इब्राहिमला घेऊन समर्थपणे राज्य चालवायला लागली. बुधवार आणि शुक्रवार हे दोन दिवस सोडून रोज दरबारात येऊन स्वत: न्यायदानाचं काम करु लागली. आपल्या सोबतीला कारभारी म्हणून तिने कामीलखान नावाच्या दिवाणाला बरोबर घेतलं. तिच्या हाताखाली प्रजा सुखात नांदायला लागली. पण दुर्दैवाने कामीलखानमधे अहंकार आणि सत्तेचा लोभ निर्माण झाला. तो उध्दटपणे राणीचे आदेश पाळेना. तेव्हा चांदबिबीने कामीलखानाला काढून जुन्या

जमानातल्या वजीराला किश्वरखानाला दिवाणगिरी दिली. तोही मिजासखोर बनला, तेव्हा परत त्यालाही काढून टाकून चांदबिबीने बंकापूरच्या सुभेदाराला मुस्तफाखानाला वजीर करण्याचं ठरवलं. पण ही बातमी गुप्त राहिली नाही. ती किश्वरखानाला कळली, त्याबरोबर किश्वरखानाने बंड करुन इब्राहिमला उचललं, आणि चांदबिबीला कैद करुन सत्ता आपल्या हातात घेतली. १५८२ सालच्या जवळपास, तिला सातारच्या किल्ल्यात कैदी म्हणून ठेवलं, तिचे खूप हाल केले, मानहानी केली. चांदबिबीची सत्ता संपली पण किश्वरखानाला कुणीही जुमानलं नाही, त्यामुळे राज्यात अनाचार माजला. तेव्हा राज्यातील दरबारी, आणि लष्करी अधिकारी एकत्र आले आणि त्यांनी किश्वरखानाला पळवून लावलं. चांदबिबीला सातारहून परत आणून तिच्या हाती कारभार दिला.

चांदबिबीने कारभार हातात घेतला. एखलासखान नावाचा एक हबशी दिवाण म्हणून नेमला. तेव्हा एक दक्षिणी आणि एक हबशी असे दोन दोन गट दरबारात तयार झाले, राज्यात परत अस्थिरता आली. त्याचा फायदा विजापूरच्या शत्रूंनी घेतला. वऱ्हाड, बेदर, गोवळकोंडाच्या बादशहांनी विजापूर प्रदेशावर हल्ला तर केलाच पण खुद्द विजापूरला वेढा घातला. तेव्हा चांदबिबी स्वदेशाच्या रक्षणासाठी स्वत: लढाईत उतरली. तिची हिंमत, तिचं शौर्य आणि आपल्या फौजेला प्रोत्साहन देण्याचं तिचं कसब बघून प्रजा थक्क झाली आणि आनंदित झाली. एक वर्षभर तिने आपल्या सैन्यासह विजापूरचा किल्ला लढवला. शेवटी शत्रूच कंटाळला आणि माघारी गेला. चांदबिबीने पराक्रमाची शर्थ केली होती. ही लढाई १५८५ मधे झाली. पुढील वर्षी म्हणजे १५८६ मधे,

म्हणजे मूर्तिजा निजामशहाने इब्राहिमच्या बहिणीला, खुदिजाला मागणी घातली. त्यानिमित्ताने अहमदनगर आणि विजापूर घराणी परत एकदा एकत्र आली.

चांदबिबी या आपल्या भावाच्या लग्नाच्या निमित्ताने अहमदनगरला आली, पण लग्नसमारंभाऐवजी तिथे मूर्तिजा आणि त्याचा मुलगा मिरान ह्यांच्यात तुफान भांडण झालं. त्यात मूर्तिजाचा वध झाला. या घटनेने चांदबिबीच्या दु:खाला सीमा राहिली नाही. त्यावेळी आपापसातील भांडणं, कारस्थानं, यामुळे अहमदनगरच्या दरबारातील परिस्थिती खूप वाईट होती. मिरानने गादी बळकावली पण त्याचाही लगेच वध झाला. शेवटी चांदबिबीच्या आणखी एका भावाच्या मुलाला बादशहा बनवलं आणि त्याचा दिवाण म्हणून जुमालखानाची नेमणूक झाली. पण हा नवीन दिवाण कुणालाच आवडला नाही. चांदबिबीबरोबर आलेल्या फौजेने आणि वऱ्हाडच्या फौजेने जुमालखानचा पराभव करुन त्याला पळवून लावलं. मग विजापूर आणि नगरचा तह झाला. अहमदनगरच्या या अनाचारी अस्थिर अवस्थेला कंटाळून, राजकारणातून निवृत्त होण्याच्या विचाराने चांदबिबी विजापूरला परत गेली. विजापूरात, इब्राहिमने चांदबिबीने जे संस्कार घडवले होते, शिक्षण दिलं होतं, त्याप्रमाणे प्रजेला सुखकारक असं राज्य केलं.

१५८७ मधे चांदबिबी विजापूरला गेल्यावर अहमदनगरला राज्यक्रांती झाली. रक्तपात, हिंसाचार सुरु झाला. तो आवरण्यासाठी चांदबिबीचा भाऊ बुर्हान याने दिल्लीला जाऊन अकबराकडे सैन्याची मदत मागितली. त्यावेळी अकबर दिल्लीत सत्तेत होता. तो दक्षिणेत पाय रोवण्याची संधीच पाहात

असतांना अहमदनगरहून त्याला आपोआप संधी चालून आली. बुर्हान अकबराची संमती घेऊन दोन वर्षांनी परतला. अहमदनगरला आल्यावर बुर्हानने आपल्या मुलाच्या हातून गादी बळकावली. पण तो ५ वर्षांनी मेल्यावर परत राज्यात अंदाधुंदी माजली. खून मारामाऱ्या वाढल्या. निजाम घराण्यातील लहान लहान बालकांना गादीवर बसवून सत्ता हातात घेण्याचे खेळ उमरावांनी केले, पण अस्थिरता कायम राहिली तेव्हा मिया मंजू नावाच्या एक वजनदार उमरावाने, अकबराचा मुलगा, मुराद हा सुभा सांभाळायला गुजराथेत होता, त्याला मदतीला बोलावलं. मुराद लगेच ३०,००० सैन्य घेऊन अहमदनगरला आला, पण नंतरचे त्याचे अत्याचार पाहून मिया मंजूचे डोळे उघडले. या परिस्थितीतून बाहेर पडण्याचा एकच मार्ग सर्व उमरावांना आठवला. तो म्हणजे चांदबिबीला अहमदनगरला बोलावून तिच्या हाती लढाईची सर्व सूत्रं द्यायची. मिया मंजू आणि सर्व उमरावांनी चंदबिबीला विनंती केली. निवृत्ती आणि ईश्वरभक्तीत दिवस घालवण्याची आपली इच्छा बाजूला ठेवून, आपल्या माहेरवर आलेलं संकट दूर करण्यासाठी चांदबिबीने विनंती मान्य केली. आपली विजापूरची फौज घेऊन चांदबिबी अहमदनगरला आली.

तिने सर्वप्रथम, अहमदनगरच्या किल्ल्याची डागडुजी करुन तो भक्कम केला. किल्ल्याचे दरवाजे भक्कम केले. प्रत्येक बुरुज बळकट केला. तिथे हुशार माणसं नेमली. आपल्या लोकांना गोवळकोंड्याला पाठवून तिथल्या बादशहाला मदत करण्याची विनंती केली. पण ती फौज येण्याआधीच दिल्लीच्या फौजा अहमदनगरवर चालून आल्या. आणि नंतर घडलं ते चांदबिबीच्या आयुष्यातील, अहमदनगरचं गाजलेलं ऐतिहासिक मुघल-

निजामशही युध्द. सन १५९५ च्या शेवटच्या महिन्यात सम्राट अकबराचा मुलगा मुराद याच्या हाताखाली, मुघल फौजा नगरवर पोचल्या. अशा मोठ्या शत्रूशी लढण्याची हिंमत चांदबिबीत होती. तिने सर्व सैनिकांना प्रोत्साहन दिलं. त्यांच्यामागे ती भक्कमपणे उभी राहिली.तिचे गुप्तहेर शत्रूच्या छावणीत हिंडून बातम्या आणू लागले. आपल्या किल्ल्याचा भक्कम तट उडवण्यासाठी, मुघल फौज सुरुंग लावण्यासाठी भुयार खणत आहेत ही बातमी ख्वाजा महंमदखान शिराजी याच्याकडून ज्यादिवशी तिला मिळाली तेव्हा तिने त्याच मार्गावर किल्ल्यातूनही भुयार खणायचा हुकूम दिला. आपल्याच दारुगोळ्याने त्यांच्या सुरुंगाचा भडका उडवून, आपल्या बाजूने त्यांचा जोर कमी करण्याचा तिचा डाव होता. मुरादलाही ही बातमी कळली तेव्हा तिच्या या अचाट साहसाने तो थक्क झाला. त्याने घाईघाईने तिचा बेत हाणून पाडण्यासाठी भुयार तयार करुन, सुरुंगाला बत्ती दिली. प्रचंड मोठा स्फोट होऊन तटाच्या भिंती कोसळल्या. स्फोटामधे चांदबिबीचे अनेक सैनिक जीव गमावून बसले. पण चांदबिबी डगमगली नाही. संकटकाळातच माणसाच्या अलौकिक धैर्याची परिक्षा होत असते.

चांदबिबी चिलखत घालून, हातात तलवार घेऊन सिध्द झाली. सुरुंग स्फोटामुळे दगडमातीने तयार झालेल्या फुटक्या रस्त्यावर फौज घेऊन उभी राहिली. आपल्या अतुल वीरश्रीने आपल्या फौजेला चेतवलं आणि दिवसभर मुरादच्या सैन्यावर बंदुका, तोफा, जेजाला यांचा मारा केला. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत हे तुंबळ युध्द चाललं. राणी सतत दिवसभर आपल्या घोड्यावरून फौजेत हिंडत राहिली. हा चांदबिबीकडून झालेला हल्ला इतका जबरदस्त होता

की शहजादा मुराद तह करायला तयार झाला इतकं त्याचं प्रचंड नुकसान झालं होतं. चांदबिबीच्या या विस्फारुन टाकणाऱ्या शौर्यामुळे तो थक्क झाला, जसा पुढे २५० वर्षांनी झांशीच्या राणीचा पराक्रम पाहून सर ह्यू रोजही थक्क झाला होता. या अशा अनेक रणरागिण्यांनी भारतीय मातीला आपल्या रक्ताचा सडा शिंपून पवित्र करुन टाकलं होतं. शहजादा मुराद तिच्या पराक्रमाने एवढा प्रभावित झाला की युध्द संपल्यावर त्याने आपले प्रतिष्ठित सरदार राणीच्या दरबारात पाठवून तिला चांद सुलताना हा किताब प्रदान केला.

चांद सुलतानाने मग अहमदनगरच्या कारभारात लक्ष घतलं. तिथे व्यवस्था आणि सुधारणा करण्याकडे लक्ष पुरवलं. अहमदनगर गादीचा वारस ठरवण्यासाठी जो वाद परत उफाळला त्यासाठी आपल्या विजापूरी फौजेला घेऊन यायला इब्राहिमला निरोप पाठवला. इब्राहिमने नगरला पोचल्यावर अहमद आणि बहादूरशहा यांच्यातील खरा वारस म्हणून बहादूरशहाची निवड करुन त्याला गादीवर बसवलं. आणि राज्यात स्थिरता आणली. पण ही व्यवस्थाही फार काळ टिकली नाही. अहमदनगरच्या दरबारातील वातावरण बिघडलं ते बिघडलंच. चांदबिबीही या वातावरणाला कंटाळली. त्याचवेळी शहजादा मुरादचा सन १५९७ मधे दिल्लीत मृत्यू झाला तेव्हा त्याच्या जागी, गुजरातवर शहजादा दानियलची नेमणूक अकबराने केली. अकबराला अहमदनगर जिंकायचं स्वप्न होतंच. सन १५९७ च्या अखेरीला दानियल प्रचंड मोठी फौज घेऊन अहमदनगरकडे चालायला लागला. चांदबिबीला ही बातमी कळली. तेव्हा तीही अहमदनगरच्या बंदोबस्ताला लागली. दानियल दक्षिणेत येणार म्हणजे आपल्या मुलूखावरही त्याचं संकट येणार हे जाणून सर्वच

दक्षिणेकडील राज्यं ती लाट अंगावर घ्यायला एकत्र आली. पण अहमदनगरच्या निहांगखान या दिवाणाने बीडच्या मुघल सैन्यावर हल्ला करून एक चूक केली. त्याने दानियलला आयतं कारण दिलं. चांदबिबी दिवाणाच्या या वर्तनाने फारच नाराज झाली पण आता परिणामांना तोंड द्यायला तयार राहायला हवंच होतं. दानियल आला. युध्द सुरु झालं. सतत चकमकी होत राहिल्या पण यश कुणालाच मिळेना. ४ वर्षे हे युध्द चाललं.

पण शेवटी किल्ल्यातील दारुगोळा संपला तेव्हा चांदबिबीने खजिन्यातून चांदी आणि सोनं बाहेर काढलं आणि त्याचे मोठे गोळे बनवून ते तोफेतून उडवले आणि शत्रूंना ठार केलं. दोन्ही फौजांमधे खूप चकमकी झाल्या पण शेवटी दानियल जिंकला. आपली फौज कमी आहे आणि ती थकलीही आहे हे चांद सुलतानाच्या लक्षात आलं. आपल्या ताकदीबाहेरची ही लढाई हे तिने जाणलं आणि दानियलशी तहाचा विचार केला. चांद सुलतानाच्या या निर्णयाचा गैर फायदा घेऊन तिच्याविरुध्द तिच्या विरोधकांकडून अपप्रचार केला गेला. अहमदनगर राज्य, चांद सुलताना मुघलांना विकते आहे असा गवगवा झाला. राणीच्या फौजेतही फूट पडली. ही लढाई चालू असतांनाच हमीदखान नावाच्या पठाणाने तिच्यावर हल्ला करुन तिचा खून केला. चांदबिबी संपली, लढाईही संपली. अहमदनगरही संपलं. बालवयातील सुलतान बहादूरखान ग्वाल्हेरच्या किल्ल्यात राजबंदी म्हणून अडकला. तिथेच त्याचा अंत झाला. अकबराने निजामशाही राज्य आपल्या मुलूखाला जोडून घेतलं. या विजयाबद्दल, त्याने आपल्या दानियलचा मोठा गौरव केला.

पण काही काळानंतर नागपूरकर भोसले यांच्या दप्तरातून दुसरीच हकीकत बाहेर आली. ती म्हणजे, चांदबिबीला पीर अवलियाचा निरोप आला की जोहार कर म्हणजे मरण स्वीकार. त्याप्रमाणे आपला पराभव होणार हे स्पष्ट झाल्यावर चांदबिबी आपल्या लढाऊ स्त्रियांसह राजवाड्यात जो गुप्त मार्ग होता, त्या गुप्त महालात निघून गेली. त्यानंतर ती कुणालाच दिसली नाही. चांदबिबीचं पुढे काय झालं ते कुणालाच माहीत नाही. हा गुप्त मार्ग अहमदशहानेच भिंगारमधे जेव्हा किल्ला बांधला तेव्हा तयार केला होता. अहमदनगरमधे त्यानंतरच्या शतकात खूप मराठी घराणी उदयाला आली. त्यातलं प्रसिध्द घराणं भोसल्यांचं होतं. निजामशाहीचं राजकारण खेळणारा पुढील १७ व्या शतकातील मोठा तरुण धुरंधर राजकारणी म्हणजे शहाजीराजे भोसले.

रणांगणावर उभी असलेली, चिलखत घातलेली, हातात समशेर धरणारी, विजापूर आणि अहमदनगर ही दोन राज्ये समर्थपणे सांभाळणारी, सुलताना चांदबिबी आठवायलाच हवी. पण ती बहिरंभटाच्या घराण्यातली म्हणून तिच्याकडे पाहणार, की मुसलमान नावामुळे तिला परकी मानणार की तिला महाराष्ट्रातील एका राज्याला मुघलांपासून वाचवणारी वीरांगना म्हणणार? आपापल्या आकलनाचा प्रश्न आहे.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

# औरंगजेबाचं सत्ताग्रहण.



महंमद घोरीनंतर इब्राहिम खान लोदीपर्यंत चालू असलेली तुर्की-अफगाणी राजवट बाबरच्या येण्याने संपली. बाबर-हुमायूँ-अकबर-जहांगिर-शहाजहाँ असा मुघल बादशाहीचा प्रवास सुरु झाला. शहाजहाँने आग्र्याचा ताजमहाल बांधून याने आपलं नाव अजरामर केलं. भारतीय वास्तू सौंदर्यात एक मोलाची भर घातली. दुसरीकडे दक्षिणेत आदिलशहा-निजामशहांच्या झगड्यात एक नवीनच तारा उदयाला आला. त्याचं नाव शहाजीराजे भोसले. आपल्या राजकारणाने आणि पराक्रमाने याने आपल्या सामर्थ्याची नवीन पायवाट तयार केली. आपण यवनांच्या सत्तेचे गुलाम आहोत कारण आपल्याला स्वतंत्र राज्य नाही बोच या तरुणाच्या मनाला लागून राहिली. त्या स्वप्नपूर्तीची तो वाट पाहात राहिला. उत्तरेत शहाजहाँ आणि दक्षिणेत शहाजी असा ताकदीचा सारीपट रंगला. शहाजहाँला ४ मुलगे होते. मोठा दाराशुको,

दुसरा शाहशूजा, तिसरा औरंगजेब आणि चौथा मुरादबक्ष.. राज्याची सूत्रं हाती घेण्यापूर्वी आपल्या भाऊबंदांना संपवायचं ही अफगाणी-तुर्की-मुघल वंशाची पिढ्यानपिढ्यांची कायमच प्रथा होती. या निर्णायक लढ्यामुळे या बादशहांची एकहाती सत्ता राहिली. राज्याची वाटणी झाली नाही, आणि त्यामुळे राज्य खिळखिळंही झालं नाही. नालायक असला तरी मोठ्या मुलालाच गादी मिळायला पाहिजे हा कायदा नसल्यामुळे सर्वश्रेष्ठ वारसच तख्तावर आला. तिसऱ्या क्रमांकावर असला तरी औरंगजेब सिंहासनावर कसा आला त्याची ही कहाणी.

मराठी भाषेला एक श्रीमंती आहे.. वेगवेगळ्या क्रियापदांसाठी वेगवेगळे शब्द.. मस्तक-टाळकं-मुंडकं-डोचकं-माथा-शीर-सगळ्याचा अर्थ एकच.. डोकं.. पण मस्तक नतमस्तक होण्यासाठी असतं, मुंडकं छाटायचं, टाळकं बडवायचं, शीर धडापासून वेगळं करायचं.. मुंडकं दुखतंय? शक्यच नाही.. दुखतं ते डोकं असतं..पण एका शब्दाला अनेक शब्द असले तरी अर्थ एकच असा जो शब्द तो म्हणजे कुटिल हा शब्द..कुटिल म्हणजे कावेबाज- लबाड-विश्वासघातकी-दुष्ट-द्वेषी-कपटी-चाणक्य नीतीचा- धोरणी-धूर्त-दगलबाज-आतल्या गाठीचा-खमंग-इंग्लिशमधे सांगायचं तर crooked-crafty-cunning-wily-sly-wicked-torturous-…आणि या सगळ्याला एकच शब्द तो म्हणजे औरंगजेब.. ते नवरंग मधे एक गाणं आहे ना? शामल शामल बदन, कोमल कोमल चरण… बडे मनसे विधाताने तुझको घडा.. तसं विधात्याने एक राजकारणी शासनकर्तासुध्दा मनापासून बनवला.. त्याचं नाव औरंगजेब.. मोहिउद्दिन महंमद, जन्म ३ नोव्हेंबर १६१८.

१७ नोव्हेंबर, १६५७ मधे शहेनशहा शाहजहाँ दिल्लीत अचानक खूप आजारी पडला. आपल्या जीवाला कारस्थानाचा धोका नको म्हणून लगेच त्याने दरवाजावर विश्वासू जसवंतसिंग आणि रामसिंग यांची नेमणूक करुन बाकीच्यांना हाकलून लावलं. आणि शहजादी बेगमसाहेबलाही कुराणावर हात ठेऊन शपथ घ्यायला लावली. आग्र्यातील सराफ सावकारांनी सांकेतिक भाषेत बातमी पसरवली, बादशहा मरण पावला आहे म्हणजे " लोण्याचे भांडे आतील ताकाने काठोकाठ भरलं आहे पण आतील लोणी मात्र गायब आहे. " दंगा होईल म्हणून लोकांनी दुकानं बंद केली आणि घराघरातील सर्वांनी शस्त्रं जमवली. पुढे काय होणार याचा अंदाज घेत बसले.

बादशहाचे चारही शहजादे दाराशुको-शाहाशूजा-औरंगजेब आणि मुरादबक्ष खूप आनंदले आणि लागलेच लगेच तयारीला.. त्यांच्याकडे मोठा मुलगा गादीचा वारस हे संस्कृती नाही त्यामुळे नालायक असला तरी गादीवर तो येणारच हा धोका नाही..सत्ता मिळवायची, ती टिकवायची, त्यासाठी सत्ता सांगणारांचे धोके संपवायचे. अगदी भविष्यातही आड येऊ शकणाऱ्या, त्यांच्या तान्हया मुलांपर्यंत सगळ्यांना ठार करून आपला मार्ग निर्धोक करायचा. संघर्षाची प्रचंड कामं उरकायची होती, बाप आजारी पडल्यामुळे या चौघांना..दाराशुको बापाचा आवडता..विदुषक, नर्तकी, गायिका आणि खुषमस्करे यांचीच त्याला आवड. शहाजहाँलाही त्याला बादशहा बनवायचं होतं. दाराशुको धरुनच चालला होता आपण बादशहा होणार ते..दुसरा शाहाशुजा पराक्रमी होता, विवेकी, पराक्रमी, माणसं जोडणारा पण गर्विष्ठ त्यालाही व्हायचं होतं बादशहा..

तिसरा औरंगजेब मात्र वेगळाच होता. पराक्रमी आणि धैर्यधर.तो आपण संन्यस्त वृत्तीचे आहोत असं सतत सांगत राहे.. रणांगणावर असतांना स्वत: विणलेल्या गवताच्या चादरीवर झोपत असे..स्वत: टोप्या शिवून विकायला पाठवत असे.. मुळा, मसूर, अशा स्वस्तातील भाज्या खात असे. आपण उपास तपास करतो, सतत कुराणाचं पठण करतो याचं प्रदर्शन करत असे. जपाची माळ फिरवत राही. त्याच्या अवतीभोवती जे फकीर होते, ते त्याचे गुप्तहेर होते. राज्याचा हक्क आपण सोडून दिला आहे, आपण मक्केला जाऊन राहणार हे सतत सांगत राही. पण शहाजहाँ आणि दरबारी त्याला ओळखून होते. चौथा मुरादबक्ष. दारु-संगीत आणि शिकार यातच कायम बुडलेला. शहाजहाँला तीन मुली. मोठी बेगमसाहेब ती दारा शुकोच्या आणि बापाच्या पक्षातली. दुसरी रोशनआरा ती औरंगजेबाला दरबारातील सर्व बातम्या गुप्तपणे पोचवी. तिसरी मेहरुन्निसा लहान होती. त्यामुळे राजकारणात नव्हती.

दिल्लीतून बातमी पोचल्याबरोबर बंगालमधे असलेला शाहशूजा मोठी फौज घेऊन लगेच दिल्लीकडे निघाला. "या तख्त या ताबूत.." म्हणजे सिंहासन तरी नाहीतर शवपेटिका तरी" अशी घोषणा त्याने केली. दाराने बादशहाला विष देऊन मारलंय म्हणून मी दाराला मारायला चाललोय हेही त्याने सांगून टाकलं. स्वत: बादशहाने मी बरा झालोय असं पत्रही लिहिलं पण उतावीळ शाहशुजा पुढे येतच राहिला. त्यामुळे बादशहाने दारा शुकोचा मुलगा सुलेमान शुको आणि जयसिंगला मोठी फौज देऊन त्याला अडवायला पाठवलं. त्यात परत गुंता होता. जयसिंगाला शुजाला कैद करायचं नव्हतं कारण बादशहा अजून जिवंत होता. २. पण बादशहाचा हुकूम तर मानायलाच हवा होता आणि दाराने जयसिंगला

एकदा खूषमस्कऱ्या म्हटलं होतं त्याचा वचपा जयसिंगला काढायचा होता. त्यामुळे शाहशुजा पुढे आणि जयसिंग मागे असा सामना झाला.

दुसरा प्रसंग दक्षिणेतला मुरादबक्ष आणि औरंजेबातला. औरंगजेबाने गुप्तपणे फौज वाढवायला तयारी सुरु केली आणि मुरादबक्षजवळ जवळ असलेली फौज घेऊन बंड करायला निघाला. त्याने मुरादबक्षला पत्र लिहून कळवलं, की दाराने बादशहाला विष देऊन ठार केलं आहे. आता बादशहा होण्यासाठी तुम्हीच फक्त लायक आहात. दारा मूर्तीपूजक आहे आणि शाहशूजा अली पंथाचा शिया म्हणजे धर्मविरोधक आहे. मी तर मक्केलाच जाऊन राहणार आहे. फक्त तुम्ही एकच करा. कुराणावर हात ठेऊन माझ्या कुटुंबाला सुखरूप ठेवाल याची शपथ घ्या. म्हणजे मी तुमच्यामागे सर्वशक्तीनीशी उभा आहे. शपथ म्हणून मी १ लाख रुपये तुम्हाला पाठवत आहे. मुरादबक्ष खूष झाला त्याने ते पत्र सगळया सैन्यात फिरवलं, व्यापाऱ्यांना दाखवलं आणि त्यांच्याकडून पैसा काढला. तोपर्यंत औरंगजेबाने इतर सरदार आपल्याकडे वळवले आणि त्यासाठी शहाजहानच्या सहीची बनावट पत्रं सरदारांना दाखवली. हेतू हा की बादशहाचा औरंगजेबालाच पाठिंबा आहे. पण या सरदारांनी आपल्या लोकांकडून खरी बातमी काढून मगच ५० दिवसांच्या नंतर औरंगजेबाला मिळायचं ठरवलंय हे कळल्यावर औरंगजेबाने त्या सर्व सरदारांची पत्रं नर्मदेपलिकडेच अडवण्याची व्यवस्था केली. त्यामुळे सरदारांना बादशहाची बातमी मिळूच शकली नाही. मग ते सर्व औरंगजेबाला सामील झाले.

आलमगीर नाटकाची ही नांदी, त्यानंतर ४ पक्षांची झुंज हे ४ अंक ...पुढच्या भागात पुढचा आँखो पढा हाल...

## औरंगजेब आणि मुरादबक्ष.

औरंगजेबाचा पाठिंबा आहे हे कळल्यावर मुरादबक्षने लढाईसाठी पैसा मिळवायला सुरत लुटली. तो गुजराथमधे असतांना औरंगजेबाने त्याला पत्र लिहून आपल्याकडे यायला सांगितलं. मुरादबक्षचा विश्वासू खोजा शहावाझने, औरंगजेबावर विश्वास ठेऊ नका, गुजराथमधेच राहा असं कळकळीने सांगितलं पण मुरादबक्षला ते पटलं नाही. राजकारण्याला डोक्यात हवा जाऊन चालत नाही. मुरादबक्ष मांडवगडजवळ औरंगजेबाने सांगितलेल्या जागी त्याला मिळाला. औरंगजेबाच्या पक्षातले शाहिस्ताखान हा मामा आणि रोशनआरा बेगम आग्र्यातील बारीकसारीक बातमी औरंगजेबाकडे पोचवत होते. त्यामुळे बादशहा जिवंत आहे हे औरंगजेबाला चांगलं माहीत होतं. हे दोघे पुढे येऊ नयेत म्हणून शहाजहाँने त्यांना कडक भाषेत पत्रं लिहिली पण दक्षिणेकडून हे दोघे पुढे येतच राहिले तेव्हा जसवंतसिंग राठोड आणि कासीमखान नावाचा सरदार त्यांना अडवण्यासाठी निघाले. उज्जयनीजवळ नदीवर दोन्ही फौजांची गाठ पडली. कासीमखान मुरादला जाऊन मिळाला त्यामुळे जसवंतसिंग लढाई हरला. जसवंतसिंगाच्या पराभवाची बातमी शहाजहाँला कळल्यावर तो हताशपणे म्हणाला, “ माझी कारकीर्द संपली हे कळलं होतं पण एवढी आपत्ती कोसळेल असं वाटलं नव्हतं. माझ्या अपराधांची सजा मला मिळते आहे.”

औरंगजेब आपल्या मालकाला फसवतो आहे हे बघून मुरादबक्षचा खोजा शाहवाझ याने एक कारस्थान रचलं. औरंगजेब आपल्या मुलासह मुरादला भेटायला शामियानात येत असे. त्यांना ठार करायचा त्याचा बेत होता. ते दोघे आल्यावर शाहवाज सांकेतिक भाषेत मुरादबक्षला म्हणाला, “हुजूर,

आपण परवानगी दिलीत तर कनातीचं कापड फाडायचं म्हणतो आहे.” पण मुरादबक्षने त्याला हो म्हटलं नाही. औरंगजेबाला मात्र त्याचा अर्थ कळला. तो परत कधीही मुरादबक्षच्या शामियानात गेला नाही. दोन्ही भावांमधले शह काटशह चालू झाले होते. तिकडे दिल्लीला दाराशुकोला आपला सर्व खजिना आणि सैन्य शहाजहाँ बादशहाने देऊन टाकला होता. दारा शुको फौज घेऊन मुरादबक्षवर निघाला. चंबळ नदीपासून १ मैलावर घोलपूरला दोन्ही पक्षांची गाठ पडली. दाराच्या वाढीव फौजेत न्हावी-शेतकरी अशी वाटेल ती माणसे होती आणि थोडे बादशहाचे वैरी होते. शहाजहाँ बादशहाने या सरदारांच्या बायकांना वापरल्यामुळे चिडलेले लोक होते हे ! या लढाईत रामसिंग आणि मुरादबक्ष एकमेकांच्या समोर आले. मुरादबक्षने पराक्रमाची शर्थ केली. ३ बाण तोंडाला लागले असतांनाही स्वत: हत्ती चालवत लढला. रामसिंगला त्याने ठार केलं. रामसिंगला त्याने ठार केलेलं पाहून दारा खचला.. त्यातच राजद्रोही खलिलुल्ला खानने दाराला सल्ला दिला की तुम्ही खाली उतरा, आपण घोड्यावरून मुरादबक्षजवळ जाऊन त्याला मारू. दाराला भान राहिलं नाही. तो खाली उतरल्याबरोबर दाराच्या फौजेला हत्तीवर तो दिसला नाही म्हणजे तो मेला असं वाटलं आणि दाराशुकोची फौज रणांगणातून पळू लागली. सकाळी ९ ते १२ लढाई झाली. मुरादबक्ष जिंकला. दारा पळून गेला.

औरंगजेबाने लगेच शामियानात जाऊन मुरादबक्षला बादशहा म्हणून संबोधलं. दाराशुको आधी दिल्लीला आणि मग लाहोरला निघून गेला होता.

शहाजहाँ बादशहाला औरंगजेबाने नाटकी पत्रं लिहून खूप दु:ख झाल्याचं सांगितलं. बादशहाने औरंगजेबाला किल्ल्यात भेटायला बोलावून ठार करायचा

बेत केला पण औरंगजेब धूर्त निघाला, त्यामुळे फसला नाही. आग्र्यातील सर्व सरदार मग औरंगजेबाला जाऊन मिळाले. मुरादबक्षही बादशहा होण्याची स्वप्नं पाहात राहिला. औरंगजेब भेटायला येत नाही हे पाहून शहाजहाँ बादशहाने त्याच्या मुलाला भेटीला बोलावलं आणि तुला राज्य देतो भेटायला ये असा निरोप पाठवला. तो आलाच नाही. औरंगजेबाने आग्र्याला वेढा घातला. शहाजहाँ अटकेत पडला. त्याला मुलाकडून निरोप आला, आता तुम्ही तुमचा विलास मनमुराद करत बसा. राज्य माझ्या हाती आहे. तुमच्याने कारभार रेटणार नाही. ''शहाजहाँ तेव्हा ६८ वर्षांचा होता. पदच्युत झाला ती तारीख होती, १८ जून १६५८. औरंगजेबाने दोघांचा निकाल लावला. बाकी राहिले शाहशूजा आणि मुराद..

शहाजहाँने बाहेरच्या औरंगजेबच्या सैनिकांवर ३ रात्री ३ दिवस तोफांचा मारा केला पण बाहेरुन त्याची रसद बंद झाली. तेवढ्यात औरंगजेबाचा भेटायला येतो असा निरोप आला. बाशहाला आणखी एकदा हुरुप आला.. पण औरंगजेब हा स्वत:चा मुलगा न येता सुलतान महंमद हा नातू भेटायला आला. औरंगजेबाने आपल्या मुलाला सांगून ठेवलं की किल्ल्याचं प्रवेशदार उघडलं की तू आपली माणसं आत घुसवायची आणि किल्ल्याच्या आतला ताबा घ्यायचा. सुलतान महंमदने तेच केलं. बादशहा, बेगमसाहिब, खोजे सर्व अटकेत पडले. औरंगजेबाने लगेच आणखी एक काम केलं. त्याने लाहोरला दाराकडे बादशहाच्या सहीचं एक बनावट पत्र पाठवलं. त्यात लिहिलं,

''तुम्ही लाहोर सोडून दूर जाऊ नये. तुमचे भाऊ नीच राक्षस आहेत. माझ्याच हातून त्यांचा वध होण्याची वेळ आली आहे..ते मला भेटायला

येताहेत.” मग पत्र अचानक पकडवलं. हे नाटकी “पकडलेलं” पत्र दरबारात सर्वांसमोर वाचण्याचं नाटक त्याने रचलं. औरंगजेब दरबारात आल्यावर मामाश्री शाहिस्तेखानाने ते पत्र वाचलं. औरंगजेबाने चेहरा फटफटीत पडल्याचं नाटक केलं. हातपाय आपटले आणि मी बादशहाला जाऊन भेटतो असं तो म्हणायला लागला तेव्हा दरबारातील सरदारांनी आपण जाऊ नये अशी गळ घातली. त्यावरून त्याने त्यांचीही परिक्षा करुन टाकली. दुसरं पत्र बादशहाला पाठवलं आणि त्यात लिहिलं, माझ्याविरुध्द फौज जमवण्यासाठी तुम्ही दाराला खेचरं भरुन सोन्याचे सिक्के पाठवलेत पण त्याला पकडून आणल्याशिवाय मीही स्वस्थ बसणार नाही. दाराचा पाडाव झाला की स्वत: अंत:पुराचे पडदे बाजूला करून आत येईन आणि तुमच्या हाती सत्ता सोपवीन..शहाजहाँ पूर्णपणे अटकेत पडला. शहाजहाँचा निकाल लागला.

आता दाराला पूर्णपणे संपवण्यासाठी मुरादबक्ष आणि औरंगजेबाच्या फौजा दिल्लीकडे चालायला लागल्या..

पुढचा अंक मुरादबक्ष बरोबरचा आणि त्याच्या अंताचा. ….

## शहजादा मुरादबक्षचा अंत.

मुरादबक्ष आणि औरंगजेब, यमुनेच्या काठाकाठाने दिल्लीकडे चालायला लागले. मुरादला बादशहा करायचं वचन औरंगजेबाला पूर्ण करायचं होतं. दोघांच्या फौजांमधे १ मैलाचं अंतर होतं. त्या प्रवासात दोघे मथुरेला पोचले. हिंदूंचं हे पवित्र तीर्थस्थान. लाहोरला पळून गेलेल्या दाराचे सैनिक ,त्या वाटेवर मुरादबक्षकडे चाकरीसाठी येत होते. मुरादबक्षही मोठ्या पगारांवर त्यांना ठेऊन घेत होता.. या प्रवासात औरंगजेब सतत मुरादकडे फळं, फुलं पाठवत

होता आणि तूच आता बादशहा हे त्याला सुचवत होता. मथुरेच्या अलिकडे ६ मैलांवर यमुनेच्या अलिकडे, काठी कोलीका घाट नावाचा एक घाट होता. ती जागा छावणीसाठी उत्तम होती. खूप मोठी प्रशस्त मोकळी भूमी होती. राज्याभिषेकाच्या सोहळ्याला उत्तम होती. या ठिकाणी ४ दिवस मुक्काम झाल्यावर औरंगजेबाने आपला मुलगा आणि मोठे अधिकारी यांच्याबरोबर निरोप पाठवला की, आजचा दिवस खूप छान दिवस आहे. तुम्ही माझ्या शामियानात या.... मला माझ्या हाताने तुमच्या मस्तकावर ताज ठेवून माझ्या जबाबदारीतून मुक्त व्हायचं आहे. मुरादबक्ष खूष झाला आणि लगेच औरंगजेबाकडे जायला निघाला तेव्हा त्याचा विश्वासू खोजा, शाहवाजने त्याला कळकळीने सूचना केली की तो तुम्हाला त्याच्या छावणीत का बोलावतो आहे ? त्याने तुमच्याकडे यायला हवं. म्हणून तुम्ही तब्येत बरी नाही आहे असं सांगून त्याच्याकडे जाणं टाळा. आजच्या ऐवजी उद्या जा आणि आज माहिती काढा. पण मुरादने ते ऐकलं नाही. शाहवाजला आणि इतर अधिकाऱ्यांना घेऊन तो औरंगजेबाच्या छावणीत गेला. वाटेत इब्राहिमखान सरदारानेही मुरादबक्षला औरंगजेबाकडे जाऊ नका असं सुचवलं. मुरादबक्ष औरंगजेबाच्या शामियानात शिरत असतांना काजी बाहेर पडत होता तो मुरादला हळूच म्हणाला, “ तुम्ही आत जाताय पण बाहेर पडणं तुमच्या हातात असणार नाही. ” तरीही मुरादबक्ष आत शिरला.

त्याबरोबर औरंगजेबाने त्याचं मोठ्या आदराने स्वागत करून त्याला उंच आसनावर बसवून सत्कार केला. मग गाणी बजावणी सुरु झाली. तोपर्यंत दुपार झाली. जेवणं सुरु झाली. मुरादचे अधिकारी आपल्या घोड्यांच्या

चाऱ्यासाठी निघून गेले. एकटा शाहवाझ मुरादच्या पाठीमागे उभा होता. औरंगजेबाचे सेवक मुरादचे मद्याचे पेले भरतच होते. मुरादबक्ष पीतच राहिला. औरंगजेब स्वत: पक्वान्नं वाढत होता. मग तो मुरादला म्हणाला की आता तुम्ही जरा झोप काढा. मी ज्योतिषाला विचारुन चांगला मुहूर्त काढतो आणि तुम्हाला उठवतो. म्हणून मुरादबक्ष झोपायला गेला. मुराद लगेच गाढ झोपला आणि शाहवाज खोजा त्याचे पाय चेपत होता. थोड्या वेळाने त्याला पांढरा सदरा, चोळणा, पांढरी टोपी घातलेला औरंगजेब शामियानाच्या एका दाराशी दिसला. त्याने शाहवाझला, काही सांगायचं आहे अशी खूण करुन आपल्याजवळ बोलावून घेतलं. शाहवाज काय हुकूम आहे असं विचारण्यासाठी पुढे झाला, इतक्यात ४ मल्लांनी त्याला बाहेर ओढलं, त्याचा गळा दाबून ठार केलं आणि त्याला पुरुनही टाकलं. शाहवाझ या विश्वासू खोजाला ठार केल्यावर औरंगजेबाने एका ८ वर्षाच्या मुलाला जवळ बोलावलं, आणि त्याला मौल्यवान दागिना दाखवत म्हटलं की हा जो तुझा काका झोपलाय ना त्याच्या कमरेची कट्यार काढून आणलीस तर मी तुला हे दिईन. मुलगा हो म्हणाला आणि त्याने मुरादच्या कमरेची कट्यार औरंगजेबाला आणून दिली. याचा अर्थ मुराद गाढ झोपेत होता.. तो जागा झाला असता तर लहान मुलाचा खोडकरपणा असं सांगायचं औरंगजेबाने ठरवलं होतं. पण ती वेळ आली नाही. मग त्याने दबा धरुन बसलेल्या गुंडांना बोलावून मुरादच्या पायात बेड्या घातल्या. मुरादला जाग आली तेव्हा त्याला सत्याचा दारूण अनुभव आला. मग औरंगजेबाने सैन्याला मंगल वाद्यं वाजवायचा हुकूम दिला. त्यामुळे शामियानात राज्याभिषेक चालू आहे असं समजून मुरादबक्षची सर्व फौज दूर गेली.

संध्याकाळी ६ वाजता औरंगजेबाच्या शामियानातून दोन पडदे लावलेले हत्ती बाहेर पडले. एक हत्ती आग्र्याकडे गेला आणि दुसरा दिल्लीकडे. आत कोण आहे ते कुणालाही कळलं नाही. रात्र झाल्यामुळे मुरादबक्षच्या फौजेने बंड करणं शक्य नव्हतं, आणि दुपारच्या मेजवानीच्या निमित्ताने मुरादबक्षचे अधिकारीही मुरादपासून दूर गेले होते. दोन हत्ती बाहेर पडतांना पाहिल्यावर मात्र मुरादचे अधिकारी चमकले. काहीतरी घातपात आहे हे लगेच त्यांच्या लक्षात आलं. इतक्यात औरंगजेब चिरायू होवो, सर्व सैन्याने आता औरंगजेबाच्या फौजेत चाकरी घ्यावी, अशी घोषणा सर्वांना ऐकू यायला लागली.. मुरादबक्षच्या बायकामुलांना दिल्लीला पाठवण्यात आलं. दिल्लीला पोचल्यावर मुरादबक्षला लगेच सलीमगढला न्यावं असं औरंगजेबाने सांगून ठेवलं होतं. अत्यंत केविलावाण्या चेहऱ्याने मुरादने दिल्लीत प्रवेश केला. सलिमगढला नेऊन मुरादला शुध्द जाईपर्यंत अफूचं पाणी पाजण्यात आलं. रोज पाणी पाजून त्याला नैसर्गिक मृत्यू आला असं औरंगजेबाला दाखवायचं होतं. पण ते जमलं नाही. मग मुरादबक्षला ग्वाल्हेरच्या किल्ल्यात हलवलं. म्हणून आता त्याने दुसरा मार्ग शोधला. मुरादबक्षने एका चिटणीसाला मारलं होतं, त्याच्या गरीब नातेवाईकांना भरपूर पैसे देऊन बोलवून आणलं. फिर्याद करवली मग काजीने प्राणाला प्राण ही शिक्षा सुनावली. औरंगजेबाने ग्वाल्हेरच्या तुरुंगात असलेल्या मुरादबक्षचं, दोन गुलाम पाठवून त्याचं शीर उडवून ठार केलं. पाठोपाठ फिर्याद करणारा चिटणीसाचा नातेवाईक आणि गर्दन उडवणाराही बेपत्ता झाले. मुरादचा विश्वासू खोजा शाहवाज याच्या नावाने एक माणूस औरंगजेबाने बंगालमधे पाठवला. तो तिथे मुरादचा खोजा म्हणून वावरला आणि मग त्याला काबूलला पाठवलं. मग त्याचं काय झालं ? कुणालाच माहीत

नाही पण लोकांच्या मते शाहवाज लोकांनी बंगालमधे पाहिला होता.. तो जीवंत होता...

औरंगजेबाच्या सत्ताग्रहणाचा इथे तिसरा अंक संपला.

## शहजादा दारा शुको आणि शाहशुजा.

आपला सत्तेमार्ग मोकळा करण्यातले दोन अडथळे औरंगजेबासाठी अजून शिल्लक होते. ते म्हणजे लाहोरला पळून गेलेला दारा शुको आणि शाहशूजा. दैवाचे कठोर फेरे, दुर्दैव, राजाचा रंक होणे, सगळया शब्दांना पुरून उरेल एवढा छळ दाराने अनुभवला. औरंगजेबाबरोबर उज्जयनीला पराभूत झालेला दारा शुको, लाहोरला पोचला. तिथून औरंगजेबाच्या फौजा पाठलाग करत आल्यावर दारा मुलतानवर गेला. मग भक्करला पळाला सिंधू नदीच्या पात्रातील या बेटावर किल्ला होता, त्यात राहिला. औरंगजेब मागावर होताच. लांडगा मागे लागावा, तसा दारा पुढे आणि औरंगजेब मागे हा अभागी खेळ चालूच राहिला. दारा कंदाहार-ठठ्ठा-कच्छ-अहमदाबादवर असतांना औरंगजेबाला बातमी मिळते की शाहशूजा बंगालहून निघाला आहे आणि आग्र्याकडे येतोय.. मग दाराचा पाठलाग सोडून औरंगजेब शाहशूजवर गेला.

शाहशूजाच्या पाठलागावर असतांना बादशहाने आपला मुलगा सुलतान महंमदला शाहशूजावर पाठवलं पण हा मुलगाच काकाला जाऊन मिळाला. ते त्याचं दुर्दैव.. औरंगजेबाच्या सरदारांनी सुलतान महंमदला पकडून ग्वाल्हेरच्या किल्ल्यात ठेवल्यावर त्याला वेड लागेपर्यंत अफूचं पाणी पाजण्याचा हुकूम मिळाला. तिथेच मुरादबक्षही होताच. इकडे दाराही अहमदाबादेतून मोठी फौज जमवून आग्र्याकडे निघाला ही बातमी आल्यावर

औरंगजेब त्याच्याशी लढायला बाहेर पडला आणि अजमेरला दोघांची गाठ पडली. लढाईच्या आदल्या दिवशी ज्योतिषाने खाजगी रितीने औरंगजेबाला कळवलं की प्रमुख स्थानी जो असेल त्याच्या जीवाला धोका आहे. म्हणून लढाईच्या दिवशी छत्र असलेल्या हत्तीवर औरंगजेबाचा गुरु शेखमीरा हा आपल्या शिष्यासाठी हत्तीवर बसला. भविष्य खरं झालं. शेख मीरा गोळी लागून ठार झाला आणि औरंगजेब वाचला. दाराचा पराभव झाला. परत तो सिंध भक्कर करत पळत राहिला शेवटीस पर्शियाच्या सीमेवर जीवनखान नावाच्या सरदाराचा मुलुख होता. तो औरंगजेबाला सामील झाला आणि त्याने दाराला पकडून दिलं. त्यावेळी दाराची पत्नी नूरमहल हिने आपलं भविष्य ओळखून विष पिऊन आयुष्य संपवलं. तिच्या मृत्यूने शोकाकूल झालेल्या दारा शुकोला तिथेच कैद करण्यात आलं. त्याची सुंदर मुलगी जानि बेगम हिलाही कैद केलं.

४० दिवसांनी दाराला दिल्लीत आणलं. दाराला दिल्लीत आणून त्याची मिरवणूक काढण्यात आली. अभागी हताश मळलेला, दारा ऑक्टोबर २२, १६५९ या दिवशी खिन्नपणे चालला होता. लोक बघायला उभे होते. मग दाराला राजवाड्यासमोर उन्हात २ तास उभं करण्यात आलं. दाराचा शिरच्छेद करण्यापूर्वी औरंगजेबाने त्याला विचारलं की तुझ्या जागी मी असतो तर तू माझ्याशी कसा वागला असतास ? दारा म्हणाला, तुझ्या देहाचे चार तुकडे करू चार दिशांना फेकले असते. दाराला गुप्तपणे मारण्यासाठी औरंगजेबाने नझरबेगबरोबर माणसं पाठवली. रात्री ७ वाजता, खिजराबागेत दाराचं शीर उडवलं गेलं. शरीर तिथेच टाकून मुंडकं औरंगजेबासमोर आणण्यात आलं. त्याच्यावरचं रक्त पुसून बागेत फिरत असलेल्या औरंगजेबासमोर थाळीत घालून

आणलं. त्याच्यावरच्या जखमेच्या खुणा तपासून तोच चेहरा हे नक्की केल्यावर औरंगजेबाने आपल्या तलवारीने या मुंडक्यावर तीन टोचे मारले. ते मुंडकं शहाजहाँकडे पाठवण्यात आलं. दुसरे दिवशी या नझरबेगला भर दरबारात मारण्याचा गुप्त हुकूम मक्बुल नावाच्या गुलामाला दिला. नझरबेगचा खून झाल्यावर आपल्याला हे अचानक पाहायला मिळतंय असं भासवून पहारेकऱ्यांना मक्बुलला मारायचा हुकूम दिला. सगळं कारस्थान पुराव्यालाही उरलं नाही. त्या रात्री रोशनआराने विजयानिमित्त जंगी खाना सर्वांना दिला. एवढं करुन औरंगजेब थांबला नाही. आपण दाराला ग्वेल्हेरच्या किल्ल्यात ठेवलंय असं लोकांना वाटावं म्हणून घोडेस्वार, भांडीकुंडी सगळा लवाजमा वरातीने दिल्लीबाहेर पाठवला. मग औरंगजेबाने दाराच्या बेगमना आपल्याशी लग्न करण्याचा निरोप पाठवला. दाराची सुंदर मुलगी जानी बेगम हिला आग्र्याला बापाकडे पाठवलं. दाराची बेगम रानादिल हिला निरोप पाठवून आपल्याशी लग्न करायचा हुकूम दिला. रानादिल ही साधी नर्तिका होती पण दारा तिच्या प्रेमात पडला आणि तिच्याशी लग्न केलं होतं. . रानादिलने औरंगजेबाचा प्रस्ताव नाकारला. माझ्यावर तुम्ही का मोहित झाला आहात असं तिने विचारलं तर औरंगजेब म्हणाला की तुझे केस मला फार आवडतात.. मग रानादिलने आपले केस कापून त्याच्याकडे पाठवले. मग औरंगजेबाने तिचा चेहरा आवडतो असा निरोप पाठवल्यावर तिने चेहऱ्यावर सपासप वार करुन जखमी झालेल्या चेहऱ्यावरचं रक्त त्याला पाठवलं. नाईलाजाने बादशहाने तिचा नाद सोडला. दाराची दुसरी पत्नी उदेपुरी ही जॉर्जियन वंशाची होती तिने मात्र औरंगजेबाशी लग्न केलं. तिचा मुलगा कामबक्ष.

शाहशूजा आणि त्याच्या कुटुंबाचाही शेवट दुर्दैवीच ठरला. औरंगजेबाने मीर जुमला या सरदाराला आणि आपला शहजादा सुलतान महंमदला शाहशूजावर अहमदाबादला पाठवलं.. शाहशूजा तिथून निसटला आणि सरकत राजमहेंद्री, मग चितगाव (पूर्व बंगाल ) वरुन अरकानला पोचला. तिथल्या राजाने त्याला आसरा दिला. पर्शियाला जाण्यासाठी शाहशूजाला बोटी मिळवून द्यायचं वचन दिलं. शाहशुजाची दौलत पाहून तो नावा मिळवून देईना. उलट त्याने शाहशुजाच्या मुलीची मागणी केली आणि शाहशुजाला अटक करण्याचं कारस्थान रचलं. अरकानच्या राजाच्या फौजांनी शाहशूजावर हल्ला केला. त्याच्या मुलाला पकडलं. त्याचा जनाना आपल्या जवळ आणला. शाहशूजा जंगलात पळून गेला आणि अनेक रत्नं त्याने अरकानी फौजेला पळवून लावायला वाटेत टाकली पण तरीही शाहशूजा पकडला गेला आणि मारला गेला. शाहशूजाच्या बायकांना राजाच्या जनानखान्यातील स्त्रियांनी आपल्याबरोबर राहू दिलं नाही. त्यामुळे राजाने त्याना हाकलून दिलं. त्यांचा शेवटी दारोदार भटकून आश्रय शोधण्यात त्यांचं आयुष्य संपलं. चितगावमधल्या डच माणसाने ही बातमी औरंगजेबाला कळवली.

सर्व भाईबंद आणि त्यांच्या पुढच्या पिढीला संपवून औरंगजेब सत्तेवर आला. जून १६५८ ला त्याने राज्याभिषेक करुन घेतला. ९ दिवसांचा उत्सव, जशन करण्याची परवानगी त्याने दिली. बादशहा हा किताब घेतला. आपल्या नावाने सोन्याची नाणी पाडली. कफनी घातलेला शहजादा बादशहा झाला आणि राजवस्त्रे घालणारे शहजादे आणि त्याचे पुत्रही काळाच्या पडद्याआड गेले.

अशा या बादशहाच्या पिंजऱ्यातून महाराज सुटले, कसे सुटले असतील....? किती चित्तथरारक असेल त्यांची योजना... त्यांच्यानंतर शंभूराजांनी राज्य राखलं, ताराराणीने रामचंद्रपंत अमात्य, परशुरामपंत प्रतिनिधींच्या मदतीने औरंगजेबाला स्वराज्य मिळू दिलं नाही.. केवढं पराक्रमी राजघराणं. किती शूर असतील हे मराठे संताजी, धनाजी, कितीतरी वीर...पण नियती आपल्या बाजूने नव्हती. हे सगळे वीर, बाजीराव माधवरावांपर्यंत सगळे अल्पायुषी का होते? आणि औरंगजेब मात्र ८७ वर्षे जगला.... हे सगळं वाचल्यावर एक प्रश्न मनात उभा राहतो...आपल्या रक्ताच्या भाऊबंदांना, संभाजी महाराजांना क्रूरपणे वागवणारा हा आलमगीर औरंगजेब, आमच्या शंभूराजांचं ७ वर्षाचं पाडस, हुकूमाचा एक्का शाहूराजे आणि महाराणी येसूबाई यांना जीवंत ठेवतो. नव्हे २५ वर्षे जवळ बाळगतो..असं का ? त्याचं काही उत्तर नाही.

**ss....ss.....ss....s....ss....ss.....ss....ss.....ss**

# शिवरायांचा आग्रा ते राजगड प्रवास...

# १२ मे ते २० नोव्हेंबर. १६६६.



उत्तरेत शाहजहाँ आणि दक्षिणेत शहाजी हा खेळ त्यांच्या पुढच्या पिढीतही चालू राहिला. समशेर आणि समरांगणावरचा खेळ रंगला तो औरंगजेब आणि शिवरायांमधे. दिल्लीचं तख्त औरंगजेबाच्या हाती आलं तेव्हा १६४५ सालात महाराष्ट्रात रोहिडेश्वरावर १५ वर्षांचा एक शिवबा भोसले नावाचा एक तरुण आपल्या साथीदारांसह स्वराज्य निर्मितीची शपथ घेत होता. शहाजीराजांचा हा युवराज त्यांच्या एका चाकण सुपे या छोट्या जहागिरीचं महान राष्ट्रात रुपांतर करण्याचं स्वप्न सत्यात आणण्याचं नियोजन करत होता. आपला शत्रू कोण आणि किती बलाढ्य आहे याचा अंदाजही त्या युवकाला नव्हता. पण यवनाने चालवलेला हिंदूंचा छळ बंद करणं आणि स्त्रियांचं संरक्षण करणं हेच त्याचं ध्येय होतं. आणि मग त्यानंतरचं त्यांचं आयुष्य त्या पाताळयंत्री औरंगजेब बादशहाचं नाक कापण्यात गेलं. आनंदभुवनी राहणारे साधूसंत, प्रजा, स्त्रिया, रयत सुखाने नांदू लागली. सर्वच प्रसंगधाडसाने भरलेल्या त्यांच्या

आयुष्यातील एक अत्यंत चित्तहर्षक प्रसंग म्हणजे आग्र्याला औरंगजेबाच्या दरबारात त्यांना झालेली अटक आणि त्यातून त्यांनी करुन घेतलेली सुटका.

साहसी, धाडसी, चित्तथरारक हे शब्द अपुरे पडतील असा आग्र्यापासून प्रवास करुन महाराज औरंगजेबाच्या मरणमिठीतून सुखरुप परत आले. शाहिस्तेखानाची बोटं छाटणाऱ्या महाराजांनी औरंगजेबाचं तर नाकच कापलं. तो क्रूर, कारस्थानी, कुटील, दुष्ट, औरंगजेब, ज्याने आपल्या बापाला कैदेत टाकलं, विष देऊन मारायचा प्रयत्न केला, आपल्या तीन भावांना संपवलं, पुतण्यांना ठार केलं आणि मुलांनाही कैदेत ठेवण्याचं क्रूरकर्म केलं, त्या बादशहाने कैदेत ठेवल्यावरही, क्षणभरही न खचता, अत्यंत नियोजनबध्द, अचूक, पावलापावलाचा आणि क्षणाक्षणाचा हिशेब ठेवत आपली सुटका करुन घेतली. अशक्य ते शक्य करुन दाखवलं. औरंगजेबाच्या दरबारातील अपमानास्पद प्रसंगानंतर १२ मे या दिवशी त्या रहस्यमय थरार नाट्याला महाराजांनी सुरुवात केली. त्या नाटकाचे सूत्रधार तेच, सर्व अंक त्यांनीच आखले, त्यांनीच अंमलात आणले, त्यांनीच शेवटचा हृदयस्पर्शी प्रसंग लिहिला. त्यांना साथ मिळाली त्यांच्यासारख्याच शूरांची, निधड्या छातीच्या साथीदारांची. आपल्या प्रतिस्पर्धी खलनायकाची नाचक्की करण्याची ही घटना ऐतिहासिक ठरवली.

२५ मे या दिवशी आग्र्याचा कोतवाल फौलादखान याने बादशहाच्या हुकूमावरुन महाराजांच्या शिबिराभोवती ५००० सैनिकांचा कडक पहारा बसवला. आता तर महाराजांच्या सुटकेची शक्यताही मावळली. शाहिस्तेखानाच्या बायकोने, या सैतानास कडक शिक्षा करा असा अर्ज

बादशहाला केला आणि जनानखान्यातील स्त्रियांनी तिला साथ दिली. औरंगजेबाला पुढे काय करायचं ते कळेना, पण त्याने महाराजांना एकांतवासात ठेवण्यासाठी, फिदाई हुसेन याला नवीन वाडा बांधण्याचा हुकूम सोडला. इकडे महाराजांनी निराजी रावजी आणि बाळाजी आवजी चिटणीस यांच्या मार्फत बादशहाचा फडणीस राहुल्लाखान याच्याकडे संधान बांधून, महाराज देशी असतांना गुरुवारचा उपास करत असत आणि दानधर्म करत असत त्यास इथेही दानधर्म करण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केली. दुसरीकडे, आपल्याबरोबर आलेल्या लोकांना देशी परत पाठवून बादशहाच्या तिजोरीवरचा खर्च कमी करण्याचा आपला विचार आहे, त्यास परवानगी मिळावी असा बादशहाला अर्ज केला. या अर्जाला बादशहाने अत्यंत आनंदाने परवानगी दिली. महाराजांना एकटं पाडणं हे त्याला हवंच होतं. महाराजांचे गुरुवारचे उपास आणि मेवामिठाईचा पेटारे भरून दानधर्म सुरु झाला. मग महाराजांनी प्रतापराव गुजरास आपली फौज घेऊन परतण्यास सांगितलं. तो इमानी योध्दा महाराजांना सोडून जायला तयार होईना पण महाराजांनी समजूत घातल्यावर सर्व फौजेसह निघाला आणि आग्र्यातच सर्वजण वेगवेगळ्या वेषात राहून मिसळून गेले. (तेच असतील का नंतर मिठाईचे पेटारे वाहणारे शिपाई मावळे?) प्रत्येक गुरुवारी महाराजांनी सर्व मुसलमान, हिंदू, मोठ्या सरदारापासून लहान सरदारापर्यंत सर्वांना आणि त्यांच्यावर नजर ठेवलेल्या सर्व फौजेला मिठाई, फळफळावळ पोचवायला सुरुवात केली. त्यांच्या या दानधर्माने, अशा थोर दानशूर माणसाला कैद केल्याची नाराजी सर्व रजपूतांमधे पसरली. हे घडत असतांना, महाराजांकडील पत्रे घेऊन जाणारे कासीद तोंडी वेगळाच निरोप घेऊन पुण्यात जात होते. त्यामुळे महाराज कैदेत पडल्याची बातमी

जिजाऊसाहेबांना, समस्त दरबारी मंत्रीमंडळाला मिळाली. (महाराजांचा उजवा हात बहिर्जी नाईक पोचला असेल का आग्र्याला ?)

महाराजांबद्दल सरदारांमधे चांगलं मत तयार व्हायला लागलं ते बादशहाला धोक्याचं वाटायला लागलं. तेव्हा बादशहाने त्यांना श्रावण वद्य तृतिया, १८ ऑगस्टला नवीन वाड्यात कैदेत ठेवायचा गुप्त हुकूम फिदाई खानला दिला. ही खबर रामसिंगने महत्प्रयासाने आदल्या दिवशी महाराजांना पोचवली. याआधीच महाराज “वरचेवर आजारी” पडू लागले होते. त्यांना तपासण्यासाठी बादशहाचे हकीम ये जा करु लागले होते. महाराजांच्या मिठाईच्या पेटाऱ्यांची रोज काटेकोर तपासणी सुरुवातीला होत असे. त्यावरुन महाराजांनी फडणीस राहुल्लाखानकडे तक्रारही केली होती. तपासणी करणारांनाही रोज फळफळावळ आणि मिठाई मिळत होती, त्यांनाही महाराजांच्या औदार्याची साक्ष पटली होती. त्यामुळे तपासणीत ढिलाई आली होती. रामसिंगाकडून निरोप मिळताच त्याच रात्री दोन पेटारे मागवण्यात आले. हिरोजी फर्जंद महाराजांच्या मंचकावर त्यांनी भेट दिलेली अंगठी घालून आजारी म्हणून झोपला. मदारी मेहेतर “खूप आजारी” महाराजांचे पाय दाबत बसला. महाराज संध्याकाळी पसार झाले. दुसरे दिवशी दुपारपर्यंत काही गडब्रड झाली नाही कारण प्रत्येक पहारेकरी मदारीला पाय चेपतांना बघून जात होता. मात्र बादशहाच्या गुप्तहेराने शिवाजी पसार झालाय ही बातमी आणली. कोतवालाने ती नाकारली. शिवाजी झोपलाय असं सांगितलं. ३ वेळा असं घडलं. तेव्हा मात्र फौलादखान स्वत: बातमीची शहानिशा करायला गेला. महाराज खरंच पसार झाले होते. फौलादखानाच्या पायाखालची जमीन सरकली. शिवाजी भोकातून

निसटू शकतो, जनावराचे रुप घेऊ शकतो, १२ हात लांब उडी मारू शकतो हे सर्व महाराजांबद्दल ऐकलेलं त्याने बादशहाला सांगितलं. पण औरंगजेबाने त्याकडे लक्ष दिलं नाही. शिवाजी आपल्या देखत निसटला ही मोठी बेअब्रू झाली होती.

१७ ऑगस्टच्या अंधाऱ्या रात्री महाराज आणि शंभूराजे ३ मैलांवर, बाळाजी आवजी, तानाजी मालुसरे, निराजी रावजी घोडी घेऊन तयार होते तिथे पोचले. त्यांचे पेटारे वाहणारे दक्षिणीच होते. त्यांना भरपूर पैसे देऊन महाराजांनी मोकळं केलं. मग महाराज आणि त्यांचे लोक यमुना पार करून सतत ४२ मैल प्रवास करुन आडवाटेने मथुरेत पोचले. मथुरेत श्रावण वद्य अष्टमीचा, गोकुळाष्टमीचा उत्सव चालू होता. तिथे महाराजांनी साधूचं रुप घेतलं. सर्व केस काढून टाकले. अंगाला राख फासली. भगवी वस्त्रं परिधान केली. गोकुळाष्टमीच्या उत्सवाला आलेल्या अनेक यात्रेकरी साधूंमधे ते मिसळून गेले. तिथे मोरोपंत पिंगळयांचे मेहुणे कृष्णाजी त्रिमल "अचानक" त्यांना मेटले. मथुरेत समर्थ रामदासांचा मठ होता. मोरोपंत पिंगळे समर्थांचे भक्त होते. कृष्णाजी त्रिमल यांच्याकडे आपला बहिश्वर प्राण, ९ वर्षांच्या संभाजीराजांना सोपवून, त्यांना भरपूर पैसा देऊन, स्वत:च्या हस्ताक्षराचं पत्र येईपर्यंत युवराजांना सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवून महाराज मोकळे झाले.

मग महाराज परतीच्या प्रवासाला लागले. त्या भागाचे जाणकार, कृष्णाजी त्रिमल वाटाडे म्हणून त्यांच्याबरोबर राहिले. एकदा यमुनेत स्नानासाठी गेलेले असतांना त्या घाटाची दुर्दशा पाहून महाराजांनी कृष्णाजी त्रिमल यांना घाट बांधायला किती खर्च येईल असं विचारलं. ते एका चौबे ब्राह्मणाने ऐकलं

आणि तो कृष्णाजींना म्हणाला की फकिराकडे धन नसतांनाही तो खर्चाची चौकशी कसा करतो म्हणजे तो खरा साधू नसावा. लगेच कृष्णाजींनी त्याच्या कानात काहीतरी सांगितलं. त्याला मथुरेचा क्षेत्रोपाध्या केलं आणि सगळे तिथून निघाले. मथुरेत राहणं आता धोक्याचं होतं कारण महाराजांना पकडून देणाराला मोठं इनाम जाहीर झालं होतं. निराजी रावजींना अनेक भाषा येत म्हणून त्यांना आपला महंत बनवून सर्वजण प्रयागला आले. पायातील जोड्यात, एकतारीच्या दांड्यात, हातातील पोकळ काठ्यात, अंगावरच्या वस्रात, अगणित मौल्यवान रत्ने, हिरे, पाचू, सोनं लपवून सर्वजण प्रयागहून काशीला आले. पण तिथे एक गडबड झाली.

पहाटे सर्वजण गंगेवर स्नानाला गेले असतांना तिथे स्नानाला आलेल्या नामाजी नावाच्या एका माणसाला घाटावर काहीतरी गडबड उडालेली दिसली. आग्र्यातून शिवाजी नावाचा राजा फरार झाला असून जो त्याला पकडून देईल त्यांना मोठं इनाम बादशहाकडून मिळेल असं काही लोक ओरडून सांगत होते. इतक्यात नामाजीजवळ एक गोसावी आला आणि त्यांच्या हातात काहीतरी देऊन, पाण्यात उभा राहिला. मला स्नानाचा मंत्र सांगा म्हणाला. नामाजी ती गडबड पहाण्यास वळला आणि इकडे तो गोसावी नाहीसा झाला. नामाजीही घाबरुन आपल्या गावी परतला. सुरतेला घरी आल्यावर त्या गोसाव्याने काय दिलं ते बघितलं, तेव्हा त्याला ९ हिरे, ९ रत्ने, ९ मोहरा, ९ होन मिळाले होते. एवढ्या अचानक लाभावर घर बांधून नामाजी सुखात राहिला. महाराजांचा सर्व प्रवास आडमार्गाने, जंगलातून काट्याकुट्यातून, नद्यानाले पार करत अखंड चालत, चालू होता.

गयेला पोचल्यावर परत महाराजांच्या काही गोसाव्यांना तिथल्या सुभेदाराने शिवाजी मिळाला म्हणून पकडलं. त्या रात्री महाराज स्वत: गोसावी रुपात सुभेदाराला भेटायला गेले, त्याच्यासमोर अत्यंत मौल्यवान हिरे ठेवत म्हणाले, बादशहाच्या बक्षिसापेक्षा हे दोन हिरे घ्या आणि त्या बिचाऱ्या पापभिरु साधूंना सोडा. सुभेदाराला हिऱ्यांचा मोह पडला. त्याने सर्वांना सोडून टाकलं. पुढे कटकास आले. तिथे जे थकतील त्यांच्यासाठी एकादं छोटं घोडं घ्यावं म्हणून त्यांनी एक घोडं खरेदी केलं. आणि चुकून चांदीच्या नाण्याऐवजी सोन्याचं नाणं दिलं. तेव्हा तो घोड्याचा मालक त्यांना म्हणाला की तुम्ही खरे गोसावी नाही आहात. आम्ही ऐकलंय त्याप्रमाणे तुम्ही बहुतेक शिवाजीच असाल. त्याक्षणी महाराजांनी सोन्याची थैली त्या मालकाला दिली आणि तिथून निघाले. महाराज कटक वरुन जगन्नाथाचं दर्शन घेऊन, गोंडवनातून चांद्यास आले. नंतर पैनगंगा नदी पार केली. तिथून महाराज गोदावरी नदीच्या काठावर कडेवळीत प्रांतातील कोडोली गावी आले. महाराज ज्या ज्या मार्गाने प्रवास आणि मुक्काम करत होते त्या सर्व ठिकाणी रामदास स्वामींचे मठ होते.

कोडोली नावाच्या गावात सर्वजण रात्री मुक्कामाला आले. तिथल्या पाटलाने सर्व गोसाव्यांना गोठ्यात जागा करुन दिली. त्या सर्व गोसाव्यांना पाटलाची आई सांगू लागली की दोन दिवसांपूर्वी आनंदराव तेलंगराव नावाच्या सरदाराने सर्व गाव लुटलं. त्यामुळे या सर्व पुण्यपुरुषांना देण्यासाठी तिच्याकडे काहीही राहिलं नाही आहे. शिवाजी राजाचे ते सरदार होते. ज्या राजाचे लोक असं जनतेला लुटतात त्याला बादशहाने कैद केलंय असं कळलंय. बादशहाने त्या राजाला तसंच अडकवून ठेवावं. महाराजांनी त्या बाईचं नाव लिहून घेतलं.

मग मुघली मुलूख टाळत, भागानगर – विजापूर – गोकर्ण महाबळेश्वर – सह्याद्री मार्गाने २० नोव्हेंबर १६६६या दिवशी राजगडावर पोचले.

राजगडावर पहारेकऱ्याने सर्व गोसाव्यांना अडवलं. तो जिजाऊसाहेबांच्या परवानगीसाठी गेला. जिजाऊसाहेबांच्या संमतीने सर्वांना आत घेतलं. त्यांची उत्तम व्यवस्था ठेवली. या गोसाव्यांच्या भजनाने गडावरचे श्रोते खूष झाले. जिजाऊंनी गोसाव्यांच्या भजनाची चौकशी केली म्हणून दुसरे दिवशी जिजाऊसाहेबांसमोर भजनाचा कार्यक्रम ठेवला. निराजी रावजी महंतांच्या समवेत भजनं सुरु झाली. शिपायांचा गराडा भोवतालने पडलेलाच होता. त्यांचं बारीक लक्ष सर्व गोसाव्यांवर होतं. महाराजही त्या भजनी मंडळात होते. माँसाहेब समोर येऊन बसल्या. भजनं सुरु झाली. जिजाऊंना पाहताच महाराजांना धीर धरवेना. ते ऊठले. लहान मुलाच्या ओढीने माऊलीच्या चरणावर मस्तक ठेवलं. मातोश्री त्या गोसाव्याला म्हणाल्या, “हे काय केले?” तेव्हा निराजी रावजी माँसाहेबांना म्हणाले, “ये आपका बेटा हैं. पहचानते नही हो क्या?” मग महाराजांनी डोक्यावरचं वस्त्र काढून आपली खूण मातोश्रींना दाखवली.


दोघांच्या अश्रूंचा बांध फुटला. मातोश्रींनी आपल्या वीर पुत्राला मिठीत घेतलं. त्याक्षणी त्या माय होत्या आणि महाराज त्यांचं लेकरू होतं. काय तो अवर्णनीय क्षण असेल. सरस्वतीकडीलही शब्द अपुरे पडतील. इतिहास फक्त होता त्या सोहळ्याच्या साक्षीला. प्रतिकूल प्रवाहाविरुध्द पोहणं म्हणजेच तर शूराचं प्राक्तन. तेच तर क्षत्रियाचं लेणं. माऊलीचे डोळे शंभूबाळाला शोधू लागले. तो दिसला नाही. जिजाऊंनी काळजीच्या स्वरात महाराजांना विचारलं. महाराजांनी दु:खी चेहऱ्याने शंभूबाळ या जगात राहिला नाही असं सर्वांना ऐकू

जाईल अशा आवाजात सांगितलं. ३० वर्षे राज्यकारभार समर्थपणे सांभाळणाऱ्या त्या माऊलीला त्याचा लगेच अर्थ कळला. हीच बातमी सर्वत्र पसरायला हवी होती. वीर बापाचा वीर पुत्र, जसे शहाजींचे शिवबा, तसे शिवबांचे शंभुराजे. धाडस, साहस, यांच्या काटेरी पायघड्यांवरुन चालण्याचे धडे ते ९व्या वर्षीच गिरवायला लागले. दूर कुठेतरी अनोळखी लोकांच्या सहवासात काही दिवस राहिले. सर्व स्थिरस्थावर झाल्यावर महाराजांनी त्यांना आपल्याकडे आणलं.

महाराज मृत्यूच्या दाढेतून सुखरुप गडावर पोचल्याची वार्ता सुगंधी वाऱ्यासारखी पसरली. तोफा सुटल्या. त्यांनीही दूरवर संदेश पोचवला. साऱ्या महाराष्ट्राला वाऱ्यानेच वेगाने बातमी दिली. आनंदी आनंद झाला. याच राजगडावरुन ५ मार्च १६६६ या दिवशी, महाराज मोठ्या ऐश्वर्यात, थाटात, लवाजमा घेऊन आग्र्याच्या दिशेने निघाले होते, ते १७ ऑगस्टला अंधाऱ्या रात्रीत, कराल पहारेकऱ्यांच्या वेढ्यातून सुटून, मार्गशीर्ष शु.५ ला ९ महिन्यांनी, हजारो मैलांचा प्रवास करत, संकटांना पार करत मातोश्रींच्या चरणी झुकले होते. धन्य ती माता-धन्य तो पुत्र. महाराजांनी मग आपल्या समवेत प्राण देण्याला साथ करणारांचा सन्मान केला. हिरोजी फर्जंद याला रायगडची हवालदारी दिली. मदारी मेहेतर यांस सिंहासनाच्या पूजेचं सर्व उत्पन्न त्याच्याकडे द्यावं अशी आज्ञा केली. स्वत: निखाऱ्यांवरुन चालत, मावळयांच्या मनगटातील जोर वाढवणारा हा असा कर्मयोगी युगपुरु ष महाराष्ट्राला मिळाला हे केवढं आपलं भाग्य....

ss....ss....ss....ss.....ss....ss....ss....ss

# येसूबाई राणी.




शिवरायांच्या स्वराज्याच्या सीमा विस्तारत चालल्या होत्या. दुसरीकडे शिवप्रभूंचा संसारही वाढत होता. जिजाऊ मासाहेबांची साथ चिरंजीवांचा कारभार आणि संसार दोन्हीकडे होती, वचक सर्वत्रच होता आणि आधारही दोन्हीकडे होता. म्हणूनच महाराज मोठमोठी आव्हानं पेलू शकत होते. महाराजांचा राणीवसाही मोठा होत चालला होता. थोरली राणी सईबाईंच्या पोटी इ. स. १६५७ च्या मे महिन्यामधे एक गोंडस पुत्ररत्नही जन्मलं. शिवरायांच्या दिवंगत झालेल्या मोठ्या बंधूंचं नाव त्यांना ठेवण्यात आलं. संभाजी. पण हे बाळ अवघ्या तिसऱ्या वर्षी मातृसुखाला पारखं झालं. मग ज्या हातांनी शिवरायांच्या पाठीवरुन हात फिरवला, तेच जिजाऊसाहेबांचे हात आता नातवाच्या पाठीवरुन फिरु लागले. शंभूराजे आजीच्या देखरेखीखाली मोठे होऊ लागले. शंभूराजांच्या वयाच्या १० व्या वर्षी महाराजांनी तालेवार सरदार निंबाळकर यांच्या घरातील कन्या संभाजीराजांसाठी वधू म्हणून घरात आणली. येसूराणी या नावाने या सुलक्षणी,

शालीन कन्येने आपल्या गृहप्रवेशाने आनंद आणला. स्वराज्यात आणि घरात घडणाऱ्या प्रत्येक लहान मोठ्या घटनेच्या त्या साक्षीदार बनत चालल्या.

भारत वर्षाच्या सुपीक मातीत वीर पुरुषांचं जसं अमाप पीक उभं राहिलं तसंच वीरकन्यांचा सुकाळ कमी नव्हता. दिल्ली सल्तनतीमधली रझिया सुलतान, अकबर सम्राटाशी टक्कर देणारी चांदबिबी, इंग्रजांशी झुंजणारी आणि वीरगतीला मिळालेली झांशीची राणी लक्ष्मीबाई, कित्तूरची राणी चिन्नम्मा. वोडियार घराण्याची परत स्थापना व्हावी म्हणून प्रयत्न करणारी राणी देवजम्मा, मदुरेची राणी, आणि महाराष्ट्राच्या सुना, जिजाबाई-सईबाई-सोयराबाई-येसूबाई-ताराराणी-जिजाबाई कोल्हापूरच्या...अशा कितीतरी स्त्रिया या मातीत आपली पावलं उमटवून गेल्या.

भोसले घराण्यातील मालोजीरावांपासून हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेचं बीज रुजलं. शहाजीराजांनी त्याचं रोपात रुपांतर केलं. शिवाजी महाराजांनी त्याचा विशाल कल्पवृक्ष घडवला. त्यावेळी, मुघल दरबारचे मातब्बर सरदार, सिंदखेडचे लखूजी जाधव यांची कन्या जिजाई, भोसले घराण्यातील पहिली सून, त्या शहाजीराजांशी लग्नगाठ बांधून भोसल्यांच्या घराण्यात आल्या. त्यांच्यामुळे शिवरायांसारखा प्रत्यक्ष शिवाचा अवतार शिवनेरीवर जन्माला आला.

शिवबा १० वर्षांचे झाले तेव्हा त्यांची पत्नी म्हणून निंबाळकर घराण्यातील सईबाईंनी उंबरठ्यावर माप ओलांडलं. अस्सल रजपूत, प्राचीन पवार घराण्यातील, निंबाळकरांच्या तालेवार घराण्यातील ही कन्या. या

घराण्याचे मूळ पुरुष निंबाजी पवार हे उत्तर हिंदुस्थानातील धारा नगरीतले प्रसिध्द पुरुष. ते दक्षिणेत आले. दक्षिणेत आल्यावर, शिखर शिंगणापूरच्या निंबाच्या झाडीत देवीची ११ वर्षे आराधना केल्यावर त्यांना देवी प्रसन्न झाली आणि तुझं घराणं छत्रचामराधीश होईल असा तिने आशीर्वाद दिला. याच घराण्यातील निंबराजाचा भर दरबारात सन्मान करून, बादशहाने नायक हा किताब आणि साडेतीन लाखांची जहागिरी दिली. निंबराजांनी लोक जमवून एक गाव वसवला. निंबजाई देवीचं देऊळ बांधलं. त्या गावाला निंबळक आणि घराण्याला निंबाळकर नाव पडलं. निंबराजाच्या घराण्यात एकापेक्षा एक वीर पुरुष जन्मले. फलटणचे सत्ताधिकारी झाले. फलटणचे जगपाळराव सत्ताधीश असतांना यांच्याचमुळे मालोजी आणि विठोजी भोसले बंधू पराक्रमाने चमकू लागले तेव्हा जगपाळरावांनी आपली बहीण दीपाबाई ही मालोजीरावांना दिली. तेव्हापासून भोसले-निंबाळकरांचा रोटी-बेटी संबंध सुरु झाला. त्याच घराण्यातील सईबाई यांना शहाजीराजांनी शिवरायांसाठी वधू म्हणून घरात आणलं.

असंच आणखी एक प्राचीन चौहानांचं रजपूत घराणं. त्या घराण्यातील वीर पुरुषाला अनेक मानमरातब आणि किताब मिळाले. मोहिते हाही किताबच होता. मोहिम शब्दापासून तयार झालेल्या या शब्दाचा अर्थ रण जिंकणारा असा होता. याच कुलातील बाजी मोहित्यांच्या कन्येशी, तुकाईबाईंशी शहाजीराजांनी विवाह केला. त्या घराण्यातील हंसाजी मोहिते, राष्ट्रउभारणीत शिवप्रभूंना सामील झाले. त्यांच्या पराक्रमावर खूष होऊन शिवाजी महाराजांनी त्यांना हंबीरराव हा किताब आणि सरनोबत हे सेनापतीपद दिलं. इतिहास पंडित द. ब.

पारसनीस,सोयराबाई ह्या मोहिते घराण्यातील होत्या असं आपल्या “मुसलमान अमदानीतील मराठे सरदार ” या पुस्तकात सांगतात.

कोकणातील मोठे सरदार शिर्के. हे थेट रामाच्या वंशातले. त्यांना कुटर या नावाने ओळखलं जायचं. यांचा एक वंशज मुसलमानांपासून जीव वाचवून दक्षिणेत आला. रायगडाजवळ स्थिरावला. मुसलमानांनी या घराण्यातील सर्वांना ठार केलं, तेव्हा त्यांची सुर्वे कुळातील एक सून माहेरी बाळंतपणाला गेली होती, ती वाचली. तिला मुलगा झाला. हा वज्रपाल नावाचा मुलगा मोठा झाल्यावर त्याने मुसेखोऱ्यातील शिरकवली गावातील जंगलातील शिरकाई देवीची काही वर्षे आराधना केली. तिने प्रसन्न होऊन या वज्रपालाला आशीर्वाद दिला. मग या वज्रपालाने ८४ गावं जिंकून सत्ता सुरु केली. तेव्हापासून या घराण्याला शिर्के नाव पडलं. पुढे, या घराण्यातील वाघोजीने निजामशाहीत पराक्रम गाजवला आणि रायगड जवळच्या १२ गावांचा वाघोजी सरदेशमुख झाला. याच घराण्यातील पिलाजीरावांची कन्या जिऊबाई यांचा शंभूराजांची पत्नी म्हणून महाराजांच्या घरात प्रवेश झाला आणि महाराजांनी आपली कन्या राजकुंवर हिचा विवाह, पिलाजीरावांच्या मुलाशी गणोजीशी, करवला. गणोजी महाराजांचे जावई झाले. येसूबाई ह्या स्वराज्य स्थापनेनंतर सून म्हणून महाराजांच्या राजवाड्यात गृहप्रवेश करणाऱ्या पहिल्या स्नुषा. महाराजांच्या पत्नी म्हणून आलेल्या सईबाई निंबाळकर आणि येसूबाईंची आत्या सोयराबाई, या स्त्रिया जिजाऊसाहेबांच्या सूना म्हणून आल्या पण तेव्हा स्वराज्याने आकार घेतला नव्हता. येसूबाईंचं आजोळ म्हणजे कोकणातील शृंगारपूरचं सुर्वे घराणं. हेही फार प्रसिध्द प्रतिष्ठित घराणं.

स्वतंत्र मराठी राज्यात महाराजांच्या संभाजी आणि राजाराम या दोन पुत्रांच्या पत्नी म्हणून येसूराणी आणि ताराराणी यांनी गृहप्रवेश केला. येसूराणी म्हणजे एक संयत, सोज्वळ, शालीन, विवेकी आणि स्वराज्याच्या घटना जवळून पाहणाऱ्या, महाराजांच्या विचारांचा प्रभाव असलेल्या, महाराजांच्या ज्येष्ठ स्नुषा. राजारामराजांची पत्नी ताराराणी म्हणजे एक आत्मविश्वास, आक्रमक, राजकारण खेळण्याची धमक आणि निर्भयता असलेलं व्यक्तीमत्त्व. येसूराणी अशा स्वभावाच्या, तर त्यांचा सहचारी संभाजी महाराज, आक्रमक, धाडसी, आव्हानं अंगावर खेळवणारा, आणि ताराराणी ज्या स्वभावाच्या, तर त्यांचे पती राजाराम महाराज सौम्य, शांत, प्रेमळ, विवेकी. विधात्याने बांधलेल्या गाठी अशाच असतात. एक समाजप्रिय असेल तर दुसरा एकांत प्रिय..एक बोलका तर तर दुसरा अबोल..

संभाजीराजांचा जन्म १६५७ मधे १४ मेला झाला पण ३ वर्षांचे असतांनाच ते आईच्या सुखाला पारखे झाले. सईबाई वारल्यानंतर जिजाऊसाहेबांनी त्यांचा सांभाळ केला. एकटं लेकरु आईच्या मायेविना वाढायला लागलं. शिवाजी महाराज आणि शंभूराजांच्यात तो मोठा फरक होता. शिवरायांना आईच्या मायेचं आणि आधाराचं पोटभर सुख मिळालं. पण चिरंजीव मात्र मायेच्या शालीला पारखे झाले. उलट तरुणपणातील वाढती रग, घरांमधे चालणारी धुसफुस, यामुळे जास्त आक्रमक बनत गेले. ते १० वर्षांचे झाले तेव्हा जिऊबाईंनी शंभूराजांची पत्नी म्हणून महाराजांच्या घरात येसूबाई नावाने प्रवेश केला. येसूराणींनी आपल्या पतीला ममतेचा आणि विश्वासाचा मानसिक आधार दिला. कुटुंबातले, राजकारणातले, महाराजांच्या आयुष्यातील

खूप चढउतार पाहिले. स्वराज्य वाढतांना पाहिलं. महाराजांच्या उंचावत जाणाऱ्या तेजस्वी पराक्रमाची कमान पाहिली. त्यांना मोलाची साथ देणाऱ्या बाळाजी आवजींसारख्या साथीदारांना तर पाहिलंच पण महाराज स्वारीवर असतांना खंबीरपणे कारभार सांभाळण्याची जिजाबाईंची, कर्तबगारीही पाहिली, आणि या मोठ्या घरात राहून कौटुंबिक राजकारणाची झळही सोसली.

महाराजांच्या मोहिमेच्या गैरहजेरीच्या काळात, दरबारात चालणारं राजकारण, अनाजी दत्तो आणि मोरोपंत पिंगळे यांच्यातील भांडण पाहिलं. पुतळाराणींना अपत्य नव्हतं, पण उरलेल्या सात सासवांच्या राजमाता बनण्याच्या मार्गातील आपल्या पतीचा अडसर पाहिला. राजमाता बनण्याचा तो योग स्वप्नात उतरण्याची शक्यता एकाच राणीच्या भविष्यात होती. आणि तोच पुढच्या आयुष्यातील काटा ठरला. संभाजीराजांसारखा बुध्दिमान, शूर, धडाडीचा पण लौकर तापणारा आणि लौकर निवणारा, पाऱ्यासारखा सहचारीसुध्दा तळहाताच्या फोडाप्रमाणे विवेकाने संयमाने, फुंकर घालत सांभाळला. सोयराबाई आणि आपले पती यांच्यातील अग्नीसारख्या नात्यात शंभूराजांना शांत ठेवण्याचं अवघड काम येसूबाईंना करावं लागलं.

आपल्या पतीचं गाढ प्रेम येसूराणींनी अनुभवलं. महाराजांना ८ राण्या होत्या पण येसूराणींना मात्र एकही सवत नव्हती. शंभूराजांनी एकच लग्न करणं हेही त्या काळातलं वेगळेपण होतं. आणि व्यसनाबद्दल म्हणावं तर व्यसनं कुणाला नव्हती? जनानखाना असणं कुणाला नवीन होतं? उलट ते एक भूषण होतं. मात्र आपल्या पतीच्याबद्दल एवढा गवगवा होण्यापासून त्यांना वाचवायचं होतं कारण बदनामीला टपलेल्या विरोधी पक्षाचं ते मुख्य हत्यार बनत होतं.

शंभूराजांना आवरणं हेच येसूराणींचं मुख्य जीवितकार्य ठरलं. या आपल्या त्राग्याचा त्रास स्वत: शंभूराजांनाही होतच होता, म्हणूनच तर त्यांनी आपला शिक्का मोर्तब आपल्या प्रिय पत्नीच्या हवाली मोठ्या विश्वासाने ठेवला होता. ती जे काही करेल ते फक्त विवेकाने आणि संयमानेच करेल याची त्यांनाच खात्री होती. आपल्या पतीने केलेला केवढा हा सन्मान येसूबाईराणींनी अनुभवला.

शिवाजीमहाराजांच्या राज्याभिषेकानंतर स्वराज्याचं भव्य भाग्य येसूबाईंनी अनुभवलं. युवराजपदावर आपल्या पतीवर झालेला पट्टाभिषेक त्यांना सुखावून गेला. युवराजपद मिळणं म्हणजे राजाने आपल्यानंतरचा वारस जाहीर करणं. त्याकाळात राजे लोकांना खूप मुलगे असत. त्यातून आपला पुढचा गादीचा वारस जो ठरेल त्याला युवराजपद मिळे. पण परत बिनसलं आणि संभाजीराजे मुघलांच्या गोटात गेले. त्यावेळी मात्र मुघलांच्या अनाचाराचा हैदोस पाहिल्यावर संभाजीराजांचे डोळे उघडले. बादशहाने आपल्याला ठार मारण्याचं ठरवलं आहे ही कानावर आलं. महाराजही आपल्या पुत्राला परत आणण्यासाठी जाळं लावून वाट पाहातच होते. एका रात्री युवराज विजापूरातून निसटले आणि पित्याच्या सावलीत विसावले. येसूराणींनी ते काही दिवस, केवढा मनस्ताप, केवढी अस्थिरता, या संकटाच्या श्वासरोधक वेटोळयांमधे काढले. मग संभाजीराजांच्या नशिबी आली ती पन्हाळगडची नजरकैद...

महाराज गेले. मग सत्तेसाठी शंभूराजांना झगडावंच लागलं. महाराजांच्या जाण्यानंतर सिंहासन मिळवण्यासाठी आपल्या पतीविरुध्द घरात जो मन विदीर्ण करणारा खेळ झाला तो येसूराणी हताशपणे पाहात राहिल्या. पन्हाळगडावर असलेल्या आपल्या पतीला फसवून इतरांनी कारभार हाती घेणं

त्यांना जराही रुचलं नव्हतं. राजारामराजेंना घाईघाईने राज्याभिषेक करवणं, हे येसूराणींची मती गुंग करणारं होतं. आता या संघर्षाच्या खेळात संभाजीराजांनी जय मिळवलाच. अनाजी दत्तो वगैरेंना कैद केलं, त्यांना माफही केलं, त्यांची कैदेतून सुटकाही केली पण त्यांचे खेळ जाईनात आणि जेव्हा आपल्या पतीच्या प्राणावरच बेतलं तेव्हा राजांचा संतापाचा आगीसारखा भडका पराकोटीला पोचणं पाहाण्याशिवाय गत्यंतरच नव्हतं. आपल्या पतीचा हक्क न्याय्य होता हेही त्यांना कळत होतं आणि घरातलेच विरोधक भलत्या टोकाला पोचणं हेही विषाद मानण्यासारखंच होतं. अनाजी दत्तोंसारख्यांचा अति धीटपणा क्लेशकारक होता. त्यातून घडलेलं शिर्क्यांचं "शिरकाण " प्रकरण आता येसूबाईंनाच सावरायचं होतं. माहेरच्या शिर्क्यांवर झालेला घाला, हा सासर-माहेरचा, तारेवरच्या कसरतीचा खेळ त्यांनी मोठ्या कौशल्याने हाताळला आणि महाराजांना शांत करत, सर्वांना परत कारभारात घेतलं. संभाजीराजांचं बालपण कोणत्या मानसिक त्रासातून गेलं असेल त्याचाच तो दाखला होता. सत्तासंघर्षाच्या राजकारणात कुणालाही कोणतंही नातं नसतं हेही येसूराणींनी अनुभवलं.

दरबार परत सुरु झाला. कारभार सुरु झाला. १० वर्षांच्या राजारामावर महाराजांचं धाकटा भाऊ म्हणून प्रेम होतंच...त्यांना संभाजीमहाराजांनी जरासुध्दा हात लावला नाही. त्यांना कैदेत ठेवणं, हे सत्तेच्या स्थिरतेसाठी राजघराण्यातील राजकुमारांना करावंच लागत होतं.. ती साखळदंडातील कैद नव्हती, पण राजारामराजेंना हाताशी धरुन परत कुणी खेळ करु नयेत म्हणून लावलेली नजरकैद होती. संभाजीमहाराजांनी आपल्या विरोधकांना शासन तर

केलंच, पण बाळाजी आवजी, त्यांचा हात नसतांना प्राण गमावून बसले तेव्हा मात्र येसूराणींनी आपली नाराजी बोलून दाखवली. बाळाजी आवजी महाराजांचं मन होते असं म्हणाल्या. आजवर बाळाजी आवजींनी महाराजांची सर्वच्या सर्व पत्रं खलिते लिहिले होते. संभाजी महाराजांनाही ती बोच होतीच. रागाच्या भरात हे झालं असं त्यांनी कबूल केलं. संभाजीमहाराजही शांत झाले. संभाजी महाराजांनी बाळाजी आवजी यांचे चिरंजीव खंडो बल्लाळ यांना परत आपल्या सेवेत घेतलं आणि आपल्या चुकीचं परिमार्जन केलं. मोरोपंत पिंगळे यांचाही हात नव्हता हे कळल्यावर त्यांनाही सेवेत घेतलं.

संभाजीराजांनी २० जुलैला रायगडावर राज्यकारभार हातात घेतला. आता येसूराणींनी दुसरं पर्व अनुभवायला सुरुवात केली. संभाजीराजे छत्रपती संभाजी महाराज झाले होते आणि येसूबाई महाराणी झाल्या होत्या. छत्रपती संभाजीमहाराज राज्यरक्षणासाठी सिध्द झाले.

## महाराणी येसूबाई

१६ जानेवारीला १६८१ मधे राज्याभिषेक समारंभ पार पडला. ते छत्रपती संभाजीमहाराज झाले. येसूराणींनी मग महाराणीपद भूषवलं. शिवाजी महाराज असतांना स्वराज्यात पाय ठेवण्याचं धाडस न झालेल्या, लाखो सैनिक घेऊन स्वराज्यात उतरलेल्या दिल्लीच्या पातशहाला आपल्या पराक्रमाने छळणाऱ्या आपल्या पतीचा महापराक्रम त्यांना पाहायला मिळाला. स्वराज्यात यायला बऱ्हाणपूरावर छावणी करुन राहिलेल्या औरंगजेबावर, विजेच्या चपळाईने संभाजीमहाराजांनी छावणीवर हल्ले करुन फौजेचे चावे घ्यायला सुरुवात केली. नाशिकजवळचा, रामसेज किल्ला हाती आला नाही, तेव्हा

त्राग्याने बादशहाने आपली टोपी जमिनीवर आपटली आणि संभाजीचा पाडाव केल्याशिवाय ही पगडी परत घालणार नाही, असा निश्चय केला. मुघल सरदार बहादूर खानाने येसूराणींना कैद करुन अहमदनगरच्या किल्ल्यावर ठेवलं तेव्हा त्यांची सुटका संभाजी महाराजांनीच केली होती. या २३ वर्षांच्या कोवळया तरुणाला जिंकून, दोन वर्षात दिल्लीत परत जाण्याचा मुरब्बी, कपटी, सामर्थ्यवान बादशहाच्या मनसुब्याचा संभाजीमहाराजांनी चुराडा करुन टाकला. संभाजीराजांविरुध्द बादशहाने पोर्तुगीज, इंग्रज, मुघल या तिन्ही शत्रूंचं मोहोळ उठवलं. एकाच वेळी या तिघांशी हरजीराजे महाडिक, गणोजी शिर्के, आणि हंबीरराव मोहिते, यांच्या साथीने लढतांना, येसूराणींना आपल्या पतीचा कधी मुत्सद्दीपणा, कधी आवेश तर कधी गनिमीकावा सुखावत होता. त्यातच त्यांची काव्याची, संस्कृत भाषेच्या अभ्यासाची, बुध्दभूषण, नखशिखा आणि नायिकाभेद या हिंदी काव्यांसारख्या लिखाणाची भर पडत होती. कवी कलुशाचा महाराजांवरचा, कारभारावरचा प्रभाव त्या पाहात राहिल्या.

रायगडावर आपली दोन मुलं, भवानीबाई आणि शाहू यांना घेऊन महाराणी येसूबाई राजकारण आणि दरबार यावर लक्ष ठेवत राहिल्या. सात वर्षं झाली तरी स्वराज्य हाती न आल्यामुळे औरंगजेब बादशहा आता निराश झाला होता. संभाजीमहाराजांच्या या तेजामुळेच तर शेवटी औरंगजेबाला कपटनीतीचा आसरा घ्यावा लागला. मग अनुभवी, आणि हुशार गुप्तहेरांची फौजच्या फौज त्याने कामाला लावली. बादशहाचा सरदार शेख निजाम, उर्फ मुकर्रबखानाला संगमेश्वरच्या वाड्यात संभाजीमहाराज आहेत हे कळल्याबरोबर २००० घोडदळ आणि १००० पायदळ एवढी मोठी मुघल फौज वाड्यावर

चालून आली. विधात्यानेही त्यालाच साथ दिली. १ फेब्रुवारी १६८९, या दिवशी संभाजी महाराज अटकेत पडले ही येसूराणींच्या कानावर ही बातमी पोचली तेव्हा, त्यांच्या काळजाचं पाणीपाणी झालं. आता आपल्या राजयोगाने, सौभाग्याने आपल्या आयुष्याची साथ सोडल्याची जाणीव त्यांना लगेच झाली. अवघ्या ९ वर्षांमधे संभाजीमहाराजांचा प्राण पणास लागला. संभाजी महाराजांना बादशहासमोर आणण्यात आलं. ११ मार्चला छत्रपती संभाजीमहाराजांचा कैलासवास झाला. फक्त ३० वर्षांच्या संभाजीमहाराजांचा मृत्यू हाही वीराला शोभणारा असाच होता. बादशहासमोर आपली मान तुकवून ते उभे राहिले नाहीत, बादशहाच्या प्रश्नांची उत्तरे उद्दामपणे देण्यासही कचरले नाहीत आणि बादशहा स्वराज्याच्या खजिन्याचा ठिकाणा विचारत होता, तोही कळू दिला नाही. त्यांनी अन्नपाणीही घेतलं नाही. अत्यंत क्रौर्याने, औरंगजेबाने आपल्या पतीचा शेवट केल्याची बातमी आल्यावर त्याचं सहनशील मन परत एकदा कोसळलं. येवढं क्रूरपणे आपल्या पतीशी वागतांना, महाराजांनी त्याचं जे अनेकवेळा नाक कापलं होतं, त्याचा विखार तर बादशहाने शिवरायांच्या पुत्रावर ओतला नाही ना असंच येसूराणींना वाटलं. शेवटी त्यांच्या पतीने कुलाचं, स्वाभिमानाचं आपल्या पित्याचं आणि राष्ट्रप्रेमाचं उत्तुंग दर्शन घडवलं होतं. आपल्या लाडक्या राजाचा असा क्रूर अंत करणाऱ्या बादशहावर सारा महाराष्ट्र संतापून उठला आणि सूडाने पेटला. त्या संतापाच्या भरातच ऑगस्टमधे संताजी घोरपडेने थेट बादशहाच्या छावणीवर हल्ला करुन अवघ्या २००० सैनिकांच्या साथीने त्याच्याच शामियानाचे सोन्याचे कळसच तोडले आणि राजाराममहाराजांच्या पायाशी आणून ठेवले. महाराष्ट्र एक झाला तर राज्य मिळत नाही हे दिल्लीपती कळूनच चुकलं .

औरंगजेबाचं हे चक्रीवादळ आता रायगडाला अंधारुन टाकणार हे काळ्याकुट्ट प्राक्तनातही लख्खपणे येसूराणींच्या लक्षात आलं. पण अशा कठीण प्रसंगातही एखाद्या मुत्सद्द्याला, राष्ट्रप्रमुखाला शोभेल असंच येसूराणी वागल्या. मुघल फौज रायगडावर चालून येते आहे हे कळलं. महाराजांनी राष्ट्राचा विचार आधी हा संस्कार त्यांच्या मनावर केला होता, त्याचा अनुभव सर्वांना आला. राजा म्हणजे राष्ट्र आणि राजाचा प्राण म्हणजे राष्ट्राचं अस्तित्त्व.. म्हणून नजरकैदेत ठेवलेल्या १९ वर्षांच्या राजारामराजांना बाहेर काढून घाईघाईने त्यांचा राज्याभिषेक केला आणि रायगडाबाहेर त्यांना काढून त्यांचा जीव वाचवण्याचा निर्णय घेतला. २५ मार्चला रायगडावर मुघलांचा वेढा पडला. तेव्हा गडावरचे सर्व मुत्सद्दी एकत्र आले आणि काय मार्ग काढावा या विचारात पडले, यावेळी येसूबाईंनी सल्ला दिला की, राजारामास बाहेर काढावे, म्हणजे ह्या फौजा त्यांच्यामागे जातील, रायगडाचा वेढा उठेल, तेव्हा आम्हास नेण्यास यावे. तोपर्यंत आम्ही गडावरच राहू.” हे ठरल्यावर ५ एप्रिलला राजाराम महाराज रायगडावरुन प्रतापगडावर गेले. गडावरचे रामचंद्रपंत अमात्य, सचिव सगळेच बाहेर पडले. येणाऱ्या संकटाशी सामना करायला येसूराणी गडावरच आपल्या पुत्राबरोबर राहिल्या.

६ महिने झाले तरी, रायगड सर होईना तेव्हा फितूरीचा मार्ग बादशहाला घ्यावा लागला. बादशहाच्या फौजेतील सूर्याजी पिसाळने, महाराजांनी अथक श्रमसाहसाने उभारलेल्या साऱ्या स्वराज्याला, क्षुल्लक वाईच्या सरदेशमुखीच्या बदल्यात विकलं. ३ नोव्हेंबरला रायगडाचे दरवाजे मुघलांसाठी उघडले. महाराजांचं सिंहासन मुघलांनी फोडलं. येसूराणी कोरड्या डोळ्यांनी ते पाहात

राहिल्या. अश्रूच संपले होते त्यांचे. गेल्या ६ महिन्यांमधे त्या नेत्रांनी केलं तरी काय होतं दुसरं. मग असहायपणे महाराजांनी श्रमाने, साहसाने, मिळवलेला एकेक होन, एकेक रत्न, एकेक जवाहीर यांनी भरलेले पेटारे गडाखाली शत्रू घेऊन जातांना पाहात राहिल्या. किती कठोर, क्रूर काळ आला होता त्यांच्यावर. स्वराज्याचं वैभव पाहिलेल्या, अनुभवलेल्या त्यांच्या पिढीतल्या त्या आणि महाराजांच्या पत्नी सकवारबाई, शिल्लक राहिल्या होत्या. रायगड रिकामा झाला आणि जीवरक्षणाची हमी घेऊन, आपल्या सात वर्षांच्या शाहूराजांचा हात घरुन त्याही गडाच्या पायऱ्या पालखीत बसून उतरायला लागल्या, कधीही परत न येण्यासाठी. त्यांच्या जाण्याने वैभव पाहिलेला रायगडही काळवंडला. त्याच्या छातीवरच्या मातीतली महाराजांची पावलं आता दुश्मनांच्या पायदळी विस्कटून जाणार होती.

पुढचं सगळं आयुष्य येसूबाई राणींनी, बादशहाच्या कैदेत राहून घालवलं. पण बरोबर पुत्रप्रेमाचा अखंड झरा त्यांच्या सोबतीला होता. ७ वर्षांचे शाहूराजे हे एकच सुख त्यांना मिळत होतं. राजाराममहाराज जिंजीला पोचल्याचीखबर त्यांनी ऐकली आणि समाधानाने त्या हसल्या. स्वराज्य जिवंत राहिलं होतं. शिवाजीमहाराजांनी आयुष्यभर बादशहाला चैन पडू दिलं नव्हतं, संभाजी महाराजांनीही तेच केलं होतं आणि आता बादशहाच्या नजरेने निर्नायकी असलेलं हे राष्ट्र, महाराजांच्या तालमीत तयार झालेले रामचंद्रपंत अमात्य, परशुरामपंत प्रतिनिधी, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, शंकराजी नारायण, हे स्वराज्य चातुर्याने सांभाळत होते हे येसूराणींनी पाहिलं.

या सगळया विराण वाळवंटात येसूराणींना सावली देणारं एकच झाड होतं. ते म्हणजे झिनतुन्निसा बेगम. बादशहाच्या या मुलीचा आसरा भक्कम होता. आपला पुत्र बादशहाच्या डोळ्यातला काटा आहे हे येसूराणींना चांगलं माहीत होतं. त्याच्या जिवाला जपणं एवढंच आयुष्यातलं कर्तव्य शिल्लक राहिलं होतं. पण त्याही दुर्दैवाचा भडाग्नी उडालेला त्यांनी अनुभवला. एक दिवस बादशहाने भर दरबारात रायगडावरुन आणलेल्या सर्वांना म्हणजे प्रतापराव गुजरांचा परिवार, संभाजी महाराजांचा दासीपुत्र मदनसिंग, जोत्याजी केसरकर, आणि शाहूराजांना मुसलमान करुन टाकण्याची घोषणा केली तेव्हा येसूराणींच्या पायाखालची जमीनच सरकली. मग मात्र येसूराणींनी आकाशपाताळ एक व्हावं असं आकांडतांडव केलं. झिनतुन्निसा बेगमचे पाय धरले. बेगमनेही औरंगजेबाला, या निर्णयाविरुध्द मी आत्महत्या करीन असा निर्वाणीचा निरोप पाठवला. बादशहाही हट्टा पेटला. मग खंडोजी गुजरानेच मार्ग काढला. या सर्वांना वाचवण्यासाठी दोघे गुजर बंधू मुसलमान झाले. बादशहाने ते मान्य केल्यामुळे तेही संकट पार झालं. नाहीतर आज साताऱ्यात मुसलमान नावाचा वंशज असता.

मग बादशहाने शाहूराजांच्या लग्नाचा विचार चालवला. दोन मुलींशी त्याचा विवाह करवला. शाहूराजांचं लग्न थाटात पार पडलं. येसूबाईंनी ते सुनमुखांचं सुख अनुभवलं. औरंगजेबाने या लग्नाची भेट म्हणून तीन तलवारी शाहूराजांना दिल्या. एक सोन्याची होती, दुसरी, अफझलखानाच्या वधामधे वापरलेली होती आणि तिसरी भवानी तलवार होती. लग्नसोहळा पार पडला पण त्यातही परत एक संकट आलं. एक दिवस बादशाहाने नवीन वधूला

पाहण्याची इच्छा प्रदर्शित केली. गोषा घेऊन नवीन सुनेला पाठवायचं तरी कसं.. मग येसूराणी आणि झिनतुन्निसा बेगमने मार्ग काढला. आपल्या एका सुंदर दासीला नववधूचा साज देऊन येसूराणींनी बादशहाकडे पाठवलं. त्यांचं नाव विरुबाई. शाहूराजांनी या उपकारकर्तीला पत्नी म्हणूनच वागवलं. कारण बादशहाला आपली फसवणूक झाल्याचं कळतं तर कुणीच जिवंत राहिलं नसतं. स्वराज्यात येऊन बादशहाला २७ वर्षे झाली. बादशहाच्या हाती स्वराज्य आलंच नव्हतं. अचानक वृध्द बादशहाने अहमदनगरचा रस्ता धरला ही बातमी येसूबाईंना कळली. सगळा तळ हलला. आणि एक दिवस पृथ्वी गर्र्कन उलटी फिरायला लागेल अशी बातमी आली. आपल्या शामियानात बादशहा आजारी पडला होता, तो अल्लाला प्यारा झाला. स्वराज्यावरचं संकट दूर झालं पण येसूराणींना नवीनच दुर्भाग्याचा फेरा अनुभवावा लागला. दिल्लीचं तख्त मिळवण्यासाठी बादशहाचे शहजादे दिल्लीकडे धावायला लागले. इतकी वर्षे कैदेत असल्या तरी येसूराणी महाराष्ट्रात होत्या. आता मात्र मायभूमी सोडायचं संकट कोसळलं होतं.

पण परत उनसावलीचा खेळ झाला. दिल्लीकडे प्रवास चालू असतांना, अचानक आपल्या पुत्राची, शाहूराजाची स्वराज्यात पाठवणी होणार ही बातमी त्यांच्याकडे आली. पुत्रवियोगाचं दु:ख मानावं की पुत्राच्या भाग्याचं सुख मानावं हे त्यांनीच ठरवायचं होतं. शाहूराजे प्रथम आपल्या मातोश्रींना भेटायला आले. येसूराणींनी त्यांना मिठीत घेतलं. डोळेभर त्याचं रुप साठवत, आशीर्वाद दिले. तुळजाभवानीचा मुखवटा दिला. तिनेच शिवरायांचं रक्षण केलं होतं, ती आपल्याही पुत्राचं रक्षण करेल याची त्यांना खात्री होती. २५ वर्षांच्या आपल्या

पुत्राच्या भाळीही राजयोग लिहिला जावा ही मनोमन प्रार्थना करुन त्यांनी शाहूराजांना निरोप दिला. मग शाहूराजे आपली दुसरी जीवनदात्री, झिनतुन्नीसाला भेटायला गेले. ७ वर्षांचा छावणीत आलेला हा मुलगा त्यांचाही मानसपुत्र झालेला होता. शाहूराजांना खर्चाला लागेल एवढं जडजवाहीर आणि हजरतांचा पंजा त्यांनी शाहूराजांना दिला. एक त्यांच्या दैवाचं रक्षण आणि एक त्यांच्या व्यवहाराचं रक्षण करणार होतं. आणखी एक मोलाचा सल्ला दिला. तो म्हणजे, शहजादांची मर्जी फिरण्याआधीच ताबडतोब निघून जा. शाहूराजे निघून गेले. काहीच दिवसांमधे त्यांनी राज्याभिषेक करुन घेतल्याची बातमी त्यांच्या कानावर आली. रायगडावरच्या उन्मळून पडलेल्या महान वटवृक्षाचा बीजांकूर साताऱ्यात वाढायला लागला. आजवर फार फार सोसलं होतं त्या दु:खाचे आणि राज्याभिषेकाच्या सुखद बातमीचे अश्रू येसूराणींच्या डोळयांमधून वहात होते. येसूराणींच्या आयुष्यात आता काहीही उरलं नव्हतं. दिल्लीमधे आयुष्य कंठता कंठता, १२ वर्षांनी तपाने परत कूस बदलली. त्यांच्या भाग्याची बाजू वर आली. आपली सुटका करण्यासाठी शाहूराजांचे पेशवे खुद्द बाळाजी विश्वनाथ फौज घेऊन येत आहेत ही बातमी आली तेव्हा त्यांचा कानावर विश्वासच बसेना.

त्या क्षणाकडे डोळे येसूराणी डोळे लावून बसल्या. खरंच स्वप्न सत्यात उतरलं होतं. दिल्ली सुटली. त्यांची मायभूमीकडे पावलं पडायला लागली. पेशवे बाळाजी विश्वनाथांनी येसूराणी, संभाजीमहाराजांचे दासीपुत्र मदनसिंग, जोत्याजी केसरकर, सगळ्यांची मुक्त्ता केली. सगळा गोतावळा स्वराज्याकडे चालायला लागला. नर्मदा, गोदावरी, महाराष्ट्रातील डोंगर, नद्या, हावऱ्या नजरेने साठवत सगळे साताऱ्यात पोचले. राजवाड्याला परत पाय लागले.

आयुष्यातला हा सर्वात मोठा, भाग्याचा दिवस त्यांच्यासमोर उभा होता. शाहूमहाराजांनी त्या सर्वांचं जंगी स्वागत केलं. येसूराणी तृप्त झाल्या. १२ वर्षांनी पुत्र दर्शनाची त्यांच्या वृध्द नजरेला आस लागली होती. ते नुसत्या नेत्रांनी सहन होणार नाही म्हणून शुभ दिवसावर शुभ मुहूर्तावर, सोन्याच्या थाळीत तूप घालून त्यात पुत्राचा चेहरा त्यांनी पाहिला. पुत्रभेटीचा घडे महोत्सव अनुभवला. आजवरचं कोंडलेलं मन त्यांच्या डोळयांमधून घळाघळा वहायला लागलं. राजवैभवही परत त्यांच्या आश्रयाला आलं होतं. आपल्या पुत्राच्या, सुनांच्या सहवासात, राजवाड्यात, वैभवात तृप्त झाल्या. आपल्या पित्याच्या उलट स्वभावाच्या शाहूराजांच्या रक्तातलं उदार मनाचं राजकारण अनुभवत होत्या.


आता त्यांना सत्तेच्या नवीन रस्सीखेचाचं रुप पाहायला मिळालं. आपल्या धाकट्या जावेला, ताराराणींना, त्यांच्याच सवतीच्या राजसबाईंच्या कैदेत पडलेलं पहावं लागलं. कोल्हापूरची गादी रक्त न सांडताही राजसबाईंच्या संभाजीराजांच्या हाती गेली होती. परत आणखी नवे खेळ चालू झाले. हैद्राबादच्या निजामाने संभाजीराजांना हाती धरल्यामुळे परत शाहूराजांनी संभाजीराजांना पराभूत केलेलं पाहिलं. ताराराणींनी शाहूराजांच्या हाताखाली कैदेत राहणं पसंत केलं. हे स्वराज्य दुभंगणारं कौटुंबिक राजकारण त्यांना बघवेना. परत त्या कामाला लागल्या. संभाजी आणि शाहू यांच्या समेटाचे त्यांचे प्रयत्न सुरु झाले. शिवरायांनी आपल्या पतीच्या काळात योजलं होतं, ते, राज्याची वाटणी करणंच हिताचं आहे यात येसूराणींनी मध्यस्थीचा पुढाकार घेतला. यावेळीही शाहूलाच सर्व स्वराज्य मिळावं हा लोभ न धरता, त्यांनी संभाजीराजांचाही हक्क मान्य केला. वारणा तहाच्या रुपाने वाटणीचा विचार

आकार घेऊ लागला होता. पण त्याचं मूर्त स्वरुप हाण्यापूर्वीच, याच सुखात न्हाऊन निघत असतांना परत आयुष्याचा तळ हलवण्याची घडी जवळ आली. अखेरचं गंगाजल त्यांनी प्रवासापुरतं मुखात घेतलं. आणि शांतपणे हृदयातली अखेरची कळ सोसली. आजवर अनेक प्रसंगांपेक्षा ही कळ वेगळी होती. तृप्ततेची होती. शिर्क्यांच्या सरदार घराण्यातील राजकन्या, भोसल्यांच्या देदिप्यमान घराण्याची थोरली सून म्हणून आणि राजमाता म्हणून या जगाचा अखेरचा निरोप घेत होती.

शिर्के घराण्यावरच्या हिंसक अत्याचारातून वाचलेले, आणि राजाराम महाराजांना सुखरूप जिंजीला पोचवण्यात हातभार लावणारे गणोजी शिर्के, आणि महाराणी येसूबाई या दोन शिर्क्यांमुळे स्वराज्य परत उभं राहिलं, जगलं आणि वाचलं. खूप मोठा राजयोग आणि खूप मोठा अंधारमय, कठीण काळ, सगेसोयऱ्यांचं राजकारण, सुखदु:खांचे फेरे, अनुभवलेल्या येसूराणी गेल्या. शिर्क्यांची कुलभूषणा, शिवरायांची स्नुषा, राज्यरक्षक महाराणी, ज्यांनी राजारामांना गादीवर बसवून, आपल्या एका मोठ्या विचाराने स्वराज्याच्या सबंध राजकारणाला कलाटणी दिली, ज्या स्त्रीने स्वत:च्या पुत्राला गादी मिळावी म्हणून आपल्या पतीच्या नाशाचे प्रयत्न केले, त्याच सोयराबाईंच्या मुलाला स्वत:हून सिंहासनावर बसवून आपल्या विशाल मनाचं दर्शन घडवलं, आणि आपल्या पुत्राला तख्त देण्यापासून दूर राहिल्या, त्या येसूराणी पणतीसारख्याच न विझता,आयुष्यभर सौम्यपणे तेवत राहिल्या. राजगृहातही, बादशहाच्या कारावासातही, वादळयोगातही आणि राजयोगातही

# ताराराणी - एक अग्नीरेखा.

## सन १६७५ ते १७६१.



शिवरायांच्या घराण्यात स्त्रीने कारभार करायचा नाही ही प्रथाच नव्हती. खुद्द जिजाऊसाहेबांनीच ही कारभार हाती घेण्याची चाल सुरु केली होती. शहाजीराजांनी आपले विश्वासातील अधिकारी जिजाबाईंच्या हाती देऊन आपल्या छोट्या जहागिरीत लक्ष घालायला पुण्याला पाठवलं होतं. सुरुवातीला, शिवबाराजे लहान अणि अननुभवी असतांना, जिजाबाई, दादोजी कोंडदेव, जेधे, वगैरे कारभारी, शहाजीराजांकडे पत्रे पाठवून सल्ला घेत असत आणि त्याप्रमाणे निर्णय घेत असत. पण तरुण शिवरायांच्या हाती कारभार आला आणि जिजाऊसाहेब मागे सरल्या. पुत्राच्या मदतीपुरतं कारभारात लक्ष पण पाठिंबा मात्र पूर्ण एवढंच धोरण त्यांनी ठेवलं. त्याच घराण्यात दोन कन्यांनी सूनांच्या पावलांनी गृहप्रवेश केला. शिर्के घराण्यातील येसूबाई आणि राजारामाची पत्नी म्हणून हंबीरराव मोहित्यांची कन्या ताराबाई.

ताराबाईंनी आपल्या सासऱ्यांचा कारभार पाहिला नाही. महाराजांच्या कैलासवासानंतर त्यांचा राजारामाशी विवाह झाला होता. पण रायगडावर आल्यावर मात्र बदलत्या राजकारणाने त्यांचे अंगभूत गुण उजळत गेले. स्वराज्याची सूत्रं हाती घेऊन बलाढ्या शत्रूशी, औरंगजेबाशी ७ वर्षे लढण्याचं जे धाडस त्यांनी केलं त्या त्यांच्या कर्तृत्वाला तोड नाही. स्वराज्यासाठी त्या अग्निरेखेसारख्याच जाज्वल्य आहेत.

ताराराणी तिचं नाव. लग्न झालं तेव्हा ती ८ वर्षांची होती. मामाच्या कडेवरुनच शिवरायांचे १३ वर्षांचे पुत्र राजारामराजांच्या गळयात वरमाला घालायला बोहल्यावर उभी होती. आपण एका फार मोठ्या घरात प्रवेश करतो आहोत याचं ज्ञान आणि भानही नव्हतं तिला. वडील हंसाजी मोहिते हे शिवरायांच्या विश्वासातले. हंसाजींच्या बहादुरीचा गौरव करण्यासाठीच महाराजांनी त्यांना हंबीरराव हा किताब दिला होता. मोहिते हाही किताबच. मोहीम हा अरबी शब्द. मोहीम जिंकणारा तो मोहिते. हंबीररावाच्या पूर्वजाने हा मिळवला होता. राज्याभिषेकाच्या वेळीच महाराजांनी हंबीररावांना सेनापतीपद दिलं होतं. हंबीररावांचे धाडसी गुण त्यांच्या कन्येत आपोआप उतरले होते. राजाराम महाराजांचा आधीच एक विवाह प्रतापराव गुजरांची कन्या जानकीबाईशी झाला होता. तीही मोठ्या घराण्यातली. कडतोजी गुजरांची कन्या. कडतोजी गुजरांचा पराक्रम पाहून महाराजांनी त्यांना प्रतापराव किताबाने गौरवलं होतं. दक्षिण स्वारीनंतर महाराज परत आले. लगेच त्यांनी राजारामाची ८ मार्च १६८० ला मुंज केली. प्रतापरावांची कन्या पसंत करुन १५ मार्चला १०

वर्षांच्या राजारामाचं लग्न लावलं. त्या पहिल्या लग्नानंतर अवघ्या महिन्याच्या आत, ४ -४ - १६८० यादिवशी महाराजांना मोक्षप्राप्ती झाली होती.

सोयराबाईंचे पुत्र राजारामाशी विवाह झाला आणि शिवरायांची स्नुषा म्हणून ताराबाईंनी गृहप्रवेश केला. पाठोपाठ आलं ते रायगडावर वाहणारं आणि दऱ्याखोऱ्यात घुमणारं जोरदार वादळी थंड वारं, तुफान पाऊस, कोसळणारी झाडं, आणि तसंच महाराजांच्या घरादाराला अस्ताव्यस्त करणारं संघर्षाचं राजकारण. स्वराज्याचं स्वामित्त्व हाती घेण्यासाठी घरात चाललेली शह आणि काटशह यांची आपली सासू आणि दीर यांची टक्कर, सोयराबाईंनी राजारामराजेंना तख्तावर बसवणं, मग संभाजीराजांनी येणं, हे सारं राजकारण स्वराज्य पाहात होतं. जेव्हा याचा शेवट झाला तेव्हा ताराराणीला एवढंच त्यातून कळलं की आता आपण आणि आपला पती नाममात्र नजरकैदेत आहे. पण आपल्या पतीच्या जीवाला कोणताही धोका नाही. २० - ७ - १६८० मधे संभाजीराजांनी सूत्रं हाती घेतली. १६ - १ - १६८१ या दिवशी संभाजीमहाराजांचा रायगडावर विधिपूर्वक राज्याभिषेक झाला. लग्न झाल्या झाल्या काही दिवसातच, दिल्लीचा आलमगीर स्वराज्य जिंकायला येतो आहे हे तिच्या कानावर आलं.

हे एक चक्री वादळ होतं. स्वराज्याला उध्वस्त होण्यापासून टिकवायचं होतं. २२ मार्च १६८२ या दिवशी औरंगजेब नावाचं हे महाभयंकर वादळ औरंगाबादेला येऊन थडकलं. त्यानंतरची ९ वर्षं ती फक्त लढाया, डावपेच, राजकारण, तह हेच शब्द ताराराणी ऐकत राहिली. तिच्या तरुण होत जाणाऱ्या मनावर तेच संस्कारशब्द आकार घ्यायला लागले. तिचं मनही आता कानावर

येणाऱ्या प्रत्येक घटनेवर स्वत:चा विचार करायला लागलं होतं. रायगडावर तिच्या सोबत होत्या त्या येसूबाई महाराणी आणि महाराजांची पत्नी सकवारबाई. १८ मे १६८२ या दिवशी संभाजीराजांना गंगावली येथे पुत्र झाला. येसूबाईंनी त्याचं नाव शाहू ठेवलं. या सगळया महत्त्वाच्या घटनांमधे जुनी माणसं अनेक कारणांनी संपली होती, जी होती तीही संभाजीमहाराजांच्या आज्ञेत कारभार सांभाळत होती. इमान आणि स्वामिभक्ती या गुणांवर हंबीरराव संभाजीमहाराजांची लष्करी बाजू पूर्ण ताकदीने सांभाळत होते. युध्दात मिळालेली सर्व लूट संभाजीमहाराजांच्या हवाली करत होते. संभाजीमहाराज बलाढ्य बादशहाशी टक्कर देण्यात आपली बहादुरी पणाला लावत होते. पण महाराष्ट्रावर आलेलं संकट गहिरं होत चाललं होतं. औरंगजेबाचा सरदार सर्जेखान याच्याशी लढतांना हंबीररावांनी त्याचा पराभव केला, त्यावेळी तोफेचा गोळा लागून हंबीररावांचा मृत्यू झाल्यामुळे संभाजीमहाराजांची बाजू लंगडी पडली. याच काळात राजारामराजेंचे दोन विवाह अंबिकाबाई आणि कागलकर घाटग्यांची कन्या राजसबाई यांच्याशी झाले.

संभाजीमहाराजांच्या नेतृत्त्वाखाली मराठ्यांच्या फौजा ठिकठिकाणी बादशहाशी लढून स्वराज्याचं रक्षण करत होत्या. शेवटी हैराण झालेल्या बादशहाला कपटनितीचा आसरा घ्यावा लागला. आणि एक दिवस बातमी आली ती अचल रायगडालाही छाती फोडून ढासळून टाकणारी होती. अवघ्या ९ वर्षांमधे, १६८९ सालच्या १ फेब्रुवारीला संगमेश्वराजवळ, खटोले गावात संभाजीमहाराज पकडले गेले आणि पाठोपाठ ११ मार्चला औरंगजेबाच्या क्रूरतेचा वीरतेने सामना करत मोक्षप्राप्तीलाही गेले. त्यांना पकडल्याची बातमी

रायगडावर येऊन थडकली. स्वराज्याचं भविष्य धोक्यात आलं. रायगडावर ऐन फाल्गुनात अंधारुन आलं होतं. आता फक्त जीव आणि स्वराज्य वाचवायचं कसं या प्रश्नाने सगळ्यांची मनं काळी झाली पण लगेच बहादुरीने संकटाशी सामना द्यायला तयार झाली. आदबखान्यात राजारामराजे कैदेत होते, त्यांना रायगडाचा किल्लेदार चांगोजी काटकर आणि येसाजी कंक यांनी ९ फेब्रुवारीला, ८ दिवसांमधे, माघ अमावास्येला बाहेर आणलं आणि फाल्गुन शुध्द तृतीयेला ३ दिवसांमधे राजारामराजेंना सिंहासनावर बसवलं. स्वराज्याला राजा आहे, ते संपलेलं नाही, हा इशारा बादशहाला पोचवणं जरुरीचं होतं.

आजवर कैदेत असणाऱ्या ताराराणी अचानक महाराणी बनल्या. पाठोपाठ रायगडावर मुघल फौज चालून येते आहे ही अपेक्षित बातमी आली. अत्यंत कठीण काळातच राज्यकर्त्यांच्या धडाडीची परीक्षा होत असते. रायगडावरील सर्व कारभारी, सरदार, मार्ग शोधण्यासाठी एकत्र जमले. पण प्रतिकूल परिस्थितही संयमी, शांत राहणाऱ्या येसूराणींनी मार्ग काढला. त्या म्हणाल्या, "तुम्ही सर्व पराक्रमी सरदारांनी एकत्र होऊन राजारामाला कुटुंबासह घेऊन बाहेर पडावं. आम्हाला राहण्यास रायगडासारखी दुसरी जागा नाही. किल्ला खूप काळ लढवता येईल. शत्रू तुमच्यावर चालून येईल, मग सगळे एकत्र या आणि आम्हाला काढून न्या." महाराणीच्या या निर्णायाने सर्वांना धीर आला. गडावरील लोकांना सोडून जाण्याला राजाराममहाराजांची आधी संमती नव्हती पण परिस्थितीनेच सर्वांना ते कबूल करायला लावलं. तेव्हा राजाराम १९ वर्षांचे, ताराराणी १४ वर्षांच्या आणि येसूबाई २८ वर्षांच्या होत्या.

ताराराणीसाठी स्वराज्यरक्षणाचा हा पहिला धडा होता. ठरल्याप्रमाणे लगेच राजाराममहाराज बाहेर पडले. आपला राणीवसा, ताराराणी, राजसबाई, अंबिकाबाई, यांना विशाळगडावर अवघड जागी सुरक्षित ठेवला. ताराराणीच्या आयुष्यातल्या अस्थिर जीवनाला तेव्हाच सुरुवात झाली. राजाराममहाराज अश्विन वद्य अष्टमीला, २६ सप्टेंबरला, नवरात्र उत्सव पन्हाळगडावर साजरा करुन झाल्यावर, ३०० माणसं बरोबर घेऊन, जिंजीच्या प्रवासाला लागले आणि एक महिन्यांनी २८ ऑक्टोबरला ५०० मैलांचा अथक प्रवास करुन वेलोरला पोचले. तिथून ५० मैलांवर असलेल्या जिंजीला १५ नोव्हेंबरला पोचले. बादशहाने ताबडतोब, त्यांच्या पाठलागावर माणसं पाठवली. महाराजांचं रक्षण करत त्यांच्याबरोबरचे त्यांचे एकनिष्ठ सहाय्यक सेवक घोड्यांवरुन प्रवास करत होते. कधी व्यापारी, कधी भिकारी, कधी संन्यासी, कधी यात्रेकरु, अशा बहुरुपी कपड्यांमधे, कधी देवळात, कधी रानात, कधी बिदनूरच्या राणीच्या आश्रयाने महालात झोपत, अत्यंत कठीण काळात आणि चिंतेत त्यांनी हा ५०० मैलांचा प्रवास संपवला. महिन्याभरात त्यांना जिंजीचा किल्ला दिसला. तिथे पोचल्यावर लगेच महाराजांनी अष्टप्रधानांच्या नेमणूका केल्या. प्रल्हाद निराजी प्रतिनिधी, निळो मोरेश्वर पिंगळे पेशवा, संताजी घोरपडे सेनापती, जनार्दन हणमंते अमात्य, रामचंद्रपंत हुकुमतपनाह, शंकराजी नारायण सचिव, असा दरबार सुरु झाला. महाराजांनी स्वत: राजचिन्हे आणि छत्रपतीपद धारण केलं. राज्याभिषेक मात्र झाला नाही. तिथेच बातमी आली की शाहूराजे, येसूबाई, राजारामराजांची पत्नी जानकीबाई, गुजर कुटुंब, संभाजी महाराजांचे दासीपुत्र मदनसिंग-माधवसिंग आणि शिवरायांची सकवारबाई राणी सर्व बादशहाच्या अटकेत पडले. अजिंक्य असलेला रायगड, सूर्याजी पिसाळाने वाईच्या सरदेशमुखीच्या

बदल्यात बादशहाला सोपवला. ही बातमी आघात करणारी होती. राजाराम महाराजांनी स्वच्छ शब्दात आपला विचार सांगितला होता. “चिरंजीव शाहू कालेकरुन तरी श्री देशीस आणील. तेव्हा संकटी जी माणसे उपयोगी पडली त्यांच्या तसनीसा आम्ही करवल्या, याचा चित्ती द्वेष यावा हे तरी अविचाराचे. शाहू सर्व राज्यास अधिकारी. आम्ही करतो ते त्यांचेचसाठी आहे. प्रसंगास सर्व लोकांस त्यांच्याचकडे पाहाणे आहे. हे कारण ईश्वरेच नेमिले आहे.” रामचंद्रपंत, शंकराजी नारायण, संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव स्वराज्यात येऊन देश सांभाळायला लागले..

राजाराममहाराज जिंजीला पोचल्याची बातमी बादशहाला कळली. त्याने लगेच झुल्फिकारखानाला जिंजीला पाठवलं. १६९० च्या ऑगस्ट २७ तारखेला मुघल फौजेचा जिंजीला वेढा पडला. रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण, संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांनी स्वराज्यात राहून बादशहाचा मुकाबला करण्यास सुरुवात केली. औरंगजेबाच्या छावणीत कैदेत असलेल्या येसूबाईंचं लक्ष स्वराज्यातील घडामोडींकडेच होतं. त्यांनी आपल्या दिराला निरोप पाठवला. “विशाळगडावरच्या आपल्या राण्या जिंजीला घेऊन जा. आमची काळजी करु नका. तुम्ही वैताग करु नये. राज्यचिन्हादि सर्व बाळगून व्यवहार करावा.” हा निरोप मिळाल्यावर राजाराम महाराजांना आपल्या बायकांना बादशहाच्या तावडीतून गुप्तपणे सुखरुप कसं आणावं याची चिंता लागली. मग सल्लागारांच्या मदतीने मार्ग ठरला. रामचंद्रपंत हुकुमतपनाह यांनी, ताराबाई, राजसबाई, अंबिकाबाई या तीन राण्यांना विशाळगडावरुन घाटाखाली पाठवलं. खंडो बल्लाळ यांच्या लिंगो शंकर-विसाजी शंकर या

मामांची राजापूरात सावकारी होती, त्यांची तारवं होती. त्या जहाजांमधून यशवंतगडच्या बंदरातून जहाजातून सर्व राणीवसा होनावरास आला. तिथून पायवाटेने, मोठ्या कष्टाने, मुघलांची सर्व ठाणी गुप्तपणे पार करत जिंजीला पोचला. ताराराणींच्या आयष्यातील पहिलं १० वर्षांचं रायगडावरचं एक पर्व संपलं.

जिंजीमधे ताराराणींच्या आयुष्याच्या दुसऱ्या पर्वाला सुरुवात झाली. तिथेच ९ जून १६९६ मधे त्यांना पुत्र झाला. त्याचं नाव शिवाजी ठेवण्यात आलं. तूर्तास तरी जिंजीमधला मुक्काम सर्वांनांच अपरिहार्य होता. झुल्फिकाराचा वेढा जिंजीला पडला होता. त्याला बादशहाकडून मदत आली तर त्याची सरशी, नसेल आपल्या लोकांची सरशी असा खेळ चालू होता. संताजी, धनाजी मुघल फौजेला हल्ले करुन हैराण करत होते. या हल्ल्यांना कंटाळून झुल्फिकार या हल्ल्यांमुळे सुटका करुन घ्यावी या विचारात होता. आपल्या स्वार्थासाठी निरनिराळ्या मागण्या घेऊन, स्वराज्यातून तिथेही येणारे लोकांचे लोंढे ताराराणी पाहात होत्या. हा काळ स्वराज्यात अतिशय गोंधळाचा होता. कुणीही उठावं, जिंजीला जावं, महाराजांकडून सनदा, इनामपत्रं, मानमरातबाचे कागद, करारपत्र आणावीत आणि राबवावीत मग रामचंद्रपंत अमात्यांकडे जावं, त्यांच्यकडूनही कागद करुन घ्यावेत, यामुळे शिवरायांनी लावलेली कुणालाही वतन न देण्याची शिस्तच मोडून गेली. पण या निर्नायकी काळात आपापल्या वतनाची काळजी घेणारे जरुरीचे होते. त्यामुळेच स्वराज्याचं रक्षण होत होतं. राजाराम महाराजांना कारभाराचा अनुभव नसल्यामुळे वारंवार पदं बदलली जाऊ लागली.

स्वराज्यात चाललेलं वृध्द बादशहाचं राजकारण, त्याचे कंटाळलेले आणि दिल्लीला जायला अधीर झालेले म्हातारे सरदार, आपल्या लोकांची अपूर्व एकजूट आणि सर्वशक्तीनिशी बादशहाशी चाललेला त्यांचा लढा, हे सारं ताराराणी येणाऱ्या लोकांकडून जिंजीत बसून ऐकत होत्या. राजाराममहाराजांना शाहूबाळाच्या जिवाची काळजी होती. स्वराज्यात बाळाजी विश्वनाथ नावाचा पुण्याचा सरसुभेदार कैदेतील राजघराण्यातील लोकांचा परामर्ष घेतो आहे हेही त्यांना कळलं होतं...त्या सगळं कानात साठवत होत्या, त्यावर विचार करत होत्या आणि स्वत:ला घडवत होत्या. याच काळात एक दुर्दैवी घटना घडली. ती म्हणजे संताजी आणि धनाजी यांच्यामधेच भांडण झालं, आयकुटवारवर दोघे लढले. संताजी शिवरायांच्या तालमीत तयार झालेला गडी. बादशहाकडून येणारी रागाची पत्रं, पैसा नाही या दयनीय अवस्थेमुळे कंटाळून तहाला आलेल्या झुल्फिकाराला संपवून टाकण्याचा मानस संताजींचा होता, पण राजाराम महाराजांनी संताजीची सूचना मान्य केली नाही. धन्याच्या मर्जीविरुध्द जायचं नसतं हेही संताजीला आवरता आलं नाही. त्याला महाराजांचं खानाबद्दलचं गुळमुळीत धोरण आवडेना. ते महाराजांशी वाद घालू लागले तेव्हा रामचंद्रपंतांनी समज दिली पण संताजींना ते पटलं नाही. नागोजी माने घटनेत सूड म्हणून संताजीचा जुलै १६९७ ला खून झाला आणि स्वराज्याची आणि कारभाऱ्यांची ताकद खच्ची झाली. ही फार मोठी हानी त्या कठीण काळात घडली.

महाराणी ताराराणीच्या आयुष्याचे ४ भाग होतात.

**१...** लग्नापासून पहिली दहा वर्षे रायगडावर १६८९ सालापर्यंत राजारामराजांबरोबर नजरकैदेत.

**२...** राजाराममहाराजांबरोबर १६९० ते १६९८ पर्यंत जिंजीचा मुक्काम, ९ जून १६९६ मधे शिवाजी ही पुत्रप्राप्ती, जिंजीहून सुटका, विशाळगडावर दाखल. सिंहगडावर राजाराम महाराजांचा २ मार्च १७०० या दिवशी मृत्यू. १६९८ मधे सातारा राजधानीची निर्मिती.

**३...**१० मार्च १७०० रोजी विशाळगडावर आपला पुत्र शिवाजी याची गादीवर स्थापना. स्वराज्याची सूत्रं हाती घेऊन, १७०० सालापासून १७१४ पर्यंत साताऱ्यातील सत्तेचा काळ, त्यात ७ वर्षे बादशहाशी टक्कर, १७०७ मधे बादशहाचा मृत्यू, शाहूराजांची कैदेतून सुटका, शाहूराजांशी गादीच्या दावेदारीचा हक्काचा झगडा, १७०८ मधे शाहूराजांचा साताऱ्यात राज्याभिषेक. १७१० साली कोल्हापूरहून ताराराणींचा कारभार. १७१४ मधे कोल्हापूरात सत्तांतर होऊन राजसबाईंचा पुत्र संभाजी गादीवर, ताराराणी राजसबाईंच्या कैदेत. १७२८सालापर्यंत कोल्हापूरात स्थानबध्द. नंतर संभाजीराजे आणि प्रतिनिधींच्या लढाईत, वारणा लढाईच्या पराभवानंतर १७२८ सालापासून मग १७४९ सालापर्यंत शाहूमहाराजांच्या कैदेत.

**४...१५ डिसेंबर १७४९ ला** शाहूमहाराजांच्या मृत्यूनंतर सातारा गादीच्या कारभारासाठी, बार्शी पानगावला गुप्तपणे ठेवलेला शिवाजीपुत्र नातू, रामराजाला सिंहासनावर बसवून कारभार हाती घेणं - त्याचं खोटेपण, रामराजाला कैद, यासंबंधी त्यांनी खेळलेल्या सत्तेसाठी राजकीय चाली. नानासाहेब पेशवा आणि त्यांच्यात झालेली शह काटशह यांची खेळी. पेशव्यांचे

प्रतिस्पर्धी गायकवाड – दाभाडे - यांना गोळा करुन परत एकदा पेशव्यांशी झगडा पण तिथे पेशव्यांची सरशी. सांगोल्याच्या लढाईत ताराराणींच्या पक्षाचा विमोड. स्वराज्याची हुकुमत हाती घेण्याचा सतत प्रयत्न आणि संग्राम. शेवटची ९ वर्षे परत सातारा किल्ल्यावर एकांतवास. पानिपताच्या उध्वस्त वादळात नानासाहेब पेशवा, सदाशीवभाऊ अनेक नामवंत सरदार यांचा परलोकवास, मराठा साम्राज्याचं एक नवीन वळण सुरु झालेलं नानासाहेबांचे पुत्र माधवराव पेशवेपदी आलेलं पाहिलं.

१० डिसेंबर १७६१ या दिवशी वयाच्या ८६ व्या वर्षी सातारा किल्ल्यावर ताराराणींचा कैलासवास. एवढ्या दीर्घायुष्याचा झोका फक्त कधी राणीपदाकडे किंवा कैदेकडे हिंदकळला. पण दोन्ही अवस्थेत त्यांची राज्य करण्याची धडपड, लालसा आणि त्यासाठी राजकारण खेळणं सतत चालू राहिलं.

## ताराराणी जिंजीला प्रयाण.

राजाराममहाराज जिंजीला पोचले. पाठोपाठ ताराराणीही पोचल्या. ताराराणींच्या दुसऱ्या पर्वाची सुरुवात झाली. राजाराम महाराजांनी आपल्यातर्फे राज्य करणारा प्रतिनिधी म्हणून प्रल्हाद निराजींची नेमणूक केली. हे पद नव्याने निर्माण केलं गेलं. प्रत्येक कठीण परिस्थितीत निर्णय घेण्याचं काम स्वराज्यात बसून रामचंद्रपंत हुकुमतपनाह घेत होते. त्यांच्या मदतीला श्रीवर्धनहून आलेला बाळाजी विश्वनाथ नावाचा तरुण सरसुभेदार रामचंद्रपंतांच्या मोठ्या जबाबदाऱ्या पार पाडत होता. झुल्फिकाराला दक्षिणेत स्वतंत्र व्हायचं होतं पण या जिंजीच्या वेढ्याला तोही कंटाळला. शेवटी झुल्फिकारखानाने

राजाराममहाराजांना पळून जाण्याची सूचना केली. महाराजांनी कोणत्या मार्गाने पळून जायचं, मुघल वेढा कोणत्या बाजूने पडणार हे गुप्तपणे कळवलं. रामचंद्रपंतही महाराजांच्या सुटकेच्या प्रयत्नात होते. संभाजीमहाराजांच्या काळात येसूबाईंचे बंधू गणोजी शिर्के, मोंगलांकडे चाकरीला होते. त्यांच्याशी खंडो बल्लाळाने गुप्त भेट घेतली आणि महाराज व त्यांचा राणीवसा यांना सोडवण्याची गळ घातली. गणोजी शिर्केने ते कबूल केलं. बक्षिसी म्हणून दाभोळची सरदेशमुखी त्यांना हवी होती. ते वतन खंडो बल्लाळांचंच होतं. त्यांनी ते लगेच देऊन टाकलं. त्यानंतर राजाराम महाराजांना बुरख्याच्या पालखीत बसवून, या आमच्या स्त्रिया आहेत असं सांगून गणोजीनेआपल्या तळावर आणलं. दुसरे दिवशी शिकारीला जाण्याच्या निमित्ताने महाराजांना घेऊन शिर्के बाहेर पडले. धनाजी जाधवांची फौज जवळच आलेली होती, राजाराममहाराजांना त्यांच्या स्वाधीन केलं. धनाजींनी महाराजांना वेलोरला नेलं. २२ फेब्रुवारी १७९८ या दिवशी, धनाजीने राजाराममहाराजांना विशाळगडावर सुखरूप आणलं. या चित्तथरारक सुटकेनंतर राजाराम महाराजांचा राणीवसा अजून जिंजीतच होता. झुल्फिकाराने महाराजांच्या राण्या ताराबाई आणि त्यांचा पुत्र शिवाजी, राजसबाई आणि त्यांची कन्या सोयराबाई, तिसरी राणी अंबिकाबाई, नाटकशाळा सगुणाबाई आणि तिचा मुलगा कर्ण यांना महाराष्ट्रात जाऊ दिलं. महाराजांचा खास विश्वासू गिरजोजी यादव याने वेलोरला या सर्वांना आणलं आणि मग स्वराज्यात पोचवलं. विशाळगडावर राजाराम महाराजांच्या दुसऱ्या पत्नीला, राजसबाईला १६९८ मधे पुत्र झाला. त्याचं नाव संभाजी ठेवण्यात आलं.

## ताराराणी: जिंजीहून मायदेशी.

अत्यंत रहस्यपूर्ण, नाट्यपूर्ण, उत्कंठावर्धक, अशा मार्गाने महाराजांची सुटका झाली. ताराराणींनी परत आपला मायदेश पाहिला. राजाराम महाराजांनी मग बादशहाच्या छावणीवर हल्ला करण्याची मोहीम आखली. पण या दगदगीने राजाराम महाराजांना खूप थकवा आला. ते स्वारीतून सिंहगडावर आले. तिथे काही दिवस त्यांना ताप आला आणि २ मार्च १७०० या दिवशी रक्ताच्या उलट्या होऊन महाराजांचं निधन झालं. राजाराम महाराजांच्या हृदयात दोष होता, त्यामुळे त्यांना शारीरिक दगदग सहन होत नसे. अनेक वेळा त्यांना खांद्यावर उचलून घ्यावं लागे. शिवरायांना राजारामाच्या जन्माची बातमी दिली आणि मुलगा पालथा जन्मलाय असं सांगितलं होतं, त्यावर महाराज क्षणात उद्गारले, म्हणजे तो मुघलशाही पालथी घालायला आलाय..

राजाराममहाराजांचा कैलासवास झाल्यावर त्यांचा नाटकशाळेचा पुत्र कर्ण हा राजा बनला पण ३ महिन्यातच देवी येऊन वारला. हुकुमतपनाह रामचंद्रपंतांनी शाहूच्या नावे कारभार करायची कल्पना राणीसमोर मांडली पण ताराराणीने ती झिडकारली आणि आपला ४ वर्षांचा मुलगा शिवाजी याचा, विशाळगडावर १०-३-१७००, चैत्र प्रतिपदेला राज्याभिषेक करवला. तेव्हापासून राणीने कारभार आपल्या हाती घेतला. मोठ्या आत्मविश्वासाने त्यांनी राजकारणात पदार्पण केलं पण ते सोपं नव्हतं. कारण लढाई बलाढ्य औरंगजेबाशी होती. अल्पावधीतच त्यांनी कारभारावर नियंत्रण मिळवलं, फौजेत हिंडून सैनिकांचा पाठिंबा मिळवला. शिवाजीराजाच्या नावाने सर्व सुभेदारांना, सरदारांना पत्रं पाठवायला सुरुवात केली. सैन्यामधेही त्या लौकरच

लोकप्रिय झाल्या. राणी हुशार होती, धाडसी होती. राणीच्या राज्याची सूत्रं हाती घेण्यामुळे बादशहाचा अपेक्षाभंग झाला. किल्ले जिंकले की स्वराज्य जिंकलं यावर आघात झाला. कारण राणीने सर्वच कारभार आपल्या हाती घेतला. ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांच्या नेमणूका करवल्या, सारावसूली, पीकपाणी, स्वराज्याबाहेरच्या मुघल तळांवर छापे घालणं, त्याची जबाबदारी एकेका सरदाराकडे सोपवणं, सगळं त्या करायला लागल्या. त्यांनी महत्त्वाच्या नेमणूका केल्या. त्या म्हणजे परशुरामपंत त्र्यंबक यांना प्रतिनिधी म्हणून नेमलं. शंकराजी नारायण यांना सचिव केलं, रामचंद्रपंत अमात्यच राहिले. त्यातही परशुरामपंतांना राणीने जास्त विश्वासातलं मानलं. यामुळे रामचंद्रपंत आणि परशुरामपंत प्रतिनिधी यांच्या दुरावा वाढायला लागला. राणीच्या मनात रामचंद्रपंतांबद्दल गैरसमज वाढवण्याचा उद्योग त्यांनी सुरु केला. त्यामुळे आजवर दहा वर्षे स्वराज्य सांभाळणारे रामचंद्रपंत काहीसे मागे पडले.

स्वराज्य संपवायला औरंगजेबाने प्रथम २१ एप्रिल १७०० या दिवशी राजधानीचं सातारा जिंकलं आणि आझमतारा नाव ठेवलं. पाठोपाठ रामदास स्वामींची परळीही परशुरामपंत प्रतिनिधींच्या हातची गेली. नवरसतारा हे नवीन नाव परळीला मिळालं. औरंगजेब मग विशाळगडावर चालून गेला. त्यापूर्वी तो आपला दाणागोटा येण्याची वाट पाहात थांबला. मराठ्यांना हे कळल्याबरोबर त्यांनी छापा घालून सर्व रसद लुटून आणली. किल्ले जिंकत जाताना बादशहाने प्राणी आणि मनुष्यहानीही खूप अनुभवली. बादशहा स्वारीसाठी छावणी हलवत चालला होता. ३० ऑगस्ट १७०० ला बादशहाने आपला तळ खवासपूरला हलवला. तिथे जरा सगळं बस्तान बसलं असतांनाच मध्यरात्री

अचानक पूराचं पाणी छावणीत शिरलं. जनावरं आणि माणसं वाहून जायला लागली. छावणीत आरडाओरडा सुरु झाला. बादशहाला मराठ्यांची फौज हल्ला करायला आली असंच वाटलं. तो रात्रीच्या अंधारात सावध होऊन शामियानात चालायला लागला तेव्हा अडखळून पडला आणि त्याच्या गुडघ्याला जबरदस्त मार बसला. हकिमांनी इलाज केले पण तो गुडघा कधीच बरा झाला नाही. औरंगजेब कायमच लंगडा झाला. बादशहाच्या भाटांनी त्याचा पूर्वज तैमूर हा असाच लंगडा झाला आणि त्यानंतर त्याने जग जिंकलं, म्हणजे खाविंदही आता जगज्जेते होणार अशी बादशहाची समजूत काढली. दरबारात औरंगजेब येऊन बसल्यावर त्याच्यासमोरचा पडदा हटवला जाई.

इकडे ताराराणीच्या हाताखाली त्यांच्या फौजेनेही मुघलांना छळायची नवीन नीती आरंभली. प्रवासात असलेल्या मुघल फौजेवर मागच्या

बाजूने हल्ले करुन त्यांचा खजिना, दाणा वैरण लुटायचं, नाहीतर त्यांच्या छावणीवर हल्ला करुन त्यांना लुटायचं. अधिकाऱ्यांना पकडायचं आणि त्यांच्या सुटकेसाठी भरपूर खंडणी मागायची असं कितीतरी वेळा घडलं. आग्र्याहून बादशहाचा खजिना येत असतांना तो पळवायचा. या गनिमीकाव्यामुळे मुघल फौज त्रस्त व्हायला लागली. किल्ला लढवतांनाही नवीन धोरण आखलं गेलं. भरपूर पैसे घ्यायचे, मुघल सरदाराला किल्ला द्यायचा, सरदाराने त्या किल्ल्यात रसद भरुन ठेवली की जायचं आणि हल्ला करुन किल्ला मिळवायचा. मुघलांच्या ज्या किल्ल्यांना पुरेशी फौज नाही असे किल्ले ते निवडायचे. एकूणच, ताराराणीने बादशहाची झोप उडवली होती. मराठे बऱ्हाणपूरावर गेले, तिथून गोवळकोंड्यावर गेले, वेलोरवर गेले, वऱ्हाडवर

गेले, जातांना वाटेतली ठाणी उध्वस्त करत गेले..मराठी फौजेने ग्वाल्हेर लुटलं, ते सिरोंजवर गेले. मराठ्यांच्या फौजा मछलीपटणपर्यंत पोचल्या. कर्नाटकात शिरे, तिथून त्रिचनापल्ली, मग तंजावर, मराठी फौजेने औरंगजेबाचा सारा मुलूख ढवळून काढला.

औरंगजेबाच्या आठवणी लिहिणाऱ्या मनुचीने लिहून ठेवलंय की मराठे सैनिक धाडसी आणि चतुर म्हणून सर्व हिंदुस्थानात त्यांचा लौकिक आहे. मराठ्यांचे सर्व किल्ले घेतल्याशिवाय राहणार नाही असं त्याने ठरवलं तर तर तो जितकी वर्षे जगला तितकीच वर्षे त्याला जगावे लागेल. आपला लौकिक धुळीला मिळू नये या विचारानेच तो लढतो आहे. तसं नसतं तर त्याने कधीच युध्द आवरतं घेतलं असतं. या ठिकठिकाणी लढणाऱ्या अनेक सरदारांना मार्गदर्शन करणारा कुणीही एक मुख्य सेनापती नाही तरी ते विजय मिळवत आहेत. ताराराणीच्या नेतृत्त्वाखाली केवढा हा लौकिक मराठ्यांनी मिळवला. या काळात ताराराणीचं कर्तृत्व झळाळून उठलं.

१७०० सालापासून १७०७ पर्यंत सात वर्षे ताराराणींचा हा औरंगजेबाशी झगडा चालला. आणि अचानक ग्रह बदलले. ८७ वर्षांचा वृध्द औरंगजेब अहमदनगरकडे चालायला लागला आणि शेवटी २० फेब्रुवारी, १७०७ ला अहमदनगरला त्याने शेवटचा श्वास घेतला. जेव्हा एखाद्या राष्ट्रपुरुषाचा अंत होतो, तेव्हा साऱ्या राजकारणाला नवीन वळण लागतं. औरंगजेबाच्या मृत्यूने त्याच्यानंतर मुघलशाही जशी पुढच्या शतकामधे खिळखिळी झाली तसा स्वराज्याचा प्रवाहही बदलला. महाराष्ट्रात रामचंद्रपंत अमात्यांचा अस्त होऊन बाळाजी विश्वनाथ भट नावाचा श्रीवर्धनचा नवीन

मुत्सद्दी उदयाला आला. त्याने शाहूची बाजू भक्कम केली. बाळाजी विश्वनाथांच्या वंशाने पुढे स्वराज्याला यमुनेपर्यंत नेऊन भिडवलं. शाहूराजांनीच स्वत:च पुढाकार घेऊन केलेली कोल्हापूर गादीची निर्मिती हे औरंगजेबाच्या जाण्यानंतरचे स्वराज्यातील बदललेले पश्चात परिणाम होते.

दिल्लीकडे जाणाऱ्या शहजादांमुळे दोराहावर मुघल कैदेतून सुटलेले शाहूराजे लामकानीला, खानदेशापर्यंत पोचले. तिथून त्यांनी सर्व सरदारांना पत्रं लिहून पाठिंबा मिळवायला सुरुवात केली तेव्हा ताराराणींनी विरोधाची ठाम भूमिका घेतली. त्या म्हणाल्या, शिवाजीमहाराजांनी मिळवलेलं राज्य संभाजीमहाराजांनी घालवलं. आता जे आहे ते राजाराममहाराजांनी संपादलेलं राज्य आहे म्हणून माझाच अधिकार आहे. त्यांचा दुसरा मुद्दा होता की शाहूमहाराजांनी ज्या अर्थी सनदा मिळवून सुभेदारी घेतली त्या अर्थी स्वतंत्र स्वराज्याची जाणीव त्यात नाही, म्हणून शाहूराजांचा गादीवर हक्क नाही. ते मांडलिक बनले आहेत. तिसरा त्यांचा मुद्दा होता की हे शाहूराजे तोतया आहेत. खरे शाहूराजे नाहीतच. त्यांनी खंडो बल्लाळांना खऱ्याखोट्याची खात्री करुन घ्यायला पाठवलं. पण बिंब खरं असा जेव्हा त्यांचा निरोप आला तेव्हा ताराराणींनी तो आक्षेप सोडून दिला. परसोजी भोसले, खंडो बल्लाळ, बाळाजी विश्वनाथांसारखे प्रमुख शाहूराजांना जाऊन मिळाले तेव्हा ताराराणींची बाजू आणखीनच कमकुवत झाली. आपल्या संस्कृतीमधे ज्येष्ठ पुत्राचाच गादीवर हक्क असतो हे त्रेता युगातील रामकथेपासूनचे संस्कार आहेत. त्यामुळे स्वराज्यात दोन तट पडले. एक पक्ष संभाजींचा पुत्र शाहूराजांच्या मागे आणि दुसरा पक्ष, ताराराणीच्यामागे उभे असणारे. तिसऱ्या प्रकारात, काही लोक

कुंपणावरचे बसलेले होते. कोणत्या पक्षाचा निकाल लागतो ते पाहून त्या वारसाकडे जाण्याचा त्यांचा कल होता. शाहूराजे अहमदनगरवर २ महिने राहिले. तिथे त्यांनी आपला पक्ष तयार केला. शेवटी शाहूराजे पुण्याजवळ येऊन पोचले. त्यांना स्वराज्यातील अनेक सरदार जाऊन मिळाले. ताराराणीही शाहूराजांशी संघर्षाच्या पवित्र्यात सज्ज झाली.

शाहूराजे ऑगस्टमधे अहमदनगरवर आल्यावर सत्तेचा संघर्ष अधिक गहिरा झाला. लढण्यशिवाय पर्याय उरला नाही. ताराराणी आणि शाहूची फौज, भीमा नदीच्या काठी पुण्यापासून २२ मैलांवर खेडच्या ( आताचं राजगुरुनगर ) नजिक येऊन थांबल्या. भीमेच्या दुसऱ्या तीरावर समोर कडूस गावाच्या नजिक ताराराणीच्या फौजा येऊन थडकल्या. शाहूला स्वत:ची फौज नव्हती ना पैसा होता, पण ज्यांचा भक्कम आधार शाहूराजांना मिळाला. त्यात होते परसोजी भोसले, खंडो बल्लाळ आणि तिसरे होते बाळाजी विश्वनाथ. धनाजी जाधव, परशुरामपंत प्रतिनिधी आणि रामचंद्रपंत अमात्य हे सर्व खंदे लोक ताराराणींच्या पक्षात होते. तरीही १२ ऑक्टोबर, धनत्रयोदशीच्या दिवशी झालेल्या लढाईत शाहूराजांचा विजय झाला तो त्यांच्या मुत्सद्दीपणामुळे. ताराराणीची फौजेची ताकद बाळाजी विश्वनाथांनी सेनापती धनाजी जाधवांचं मन वळवून आपल्याकडे वळवली. धनाजी जाधव लढाईत उतरलेच नाहीत. लढाईनंतर धनाजी जाधव शाहूंच्या पक्षाला मिळाले. ताराराणींचा पराभव झाला. ताराराणी पन्हाळ्यावर निघून गेल्या. पाठोपाठ शाहूराजांनी १ जानेवारी १७०८ या दिवशी साताराही जिंकलं. तिथे सैख मीरा नावाचा किल्लेदार होता, त्याच्या कुटुंबाला शाहूराजांनी पकडलं आणि कैदेत ठेवलं. त्याबरोबर शेखमीराने लगेच किल्ला

शाहूराजांच्या हवाली केला. परशुरामपंत प्रतिनिधी अटकेत पडले. खंडेराव दाभाड्यांनाही शाहूराजांच्या फौजेने पकडून नेलं. त्यामुळे ताराराणींची बाजू आणखीनच लंगडी झाली. पण त्या खचल्या नाहीत. सत्तेचे दोर आपल्या हाती घेण्याची त्यांची धडपड चालूच राहिली. या निर्णायक लढाईनंतर शाहूराजांनी थाटाने १२ जानेवारी १७०८ या दिवशी राज्याभिषेक करुन घेतला. सातारा ही राजधानीचं रुप घेतलेली महत्त्वाची नगरी बनली. राज्याभिषेकानंतर ४ दिवसांमधेच भाऊबंदकी टाळावी म्हणून शाहूराजांनी एक राज्याच्या वाटणीचा एक प्रस्ताव राणीकडे पाठवला. पण ताराराणींनी तो नाकारला. सर्व सत्ता काबीज करण्याची त्यांनी अजून हार मानली नव्हती. जिद्दी, आक्रमक ताराराणींच्या आयुष्याने आणखी एक वळण घेतलं.

## ताराराणी : ताराराणी कैदेत.

खेडच्या लढाईत पराभव झाल्यावर ताराराणींनी पन्हाळ्यावर आपल्या नवीन फौजेची उभारणी केली. परत दोन्ही फौजा एकमेकींना भिडल्या. पन्हाळाही ताराराणींना सुरक्षित राहिला नाही तेव्हा त्या रांगण्यावर जाऊन राहिल्या. पन्हाळा सहज शाहूराजांच्या हाती पडला तेव्हाच पुढची स्वारी रांगण्यावर हे निश्चित झालं. त्यामुळे रामचंद्रपंत अमात्यांनी ताराराणी, शिवाजी, दुसरी राणी राजसबाई आणि संभाजी यांना मालवणच्या सिंधुदुर्ग किल्ल्यात पावसाळ्यात सुरक्षित नेऊन ठेवलं. पन्हाळ्यावर शाहूराजांचा मुक्काम असतानांच, सेनापती धनाजी जाधवांचं निधन झाल्याची बातमी आली तेव्हा शाहूमहाराज साताऱ्याला परतले आणि धनाजींचा पुत्र चंद्रसेन जाधवांची वडिलांच्या जागी नेमणूक केली. रांगण्याची मोहीम लांबत चालली, तेव्हा ती

जबाबदारी त्यांनी परसोजी भोसले यांच्यावर सोपवली. ही सुवर्णसंधी ताराराणींनी सोडली नाही. १७१० सालात त्यांनी परसोजींवर हल्ला केला. परसोजी हरले आणि पन्हाळा, कोल्हापूर हा प्रदेश ताराराणींकडे आला. आता फक्त सातारा जिंकायची उमेद त्या बाळगून होत्या. कोल्हापूर आणि पन्हाळ्याचा मुलुख हाती आल्याबरोबर ताराराणींनी सावंतवाडीकरांचाही विरोध मोडून काढला आणि पन्हाळा ही आपली राजधानी असल्याचं जाहीर केलं. आपला पुत्र शिवाजीच्या नावाने छत्रपतीपदाची द्वाही फिरवून छत्रपतींची राजधानी सातारा नसून पन्हाळा आहे हे जनतेने जाणावं असं जाहीर केलं. अशातऱ्हेने सातारा आणि कोल्हापूर या स्वराज्याच्या दोन शाखांनी जन्म घेतला पण अजून निर्णायक निकाल लागला नव्हताच.

दोघांच्यात स्पर्धा आणि डावपेंच सतत चालू होते. सरदारांना आपल्याकडे वळवणं चालू होतं. अनेकांनी शाहूराजांनाच पसंती दिली होती आणि त्यांचा जोर वाढतो आहे हे पाहून ताराराणींकडचे सरदारही शाहूमहाराजांना जाऊन मिळत होते. याचवेळी बाळाजी विश्वनाथ या नवीन मुत्सद्याचा साताऱ्यात शाहूराजांना आधार मिळत होता. पन्हाळ्याहून ताराराणींचा कारभार सुरु झाला त्याचवेळी १७११ सालात बाळाजी विश्वनाथांचं आणि सेनापती बनलेल्या चंद्रसेन जाधवाचं एका क्षुल्लक हरिणावरुन तंटा लागला आणि त्यात चंद्रसेन जाधव सरळ ताराराणींना जाऊन मिळाला. यामुळे ताराराणींना आणखी हुरुप आला. ताराराणी आणि चंद्रसेन जाधव हे दोघे आक्रमक आणि मुत्सद्देगिरीला दुय्यम मानून बळाच्या वापरावर विश्वास ठेवणारे तर बाळाजी विश्वनाथ आणि शाहूराजे हे दोघे विरोधकांची मनं

वळवून त्यांना आपल्या पक्षात ओढण्याचा कल असणारे होते. नोव्हेंबर १७१३ ला बाळाजी विश्वनाथांना शाहूमहाराजांनी पेशवेपद दिलं त्यानंतर बाळाजी विश्वनाथांनी साऱ्या समुद्र किनाऱ्याचा मुख्य कान्होजी आंग्रे याला केवळ मुत्सद्देगिरीच्या बळावर आपल्या पक्षात ओढून आणलं त्यामुळे तर ताराराणींची ताकद आणखीनच कमी झाली. ताराराणींच्या कारभारात चंद्रसेन जाधव आणि परशुरामपंत प्रतिनिधींचं महत्त्व वाढलं. रामचंद्रपंत काहीसे मागे पडले. परशुरामपंतांशी त्यांचं अजिबात जमत नव्हतं. परशुरामपंतांनी ताराराणींच्या मनात रामचंद्रपंतांबद्दल गैरसमज निर्माण करण्याचा सतत प्रयत्न केला, तेव्हा चिडलेल्या रामचंद्रपंतांनी शाहूला अनुकूल असं वर्तन केल्याची बातमी ताराराणीला कळल्यावर ताराराणींनी रामचंद्रपंतांना रुप्याची बेडी घालून कैद करुन ठेवलं. त्यामुळे तेही आणखीनच बिथरले आणि अनेक सरदारांना त्यांनी शाहूराजाकडे पाठवलं. आता ते राणीच्या पक्षातून मनाने दूर गेलेलेच होते. राणीचा पक्ष आणखी कमकुवत झाला. तेव्हा ताराराणींनी रामचंद्रपंतांना बाहेर काढून शिवाजी आणि संभाजी या दोन्ही मुलांना त्यांच्या मांडीवर ठेवून कारभार पाहायला सांगितलं. मग ते कारभार पाहू लागले.

१७१४ सालात दोन वारसांमधे चाललेल्या या झगड्याला अचानक कलाटणी मिळाली ती खुद्द कोल्हापूरमधेच. एक दिवस अचानक कोल्हापूरात रक्तशून्य क्रांती झाली आणि राजसबाईंचा पुत्र संभाजीराजांची गादीवर नेमणूक झाली. ताराराणी आणि शिवाजी, अचानक कैदेत पडले. १७१४ सालच्या सप्टेंबर ऑक्टोबरमधे कधीतरी अचानक ही क्रांती झाली. जसे काही राजयोगी ग्रह आकाशामंडलातून हद्दपार व्हावेत त्याप्रमाणे ताराराणीचं पुढचं ३६ वर्षाचं

आयुष्य बंदिवासात गेलं. ताराराणींना गाफील ठेवून हे सत्तांतर घडवणं सोपं काम नव्हतं. पण ते घडलं. कुणी घडवलं, कसं घडवलं यांचा थांगपत्ता खुद्द ताराराणीलाच कळला नाही, नाहीतर कट करणारा जिवंत राहिला नसता. ताराराणींनी पत्रात लिहिलं, कालपरत्वे आमचा प्रसंग विस्कळीत होऊन संभाजीराजे आणि राजसबाई यांनी गिरजोजी यादव, अंताजी त्रिमळ, आणि गडकरी तुरोजी शितोळे यांस पुढे करुन किल्ले पन्हाळा येथे संभाजीराजे यांस गादीवर बसवले, आम्हास संकटी घातले. वर्षानुवर्षाचा जुना विश्वासू गिरजोजी यादवही विरोधात गेला. चाणक्याला दुखावलं तर धनानंदाला गादीवरुन उतरावं लागतं. शाहूराजांचा जोर त्यानंतर वाढतच गेला. पेशवे बाळाजी विश्वनाथांनी दिल्लीहून सनदा आणल्या. येसूराणी, मदनसिंग, वगैरेंची सुटका करुन देशी आणलं. २ एप्रिल १७२० मधे बाळाजी विश्वनाथांचं देहावसान झालं आणि १५ दिवसांनी, १७ एप्रिल १७२० ला २० वर्षांचे बाजीराव पेशवेपदावर आले. त्यांच्या पराक्रमाने स्वराज्याच्या सीमा यमुनेला जाऊन भिडल्या.

बाजीरावाच्या काळात निजाम उल्मुल्कने, शाहूराजांना शह द्यायला संभाजीराजांना हाताश धरुन स्वराज्यात युध्दाचा धुमाकूळ उठावला. पेशवे बाजीरावांनी पालखेडवर निजामाचा पूर्ण पराभव केला आणि संभाजीराजांना हात न लावण्याचं कलम लिहून घेतलं. त्यानंतर शाहूमहाराजांनी श्रीनिवासराव प्रतिनिधींना संभाजीराजांवर पाठवलं. मार्च १७३० या दिवशी वारणेवर संभाजीराजांचा पराभव झाला. त्यांच्या सर्व बायकामुलांना श्रीनिवासरावांनी कोल्हापूरला सुखरुप पाठवलं. ताराराणींनी सवतीच्या हाताखाली कोल्हापूरला जाणं नाकारलं आणि त्या शाहूराजांच्या आसऱ्याला आल्या. शाहूराजांनी

सातारा किल्लावर त्यांची राहण्याची सोय करुन त्यांना नजरकैदेत ठेवलं. शाहूमहाराजांनी मग व्यवस्थितपणे स्वराज्याची वाटणीकरुन १३ एप्रिल १७३१रोजी संभाजीराजांना मुलुख वाटून दिला त्यामुळे कोल्हापूर गादीची निर्मिती झाली.

शाहूराजांचा हा लौकिक वाढत असतांनाच महाराज मात्र गादीला वारस नाही, पोटी पुत्र नाही म्हणून दु:खी होते. त्यातच त्यांची आवडती राणी सगुणाबाई यांचं निधन झालं. १७४० मधे बाजीराव आणि चिमाजीआपांचंही निधन झालं. शाहूराजांची प्रकृती बिघडायला लागली. ते जेव्हा आजारी पडले तेव्हा गादीचा वारस कोण करावा याचा विचार सुरु झाला. संभाजीराजांना वारस करुन सातारा-कोल्हापूर गाद्या एक करण्याच्या योजेनेला महाराजांची थोरली राणी सकवारबाई हिचा विरोध होता. संभाजीराजांना आवरशक्ती नाही म्हणून शाहूराजांनाही ते योग्य वाटत नव्हते. त्यामुळे नवीन वारसाची शोधाशोध सुरु झाली. तेव्हा ७५ वर्षांच्या ताराराणी परत नव्या जोमाने राजकारणात उतरल्या. त्यांनी महाराजांना निरोप पाठवला की घरचा वारस असतांना बाहेरचा का शोधता? शाहूराजांनाच काय पण कुणालाच त्याचा अर्थबोध झाला नाही. तेव्हा ताराराणींनी सांगितलं की आपला नातू, शिवाजीचा मुलगा, आपण गुप्तरुपाने ठेवला असून त्याला धनी करावा." सारे दरबारी आणि राजवाडा या वाक्याने थक्क झाले. लगेच सर्वांच्या प्रतिक्रिया उमटल्या. शाहूराजांना ताराराणींनी सर्व खुलासा केला. त्यांनी सांगितलं की आपला पुत्र शिवाजी वारला तेव्हा त्यांची पत्नी भवानीबाई गरोदर होती. शिवाजी गेल्यावर, तिला ३ महिन्यांनी मुलगा झाला. सुरुवातीला तो पन्हाळ्यावर ३ वर्षे होता. नंतर तो गुप्तपणे अमात्यांकडे

बावडा इथे ठेवला. परदेशी रजपूत याच्यामार्फत हे काम केलं. जेव्हा कोल्हापूरची राणी जिजाबाई यांना ही गुप्त बातमी समजली तेव्हा त्यांनी रामराजाला संपवण्यासाठी हल्ला केला. तेव्हा रामराजाला पानगावाला त्याची बहीण दर्याबाई निंबाळकर यांच्याकडे पाठवलं. ताराराणी अधूनमधून विश्वासू माणूस पाठवून त्या मुलाची चौकशी करत असत. तो रामराजा हा मुलगा तिथेच आहे."

शाहूमहाराजांचं मत पडलं की २० वर्षाच्या या मुलाचा शोध घेऊन शहानिशा करणं भाग आहे. सकवारबाईंनी सरळ सरळ आरोप केला की हे सारं ताराराणीसाहेबांचं थोतांड आहे. म्हणून ताराबाईंचा बंदोबस्त करावा. संभाजीस आणून त्यास गादी द्यावी. त्यावेळी नानासाहेब पेशवेपदावर होते. सारंच प्रकरण चिडीला गेलं. सकवारबाईंनी शाहूमहाराजांच्या भेटीला यायची सर्वांना बंदी घातली. त्यामुळे पेशव्यांनाही शाहूमहाराजांची भेट घेणं जड व्हायला लागलं. पण त्यांनी शाहूमहाराजांच्या पडत्या फळाची आज्ञा घेऊन या नातवाचा शोध घेण्याचं ठरवलं आणि दत्तक घेतांना काहीही विपरित घडू नये म्हणून महाराजांना सर्वांच्या प्रतिक्रियांची कल्पना दिली. तेव्हा शाहूमहाराजांनी हा कठीण समय पाहून पंतप्रधानांना एकांती बोलावलं. गोविंदरायांच्या विद्यमाने सर्व ठरवून, आपल्या सर्व अखेरच्या इच्छांची यादी स्वहस्ते लिहून दिली. आपल्या हयातीत ताराराणींच्या गादीवर बसवण्याचा महाराजांचा बेत होता पण सकवारबाई त्याला काहीतरी अपाय करेल या भीतीने तो बेत रहित केला.

शाहूमहाराजांचा २० वर्षांच्या रामराजाला दत्तक घेण्याचा बेत तडीस जाण्यासाठी थोरल्या राणीसाहेब सकवारबाई यांनाही विश्वासात घेणं जरुरीचं

होतं. सकवारबाईंना महाराजांचा बेत पसंत पडला नाही. त्यामागे ताराराणींचा काहीतरी डाव आहे याची त्यांना खात्री होती. हा रामराजा खरा वंशज नव्हे असं त्यांनी स्पष्ट मत दिलं. भोसल्यांच्याच कुळातील खऱ्या वंशजाकडे गादी द्यावी असा त्यांनी सल्ला दिला. पण असं केल्याने ताराराणीचा वारस आणि नवीन वारस यांच्यात कलह सुरु होईल यादवी माजेल हे पटवून देण्याचा प्रयत्न केला पण सकवारबाईंना ते पटलं नाही. शाहूराजांची वारस खरा असल्याची खात्री होती. ताराराणींमुळे राजकीय गोंधळ माजला. राज्यावर अनपेक्षित संकट आलं. या सर्व संकटात भर पडली ती आणखी एका गहिऱ्या संकटाची. ती म्हणजे शाहूमहाराजांचा कैलासवास झाला. १५ डिसेंबर १७४९ या दिवशी महाराजांनी प्राण सोडला. थोरली राणी सकवारबाईंना सती जावं लागलं. ताराबाईंचा रामराजांना गादीवर बसवायचा मार्ग मोकळा झाला. शाहूमहाराजांचा तेरावा दिवस झाल्यावर ४ जानेवारी १७५० या दिवशी रामराजांना साताऱ्यात आणण्यात आलं. त्याचदिवशी संध्याकाळी त्यांचा राज्यारोहण विधी झाला.

स्वराज्याच्या प्रवाहाला नवीन कलाटणी मिळाली. ताराराणींच्या आयुष्यात परत एकदा नवीन पर्व सुरु झालं. कैलासवासी थोरले छत्रपती संभाजीमहाराज संकटाने घेरले गेलेले असतांना शिवयोगी नावाच्या मंत्रविद्या जाणणाऱ्या योग्याने त्यांना कालिमातेची आराधना करा म्हणजे ती तुम्हाला पुत्र देईल. तो पुत्र तुमच्या स्वराज्याचं निवारण करेल आणि भाग्य संपादन करेल असं सांगितलं होतं. तो कालिमातेच्या प्रसादाने झालेला पुत्र शाहूराजा खरंच स्वराज्याचा भाग्योदय करुन परलोकी गेला होता.

## ताराराणी    ; परत सत्तेत.

मार्गशीर्ष व ॥ ३, पुष्य नक्षत्र, शके १६४९, शुक्ल संवत्सरी, १५ डिसेंबर १७४९ या दिवशी, सकाळी, अजानुबाहू, अजातशत्रू शाहूमहाराजांचा काल झाला. त्यांच्या तोंडून कधीही “मारा” ही शिक्षा बाहेर पडली नाही. ४ महिने आधीपासून, ऑगस्टपासून ते अंथरुणाला खिळलेले होते. आपला शेवट जवळ आल्यावर कृष्णातीरी राहायचं ठरवून, माहुली-साताराच्या मधे छप्परबंद डेरे देऊन त्यास वनवासवाडी म्हणू लागले आणि तिथेच राहिले. पण नंतर रंगमहालात येऊन राहिले. जाण्यापूर्वी सकाळी अंगाला भस्म लावलं, रुद्राक्ष गळ्यात घातलं, दर्भासनावर पांढरी घोंगडी टाकली, ११ वेळा रामनाम आणि शिवहरहर म्हणत प्राण सोडला. थोरली राणी सकवारबाई सती गेल्या. नव्हे, राजकीय परिस्थितीमुळे त्यांना जावं लागलं. महाराजांची शेवटची ५ वर्षं अत्यंत मानसिक त्रासाची झाली. सकवारबाई आणि सगुणाबाई या दोन राण्यांमधली भांडणं, त्यांचा आवडता हत्ती मदारीही मेला, वारस कुणाला करायचं याची चिंता, प्रकृती साथ देईना अशा मानसिक त्रासातून गेले. अशा अवस्थेत, कोल्हापूरच्या संभाजीराजांना, तेही वृध्द आणि त्यांनाही संतान नाही म्हणून त्यांना वारस न करता ताराराणींचा नातू गादीवर बसवायचं त्यांनी नक्की केलं. ताराराणींवर विश्वास न टाकून तरी कसं चालेल ?

शाहूराजे निवर्तले त्याच दिवशी त्यांनी काही प्रमुख मुत्सद्दी बार्शी पानगावला ताराराणींच्या नातवाला आणायला पाठवलं होतं. रामराजांची बहीण, दर्याबाई निंबाळकरांना सर्वजण भेटले. दर्याबाई निंबाळकर यांच्यासाठी ताराराणीने आपली अंगठी खूण म्हणून दिली. त्यानंतर सर्व मंडळी मिरवणूकीने

साताऱ्यानजिक वडूथला आली. कृष्णा नदीच्या उत्तर तीरावर, शकुंतेश्वराच्या मंदिरात, तिथे रामराजांनी ताराबाईंची भेट घेतली. पण शाहूराजांच्या निधनामुळे त्यांचा १३ वा दिवस झाल्यावर ४ जानेवारी १७५० या दिवशी शहरात आले. त्याच दिवशी संध्याकाळी रामराजांना सिंहासनावर बसवलं.

२० वर्षांच्या अनुभव नसलेल्या रामराजांना आपलं राजेपद हे किती काटेरी आणि बेचव आहे हे लगेच कळायला लागलं. कारण लगेच ताराराणी आणि पेशवे या दोघांमधे रामराजांना ताब्यात ठेवण्याची स्पर्धा सुरु झाली. ज्यांच्या हाती रामराजे, त्यांची सत्ता चालणार होती. रामराजे या सर्वच विश्वाला अजाणते होते, नवीन माणसं, नवीन भूमिका, नवीन राजकारण, सर्वांपासून खूप दूर होते. त्यांची या दोघांच्या ओढाताणीत प्रचंड कुचंबणा व्हायला लागली. त्यावर उपाय म्हणून नानासाहेब पेशव्यांनी रामराजांच्या मार्फत ताराराणींना त्यांनी फक्त सल्लागार म्हणून राहावं ही सूचना करवली पण त्याचा परिणाम उलटाच झाला. ताराराणींना रामराजांनी सुचवलेला तो अपमान वाटला आणि त्यांनी रामराजांवरचे निर्बंध आणखीनच कडक केले. राज्य चालवण्याची जबाबदारी असलेल्या नानासाहेब पेशव्यांना, अजाण रामराजे आणि कारस्थानी, ताराराणी या दोघांच्या हाती सत्ता एकत्र जाणं अथवा विभागली जाणं धोक्याचं वाटत होतं. तूर्त तरी त्यांनी काय काय होतंय ते पाहाण्याचं ठरवलं. रामराजांना ताराराणींचा वचक त्रासाचा व्हायला लागला. त्याचं मन पेशव्यांकडे वळतंय हे राणीला सहन होईना. ताराराणी साताऱ्यात किल्ल्यावर आणि रामराजे खाली शहरात अशी निवासस्थानं होती. राजे ताराराणींना

भेटायला गेले की आपल्या आजींचं ऐका आणि तसा कारभार करा असा सल्ला राणीच्या सल्लागारांकडून त्यांना मिळायचा. ते ताराणींना दुरुत्तरं करायचे.

ताराराणींसाठी पेशव्यांचा शह संपवणं त्यांना जरुरीचं होतं. म्हणून पेशव्यांच्या विरोधकांना त्यांनी गोळा करायला सुरुवात केली. कोल्हापूरच्या संभाजीराजांना गादीवर बसवण्याचा प्रयत्न करायला सुरुवात केली. राज्य त्या दोघांच्या मालकीचं होतं. पेशवे राज्य चालवण्याच्या जबाबदारीने वागत होते. तो काळ स्वराज्यासाठी अत्यंत अस्थिर राजकारणाचा होता. त्यातच आपलं न ऐकणाऱ्या रामराजावर तू खरा नातू नाहीस, तू भोसले कुळाचाही नाहीस, उचल्या आहेस असा वारंवार, असा सर्वांसमक्ष गवगवा ताराबाईंनी अचानक सुरु केल्यावर तर सर्वच जण थक्क झाले. ताराराणींनीच आपला नातू असल्याचं शपथेवार सांगितलं होतं, आता ते नाटक ठरण्याची वेळ आली. दरबारातील मुत्सद्दी, सरदार, सारेच गोंधळात पडले. ज्या बुऱ्हाणजी मोहित्यांनी आपली मुलगी रामराजांना दिली होती त्यांची स्थिती तर आणखीनच वाईट झाली. ते इतके खचले की त्यांनी जिवाचं बरंवाईट करुन घेण्याचा निर्धार जाहीर केला. त्यामुळे ताराराणी विरुध्द पेशवे असे दोन तट आपोआप तयार झाले. या घटनेचे पडसाद राज्यभर उमटायला लागले आणि विश्वास ठेवायचा तो राणीसाहेबांवरच अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली. थोरल्या राणीसाहेब सकवारबाई जे म्हणत होत्या तेच खरं अशी गोंधळाची अवस्था झाली. पण हे सर्व सत्तेचा खेळ जिंकण्यासाठीच ताराराणींनी फासे टाकले होते. ताराराणींच्या मनासारखं होऊनही संघर्ष थांबलाच नाही अशी विचित्र कोंडी होऊन बसली. आता रामराजा खरा की खोटा याची शहानिशा व्हायलाच हवी होती.

नानासाहेब पेशव्यांनी चिडलेल्या ताराबाईंना शांत करण्याचे प्रयत्न चालवले. त्याशिवाय या वातावरणात राज्यकारभार सुरळीत होणार नव्हता. पेशवे पुण्यात बसून या दोघांच्या हालचालींवर लक्ष ठेवून होते.

थोड्याच दिवसांनी पेशवे आणि ताराराणींमधे पत्रव्यवहार सुरु झाले. राणीने गडावरुन खाली यावं म्हणजे सर्व गोष्टी त्यांच्या मनाप्रमाणे होतील असा निरोप मिळाल्यावर राणीसाहेब खाली आल्या. रामराजांना दूर करायलाही पेशव्यांची गरज ताराराणीला होतीच. १७५० मधे, त्याचवेळी नानासाहेब पेशव्यांनी आपला मुलगा विश्वास आणि सदाशीवभाऊचं दुसरं लग्न करायला काढलं. ते एक राजकीय निमित्त होतं. सर्व प्रतिष्ठित सरदारांना आमंत्रणं गेली. जमलेल्या सर्व सरदारांच्या मनाचा अंदाज यावेळी नानासाहेबांनी घेतला. ताराराणीला याचा सुगावा लागला. त्यांनाही आमंत्रण होतंच त्याप्रमाणे त्या आल्या, रामराजेही आले. पेशव्यांकडील राजकीय संमेलनानंतर, साताऱ्याला परत गेल्यावर राणीसाहेबांनी आपले डावपेच बदलले.

रामराजेंना आपल्याकडे वळवण्यासाठी चंपाषष्ठीचं पूजेचं निमित्त करुन त्यांनी रामराजांना जेवायला बोलावलं. त्यांना घातपात होईल म्हणून रामराजांना त्यांची बहीण दर्याबाईसकट सर्वजण जाऊ नका म्हणून बजावत असतांनाही ते गेले. ती तारीख होती २२ नोव्हेंबर १७५०. सगळ्यांचा सल्ला अव्हेरुन, ताराबाईंवर विश्वास ठेवून ते गडावर पूजेला गेले. आदल्या दिवशी गेले होते तेव्हा त्याची थोडीशी झलक त्यांनी अनुभवली होतीच. पूजेचा कार्यक्रम आटोपल्यावर जेव्हा ते किल्ल्याच्या महाद्वारापाशी आले, तेव्हा त्यांना रोखून धरण्यात आलं. गडाची दारं लावून घेऊन त्यांना बंदिस्त करुन ठेवलं गेलं.

अशाप्रकारे ताराराणींनी स्वराज्याचा कारभार आपल्या ताब्यात घेतला. गडावरुन रामराजे खाली आले नाहीत तेव्हा रामराजांच्या अटकेचं वृत्त वाऱ्यासारखं सगळीकडे पसरलं. राणींचे सेनापती दाभाडे यांनी दमाजी गायकवाडांना कळवलं. ते राणीसाहेबांच्या पक्षातले होते. त्यांच्यामार्फत निजाम आणि पोर्तुगीजांची मदत मागितली. आता गडावर रामराजांचं काय झालंय याचा घोर पेशव्यांना लागला. ते सुखरूप आहेत की नाही याचाही अंदाज लागेना. अफवांचं तर पीक आलं. त्यांच्या सुटकेसाठी गडाभोवती फौजांचा घेर घालायचा तरी पंचाईत होती. त्यांची काहीही बातमी गडाखाली न जाऊ देण्याची काळजी राणीसाहेबांनी घेतली. काही दिवसांनी राणीसाहेब निवळल्या. त्यांनी पेशव्यांशी पत्रव्यवहार सुरु केला. नानासाहेब पेशवे परिस्थिती आणि राणीसाहेब दोन्ही शांत डोक्याने हाताळत होते. राणीच्या संशयी स्वभावामुळे आपण खाली उतरलो की रामराजा पळून जाईल ही त्यांना भीती होती. त्यामुळे त्या खाली उतरायला तयार नव्हत्या. गडावर रामराजे आणि राणीमधले वाद पराकोटीला गेले होते.

हे प्रकरण चालू असतांना दक्षिणेत युध्दांचा प्रचंड धुरळा उठला होता. हैद्राबादचा निजाम १७४८ मधे, शाहूमहाराजांच्या आधी एक वर्ष मरण पावला होता. त्याच्या ४ मुलांनी आणि नातवाने निजामाची गादी मिळवण्यासाठी सन १७४९ मधे संघर्ष सुरु केला. त्या खेचाखेचीत दक्षिणेतील इतर राज्यं अडकली. या भांडणांचा फायदा घेत इंग्रज आणि फ्रेंच दोन पक्ष घेऊन समरांगणात उतरले. त्यांची युरोपियन भूमीवर लढली जाणारी युध्दं आता भारतवर्षात होऊ लागली. त्रिचनापल्ली, अर्काट, मदुरा, मैसूर ही राज्यं रणधुमाळीत गुंतली. त्यातच दक्षिणेत नवीन तारा उदयाला आला. तो म्हणजे मैसूरचा हैदरअली. पण या

राजकारणात लक्ष घालायला नानासाहेब पेशव्यांना घरातील कटकटींमुळे वेळ मिळाला नाही. १७५१ मधे नानासाहेब पेशवे फौज घेऊन निजामावर चालून गेले. निजामाचा धुव्वा उडाला आणि त्या तहात साठ लाखांचा मुलूख पेशव्यांनी मिळवला. याचवेळी दमाजी गायकवाड वगैरे राणीसाहेबांच्या पक्षातील लोकांनी बंडावा सुरु केला, त्यातून गायकवाड आणि सेनापती दाभाडे यांचा सदाशीवभाऊंनी पराभव केल्याने ताराबाईंचा जोर संपला. ही सांगोल्याची लढाई नानासाहेब पेशवे निजामावर असतांना सदाशीवभाऊंनी जिंकली.

सांगोल्याच्या या लढाईतील पराभवानंतर ताराराणींनी समेटाचा निरोप पाठवला. पेशवे आणि तारा‌राणी या दोन्ही पक्षांकडून एकमेकांच्या अटी आणि मागण्यांची यादी तयार झाली. त्याप्रमाणे ताराबाईंच्या हाती सत्ता, पेशव्यांनीच कारभार करणे, तारा‌राणींच्या बाजूने जे लढले त्यांच्याविरुध्द कारवाई न करणे, ज्यांची वतनं आणि जहागिरी जप्त केली आहेत ती परत करणे, गायकवाड आणि दाभाडे यांना सोडून देणे, त्याबदल्यात सिंहगड पेशव्यांना देणे आणि गुजराथचा निम्मा प्रांत पेशव्यांना देणे यावर करार निश्चित झाला. १२ ऑक्टोबर १७५१ या दिवशी त्या रामराजांसकट गडावरुन खाली उतरल्या. कारभाराची सूत्रं सर्व आपल्या हाती घेतली. आपणही पेशव्यांच्या विचारे चालू असं कबूल केलं. रामराजे मात्र त्यांच्याच कैदेत राहिले. त्यांना सोडवायचा पेशव्यांनी एकदा प्रयत्न केला पण तो कडक बंदोबस्तामुळे फसला. तारा‌राणींच्या हाती परत एकदा सत्ता आली. मग रामराजे खोटे आहेत हे आपण म्हटलेलं लोकांना पटवून देण्यासाठी ११ महिन्यांच्यानंतर १७, सप्टेंबर १७५२ या दिवशी जेजुरीच्या खंडोबासमोर ताराबाईंनी शपथपूर्वक सांगितलं की रामराजे राजबीजाचे नाहीत. ते खोटे आहेत. त्यादिवशी सोमवारी सकाळी, ताराबाई पेशव्यांच्या हवेलीत आल्या.

फक्त एकट्या पेशव्यांशी तासभर बोलल्या. संभाजीराजांना गादीवर बसवावं, रामराजाचे नसल खरे नाही असं साफ सांगितलं. दोन्ही पक्षांची मने साफ झाली. याप्रमाणे तह झाला.

छत्रपतीपदावरुन चाललेली ही रस्सीखेच अशी संपली. ताराराणींचं स्वत: कारभार करण्याचं स्वप्न परत एकदा पूर्ण झालं. रामराजे पुढे १२ वर्षे कैदतच राहिले. संभाजीराजे कोल्हापूर सोडून साताऱ्याला यायला तयार झाले नाहीत कारण त्यांची राणी जिजाबाई यांना ताराबाईंचा जाच नको होता आणि रामराजांचे हाल त्या पाहात होत्या. पण ही व्यवस्थाही पुढे २ / ३ वर्षेच चालली. ८० वर्षांच्या राणीसाहेब ताराबाई अति वृध्द झाल्या. शेवटची वर्षे परत सातारच्या किल्यावर निष्क्रिय आयुष्य जगत राहिल्या. पेशवेच सर्व कारभार पाहू लागले. ताराराणींनीच हे कुभांड रचलं, तेव्हा आपल्यावर त्याचा काहीही दोष नाही हेही पेशव्यांनी राणीसाहेबांना सांगून टाकलं.

१७६० मधे कोल्हापूरचे संभाजीराजे मरण पावले. १७६१ साल उजाडलं ते पानिपत नावाच्या वादळाने. १४ जानेवारी १७६१ पासून घुमायला लागलेल्या या अंधारमय काळात एका वर्षात पेशव्यांच्या घराण्यातील दोन पिढ्या, अनेक सरदार, शिपाई, गारद झाले. त्या दु:खाने नानासाहेब पेशव्यांचा अंत झाला. माधवराव पेशवे झाले. त्याच साली ताराराणी १० डिसेंबर १७६१ या दिवशी देवाघरी गेल्या. त्यांचं क्रियाकर्म रामराजांनीच माहुलीत केलं. त्यांच्या आयुष्याची सुरुवात मराठ्यांच्या बहादुरीच्या काळाने आणि शेवट पानिपताच्या प्रचंड नुकसानीने झाली. ताराराणींचं सारं आयष्य विलक्षण चढउताराचं होतं. त्यांचं आयुष्य एकाद्या झोपाळयासारखं घडलं. एकदा झोका सत्तेच्या दिशेने उंच गेला आणि परतला तो स्थानबध्दतेत खाली आला.

हंबीरराव मोहित्यांच्या पोटी जन्म, राजघराण्यात गृहप्रवेश आणि लगेच संभाजीमहाराजांच्या स्थानबध्दतेत पडल्या. तिथून सुटका झाली ती जिंजीला जाऊन अडकल्या. जिंजीतून सुखरुप स्वराज्यात आल्या आणि लगेच स्वराज्याची सूत्रं आपल्या हाती घेऊन आपल्या बहादूरीची कर्तृत्वाची छाप कारभारावर सोडली. राजा नाही, राजधानी नाही, पैसा नाही, आणि गादीला पुरुष नाही असा संकटकाळात त्यांनी तलवार गाजवली. महाबलाढ्य बादशहाशी लढण्याचं अलौकिक धैर्य दाखवलं आणि स्वराज्य वाचवलं. पण त्यांना त्याकाळात कुणी प्रतिस्पर्धी नव्हता. आणि जेव्हा शाहूराजांच्या रुपाने तो स्वराज्यात प्रकटला तेव्हा त्यांच्यातील संशयी आणि योग्य वेळी, तात्पुरती माघार न घेण्याच्या आक्रमक स्वभावाने खीळ बसली. रामचंद्रपंत अमात्यांना दुखावणं त्यांना सत्तेपासून दूर घेऊन गेलं. त्यामुळेच १७१४ सालापासून १७४९ सालापर्यंतची वर्षे त्यांनी संभाजीराजे आणि मग शाहूराजांच्या नजर कैदेत घालवली. शाहूराजांच्या निधनानंतर परत त्यांना एक मौल्यवान संधी मिळाली पण रामराजांच्या प्रकरणाने परत त्यांनी ती घालवली. आपल्या आयुष्यात त्यांनी अनेक राजकीय वादळं पाहिली. स्थित्यंतरं पाहिली. मुघलशाही बुडतांना पाहिली. पेशवाईचा उदय पाहिला.

त्यांना भद्रकाली या नावाने संबोधलं गेलं. त्यांची राजकीय गणितं चुकली तरी त्यांची प्रतिमा एक अग्नीज्वाला याच रुपाने इतिहासात उरली.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

# बाजीराऊ

## एक तेजस्वी तारा.

## जन्म १८ ऑगस्ट१७०० - मृत्यू २८ एप्रिल १७४०.



**भाग १.**

२५ वर्षे हातपाय बांधून ठेवावेत आणि अचानक मोकळे करुन त्या माणसाला धावायला सांगावं तसं घडलं शाहूराजांच्या जीवनात. १७०७ मधे औरंगजेब पातशहा सदेह नाहीसा झाला आणि संभाजीपुत्र शाहूंची ललाटरेषा नवीन अक्षरं घेऊन राजकारणात उमटली. शाहूराजे मुघलांच्या कैदेतून सुटून स्वराज्यात आले. भारतीय संस्कृतीप्रमाणे ज्येष्ठ पुत्राचा ज्येष्ठ पुत्र वारस की जो राज्याचा सांभाळ करतो तो गादीचा खरा मालक हे दोन प्रवाह स्वराज्यात तयार झाले त्यामुळे निर्माण झालेला भोवरा परत गरगरायला लागला. ताराराणी की शाहू..? पण अखेरीला राज्यलक्ष्मीनेच शाहूराजांच्या गळयात वरमाला घालून हा प्रश्न सोडवला. त्यांना स्वराज्यातील कारभाऱ्यांची साथ हवीच होती कारण त्यांना ना कारभाराचा अनुभव होता, ना लष्करी शिक्षण

होतं. औरंगजेबाने शाहूराजांना या दोन्ही क्षेत्रात अपंग करुन ठेवलं होतं. आपल्या या दोन्ही कमकुवत ताकदींवर मात करुन केवळ मनुष्यापारख या वरदानावर त्यांनी माणसं अचूक निवडली आणि कारभाराचे निर्णय घेतले. त्यात श्रीवर्धनचा बाळाजी विश्वनाथ भट हा तरुण मुत्सद्दी त्यांच्या नजरेत भरला. कारभाराची सुरवातीची घडी बसवतांना हाती ना दौलत, ना फौज अशावेळी पैसा खर्च न होईल आणि माणसं आपल्याकडे वळतील अशा वृत्तीचा लायक मदतगार त्यांना हवा होता. तो बाळाजी विश्वनाथांच्या रुपात मिळाला. आणि मग आपलं सिंहासन आणि स्थान भक्कम झाल्यावर चौफेर समशेर चालवून समरांगणं गाजवणारा तेजस्वी तारा त्यांनी निवडला. बाजीराव या नावाने तो तारा स्वराज्याच्या क्षितिजावर चमकला. शाहूराजांच्या या पेशवेपदाच्या निवडीमुळे पेशवाई या कालखंडाचा पाया घातला.

१७ एप्रिल १७२० ते २८ एप्रिल १७४०. २० वर्षे आणि १० दिवस..ते शेवटचे ५ दिवस नवज्वरातले..टायफॉईडचे..त्यामुळे खरं म्हणजे पूर्ण २० वर्षे...ती २० वर्षे स्वराज्य मध्यान्हीच्या तेजाने झळाळत होतं आणि त्या मध्यान्हीच्या सूर्याच्या झळांनी दिल्लीतील पातशाही घामाने निथळत होती. त्या तेजस्वी तरुणाचं नाव विसाजी-विश्वनाथ बाळकृष्ण भट. पेशवे बाळाजी विश्वनाथांचा सुपुत्र..स्वराज्य त्याला राऊ नावाने आणि इतिहास त्याला बाजीराव या नावाने ओळखतो. हा अत्यंत देखणा वीरपुरुष रणांगणात बेभानपणे नाचला आणि एक प्रेमवीर म्हणूनही यवन नर्तकी, आणि प्रेयसी मस्तानसाठी याने बेभानपणे समाजाच्या शृंखला तोडल्या. त्यात तो जखमीही झाला पण

जास्त जखमी झाले ते त्याचे बंधू चिमाजी, त्यांच्या मातोश्री राधाबाआणि पत्नी काशीबाई..राऊ म्हणजे नियतीने स्वराज्यासाठी निर्माण केलेलं एक अलौकिक सुंदर नाट्य..

बाजीरावांच्या जन्माची बातमी बाळाजींना कळली तेव्हा ते बाजीप्रभू देशपांड्यांचं चरित्र वाचत होते. ते सहज म्हणाले, अरे, आपल्याही घरात एक बाजी आले.. आणि मग बाजीरावच नाव कायम झालं असं बखर सांगते. राऊंची मुंज ५व्या वर्षी झाली. मग अभ्यासाला सुरुवात झाली. लष्करी शिक्षणालाही थोड्याच दिवसात सुरुवात झाली. तलवारबाजी, दांडपट्टा, घोडदौद, राऊंना मनस्वी आवडायची दांडगाई. राऊ १० वर्षांचे झाले म्हणजे आता त्यांचं लग्न करणं भाग होतं. बाळाजी विश्वनाथ शाहूराजांची राज्यसंसाराची घडी बसवण्यात दंग होते. बाळाजींना आपली पागा असावी असं वाटायला लागलं होतं. त्याकाळात आपलं घोड्यांचं पथक असणं हा मोठा व्यवसाय होता. स्वारी-मोहिमांना घोडे लागत, ते जखमी होत, मरत, त्यामुळे आपले घोडे आणि एकांडे शिलेदार यातून स्वारीवर जायचं, हा व्यवसाय जोरात चालत असे. बाळाजींनी पालीचे जोशी सावकार, यांच्याकडून पथकासाठी कर्ज घेतलं. जोशी सावकार शाहूराजांना साताऱ्यात आर्थिक मदत करत होते. बाळाजींनी कर्ज घेतलं आणि जोशी सावकारांना तुमची मुलगी आमच्या राऊंसाठी करुन घेऊ असं वचन देऊन मैत्री घट्ट केली. जोशी सावकारही आनंदले. साताऱ्यात १० वर्षांच्या राऊंचं लग्न ५ वर्षांच्या लाडूबाई या मुलीशी १७१० साली, मोठ्या थाटात पार पडलं. राऊंचं नाव विश्वनाथ, म्हणून लाडूबाईचं नाव काशीबाई ठेवण्यात आलं.

जोशी सावकारांनी त्याकाळात २५ ००० रुपये लग्नखर्च केला. काशीबाईंच्या पायाने खरोखरच लक्ष्मी घरात आली.

बाळाजी विश्वनाथांना १७१३ साली पेशवेपद मिळालं. मालक शाहूराजे आणि चालक पेशवे या नात्याने खजिना भरण्याचं, राज्यात शांतता ठेवण्याचं काम पेशव्यांचं होतं. हातात ना पैसा, ना युध्दसाहित्य, ना फौज अशा विरुध्द परिस्थितीत बाळाजी विश्वनाथांनी अनेकांची मनं वळवून त्यांना शाहूंच्या पक्षात आणलं. जे शाहूराजांच्या पक्षात आले त्यांना राजांनी वंशपरंपरेने ते पद कायम केलं. आपल्या पक्षात बांधून ठेवण्यासाठी हे करणं शाहूराजांना गरजेचं होतं. १० वर्षांचे राऊ वडिलांबरोबर कारभाराचा अनुभव घ्यायला लागले.

२ एप्रिल १७२० या दिवशी पेशवे बाळाजी विश्वनाथांचं निधन झालं. बाळाजी विश्वनाथांच्यानंतर वंशपरंपरेने त्यांचा थोरला पुत्र म्हणून राऊ

हेच पेशवेपदावर येणार होते, पण अनेक दरबारी प्रतिष्ठितांनी महाराजांना सल्ला दिला, बाजीराव उद्दाम प्रकृतीचे, कायम शिपाईगिरीत दंग, राज्य चालवण्यास सबूरी लागते ती त्यांच्यापाशी नाही. त्यांना हे पद न द्यावे. पण महाराजांचा निर्णय झालेला होता. स्वराज्याच्या विस्तारासाठी, दारातील शत्रूंना थोपवण्यासाठी महाराजांना अशाच स्वभावाची गरज होती. महत्त्वाचं म्हणजे बाळाजी विश्वनाथांनी बादशहाकडून दक्खनच्या चौथाई सरदेशमुखीच्या वसूलीच्या सनदा म्हणजे इंपिरिअल ग्रँट्स आणल्या. पण त्या अंमलात आणायच्या असतील तर मुघल अधिकाऱ्यांशी लढण्याची ज्याच्या बाहूंमधे ताकद आहे असाच चालक राज्यासाठी जरुरीचा होता. आणि त्यासाठी पेशवा म्हणून एकमेव वीर तरुण होता, बाजीराव..पूर्ण विचारांती माणूसपारखी

महाराजांनी भर दरबारात आपला निर्णय जाहीर केला. ते म्हणाले, बाळाजी विश्वनाथांनी जीवदारभ्य श्रमसाहस करुन सुख भोगलं नाही. तूर्त बाजीरावास वस्त्रे देतो, यांचे दैवी असल्यास श्रीशंभू कृपा करील. उपयोगी नाही दिसल्यास पुढे विचार होईल..अशी श्रीदेवाची प्रार्थना करुन महाराजांनी बाजीरावास कऱ्हाडजवळच्या मसूर गावात पेशवाईची वस्त्रे दिली. चैत्र वद्य सप्तमी, गुरुवार, शके १६४२. १७ एप्रिल १७२० दिवस होता तो. १७०० सालच्या १८ ऑगस्टला, श्रावणपौर्णिमेला जन्मलेला हा सूर्य त्यादिवशी अवघा २० वर्षांचा होता...श्रीवर्धनच्या भट घराण्यात दुसऱ्यांदा पेशवेपद आलं.

शाहूमहाराजांच्या राज्यसंसाराची घडी अजून नीट बसलीही नव्हती. खजिनाही भरलेला नव्हता, दरबारी शिष्टाचारही प्रोटोकोलही अजून आखला गेला नव्हता. जो तो मनाला येईल तसं वागत होता. अशा कठीण काळात राऊ पेशवे झाले. त्यांच्या धाडसाची, शौर्याची पारख तर महाराजांनी १० वर्षात केलेली होती. पण कारभाराला लागणारी सबूरी राखायला महाराजांनी सातारला राहतील असे राऊंचे धाकटे बंधू १५वर्षांच्या चिमाजी अप्पांना पंडित हा किताब, दमाजी थोराताचा सरंजाम आणि सरदारी दिली. सासवडचे अंबाजी पुरंदरे, मुतालिक पदावर नेमले. मुतालिक म्हणजे पेशव्यांच्या गैरहजेरीत त्यांचा शिक्का वापरण्याचा अधिकार असलेला आणि कारभार सांभाळणारा त्यांचा प्रतिनिधी..त्या दिवसानंतर रायांचा घोडा अश्वमेधाच्या घोड्यासारखा सुटला. तो शेवटपर्यंत कधीच थकला नाही. ना त्याने एकही पराभव पाहिला. पेशवेपदावर येण्याआधीही राज्यातील बंडखोर जहागिरदारांचं शाहूराजांना न मानणं, सारावसूलीसाठी लागणारी जबरदस्ती त्यांनी वडिलांबरोबर हिंडून

पाहिली होती. बाळाजी विश्वनाथांबरोबर दिल्लीच्या स्वारीत ते सामील झाले होते. तिथलं बादशहा-वजीर यांचं अस्थिर वातावरण पाहिल्यावर, १८व्या वर्षीच त्यांच्या लगेच लक्षात आलं होतं की पातशाही खिळखिळी झाली आहे. मूले तु कुठार: या वृक्षाच्या मुळावर कुऱ्हाड मारली तर स्वराज्य दिल्लीपर्यंत पसरेल..आपल्या धाडसावर भरपूर आत्मविश्वास, रणनीती, आणि गनिमीकावा, या महाराजांनी दिलेल्या मंत्रांमुळे, शाहूराजांकडे पैसा नाही, तोफखाना नाही, मोठी फौज नाही या तीन कमजोरींची त्यांना फिकीर नव्हती. आता त्यांना दरबारातील आपले मित्र कोण, आणि दरबारातील प्रतिस्पर्धी कोण याचाच विचार करायचा होता. काहींना निर्माल्यवत करायचं होतं, काहींना शून्य किंमत द्यायची होती तर काहींना शत्रू मानायचं होतं. यांना सर्वांना टाळून आपला एक नवीन पक्ष तयार करायचा होता. राऊंनी तो लगेच निर्माण केला. सख्खा भाऊ चिमाजीआपा सावलीसारखा मागे उभा होता, जुन्या पिढीतल्या अंबाजीपंत पुरंदरे यांच्यासकट, पिलाजी जाधव, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे, सगळी बहादूर तरुण मंडळी गोळा केली..

त्याचवेळी जबरदस्त अनुभवी राजकारणी, दिल्लीचा निजाम उन्मुल्क दक्षिण सुभ्यावर कारभारात आला होता. त्याच्या रक्तातच राजकारण. मुघल दरबारात मोठं स्थान मिळवणाऱ्या घराण्यातील तो वारस. मराठे हे आपले एकमेव शत्रू हे निजाम जाणून होता. त्याला स्वराज्य घशात घालायचं होतं. मुघलांचं दक्षिणेतील मुख्य ठाणं, औरंगाबादेला आल्याबरोबर शाहूंच्या दरबारातील बाजीरावांचे प्रतिस्पर्धी मोहरांच्या थैलींनी त्याने आपल्याकडे वळवले होते. बाजीरावांबद्दल शाहूराजांचं मन बिघडवणं हे काम त्यांच्यावर

सोपवलं. शाहूराजांचे चुलतबंधू कोल्हापूरचे संभाजीराजे आणि शाहू यांच्यातील फट रुंदावणं हा दुसरा डाव त्याने आखला. नवीन, तरुण, अनुभवशून्य पेशव्याचा निजामाला अजून अंदाज आला नव्हता. त्याची भीती तर अजिबात नव्हती. राऊंना मात्र प्रतिस्पर्धी जबरदस्त भिडणार होता. निजामाकडे मोठी फौज, मोठा खजिना, लहानमोठ्या तोफा, बंदूका हे बळही भरपूर होतं. असे हे दोन तगडे गडी समरांगणात उतरले. दोघांनी एकमेकांना चाचपायला सुरुवात केली. बाजीरावांची निजामाशी पहिली गाठ पडली ती बाळापूरच्या लढाईत., निजामावर चालून आलेल्या दिल्लीच्या सरदाराशी झालेल्या सामन्यात..ती केवळ तोंडओळख होती. शाहूंच्या मुघलांशी झालेल्या करारानुसार मराठ्यांची फौज बादशहाच्या मदतीला देणं ठरलं होतं. म्हणून पेशवेपद मिळाल्याबरोबर ऑगस्टमधे राऊ निघून गेले. स्वराज्यात राऊंना दुसरं काम होतं ते आजवर स्वराज्यात ठाण मांडून बसलेल्या मुघल अधिकाऱ्यांना आपल्या राज्यातून घालवून देणं. तिसरं महत्त्वाचं काम म्हणजे जंजिऱ्याचा हबशी, हिंदूंना छळणारे वसईचे पोर्तुगीज यांना शरण आणणं. आणि चौथं, उत्तरेतील माळवा प्रांत हाताशी धरुन बादशाहीला शह देणं..माळवा-गुजरातचे चौथाई हक्क वसूल करणे.

बाजीरावांनी कारभार हातात घेतला आणि लगेच निजामाची पहिली चुणूक त्यांनी अनुभवली. कोल्हापूरच्या संभाजीराजांना फोडून निजामाने शाहूराजांना प्रश्न विचारला की बादशाही सनदा कुणाला द्यायच्या ? चौथाई वसूल करायचा हक्क तुमचा की संभाजीराजांचा ? त्यावर बाजीरावांनी लगेच महाराजांची भेट घेतली. त्यांना आपला विचार सांगितला. “पूर्वी वडिलांनी

मोठी कार्ये केली. तशी न करावी तरी मोठी पदे कशास घ्यावी? आपण हुकूम करा, फौज खजिना सर्व सिध्द करतो, राज्य राखतो, किलिजखानचा शह राखून हिंदुस्थानची मसलत सिध्द करतो..” महाराजांनी बाजीरावांना मान्यता दिली. बाजीरावांचा आवेश दांडगा. लष्करी सामर्थ्यावर शत्रूला गुडघे टेकायला लावण्याची त्यांची हिंमत तर शाहूराजे समक्ष भेटून बोलणी करण्याच्या स्वभावाचे.. राऊंच्या दांडगाईने हे पोर काय करेल अशी त्यांना काळजी वाटे. त्या दिवाळीनंतर राऊ निजामाला भेटायला औरंगाबादजवळ चिखलठाण, मग पुढील दोन वर्षांनी बदकशा, पुढील वर्षी नालछा इथे लागोलाग भेटी झाल्या. उंचापुरा, अत्यंत देखणा, चेहऱ्यावर ओसंडून वाहणारा आत्मविश्वास, थोडीशी मगरुरीची छाप आणि बुध्दीची चमक असलेला वीस वर्षांचा पोरसवदा बाजीराव, नमवी पहा भूमी तो चालतांना, अशी देहबोली, हे सर्व निजामाने त्या पहिल्या भेटीत कुतूहलाने निरखलं.. बाजीरावांची नजर सतत दिल्लीच्या घटनांवर खिळलेली असे. तिथे कोण काय बोलतो, बादशहा कसा वागतो, निजामाची काय परिस्थिती आहे याची सर्व माहिती राऊंना त्यांच्या हेरांकडून सतत मिळत असे.

.त्यातच निजामाने आपला प्रतिस्पर्धी बादशहाचा बडा उमराव मुबारिजखान याचा औरंगाबादेजवळ साखरखेडले गावात सरळ सरळ पराभव केला आणि दक्षिणेत आपलं साम्राज्य निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा त्याने कायम केली. राऊ परत करारानुसार मदतीला गेले. साखरखेडल्याच्या लढाईत राऊंना शाहूराजांचे सक्त आदेश होते की दिल्लीच्या दोन तालेवार सरदारांच्या लढाईत आपण न पडावे. पण राऊंनी मुबारिजखानाला धडा शिकवायची हीच

योग्य वेळ आहे हे पूर्णपणे लक्षात ठेवून साखरखेडल्यात मुबारिजखानाला कोंडून ठेवण्याचं काम केलं आणि मग निजामाने खानाची फौज कापून काढली,मुबारिजखानही ठार झाला. त्याचं मुंडकं निजामाने दिल्लीला पाठवून दिलं. राऊ मुबारिजखानाच्या विरुध्द एवढ्याचसाठी होते की या खानाने आपल्या मगरूर स्वभावाने मराठ्यांना अत्यंत वाईट रितीने वागवलं होतं. तो हिशेब राऊंनी निजामाच्या सहाय्याने पूर्ण केला. शाहूमहाराज योध्दा नव्हते, त्यांना हे लष्करी डावपेच कळलेही नसते म्हणून बाजीरावांनी परस्पर मुबारिजखानाला संपवून टाकलं. त्याला पाहुण्यांच्या वहाणेने विंचू मारायचा असं मराठीत म्हणतात..ही बाजीरांवांची राज्याचा चालक म्हणून राजनीतीची पहिली चुणूक होती. साखरखेडला गावाला फत्तेखर्डा नाव देऊन निजाम भागानगरला गेला. यानंतर निजामाने हैद्राबाद हे आपलं कायमचं रहाण्याचं ठिकाण नक्की करुन टाकलं. राऊ साताऱ्यात परतले.

## बाजीराव.

## पालखेड संग्राम

आता महाराष्ट्रात पेशवे आणि निजाम यांचाच लढा सतत लागणार हेही या साखरखेडल्याच्या लढाईनंतर नक्की झालं. बाजीरावांची पुढची २ वर्षे १७२५, आणि १७२६ साल कर्नाटकाच्या स्वारीत गेली. कर्नाटकातील चौथाई वसूलीचा कारभार आपल्या पुत्रवत मानलेल्या अक्कलकोटच्या फत्तेसिंगांना आणि प्रतिनिधींना देण्याचा महाराजांचा विचार होता. पण बाजीरावाशिवाय कुणीच सरदार कर्नाटकात जायला निघेना तेव्हा नाईलाजाने बाजीरावांना

कर्नाटकात जाण्याचा हुकूम शाहू महाराजांनी केला. २५-२६ सालात मराठी फौजा कर्नाटकात जाऊन वसूल घेऊन आल्या. संभाजीराजांच्या काळापासूनचा महसूल तिथल्या जमीनदारांनी बुडवला होता. लगेच दसऱ्यानंतर निजाम कर्नाटकात गेला म्हणून राऊंची दुसरी चित्रदुर्गाची स्वारी झाली.

आपलं राज्य निर्माण करण्यासाठी मराठ्यांचा प्रदेश मिळवण्याच्या मागे निजाम लागला. शाहूराजांचं आसन कमजोर करण्यासाठी त्याने पहिलं काम केलं ते कोल्हापूरच्या संभाजीराजांना फोडलं. धनाजी जाधवांचा बंडखोरी करुन गेलेला मुलगा चंद्रसेन जाधव हा संभाजीराजांना निजामाकडे वळवण्यासाठी प्रयत्नात होता.. बाजीरावासकट सर्व मराठी फौजा कर्नाटकात गेलेल्या पाहताच शाहूविरुध्द स्वारी करण्यात हीच योग्य वेळ आहे हे चंद्रसेन जाधवाने ठरवलं. निजामाने त्याला परवानगी दिली आणि शाहूंवर स्वारी करण्याचा संभाजीराजांचा कट नक्की झाला. निजामाने शाहूराजांना पत्र लिहून तुमच्या कोकणस्थ पेशव्याला काढून टाका. तो आणि सेनापती खंडेराव दाभाडे सरदार तुम्हाला काढून टाकण्याच्या तयारीत आहेत असा खोटाच मजकूर पत्रात लिहिला. शाहूराजांचा दरबार कोकणस्थ आणि देशस्थ या विषाने फोडला. काहींना आपल्याकडे वळवलं. शाहूराजांना असं कमकुवत केल्यावर, संभाजीराजांना सातारला आणण्याची अशी तयारी झाल्यावर निजाम आता मराठ्यांच्या स्वारीसाठी तयार झाला. त्यामुळे संभाजीराजांच्या फौजा शाहूराजांच्या मुलखात दंगा करु लागल्या.. लोक संभाजीराजांकडून इनामाच्या सनदा घेऊ लागले ही बातमी शाहूराजांपर्यंत पोचली आणि त्यांचे डोळे उघडले. संभाजीराजे हेच खरे स्वराज्याचे वारस असा फाजीलपणा निजामाने चालू

केल्याचं पाहून शाहूराजांनी कर्नाटकात गेलेल्या बाजीरावांना ताबडतोब आपल्याजवळ बोलावून घेतलं. स्वराज्यावरचं हे संकट कळल्यावर लांब लांब मजली मारत मे महिन्यात राऊ साताऱ्यात पोचले. तोपर्यंत निजामाशी लढण्याचं नक्की झालं होतं. सेनापती म्हणून, राऊंसाठी ही अत्यंत कठीण अशी पहिली परिक्षा होती. निजामाकडे हत्ती-घोडे-तोफा-बंदूका-फौज सगळं होतं आणि राऊंकडे दोन शिपायांमधे एक घोडा होता, ना होत्या बंदूका, ना होत्या तोफा.

पावसाळ्यात राऊंनी लढाईची पूर्ण तयारी केली होती. सगळीकडची फौज गोळा झाली. दसऱ्याच्या मुहूर्तावर मराठ्यांच्या फौजा निजामाशी लढायला बाहेर पडल्या. निजामांच्या तोफांच्याविरुध्द गनिमी कावा असं हे युध्द घडलं. निजाम विरुध्द राऊ असंच त्याचं रुप होतं. राऊंनी आपल्याकडे उत्तर महाराष्ट्र घेतला आणि चिमाजीआपांकडे पुण्याच्या खालचा सातारा मिरज वगैरे भाग सांभाळायला दिला. आपांच्या मदतीला शिंदे होळकर दिले. एक कसलेला सेनापती म्हणून राऊंनी आपली रणनीती निश्चित केली. निजामाची ताकद कमी करणं म्हणजे निजामाला तोफा वापरायची वेळ न आणू देणं ही पहिली महत्त्वाची रणनीती ठरली. त्यासाठी उघड्या मुलूखात निजामासमोर न जाणं महत्त्वाचं होतं. युध्दखर्च वसूल करायला निजामाचा खजिना आणि रसद मिळवायची होती. आणि मग ? आणि मग राऊ नुसते इथून तिथे लांब लांब मजलींनी फौजेसकट धावू लागले. निजामाची फौज त्याचा शोध घेत त्याच्यामागे पळायला लागली. त्याची फौज वाटली गेली, त्यामुळे फौजेचा जोर कमी झाला. त्यावेळी निजामाच्या तोफांची परिस्थिती अवघड झाली. त्या बैलगाडीवर चढणार आणि मग बैलांच्या गतीने त्या राऊंच्या मागे पोचणार हे

निजामासाठी अवघड होऊन बसलं. लूट आणि रसद मिळवायला राऊंनी निजामाचा श्रीमंत मुलूख निवडला, त्यामुळे आपला मुलूख बेचिराख होतांना निजामाला पहावं लागलं. राऊ पुण्यातून बाहेर पडले ते लोणी-पारनेर-जालना-येवले या मार्गाने वैजापूरात पोचले. पुणतांब्यावर त्यांनी गोदावरी ओलांडली. जालना आणि सिंदखेड यथेच्छ लुटलं आणि मग बेचिराख केलं. तिथून अचानक मुघल फौजेला गुंगारा देऊन बऱ्हाणपुरात जाणार ही खोटी बातमी पसरवून माहूर-मंगरूळ-वासीम हे परगणे लुटले. तिथून तापी ओलांडली. मुघल फौज मागे यायला लागल्यावर खानदेशात चोपडा परगण्यात शिरले तिथून तापी ओलांडून गुजरातवर गेले. बाबाप्याराच्या घाटाने भडोचपर्यंत पोचले.

हे सगळे परगणे तालुके निजामाचे श्रीमंत मुलूख. आता मात्र निजामाने राऊंच्या मागे न जाता आपली चाल बदलली आणि तो पुण्याकडे निघाला. शेवटी तोही मुरलेला अनुभवी योध्दा होता. राऊ पुणं वाचवायला येतील अशी त्याची अपेक्षा होती. पण राऊंनी ती फोल ठरवली. पुण्यात निजाम येणार हे कळल्याबरोबर पुण्यात गडबड उडाली. लोणी-सुपे-बारामती सगळीकडे लढाईचा कल्लोळ माजला. पुण्यावर शह बसणार हि बातमी गुप्तहेरांनी राऊंना दिली तेव्हा राऊंनीही आपली चाल बदलली. ते गुजराथचा डोंगराळ प्रदेश सोडून सरळ अजिंठ्याचा डोंगर उतरुन औरंगाबादेकडे निघाले. आपल्या राजधानीच्या बचावासाठी पुण्यावरुन परत जाणं निजामाला भागच होतं. आता त्याच्या तोफांची त्याला अडचण व्हायला लागली. ऑक्टोबरपासून सुरु झालेली ही धामधूम फेब्रुवारीमधे शेवटच्या टप्प्यात आली. राऊंनी आपले साथीदार वेगवेगळया दिशांना पसरवून निजामाला घेराव घालण्याची तयारी पूर्ण

केली. जवळपासचा भाग निजामाला दाणा वैरण मिळू नये यासाठी जाळून टाकला.

राऊंची पुढली रणनीती होती ती निजामाला घेरावात अडकवता येईल अशा ठिकाणी आणणं. त्या संधीची ते वाट पाहात होते. गोदावरी उतरुन निजाम वैजापूरच्या पूर्वेला पालखेड गावावर पोचल्याची बातमी राऊंना मिळाली. त्याबरोबर ते आणि त्यांचे साथीदार भूतासारखे तिथे अचानक येऊन टपकले. निजाम पालखेडावर पूर्ण कोंडला गेला. जवळचा पाण्याचा ओढा ताब्यात घेऊन मुघल फौजेला पाणीसुध्दा न मिळू देण्याची खबरदारी राऊंनी घेतली होती. निजामाची रसद -बंद झाली. निजाम काकुळतीला आला. जनावरांना चारा नाही, पाण्याची टंचाई आणि फौजेत धान्याची महागाई याने तो हैराण झाला. शेवटी तह करण्याशिवाय त्याला पर्याय उरला नाही. आपला सरदार ऐवजखानातर्फे निजामाने राऊंना निरोप पाठवला आपण समेट करु या. पाण्याची वाट मोकळी करुन द्या. राऊंच्या मागणीवरुन २ मोठे सरदार रायांकडे ओलीस ठेवून निजाम मुंगी पैठणला ओढा होता, तिथे पाण्याजवळ गेला. मग १० मार्चला परगणा शेगावच्या मुंगीपैठण गावाजवळ तह झाला. या तहात बरीच कलमे होती, पण महत्त्वाची होती ती.१. संभाजीच्या वारसा हक्काची भाषा या करारामुळे निजामाने बंद केली. २. दक्षिणेतील सहा सुभ्यांचा चौथाई--सरदेशमुखीचा हक्क शाहूराजांना मिळाला. ३. दक्षिणेचा कारभार शाहूकडेच असावा. ४. पुण्यातील स्वारीच्यावेळी निजामाने जप्त केलेली ठाणी त्याला परत करावी लागली. निजामाने सगळया अटी मान्य केल्या. या लढाईत निजामाची बदनामी झाली. या युध्दातून निजाम खूप काही शिकला. त्याला राऊंची

चपळता, शौर्य, धाडस, रणनीती पहायला मिळाली. या काळात संभाजीराजांनी आणि चंद्रसेन जाधवने शाहूविरुध्द काहीच केलं नाही. त्यामुळेही तो फसला. एवढा मोठा सामर्थ्यवान दिल्ली दरबारातील उमराव पण पंचवीशीतील तरुणाने काहीही युध्दसाहित्य नसतांना निजामाला हरवलं यामुळे दिल्ली दरबारातही त्याची अप्रतिष्ठा झाली ती वेगळीच.पालखेडचं हे युध्द जगाला बाजीरावाचं साहस, आणि युध्दकौशल्य याची ओळख पटवून गेलं. पण शाहूमहाराजांच्या इच्छेमुळे निजामाला साफ संपवण्याचा रायांचा मानस त्यांना साध्य करता आला नाही. मुघल बादशाही बुडवण्याच्याही शाहूराजे अगदी विरुध्द होते. मंदिराच्या भिंतींचा जीर्णोध्दार करावा पण त्यासाठी शिवलिंग उचकटून टाकणं जरुरी नाही असं त्यांचं स्पष्ट मत होतं आणि राज्याचे मालक म्हणून ते राऊंना मानावं लागलं.

एकूण, २८ साली झालेला हा पालखेडचा संग्राम आणि मुंगीशेगावचा तह, भारताला एका नव्या नायकाची ओळख करुन देऊन गेला. मराठ्यांच्या शौर्याचा दरारा आधीपासून होता तो आणखीनच वाढला. शाहूमहाराजांच्या मनात आपलं राज्य जातं की काय ही चिंता होती ती पूर्ण गेली आणि रायांशिवाय स्वराज्य नाही याची ओळख पटली. शाहूंचा एक डोळा म्हणजे राऊ असं बोललं जाऊ लागलं इतके ते महाराजांचे लाडके बनले..राऊंनी आपलं कौशल्य

जगाला दाखवून दिलं. दरबारातील त्यांच्या विरुध्दची मंडळी गप्प झाली. पालखेड संग्राम हा शाहूराजांच्या कारकीर्दीतील महत्त्वाचा विजय सोहळा.प्रसिध्द फिल्डमार्शल माँटगोमेरी याने आपल्या हिस्टरी ऑफ वॉरफेअर

या जगातील लढायांच्या इतिहासावरील पुस्तकात बाजीरावांच्या पालखेड संग्रामाचा कौतुक करणारा उल्लेख केलाय..

मार्च २८ ला मुंगीशेगावचा तह करुन, राऊ आले. शाहूराजे आणि दरबारी थक्क झाले. निजामही चपापला. पण निजामाने पुढे काहीच हालचाल केली नाही. त्याने तहाची कलमे कबूल केल्याप्रमाणे शाहूराजांना दिली नाही. पण राऊंनी निजामाला हरवणं शाहूराजांना बिलकुल आवडलं नाही. महाराजांनी आज्ञापत्र लिहून शपथपूर्ण स्वमुखाने आज्ञा केली की नबाबांची मर्जी राखावी. त्यांना कै. नानांच्या, राऊंच्या वडिलांच्या पायाची शपथ घातली. नबाबास किरकोळ त्रास द्यावा असं सांगितलं. नबाबाशी कलह म्हणजे भांडण न करण्याबद्दल सुनावलं. नबाबाला हात लावायचा नाही, दिल्लीवर स्वारी करायची नाही या दोन अटी राऊंना सांभाळणं भागच होतं. कर्नाटकात प्रतिनिधी आणि फत्तेसिंगना अधिकार दिला होता. त्यामुळे खजिना भरण्यासाठी राऊंना उत्तरेत स्वारी करण्यावाचून दुसरा मार्ग राहिला नाही. ते त्यांना फायद्याचंच ठरलं. दिल्लीला शह द्यायला माळवा त्यांना हवाच होता. दुसरीकडे, राऊंची मर्जी सर्वांनी पाळावी. त्यांच्या मनास त्रास देऊ नये असा शाहूराजांनी दरबारी मंडळींना दम भरला. स्वराज्याचे मालक शाहू, आणि चालक पेशवे या नात्याने राऊ या नात्याने राज्य चालवायचं तर खजिना भरलेला पाहिजे, खजिना भरायचा तर वसूलीसाठी फौज पाहिजे, फौजेचा खर्च करायचा तर फौजेला काम पाहिजे. १७२८ च्या उन्हाळ्यात राऊ आणि आपा, दोघांनी ठरवली ती पुढची माळवा मोहीम.. ती अत्यंत गुप्तपणे आखली. दरबारी आणि शाहूराजांना खबर न होईल अशी.. पावसाळ्यात सैनिक आणि घोडे विश्रांती घेत असतांना राऊ

आणि चिमाजी आपांनी माळव्यातील डोंगर, नद्या, त्यांचे उतार, घाट यांची माहिती गोळा केली. होळकर शिंदे यांना गुपचुप माळव्यात पाठवून सगळे घाट आणि नद्यांच्या उतारावर फौज ठेवून ताबा मिळवून ठेवला.

## बाजीराव

## माळवा-बुंदेलखंड

पालखेडचा संग्राम भारतभर गाजला. मुसलमानांशी लढायला कुणीतरी तेवढाच जबरदस्त आहे याचा हिंदूंना अत्यंत आनंद झाला. सवाई जयसिंग राऊंचा पराक्रम पाहून त्यांना सामील झाले. माळव्यातील फार मोठा वतनदार नंदलाल मंडलोई हाही राऊंना सामील झाला. माळव्यातील बादशहाचे सुभेदार गिरिधरबहादूर आणि दयाबहादूर यांच्या छळाने हिंदू जनता त्रासली होती. नंदलाल मंडलोईसुध्दा त्यांचा त्रास सहन करत होता. कंपेलमधे राहणारा हा मंडलोई खूप मोठा जमीनदार. त्यानेच कंपेलजवळ इंदूर शहर वसवलं. तिथे तटबंदी बांधली. रावजी पुरा, निहालपुरा, नंदलाल पुरा अशा पेठा वसवल्या आणि घाट बांधून इंदूर शहर संपन्न केलं. या मंडलोईने राऊंना आमंत्रण दिलं. चिमाजी आपा दिवाळीच्या भाऊबिजेला भिऊबाई आणि अनुबाई या बहिणींना भाऊबीज घालून, फौज घेऊन पोट भरायला जातो असं सांगून रायांच्या आधी बाहेर पडले. नाशिक बागलाण - खानदेश - मार्गाने नर्मदेवर आले. नोव्हेंबरच्या अखेरीला बाजीराव त्यांच्यावर लक्ष ठेवून अहमदनगर, वऱ्हाड, चांदा, देवगड करत बाहेर पडले. त्याआधी ते शाहूराजांना आणि त्यांच्या राण्यांना घेऊन तुळजाभवानीच्या दर्शनासाठी जाऊन आले. शाहूराजांना साताऱ्यास पोचवून

राऊ मोकळे झाले होते. इतक्यात माळव्यातून धक्के देणाऱ्या बातम्या सातारा दरबारात पोचल्या आणि सगळे थक्क झाले.

२९ नोव्हेंबरला चिमाजीआपांनी माळव्याचा सामर्थ्यवान सुभेदार गिरिधरबहादूर याला अमझेरा तळावर ठार करुन माळव्यावर अंमल बंसवला होता. चिमाजीआपाच्या या करामतीने दरबारी आणि महाराजही थक्क झाले. हा विशीतला मुलगा माळव्यात गेला कशासाठी ? इतकी ही माळव्याची मोहीम गुप्त ठेवली होती कारण असलं साहस करण्याला शाहूराजांनी परवानगी दिलीच नसती. आणि राऊंना घाव तर घालायचाच होता. हे चिमाजी आपांचं यश अमर्याद होतं. या दोन्ही बंधूंनी माळव्यात कंठाजी कदमला पाठवलं आणि दंगा करायला सांगितलं. कंठाजीवर सुभेदार गिरिधरबहादूर चालून गेला आणि कंठाजी पळून गुजरातमधे बसवाडाला गेला म्हणून अमझेरावर छावणी करुन राहिला. चिमाजीआपा दिवाळीनंतर माळव्यात उतरले. गिरिधरबहादूरचा मुक्काम अमझेऱ्याला आहे हे कळल्यावर रोज ६० मैलांची मजल मारत अचानक गिरिबहादूरवर कोसळले. बरोबर २२ हजार फौज आणि उदाजी पवार होते. आपल्या छावणीभोवती पडलेल्या या वेढ्याने सुभेदारही चकित झाला. त्याचे सरदार मराठ्यांशी लढायला निघाले पण दोघेही ठार झाले. ही बातमी आल्यावर स्वत: गिरिधरबहादूर हत्तीवरुन निघाला. आपल्या बाणांनी त्याने काहींना मारलंही पण त्याचे सगळे बाण संपले. इतक्यात मराठ्यांची गोळी लागून सुभेदार गिरिबहादूर ठार झाला. मराठ्यांना भरपूर लूट मिळाली. खजिना मिळाला. पाठोपाठ चालून आलेल्या भाऊ दयाबहादूरालाही संपवलं. माळव्यातील हिंदू खूष झाले. अमझेऱ्यावर चिमाजी आपांनी फौजेला ३ दिवस

विश्रांती दिली आणि सर्व उज्जैनवर निघाले पण ती नगरी हाती आली नाही. चिमाजीआपाच्या या साहसाने सारा भारत हादरला. आता मराठ्यांशिवाय तरणोपाय नाही ही कीर्ती सर्वत्र पसरली. चिमाजी आपांवर अभिनंदनाचा वर्षाव झाला. राऊंना या विजयाची पत्रं दुसरे दिवशी मिळाली. अजून ते पुण्याजवळच होते. पुढे माळव्याच्या कारभाराची वाटणी झाली. त्यात ३१ टक्के वसूल सरकारचा, ३० टक्के होळकर, ३० टक्के शिंदे आणि ९ टक्के उदाजी पवार यांचा हिस्सा ठरला. त्यांनी वसूल गोळा करायचा, आणि फौज बाळगून त्या मुलखाचा सांभाळ करायचा.

शिंदे उज्जैनला, होळकर इंदूरला आणि पवार धारला, तेव्हापासून माळव्यात कायम झाले.

मराठे माळव्यात लढत असतांना बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल हा मुघल सेनाधिकारी बंगशच्या तावडीत सापडला होता. त्याचे दोन मुलगे त्याचवेळी २८ सालच्या डिसेंबरमधे बंगशाशी लढण्यात गुंतले होते. छत्रसाल पराभूत झाला. त्याला माळव्यातील मराठ्यांच्या पराक्रमाची माहिती मिळाल्याबरोबर छत्रसालाने राऊंशी पत्रव्यवहार केला आणि आपल्या मदतीला बोलावलं. दिवाळीनंतर राऊही माळव्याकडे निघालेच होते. छत्रसालच्या मदतीला ते धावले. पिलाजी जाधव, दावलजी सोमवंशी, नारोशंकर असे सरदार घेऊन राऊ छत्रसालाला मार्च १२ ला राजधानी महोब्याला भेटले आणि मग बंगशाशी लढायला राऊ मैदानात उतरले. राऊंनी त्याच्या छावणीला वेढा घातला. त्याची रसद तोडली. पुढच्या दोन महिन्यात बंगशाच्या छावणीतील धान्य संपलं. मे महिन्यात बंगश शरण आला. छत्रसालावर परत कधीही हल्ला करणार नाही,

बुंदेलखंड सोडून जातो असं त्याने लिहून दिलं आणि आपली सुटका करुन घेतली. छत्रसाल या अपूर्व यशाने खूष झाला. त्याला आपला तिसरा मुलगा मानून त्याने आपल्या मुलखातला तिसरा हिस्सा राऊंच्या नावे करुन दिला आणि आपल्या कमकुवत मुलांची आणि राज्याची भविष्याची सोय केली. मराठ्यांची सीमा यमुनेला जाऊन भिडली.

चिमाजी आणि राऊ यांच्या या अद्भूत आणि अपूर्व यशाने १७२९ साल हे स्वराज्यासाठी माथ्यावर आलेल्या सूर्यासारखं तळपायला लागलं. राऊंना भरपूर दौलत, हिऱ्यांच्या खाणीचा प्रदेश पन्ना आणि भेटी देऊन छत्रसालाने खूष केलं. सागर, काल्पी, सिरोंज, झांसी, गडकोटा, इटा, कुंच, हरदेनगर एवढा मुलूख राऊंच्या खाजगी मालमत्तेत जमा झाला. (पुढे हाच मुलूख मस्तानच्या मुलांकडे गेला.) या प्रांताचा कारभार पाहायला राऊंनी गोविंद खेरची नेमणूक केली. हा गोविंदा खेर, राऊंच्या आजोळच्या गावचा, कोकणातील नेवऱ्याचा. तो राऊंच्या चाकरीत सामील झाला होता. तोच पुढे गोविंदपंत बुंदेला या नावाने प्रसिध्द झाला. त्याने सागर ही राजधानी मोठी केली. या विजयामुळे दिल्लीला शह देण्यासाठी बुंदेलखंडात पाय रोवायची राऊंची सोय झाली. छत्रसालबरोबरच्या त्या भेटीतच होती नर्तिका मस्तान.. छत्रसालाला खूप बायका आणि खूप मुलं होतं. त्याच्या यवन रखेलची अत्यंत सुंदर मुलगी मस्तान. तीही पुण्यात आली…शनिवारवाड्यापासून दूर, नदीच्या पलिकडे राहू लागली. ( आताचा कोथरुड भाग.)

मे महिन्यात साताऱ्यात पोचलेल्या या बंधूंच्या गौरवाची शाहूराजांनी मोठा सन्मान करुन पावती दिली. राऊंच्या पराक्रमाचा भाग्यतारा आकाशात

पोचला होता. राऊंचं कौटुंबिक जीवनही सुखात होतं. सोज्वळ,संयमी, प्रेमळ पत्नी काशीबाईच्या सहवासात राऊ तृप्त होते. तिला बाळाजी, रामचंद्र, जनार्दन हे तीन मुलगेही झाले होते. बाळाजी हे आजोबांचं नाव, ते राधाबाई आजी कशा घेतील, म्हणून त्याला नानासाहेब म्हणू लागले. राऊंचा हा नाना, सासवडला आजीबरोबर राधाबाईंबरोबर राहात होता, तो आता १० वर्षांचा झाला होता.. त्याला सातारच्या दरबारातील चालीरीती, राजकारण कळण्यासाठी सातारला आणण्याचा निर्णय बाजी-चिमाजींनी घेतला होता. त्यातच नानाच्या लग्नाचा प्रस्ताव घेऊन वाईचे सावकार भिकाजीपंत रास्ते राऊंकडे आले. त्याचं झालं असं की त्या दिवाळीत शाहूराजे फराळाला म्हणून रास्ते सावकारांकडे गेले. तिथे त्यांची अत्यंत सुस्वरुप, चुणचुणीत कन्या गोपिका शाहूराजांनी बघितली आणि ती नानाला देण्याची सूचना त्यांनी रास्त्यांना केली. हा तर दुग्धशर्करा योग होता.

आणखी एक मोठी घटना घडली. आजवर शाहूंचा दरबार साताऱ्यात, स्वाऱ्या मोहिमा काढायच्या तर पुण्यात यायचं, धडफळे सरदारांच्या वाड्यात राहायचं आणि पुढे जायचं असा रिवाज होता. राऊंना पुण्यात आपल्या वास्तव्यासाठी स्वत:चं घर हवं होतं. त्याचा विचार सुरु झाला. शनिवारवाड्याची जागा निश्चित झाली. वाडा बांधायचं काम लिमयांकडे सोपवलं. तेच पुढे खाजगीवाले झाले. १० जानेवारी १७३० मधे वाडा बांधायला सुरुवात झाली. एक वर्षात राहण्याजोगा वाडा तयार झाला २ फेब्रुवारीला १७३१ या दिवशी वास्तुशांत करुन सर्व भट मंडळी वाईला नानांच्या लग्नाला रास्त्यांकडे गेली. १० वर्षांचे नानासाहेब, ५ वर्षांची गोपिका. थाटात लग्न झालं.

तिथून आल्यावर सासवड कायमचं सोडून राधाबाई आणि मुलं शनिवारवाड्यात राहू लागली. राऊ, चिमाजीआपा आपल्या कुटुंबासह साताऱ्यात वास्तव्य करुन राहिली. शनिवार वाडा प्रसिध्दीच्या झोतात आला. राऊंनी शनिवारवाड्याभोवती तटबंदी बांधायला सुरुवात केली पण शाहूराजांनी परवानगी दिली नाही. त्यांना जुन्या सरदारांनी दिलेला त्रास आठवत होता. शाहूराजांच्या कैलासवासानंतर नानासाहेब पेशव्याने हल्ली दिसते ती ती बुरुज आणि तटबंदी बांधली. १७२८-२९-३०-३१ ही ४ वर्षे परमोच्च सुखाची, कीर्तीची, पराक्रमाची ठरली. चिमाजीआपांनाही मुलगा झाला होता. सदाशिव त्याचं नाव. पण सदाशिवच्या जन्मानंतर लगेच रखमाबाईंचं निधन लागलं. चिमाजीआपांचं दुसरं लग्न झालं. भट घराण्यातील सुखाला हे गालबोट लागलं होतं. काशीबाई, राधाबाईंनी सदाशिवच्या संगोपनाची जबाबदारी घेतली. राऊंच्या भाग्याने शिखर गाठलं होतं. पण अत्युच्च शिखर गाठलं की पुढचं पाऊन उतरणीवर पडत असतं. सन १७३१ ते १७४० पर्यंतची १०वर्षे तलवारीची धार तीच कायम राहिली पण व्यक्तिगत आयुष्य मात्र वादळात सापडलं.

१७२८ आणि २९ या दोन वर्षातील, पालखेड, माळवा, बुंदेलखंड या तीन प्रांतातील दोन भावांच्या शौर्याच्या कथा कानावर आल्या आणि दिल्लीतील बादशहा, उमराव आणि निजाम खडबडून जागे झाले. झोपच उडाली त्यांची ! त्यातच पुढचं वर्ष म्हणजे ३० साल शाहूराजांसाठी अत्यंत मनस्तापाचं आणि परीक्षा पाहणारं, कठीण गेलं. बाजी-चिमाजी दूर माळव्यावर आहेत हे पाहून कोल्हापूरच्या संभाजीराजांनी सेनापती उदाजी चव्हाण यांना

हाताशी धरुन शाहूंच्या मुलखात दंगा सुरु केला. शाहूराजांनी आधी समजूतीचं पत्र संभाजीराजांना लिहिलं, त्यात ते म्हणाले, “ हे राज्य श्रींचं. यवनाच्या आश्रयाला जाऊन जय कसा होईल? तुम्हांस राज्यलोभ असेल तर आम्हास सांगून पाठवायचे. आमचे पदरी सेवकलोक दिगंत प्रताप करणारे आहेत तसे तुम्हाला दिले असते, नाहीतर तुम्हीच यवनांकडून ते सोडवून घ्यायचे. आम्ही यवनांकडून मिळवलेले विभाग मागता ही काय नीती ? ” पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. तेव्हा शाहूराजे स्वत: सर्व सरदार आणि फौज घेऊन संभाजींविरुध्द निघाले. नंतर तर कहरच झाला. शाहूराजे या मोहिमेत एक दिवस शिकारीसाठी जंगलात गेलेले असतांना ४ मारेकरी त्यांच्यावर आले पण शाहूराजांवर त्यांच्याकडून हत्यार चालवेना.. तेव्हा शाहूराजे त्यांना म्हणाले, …हत्यार चालवत नसाल तर पसार व्हा, नाहीतर माझे शिपाई तुम्हाला मारतील.. मग ते मारेकरी पळून गेले. शाहूराजांचं हे वागणं त्यांच्या सज्जनपणाचा कळस होतं. शाहूराजांना ते कुणी पाठवले ते मात्र लगेच कळलं. शाहूराजांना कठोर निर्णय घेणं भाग पडलं.

शाहूराजांनी मग फौज देऊन श्रीनिवासराव प्रतिनिधींना संभाजीराजांचा सेनापती उदाजी चव्हाणावर शिरोळला होते. प्रतिनिधी श्रीनिवासरावांनी उदाजी चव्हाणांचा पूर्ण पराभव केला. त्यांचं सगळं सामान हाती आलं. संभाजीराजांच्या बरोबर असलेल्या स्त्रिया म्हणजे ताराराणी, आई राजसबाई, संभाजीराजांच्या राण्या, इचलकरंजी संस्थानचे व्यंकटेश घोरपडे, म्हणजे राऊंच्या बहिणीचे यजमान, हे पाडाव (पकडले ) गेले. संभाजीराजांच्या स्त्रिया आणि राजसबाईंना प्रतिनिधींनी सन्मानाने कोल्हापूरास पोचवलं. ताराराणींनी

शाहूराजांच्या नजरकैदेत राहणं पसंत केलं तेव्हा त्यांना शाहूराजांनी किल्ल्यावर राजवाड्यात ठेवलं. अटकेत असलेले इचलकरंजीकर व्यंकटेश घोरपडे हे राऊंचे मेहूणे, बहीण अनुबाईचे पती. ती संधी श्रीनिवासराव कशी जाऊ देतील ? राऊंनी १०,००० रुपये दंड भरला आणि घोरपड्यांना सोडवलं. व्यंकटेशराव घोरपडे मग कायमचे शाहूराजांच्या सेवेत आले. एवढ्या लढाईनंतर आता हे प्रकरण हारजीत होऊन संपणार नाही हे महाराजांच्या लक्षात आलं. त्यांनी विचार केला, निश्चय केला आणि त्यातून घडून आली ती सातारा-कोल्हापूर गादीची वाटणी. कऱ्हाडला दोघे बंधू एकत्र आले. २७ फेब्रुवारी १७३१ ला जखीणवाडीच्या मैदानावर मोठ्या थाटामाटात भेटी झाल्या. हत्तीवरुन दोघे बंधू आले, हत्तीवरुन उतरुन संभाजीराजांनी शाहूराजांच्या चरणांवर मस्तक ठेवलं. पुष्पवृष्टी झाली, तोफा सुटल्या. बंधूंच्या भेटीचा अपूर्व सोहाळा पार पडला. सर्व दरबारी जनता, या सोहाळयाला हजर होती. एप्रिलमधे वारणेचा तह झाला. दोन्हीकडील यादी पूर्ण झाली. शाहूराजांनी संभाजीराजांना आपल्याकडे वळवून घेऊन निजामाची एक बाजू बंद केली. शिवरायांच्या स्वराज्यासाठी २ तख्त तयार होणं ही मात्र महाराष्ट्रासाठी एक ऐतिहासिक घटना होती.

राऊ तेव्हा दाभाडेंच्याविरुध्दच्या झगड्याचा निकाल लावण्यात गुंतले होते. खंडेराव दाभाड्यांचा मृत्यू झाल्यावर त्यांचे पुत्र त्रिंबकराव दाभाडे सेनापती झाले. राऊंशी त्यांचं जमेना. ते राऊंना हिशेब देईनात, खजिन्यात पैसेही पाठवेनात. त्यातच गुजराथ मामला बिघाडाला कारण ठरला. राऊंची ताकद कमी करायला दाभाड्यांनी निजामाशी बोलणी सुरु केली. निजामाला एवढी सुवर्णसंधी आयती चालून आली. त्याला पालखेडचा बदला घ्यायचाच होता.

दाभाड्यांना धारचे उदाजी पवार जाऊन मिळाले. माळव्यात शिंदे-होळकरांपेक्षा कमी हिस्सा मिळाला म्हणून ते नाराज होते. दाभाड्यांची लढाईची तयारी पाहून शाहूराजांनी त्यांची समजूत घालायचा प्रयत्न केला. पण उपयोग झाला नाही. शेवटी शाहूराजांना दाभाड्यांविरुध्द हत्यार हाती घ्यावं लागलं. राऊंनीसुध्दा फौज जमवली. आपलेच दोन सरदार एकमेकांच्यात लढत आहेत हे पाहाणे शाहूराजांना त्रासदायक होतं. तेवढ्यात राऊंना बातमी लागली की निजाम माळव्यातून बंगशाकडच्या तोफा घेऊन दाभाड्यांच्या मदतीला जायच्या तयारीला लागला आहे. हे कळल्याबरोबर त्यांनी चिमाजीआपांना नर्मदेवर निजामाला अडवायला पाठवलं. दाभाडे गुजरातमधे डभईवर होते. राऊ पुणे-खानदेश-वरुन गुजरातवर येतील या समजुतीत दाभाडे आणि निजाम दंग असतांना, राऊ चित्त्याच्या चपळाईने लांब लांब मजली मारत, पुणे-नाशिक-पेठ-बासदा मार्गाने सुरतवरून अचानक दाभाड्यांच्यासमोर उभे राहिले. दाभाड्यांचे कारभारी पिलाजी गायकवाड बडोद्यास होते. दाभाडे भिलापूर डभईच्या तळावर होते. त्यांच्याकडे प्रचंड ४०,०००ची फौज होती आणि राऊंकडे निम्मी म्हणजे २५००० फौज होती. लढाईला तोंड लागलं. त्रिंबकराव दाभाडे हत्तीवरुन चालून आले. राऊंनी दाभाड्यांवर हत्यार न चालवण्याची सूचना आपल्या शिपायांना केली. पण त्रिंबकरावांचे सावत्रमामा भावसिंग टोके यांच्या बारगिराने दाभाड्यांवर गोळी चालवली आणि दाभाडे पडले. राऊ आणि चिमाजी आपा चालून येत आहेत हे कळल्यावर दाभाड्यांचे साथीदार त्यांना सोडून गेले. राऊंची ताकद करण्याची संधी निजामाला मात्र परत एकदा साधता आली नाही. यावेळीही हार मानावी लागली. या लढाईत राऊंचं यश कशात होतं ? तर शत्रूची बातमी राखणे, चपळ वेगवान गतीने वेगळाच मार्ग गाठून

शत्रूसमोर उभे राहणे, आणि शत्रूला आपल्याला हव्या त्या जागी येण्याची संधी मिळाल्याबरोबर हल्ला करणे. दाभाडे डभईला येईपर्यंत राऊंनी वाट पाहिली. संभाजीराजे आणि दाभाडे या दोन आपल्याच माणसांबरोबर लढण्यात फौज अडकल्यामुळे पेशव्यांची दोन वर्षे गेली. त्यामुळे उत्तर हिंदुस्थानात स्वारी झाली नाही.

## बाजीराव

## दिल्लीवर झडप-मस्तानी.

दाभाडे प्रकरणाने शाहूराजे दु:खी झाले. पण आपल्याविरुध्द जाणारांना क्षमा नाही हाही संदेश त्यांनी सर्वांना दिला. मग उमाबाईंची समजूत घालण्यासाठी त्यांच्या भेटीला गेले. राऊ आणि चिमाजी आपा यांना उमाबाई दाभाड्यांच्या पायावर घातलं. आणि उमाबाईंशी सलोखा करुन परत आले. पुढचं वर्ष, ३२ साल उजाडलं ते एका वेगळ्याच घटनेने. निजामाने शाहूराजांजवळ राऊंशी भेट करवून द्यायचा आग्रह धरला. म्हणून शाहूराजांनी राऊंना निजामाच्या भेटीला जायचा आग्रह धरला. राऊंना कारणाशिवाय निजामाला भेटण्यात रस नव्हता, वाचाळता करत वेळ घालवणं त्यांना बिलकुल मंजूर नव्हतं.. पण शाहूराजांचा आग्रह इतका वाढला की शेवटी राऊ कबूल झाले. शाहूराजांच्या या अति आग्रहामुळे साताऱ्यात एक वेगळीच अफवा घराघरात उठली. निजामाला राऊंचा घात करायचा आहे आणि त्यासाठी त्याने शाहूराजांना २ कोटी रुपये देण्याचं कबूल केलं आहे. राऊंचा उद्दामपणा महाराजांना नकोसा झालाय म्हणून निजामाबरोबर त्यांनी हा गुप्त कट रचलाय.. एवढी जनचर्चा महाराजांनाही संकटात टाकून गेली. शेवटी विश्वासाची माणसे

बरोबर घेऊन राऊ निजामाला भेटायला गेले. पण नेहमीप्रमाणे ही भेट औरंगाबादच्याजवळ मोठ्या ठिकाणी न होता पंढरपूर कर्माळा मार्गावर, लातूरच्या उत्तरेला ८ मैलांवर, मांजरा नदीच्या काठी, औसाजवळ रोहेरामेश्वर इथे पार पडली. भेटी मोठ्या थाटामाटाच्या झाल्या. रायांना एक हत्ती, २ मोती, उंची वस्त्रे,२ देखणे घोडे निजामाने भेट दिली. तोफा सोडल्या. याच भेटीच्या वेळी निजामाच्या जनानखान्यातील स्त्रियांनी राऊंच्या देखणेपणाची कीर्ती ऐकून त्यांना बघण्याची हौस भागवून घेतली. या भेटीत दोघांची काय बोलणी झाली ती गुप्तच राहिली. त्याची कोणतीही कागदपत्रं बाहेर आली नाहीत. पण राऊ आणि निजामाने आपापसात लढत न बसता आपापले उद्योग करावेत एवढं मात्र निश्चित झालं असावं कारण पुढची ४ वर्षे निजाम राऊंच्या वाट्याला गेला नाही.

३२ सालच्या २७ डिसेंबरला या भेटी होऊन राऊ निजामाकडून सुखरुप परत आले. शाहूराजांनी सुटकेचा निश्वास टाकला. शनिवारवाड्यातही मातोश्री राधाबाई, चिमाजीआपांची काळजी मिटली. त्या नवीन शनिवारवाड्यात पुढच्या वर्षीचा गणपती उत्सव मोठ्या थाटात साजरा झाला. छत्रसालाकडून आलेली मुसलमान नर्तिका मस्तान हिचा नाच झाला. मस्तानचं सौंदर्य बघून सर्वच थक्क झाले.. तिला १०० रुपये बिदागी देण्यात आली. राऊंची नजर तिच्यावर खिळून राहिली..त्यानंतर राऊंचं नदी पार करुन मस्तानच्या मस्तानच्या बागेकडे जाणं वरचेवर होऊ लागलं. या बातम्या मातोश्री राधाबाईंच्या कानावर यायला लागल्या. काशीबाईंना कळायला लागल्या. चिमाजीआपांना आधीच कळत होत्या. रक्षा असणं चुकीचं नव्हतं, पण तिचं यवन असणं आणि त्यात राऊंनी गुंतणं.. राऊंच्या या वागण्याने लोकप्रवाद

वाढायला लागला. घराघरात कुजबुज सुरु झाली. पण राऊंना त्याची फिकीर नव्हती. राऊ धनुष्यासारखे न बदलणारे, काशीबाई धनुष्याच्या दोरीसारखी.. कितीही ताण सहन करणारी. राऊंच्या प्रेमात मस्तानही आकंठ बुडली. तिने मराठी पोशाख, मराठी चालिरिती सर्व स्विकारलं. राऊंबरोबर मोहिमेत हजर राहू लागली. त्यावेळी राऊंच्या बरोबरीने घोडदौड करायची. तलवार चालवायची. राऊ तिच्या सहवासात तृप्त होते पण समाज विरुध्द होता.

राऊंची पुढची मोहीम होती ती कोकणात. त्या ३३ सालच्या जंजिरा स्वारीचं निमित्त राजकीय नव्हतंच. उलट अगदी क्षुल्लकच पण अहंकारावर तयार झालेलं होतं. ही घटना मोठी रंजक आहे. यात भांडण लागलं ते फार मोठे कोकणातले सत्पुरुष, ब्रह्मेंद्र स्वामी आणि जंजिऱ्याचा सिद्दी यांच्यात. ब्रह्मेंद्रस्वामी हे त्याकाळातील मोठं प्रस्थ. सरकारशी आणि भट घराण्याशी त्यांचे मोठे लागेबंधे. बाळाजी विश्वनाथांना, त्यांच्या संकटकाळात देशावर जा असा सल्ला देणारे तेच हे. हे स्वामी आपला दौरा संपवून कर्नाटकातून परत येतांना सिद्दीने, आपला हत्ती आणायची जबाबदारी त्यांना सांगितली. स्वामींनी ती मान्य केली. स्वामींना कोण अडवणार? हत्ती कोकणापर्यंत व्यवस्थित आला पण कान्होजी आंग्र्यांच्या लोकांनी हत्ती आणणाऱ्यांना परवाना कुठाय असं विचारलं, त्यावरुन सगळा बिघाड झाला, हत्ती सिद्दीपर्यंत पोचलाच नाही. रागावलेल्या सिद्दीने स्वामींचा मठ उधळून लावला. स्वामींना हात लावणाऱ्या सिद्दीला धडा शिकवणं हे सरकारचं कर्तव्य.. मग स्वामी साताऱ्याजवळ धावडसीला येऊन राहिले. त्यांनी शाहूराजांकडे सिद्दीच्या जंजिऱ्यावर हल्ला करायचा आग्रह धरला त्यातून निघाली जंजिऱ्याची मोहीम. शाहूराजांनी आपले

सगळे दरबारी कोकणात उतरवले. त्यात राऊ आणि प्रतिनिधी श्रीनिवासरावही होते. आजवर दोघांचं कधीही पटलं नाही कारण प्रतिनिधी म्हणजे शाहूराजांच्या तोलाचे. पेशवे हे त्यांचेही सेवक. या मोहिमेचा शेवट एवढाच की जंजिरा स्वारीचा निकाल लागला नाही. प्रतिनिधींनी राऊंना मदत न करता, रायगड मिळवून शाहूराजांना खूष केलं. शेवटी चिमाजीआपांनीच जंजिऱ्याची मोहीम यशस्वी केली. दुसरं म्हणजे सागरी लढाईचा अनुभव कुणालाच नव्हता. कान्होजीपुत्र सेखोजी आंग्रे यांच्याशिवाय कुणालाच जंजिऱ्याची मोहिम चालवता आली नाही

३४ साल उजाडलं. राऊंच्या वैवाहिक आयुष्यात महत्त्वाचं वर्ष होतं. या वर्षी काशीबाई आणि मस्तान दोघींना मुलगे झाले. काशीबाईंना १ ऑगस्टला साताऱ्याला माहुलीत रघुनाथ झाला...तेच राघोबादादा. मस्तानने समशेर हे आपल्या भावाचं नाव बाळाला ठेवलं. मातोश्री राधाबाईंनी परिस्थिती हुशारीने सांभाळली. राऊंचाच तो अंश होता. त्यांनी आणि काशीबाईंनी मस्तानला बाळंतविडा पाठवला आणि कृष्णसिंह नाव ठेवायला सांगितलं. मातोश्री आणि चिमाजीआपा राऊंना सांभाळून घेत होते.

राऊंचं ३५ साल धामधुमीचं गेलं. सवाई जयसिंहानी बादशहाला सल्ला दिला की राऊंच्या तडाख्याला आवरायचं असेल तर राऊंनाच माळव्याचा सुभेदार करा आणि आपल्या रक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवा म्हणजे मराठ्यांच्या फौजांचा त्रास कायमचा वाचेल. सुभाही आपल्याचजवळ राहील. बादशहाला हा सल्ला मानवला. त्याने राऊंची भेट घेण्याला मान्यता दिली. मग जयसिंहाच्या आमंत्रणावरुन बादशहाशी पुढील

बोलणी करण्यासाठी राऊ काशीबाईंना घेऊन उदेपूर-जयपूरच्या भेटीला गेले. उदेपूरच्या राणा जगतसिंहने चंपाबागेत राऊंचा भव्य सत्कार केला. राण्याने दोन सुवर्ण सिंहासने तयार केली होती, एकावर राऊंना बसायला सांगितलं. राऊंनी नम्रपणे नकार दिला. ज्या सिंहासनावर राणा प्रतापसारखे चक्रवर्ती बसले त्यावर मी बसणार नाही असं म्हणून राणा बसला होता त्याच्या शेजारी दुसरं आसन होतं त्यावर बसले. राऊंच्या या वागण्याने दरबार खूष होउन भारुन गेला. उदेपूरावरुन राऊ जयपूरला सवाई जयसिंहाच्या भेटीला गेले. तिथे जयसिंहांनी त्यांचा भव्य सत्कार केला. तिथे मात्र राऊ जयसिंहाबरोबर आसनावर बसले. दरबारातून परत आल्यावर राऊंना कुणी विचारलं की, श्रीमंत, उदेपूरला खालच्या आसनावर बसलात पण इथे मात्र बरोबरीने बसलात असं का केलंत ? राऊंनी मार्मिक उत्तर दिलं. उदेपूरवाल्यांनी आपला स्वाभिमान बादशहाला विकला नाही कधी.. जयपूरला असतांना बादशहाशी तहाच्या कलमांची बरीच वाटाघाट झाली, पण बादशहाच्या दरबारातील जयसिंहाच्या विरुध्दच्या लोकांनी ती कलमे मंजूर होऊ दिली नाहीत. शेवटी २ महिने राहून राऊ भेट निष्फळ झाल्याने पुण्याला परत आले. तेव्हाच त्यांचा निर्णय झालेला होता, आता आपल्या बळावरच माळव्याचा हक्क चालू करायचा. आणि त्यांनी तसंच केलं. त्याच वर्षी ३५ साली, मातोश्री राधाबाई काशीयात्रा करायला पुण्यातून बाहेर पडल्या आणि एक वर्षांने ३६ साली परत आल्या. त्यांचा सर्व प्रवास मोगलाई मुलुखातून सुखरुप पार पडला. राऊ आणि चिमाजीआपांच्या मातोश्री एकट्या अवघ्या १०० माणसांबरोबर प्रवास करत होत्या पण कोणा मुघल सरदाराची त्यांना हात लावायची हिंमत झाली नाही. उलट ज्या बंगशाला राऊंनी बुंदेलखंडातून हाकलून दिलं होतं, त्याच बंगशाने मातोश्रींची भेट घेऊन, मला

आपण माझ्याच मातोश्रींसारख्या, असं म्हणून त्यांना यमुनापार कडक संरक्षणात जाऊ दिलं. बाजी-चिमाजी यांच्या प्रतापांचाच, दराऱ्याचा तो परिणाम होता.

३६ साली मातोश्री काशीयात्रा करुन परतल्या आणि राऊ आणि त्यांचे रांगडे गडी माळव्यावरचा वसूलीचा हक्क आपल्या बळावर साध्य करायला बाहेर पडले. यावेळी राऊंच्या बेबंद धाडसाचं दर्शन खुद्द बादशहालाच घडलं. राऊ म्हणजे काय हे बादशहाने दिल्लीतच अनुभवलं. रामनवमीचा उत्सव दिल्लीत जोरात चालला होता. दुसरे दिवशी रामनवमी होती. दिल्लीच्या दक्षिणेला कालकादेवीची जत्रा चालू होती. भाविक मंडळी जत्रेचा आनंद लुटत असतांना अचानक धुरळा उडायला लागला. पाहता पाहता नागव्या तलवारी घेतलेले स्वार मैदानाजवळ आले. जत्रेतील लोकांचा श्वास थांबला. भयभीत होऊन वाट फुटेल तिथे सगळे पळायला लागले. जत्रेतील पालं उखडली गेली, आक्रमण करणारांनी तिथला हत्ती नेला. सगळं मैदान विस्कटून टाकलं. कोण होते, कुठून आले कुणालाच अंदाज येईना. घाबरलेल्या लोकांची ही अवस्था बादशहाच्या कानावर लगेच गेली. तो म्हणाला, मेवाती चोर लुटारू असतील.. व्यापारी कशाला एवढा मौल्यवान माल जत्रेत नेतात ? पण ती वावटळ आली तशीच निघूनही गेली. सगळे स्वार तालकटोऱ्यावर मालचा गावच्या झाडीत जाऊन बसले आणि तिथून त्या टोळीनायकाचं बादशहाला पत्र आलं. पत्र खरंच बाजीरावांचं होतं. आग्र्यावर त्याचे खानदौरान आणि सादतखान हे मोठे सरदार फौज घेऊन असतांना बाजीराव दिल्लीवर.? बादशहा कापायलाच लागला. दरबारी भयभीत झाले. बादशहाने आपले भरवशाचे लोक बातमी काढून आणायला पाठवले.राऊ आल्याची बातमी खरंच होती. बादशहाला पळता भुई

कमी झाली. पळून जाण्यासाठी त्याने घाईघाईने यमुनेवर नावा जमवल्या. पण ते तरी कसं शोभलं असतं. पराभव झाला तरी बदनामी..शेवटी अमीरखान नावाचा लढण्याचा अनुभव नसलेला बादशहाच्या मर्जीतला माणूस, १२००० स्वार, २०००० पायदळ आणि तोफा घेऊन बाजीरावांचा समाचार घ्यायला गेला. राऊंनी त्याला पुढे पुढे येऊ दिलं आणि आपल्या विळख्यात आल्यावर तुफानी हल्ला चढवला. मल्हारराव, राणोजी, सटवोजींनी चवताळून ४०० लोकांना कापून काढलं. २०० जखमी लोकांना पाहून दिल्लीकरांची बोबडीच वळली. सारी दिल्ली कापायला लागली. अफवाचं प्रचंड रान माजलं. राऊ आणि दिल्लीत..? हे तर स्वत: ढाण्या तरुण वाघाने, आपण जंगलात रहायला आलो असल्याचं गावात जाऊन मुखियाला सांगितल्यासारखंच होतं.. राऊ होतेच तसे. थरथराट, घबराट, दणदणाट निर्माण करणारे. शत्रूसमोर अचानक प्रगट होऊन त्यांना घाम फोडणारे. तडफदार. चैतन्याचा ज्वालामुखी. अवघा देह म्हणजे वीरश्रीचा उन्माद..नजरेत यशाची धार.

दिल्लीचा दहा दिवसांचा घोड्यावरचा प्रवास चित्त्याच्या झेपेने दोन दिवसात संपवला होता त्यांनी..आग्र्यावर बादशहाचे जबरदस्त सरदार बसले होते म्हणून दिल्लीला पोचण्यासाठी त्यांनी मार्ग निवडला तोही त्यांच्या युध्दकौशल्याला शोभेल असाच. मुख्य रस्त्याने न जाता, जाठाच्या मुलखातून, फत्तेपूरसिक्री-दीग-नेवत्याच्या डोंगरांच्या सरहद्दीने ते दिल्लीत पोचले. आग्र्यात सादतखान, सफदरखान बंगश, आरामात जेवत बसले होते, त्यांना ही बातमी लगेच पोचली. तिघांचे घास घशातच अडकले. राऊ स्वत: का आले दिल्लीत? कारण अगदी क्षुल्लक होतं. बादशहाची आणि त्यांची भेट होण्यामागे निजाम

स्वत: आणि दरबारातील जयसिंहाचे विरोधक होते, म्हणून आपल्याच बाहूबळावर त्यांनी माळव्यात पाय ठेवला आणि मल्हाररावांना गंगा यमुनेच्या दुआबात पाठवलं. होळकर पिलाजी जाधवांनी शिकोहाबाद वगैरे ठाणी जिंकली. आणि ते फौज घेऊन जळेश्वरवर आले. पण तिथे सफदरखान सादतखान या मुघलांची मोठी फौज होती, त्यांचा अंदाज न आल्यामुळे मल्हारराव आणि मराठ्यांना माघारी फिरावं लागलं. सादतखानाला वाटलं की आपण मराठ्यांची मोठी फौज आणि बाजीरावाला बुडवलं. म्हणून त्याने लगेच बादशहाला मराठे हरल्याची बातमी पोचवली. लगेच बादशहालाही बाजीरावाला सादतखानाने हरवलं हे कळल्यावर अत्यानंद झाला आणि त्याने सादतखानाला हत्ती, पोशाख पाठवला. राऊंना ही बातमी कळली मात्र, राऊंनी धाडसी निर्णय घेतला. त्यांच्याच शब्दात सांगायचं तर,

“सादतखानानी बादशहास लिहून पाठवले की मल्हारजी होळकर कामास आले, (ठार झाले) बाजीरावाची ही गत झाली. आमचे फौजेत जीव नाही, केवळ निर्जीव, बुडवून नेस्तनाबूद केली असे लिहून पाठवले. मोगली कारभार ..करावे थोडे, लिहावे फार. आता पातशहास सत्य भासते ते मिथ्या करुन दाखवावे. म्हणून एकतर सादतखानास तरी बुडवावे नाहीतर दिल्लीस जाऊन पुरे जाळावे असा विचार केला.” राऊंनी दुसरा मार्ग निवडला. सरळ बादशहासमोर उभं राहायचं आणि मी पळून गेलेलो नाही हे दाखवायचं. त्यासाठी हा सगळा खटाटोप होता. पातशहाला आणि जनतेला त्रास द्यायचा नाही, हा विचार मनात ठेवून एवढा उद्योग केला. गावाबाहेर राहिले आणि मुघलांची मोठी फौज येते आहे हे कळल्यावर पसार झाले. राऊंच्या मनातलं

दिल्लीवर स्वारी करण्याचं स्वप्न असं सत्यात आलं पण त्याला शाहूराजांच्या इच्छेचे लगाम होते नाहीतर कधीच राऊंनी दिल्ली जिंकली असती. राऊंचं एक अपूर्व साहस याची ही पावती होती. शाहूराजांचं सारं लक्ष त्यांच्या दांडगाईकडेच लागलेलं असे. हे आडदांड पोर काय करेल या काळजीत त्यांनी राऊंना मायेने पत्र लिहिलं, "कोठे आहात, कसे आहात, तुमच्याकडून पत्र नाही. आग्र्यापर्यंत गेला आहात, पलिकडे जाणार असं ऐकिवात आहे. असं असेल तर मोगल इमान देऊन मतलब साधतील. याजकरता शहरात जाऊन भेट घेण्याचा मनसुबा करत असाल तर सर्वथा न करणे. भेट न घेता दुरुनच मतलब साध्य होईल तो करणे..हावभरी होऊन त्यांच्या विश्वासावर जाल म्हणून लिहिले आहे. तुम्ही बुध्दीमंत कार्यकर्ते यशस्वी सेवक आहात, बहुत विचारे आपली बाजू सर होईल ते करणे.." राऊ बुध्दीमंतच होते. दिल्लीश्वराला फक्त दचकवून आले. आणि शाहूराजांना ते दिल्लीत जातील याची धास्ती होती तीही खरीच झाली.

## बाजीराव

## भोपाळ-रावेर-अंत

इ. स. १७३७ साल उजाडलं. निजाम उन्मुल्क आणि मराठे यांच्यातील युध्दाचा अडीच वर्षे संग्राम झाला. बाजीरावाला संपवलं नाही तर आपलं दक्षिणेतलं स्वप्नही खरं होणार नाही या विचाराने निजाम बादशहाच्या भेटीला गेला. पुढचा संग्राम भोपाळचा गाजला. राऊंना माळव्यातून संपवायला निजाम दिल्लीला बादशहाला भेटून निघाला. प्रचंड मोठी फौज त्याने घेतली. राऊंनी बातमी गोळा केलीच होती. बाजी-चिमाजींनी १५ ऑक्टोबरला कार्तिक

महिन्यात उत्तरेकडे कूच केलं. ८० हजार फौज नर्मदेवर गोळा झाली. निजाम तेव्हा भोपाळवर होता. औरंगाबादवरून मदतीला येणाऱ्या आपल्या मुलाच्या मदतीची वाट पाहात बसला होता. नासिरजंगला अडवायला चिमाजी खानदेशातील वरणगावावर घट्ट उभे राहिले. .

राऊ माळव्यातून अचानक निजामाजवळ पोचले आणि निजामाला वेढा घातला तेव्हाच निजामाची पहिली हार झाली. १३ डिसेंबर १७३७ ला युध्दाला सुरुवात झाली. आता बंदिस्त जागी राहणं एवढंच निजामाला शक्य होतं. त्याने भोपाळ निवडलं. भोपाळचा प्रचंड तलाव सोबतीला घेऊन तो तिथे राहिला. मराठ्यांची चपळाई आपल्याला झेपणार नाही हे त्याला आजवर कळून चुकलं होतं. राऊ तिथे पोचले. रसद बंद केली. निजामाच्या तोफा चालू झाल्या. राऊंकडे तोफा नव्हत्या म्हणून काय झालं. रायांच्या फौजेने सतत बाणांचा वर्षाव करुन शत्रूला जागा सोडायला लावल्या. काय करणार तोफा चालवणारा तोपची तरी ? निजामाने भोपाळ किल्ल्याचा आश्रय घेतला. ती तर त्याची आणखीनच मोठी चूक झाली. कारण राऊंनी त्याचं दाणापाणीच बंद केलं. निजामाचा प्रचंड कोंडमारा झाला.फौजेला अन्न मिळेना, गुरांनी पळसाची पानं खायला सुरुवात केली. हत्ती घोड्यांना झाडांची सालं खायला घातली. ४ दिवस मुसलमान शिपायांनी घोडे, बैल मारून भूक भागवली. हाल झाले ते निजामाच्या रजपूत सैनिकांचे..भोपाळात राहणे अशक्य झालं तेव्हा निजाम बाहेर पडून तोफांच्या आसऱ्याने चालायला लागला. मराठ्यांच्या माऱ्याने आणखीनच हैराण झाला.

शेवटी, निजामाची अब्रू राखली तर ते सर्व मागण्या मान्य करतील असा निजामाकडून घेऊन आनंदराव सुमंत राऊंकडे आले. राऊंनी मान्य केलं.

त्यांच्याकडे रसद पोचवली. ७ जानेवारी ३८ सालात तह झाला. राऊंच्या मागण्यांवर निजामाने सही केली. १. माळवा प्रांत देणे. २. नर्मदा आणि चंबळमधला मुलूख देणे. ३. या दोन्हीच्या बादशाही सनदा आणून देणे. ४. मराठ्यांना खर्चाचे ५० लाख बादशहाकडून देववणे. निजामाने बुंदेलखंडातील सर्व सरदार आणि आणि राजे यांना राऊंच्या भेटीला पाठवलं. राऊंनी दरबार भरवून त्यांच्याकडून कर वसूल करुन घेतला. राऊ मुत्सद्दी होते. व्यवहारकुशल होते. निजामाला पूर्ण बुडवला नाही. तहाला मान्यता दिली कारण निजामाकडे उत्कृष्ट तोफखाना होता आणि रजपूत, रोहिले बुंदेले यांची मदत त्याला होती. त्यामुळे फार ताणण्यात अर्थ नव्हता. जो निजाम चौथाई सरदेशमुखीचा पैसा द्यायला तयार नव्हता, त्याला माळव्यासारख्या सुपिक-संपन्न प्रांताची सनद लिहून देतांना फार जड गेलं. बाळाजी विश्वनाथांनी सनदा आणल्या होत्या, त्याचे लेखी करार हाती मिळवण्यासाठी राऊंची हयात गेली. मिळालेल्या मुलखाची व्यवस्था लावून, ३८ साली भोपाळवर निजमाला मान खाली घालायला लावून राऊ पुण्यात परतले. तेव्हा चिमाजीआपा वसईच्या स्वारीच्या तयारीला लागले होते.

.... सूर्य कितीही तेजाने झळाळत राहिला तरी तो कधीतरी त्याच्याचमुळे प्रकाशित असलेल्या चंद्रामुळे ग्रहणाच्या छायेत येतो, काळवंडतो. राऊ नावाचा सूर्य हळूहळू ग्रहणाच्या दिशेने सरकत होता. त्यांची मस्तान चंद्रिकाच त्याला कारण ठरायला लागली होती. राऊंचा आजवरचा धाडस हा गुण आता अतिरेकाकडे गेला. शाहूराजांच्या दरबारी राजशिष्टाचार पाळला जात होता. राऊ त्याच्यापुढे गेले. भर दरबारात त्यांनी मस्तानला पत्नी

म्हणून नेलं. ही धिटाई खचितच योग्य नव्हती. रक्षा कुणाला नव्हत्या ? पण त्या कधी दरबारात आणण्याची हिंमत कुणी केली नव्हती. मस्तानला दरबारात आणल्यावर सारा दरबार संतापला. शाहूराजे संतापले. ही त्यांची अवज्ञाच होती. या प्रकरणाचा साताऱ्यात मोठाच गवगवा झाला. हितशत्रूंनी त्यात आणखी सरपण घातलं. अनगळ-जोशी सावकारही रागावले. कसंबसं मस्तानला पुण्यात पाठवण्यात आलं. हे कानावर आल्यावर करारी-कणखर-मुत्सद्दी, मातोश्री राधाबाई अवाक झाल्या. आजवर राऊंच्या मनाला दुखवायला नको म्हणून त्यांनी खूप संयमाने रायांचं मस्तान प्रकरण हाताळलं होतं. ते करतील ते मान्य केलं होतं.

शनिवारवाड्याच्या नवीन बांधकामानंतर वास्तुशांतीला यायला पुण्यातील रामेश्वरावरच्या पुरोहितांनी मुसलमान स्त्री म्हणून नकार दिला होता, तेव्हा मातोश्री राधाबाईंनीच, तुम्ही न याल तर काशीहून आमचे पुरोहित आणवीन असा दम दिला होता. रामेश्वरावरच्या पुरोहितांच्या बहिष्काराच्या वादाच्या वेळी तिथे दोन कनोजी ब्राह्मण उपस्थित होते, ही सगळी वादळी चर्चा पाहून ते पुरोहितांना म्हणाले, ज्या बाजीरावांच्या मुसलमान स्त्रीसाठी तुम्ही वाद घालता आहात, तर आम्ही तुम्हाला विचारतो की रायांनी काशीपर्यंतच्या मुसलमानांना दाबून ठेवलंय आणि हिंदूंच्या रक्षणासाठी शौर्य गाजवलंय.. तुमच्याकडे दुसरा कुणी आहे का असा तर दाखवा नाहीतर राऊंच्या दोषाकडे दुर्लक्ष करा. तेव्हा पुरोहितांनी बहिष्कार मागे घेतला. रायांना आता मद्यमांसाचंही व्यसन लागलं होतं. राऊंची बेअब्रू राधाबाईंना आणि चिमाजीआपांना बघवेना. यावर मातोश्री, चिमाजीआपा, नानासाहेब, यांनी एक विचाराने मस्तानला कैदेत

ठेवून रायांपासून दूर करण्याचा निर्णय घेतला. शाहूराजांना हा निर्णय पसंत पडला नाही. त्यांनी निरोप पाठवला, रायांची वस्तू त्यांच्याजवळच ठेवावी. व्यसनाचा दोष त्यांच्यावर नाही. लोहपुरुषाला गंज चढणं त्यांनाही बघवत नव्हतं. पण राऊंची आणि पर्यायाने कुटुंबाची बदनामी थांबवण्यासाठी हा निर्णय घेणं भागच होतं. त्यातच रायांनी आणखी एक हट्टीपणा केला. रघुनाथाची मुंज लावायच्या वेळी समशेरचीसुध्दा मुंज लावायाचा त्यांचा हट्ट कदापी मान्य होण्यासारखा नव्हता. त्यांना मस्तानला पत्नीचा दर्जा द्यायचा होता, पण शेवटी ती रक्षा होती आणि मुसलमान होती, हे समाज कसं चालवून घेईल ? मग राऊ आणि मातोश्रींमधे संवाद तुटला.

एक चिमाजी आपा होते जे दोघांच्यातील संभाषणाचा धागा होते. राऊ आपल्या आईवर चिडले होते. संस्काराचं पाणी शिंपडून आपल्या मुलांना मोठं करणाऱ्या प्रत्येक मातेला आपला पुत्र बिघडणं हे तिच्या अपयशाचं कारण वाटतं तेच मातोश्री अनुभवत होत्या. रायांचं प्रकरण हाताबाहेर जायला लागलं. चिमाजीआपा मात्र शांतपणे, समर्थपणे सगळं सांभाळत होते. घरातील रघुनाथाची मुंज, सदाशीवचं लग्न, ही लग्न कार्य मुंजी तेच निपटत होते. रायांनी मगरुरीने दुखावलेल्या राम पटवर्धनसारख्या शूर लोकांना तेच सांभाळून घेत होते, सातारा दरबारातील कामकाज तेच चालवत होते, रायांशी गोडीगुलाबीने वागून त्यांचं मन तेच राखत होते. अशातच चिमाजी आपांचा आणखी एक पराक्रम म्हणजे १७३९ साली वसईची पोर्तुगिजांविरुध्दची मोहीम यशस्वी करणं. आणि पोर्तुगिजांना वसईतून हाकलून तिथल्या हिंदूंचा श्वास मोकळा करणं. ५ मे १७३९ या दिवशी पांढरं निशाण घेऊन पोर्तुगीजांचा वकील

चिमाजीआपांना भेटायला आला. ७५ मैल लांब सागरी किनारा, ३४० गावे, ८ शहरे, २० किल्ले आपांच्या पराक्रमामुळे स्वराज्यात आले. वसई मराठ्यांना मिळणं म्हणजे सागरावर हुकमत मिळवणं, वसई आणि ठाणे जिंकणं म्हणजे मुंबईच्या इंग्रजांवर शह बसवणं. चिमाजी आपांच्या कर्तृत्वाला सीमा नव्हती. त्यांनी व्यंकटराव घोरपडे यांना गोव्यावर हल्ला करायला पाठवलं. त्यामुळे पोर्तुगिजांची फौज वाटली गेली आणि ताकद कमी झाली. ही रणनीती अतिशय यशस्वी झाली. दोन्ही बंधू आपपापलं यश घेऊन पावसाळ्यात ३९ सालात पुण्यात आले.

तेवढ्यात नादिरशाहाची दिल्लीवर स्वारी केल्याची बातमी सातारच्या दरबारात येऊन थडकली. राऊंना बादशहाच्या मदतीला जाणं भाग होतं पण दिल्ली उध्वस्त करुन नादिरशहा निघून गेला. बादशहा मोकळा झाला. त्यामुळे राऊंचं दिल्लीत जाणं रहित झालं. ३९ साल उजाडलं. निजाम आणि त्याचा पुत्र नासिरजंग यांनी पालखेड संग्रामाच्या वेळी तहात कबूल केलेली नेवासे, टोके अशे परगणे अजून राऊंना दिले नव्हते, म्हणून ते वसूल करायला राऊ बाहेर पडले. मग राऊ निजामाच्या पुत्राशी नासिरजंगाशी लढण्यात गुंतले. नासिरजंगला भोपाळच्या लढाईच्या वेळी जमवलेल्या फौजांना काम द्यायचं होतं. त्याने मराठी मुलखात दंगा सुरु केला. राऊ त्याच्या समाचाराला गेले. नासिरने पराभव मान्य केला. २७ फेब्रुवारी १७४० या दिवशी मुंगीपैठणला परत एकवार तह झाला.त्यांच्याकडून मिळालेल्या हंड्या आणि खरगोण प्रांताची व्यवस्था लावण्यासाठी नर्मदेच्या काठावर रावेर गावी मार्चमधे पोचले. तिथे लष्कराचा तळ पडला. रायांनी चिमाजी आपांना मस्तानला आपल्याकडे

पाठवण्याचा निरोप दिला. मस्तान कैदेत होती. चिमाजीआपांनी काशीबाई आणि जनार्दनला लष्करात पाठवलं. राऊ नाराज झाले. त्याच मुक्कामात २२ एप्रिलपासून राऊंना ताप येऊ लागला. पुण्यात बातमी पोचल्याबरोबर मातोश्रींनी मृत्यूजंयाचा जप चालू केला. वेगवेगळी दानं दिली. यमाचं वाहन रेडा म्हणून म्हैसदान दिलं की मृत्यू जवळ येत नाही ही तेव्हाची समजूत. तेही दान झालं. रोजच सांडणीस्वार रावेरहून पुण्यात पोचू लागला.

२८ एप्रिल हा दिवस उजाडला आणि एक दिवस उल्कापाताची बातमी आली. राऊंचा नवज्वराने- टायफॉइडने- अंत झाला होता. पुण्यात हाहा:कार माजला. सारा महाराष्ट्रच काय पण गनिमही हळहळला. शाहू अति दु:खात बुडले. मल्हारराव सुभेदारांच्या डोळ्यातील पाणी थांबत नव्हतं. मस्तानला ही बातमी कळली. रायांच्या आजारपणाची बातमी कळताच ती कैदेतून बाहेर पडली. पाबळजवळ पोचेपर्यंत तिला रायांचा कैलासवासाची वार्ता कळली. हिरकणी खाऊन तिथेच तिने प्राणार्पण केलं. एक खरी शमा-परवाना जोडी या लोकातून निघून गेली. रायांचं अवतारकार्य अवघ्या चाळिसाव्या वर्षीच संपलं होतं. काशीबाई, जनार्दन लष्करातून परत आले. आजवरच्या मनस्तापाने काशीबाई खचून गेल्या होत्या. राऊंना सांभाळता सांभाळता त्यांची ताकद क्षीण झाली होती. देवाच्या गाभाऱ्यात धूपाच्या कांडीने एकटीनेच भक्तीने जळत रहावं, तसं काशीबाई रायांसाठी गेली १० वर्षे जळत राहिल्या. पुढची ६/७ वर्षे त्या शनिवाड्याच्या बाहेरच नानासाहेब पेशव्यांबरोबर मोहिमेत फिरत राहिल्या.

काळ हीच यावरची फुंकर होती. शाहूराजांनी बाजीरावपुत्र, नानासाहेबांची विचारपूर्वक पेशवेपदावर नेमणूक केली. शाहूराजांमुळे पेशवाई

काळ स्वराज्यात चालू झाला. राऊंना जाऊन ६ महिने होतात न होतात तोच १७ डिसेंबरला चिमाजीआपांनीही शेवटचा श्वास घेतला. भट घराण्यावर आकाश कोसळलं. चिमाजीआपांची बायको आपल्या एक महिन्याच्या नवजात मुलीला राधाबाईंच्या हाती सोपवून आपांबरोबर अग्नित सामावली. मातोश्रींचं दु:ख छातीत पुरेना इतकं दाटलं. एक राम लक्ष्मणाची जोडी या पुण्यभूमीतून काळाच्या पडद्याआड गेली. राऊंच्या मागून त्यांची सावली बनून राहिलेले आपाही निघून गेले. ५ वर्षांचा रघुनाथ, ५ वर्षांचा समशेर, १० वर्षांचा सदाशीव, आणि एक महिन्याची चिमाजीआपाची बयाबाई ही कन्या मांडीवर घेऊन मातोश्री राधाबाई परत कणखरपणे नानासाहेब पेशव्यांच्या मागे उभ्या राहिल्या. आपल्या २० वर्षांच्या कारकीर्दीत श्रीरंगपट्टण ते दिल्ली एवढ्या मुलखात राऊंनी १ लाख, ७५ हजार मैल प्रवास घोड्यावरुन केला असं इतिहासाचे अभ्यासक सांगतात. या मोहिमांमधे असतांनाच त्यांचं राज्यकारभाराकडेही लक्ष होतं. फौजेच्या आणि सरदारांच्या पोटापाण्याची व्यवस्था, मोहीमा आखणं, शत्रूवर नजर ठेवून धोरण आखणं, आपल्या आणि इतर दरबारांना सांगण्याची राजनीती, हेरांकडून आलेल्या बातम्यावरुन त्यावर विचार करुन पुढचं धोरण ठरवणे, ही राज्यकारभाराची कामं, आणि त्याचवेळी छत्रपतींच्या गरजांची, कुटुंबाची काळजी घेणं, वाडे, दुरुस्त्या, किल्ले बांधणं, दरबारातील रुसवे, भांडणं मिटवणं, जखमी सैनिकाची काळजी घेणं, मेलेल्या शिपायांच्या कुटुंबांची सोय लावणं, अशी सर्व कामं राऊ या प्रवासातच करत. त्यामुळे त्यांची पत्रंही, कधी पालखीतून जात असतांना, पायी फिरत असतांना, घोड्यावर असतांना, रात्री-दिवसा, अशावेळी लिहिलेली असत. राऊंबरोबर त्यांची कचेरीही फिरत असे. एवढा प्रचंड वकूब, त्यांच्यात होता. चिमाजी

आपांची सतत त्यांना साथ होती पण दम्यामुळे चिमाजी आपांना राऊंसारखं शारिरिक ताकदीचं वरदान नव्हतं. तरीही त्यांनी अनेक स्वाऱ्या, माळवा, वसई मोहीम यशस्वी केली. दोघे भाऊ सतत दोन दिशांना असत पण सावलीसारखे एकमेकांच्या संपर्कात असत.

Bravest of Brave, Fairest of Fair, BajIrav died like a most fascinating figure in a romance of love. भारतात हायकोर्ट जज्ज आणि इतिहासाचे अभ्यासक असलेल्या चार्ल्स, ऑगस्टस किंकेड यांनी केलेलं हे वर्णन आहे.

शिवरायांनी स्वराज्य नावाची सृष्टी उभारली, त्यांच्या शंभूराजे या छाव्याने पोर्तुगीज-इंग्रज-औरंगजेब या तीन लांडग्यांच्या हातून महा राष्ट्र केवळ पराक्रमावर वाचवला आणि चित्रदुर्ग ते दिल्ली एवढा भारत, केवळ लांब लांब मजलींनी घोड्यावर स्वार होऊन राऊंनी निजामाला चेपला. शिवाजी-संभाजी-बाजी ही या देशातील अथांग पराक्रमाची तीन शिल्पं अजूनही उर भरुन टाकतात..

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

## पानिपत.

## १४ जानेवारी १७६१.



१४ - १५ - १६जानेवारी, १७६१ या तीन दिवसांमधे भारतात प्रचंड राजकीय उलथापालथीची राजकीय त्सुनामी समरांगणांवर येऊन आदळली आणि सत्तापालटाचा रंगच बदलला. १४ जानेवारीच्या संक्रातीला मराठे – अहमदशहा अब्दालीमधला संग्राम, १५ जानेवारीला पटणापासून ५ मैलांवर इंग्रज आणि मुघल फौजांची टक्कर होऊन इंग्रजांचा विजय आणि दूर दक्षिणेत पाँडेचेरीला फ्रेंचांचा पराभव होऊन इंग्रजांचा त्यांच्यावर विजय, या निर्णायक युध्दांनी भारतीय राजकारणाची दिशा नक्की झाली. इंग्रज सर्वांना भारी झाले. पानिपतावरही समशेरीच्या तीन संगरांनी इतिहास निर्माण केला. इ. स. १५२६

मधे बाबर आणि इब्राहिमखान लोदी यांच्यामधे झालेल्या लढाईत बाबरचा विजय झाला तो केवळ त्याने भारतात येण्यापूर्वी तुर्कांकडून तोफा आणल्या होत्या त्यामुळेच. युध्दसाहित्यात तो लोदीपेक्षा कितीतरी श्रेष्ठ होता. दुसरी पानिपत झुंज गाजली ती सूरी राजवटीचा हेमू आणि बाबरचा नातू, सम्राट अकबर याच्यात.. त्यावेळी अकबरची सरशी झाली. आणि तिसरी लढाई झाली ती १७६१ मधे मराठे आणि अब्दालीमधे.

पंधराव्या शतकाच्या अखेरीला १४९८ सालच्या मे महिन्यात वास्को द गामा भारताच्या पश्चिम किनाऱ्याला लागला. १६०० मधे इंग्रजांनी सुरत, मद्रास, कलकत्ता ही सागर किनाऱ्यावरची गावं पकडली. समुद्रातून बोटीतून येणाऱ्या या युरोपियनांचा डच-वलंदाज-फ्रेंच-फरान्सिस, इंग्रज-टोपीकर, हळूहळू यांची भारतीय राजकारणाशी ओळख झाली आणि मसाल्यांचा व्यापार करता करता हा राजकीय मसाला त्यांच्या जास्त नफ्याचा ठरला. शस्त्रास्त्रांसाठी ही गिऱ्हाईके त्यांच्यासाठी फायद्याची ठरली. मग समुद्र किनाऱ्यावरील बंदरांवर त्यांची तोफा-बंदुकांनी भरलेली जहाजं नांगर टाकायला लागली. भारतात ही उलथापालथ होत असतांना दिल्ली हेच अजून मूख्य आकर्षणाचं केंद्र होतं. बाजीरावांमुळे मराठा फौजेत कमालीचं चैतन्य आलं. मराठ्यांच्या पराक्रमाचा, बहादूरीचा डंका देशभर गाजायला लागला. औरंगजेबानंतर अनाचार आणि दुरावस्थेत अडकल्यामुळे त्यांच्याशिवाय आपला तरणोपाय नाही ही कमकुवत बादशहाची भावना घट्ट झाली. त्यातून खूप काही घडलं पानिपतावर.

दरवर्षी संक्रांत येते आणि तीळगूळ घ्या गोड बोला म्हणतांनाच मनात कुठेतरी खोलवर दडलेली एक कळ उठते. .पानिपत....ज्या मराठ्यांच्या पराक्रमाचा साऱ्या भारतात एक धाक तयार झाला होता त्यांच्या शौर्याची आणि त्यांच्याच पराभवाची ही अनाकलनीय कहाणी..त्याची सुरुवात खरं तर संभाजी महाराजांच्या कैलासवासानंतर सुरु झाली. राज्यात राजा नसतांनाही मराठ्यांनी एक होऊन प्रचंड फौजेनिशी स्वराज्यात आलेल्या औरंगजेबाला स्वराज्य घेऊ दिलं नाही तेव्हा आपल्या पराक्रमाची शौर्याची आणि देशरक्षणासाठी प्राण देणाऱ्या रक्ताची ओळख झाली. औरंगजेब मेल्यावर हा पराक्रम पाहिलेल्या मुगलांना आपल्यावर संकट आलं की मराठ्यांना मदतीला बोलावण्याची आठवण कमजोर झालेल्या बादशाहीला वरचेवर येत राहिली. नादिरशहा असो की अहमदशहा अबदाली असो. आपले तारणहर मराठेच याबद्दल त्यांना काही संशय राहिला नाही. दिल्लीतही समर्थ बादशहा तख्तावर आला नाही.

इ. स. १७५० च्या मध्यावर यमुना आणि गंगा यांच्या दुआबात राहणाऱ्या रोहिला पठाणांच्यात आणि बादशहाचा वजीर सफदरजंग यांच्यात कुरबुरी सुरु झाल्या. त्यातही एक शिया आणि एक सुन्नी ही धार्मिक धार. अफगाणिस्तानात अहंमदशहा अब्दाली याने नादिरशहा या इराणी राजाच्या मृत्यूनंतर आपलं राज्य बनवलं होतं आणि रोहिला पठाणांना त्याला भारतात आणायचं होतं. या अब्दालीविरुध्द लढण्यासाठी बादशहाला आठवले ते मराठे.. म्हणून १७५२ मधे बादशहाने कनोज इथे शिंदे-होळकरांशी, मराठ्यांनी त्याचं संरक्षण करायचं हा तो करार होता. रजपूत वा पठाण हे भारतातले शत्रू आले तर ३० लाख रुपये आणि अब्दालीसारखे बाहेरचे आले तर ५० लाख

रुपये खर्च बादशहाने पेशव्याला द्यायचे असं ठरलं. त्यातही आग्रा आणि अजमेर या सुभ्यांचा सगळा महसूल आणि बंगालच्या चौथाईचे हक्कही मराठ्यांना मिळाले...हा महत्त्वाचा करार मराठ्यांना दिल्ली रक्षणासाठी आणायला कारण ठरला. सफदरजंग मरण पावला आणि गाजीउद्दीन नावाचा वजीर त्याजागी आला. अहमदशहा अब्दाली १७५६ मधे परत दिल्लीकडे यायला निघाला आणि डिसेंबरमधे दिल्लीत पोचला. त्यामागे नजीबखान रोहिलाचं मोठं कारस्थान होतं. वजीर गाजीउद्दीनला कंटाळलेल्या बादशहाच्या बेगमांना चिथावून त्याने त्यांच्याकडून अब्दालीला आमंत्रण पाठवलं. तोही लगेच निघाला. अब्दाली दिल्लीत आला आणि क्रौर्याचा कहर उडाला. मग त्याने मथुरा वृंदावनवर हल्ला करून मुंडक्यांच्या राशी पडल्या इतक्या की जिवंत लोकांना रस्त्याने चालता येईना. प्रचंड दौलत घेऊन अब्दाली निघून गेला, तेव्हा जातांना आपल्या मुलांना लाहोरवर ठेऊन गेला. नजीबखान कारभारावर आला.

अब्दालीच्या नरसंहाराची बातमी पुण्यात पोचल्याबरोबर नानासाहेब पेशव्याने राघोबा, साबाजी शिंदे, तुकोजी होळकर यांना दिल्ली रक्षणासाठी निघाले. मराठ्यांच्या फौजा दिल्लीत पोचल्या. तोपर्यंत नजीबखानापेक्षा गाजीउद्दीन बरा अशी अवस्था बादशहाची झाली होती. त्यामुळे परत गाजीउद्दीन वजीर बनला. नजीबखान आपल्या सुभ्याकडे परत गेला जातांना आणखी एक खिळा त्याने मराठ्यांच्यात मारून ठेवला. तो म्हणजे मल्हारराव होळकरांना पत्र लिहून स्वत:ला त्यांचा धर्मपुत्र करुन घेतलं. २२ ऑक्टोबर १७५७ च्या दसऱ्याला राघोबा आणि मराठे पंजाबकडे चालायला लागले.

पंजाबमधील शीखांची मदत त्यांना मिळाली. मानाजी पायगुडे आणि आदिनाबेग नावाचा सरदार लाहोरवर गेले. अब्दालीच्या मुलांना पराभूत केलं. ते पळून गेले. मानाजी पायगुडेने लाहोरच्या किल्ल्यात आपला पाय ठेवला.. सगळे परत अफगाण्यांच्या मागे लागले आणि चिनाब नदी पर्यंत पोचले. पण तिथे मात्र त्यांना नदीचं थंड आणि भरपूर पाणी यामुळे थांबावं लागलं. मराठे तिथून परत फिरले. आपलं सामान टाकून अफगाणी फौज काबूलला पळून गेली. अटकेपार झेंडे लावणारे स्वराज्यातले हे मराठे .. मराठी फौजांच्या साहसाला उपमा नव्हती. मराठ्यांचा हा पराक्रम बघून इराणच्या शहाने, तुम्ही आणि आम्ही मिळून **अब्दालीस** संपवू अशी पत्रं राघोबास लिहिली. केवढी कीर्ती मराठ्यांच्या सामर्थ्याची...आदिनाबेग या सरदाराच्या हाताखाली रायाजी सखदेव (मिरजेचे सखदेव?) वगैरे सरदार नेमून आणि २० हजार फौज ठेवून राघोबा दत्ताजींवर दिल्ली सोपवून पुण्याला परत गेले.

आपल्या मुलांना पळवून लावणाऱ्या मराठ्यांचा सूड घेण्यासाठी अब्दाली पुढच्या वर्षी परत भारतात आला. तेव्हा दत्ताजी शिंदे, त्याच्याशी लढण्यासाठी कुरुक्षेत्रावर पोचले. स्थानेश्वराजवळ दोन्ही फौजा एकमेकांना भिडल्या. अब्दालीचे ४०० लोक दत्ताजींनी मारले तेव्हा अब्दाली यमुनेच्या पलिकडे निघून गेला. दत्ताजी, साबाजी शिंदे बरारी घाटावर येऊन थांबले. इथे यमुनेच्या पात्रात एक बेट तयार होऊन त्यात झुडपं माजली होती. **१० जानेवारी १७६०.** सकाळी १० वाजता नजीबखान पायदळ घेऊन अचानक बरारी घाटावर आला. बेटावरच्या झुडपांच्या मागे लपून त्यांनी साबाजीच्या तुकडीवर बंदुकांच्या गोळयांचा मारा चढवला. मराठ्यांकडे बंदुका नव्हत्या. होत्या फक्त

तलवारी आणि भाले. दत्ताजीस ही बातमी मिळाल्याबरोबर दत्ताजी शिंदे साबाजीच्या मदतीला धावले. त्यांनी बेटावरची अफगाणी फौज हाकलून लावली. तेव्हाच नेमका जगदाळे नावाचा शिपाई गोळी लागून खाली पडला. दत्ताजी खाली वाकून त्याला झुडपातून बाहेर काढतांना दत्ताजींना बरगडीत गोळी लागली आणि ते घोड्यावरून कोसळले. लगेच नजीब आणि त्याचा कुतबशहा हा भाऊ धावत आले. त्यांनी दत्ताजींना ओळखलं. नजीबखानाचा भाऊ कुतुबशहाने विचारलं, क्यों पटेल ? और लडोगें क्या ? तर मरता मरता दत्ताजी शिंदे म्हणाले, बचेंगे तो औरभी लडेंगे.. त्यांचा प्राण गेल्यावर नजीबने दत्ताजींचं शीर कापून अब्दालीकडे पाठवलं. हे उद्गार बखरीत लिहिलेले आहेत पण उद्गार बिलकुल खोटे वाटत नाहीत.

दत्ताजी पडले ही पुण्यात पेशव्यांना बातमी कळल्याबरोबर सदाशीवभाऊंना दिल्लीत पाठवण्याचा निर्णय झाला तेव्हा भाऊंनी निजामावर उदगीरवर विजय मिळवला होता आणि ६० लाखांचा मुलूख निजामाने द्यायचा करार पार पडला होता. भाऊंसारखा तडफदार, शूर, उत्तम कारभारी, मजबूत बांध्याचा, आत्मविश्वासी आणि तरुण असाच सेनापती आता हवा होता. नागपूरकर भोसले आणि पटवर्धनांना आपल्या मदतीला ठेवून बाकी फौज पेशव्यांनी भाऊंना दिली. दोघे भाऊ जालन्याजवळ पटदूरवर भेटले. इब्राहिम गारदीचा तोफखाना, सरदार, हुजरात आणि गारदी अशी ५० हजार फौज घेऊन १४ मार्चला सदाशिवभाऊंनी उत्तरेकडे प्रयाण केलं. सिंदखेड, बऱ्हाणपूर-हंड्या ( हरदाजवळ ) सिहोर असा प्रवास करत भाऊच्या फौजा आग्र्याला पोचायच्या होत्या. पण आग्र्याजवळच्या गंभीर नदीवर तिला पूर आल्याने एक महिना

तिथेच थांबावं लागलं. २ ऑगस्टला मराठ्यांनी दिल्लीत प्रवेश केला तेव्हा बरोबरच्या बाजारबुणगे आणि कुटुंबाचं लेंढार यामुळे खर्च खूप वाढला. मराठ्यांच्या फौजा येत आहेत हे कळल्यावर अब्दालीही काबूलला न जाता परत फिरला आणि दुआबात पोचला.

अब्दालीमुळे बादशहा दिल्ली सोडून गेला होता. भाऊंनी दिल्ली ताब्यात घेतली. विश्वासरावांना सर्वांकडून नजरा करवल्या. सत्तेचं केंद्र अब्दाली झालं होतं ते भाऊंनी परत दिल्लीला आणलं त्यामुळे लोकांना विश्वास वाटला.२ महिने तिथे राहून ते कुंजपुऱ्याला निघाले. कारण तिथून अब्दालीला रसद पोचत होती. कुंजपुरा दिल्लीहून ७८ मैलांवर आहे. यमुनेला अजून पाणी खूप होतं. तिथे उतार मिळाला तर नदी ओलांडून पलिकडे असलेल्या अब्दालीवर जायचा बेत भाऊंचा होता. शिंदे-होळकर-विंचूरकर सरदारांनी कुंजपुरा १७ ऑक्टोबरला घेतलं. इब्राहिमखानाच्या तोफांनी कमाल केली होती. कुंजपुऱ्याला दत्ताजींना मारणारा कुतुबशहा सापडला. त्याला ठार करून त्याचं शीर भाऊंनी भाल्यावर लटकवून फौजेत फिरवलं. तिथे भरपूर रसदही मिळाली. तोफा, बंदुका, ३००० घोडे, २ लाख मण गहू, १० लाख रुपये रोख, आणि इतर सामान एवढं सामान मिळालं. पंजाब्यांची मदत मिळवण्यासाठी भाऊ फौज घेऊन कुरुक्षेत्राला गेले.

तिथे असतांना भाऊंना यमुनेच्या पलिकडे असलेला अब्दाली गौरीपुराजवळ यमुना पार करुन दिल्लीच्या बाजूला येऊन थांबला असल्याची बातमी आली. चिनाब, रावी, सतलजसारख्या नद्या ओलांडून येणाऱ्या अब्दालीने एक उतार शोधून काढलाच. तो मोठा फटका होता कारण त्यामुळे मराठी फौजेला दक्षिणेकडून येणारी रसद बंद पडणार होती. म्हणून भाऊ

कुरुक्षेत्रावरून निघाले आणि पानिपतावर पोचले. अफगाणी फौज **नुरपूर पसिनम** गावात तर भाऊंचा मुक्काम "**काळा आंबा**" इथे होता. इथे दोन्ही फौजांची गाठ पडली. भाऊंच्या संकटांना इथेच सुरुवात झाली. पैसा संपला, धान्य संपत आलं. दोन्ही फौजांच्या चकमकी सुरु झाल्या. त्यातच ७ डिसेंबरला अचानक बळवंतराव मेहेंदळे अफगाण्यांना मारत असतांना गोळी लागून ठार झाले. त्यांचं शीर कापण्यास गिलचे पुढे धावले तेव्हा खंडेराव निंबाळकर धाडसाने त्यांच्या शवावर पडला आणि मग तळावर घेऊन आला. त्यांची पत्नी सती गेली. बरोबर त्यांचा १३ वर्षांचा मुलगा कृष्णराव होता. तो पुढे सरदार अप्पा बळवंत या नावाने गाजला. (त्यांचं अप्पा बळवंत एवढं मोठं नाव आता इंग्रजीत सुटसुटीत झालंय. त्यांच्या नावाच्या चौकाला पुण्यात एबिसि चौक म्हणतात.) हा फार मोठा आघात होता. त्यातच भाऊंना पैसा पोचवण्यासाठी निघालेल्या गोविंदपंत बुंदेले यांचा गोळी लागून मृत्यू झाला. तळावरच्या लोकांना खायला अन्न नव्हतं. या सर्व संकटांवर उपाय म्हणून १३ जानेवारीला भाऊंनी इब्राहिमखाँ गारदी याच्या सल्लाने दुसरे दिवशी तळ सोडायचा निश्चय केला. अंधाराच्या खोल गुहेत शिरण्यासाठी तळावरचे सगळे त्या रात्री गाढ झोपी गेले…

पौष शु. ८, बुधवार …. १४ जानेवारी १७६१. संक्रांत १० तारखेला होऊन गेली होती. सकाळी सर्वांनी तयारी केली. सामान बांधलं. उपासमारीने घोडे मेल्याने तळावरचं बरंचसं घोडदळ पायदळ बनलं होतं. सर्व सरदारांचा आणि तोफखान्याचा गोल बनवून, मधे बाजारबुणगे ठेऊन आग्नेयाच्या दिशेने मराठ्यांनी उजाडता उजाडता तळ सोडला. फौज ५०,००० आणि बिनलढाऊ

भरणा २ लाख लोकांचा. यांना सांभाळून न्यायचं होतं. मराठे तळ सोडणार ही अब्दालीला जराही खबर नव्हती. सकाळी त्याच्याकडे बातमी आली. सकाळी ९ वाजता त्यांच्या फौजा मराठ्यांसमोर आल्या. १० वाजता युध्दाला सुरुवात झाली. मराठी फौजांनी जोदार हल्ला चढवला त्यात ३००० गिलचे कापले गेले. असा जोरदार हल्ला सुरुच राहिला. अब्दाली २ मैलांवरच्या आपल्या तंबूतून आपल्या दुर्बिणीतून लढाई पाहात होता. अब्दालीच्या वजीराचे सैनिक पळत सुटले. घोड्यावरून खाली उतरुन प्रेतांवर बसून तो वजीर जोरात ओरडून आपल्या सैनिकांना म्हणाला, अरे, धावता कुठे? काबूल काय जवळ आहे का? अब्दालीने हे पाहिलं आणि त्या पळणाऱ्या १३००० फौजेला परत लढायला पिटाळलं. ४/५ तास अफगाणी फौज अनेकवेळा पराभवाच्या छायेतून गेली. मराठ्यांचा जबरदस्त हल्ला सोसवत नव्हता त्यांना. आपल्या फौजेचा दुपारी २ वाजेपर्यंत जोर चालूच होता.

आणि अचानक...विश्वासराव आपल्या दिलपाक घोड्यावर असतांना त्यांना गोळी लागली. **अब्दालीचं ते सुदैव होतं.** विश्वासराव ठार झाले. भाऊंनी त्यांना हत्तीवर बसवलं. एकाने त्यांचं शव धरुन ठेवलं. पराक्रमाची शर्थ चालली होती पण लढाई मोडली. नंतरचे ३/४ तास बायका, पुरुष, नोकर चाकर सगळे पळू लागले. अब्दालीचे पठाण यांना कापायला लागले. निरपराधांच्या प्रेतांच्या राशी पडल्या. अशातच अब्दालीने आपली राखीव ताजी फौज रणांगणावर उतरवली. त्यांनी तर कहरच केला. अफगाण्यांनी दिसेल ते प्रेत आपल्या तळावर आणून रचलं. त्यातच लौकर दिवस मावळला. रात्री सगळं शांत झाल्यावर पहारे बसवून अफगाणी फौज आपापल्या राहुटीत गेली. सकाळी उजाडता उजाडता

काशीराज, अनूपगीर गोसावी रणांगणावर आले. २८००० मुडदे निघाले. शिवाय खंदकात मरुन पडलेले कितीतरी..काही जखमी नंतर मेले. एकूण ५५ ते ६० हजार मराठे जीव संपले होते एका दिवसात. २५ हजाराच्या जवळपास अफगाणी ठार झाले होते. ७५००० लोकांनी प्राण गमावला होता.

विश्वासराव म्हणजे केवळ मदनाचा पुतळा. त्याचं शव तळावर आलं तेव्हा अब्दाली त्याला पहायला गेला. मग ते मराठ्यांकडे सोपवलं. विश्वास आणि भाऊंच्या शवावर मंत्रोच्चाराने अग्नि देण्याचं काम शुजाउद्दौलाने केलं. जखमी इब्राहिम खान गार्दीला आणि जनकोजी शिंदेला बरखुर्दार पठाणांनी पकडून नेलं. त्यांच्याकडून दंड घेऊन त्यांना सोडून देण्याचा त्यांचा विचार होता. पण नजीबखानाने अब्दालीकडे चुगली केली. तेव्हा बरखुर्दाराने जनकोजीला ठार करुन पुरुन टाकलं. नेलं. इब्राहिमखानाला शहानेच ठार केलं. होळकर-दमाजी गायकवाड-गंगोबातात्या- विंचूरकर- असे काही सुखरुप परत आले. महादजी शिंदे जखमी अवस्थेत पडले होते.त्यांना भिस्ती राणाखानने उचलून आणलं. त्यांच्या पायावर इलाज केले. मग हेच राणाखान पुढच्या आयुष्यात महादजीबाबांचा उजवा हात बनले. नाना फडणीस शेतातून जीव वाचवत कसेबसे नानासाहेब पेशव्यांच्या तळावर पोचले. भाऊंची पत्नी पार्वतीबाई जानु भिंताड्याच्या मदतीने पेशव्यांकडे आल्या. खूप लोकांना सुरमल जाठाच्या राणीने किशोरीने जेवण, वस्त्रं घोंगड्या पुरवल्या. मस्तानीचा मुलगा समशेर बहाद्दरला गंभीर जखमी अवस्थेत सुरजमलकडे आणला पण भाऊ भाऊ म्हणत त्यानेही प्राण सोडला. दुसरे दिवशी भिस्तीला घेऊन शव ओळखणं सुरु झालं. चेहऱ्यावर पखालीतलं पाणी घालावं आणि ओळख पटवावी..एका प्रेताला शीर

नव्हतं पण किनखापाचे कपडे आणि देहाखाली ४ मोती पडले होते. ते शव सदाशिवभाऊंचं होतं. तळावर आणल्यावर त्यांच्या हुजऱ्यांनी ओळखलं. पण त्याला शीर नव्हतं. ते अब्दालीने शोधून पाठवून दिलं. तलाश ए लाश..या विजयानंतर अब्दालीने जरतारी पोशाख चढवून अलि कलंदर साधूच्या दर्ग्यात जाऊन दर्शन घेतलं आणि तो २९ जानेवारीला दिल्लीला आला.

भाऊंच्या मदतीला नानासाहेब पेशवे फौज घेऊन भेलशापर्यंत पोचलेही होते. तिथेच त्यांना सांकेतीक भाषेतला निरोप मिळाला. **“ दो मोती गलत, दसबीस अश्रफियाँ, रुपयोंकी गिनती नहीं.”** पळून आलेले लोक छावणीत गोळा होऊ लागले. पानिपतावरून आलेल्यांच्या दु:खी कहाण्या ऐकून नानासाहेब पेशव्यांच्या मनावर प्रचंड आघात झाला. भाऊशिवाय दौलत व्यर्थ आहे, भाऊशिवाय दुनिया नाही असा शोक करत राहिले. त्यातच भ्रम झाला. मानसिक अवस्था वाईट झाली. पेशव्यांचे तीन पुरुष, भाऊ-विश्वास-समशेर वीरगतीला मिळाले. पुण्यात मे महिन्यात पोचले प्रकृती बिघडत गेली. जूनच्या २० तारखेला पर्वतीवर जाऊन राहिले. २३ जूनला कैलासवास झाला. उजाड झालेली घरं, उध्वस्त राज्य रिकामा खजिना आणि राघोबादादा हा काका पदरात घेऊन १६ वर्षांचे माधवराव पेशवे झाले.

**पानिपताच्या समरांगणावरच्या आठवणींचं काशीराजाने पुस्तक लिहिलं “तलाश ए लाश..”**

बाजी चिमाजी ६ माहिन्यांच्या अंतराने गेले, विश्वास समशेर एकाच दिवशी गेले. सदाशीवभाऊ आणि नानासाहेब पेशवे ६ महिन्यांच्या अंतराने गेले. आणि शेवटची जोडी माधवराव आणि नारायणराव पेशवे ९ महिन्यांच्या

अंतराने गेले. पेशव्यांच्या घराण्यातील हा विलक्षण योगायोग. उप्परवाल्यासारखा ड्रामा रायटर कुणी नाही.. एवढ्या नरसंहारात २ जीव सुरक्षितपणे स्वराज्यात आणले. एक नाना फडणीस आणि दुसरे महादजी शिंदे..पाटीलबाबा..एक सरदार एक कारभारी.. पुढची ३० वर्षे त्यांनीच सांभाळला स्वराज्याचा रुबाब. स्वराज्याचा नक्ष.

का झाला आपला पराभव ...१. युध्दसाहित्यात अब्दाली फार पुढे होता. त्याच्यकडील बंदुका त्याच्याकडे उंटावर बसवलेल्या गोल फिरणाऱ्या swivel तोफा होत्या. त्यामुळे ते कुठेही फिरत. मराठ्यांच्या तोफा जलद हलणाऱ्या नव्हत्या. २, त्याच्या फौजेला चामडी कोट, लोखंडी चिलखतं , शिरस्त्राणं होती. मराठे साध्या सुती कपड्यात होते. ३. दक्षिणेकडील रसद मिळाली नाही. ४. ताज्या दमाची राखीव फौज मराठ्यांकडे नव्हती..पण अब्दाली मराठ्याचं तेज ओळखून होता. त्याने दिल्लीत भाऊंनी केलेली व्यवस्थाच कायम केली आणि पेशव्यांशी सलुखाची बोलणी सुरु केली. भाऊ? कर्णासारखे. पराक्रमी असूनही पराभूताचा शिक्का लागलेले. तेज असूनही दुय्यम स्थानावर राहिलेले.. तलाश ए लाश मात्र कुरुक्षेत्र आणि पानिपत दोन्हीकडे सारखाच होता.. विलाप कुंतीचा द्रौपदीचा आणि गोपिकाबाईंचा सारखाच होता.. दरवर्षी एकदा आठवतंच पानिपत..आणि जनकोजी शिंदे, समशेरसारखे वीर.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

# थोरले माधवराव पेशवे.

जन्म १५ फेब्रुवारी १७७२ – मृत्यू १८ नोव्हेंबर १७७२.



पानिपतामुळे स्वराज्याचा गाडा संपूर्णपणे रुतला. त्यावेळी प्रचंड आर्थिक नुकसान, मनुष्यहानी आणि पराभूत मानसिक धक्क्याला बाहेर काढू शकणाऱ्या समर्थ नायकाची गरज होती ती थोरले माधवराव पेशवे यांनी आपल्या स्वच्छ चारित्र्य, कडक धोरणं आणि सर्वांवर वचक या तीन गुणांनी वयाच्या अवघ्या १६ वर्षी पूर्ण केली. वयाच्या २८ व्या वर्षी त्यांचं देहावसान झालं. इंग्रजी आक्रमण संपवण्यासाठी त्यांनी फ्रेंचांच्या सहाय्याने शह द्यायचं ठरवलं होतं. पण त्या योजनेला यश आलं नाही. गुप्तहेरखातं हे त्यांच्या यशाचं मुख्य कारण होतं, त्यामुळे त्यांच्या कारकीर्दीत अनेक किस्से निर्माण झाले होते. त्यांच्या मृत्यूची ही कहाणी.

पानिपताच्या पराभवाच्या मानसिक धक्क्याने नानासाहेब पेशव्यांचा कैलासवास झाला. पेशव्यांच्या घरातील सदाशीवभाऊ, विश्वासराव, मस्तानीचा पुत्र समशेरबहाद्दर, वीरगतीला पोचले होते. आता पेशवेपदावर

कुणाला नेमायचं ते ठरवणं भाग होतं. ते पेशवेपद बाजीरावांचे दुसरे पुत्र राघोबादादा यांना हवं होतं, पण थोरल्या पातीकडेच पेशवेपद जावं ही दरबारी मुत्सद्द्यांची इच्छा होती. त्याप्रमाणे १६ वर्षांच्या माधवरावांना पेशवेपदाची वस्त्रे मिळाली. आणि तेव्हाच पुणे दरबारात चुलता पुतण्याच्या कलहाचं बीज रोवलं गेलं. याचा फटका साऱ्या पुण्याला, मुत्सद्द्यांना, सरदारांना, भावाभावांना, दौलतीला बसला. दुहीच्या मुळया या सर्वांच्या घराघरात पोचल्या. माधवराव पेशव्यांचा मुकुट कल्पनेबाहेर काटेरी निघाला. राघोबादादा हा चंचल, हलक्या कानांचा, शूर पण कमकुवत मनाचा निखारा माधवराव पेशव्यांना पदरी अति सावधतेने बाळगावा लागला. सीमेवरचं राजकारण तर होतंच जोडीला. दक्षिणेत हैदर, निजाम, उत्तरेत मुघल आणि खुद्द स्वराज्याचे महत्त्वाचे घटक असलेले नागपूरकर भोसले हे सर्वच पेशव्यांच्या कुवतीची परीक्षा घेणारे ठरले.

पानिपताच्या पराभवामुळे आणि मनुष्यहानीमुळे उध्वस्त झालेलं स्वराज्य, अत्यंत सावधपणे, मुत्सद्दीपणे, राजकीय चतुराईने, कणखरपणाची जोड देत माधवराव पेशव्यांनी कारभारावर आपला वचक बसवून सावरलं, राघोबादांचा पक्ष घेऊन पेशव्यांना त्रास देणाऱ्या, मुरलेल्या कारभारी सखारामबापूंना ठिकाणी बसवलं. इंग्रजांना पुण्यात आणण्याच्या, आपल्या काकासाहेबांच्या घातक मनसुब्यांना रोखून धरलं.त्यांच्या उचापतींना लगाम लावले ते त्यांना भडकवणाऱ्या विरोधकांवर चाल करुन. आळेगावावर हार झाली तेव्हा काळ सर्वसमयी सारखा नसतो असं गोपिकाबाईंना कळवलं आणि तात्पुरती माघार घेतली. त्या दरबारात राघोबादादांचे जोडे उचलून

राघोबादादांना विरघळवलं. राक्षसभुवनाच्या लढाईच्यावेळी निजामाचा धुव्वा उडवत आपली राजकारणातील कुवत सिध्द केली. त्यांच्या कारकीर्दीत त्यांचे जास्तीत जास्त संग्राम घडले ते मैसूरच्या हैदरशी. हैदरलासुध्दा माधवराव बच्चा वाटत होते, त्याला आपल्या ताकदीची ओळख करुन दिली.

दौलतीला अपाय करणाऱ्या कुणाचाही मुलाहिजा त्यांनी ठेवला नाही. अगदी आपल्या आईचा, गोपिकाबाईंचाही नाही. निजाम पुणं जाळत असतांना ज्यांनी निजामाला साथ दिली त्या सर्वांना जबर शिक्षा केल्या त्यात त्यांचे मामा रास्तेही होते. गोपिकाबाईंना, आपल्या लोकांना शिक्षा करणं आवडलं नाही तेव्हा त्यांनी शनिवारवाडा सोडायचं ठरवलं. माधवरावांनी आपल्या आईच्या या दडपणाला किंमत दिली नाही. त्या घर सोडून नाशिकला जाऊन राहिल्या तेव्हा त्यांची व्यवस्थित काळजी घेतली आणि त्यांच्याभोवती आणि राघोबादादांच्या भोवती आपली विश्वासातील माणसं ठेवली. राघोबादादांनाही कैदेत टाकण्यास मागे हटले नाहीत. होळकरांच्या घरात विघ्नं उत्पन्न करणाऱ्या गंगोबातात्या दिवाणांना भर दरबारात छड्या मारून इतर दरबाऱ्यांवर आपला वचक बसवला. जानोजी भोसले यांनाही दौलतीच्या कारभारात सामील करुन घेतलं. निजाम आणि हैदरशी सामना करण्यात त्यांना साथ मिळाली ती मिरजेच्या पटवर्धनांची. मिरजेच्या ७ बंधूंचे सर्व तरुण मुलगे पेशव्यांच्या फौजेत आपलं पथक घेऊन पराक्रम गाजवायला लागले. माधवराव पेशव्यांच्या मागे खंबीरपणे उभे राहिले ते रामशास्त्री प्रभुणे, महादेव बल्लाळ गुरुजी आणि समवयस्क असलेले नाना फडणीस. नाना फडणीस माधवराव पेशव्यांच्या तालमीत वाढले. स्वच्छ चारित्र्य ही आणखी एक माधवराव पेशव्यांची जमेची

बाजू. त्यांना फक्त एकच पत्नी होती ती म्हणजे रमाबाई. ना आणखी लग्नाच्या बायका होत्या, ना नाटकशाळा होत्या, ना कुणी रक्षा होती. तो सारा मक्ता राघोबादादांनी घेतला होता. त्यांच्या लग्नाच्या बायकांना आणि नाटकशाळांना तोटा नव्हता.

या परिस्थितीत, चहूबाजूंनी घोंघावणाऱ्या संकटांना जोड दिली ती माधवराव पेशव्यांच्या पोटातील दुखण्याने पोटामधे क्षयाने घर केलं. सततच्या स्वाऱ्या, मोहिमा आणि राज्यकारभाराचा आणि राघोबादादांचा मानसिक ताण सहन करत असतांना, पोटातील वेदनेनेही ते व्याकूळ होत होते. बघता बघता ९ वर्षे सरली. १७७० साल उजाडलं. पोटातील वेदना वाढायला लागली. वैद्यांचं, फिरंग्यांचं औषध चालू होतं पण गुण येईना. आता सारा भरोसा होता तो त्र्यंबकराव पेठे, पटवर्धन अशा सरदारांवर. तेच दक्षिणेतील मोहिमा सांभाळत होते. दुखणं असह्य झालं तेव्हा हवापालट करायला पेशवे बाहेर पडले. तिथेही चैन पडेना. पण वेदनेने कळस गाठला. पोटातून असह्य कळा यायला लागल्या. मग गोदावरीच्या काठी टोके गावाजवळ कटोरे गाव आहे तिथे जाऊन राहिले. तिथेच सुवर्णतुला केली. पण १७७२ पासून तब्येत परत बिघडायला लागली. अंगाची आगआग व्हायला लागली तेव्हा केळीच्या पानांच्या सुरळया करुन त्यावर निजायला लागले. मग थेऊरास जाऊन राहायचं ठरवलं. तिथूनच दरबारचं काम सुरु झालं. आपल्यानंतरची दौलतीची ९ कलमी व्यवस्थाही तिथेच ठरवली. स्वत:ला कर्जमुक्त केलं.

अश्विन महिना म्हणजे ऑक्टोबर १७७२ चा महिना असह्य कळा सोसण्यात गेला. पुण्याचे सर्व मुत्सद्दी दरबारी थेऊरास येऊन राहिले. जीव घाबरा

होऊ लागला. थेऊरला वाड्यात राहात होते ते गणपतीच्या आवारात येऊन राहिले. पोटात खुपसायला खंजीर द्या म्हणायला लागले. वरचेवर भ्रम होऊ लागला. पण अविचाराचं बोलणं त्यात नव्हतं. मग दानधर्म सुरु केला. कार्तिक शु. ११ ला फारच गडबडले. जमिनीवरच झोपायला लागले. हातपाय हलवणं कठीण व्हायाला लागलं. रमाबाईंनी जेवण सोडलं. फक्त दुधावर राहिल्या. रमाबाई आधी पुण्यास होत्या त्या थेऊराला आल्या. त्यांनी सती जातेवेळची वस्त्रं पुण्यातून मागवली. ही बातमी गावात वाऱ्यासारखी पसरली. आधी गडबड झाली मग खरी बातमी कळली. हळूहळू प्रकृती ढासळत चालली. वैद्यांना विनंती केली की मरणसमयी कफ होऊ न द्यावा. नाहीतर गजाननाचं स्मरण करता येणार येणार नाही.

दोन घटकांनी तासाभरात प्राण जाणार याचा अंदाज आल्यावर मोठमोठ्या वैदिक ब्राह्मणांना बोलावून वंदन केलं. शांत चेहऱ्याने, आम्ही महायात्रेस जातो, स्वारीची तयारी करा असं सांगितलं. प्राण जायला लागला तेव्हा दूध घाला, अन्न घालू नका म्हणाले आणि मग गजानन गजानन म्हणत, डोळयांच्या वाटेने प्राण गेला. सारं राज्य दु:खात बुडालं. पाठोपाठ रमाबाईही सती जायला तयार झाल्या. धर्मवेदीवर उभं राहून, दादासाहेबांना बोलावून नारायणाचा हात त्यांच्या हाती दिला. आपल्या जवळ मोहरांची थैली ठेवली. नमस्काराला आलेल्या प्रत्येकाला आपल्या हाताने एक एक मोहोर दिली. २८ वर्षांचे माधवराव पेशवे आणि २५ वर्षांच्या जवळपासच्या वयाच्या रमाबाई अनंतात विलीन झाली. त्यांनाही मूल झालंच नाही.

१८ नोव्हेंबर १७७२ हा दिवस होता तो. असं घडलं होतं तेव्हा.

माधवरावांचा स्वर्गवास हे स्वराज्याच्या दृष्टीने स्वराज्य घसरणीला वेग आल्याचं लक्षण होतं. त्यांच्यानंतर समर्थ पेशव्यांची परंपरा संपली. भोसले घराणंही निर्माल्यवत झालेलंच होतं. बाळाजी विश्वनाथांपासून, शाहू महाराजांना तख्तावर बसवण्यापासून राज्याच्या सीमा यमुनेपर्यंत नेणारे आणि राज्याचा कारभार सांभळणारे पेशव्यांच्या घराण्यातील पुरुष ४० वर्षांपर्यंतच जगले. त्यात माधवराव, नारायणराव आणि सवाई माधवराव अल्पायुषी ठरले. ज्या राघोबादादांनी कारभारात सर्वांचं रक्त आटवलं तेही मरणसमयी ५० वर्षांचेच होते. शाहूमहाराजांनी रत्नपारखी जवाहिऱ्याच्या नजरेने या घराण्यावर विश्वास ठेवून त्यांच्याकडून काम करुन घेतलं. तो त्यांचा मोठा गुण. शाहूमहाराज निपुत्रिक गेले. कोल्हापूरचे संभाजीमहाराजही निपुत्रिक गेले. शिवरायांच्या औरस घराण्याचाही शेवट झाला. दत्तक परंपरा चालू झाली. इ. स. १७१३ सालापासून शंभर वर्षे पेशवाईचा काळ गाजला. १६४५ सालापासून १७४९ पर्यंतचा शिवरायांचा वंश चालला. शिंदे-होळकर-पवार-गायकवाड-दाभाडे, या सर्व ऐतिहासिक घराण्यांमधेही मलूल कळा आली. पण १७७१ सालामधे तरुण महादजी शिंद्यांनी दिल्लीचा बादशहा शहाआलम द्वितीय याला तख्तावर बसवून मराठ्यांचा दरारा वाढवल्याचं पाहाण्याचं भाग्य पेशवे माधवरांना मिळालं.


माधवराव पेशव्यांचा मृत्यू हा, खंगत चाललेल्या, अंथरुणाला खिळललेल्या रोग्यासारखी, स्वराज्याची अवस्था करुन गेला. इंग्रजांची स्वराज्य मिळवण्याची तडफड चालूच होती पण अशा अवस्थेतही शिवरायांच्या तालमीत तयार झालेल्या मराठ्यांच्या तलवारीची धार अजून बोथट झालेली

नाही हे नाना फडणीस आणि महादजी शिंदे यांनी पुढच्या ३० वर्षांमधे सिध्द केलं. महाराष्ट्राची घरंगळणारी गाडी रोखली ती नाना फडणीस आणि महादजी शिंदे यांनी. कशीबशी ३० वर्षे गेली. या दोघांचाही अंत झाला तेव्हा स्वराज्य संपलं.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

## मोती तलावाची लढाई.

## ६ मार्च १७७१.



पेशवे माधवरावांच्या हयातीत हैदरचा पराभव करणं, त्याला स्वराज्यात येऊ न देणं हेच त्यांचं लक्ष्य होतं. अनेकदा हैदरअलीने चोपही खाल्ला होता. पेशव्यांच्या घरातलेच राघोबादादाच हैदरला सामील झाले होते आणि माधवरावांची शक्ती कमी करत होते. माधवराव पेशव्यांना साथ होती ती मिरजेच्या पटवर्धनांची. जसे उत्तरेत बाजीरावांनी शिंदे होळकर या दोन मोठ्या शक्तींना राज्याच्या सीमा वाढवण्यासाठी आणि बादशहाशी झुंजायला ठेवलं

होतं, तसंच माधवराव पेशव्यांनी पेशवेपद मिळाल्याबरोबर लगेच इ. स. १७६१ मधे गोविंदराव पटवर्धनांना मिरजेची सनद देऊन दक्षिण सीमा सांभाळायला ठेवलं होतं. कोकणातील कोतवड्याच्या हरभट पटवर्धनांचे ७ पुत्र बाजीराव-चिमाजीआपांच्या नेतृत्त्वाखाली लष्करी शिक्षणात तयार झाले होते. गोविंदपंतांचे पराक्रमी पुत्र गोपाळराव, कुरुंदवाडच्या त्र्यंबकपंतांचे पुत्र नीलकंठ आणि रामभाऊ पटवर्धनांचे पुत्र परशुरामभाऊ, या मिरज-कुरुंदवाड-तासगाव या तीन शाखांच्या पटवर्धन पुत्रांनी मराठी साम्राज्यात फक्त पराक्रमच केले. माधवराव पेशव्यांना त्यांचा तन-मन-धनाने पूर्ण पाठिंबा होता. पण जानेवारी १७७१ मधे गोपाळराव पटवर्धनांचा जलोदराच्या दुखण्यात अंत झाला तेव्हा हैदरशी लढायला त्र्यंबकराव पेठे सेनापती होते. त्र्यंबकमामा पेठे यांच्या सेनापतीपदाखाली ६ मार्च १७७१ या दिवशी हैदरचा जो मोठा पराभव झाला त्याची ही कहाणी. या लढाईला मोती तलावाची लढाई असं नाव आहे. पेशव्यांच्या अखेरीच्या दिवसांमधे त्यांना हे यश पाहायला मिळालं.

१७६१ हे साल दक्षिण भारताच्या राजकारणात वेगळा खेळ खेळून गेलं. या बुध्दिबळ पटावर मैसूरला, ३० वर्षांचा हैदरअली सत्तेत आला आणि त्याच वर्षी स्वराज्यात १६ वर्षांचे माधवराव पेशवे झाले. दोघांची एकमेकांशी झुंज, power game मोठा इतिहास घडवून गेला. मैसूरचा राजा वोडियार हा कमकुवत असल्यामुळे वोडियारचेच सेनापती म्हणजे दलवाई देवराजैया आणि सर्वाधिकारी पंतप्रधान करचुरी नंजराजैयाच्या हातून हैदरअलीने राजकीय चातुर्याने सत्ता उपटली होती. हैदरअली मुळात एक साधा नाईक या हुद्द्यावर

लागलेला शिपाई होता. पण त्याने राजकारण खेळत १७६१ मधे कारभार आपल्या हाती घेतला होता. हैदरला स्वराज्यापर्यंत मैसूर वाढवायचं होतं, आणि माधवरावांना हैदरला संपवायचं होतं. माधवरावांच्या हाती कारभार आला तेव्हा त्यांच्या पदरात होतं, प्रचंड कर्ज, तरुण फौजेचा नाश, पदरात कमकुवत मनाचा काका राघोबादादा नावाचा निखारा.

घोडदळ आणि गनिमीकावा ही माराठ्यांची बलस्थानं आहेत हे ओळखून, हैदरने आपल्या पदरी गनिमीकावा शिकण्यासाठी माणसं ठेवली. आपल्या १० वर्षांच्या काळात माधवरावांनी सतत कर्नाटकावर स्वाऱ्या केल्या. दरवेळी मराठ्यांनी हैदरला झोडपलं. त्यांना साथ मिळाली ती मिरजेच्या पटवर्धन सरदार घराण्याची. उत्तरेला शिंदे होळकर होते पण दक्षिण भारतात हैदर आणि इंग्रज यांच्यापासून सीमेचं रक्षण करायला पटवर्धनांसारख्या शूर घराण्याची माधवरावांनी मिरजेला स्थापना केली. सबंध पटवर्धन घराण्यातील १५/१६ तरुण लढाईत सामील असत. गोपाळराव पटवर्धन हा गोविंदपंत पटवर्धनांचा पराक्रमी पुत्र. त्यावेळी दरबारात “ राव ” हा सन्मान फक्त तिघांना होता. एक भवानराव प्रतिनिधी, दुसरे मुरारराव घोरपडे आणि तिसरे गोपाळराव पटवर्धन. बाकी कुणीही राव शब्द आपल्या नावाला जोडायचा नाही असा दंडक होता. ११ जानेवारी १७७१ मधे गोपाळरावांचं जलोदराने निधन झालं. पेशव्यांनी चार दिवस दरबार आणि चौघडा दुखवटा म्हणून बंद ठेवला. आणि परत हैदरविरुध्दची लढाई सुरु झाली.

सेनापती त्र्यंबकमामा पेठ्यांच्या हाताखाली मराठी फौजा हैदरवर निघाल्या. पण माधवरावांचा आजार वाढायला लागला. पुण्यातून त्यांनी या

मोहिमेवर लक्ष ठेवलं. पुण्याहून अप्पा बळवंत मेहेंदळे सरदार आपली फौज घेऊन पेठ्यांना सामील व्हायला निघाले. या दोघांची भेट होऊ नये म्हणून हैदरने प्रयत्न केले पण यश आलं नाही. पेठेमामांनी हैदरचा प्रेमाचा प्रांत बिदनूरवरच हल्ला चढवायचं ठरवलं. मराठ्यांचा हा बेत हाणून पाडायला हैदरने नवीन चाल केली. दोघांचा एकमेकांना झुलवण्याचा डाव सुरु झाला. शेवटी हैदर श्रीरंगपट्टणहून १५ मैलांवर असलेल्या मेलुकोट्याच्या डोंगरात जाऊन बसला. २५००० हजार फौज आणि ८००० घोडदळ घेऊन घनदाट जंगल, डोंगर यात हैदरची फौज दबा धरुन बसली. हैदरने मेलुकोट्यावर येण्याचे मराठ्यांचे सर्व रस्ते अडवून धरले. श्रीरंगपट्टणहून मेलुकोट्यावर जायला एकच मार्ग होता..एक अरुंद खिंड..डोंगरांच्या अनेक रागांमुळे पूर्वेकडचा रस्ता अत्यंत कठीण होता. म्हणून हैदर तिकडून मराठे येणार नाहीत याची खात्री बाळगून होता. आणि तीच त्याची मोठी चूक झाली. धाडसी, कणखर, पराक्रमी सेनापती म्हणून पेठेमामांनी तोच अवघड रस्ता पार केला आणि मराठ्यांच्या फौजाही मेलुकोट्याच्या डोंगरावर आल्या. ते हैदरपेक्षा वरच्या डोंगरावर गेले आणि तिथून तोफा चलवायला लागले. हैदरअली आता मराठ्यांच्या कब्जात पूर्ण अडकला. डोंगरांवर वरच्या बाजूला त्याच्या तोफाही चालेनात.. नेम कुठे धरायचा त्यांनी..? पेठेमामांनी श्रीरंगपट्टणच्या रस्त्यावर पटवर्धन, नरसिंगराव धायगुडे आणि सुपेकरांना गस्तीसाठी ठेवलं. ८ दिवस थोड्या चकमकी झाल्या शेवटी हैदरने गुपचुप तळ हलवायचं ठरवलं. मराठ्यांच्या तावडीतून त्याने स्वत:ची सुटका करून घ्यायचं ठरवलं.

त्यासाठी निवडली ६ मार्च १७७१. अमावास्येची रात्र. घनदाट जंगलात पूर्ण अंधार. हैदरच्या फौजा आवाज न करता छावणीतून बाहेर पडल्या.

गाईबकऱ्यांपासून तोफांपर्यंत सर्व पसारा बाहेर काढायचा होता. हैदरअली रात्र होईपर्यंत थांबला. मध्यरात्र झाली आणि एकेक फौजी बाहेर पडायला लागला. मराठी सैनिकही डोंगरांमधे बंदूका तलवारी जवळ ठेवून सावध झोपले होते. डोळ्यातसुध्दा बोट घालता येणार नाही इतका दाट अंधार होता. इतक्यात कुणाला तरी काहीतरी हालचाल चालली आहे असा अंधुक भास झाला. तो सावध झाला. सगळा तळ आवाज न करता जागा झाला. आणि डोळे फाडून पाहायला लागला. हैदरने डोंगर सोडला हे त्यांच्या लक्षात आलं. ताबडतोब पेठेमामांना वर्दी देण्यात आली. हैदर कुठल्या बाजूला गेला हे कळायला मार्ग नव्हता. श्रीरंगपट्ट्णाच्या वाटेवर गस्त घालणाऱ्या माणकोजी राऊतालाही हैदरची फौज अंधारात दिसायला लागली. मराठ्यांच्या राहुट्यांमधे गडबड उडाली. नगारे वाजायला लागले. क्षणात घोड्यांवर जीन चढवलं गेलं आणि चुणचुणीत सर्व मराठी फौज घोड्यावर बसली सुध्दा. आता हैदरचा पाठलाग करायचा होता..मामांचा हुकूम सुटला. काही फौज बिदनूरकडे, काही पट्टणकडे निघाली. इतक्यात दोन घोडेस्वार आले आणि हैदर पट्टणकडे निघाल्याची बातमी देऊन बक्षिस घेऊन निघून गेले. आता मराठी फौजा डोंगरावरुन पट्टणकडे जायला निघाल्या.

भर मध्यरात्री लढाईला सुरुवात झाली. हैदर तोफा, बारगीर, यांच्या गोल रक्षणातून चालला होता. दोन्ही फौजांची झटापट सुरु झाली. डोंगरावरुन तोफा खाली उतरवायला वेळ लागला तोपर्यंत गायकवाड, हिंदूराव, सखाराम हरि,

रास्ते, पटवर्धन, आनंदराव सुपेकर, विठ्ठल शिवदेव विंचूरकर, यांची मराठी फौज हैदरच्या फौजेला चावत सुटली..श्रीरंगपट्टणपासून ३ कोसांवर मोती नावाचं तळं होतं. लढत लढत तिथपर्यंत हैदर पोचला. पुढे ३ कोसांवर त्याला पट्टणात जाऊ न देण्याचं काम मराठ्यांना करायचं होतं. मराठी फौजेने हैदरला घेरुन टाकलं तेवढ्यात मराठ्यांच्या तोफाही पोचल्या. आपली फौज मागच्या बाजूने मराठे कापताहेत हे हैदरला कळलं. तो लगेच एका डोंगरावर चढला. त्याच्याबरोबर ५/६ हजार सैनिक होते. २००० मराठी फौजही त्याच्यामागे गेली. हैदरला काय करावं कळेना. तो घोड्यावरुन खाली उतरला. इतक्यात त्याच्या गाजीखान बिड नावाच्या खिजमतगाराने त्याला डोंगराच्या शिखरावर नेलं, हंसराज नावाच्या तगड्या घोड्यावर बसवलं. तिथे वेषांतर करुन हैदर पळाला आणि कादिरवलीच्या दर्ग्यात जाऊन टिपू सुलतानाच्या प्राणाचं रक्षण करण्यासाठी अल्लाची मनधरणी करत बसला. टिपू सुलतानाला सय्यद महंमदने भिकाऱ्याचा वेष देऊन वाचवलं आणि कादिरवलीच्या दर्ग्यात हैदरला भेटवलं. मराठ्यांनी हैदरचं सर्व खजिना, जवाहीर, ४०/५० तोफा, ३० हत्ती, ७/८ हजार घोडे, नौबत, निशाण, बंदूका, सर्व सर्व काही लुटलं. हैदरचे सरदार पकडले. पेठेमामांच्या कानाला बंदूकीची गोळी चाटून गेली, पण मोठी हानी झाली ती कुरुंदवाडच्या पटवर्धनांची. नीलकंठ त्रिंबक पटवर्धन तोफेचा गोळा लागून ठार झाले. दोनच महिन्यांपूर्वी त्यांच्या चुलतभावाचा - गोपाळरावांचा मृत्यू झाला होता.. टिपूला जीवदान देऊन नीलकंठाचा नियतीने प्राण घेतला.

मध्यरात्रीच्या या हैदरच्या चालीच्या वेळी हैदरच्या शामियानात आणखी एक नाट्य घडलं होतं. मध्यरात्री फौजेने तळ सोडायचा हा निरोप हैदरने

सर्वांना पोचवला आणि टिपूने फौजेच्या पिछाडीला रक्षणासाठी राहायचं हेही हैदरअलीनेच ठरवलं होतं. फौज निघाली तेव्हा हैदरने टिपूला बोलावणं पाठवलं पण टिपू सापडत नाही असा निरोप शिपायांनी आणला तेव्हा हैदर संतापाने बेभान झाला आणि त्याला शोधून आणायला त्याने सर्वांना पिटाळलं. लगेच टिपू बापासमोर हजर झाला तेव्हा हैदरने त्याला संतापाने आपल्या अंगरक्षकाच्या वेताच्या छडीने तडाखे द्यायला सुरवात केली. आता टिपूही सर्वांसमोर झालेल्या या अपमानाने आणखीनच संतापला. आपला फेटा जमिनीवर आपटत म्हणाला, आज तुमची लढाई तुम्हीच लढा. मी हातात बंदूकही धरणार नाही.. मग शामियानातील इतर सरदारांनी दोघांना शांत केलं. या सबंध झुंजीमधे टिपूने खरंच एकदही बंदूक चालवली नाही.. हैदर लढाईनंतर दमल्यावर रात्री रोज थोडं मद्य घेत असे पण त्याच्या त्या संतापण्यावर, त्यादिवशी जरा जास्त घेतलं असं सर्व सरदारांचं मत झालं..सगळा मानसिक ताण..

मोती तलावाचं यश म्हणजे पेठेमामांच्या शौर्याची, कष्टाची आणि चिवटपणाची ती कमाल होती. पेठे मामांनी पेशव्यांना सारी हकीकत कळवली. पेशवे खूष झाले. पण आनंद उपभोगायच्या पलिकडे गेले होते. त्यांची तब्येत आणखी ढासळली होती. हैदरही या पराभवाने तह करण्याच्या निर्णयाला आला होता. पेशव्यांनीही तसाच निरोप पाठवला होता. हैदरशी तह करुन मराठी फौजा पुण्यात परतल्या. आता थोडं त्र्यंबकमामा पेठे यांच्याबद्दल ..चिमाजीआपांची बायको रखमाबाई ही या विसाजी कृष्ण पेठे यांची कन्या. त्र्यंबकराव हा तिचा भाऊ. चिमाजीआपांचा मुलगा सदाशीव हा त्र्यंबकरावांना मामा म्हणायचा

म्हणून साऱ्या दरबारचे ते मामा झाले, पेठे मामा. त्र्यंबकराव पेठ्यांची बायको वेणू, ही बाजीरावाची धाकटी बहीण, इचलकरंजीच्या घोरपडे सरदारांची पत्नी अनुबाई, हिची मुलगी..असं ते पेठे घराणं. पेठे मामांनी अनेक लढाया गाजवल्या. नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर पेशवेपद घेऊन राघोबादादा कर्नाटकात गेले आणि तिथे असतांना त्यांची आणि पेठेमामांची लढाई झाली. शेवटी राघोबादादांचा पाठलाग करत असतांना दोघांच्यात कासेगावला लढाई झाली, त्यात पेठेमामांना जखमा झाल्या, ते राघोबादादांच्याकडून पकडले गेले आणि त्यातच त्यांना मरण आलं. त्यांचा मराठ्यांच्या लढाईतील महत्त्वाचा सहभाग होता...पेशव्यांच्या वतीने त्यांनी अनेक जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या होत्या. पेशवे माधवरावांच्यानंतर त्यांचं जाणं हे स्वराज्यासाठी आणखीन एक मोठं नुकसान होतं.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

**स्थळ शनिवारवाडा.**

**३० ऑगस्ट १७७३.**



माधवराव पेशव्यांच्या खंबीर कारभारानंतर, त्यांच्या जाण्याने स्वराज्यात अस्थिरता आली. कमकुवत नारायणराव हे माधवरावांचे धाकटे बंधू पेशवे बनले. माधवराव पेशव्यांचा वचक असलेले राघोबादादा आता पेशवपद मिळवण्याच्या प्रयत्नांना लागले. पण दोघेही चंचल, कमकुवत आणि अस्थिर बुध्दीचे. राघोबांनी निजाम आणि हैदर या दोघांना आपल्या बाजूला वळवून घेतलंच होतं. इंग्रज हे पिकलेलं फळ आपल्या झोळीत पडावं म्हणून जाळं लावून बसलेच होते. दादांना आणि त्यांच्या साथीदारांना सत्ता मिळवायची आस लागलेलीच होती. त्यावर, नारायणरावांना अटकेत ठेवून कारभार हाती घेण्याची कल्पना सखारामबापू आणि दादांना सुचली. त्यातून घडला तो

शनिवारवाड्यातील प्रलय, जो आजवर मराठयांच्या इतिहासात कधीच घडला नव्हता. दिल्ली सल्तनतीला ते नेहमीचंच होतं, पण स्वराज्याने कधीही पाहिलं नव्हतं.

या घटनेने राजकीय सत्तापालटाच्या खेळाला वेगळं वळण लागलं म्हणून ही घटना महत्त्वाची ठरली. राजघराण्यातील वंशजांनी कारभार करण्याची प्रथा मोडीत निघून कारभारी हे सूत्रचालक ठरले. पेशवेपदावर ४० दिवसांच्या सवाई माधवरावांची स्थापना झाली. पण कारभार नाना फडणीस, आणि सखारामबापू बोकिलांच्या हाती आला. त्यातही सखारामबापू मागे पडले. राघोबादांचे इंग्रजांच्या सहाय्याने पेशवेपद मिळवण्याचे प्रयत्न अयशस्वी झाले. नाना फडणीस आणि महादजी शिंदे यांचा प्रभाव साऱ्या भारतावर राहिला. नारायणराव पेशवे या सत्तेच्या स्थित्यंतराचा एक मोहरा ठरले. त्यादिवशी नेमकं काय घडलं त्याची ही कथा.

अचानक तोफगोळयाचा प्रचंड धमाका व्हावा तसं सगळं पुणं अचानक हादरलं. प्रत्येकजण शनिवारवाड्याकडे धावायला लागला. त्यात कारभारी होते, मुत्सद्दी होते, इतर राज्यप्रमुखांचे वकील होते. घडलंच होतं तसं. उद्या मंगळवार, अनंतचतुर्दशी. भाद्रपदातला हा गणेशउत्सव उद्या संपन्न व्हायचा होता. घराघरातील मंडळी, कीर्तनकार, हरदासबुवा कथेकरीबुवा, भजनी मंडळं, नर्तक-गायक-शाहीर, १० दिवसांच्या धामधुमीमुळे सुखावली होती. आणि अचानक मति गुंग करणारी बातमी वणव्यासारखी घराघरात पसरली. त्या भाद्रपदातील सोमवारी दुपारी मातब्बर मुत्सद्दी, सखारामबापू बोकील, मालोजी

घोरपडे, बजाबा पुरंदरे, भवानराव प्रतिनिधी, हरीपंत फडके, सारेजण शनिवारवाड्याच्या बंद भक्कम दारासमोर हतबल होऊन बधिर मनाने उभे होते. त्यांचे शत्रूशी लढणारे हात आज लकवा भरल्यासारखे थिजले होते. तोफगोळे मातीच्या ढेकळासारखे भुसभुशीत झाले होते. तोफा चालवणं अशक्य होतं कारण आत पेशव्यांच्या घरातली खासे राघोबादादा, नारायणराव, राघोबांचे दत्तक पुत्र अमृतराव, पार्वतीबाई, आनंदीबाई, पेशव्यांची पत्नी गंगाबाई, सगुणाबाई या बायका, मुलं, दास. दासी नोकर चाकर होते. त्यांच्यावर गोळे टाकणं अशक्यच होतं. शनिवारवाड्याचे सारे दरवाजे बंद होते. आत काय झालंय ते कळायला मार्गच नव्हता. फक्त रडारड ऐकू येत होती. दारावरचे पहारेकरीही भेदरलेले होते. वाड्यात काही वेळापूर्वी ७/८ शे गारदी झुंडीने आत शिरले होते आणि त्यांनीच दरवाजे आतून लावून घेतले असल्याचं ते सांगत होते. हरिपंत फडक्यांनी फौज आणली पण आतून त्यांच्यावरच बंदूकीच्या गोळया गारदी चालवत आहेत एवढंच लक्षात आलं होतं. बाहेर गर्दी असूनही भयाण शांतता पसरली होती. प्रत्येकजण सुन्न झाला होता. आत काय चाललंय त्याचा ठाव लागत नव्हता.

बराच वेळ गेला. एवढ्यात वाड्याचा दरवाजा उघडला. राघोबादादांचा जासूद चिठ्ठी घेऊन बाहेर आला. त्यात लिहिलं होतं, “गुंता उरकला. आत यावं.” तेव्हा बाहेर उभे असलेले सर्व मुत्सद्दी आत गेले. तिथे जे पाहिलं त्यावर कुणाचा विश्वासच बसेना. सगळा वाडा अस्ताव्यस्त झालेला होता. पार्वतीबाई, गंगाबाई, विश्वासरावांची विधवा सगुणाबाईंचे डोळे पाझरत होते. दरवाज्यापासून तुळशी वृंदावनापर्यंत देह पडले होते. एक गायही त्यात होती.

सगळं भयाण काही तरी घडलं होतं. सर्वांनी आपापल्या परीने दादांचा निषेध केला. सखारामबापू म्हणाले, गोष्ट फार वाईट घडली आहे. आम्हाला समाधान नाही. लेखणीचे धनी नाना फडणीस आहेत त्यांना बोलवावे." एवढं बोलून बापू घरी निघून गेले. त्यांनी जे पाहिलं, जे ऐकलं त्यावर त्यांचाच विश्वास बसत नव्हता. दुसरे दिवशी भ्रमिष्ट मनाने एकटेच घराबाहेर पडले, चार कोस दूर गेले आणि काही विचार करुन परतले. माधवराव श्रीमंतांनी नारायणाचा हात आपल्या हाती देऊन रक्षण करण्यास सांगितलं होतं पण ते घडलं नाही याची बोच त्यांच्या मनाला लागली. नाना फडणीसांच्या मर्जीतला म्हणून हरिपंत फडक्यांवर दादांचा कमालीचा राग होता, त्यामुळे तेही बारामतीला बाबूजी नाइकांकडे निघून गेले. नाना फडणीस त्या दिवशी पुण्यात नव्हते. त्यांना बोलावून आणलं. आणि मग काय काय झालं त्याची हकिकत सगळ्यांना कळायला लागली.

सोमवारी सकाळी रघुजी आंग्रे पर्वतीच्या बाजूला उतरले होते, त्यांना भेटायला नारायणराव पेशवे गेले असतांना, तुमच्याविरुध्द कारस्थान रचलं जातंय, कटाची कुणकुण लागली आहे, सावध असावे असा सल्ला त्यांनी पेशव्यांना दिला. अशी कारस्थानं नवीन नाहीत असं म्हणून तिथून नारायणराव पर्वतीवर चिंचवडच्या देवांबरोबर जेवायला गेले आणि दुपारी केशरभाताचं प्रसादाचं जेवण करुन शनिवार वाड्यावर परतले. हरिपंत फडके त्यांच्याबरोबरच होते. वाड्यावर परतले तेव्हा गारदी वाड्यावर दंगा करत आहेत एवढंच कळलं, तरी पेशवे वाड्यावर झोपायला गेले. इकडे पेशव्यांच्या हालचालींवर तुळया पवाराची सख्त नजर होती. पेशवे आणि हरिपंतांना कटाचा सुगावा लागला

आहे, आता उशीर करण्यात अर्थ नाही, नाहीतर आपला जीव जाईल म्हणून तुळ्या पवाराने गारद्यांना घाईने कट अंमलात आणायचा निरोप पाठवला. गारदी तयारच होते.

७०० / ८०० गारद्यांना घेऊन सुमेरसिंग आणि महंमद इसाक हे दोघेजण शनिवारवाड्याच्या दरवाज्यावर आले. बुधासिंग जमादाराने त्यांना अडवलं, तेव्हा त्याला ठार करुन दिसेल त्याला मारहाण करत गारदी आत घुसले. आबाजीपंत दरवाजा लावण्यास पुढे गेला तेव्हा त्यालाही मारलं. शनिवारवाड्याच्या चौकात उभं राहून त्यांनी पगाराची थकबाकी मागायला सुरुवात केली तेव्हा खाजगीकडील कारकून इच्छारामपंत ढेरे पुढे झाले आणि यजमान झोपलेत, उद्या कचेरीत पगार मागा असं सांगू लागले तेव्हा गारदी त्यांच्याही अंगावर धावले. पंत धावले आणि एका गायीच्या मागे लपले तेव्हा गारद्यांनी गाय आणि पंत, दोघांवर तलवार चालवली. वाड्यात रक्ताचा सडा पडला. तिथून सगळे देवघरात शिरले, देव, पूजेचं साहित्य, चांदी सोनं, सगळं लुटलं. काहीजण पेशव्यांच्या महालाकडे जायला लागले. तेव्हा शागिर्दांनी नारायणराव पेशव्यांना नाना फडणीसांच्या वाड्यावर पळून जायला सांगितलं. पण त्यांनी न ऐकता ते पार्वतीबाईंकडे आश्रयाला गेले. पार्वतीबाईंना मूल नव्हतं म्हणून गोपिकाबाईंनी स्वत:च, हा तुझा मुलगा, याचा सांभाळ कर असं सांगितलं होतं. पार्वतीबाई पेशव्यांना म्हणाल्या, हे काम तुमच्याच चुलत्यांचं आहे, त्यांच्याचकडे जा.” नारायणराव दादांच्या महालात गेले.

आपल्या महालात दादा अधीरपणे फेऱ्या मारत होते. नारायणाची अटक आणि नंतर त्यांच्या स्वप्नपूर्तीच्या क्षणाची वाट पाहात असतांनाच नारायण

तिथे “ काका मला वाचवा ” असं म्हणत आत शिरला. त्याने दादांच्या कमरेला मिठी घातली. आर्त करुण आवाजात त्यांनी काकांना विनंती केली..त्यांचा तो करुण आवाज महालात घुमला आणि दादांच्या मनात गलबल झाली. दादांना हे अनपेक्षित होतं. दादा त्यांचे हात सोडवून घ्यायला लागले. पाठोपाठ सुमेरसिंग गारदीही दोन तीन लोकांना ठार करत तिथे पोचला. रावांस सोडा, नाहीतर दोघांचे जीव जातील असं रागाने बोलला, तेव्हा नारायणराव काकळुतीने दादांची विनवणी करायला लागले. काका, मला राज्य नको, मला पाहिजे तिथे बंदीत ठेवा म्हणायला लागला पण त्यांना वाचवण्याचा अवसरच मिळाला नाही. गारद्यांच्या डोळ्यात खून चढला होता. दादांनी सुमेरसिंगास दूर होण्यास सांगितलं. सापास सोडलं तर तो आमचाच प्राण घेईल असं सुमेरसिंग म्हणाला. तुळ्या पवार घाबरुन गेला. त्याने पेशव्यांचे पाय ओढले, त्याबरोबर दादांच्या पायाची मिठी सुटली. लगेच सुमेरसिंगने वार टाकला. इतक्यात हुजऱ्या चापाजी टिळेकर आणि गवई नारोबा फाटक रायांना वाचवण्यासाठी धावले. त्या दोघांसह पेशव्यांना गारद्यांनी ठार केलं. दादांनी वाचवण्यासाठी हात पुढे केला तर त्यांच्याही हाताला जखम झाली. आणि शिरपेंचाचे मोती तुटले. एका कलत्या सूर्याच्या साक्षीने स्त्रीहत्या, गोहत्या, ब्राह्मणहत्या झाल्या. विरोध करणारेही मेले. वाड्यात हाहा:कार माजला. स्त्रिया रडू लागल्या. नोकर चाकर भेदरुन अवाक् होऊन थिजल्यासारखे लपले.

सूर्य अस्ताला गेला. वाडा अंधारला. दिवेलागणी झाली. मशाली पेटवण्यात आल्या. दारापासून दिवाणखान्यापर्यंत खाली माना घालून लोक देह तपासत होते. मशालींच्या उजेडात वाड्याच्या भिंतींवर गहिऱ्या, भेसूर सावल्या

हालचाल करतांना दिसायला लागल्या. पायतळी शवांच्या राशी पडल्या होत्या. कुणाचा देह, कुणाचे हात, कुणाचं शरीर, त्यातच गाय.. मशाल पेटवली गेली, नारायणरावांचा देह ओळखला गेला तो त्यांच्या पोटातून बाहेर पडलेल्या सकाळच्या केशरी भाताच्या कणांमुळे.. मग पेशव्यांच्या देहाचे तुकडे खाली चौकात आणले गेले. गावात गहजब होऊ नये म्हणून रात्र पडल्यावर अंधारात झोळीत शव बांधून, नडगेमोडीला अग्नी देण्याचं काम त्र्यंबकमामा पेठ्यांनी केलं. त्याचवेळी शनिवार वाड्यात आणखी एक दु:खद घटना घडत होती. नारायणराव पेशव्यांची पत्नी आर्त स्वरात रडत सती जायचा हट्ट धरुन बसली होती. मस्तक फोडून घेत होती, पण दादांनी आणि आनंदीबाईंनी तिला खोलीत बंद करुन बाहेरुन कडी लावली. ती सती जाणार म्हणजे दुसरे दिवशीची सकाळ उजाडणार, गावात गवगवा होणार, शिवाय गंगाबाईला दिवस गेले होते.

नारायणरावांना अटकेत ठेवून पेशवेपद आपल्या हाती घेण्याची राघोबादादांची इच्छा त्यांचे पाठीराखे सखाराम बापू बोकील, पुरंदरे वगैरेंना मान्य होती. माधवराव पेशवे वारले. आता दादांना आपल्याला पेशवाई मिळावी याची आंस लागली. पण नारायणरावांनी दादांनाच अटकेत टाकलं त्यामुळे ते आणखीनच चिडले. दादांच्या कैदेची व्यवस्था पाहायला पेशव्यांनी सुमेरसिंग गारदी याची नेमणूक केली. दादांचा हुजऱ्या तुळाजी पवार याने सुमेरसिंगाला आपल्याकडे वळवलं. भरपूर पैसा दिला तर गारदी काहीही काम करु शकतात हा विश्वास तुळयानेच दादांच्या मनात भरवला. सखारामबापूंनी कराराचा कागद लिहून दिला. दादांनी त्यावर स्वहस्त करुन दिलं. कटाची उभारणी अशी झाली. विरोधकांना नजरकैदेत ठेवण्याची वृत्ती राजकारणात नवीन नाही. पण प्रत्यक्ष जे

घडलं ते कुणाला माहीत होतं? जे घडून गेलं त्यातून सखारामबापू बोकील मग सावरले. गंगाबाईंना दिवस गेले आहेत हे कळल्यावर दादांना कारभारातून काढण्याचा गुप्त बेत त्यांनीच आखला. ९ महिने गंगाबाईंना सांभाळायचं, त्यांना पुत्र झाला की त्याच्या नावाने कारभार सुरु करायचा हा विचार त्यांनी नक्की केला आणि एकेका मुत्सद्याला, सरदारांना आपल्या पक्षात वळवून घ्यायला सुरुवात केली. तेच बारभाई मंडळ. गंगाबाईंच्या जीवाला दादांपासून धोका नको म्हणून पुरंदरावर ठेवण्यात आलं.

गोपिकाबाईंना नाशिकला त्यांचं हृदय फोडून टाकणारी ही बातमी मिळाली. पानिपताच्या युध्दात पेशव्यांच्या घरातले सदाशीवभाऊ, विश्वासराव, समशेर, पती नानासाहेब पेशवे, २७ वर्षांचे माधवराव पेशवे आणि पाठोपाठ ९ महिन्यांमधे तिसरा २० वर्षांचा नारायणराव असे तीन पुत्र त्या अभागिनीने गमावले होते. गोपिकाबाईंना हा आघात पेललाच नाही.. त्या मन:शांतीसाठी मठात जाऊन राहिल्या. चार घरची भिक्षा मागून जेवत राहिल्या.. एके काळची सावकारांची लाडकी गर्भश्रीमंत लेक, एका महाप्रतापी बाजीराऊ पेशव्यांची सून, नानासाहेब पेशव्यांची पत्नी आणि माधवराव पेशव्यांची माता एक करारी, बुध्दिमान सुंदर स्त्री, दुर्दैवाच्या तडाख्याने उध्वस्त होऊन मन:शांती शोधत होती.. एवढं करुण दुर्दैव सटवाईने तरी बाईंच्या भाळी कोणत्या आकसाने लिहिलं असेल..? नियतीने पेशवे नारायणरावांना नेलं आणि त्यांचं बीज सवाई माधवरावांच्या रुपाने परत त्याच वाड्यात पेरलं.

नारायणरावांना अटक करण्याची चिठ्ठी मिळाली तेव्हा त्यात धरावे च्या जागी मारावे असं लिहिलं होतं. ध चा मा केल्याचा हा आळ आनंदीबाईंवर

घालण्यात आला. त्या मात्र परत परत कारभारी नाना फडणींसांना पत्रं लिहून विचारत राहिल्या, “ माझं नाव का घेता ? खऱ्या गुन्हेगाराचा शोध घ्या…ध चा मा कोणी केला याचा तपास न करता तो माझ्या अंगी उगाच का लावता?” पण नानांनी त्याला उत्तर दिलंच नाही. एका शब्द बदलाने सारं राजकारण बदलून टाकणारा कोण असेल तो? इतिहासाला ते कधीच कळलं नाही. दादांना झाल्या कृत्याची देहांत प्रायश्चित्ताची सजा फर्मावून रामशास्त्री प्रभुणे नोकरी सोडून निघून गेले. असा न्यायाधीश परत झाला नाही. घटाघटाचे रुप आगळे, प्रत्येकाचे दैव वेगळे, तुझ्याविना ते कोणा नकळे. खरं का हे!

ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss

# मातोश्री अहिल्याबाई होळकर.



स्वराज्याचे राजघराण्याचे रंग आता बदलले होते. सरदारीतही नवीन पिढी आली होती. जुने घराणी स्थापन करणारे हात काळाच्या पडद्याआड गेले होते. मल्हारराव होळकर १७६५ मधे निवर्तले. पानिपतात राणोजी शिंद्यांचे

औरस पुत्र धारातीर्थी पडले, म्हणून महादजी शिंदे दौलतीचे प्रमुख वारस ठरले. शिंदे होळकर या युगुलात शिंद्यांची दौलत महादजीबाबांकडे आली आणि मल्हाररावांची दौलत अहिल्याबाई होळकरांच्या हाती माधवराव पेशव्यांनी सोपवली. बाईमाणूस लष्कर कसं सांभाळणार म्हणून मल्हाररावांचा पुत्रवत वारस तुकोजी होळकरांना लष्करी अधिकार दिले. अहिल्याबाईंनी ते कारभाराचे दोर समर्थपणे सांभाळले. त्यांची ही कथा.

She was blest by every tongue, by stern and gentle, by young and old. - Mrs. Jone Welby. "अहिल्याबाईस ब्राह्मण क्षत्रिय, हिंदू-मुसलमान, सुष्ट-दुष्ट आणि चोर- सावकार सर्वच माळव्यात दुवा देतात आणि तिचे नाव परमपूज्य बुध्दीने घेतात.."

एखाद्या सत्ताधीशासाठी ही प्रजेकडून मिळालेली कीर्ती, अहिल्यादेवींचं सारं थोरपणाचं चरित्रच दाखवून जातं. शिवप्रभू, संभाजी महाराज, राजाराम महाराज यांच्यानंतर स्वराज्यात जरासा मध्यंतरासारखा काळ आला आणि शाहू महाराजांच्या आगमनानंतर परत स्वराज्य झळाळून उठलं. शाहू महाराजांनी शिवरायांसारखंच जातीचा दाखला न बघता वकूबाचा दाखला पाहिला. त्यामुळे पेशवेपदावर बाळाजी विश्वनाथ आणि त्यानंतर आले बाजीराऊ.. झळाळत्या सूर्यासारखे. पेशवाई ब्राह्मणांची झाली पण राऊंनी ब्राह्मणांचं राज्य आणलं नाही.. जातीचा दाखला न बघता कर्तृत्त्वाचा गुण पाहिला. म्हणूनच दाभाड्यांशी झालेल्या लढाईत त्यांच्याकडून लढणाऱ्या मल्हारी होळकरला आपल्याकडे मागून घेतलं. दिल्ली कब्जात आणणं म्हणजे सारा हिंदुस्थान

स्वराज्यात आणणं हे त्यांचं स्वप्न होतं म्हणून दिल्लीजवळचे माळवा, बुंदेलखंड सुभे जिंकून तिथे तेजस्वी, पराक्रमी, मल्हारराव होळकराला माळव्यावर नेमलं. नीरा नदीकाठच्या होळ गावच्या खंडेराव वीरकर या धनगराचा रामनवमीच्या मुहूर्तावर जन्मलेला हा मुलगा. वडील गेल्यावर मल्हारी आपल्या मामाकडे भोजराज बारगळ यांच्याकडे तळोदे इथे आईबरोबर वाढला आणि आपल्या हूडपणामुळे लष्करात चमकला. राऊंनी साताऱ्याजवळच्या कण्हेरखेडच्या राणोजी शिंदेला ग्वाल्हेरवर ठेवलं आणि औरंगजेबानंतर खिळखिळया झालेल्या बादशाहीला शह दिला. बाजीरावांनी आपला एक भक्कम पक्ष तयार केला. शाहूराजांच्या जुन्या झालेल्या प्रतिष्ठित दरबारींना शह दिला. मग राणोजी, मल्हारराव यांचे घोडे सुसाट सुटले..मल्हारबाबांना सर्वजण सुभेदार म्हणत.

अहिल्याबाई याच मल्हाररावांच्या घरात सून म्हणून आली. बीड जिल्ह्यातील चौंडी गावच्या शिंदे पाटलाची ही कन्या. १७२५ सालात यांचा जन्म झाला. त्याकाळातील प्रथेप्रमाणे मल्हाररावांच्या पुत्राशी, खंडेरावांशी यांचं लग्न १७३३ मधे वयाच्या ८व्या वर्षी झालं. त्यांच्या लग्नाची कथाही अत्यंत उत्कंठावर्धक आहे. बाजीराव आणि मल्हारराव एकदा स्वारीवरुन येत असतांना चौंडी गावात त्यांचा मुक्काम झाला. हे सीना नदीवरचं गाव. त्यादिवशी छोटी अहिल्या आपल्या आईबरोबर नदीकाठच्या महादेवाच्या देवळात आली होती. ती नदीवरच्या वाळूत शिवलिंग रचत बसली असतांना अचानक बाजीरावांच्या तळावरचा एक उधळलेला घोडा तिथे आला. सगळे धावले पण अहिल्या शिवलिंगावर वाकली. इतक्यात मल्हारराव आणि बाजीराव घोड्यावरुन तिथे

येऊन पोचले. बाजीरावांनी तिला बाजूला केलं आणि घोड्यांनी जखमी झाली असतीस तर असं विचारलं तेव्हा ती धीटपणे म्हणाली की जे आपण घडवावे ते आपण जीवापाड रक्षावं असं मोठे लोक सांगतात. बाजीराऊ चमकले. त्यांनी मल्हारबाबांना खंडेरावासाठी ही मुलगी करुन घ्या आणि राज्य रक्षणासाठी तयार करा असं सांगितलं. भाग्यवान होती म्हणून धनगर ज्ञातीतील राजघराण्यात तिचा पुढील कर्तृत्वासाठीच प्रवेश झाला.

थोडंसं लिहायला वाचायला शिकलेली ही लहान मुलगी जन्मत:च बुध्दिमान होती. त्यामुळे सासरच्या घरात लगेच व्यवहार समजून घ्यायला लागली.. तोपर्यंत मल्हारबाबांची पत्नी गौतमीबाई या व्यवहार सांभाळायच्या, मल्हारपंतांनी आणलेली लूट, खजिना यांचे हिशेब ठेवण्यात अहिल्याबाई इतक्या हुशार झाल्या की सुभेदारांनी चक्क खजिन्याच्या चाव्याच त्यांच्याच हातात सोपवल्या..त्यांनी आपल्या अधिकारातील सर्व जिल्हे, तालुके, तीर्थक्षेत्रे यांची माहिती करुन घेतली, रोज कचेरीत जाऊन जमाखर्च सांभाळायला आणि तपासायला लागल्या, न्यायनिवाडे करायला लागल्या. सरकारी आणि खाजगी उत्पन्न वेगळं ठेवायला लागल्या. घोडेस्वारीत तयार झाल्या. मल्हारबाबांसाठी फौज तयार ठेवणं, तलवारी-भाले-गोळाबारूद- तयार ठेवणं, खात्यांप्रमाणे पैसे वाटप करण्यात त्या वयाच्या १५ व्या वर्षापर्यंत तरबेज झाल्या. सगळा कारभार सांभाळायला लागल्या. त्यांच्या हुशारीचं एकच उदाहरण पुरेसं होईल. ते म्हणजे एकदा बाजीरावांनी एका महत्त्वाच्या व्यक्तीच्या काशी प्रवासाची त्यांच्यावर जबाबदारी सोपवली. तेव्हा अहिल्याबाईंनी प्रवासात लागणाऱ्या नद्या, घाट, उतार, गावं यांचा एक नकाशा स्वत: तयार केला आणि गावोगावच्या लोकांना

तशी पत्रं पाठवली. बाजीराऊबरोबर स्वारीवर खंडेरावाला घेऊन मल्हारबाबा बाहेर पडले की अहिल्याबाईच सर्वांकडून कामं करुन घेऊ लागल्या. त्यांचे निर्णय इतके चोख असत की सगळेजण हुकूम पाळत..त्यात जरबही असे. एवढंच काय पण सुभेदारही सुनेच्या सल्ल्यानुसार वागायला लागले. मल्हारबाबांनी त्यांना लष्करात नेऊन तेही शिक्षण दिलं.

.त्यातून त्यांचं धर्माचरणाचं तेज आणखीनच चकचकीत करुन गेलं. अहिल्याबाईंना स्तोत्रं पाठ होती. धार्मिक ग्रंथांचं वाचन सतत चालत असे. त्या अध्यात्मिक तेजाने खंडेरावही आपले सगळे व्यसनी छंद बाजूला ठेऊन तिच्यासमोर जात असे. एकीकडे पुण्यशील आणि दुसरीकडे राजनीती, हे एकमेकांचे विरोधी असे दोन गुण एकत्र अहिल्याबाईंच्यात दिसून आले. अहिल्याबाईंच्या या सद्गुणांमधे त्यांना मालराव हा पुत्र झाल्यावर आणखी भर पडली. नंतर त्यांना एक मुलगी झाली ती मुक्ताबाई. खंडेरावाकडे सद्गुणांचा अभाव होता. ते अत्यंत व्यसनी होते. त्यांनी एकदा व्यसनासाठी अहिल्याबाईंकडे पैसे मागितले पण अहिल्याबाईंनी त्यांना व्यसनावरचा खर्च दाखवत ठाम नकार दिला तेव्हा चिडलेल्या खंडेरावांनी हिशेबाची वही भिरकावली. त्यावर शांतपणे अहिल्याबाईंनी प्रत्यक्ष नवऱ्याला, खंडेरावांना, खतावणीची बेअदबी केली म्हणून २५ मोहरांचा दंड लावला. इतक्या कडक होत्या.

बाजीरावांचा मृत्यू झाल्याची खबर इंदूरात पोचली. मल्हारराव हृदय फुटेपर्यंत रडले, ८ दिवस अन्नाला शिवले नाहीत. राऊंसाठी त्यांनी दानधर्म करवला. पुढे हिशेबाची वही तपासतांना सर्व खर्च सरकारी खात्यात टाकल्याचं

दिसलं. अहिल्याबाईंनी गंगोबातात्यांना सज्जड दम भरत म्हटलं, तात्या, मामंजी बाजीरावांचे संबंध भावांसारखे, त्यांचा सगळा खर्च खाजगीकडे टाका. एकवेळ खाजगीतला पैसा सरकारी कामावर वापरावा पण सरकारची एक कवडीही आपल्या खाजगीकडे नसावी. यावेळी अहिल्याबाई केवळ १५ वर्षांच्या होत्या..ही अहिल्याबाईंची नीतीमत्ता. अहिल्याबाई इतक्या हिऱ्यासारख्या पण पुत्र मालराव अगदी गारगोटी निघाला. अभ्यासात गती तर नाहीच पण क्रौर्यही फार होतं. बाई स्वत: त्याचा अभ्यास घ्यायला बसायच्या.

इ. स. १७५४ सालच्या स्वारीत कुंभेरीच्या वेढ्यात खंडेराव गोळी लागून ठार झाले आणि वयाच्या २९ व्या वर्षी अहिल्याबाईना वैधव्य आलं. अहिल्याबाई लष्करातच होत्या. खंडेरावांची मृत्यूची बातमी कळल्याबरोबर त्यांनी त्या काळच्या लौकिकाला साजेल असा सती जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा मल्हारबाबा भूकंप झाल्यासारखे हादरले. सतीची वस्त्रे नेसून आणि मळवट भरुन उभ्या असलेल्या अहिल्याबाईला पाहून मल्हारबाबा पार कोसळले. अक्षरश: त्यांच्या पाया पडले आणि तिच्या सती न जाण्यासाठी विनवण्या केल्या तेव्हा अखेर अहिल्याबाईंनी आपला निर्णय बदलला आणि राज्याचा कारभार हाती घेतला. “बाई, तू मला असा उन्हाळा का करते आहेस? खंडू समजून मी तुझ्याकडून राज्यकारभार करुन घेत होतो..माझं सारं सौभाग्य तुझ्या हाती आहे.. तू गेलीस तर मी निपुत्रिक होईन. तू प्रजेची आई हो. माझं पुण्य संपलं का पोरी .या म्हाताऱ्याची कींव कर..” अशा विनवण्या केल्यावर अहिल्येने आपला हट्ट सोडला. खंडेरावांचं प्रेत जळायला लागलं, त्यांच्या ९ रक्षा सती गेल्या. अहिल्याबाईंनी आपले सर्व दागिने, शालू, पैठण्या एकत्र

बांधल्या आणि चितेत टाकल्या. सारे रंग उपभोग जाळून आजपासून मी फक्त शुभ्र वस्त्रे नेसीन म्हणाल्या. आणि त्यांनी संन्यस्त जीवन स्वीकारलं. डेऱ्यात आल्यावर मल्हारबाबांनी त्यांना आजपासून तुम्ही आम्हाला पुत्रवत, म्हणून तुम्ही म्हणू. असं म्हणाले. त्यादिवशीपासून राज्यकारभार सांभाळायला लागल्या तेव्हा त्या अवघ्या ३० वर्षांच्या होत्या. त्याचवेळी त्यांचं धर्माचरण, पूजा, व्रतवैकल्य हेही तेवढंच कडकडीत निष्ठेने चालू राहिलं.. कितीही मोठा दरबारी वा सरदार आला तरी त्यांची पूजाअर्चा संपपर्यंत तो थांबू लागला..दुसरीकडे अहिल्याबाईंनी तोफांचा कारखाना उघडला. दारुगोळ्याची त्यांना पूर्ण माहिती होती.

खंडेराव गेल्यावर मल्हाररावही स्वारी मोहिमांमधे एकटेच जाऊ लागले. सन १७६१ मधे पानिपतामुळे पुण्यात हाहा:कार माजला. पाठोपाठ चार वर्षांनी १७६५ मधे मल्हारबाबा हे जग सोडून गेले. त्यावेळी ते उत्तरेत मोहिमेत होते. आलमपूरला असतांना त्यांच्या कानाला ठणका लागला. मल्हारबाबांना एकदा तोफेच्या गोळ्याची जखम कानाला झाली होती. ती वाढली आणि त्यात सुभेदारांचा कैलासवास झाला. आता अहिल्याबाई आणि त्यांचा वेडसर, व्यसनी, पुत्र मालराव मागे राहिले. त्यावेळी थोरले माधवराव पेशवे होते. त्यांनी मालरावांच्या नावाने सरदारीची वस्त्रे दिली. सरदारी मिळाल्यावर मालराव बेफाम वागू लागला.पैसे उडवू लागला. अहिल्याबाईंचा इलाज नव्हता. मालराव अत्यंत दुष्ट होता, क्रूर होता. अहिल्याबाई ब्राह्मणांना दान म्हणून तबकात पैसे ठेवत असत. ब्राह्मणाने त्यात हात घातला की त्यातील विंचू त्याला चावत असे. मग मालरावाला खदाखदा हसत सुटे. अशी अनेक उदाहरणं होती.

मालरावांच्या काळात त्या इंदूर सोडून महेश्वरला येऊन राहिल्या. अहिल्याबाईंना आता मुक्ताचं लग्न करायचं होतं. त्यांना शूर जावई हवा होता, म्हणून त्यांनी दरबार भरवून एक घोषणा केली. जो कुणी राज्यातील लुटारू भिल्लांचा बंदोबस्त करील त्याला मुक्ता मिळेल. दरोडेखोर भिल्लांना हात लावणं सोपं नव्हतं पण यशवंतराव फणसे नावाच्या एक वीराने भिल्लांच्या नायकाला जेरबंद करून बाईंपुढे आणलं. अहिल्याबाईंनी यशवंतरावाशी मोठ्या थाटाने मुक्ताचं लग्न लावून दिलं. खंडेरावांच्या पाठोपाठ वर्षभरात मालरावही वारला. मालरावाच्या दासीचा गावातील एक पटवेगाराशी संबंध आहे हे कळल्याबरोबर त्याने त्या पटवेगाराला ठार केलं. तो पटवेगार चेटुक जाणणारा होता., मरतांना मी भूत बनून तुझा प्राण घेईन असा शाप त्याने मालरावाला दिला होता. त्या भीतीने मालरावाच्या मनावर मोठा परिणाम झाला. मालरावाला सणसणून ताप भरला. त्याच मानसिक ताणाने मालराव मेला..मालरावाचं मैना नावाच्या मुलीशी विवाह झाला होता. अहिल्याबाईंवर आकाश कोसळलं आणि दुष्ट संकटांची साखळी सुरु झाली..मालरावाला संतती नव्हती त्यामुळे होळकरांची सरदारी कुणाच्या नावे करायची याचा घोळ झाला…

आता सर्व निर्णय पेशवे माधवरावांना घ्यायचा होता. माधवरावांनी विचारपूर्व होळकर दौलतीची विभागणी केली. राज्याचा कारभार अहिल्याबाईंकडे दिला आणि लष्कर स्वारी मोहिमांची जबाबदारी तुकोजी होळकरांवर टाकली. अहिल्याबाईंच्या आयुष्यातील दुसरं पर्व सुरु झालं. **माळव्याचा कारभार माळव्याचा कारभार अहिल्याबाईंकडे आला.**

मल्हारबाबांनी खंडेराव यांची नियत पाहून आधीपासून आपला दासीपुत्र तुकोजी होळकराला लहानपणापासूनच जवळ बाळगलं होतं. तुकोजींना एक बंधू होते ते संताजी..मालरावाच्या मरणाने अहिल्याबाई पार कोसळल्या. एकट्याही पडल्या. त्याचवेळी त्या आणखी एका संकटात सापडल्या.

स्त्री आणि संपत्ती उघड्यावर पडलेली पाहिली की इमानदार कुत्रेही लांडगे बनतात..मल्हारबाबांचे दिवाण गंगोबातात्या यांची नियत विषारी झाली. या असहाय, एकट्या बाईचा पैसा आणि सत्ता ताब्यात घ्यायचं कारस्थान गंगोबा तात्यांनी आखलं. राघोबादादांना फौज घेऊन इंदूरवर येण्यासाठी गुप्त पत्र लिहिलं. अहिल्याबाईंना ही बातमी गुप्तहेरांकडून कळली. मल्हारबाबांच्या खजिन्यात १४/१५ कोटींची पुंजी जमा होती. ती हडपायचा आणि आपल्या मनासारखा वारस होळकरांच्या गादीवर बसवायचा त्या दोघांनी कट केला. राघोबा तर नुसते कमकुवत मनाचे पोकळ नाचणारी बाहुली.. आधी सखारामबापू, मग गंगोबातात्या, मग इंग्रज, प्रत्येकाने त्यांना वापरलं. राजकारणात मन खंबीर नसलं की काय दशा होते त्याचं उत्तम उदाहरण म्हणजे राघोबादादा..पण या कठीण प्रसंगातच व्यक्तीच्या कणखरपणाची वकूबाची परिक्षा होत असते.. अहिल्याबाई गाय होत्या त्या वाघिण झाल्या..सत्ता मिळवण्यासाठी आपल्यावर फौज घेऊन चालून येणाऱ्या त्या लांडग्यांना त्यांनी अक्षरश: शिंगावर घेतलं. आपला शोक बाजूला ठेवला. राघोबा फौज घेऊन आपल्या राज्यावर येत आहेत हे कळल्याबरोबर त्यांनी लगेच गायकवाड-शिंदे-पवारांना पत्रं लिहिली. पत्रात त्यांना लिहिलं की आज जी वेळ आमच्यावर

आली आहे, ती उद्या तुमच्यावर येईल. याचा विचार करुन फौज पाठवावी.. तुकोजी होळकर मोहिमेवर होते. त्यांना तातडीचा खलिता पाठवला आणि जेवत असाल तर हात धुवायला इंदूरला या असा निरोप दिला.

पुण्याला पेशव्यांना पत्र लिहिलं. माधवराव पेशव्यांनीही उत्तर पाठवलं की तुमच्या दौलतीविषयी जो पापबुध्दी धरेल, त्याचं पारिपात्य बेलाशक करावं. मल्हारबाबांनी माधवराव जेव्हा राघोबादादांच्या कैदेत होते, तेव्हा आर्थिक मदत दिली होती. मग अहिल्याबाईंनी रणनीती आखली. इथे अहिल्याबाईंच्या राजकीय चातुर्याची झलक बघायला मिळते. त्यांनी राघोबादादांनाही पत्र लिहिलं आणि त्यात म्हटलं की आपण माझं राज्य हिसकावण्याच्या कपटाने आलात. माझ्या सासऱ्यांनी आपल्या हिंमतीवर हे राज्य मिळवलं आहे. मीही खांद्यावर भाला टाकून उभी आहे. आपण जरुर या ! मी जिंकले तरी आपली लाज जाणार. आपण जिंकलात तरी आपली शोभा होणार. गायकवाडांचीही फौज इंदूरात जमा झाली. राघोबांना आता मागे फिरणं अशक्य, पुढे जावं तर लाज जाणार, तेव्हा राघोबा भानावर आले आणि आपण अहिल्याबाईंच्या पुत्रशोकाच्या सांत्वनाला येत असल्याचा बहाणा केला. त्यावर अहिल्याबाईंनी सरळ प्रश्न केला, सांत्वनासाठी येत असाल तर एवढी फौज कशापायी..शेवटी राघोबा एकटेच बाईंच्या भेटीला आले. महिनाभर इंदूरात राहिले आणि परत गेले. आपल्याच धन्याच्या नाशाचं कारस्थान रचणाऱ्या या गंगाधर यशवंत चंद्रचूड दिवाणाला माधवराव पेशवे यांनी भर दरबारात कठोर शिक्षा केली. त्यांना ३० लाख रुपये दंड केला. जेव्हा माधवरावांच्या हुकूमाला जुमानलं नाही, ते पैसे आले नाहीत तेव्हा पेशव्यांनी त्यांना दुपारी दरबारात बोलावलं..

गंगाधरतात्यांबरोबर त्यांचे तीन लोक आले. पेशव्यांनी दंड न भरल्याबद्दल विचारलं तेव्हा तात्यांनी उध्दट उत्तर दिलं. त्यावर श्रीमंत संतापले, त्यांनी चौघांच्या मुसक्या बांधल्या आणि चाबकाचे ३०० फटके मारण्याचा हुकूम सोडला. गंगाधरतात्यांना १२ फटके इतके जोराचे मारले की ते रक्त ओकले. चौघांच्या अंगातून रक्ताच्या चिळकांड्या उडायला लागल्या. तरी पैशाचं बोलेनात तेव्हा त्यांच्या नाकाला आणि कानाला चाप लावले आणि मग कैदेत टाकलं. जप्तीचे लोक त्यांच्या घरी पाठवले. अहिल्याबाईंना दादांनी आणखी एकदा त्रास दिला होता. बाईंचा दानधर्म पाहून सर्वांना बाईंकडे तुंबळ पैसा असेल असा लोभ होता. म्हणून राघोबादादांनी त्यांच्याकडे काही रक्कम मागितली. बाईंनी उत्तर पाठवलं की माझ्या संपत्तीवर मी तुळशीपत्र ठेवलंय.. त्यातून मी आपणाला काहीही रक्कम राजकारणासाठी देऊ शकत नाही. हवं तर ब्राह्मण म्हणून मी तुम्हाला काही रक्कम दान देऊ शकते. तेव्हा राघोबांचं उत्तर आलं की मी दान मागणारा भिक्षुक नाही. पण माझी रक्कम वसूल करायला मी फौज घेऊन येत आहे.. त्यासाठी लढायला तयार राहा. अहिल्याबाई राघोबादादांना पूर्ण ओळखून होत्या. त्यांनी लगेच उत्तर पाठवलं की माझा प्राण गेला तरी मी माझ्या धर्मादाय खजिन्याला हात लावू देणार नाही. यावर दादा फौज घेऊन येताहेत हे कळल्यावर अहिल्याबाईंनी स्त्रियांची फौज तयार केली आणि स्वत: त्यांचं सेनापतीपद घेऊन पुरुष वेषात दादांसमोर उभ्या राहिल्या. दादांच्या फौजेने आम्ही स्त्रियांशी लढणार नाही अशं म्हणत आपली हत्यारं खाली ठेवली. दादा खजिल झाले. दादांनी विचारलं की तुमची फौज कुठे आहे ? तेव्हा बाई म्हणाल्या की तुमच्या पूर्वजांनी दिलेल्या दौलतीवरच माझं रक्षण

झालं आहे. मीच त्या सर्व सेनेची प्रतिनिधी आहे. आपण मला मारुन राज्य घेऊ शकता..राघोबा शरमिंदे होऊन निघून गेले.

श्रीमंत माधवराव अहिल्याबाईंना मातोश्री अहिल्यादेवी असं बोधू लागले. राज्यात गुन्हेगारीला समूळ नष्ट करतांना त्यांनी आप पर भाव बाळगला नाही. एकदा अहिल्याबाईंच्या कानावर तक्रार गेली की तुकोजी होळकरांनी गावातील एका देवीचंद नावाच्या सावकाराच्या मरणानंतर त्याची दौलत,जप्त करायचा विचार केलाय. तेव्हा अहिल्याबाईंनी त्या बाईंना दत्तक वारस घेण्याची परवानगी दिली. दुसरीकडे, माझ्या प्रजेला तुमचा त्रास होतो म्हणून तुकोजी होळकरांना गावाच्या बाहेर राहण्याचा निरोप पाठवला. या घटनेनंतर बाईंचा लौकिक आणि दरारा खूप वाढला. खेमदास नावाचा सावकार निपुत्रिक मेला तेव्हा तिथल्या कमावीसदाराने तिच्याकडे लाच मागितली आणि दिली नाहीतर दौलत जप्त करण्याची धमकी दिली तेव्हा अहिल्याबाईंनी त्याला कामावरुन काढून टाकलं आणि विधवा असूनही त्या बाईंना दत्तक घेण्यास परवानगी दिली. तापीदास नावाचा एक सावकार खरगोण प्रांतात होता. त्याच्या पत्नीला अहिल्याबाईंनी आपला पैसा दानधर्मात खर्च करायला सांगितला. तेव्हा तिने नदीवर घाट बांधला, तापीदासाचं देऊळ बांधलं. माधवराव पेशव्यांनी माळव्याचा कारभार मातोश्री अहिल्यादेवींच्या नावे केला. त्यांच्या संमतीने नारो गणेश यांना कारभारी नेमलं. नारो गणेशांचा भाचा मुकुंदाला खाजगीचा कारभारी केलं. मग अहिल्याबाईंनी महेश्वर आपली राजधानी केली. सुंदर किल्ला बांधला. नर्मदेवर सुंदर घाट बांधला. बाईंनी मुलींसाठी पाठशाळा, शस्त्रशिक्षण सुरु केलं, संस्कृत पाठशाळा सुरु केल्या. कसबींना वसवलं. पेठा

निर्माण केल्या. महेश्वर राजधानी श्रीमंतीने नटली. हुंडा घेणारास शिक्षा जाहीर केली. दारुबंदी केली. सन १७६८ पासून अहिल्यादेवींचा अंमल माळव्यावर सुरु झाला. अहिल्याबाईंनी आपले वकील निजाम, टिपू, कलकत्ता, नागपूरकरांकडे पाठवले होते. त्यांच्याशी बाईंचे अतिशय स्नेहपूर्ण संबंध होते.

एकदा एका तरुणाला घेऊन काही भिल्ल बाईंपाशी आले आणि म्हणाले, आम्ही या तरुणाला लुटलं तेव्हा हा म्हणाला की अहिल्या देवींना मला ही शाल द्यायची आहे ती सोडून सगळं घ्या. तेव्हा अहिल्यादेवींनी त्यांची चौकशी केली. त्यांना आश्रय दिला. तोच पुढे प्रसिध्द झालेला शाहिर अनंत फंदी. आणि दुसरीकडे एक कवी आपलं अहिल्यादेवींवरचं स्तुतीस्तोत्र घेऊन आला, त्याचं ते काव्य ऐकल्यावर त्या वह्या नदीत फेकल्या. माझी स्तुती करण्यापेक्षा देवादिकांची करा असं त्याला म्हणाल्या. राज्याच्या सीमेवर राहणाऱ्या भिल्लांनी प्रवाशांना त्रास द्यायला लुटायला सुरुवात केली होती. लोक भयभीत होते. तेव्हा अहिल्याबाईंनी सर्व भिल्लांच्या नायकांचा बंदोबस्त केला आणि जे शरण आले त्यांना नवीन मार्ग दाखवला. त्यांना सरकारी सेवेत घेतलं, पगार चालू केला आणि वाटसरूंचं रक्षण करण्याचं काम सोपवलं. तेच काम पुढे औंधच्या पंतप्रतिनिधींनी केलं. त्यावरून व्ही शांताराम यांनी दो आँखे बारह हाथ हा सिनेमा काढला. पण मूळ कल्पना अहिल्याबाईंची. अहिल्याबाईंचा दानधर्म खाजगी संपत्तीतून चालत असे. बाई इतक्या दयाळू होत्या की शेतकरी पक्ष्यांना दाणे खाऊ देत नाहीत म्हणून त्यांनी गावोगाव शेतं खरेदी करुन ती वेगळी जमीन पक्ष्यांसाठी राखून ठेवली. राज्याच्या पैशाचा चोख जमाखर्च त्या पेशव्यांकडे पाठवत असत..बाईंनी प्रचंड दानधर्म केला. भारतभर

रस्ते बांधले, त्यावर दुतर्फा झाडं लावली. नद्यांवर घाट, विहिरी, धर्मशाळा, बांधल्या. अनेक देवस्थांनांचा जीर्णोध्दार केला. बाईंनी जो काही दानधर्म केला तो कायम स्वरुपाचा केला.. यज्ञ, अन्नछत्र यात कमी घातला हे त्यांच्या दानशूरपणातील आणखी एक व्यावहारिकपणाचं लक्षण..अहिल्याबाईंचे खासगीकडचे दिवाण मुकुंदराव होते.. बाईंनी स्वच्छच सांगितलं होतं, मी कारभार हाती घेतल्यापासून कवडीकवडीचा सर्व जमाखर्च चोख ठेवते. जर त्यात एका कवडीची चूक झाली तर एकाला ५ कवड्या देईन..अहिल्याबाई न्यायनिवाडा पंचायतीने करत असत. गुन्हेगारास लगेच शिक्षा होई. पण त्यांनी सहसा कधी देहदंडाची शिक्षा दिली नाही..

धर्मकार्यावर खर्च करतांना सैन्य म्हणजे राज्याचा प्राण याची अहिल्याबाईंना पूर्ण जाणीव होती. दुष्टांची कारस्थानं त्यांना पूर्णपणे अवगत होती आणि त्यावर मात करण्यातच त्यांची हुशारी होती. फडणीशी, राज्यकारभार, परराज्यांशी संबंध आणि लष्कर, या चार बाजू त्यांनी समर्थपणे सांभाळल्या..तुकोजी होळकरांनी लष्कराची जबाबदारी सांभाळली, पण हळूहळू तुकोजींमधेही महत्वाकांक्षा वाढत जाण्याचा बदल घडायला लागला होता.. अहिल्याबाईंचा कारभारही आपल्याच हाती यावा अशी बुध्दी त्यांनी धरली. त्यातून वाद निर्माण व्हायला लागला.अहिल्याबाई युध्दकलेतही हुशार होत्या. सुभेदार मल्हारबाबांना उदेपूरच्या राण्याने रामपुर परगणा भेट म्हणून दिलेला रामपुर सुभा परत मिळवावा असा लोभ चंद्रावताला सुटला. उदेपूरचा वंश चंद्रवंशिय होते म्हणून त्यांना चंद्रावत नाव होतं. तुकोजी होळकरांनी पराभव केला पण दुसरे वेळी तुकोजी होळकर जवळ नसतांनाही बाईंनी त्याच्याशी

सामना केला. शरीफभाई नावाच्या पहारेकऱ्याला फौज देऊन त्याच्यावर पाठवलं. त्याने चंद्रावतांचा पराभव केला. असा तीन वेळा बाईंनी सामना दिला.

अहिल्याबाईंना पुण्याच्या बालपेशव्यांबद्दल अतीव प्रेम होतं. चिमाजी अप्पांनी कष्टाने मिळवलेली वसई इंग्रजांच्या ताब्यात गेली तेव्हा त्यांना अतिव दु:ख झालं..पुण्यात नाना फडणीस २५/३० हजार हत्यारबंद कवायती फौज ठेवत नाहीत याचा त्यांना राग येई. कारण त्यांनी स्वत:च्या राजधानीची सुरक्षा इतकी भक्कम ठेवली होती की २५ हजार फौज कायम राजधानीत तयार असे. कुणीही त्यांच्या परवानगीशिवाय आत बाहेर करु शकत नसे इतकंच काय किल्ल्याच्या पायाशी वाहणारी नर्मदाही ओलांडू शकत नसे. कोणतंही बांधकाम करण्यात त्यांना विशेष सौंदर्यदृष्टी होती..महादजी शिंदे यांना वठणीवर ठेवणे आणि त्याच वेळी त्यांच्याशी सलोख्याचे संबंध ठेवणे ही तारेवरची कसरत त्यांनी खूप वर्षे केली. अत्यंत शांत, थंड डोक्याने अहिल्याबाईंनी ३० वर्षे राज्यातले प्रश्न सोडवले. अहिल्याबाईचा इतिहास लिहिणाऱ्या माल्कमने लिहून ठेवलंय की अहिल्याबाईंच्या विरोधात जाणं हे गोहत्येसारखं पाप समजलं जाई इतका त्यांच्याबद्दल आदर सर्व महाराष्ट्रात होता. टिपू सुलतान आणि निजामसुध्दा त्यांच्याशी दरारायुक्त आदराने वागत. महेश्वरच्या कागदपत्रात अहिल्याबाईंना उद्देशून गंगाजलनिर्मल असा उल्लेख आहे.

अहिल्याबाईंना प्रापंचिक सुख मात्र काडीमात्र मिळालं नाही. घरात खूप मृत्यू पाहिले. मल्हारराव गेले तेव्हा त्यांच्या २ बायका सती गेल्या. त्यानंतर खंडेराव मारले गेले तेव्हा त्यांच्या ९ रखेल बायका सती गेल्या. त्यातील दोन मुसलमान होत्या. मुलगा मालराव व्यसनी, दुष्ट, मानसिक रोगी, तोही लवकर

गेला, त्यांच्या मुलीच्या मुलाचं नाव नथ्योबा फणसे.. तोही ऐन तरुण वयात, १८ व्या वर्षी टी. बी. च्या दुखण्याने गेला. त्याच्या अंत्यसंस्काराच्या वेळी त्याच्या दोन १८ आणि १० वर्षांच्या कोवळया मुली सती गेल्या. ते दृष्य मुक्ताला आणि अहिल्याबाईंना पहावलं नाही. पाठोपाठ यशवंतराव जावई प्लेग दुखण्याने १७९१ मधे अचानक गेले. मुक्ता सती निघाली. आईने सती न जाण्यासाठी आग्रह करुनही, मुलगी मुक्ता सती गेली...अहिल्याबाई अक्षरश: तिच्या पाया पडत मला एकटीला टाकून जाऊ नकोस असं अगतिकपणे म्हणत राहिल्या. मुक्ताबाई म्हणाल्या, आई मी कुणासाठी जगू.? मुलगा गेला, पतीही चालले, तूही वृध्द झाली आहेस मला सन्मानाने जाऊ दे असं म्हणत मुक्ता चितेत शिरली. त्यावेळी अहिल्याबाईंचा शोक वर्णन न करण्यासारखा होता. त्यांना दोघांनी धरुन ठेवलं. बाई त्या क्षणी बेशुध्द होऊन पडल्या त्या तीन दिवसांनी शुध्दीवर आल्या. अहिल्याबाईंच्या दु:खाला अंत राहिला नाही.

काही काळाने अहिल्याबाई परत सावरल्या..कारभार पाहायला लागल्या त्यानंतर तुकोजी होळकरांची पत्नी रखमाबाई अहिल्याबाईंच्या सांत्वनासाठी इंदूरहून यायला निघाली तेव्हा अहिल्याबाईंनी तिला भेटीला न येण्याचा निरोप पाठवला. आपल्या दु:खाने आनंद झाल्यामुळे रखमाबाई भेटीला येते आहे अशी अहिल्याबाईंची खात्री होती..तिचा नथ्याबा हा मुलगा हाताशी धरुन त्याला गादीवर बसवेल असा तुकोजी होळकरला त्याच्या बायकोला, रखमाबाईला संशय होता. पण तो दूर करावा म्हणून अहिल्याबाईंनी तुकोजींचा मुलगा मल्हारराव याला हाताशी धरलं पण तोही इतका दगाबाज निघाला की अहिल्याबाईंनी त्याला कैदेत टाकलं. मुक्ताच्या जाण्यानंतर

अहिल्याबाई खचल्या. आता वयही वाढलं होतं. सत्तरी आली होती. शरीर साथ देत नव्हतं. थकवा वाढत चालला होता. सन १७९५ सालचा मराठ्यांनी निजामावर मिळवलेला शेवटचा खर्ड्याचा विजय त्यांनी पाहिला. मृत्यूसुध्दा त्यांना आला तो दानधर्म करतांना. १३ ऑगस्ट १७९५ ला, श्रावण शुध्द चतुर्दशीला, नारळी पौर्णिमेच्या आदल्या दिवशी त्यांचा कैलासवास झाला. तुकोजी होळकर पुण्यात होते, ते आले आणि बाईंचे उत्तरकार्य त्यांनी पार पाडलं.

एक पुण्यश्लोक साध्वी, होळकरांची राज्यकर्ती म्हणून अहिल्यादेवी कालपटावर आपली स्वाक्षरी करुन गेली.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

# महादजी शिंदे.



शिवरायांच्यानंतर मराठी रियासतीचा प्रवाहही बदलत गेला. शाहूराजांच्यानंतर राजघराणं क्षीण झालं आणि पेशव्यांच्या कालाचा उदय झाला. पेशवे घराणंही कालांतराने असमर्थ झालं आणि दोन कारभारी राज्याचे प्रमुख झाले. त्यातले एक महादजी शिंदे.

महादजी शिंदे यांचं नाव घेतल्याशिवाय मराठ्यांचा इतिहास पूर्ण होत नाही..पाटीलबाबा हे त्यांचं पुणे दरबाराला परिचित असलेलं नाव. कण्हेरखेड हे साताऱ्याजवळचं एक नगण्य गाव पण या गावाने इतिहास घडवणारे शिंदे

घराण्यातील पराक्रमी पुत्र स्वराज्याला दिले. या कण्हेरखेडचा एक तरुण औरंजगेबाच्या फौजेत सरदार होता. त्या शिंद्यांच्या कन्येशी बादशहाने शाहूराजांशी लावून दिलं. पुढे पेशवे बाळाजी विश्वनाथांच्याकडे बारगिर म्हणून राहिलेल्या राणोजी शिंदे नावाच्या तरुणाला बाजिराऊ नावाच्या परिसाचा स्पर्श झाला. त्यामुळे राणोजींची बहादुरी झळाळून उठली. राऊंनी राणोजीला करोल बनवलं. करोल म्हणजे घोड्यावरुन निशाणा करण्यात तरबेज असलेला..माळव्यातील मुलूख जिंकत गेल्यावर शिंदे – होळकर – पवार यांनी मुलूख जिंकायचा, त्याची खंडणी पुण्याला पाठवायची असं ठरलं. सुरुवातीला मल्हारराव होळकरांनी इंदूरला बस्तान बसवलं आणि राणोजी शिंद्यांनी उज्जयनीला घर केलं. याच राणोजी शिंदे आणि त्याच्या पराक्रमी पुत्रांनी, आपल्या तलवारीच्या पातीवर ग्वाल्हेरात आपला राजवंश स्थापन केला. राणोजीला एकच बायको होती. तिचं नाव मैनाबाई. तिला ३ मुलगे झाले. जयाजी, दत्ताजी, ज्योतिबा-ज्योताजी. राणोजीच्या पराक्रमी पुत्रांनी “ बचेंगे तो औरभी लडेंगे” या हिंमतीने सरदारी चालवून माळव्यात राज्य केलं. राणोजींची चिमाबाई ही रखेल रजपूत होती. तिने तलवारीशी लग्न लावलं म्हणून तिला खांडाराणी असं म्हणत. तिचा मुलगा महादजी. याच मुलाने ग्वाल्हेरला आणि शिंदे घराण्याला प्रचंड नावलौकिक मिळवून दिला.

हे राणोजीचं घराणं, ग्वाल्हेरचे सिंदिया घराणं या नावाने स्वातंत्र्यानंतरही त्यांच्या वारसांनी आजवर गाजवलं.

राणोजी शिंद्यांच्या मृत्यूनंतर थोरला पुत्र जयाजी शिंदे सरदार बनला, पण नागोरमधे मोहिमेवर असतांना त्यांचा खून झाला. त्यांच्यानंतर सरदारी

चालवणारे दत्ताजी दिल्लीत शुक्रतालवर अहमदशहा अब्दालीशी लढतांना मारले गेले. मरणशय्येवर असतांना “बचेंगे तो औरभी लडेंगे” हे त्यांचे उद्गार स्वराज्यात आजही सर्वतोमुखी आहेत. पाठोपाठ मुसलमानांशी लढतांनाच जोत्याजींनाही वीरगती मिळाली. त्यानंतर १७६१ मधे पानिपत घडलं. पानिपतावर जो हाहा:कार माजला त्यावेळी नाना फडणीस आणि महादजी शिंदे हे दोन जीव अब्दालीच्या माऱ्यातून वाचले. त्यावेळी जयाजीचे पुत्र जनकोजी शिंदे जखमी झाले आणि बरखुरदार नावाच्या अफगाण्याच्या हाती लागले. जनकोजींवर उपचार करुन, त्यांच्याकडून पैसा घेऊन सोडून द्यायचा विचार बरखुरदारने केला. पण तेवढ्यात एका शिपायाने अब्दालीकडे चुगली केली. म्हणून त्याची माणसं येताहेत हे कळल्यावर बरखुरदाराने जनकोजीला ठार करुन पुरूनही टाकलं. दुसरीकडे आपली हार होते आहे हे पाहून महादजी रणांगणावरुन निघाले तेव्हा त्यांच्या मागे एक पठाण लागला. पण त्याचवेळी महादजींचा घोडा अतिशय थकला, तेव्हा त्या अफगाणाने महादजींवर वार केला आणि महादजींचा घोडा आणि अंगावरचे दागिने घेऊन तो निघून गेला. महादजी पायाला जखम होऊन एका खड्ड्यात पडून राहिले. त्या रस्त्याने एक भिस्ती जात होता, त्याने महादजींना पाहिले. भिस्ती म्हणजे युध्द चालू असतांना सैनिकांना आपल्या भल्या मोठ्या कातडी पिशवीतून म्हणजे पखालीतून पाणी पाजण्याचं काम करणारा. त्याने महादजींना उचलून आपल्या घोड्यावर टाकलं आणि आपल्या घरी आणून त्यांची शुश्रुषा केली. या अपघातात महादजीबाबा कायमच एका पायाने अधू झाले, पण आपल्या बुध्दीवैभवाने आणि तलवारबाजीने त्यांनी स्वराज्यात मात्र आपला भक्कम पाय रोवला. ग्वाल्हेरात या विदुरपुत्र महादजी शिंद्यानी घराण्याची प्रतिष्ठापना केली.

जनकोजींच्या वीरपतनाने राणोजींचा औरस वंश संपला. आता सरदार करायचं तर राणोजींचे पुत्र म्हणून एकटे महादजी जिवंत होते. पण त्याचवेळी राघोबादादांचा माधवरावांशी पेशवाई मिळवण्याचा कलह सुरु झाला. त्यात दादांचा राग असलेल्या महादजींना घरच्या सरदारीवर हक्क मिळवण्यासाठी भरपूर मनस्ताप सहन करावा लागला. राघोबांनी शिंदे घराण्यातील मानाजी शिंदेना सरदारी दिली..., तेव्हा पाटीलबाबा, निजामाचा बीडचा ठाणेदार, सुलतानजी निंबाळकर या सरदाराकडे जाऊन राहिले. निंबाळकरांच्या भाचीशी महादजीबाबांचं लग्न लागलं. या भाचीला निंबाळकरांनी जामखेडमधील खोकरमोह गाव आंदण दिला. या गावाजवळ रायमोह गावात, मन्सूर शहावल्ली नावाचा एक अवलिया राहात होता. पाटीलबाबांनी त्याची खूप सेवा केली. त्यानंतर बाबांना सरदारी मिळाली, म्हणून शिंद्यांच्या सरदारीला फकिरी दौलत या नावाने ओळखलं जाऊ लागलं. पाटीलबाबा स्वत: रोज भजनं म्हणत, कवनं करत असत. रोज पूजापाठ करत. संत-फकिरांची सेवा करत असत. सरदारी मिळाल्यावर पाटीलबाबांनी या फकिराला काही गावं इनाम दिली. आपल्याला वाचवणाऱ्या राणेखान भिस्तीला भाई हा किताब देऊन त्यालाही काही गावं इनाम दिली. पुढच्या आयुष्यात हा राणेखानभाई पाटीलबाबांचा उजवा हात बनला.

राघोबादादांच्या विरुध्द माधवरवांची कारभारावरची पकड महादजींना आधार देऊन गेली. शिद्यांची सरदारी महादजींकडे आली.

पेशवे माधवरावांचा मृत्यू, नारायणरावांचा शनिवारवाड्यात खून, नावाने कारभार चालवणं, दादांचं इंग्रजांना जाऊन मिळणं, नाना फडणीस -

सखारामबापू बोकिलांनी सवाई माधवरावांच्या नावाने कारभार करणं या सर्वांमुळे स्वराज्याला कमालीचा अस्थिरपणा आला होता. राघोबादादा पेशवेपद मिळवण्याचा प्रयत्न सोडत नव्हते. त्यामुळे नाना आणि बापू यांना अनेक संकटांना सामोरं जावं लागत होतं. त्यावेळी महादजीबाबा उत्तरेतच कारभारी सांगतील ती सेवा करत होते. अशी ही पुणे दरबारातील फूटीची संधी इंग्रज न सोडतील तरच नवल. उत्तर भारत हातात आल्यावर स्वराज्य गिळण्याची त्यांना खा खा झाली होती. पुण्याच्या या अस्थिर वातावरणाचा फायदा उठवण्यासाठी मुंबईचा वकील मॉस्टीन याने पुणे दरबारातील असंतुष्टांना हाती धरण्याचं ठरवलं. इंग्रजांच्या आश्रयाला गेलेले राघोबा त्यांच्या हाती होतेच. राघोबादादांना पेशवेपदावर नेमायचं, नागपूरच्या मुधोजी भोसल्यांना सातारचं छत्रपतीपद द्यायचं, असं कारस्थान मुंबईच्या इंग्रजांनी रचलं. त्यासाठी सखारामबापू आणि होळकरांना आपल्याकडे वळवलं. सखारामबापूंना दादा नको होते पण सर्व अधिकार मात्र हवे होते. मॉस्टीनने पहिलं जाळं टाकलं ते नानांचा चुलत भाऊ मोरोबा फडणीस याच्यावर. आपल्याला कारभारात काहीही स्थान नाना देत नाही याचा मोरोबांना राग होता. मॉस्टिनने त्याला साऱ्या राज्याची फडणीशी देण्याचं कबूल केलं. फडणीशी म्हणजे अर्थखातं. मुख्य म्हणजे पुण्यातून नानांची समाप्ती होईल तरच हे सगळं घडणार होतं. म्हणून नानांना अटक करण्याएवढी मजल मोरोबाची झाली. धूर्तपणे नानांनी कारभार सोडल्याचं जाहीर केलं. आणि त्यांनी महादजींशी गुप्तपणे संपर्क साधला. तेव्हा पाटीलबाबांनी हे महान संकट अत्यंत धूर्तपणे आणि गुप्तपणे निवारलं. त्यांनी आधी सखारामबापूंना गाठलं आणि नाना फडणीस आणि बापू यांच्यात समेट घडवून, करार लिहून घेतला. मग इंग्रजांना फौज देण्यास तयार झालेल्या

होळकरांना सरळच विचारलं की इंग्रजांनी स्वराज्य जिंकल्यावर तुमची तरी दौलत राहणार आहे का याचा विचार करा. त्यामुळे होळकरही भानावर आले. अशा रीतीने सखारामबापू आणि होळकर मॉस्टीनच्या कारस्थानातून फुटले. आता मोरोबाला जिवंत पकडणं शिल्लक होतं, त्यासाठी अटक करायला काहीतरी कारण हवं होतं ते महादजीबाबांना मिळालं. फितूरीवरुन मोरोबांना अटक झाली आणि नगरच्या किल्ल्यात रवानगी झाली. तिथेच २२ वर्षे ते कैदेत राहिले. पाटीलबाबांनी अत्यंत धूर्तपणे, एकेक बाजू मिटवत हे संकट निवारलं. इंग्रजांचं हे बंडाचं कारस्थान यशस्वी होतं तर दादांना घेऊन इंग्रज पुण्यावर आलेच असते आणि स्वराज्य १७७८ मधेच संपलं असतं. एवढा आणीबाणीचा प्रसंग रक्तपाताशिवाय चार दिवसात आटोपला तो केवळ नाना आणि महादजी यांच्या धूर्त कारवाईमुळेच. आपलं आणि आपल्या शत्रूचं बलाबल नीट ओळखून हाती घेतलेलं काम नक्की यशस्वी होईल याची खात्री झाल्यावरच पाटीलबाबा काम हाती घेत. अशावेळी लोकांच्या आग्रहाला ते बळी पडत नसत हे त्यांच्या यशाचं रहस्य होतं. नाना आणि पाटीलबाबा यांचं जुग फुटल्याशिवाय आपल्या हाती स्वराज्य येणार नाही हेही इंग्रजांना कळून चुकलं.

## महादजी शिंदे

## वडगावचा तह.

महादजीबाबांची सरदारी काढून तिथे मानाजी शिंदे या बाबांच्या चुलत भावाला शिंद्यांच्या दौलतीवर स्थापण्याची मोरोबांची चिठ्ठी पाटीलबाबांच्या हाती लागल्यावर ११ जुलै १७७८ या दिवशी मोरोबा फडणीस यांना अटक झाली. मोरोबा फडणीसला कारभारी आणि राघोबादादांना पुण्यात स्थापायचं

मॉस्टीनचं कारस्थान वाया गेलं तरी चिवट इंग्रजांनी आपला प्रयत्न सोडला नव्हता. त्याच वेळी अमेरिका स्वतंत्र होऊन इंग्रजांच्या हातून गेली होती, त्यामुळे ते नुकसान भरुन काढण्यासाठी, पैशासाठी, भारतात आपलं साम्राज्य स्थापण्याची इंग्रजांना गरज होती. म्हणून त्यांना पुणं जिंकायचंच होतं. त्यातूनच पुढचा वडगावच्या लढाईचा प्रसंग निर्माण झाला. आता काहीही करुन पुण्यावर चालून जायचंच असं मुंबईच्या इंग्रजांनी ठरवलं. गव्हर्नर जनरल हेस्टींगने मराठी मुलखात शिरण्यासाठी नाना फडणीसांकडे परवाने मागितले. आजवर मुंबई, मद्रासकडे समुद्र वाटेने कायम ये जा करणारं लष्कर देशातून प्रवास करत आहे हे कळल्यावर लगेच नाना सावध झाले आणि पुण्यावर इंग्रज येणार हे ओळखून त्यांनी कर्नाटकातील फौजा लगेच माघारी बोलावल्या. तोपर्यंत सेनापती गॉडर्ड फौज घेऊन सुरतेस पोचला. त्याला मुंबईकरांनी आपल्या मदतीला बोलावलं. पण गॉडर्ड येण्याआधीच २५ नोव्हेंबर १७७८ या दिवशी, कर्नल इगर्टन ५०० इंग्रजी आणि २००० देशी शिपायांना घेऊन पुण्याकडे चालायला लागला. मुंबई किल्ल्यासमोर खाडी पार करुन इंग्रज पनवेलवरुन चौक-खोपोली मार्गाने राजमाचीवरुन पुण्याला जात. त्यावेळी मुंबई-पुण्याचा घोड्यावरचा प्रवास ८ ते १० दिवसांचा असे. (वर पोचल्यावर त्यांना समोर झोपलेल्या ड्यूक ऑफ वेलिंग्टनचा-आर्थर वेलस्लीचा चेहरा वाटावा असं नाक आणि दाढी असलेला कळस दिसे.. तेच आजचं ड्यूक्स नोज.. आता त्याला आपल्या गो.नि.दांडेकरांचं नाव द्यायला हरकत नाही. ) त्याच्याबरोबर राघोबादादा आणि त्यांचा दत्तकपुत्र अमृतराव होते. सर्व फौजा २५ डिसेंबरला खंडाळ्याला पोचल्या. पुण्याहून शिंदे, हरिपंत फडके यांच्या फौजाही इंग्रजांना अडवायला निघाल्या. मराठ्यांनी घाटातली त्यांच्या परतीची वाट बंद केली. त्यातच इंग्रजी

सेनापति कर्नल इगर्टन हा खंडाळ्याला आजारी पडला पण मुंबईला परत जाऊ शकला नाही. खंडाळ्याला पोचेपर्यंत इंग्रजांना पुण्याला पोचणं किती कठीण साहस आहे हे कळून चुकलं. ३० डिसेंबर १७७८ ला खंडाळ्यावरुन इंग्रज तळेगावच्या दिशेने चालू लागले तेव्हा मराठ्यांनी जवळपासचा सगळा प्रदेश जाळून त्यांचे आणि त्यांच्या जनावरांच्या खाण्याचे हाल केले. नानांच्या हेरांमुळे या वाटचालीत राघोबादादा फौजेच्या मागच्या टोकाला असतात हे मराठ्यांना कळलं म्हणून दादांना मागच्यामागे पळवून नेण्याची योजना मराठ्यांनी आखली.

राघोबांच्यामुळे इंग्रजांच्या मदतीला शिंदे होळकर फौज येणार हे मॉस्टीनने मुंबईच्या इंग्रजांना कळवलं. पण ९ जानेवारी १७७९ ला इंग्रज तळेगावावर पोचले तेव्हा त्यांना शिंदे होळकर फौजा समोरच्या बाजूला दिसल्या. तेव्हा मॉस्टीनने आपल्याला फसवलं हे इंग्रजांना कळलं. आपला पराभव समोरच दिसल्यामुळे इंग्रज परत फिरले आणि वडगावाकडे चालायला लागले तेव्हा मराठ्यांच्या फौजा त्यांच्या पाठलागावर गेल्या. वडगावावर दोन्ही फौजांची गाठ पडली. मराठ्यांनी इंग्रजांचे खूप शिपाई ठार केले. या लढाईची संपूर्ण जबाबदारी पाटीलबाबांवर होती. राघोबादादांनाही महादजी शिंदेच या स्वारीत सूत्रधार आहेत हे कळून चुकलं. तेव्हा, तुमच्याशी स्नेह करावा अशी इच्छा आहे असा निरोप त्यांनी पाठवला. तेव्हा पाटीलबाबांनी आपली दोन माणसं गुप्त रुपाने दादांकडे पाठवली. दादांना स्वाधीन केल्याशिवाय आपला निभाव लागणार नाही हे इंग्रजांना कळून चुकलं. इंग्रजांचा वकील फार्मर याने सही शिक्क्यानिशी कोरा कागद कारभाऱ्यांपुढे ठेवला आणि तुम्हाला हवी ती

कलमे यात लिहा अशी विनंती केली. तोपर्यंत मराठ्यांनी इंग्रजांचे अन्नपाणी बंद केलं होतं. उपासमार झालेल्या फौजेला वडगावचा तह केल्यावरच जेवण मिळालं. त्यानंतर मात्र अन्न पुरवण्याचं मराठ्यांचं मोठं मन पाहायला इंग्रजांनी अनुभवलं. ही लढाई मुंबईकर इंग्रजांनी गव्हर्नर जनरलच्या मनाविरुध्द स्वत:च्या जबाबदारीवर केली होती. त्यात इंग्रजांची लाजच गेल्यामुळे तो तह फारच झोंबला. या तहावर हेस्टींगकडून मंजूरी येईपर्यंत फार्मर आणि स्ट्रयुअर्टचा पुतण्या यांना नाना महादजींनी ओलीस म्हणून आपल्याकडे ठेवून घेतलं. वडगावच्या या पराभवाने राघोबादादा परत पुणे दरबाराच्या स्वाधीन झाले. आपण झांशीला स्नानसंध्या करत राहू असं वचन त्यांनी कारभाऱ्यांना दिलं. त्यामुळे, महादजी शिंद्यांवर दादांना सांभाळण्याची जबाबदारी सोपवण्यात आली.

१७ जानेवारी १७७९ या दिवशी वडगावचा तह पार पडला. महादजीबाबा मात्र यावेळी एक मोठा धडा शिकले. इंग्रजी फौजेची कवायती शिस्त त्यांनी पाहिली. त्या शिस्तीमुळे त्यांची फौज सैरावैरा धावत नाही, एक शिपाई पडला की दुसरा त्याची जागा घेतो, आणि सर्व फौज भिंतीसारखी उभी राहते, पळतांनासुध्दा घाबरटपणाने न पळता, शिस्तशीर माघार घेतात हे सर्व त्यांच्या मनावर इतकं बिंबलं की लष्करी ताकद ही सर्वात मोठी ताकद आहे, आणि आपल्यात तीच मोठी उणीव आहे हे त्यांच्या लक्षात आलं. या बलाढ्य शत्रूशी लढतांना आपल्यातील फूट आपल्या नाशाला कारण आहे हेही कळलं. त्यामुळेच इंग्रजांना संपवायचं असेल तर काट्याने काटा या न्यायाने उत्तम युध्दसाहित्यासाठी फ्रेंचांची मदत घेणं हाच त्यावरचा उपाय आहे हे त्यांच्या

मनावर ठासून भरलं. ब्रिटीशांना घालवायला फ्रेंच हवेत हेच मर्म टिपू सुलतान आणि पाटीलबाबा दोघांनी ओळखलं होतं.

राघोबादादा हाती आल्यावर चिंतो विठ्ठल, सदाशीव रामचंद्र या त्यांच्या भक्तांनाही शिक्षा करण्याचं नाना फडणीसांनी ठरवलं. तेव्हा चिंतोबा चिडले आणि आम्हाला शिक्षा करता तर सखारामबापूंना का सोडता, त्यांनीही फितूरी केल्याचे कागद माझ्याजवळ आहेत असं पाटीलबाबांना सांगितलं. ते राघोबांनीही मान्य केलं. तेव्हा पाटीलबाबांनी बापूंनी लिहिलेले फितूरीचे कागद युक्तीने दादांकडून काढून घेतले. राघोबा झांशीच्या मार्गाला लागल्यावर नाना आणि पाटीलबाबांनी सखारामबापूंना मेजवानीस बोलावलं. ते आल्याबरोबर दादांना आणि इंग्रजांना सामील असल्याच्या त्यांच्या चिठ्ठ्या दाखवत त्यांना कैद करुन रायगडावर ठेवलं. तिथेच त्यांचा मृत्यू झाला. ४ महिन्यात राघोबादादांनीही परत दगा दिला. झांशीच्या मुक्कामात असतांना ते परत निसटले आणि नर्मदेच्या काठाने सुरतेला गॉडर्डला जाऊन मिळाले. नाना आणि पाटीलबाबांच्या अडचणींना तोटा नव्हता. राघोबांनी माधवराव पेशवे, कारभारी आणि इंग्रज सर्वांना छळलं पण हुकूमाचा एक्का म्हणून पुण्याला गिळण्यासाठी इंग्रजांना राघोबादादांची जरुरी होती.

सखारामबापू गेल्यामुळे आता सर्व कारभार नाना फडणीसांच्या हाती आला. महादजीबाबांनी उत्तरेचं व्यवधान सांभाळणं अशी कायम वाटणी झाली. नाना फडणीसांची लष्करी बाजू अगदी कमकुवत होती. त्यामुळेच स्वराज्यासाठी नव्याने निर्माण झालेले दक्षिणेतील दोन शत्रू, हैदर असो वा इंग्रज, रणनीती आखण्यात नाना नेहमीच पाटीलबाबांच्या सल्ल्यानुसार चालत.

मिरजेच्या पटवर्धन घराण्यातील गोपाळराव, पुरुषोत्तम दाजी, नीलकंठराव परशुरामभाऊ या वीरांनी हैदरशी कैक सामने केले होते आणि त्याला सीमा ओलांडून, कृष्णेवर येऊ दिलं नव्हतं.

या सर्व घडामोडींमधे ८० साल उजाडायला आलं तेव्हा घडलं इंग्रजांविरुध्दचं हैदर-निजाम-मराठे यांच्यातील पहिलं युध्द. निजामाच्या सूचनेमुळे झालेल्या या युध्दाची, नाना फडणीसांच्या व्यूह रचनेची ही कमाल होती. वडगावचा अपमानास्पद तह गव्हर्नर जनरल हेस्टींगने झुगारला. राघोबाही सुरतेला इंग्रजांकडे पोचले. आपल्या एकट्याच्या हातून इंग्रजांना ताळयावर आणणं जमणार नाही हे पक्कं ओळखून नाना फडणीसांनी इंग्रजांविरुध्द निजाम-हैदर- नागपूरकर भोसले यांची जी एकजूट केली, त्यातून निर्माण झालं मराठे विरुध्द इंग्रजांचं १७८० सालचं युध्द. हे तिघेही आपापल्या कारणांसाठी इंग्रजांच्याविरुध्द नाखूष होते म्हणूनच तेही नानांच्या कारस्थानात सामील झाले. यावेळी महादजीबाबांनी सल्ला दिला की हैदरही आपल्याला सीमेवर त्रास देतोय, त्याला नंतर बघू. आधी आपण सगळे एकत्र येऊन इंग्रजांना ताळयावर आणू. त्याप्रमाणे नानांनी ज्या गुप्तपणे या तीनही सत्ताप्रमुखांशी संपर्क साधला आणि कारस्थान रचलं, त्याचा पत्ता खुद्द इंग्रजांच्या गुप्तहेरांनाही लागला नाही. इंग्रजांविरुध्दचं हे चौकडीचं युध्द भारतीय राजकारणात खूप गाजलं. इंग्रजांशी टक्कर घेणाऱ्या मराठ्यांचा दरारा सर्वत्र वाढला. सगळा दक्षिण भारत त्यात ढवळून निघालं. या कारस्थानात निजामाने शिकाकोलमधे, नागपूरकर भोसल्यांनी बंगालमधे हैदरअलीने चिन्नपट्टणमधे आणि मराठ्यांनी गुजरातमधे युध्दाचा भडका उडवायचं ठरलं. इंग्रजांची मिजास कमी करणं हाच यामागे हेतू

होता. पण इंग्रजी कपटनीतीला भोसले बळी ठरले. हेस्टींगने त्यांना सातारचं छत्रपतीपद देतो असं सांगितलं कारण तेव्हा रामराजे शेवटच्या घटका मोजत होते. नाना फडणींसांना ही बातमी कळताच त्यांनी घाईघाईने रामराजांना दत्तक घ्यायला लावला आणि भोसले हेस्टींगची फजिती झाली.

हैदरने मद्रासच्या इंग्रजांसमोर पोचून त्यांचा थरकाप उडवला. महादजी गुजरात मोहिमेवर पोचले तेव्हा अहमदाबाद हातून गेलं होतं.

इंग्रजांची फौज प्रचंड होती. तिच्यासमोर आपला निभाव लागणार नाही हे लक्षात आल्यावर महादजीबाबांनी एक खेळी केली. त्यांनी वकिलाबरोबर निरोप पाठवला की माझं आणि नानांचं पटत नाही. तुम्ही मदत कराल तर आपण पुण्यात जाऊ. माझ्याबरोबर राघोबांना द्या. पण गॉडर्डही १२ गावचं पाणी प्यायलेला होता. महादजीबाबा काहीतरी वेळ घालवत आहेत हे त्याने चाणाक्षपणे ताडलं. आणि तसंच होतं. महादजीबाबांनी सावंतवाडीहून फत्तेसिंग गायकवाडांच्या बंधूंना गोविंदरावांना आमंत्रण दिलं होतं. ते फौज घेऊन आले आणि भाऊ आला म्हटल्यावर फत्तेसिंगनाही शह बसला. मग बाबांनी बडोद्यावर हल्ला केला. माळवा-ग्वाल्हेर-भेलसे सर्वत्र महादजीबाबा इंग्रजांशी लढत होते. बाबांचा दिनक्रम त्यावेळी कसा होता याचं वर्णन आहे ते असं- दिवसभर आणि रात्री राऊत घेऊन घोड्यावरुन बाबा सडेच फिरतात. पहाटे पहाटे इंग्रजांनी कूच केल्याची बातमी आल्यावर २ तास ओढ्यावर जाऊन बसतात. इंग्रज आपल्यावर येणार नाहीत याची खात्री झाल्यावर घोड्यावरचं जिन उतरवून स्नान-भोजन उरकतात. संध्याकाळी रानात आडवाटेला बसतात. जिकडे इंग्रज जाईल त्याच्या मागे जातात. इंग्रजांकडे तोफा भारी त्यामुळे

बाबांना लढणं कठीण होतं. पण ते इंग्रजांना पुरुन उरले. सबंध भारतभर युध्दाचा भडका उडाला. आणि सगळीकडून इंग्रजांनी मार खाल्ला.

तिकडे वडगावच्या तहाने अपमानित झालेले इंग्रज आता सरळ पुण्यावर फौज घेऊन धडकायच्या निर्णयाला पोचले. हेस्टींगने पाटीलबाबांना नानांपासून फोडायचा प्रयत्न केला पण तो फसला. मुंबईच्या हॉर्नबीने लिहिलं, महादजी शिंदे अशी व्यक्ती आहे, की तिच्या स्नेहामुळे आपल्याला खूप फायदा होईल, आणि वैर जोडल्यास आपलं प्रचंड नुकसान होईल. गॉडर्ड फौज घेऊन मुंबईकडे निघाला. पुण्याला पोचण्याआधी कल्याण कोकण भाग जिंकावा या विचाराने तो कल्याण प्रातांत आला. त्याने वसई जिंकली आणि मग तेव्हापासून वसई, वज्रेश्वरी, बदलापूर, कुळगाव, कर्जत, हाजीमलंगचा डोंगर, या भागात मराठे इंग्रज हा मोठा झगडा सुरु झाला. पुण्याहून तुकोजी होळकर, मिरजेहून पटवर्धन, सगळ्या फौजा घाटाकडे चालायला लागल्या. गॉडर्ड मुंबईहून निघाला आणि खंडाळ्याला पोचला. त्याने तिथे तोफांच्या बंदोबस्तात तळ्याजवळ मुक्काम केला. २ महिने झाले तरी तो तिथून हटेना. तेव्हा त्याला बाहेर काढायला त्याची मुंबईहून येणारी रसद तोडायचं ठरवलं. मग चौकवरुन येणारी त्याची रसद तोडण्यासाठी बदलापूर भागात असलेलली मराठी फौज आणि पटवर्धन फौज कर्जतवरुन खोपोली रस्यावर आली. सर्वांनी मिळून इंग्रजांची सारी रसद लुटली. हजारो बैलजोड्या, डेरे राहुट्या, धान्य, चांदीची भांडी सगळं लुटलं. गॉडर्डकडे ही बातमी पोचली. आता त्याला पुणं गाठणं किती भयंकर दिव्य आहे ते कळलं आणि तो मुंबईला यायला खाली उतरायला लागला. त्याच्या पिछाडीवर मराठे आणि खोपोलीजवळ मराठे या चिमटीत

अडकल्यामुळे पनवेलपर्यंत पोचेपर्यंत त्याच्या फौजेने भरपूर मार खाल्ला. गॉडर्डनेही मार खाल्ल्यावर इंग्रजांची मिजास खूप उतरली. त्यामुळे सालबाईला महादजीबाबा आणि इंग्रजांमधे तह झाला. त्यावेळी हैदरअली नव्हते म्हणून नाना फडणीसांनीही सही केली नाही. डिसेंबर १७८२ मधे इंग्रजांशी युध्द चालू असतांना चित्तूरच्या छावणीत हैदरचं निधन झालं आणि मग नाना फडणीसांनी सालबाईच्या तहावर सही केली. आता मैसूरचा टिपू सुलतान सत्ताप्रमुख झाला.

सालबाईच्या तहानंतर इंग्रजांनी सुरतेला आश्रयाला असलेल्या राघोबादादांची जबाबदारी झटकली. त्यांना पुण्यास जाऊन राहायला सांगितलं. तेही दादांच्या उपद्व्यापांना कंटाळले होते. कारण दादांना मोहरा बनवायचं त्यांचं कारस्थान फुकट गेलं होतं आणि प्रतिष्ठाही गेली होती. नानांनाही आता दादा आपल्याच ताब्यात हवे होते. शेवटी नानांबरोबर दोन करार दादांनी केले. तुमच्याविषयी मनात अढी होती ती सोडून देतो, कपट करणार नाही. तुमच्याशी सरळपणे वागीन. राजकारण करणार नाही. दौलतीविरुध्द आचरण करणार नाही. एवढं लिहून दिल्यानंतर पश्चात्ताप झालेल राघोबादादा शरण आले. नाशिकला गोदातीरी राहायचं त्यांनी कबूल केलं. नाशिकला कोपरगावला मुक्कामाला आले. गोपिकाबाईंच्या मनाचं समाधान व्हावं म्हणून गोदा-दारणा संगमावर प्रायश्चित्त घेतलं. आणि ११ डिसेंबर १७८३ या दिवशी या खेळियाचा अंत झाला. त्यामुळे स्वराज्याचे हाल संपले. बाजीरावाचे पुत्र असूनही, अटकेपार दौडत जाणारा हा वीर शूर असूनही हलके कान, चंचल मन, आणि घटकेत भोळेपणा किंवा दुष्टपणा, यामुळे हा पुरुष वाया गेला. त्यांची ओंजळ मोठी होती पण त्यात राहील असा चंद्रच नव्हता. दादांची ओंजळ रिकामीच राहिली.

पेशवेपदासाठी अनेक प्रयत्न करुनही ते पद त्यांना मिळालं नाही हे त्यांचं दुर्दैवच ठरलं. खुनाचा ठपका मात्र माथी लागला. ध चा मा करणारं कोण हेही कधी कुणाला कळलं नाही. आनंदीबाई मात्र विनाकारण बदनाम झाल्या. दादांच्यानंतर आनंदीबाईही मग कोपरगावलाच राहिल्या. पण दोघांनी मिळून बापसे बेटा सवाई असे दुसरे बाजीराव आपल्या मागे ठेवले. सखारामबापू आणि दादा संपले.

यानंतर उत्तरेत पाटीलबाबा आणि तुकोजी होळकर राहिले. त्यातही अहिल्याबाई कारभार बघणार आणि तुकोजी लष्कर सांभाळणार यात होळकर शिंदे झगडा वाढत गेला. पण आता पाटीलबाबांच्या आयुष्यातील परमोच्च भाग्याचा काळ आला तो म्हणजे त्यांना मीरबक्षगिरी आणि वकील ई मुतलक हा किताब मिळाला.

## महाराजाधिराज उमराव अलिजाबहादर माधवराव शिंदे.

## वकील इ मुलक, मीरबक्षी

स्वराज्यातील लढाया संपल्यावर महादजीबाबांनी उत्तरेकडे आपलं लक्ष वळवलं. सालबाईचा इंग्रजांबरोबरचा तह पार पडला होता.

अलिगोहर ऊर्फ शाहआलम द्वितीय या बादशहाचा समर्थ वजीर नजफखान होता तोपर्यंत बादशहाची बाजू तो भक्कमपणे चालवत होता. उत्तरेकडून शीख, दक्षिणेकडून जाठ आणि पूर्वेकडून रोहिले या कमकुवत बादशहाचा मुलूख तोडत होते. त्यांच्याशी लढून मुलूख राखायचं काम नजफखान करत होता, पण तो १७८२ सालामधे वारला. तेव्हा बादशहाची

अवस्था अतिशय केविलवाणी झाली. बादशहा स्वत: असमर्थच होता. त्यामुळे मराठ्यांच्या मदतीशिवाय आपला निभाव लागणार नाही, आपल्याला वाचवणारं पाटीलबाबांशिवाय कुणीही नाही याची खात्री असल्यामुळे बादशहाने मराठ्यांचे वकील हिंगणे यांच्याकडे विनवणी केली होती. इंग्रजांशी आम्ही बिघाड केल्यावर, मराठ्यांचा आश्रय पक्का न राहिला तर आम्ही एकटे पडून त्यांचे काबूत जाऊ ते न करावे असं बादशाहा सतत मराठ्यांच्या वकिलांना सांगे.

१७८४ हे साल उजाडलं. हे साल मराठ्यांच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचं साल. दोन सामर्थ्यवान राज्यकर्त्यांच्या उलाढालींचं हे वर्ष होतं. पुण्यात बसून नाना फडणीसांनी निजामाच्या मदतीने टिपू सुलतानावरची स्वारी निश्चित केली आणि उत्तरेला पाटीलबाबांनी बादशहाचं राजकारण स्वीकारलं. या काळापर्यंत उत्तरेतील लढायांचं स्वरुप पार बदललं होतं. उत्तरेतील सर्वच लहान मोठ्या राज्यकर्त्यांनी पाश्चिमात्य कवायती फौजा आणि सेनापती पदरी ठेवले होते. गनिमीकाव्याचे दिवस संपले होते. याच वेळी भारतभर युध्द निर्माण करुन अशांतता निर्माण करणारा हेस्टींग परत गेला आणि त्याच्या जागी कॉर्नवॉलिस, गव्हर्नर जनरल म्हणून आला. त्यामुळे इंग्रजांची भारतातील राजनीतीही बदलली. अमेरिकन वसाहतीच्या युध्दात भाग घेतलेला कॉर्नवॉलिस शिपाई गडी असल्यामुळे भारतात येतांना त्याने मुलकी आणि लष्करी अधिकार आपल्याकडे मागून घेतले होते. पाटीलबाबांनी उत्तर हिंदुस्थानाचा कारभार हाती घेतल्याबरोबर आधी गोहद आणि ग्वाल्हेरचा किल्ला परत आपल्याकडे मिळवला. मग रोहिल्यांना आणि जाटांना पछाडलं.

आपला दरारा बसवल्यावर मग त्यांनी बादशहा शहाआलमची भेट घ्यायचं ठरवलं. १० नोव्हेंबर १७८४ या दिवशी बादशहा आग्र्याहून निघून फत्तेपूरसिक्रीजवळ आला. मथुरेहून पाटीलबाबा बादशहाच्या लष्करी छावणीजवळ पाव कोसावर, म्हणजे अर्ध्या मैलावर येऊन उतरले. बाबांनी बादशहासाठी खास शामियाना उभारला. त्यावेळचं वर्णन मराठ्यांना अभिमान वाटावं असंच आहे. त्यात लिहिलंय,

"बादशहा आले. बाबांनी त्यांना सन्मानाने सिंहासनावर बसवलं. त्यांच्या पायावर डोई ठेवली. १०१ मोहरा नजर केल्या. मग बादशहा शहाआलमने बाबांच्या पाठीवर बहुत ममतापुरस्सर हात ठेवून आज्ञा केली की जवळ बसा. त्याप्रमाणे बाबा बादशहाच्या जवळ बसले. नंतर बादशहाने सर्वांना खिलत-वस्त्रे वाटून सन्मान केला. त्यानंतर बादशहाशी बाबांची एकांतात खलबतं केली. बादशहाची जबाबदारी अंगावर घेतल्यावर बादशहाच्या लष्करासोबत आपली पलटणे बसवली. आता बाबांच्या परवानगीवाचून इकडून तिकडे आणि बादशहाकडेही कुणीही जावू शकत नाहीत. बादशहाची ४० हजार फौज विनातरवार, पादाक्रांत होऊन, जैसी पाण्यात माती विरुन जाते त्याप्रमाणे यवनाच्या फौजेची अवस्था झाली आहे. बादशहाने मग पाटीलबाबांना आज्ञा केली की सलतनतीचा कारभार करावा. त्यावर पाटीलबाबांनी विनंती केली की कोणत्याही पदाशिवाय कारभार कैसा होतो? त्यावर पातशहा बोलले की तुम्हाकडे पद सांगावे आणि वजीर व इंग्रजयांच्यावर दाब पडून सलतनतीचा बंदोबस्त व्हायला हवा. त्यास वकील इ मुतलखी आणि मीरबक्षगिरी ही दोन्ही पदे तुम्हास देतो. त्यावर पुण्याला पेशव्यांना लिहून

कळवतो आणि त्यांच्या परवानगीने पद घेतो असं पाटीलबाबांनी सांगितलं तेव्हा पातशहा बोलले की फौजेत आणि तोफखान्यात बखेडा खूप माजला आहे, पुण्याहून उत्तर येण्यास दिवसगत लागतील. सबब दोन्ही पदांची नायबतीची वस्त्रे तुम्हाला देतो.”

पाटीलबाबांनी ते कबूल केलं. मग वस्त्रे, कलगी, शिरपेच, कट्यार, नालकी म्हणजे दोन समांतर दांडे असलेली पालखी आणि पालखी म्हणजे एकच उंचवटा असलेला दांडा असलेली, नौबत नगारे, हत्तीघोडे हे सर्व राजशिष्टाचाराप्रमाणे दिलं. पाटीलबाबांच्या असामान्य कर्तृत्वाचा तो सन्मान होता. दिल्लीचं तख्त मिळवायचं हे बाजीराऊंनी एकेकाळी पाहिलेलं स्वप्न राणोजी शिंद्यांच्या सुपुत्राने वास्तवात आणलं होतं. बादशहाचं रक्षण करण्याचं भाग्य बाजीराऊंचा पणतू अनुभवत होता. मराठ्यांनी आपल्या पराक्रमाने दिल्ली जिंकली होती. बादशहाने महादजी शिंदेंना कारभार चालवण्यासाठी फारसी शिक्का करुन दिला. त्याचे मराठी अर्थाचे शब्द होते,

**महाराजाधिराज उमराव अलिजाबहाद्दर माधवरावजी शिंदे.**

आधीच्या औरंगजेब बादशहाच्या काळापर्यंत वजीर आणि सेनापती म्हणजे अलउमरा, अशी दोन वेगवेगळी पदे असत. आणि दोन वेगळे मंत्री असत. पण कमकुवत बादशहा आल्यावर दोन्ही पदे एकच झाली. मुलकी आणि लष्करी सर्वच कारभार एकहाती आल्यावर त्याला राजाचा प्रतिनिधी असं रुप म्हणजे व्हॉईसरॉयचे अधिकार. आजवर फक्त निजामउल्मुल्कला ही दोन्ही पदं वकील-इ-मुतलक या नावाने देण्यात आली होती. ते पद मिळवणारे महादजीबाबा दुसरे होते. केवढा सन्मान होता तो बाबांचा. पण पुण्याला ही

बातमी गेल्यावर नानांच्या बारीक, चिकित्सक नजरेत त्याची चिरफाड झाली. पाटीलबाबांनी मुख्य, वकील इ मुतलक आपल्याकडे घेऊन नायबपद पेशव्यांच्या नावाने घेतलं आणि पेशव्यांचा अपमान झाला असं त्यांना वाटलं. बाबा काय आणि नाना काय, दोघांनाही फारसी कळतच नव्हतं पण पत्रापत्री दोघांमधे खूप झाली. आणि शेवटी महादजीबाबांनी हा सर्व सन्मान, खिलत पुण्याला न पाठवता उज्जयनीला आपल्या घरी ठेवली. १७९२ मधे ७ वर्षांनी, पाटीलबाबांनी पुण्याला ती समारंभपूर्वक पेशवे सवाई माधवरावांना दिली.

दिल्लीचा बादशहा आणि त्याचा कारभार हाती आल्यावर पाटीलबाबा कामाला लागले. बादशाच्या मोठ्या मोठ्या जहागिरी खाऊन त्याला फौजेची मदत न करणारे खूप होते. आधी त्यांना राज्य चालवायला आजवर सर्वांनी दाबून ठेवलेली बादशहाला द्यायची देणी वसूल करायची होती. त्यात राजपूत, जाट, मुसलमान सगळेच होते. बाबांना आग्रा जिंकायचं होतं. या सर्वांना चिथावायला इंग्रज होतेच. पण प्रत्यक्षात इंग्रजांनी पाटीलबाबांशी कुरापत काढून भांडण अंगावर घेतलं नाही इतकी पाटीलबाबांची ताकद इंग्रज ओळखून होते. या सर्वांना वठणीवर आणण्यासाठी भक्कम फौजेची गरज होती. लगेच बाबांनी फ्रेंच सेनानी डी बायॉला सेनापती करुन कवायती पलटणे उभारली. बाबांनी हे वसूलीचं उग्र रुप धारण केल्यावर शत्रू तर निर्माण होणारच होते. आणि वसूली करुन दाखवली तरच पाटीलबाबांचा वचक राहणार होता. त्याप्रमाणे त्यांचा पहिला सामना झाला तो राघवगडबरोबर. मग रामगडची मोहीम झाली. त्या दोन्ही यशस्वी झाल्या. गोहदकर जाट राजा छत्रसालला शरण आणलं आणि ग्वाल्हेरचा किल्ला पाटीलबाबांनी जिंकून घेतला.

नंतर घडलं ते लालसोटवरचं महायुध्द. हे युध्द जास्त गाजलं. लालसोट हे जयपूरपासून ३० मैलांवरचं ठिकाण. पाटीलबाबांनी जयपूरच्या प्रतापसिंग राण्याकडून मागील बाकी आणि चालू खंडणी मिळून ३.५० कोटी रुपयांची मागणी केली. राण्याने ते नाकबूल करताच मध्यस्थातर्फे ६३ लाखांवर ही मागणी कबूल झाली. तेही मिळाले नाहीत तेव्हा बाबांनी सरळ हल्ले करुन मुलूख हाती घेतला तेव्हा सगळे रजपूत एक झाले आणि बाबांचा द्वेष करायला लागले.जोधपूरचा बिजासिंग आणि जयपूरचे राजे पाटीलबाबांच्याविरुध्द एकत्र आले. तेव्हा जयपूरावर स्वारी करण्याचा मुहूर्त करुन फेब्रुवारी १७८७ मधे पाटीलबाबा जयपूराहून ७ कोसांवर मोती टेकडीजवळ तळ करुन राहिले. २८ जुलैला युध्दाला सुरुवात झाली. बाबांची पलटणे, तोफा सर्व चांगलं असूनही बाबांची फौज मार खायला लागली. हे अघटित होतं. पाटीलबाबांनी तोफा चालू केल्या तर त्याचे गोळे शत्रूपर्यंत पोचलेच नाहीत. कारण गोलंदाज मुद्दाम लहान पल्ल्याच्या तोफा चालवत होते. त्यामुळे समोरची फौज हलेचना. हे असं का होतंय हे बाबांच्या सेनाधिकाऱ्यांनाही कळेना. शिवाय कवायती फौज पगारासाठी नेमकी तेव्हाच हटून बसली. त्या कवायती पलटणींचा तो दोष होता. त्यांना वेळेवर पगार द्यावाच लागे नाहीतर त्या निघून जात. भारतीय फौजांचा तो त्रास नसे. पगार मिळाला नाही म्हणून बाबांची पलटणे १२५ तोफा आणि ७००० बंदूकवाले घेऊन निघून जायला लागली. तेव्हा जयपूरकरांनी त्यांना पैसा देऊन लगेच आपल्या सेवेत घेतलं. त्यामुळे युध्दाची दिशा बदलली. आपल्या फौजेचं प्रचंड नुकसान होतंय हे पाहिल्याबरोबर पाटीलबाबांनी लगेच निर्णय घेतला आणि दुसरं पानिपत घडण्याआधीच ते माघारे फिरले. सर्व फौज तळावर आली. मग बाबांनी चौकशी केली त्यात पलटणींमधे फितूर झालेलं त्यांना

कळलं आणि हे सर्व दोन महिने आधीपासून चालू झालं होतं. लालसोट संग्रमामुळे बाबांना मनस्ताप झाला. पाटीलबाबांनी पुण्याहून फौज मागवली. त्यांची पत्रे मिळाल्याबरोबर पुण्याहून फौजेची मदत हवी होती ती नाना फडणींसांनी ताबडतोब पूर्ण केली आणि तुकोजी होळकर आणि मस्तानचा नातू अलिबहाद्दर यांना बाबांकडे पाठवलं. पण दोघेही बाबांजवळ ताबडतोब पोचलेच नाहीत. बाबांचा त्यांनी अंतच पाहिला. त्यात तुकोजी ईर्षा, मत्सर, यामुळे जाणून बुजून गेले नाहीत आणि अलिबहाद्दरला आपल्याकडे अडकवून ठेवून त्यालाही जाऊ दिलं नाही. ही जोडी फुटणं हेही स्वराज्याच्या घसरणीला कारण ठरलं. पण पाटीलबाबा खंबीर होते. त्यांनी उज्जयनीहून आपली फौज आणि घरातील चांदी आणली. ती मोडून त्याचे रुपये पाडले आणि सैनिकांचा पगार वाटला.

ह्या लालसोटच्या बाबांच्या पिछेहाटीनंतर गुलाम कादिर माजला. ह्याने इस्माईल बेग आणि जयपूर आणि जोधपूरच्या बिजासिंग राजांशी हातमिळवणी करुन बाबांचा पाडाव करण्याचं कारस्थान रचलं. त्यांना सामील झाला तो खुद्द बादशहाचा शहजादा जवानबख्त. पण फौज सांभाळायला लागणारा पैसा या कुणाकडेच नव्हता. शिवाय या लोकांनी बाबांच्या विरुध्द अफगाणिस्तानमधून तैमूरशहाची मदत मागितली. पण तो आला नाही. असं करुन पाटीलबाबांवर फार मोठं काळकुट्ट वादळ घोंघावू लागलं. पण पाटीलबाबा स्वस्थ बसले नव्हते. त्यांची हिंमतही जबरदस्त होती. आजवरच्या आयुष्यात घाबरलो हा शब्द त्यांच्या तोंडून कधीही निघाला नव्हता. ते चंबळवर येऊन थांबले. इस्माईलबेग आग्रा जिंकायचा प्रयत्न करतोय हे पाहून पाटीलबाबांनी डी बायॉं,

लखबाबादादा, राणेखानभाई, जिवाजी बल्लाळ, देवजी गौळी या साऱ्यांना आग्र्यावर पाठवलं. हे सर्वजण अतिशय पराक्रमी आणि बाबांना साथ देणारे साथीदार होते. चकसान गावाजवळ दोन्ही फौजा भिडल्या. गुलाम कादिरचा फन्ना उडाला. बाबांनी आग्रा जिंकलं. आग्र्याची लढाई भीषण झाली. गुलाम कादीरचे कित्येक सैनिक लढतांना मेले, २ हजार प्यादी यमुनेत बुडून मेली. पाटीलबाबांनी शीखांशी हातमिळवणी केली होती. त्यांनी रोहिलखंडात दंगा मांडला आणि गुलाम कादिरला रोहिलखंडात शिरायला भाग पाडलं. या युध्दात प्रचंड नुकसान झालेला गुलाम कादिर फौज घेऊन यमुनापार करुन रोहिला खंडात शिरला. इस्माईलबेगही पळून गेला. पाटीलबाबांची दहशत पुऱ्या उत्तर हिंदुस्थानात बसली. आता एक मोठा शत्रू संपवायचा होता तो म्हणजे गुलाम कादिर. आणि इस्माईल बेग. बाबा आता गुलाम कादिरच्या मागे लागले.

मुळात बादशहाचीच आर्थिक परिस्थिती कठीण होती. त्याच्या खजिन्यात पैसाच नव्हता. पाटीलबाबा अपुऱ्या पैशाअभावी फौज घेऊन लढत असतांना पुण्यातल्या सरदार, मुत्सद्दी आणि नानांना मात्र पाटीलबाबांच्याकडे सोन्याचा धूर निघत असेल असं वाटत होतं. याला एक कारण होतं. बाजीराव चिमाजीआपा आणि त्यांच्या साथीदारांनी उत्तरेचं राजकारण हाती घेतलं. पण नंतर नानासाहेब पेशव्यांच्या काळात होळकर शिंदे उत्तरेत भक्कमपणे उभे असल्याने नानासाहेब पेशव्याने आपली नजर दक्षिणेच्या राजकारणाकडे वळवली. एकटे सदाशीवभाऊंनी दिल्ली आणि तिथल्या राजकारणाचा अनुभव घेतला होता. पण त्यामुळे उत्तरेत न गेलेल्या रास्ते, पेठे, पटवर्धन, अशा नव्याने पुढे आलेल्या सरदारांनी दिल्ली, बादशहा हे राजकारण पाहिलंच नव्हतं.

पाटीलबाबा मात्र बादशहा, मुघल, मुसलमान यांच्यातच राहिले होते. त्यांना दक्षिणही माहीत होती आणि उत्तरेतील राजकारणही. आता गुलाम कादिरने जो प्रचंड हैदोस घातला त्याचा अनुभव त्यांना घ्यायचा होता.

## महादजी शिंदे

## गुलाम कादिर

जगाच्या इतिहासात घडलं नसेल इतकं क्रूर दु:ख दिल्लीच्या मुघल बादशहाने त्याच्याच धर्माच्या दुष्टाकडून भोगलं. गुलाम कादिर त्याचं नाव.त्याला फक्त सत्ता हवी होती. बादशहाची सुरक्षा महादजी बाबांच्या हाती असल्यामुळे तेच कादिरचा मोठा अडथळा होते. दिल्लीवर ताबा मिळवण्यासाठी आग्र्याची, चकसानची झुंज त्याला राणेखानभाई, अंबूजी इंगळे, यांच्याबरोबर करावी लागली. बादशहाचा जवानबख्त हा शहजादाही कादिर आणि इस्माईलबेगला सामील झाला होता. बादशहाचे शत्रू, जयपूरचे रजपूतही कादिरला सामील होते. त्यांच्याकडून कादिरला फौजेची मदत मिळण्याचा धोका होता. बाबांशी सामना झेपेना, यश येईना तेव्हा गुलाम कादिरने राजवाड्यातील खोजा नाझिर याला आपल्याकडे वळवून घेतलं. तो राजवाड्यातील बारीकसारीक बातम्या कादिरला देऊ लागला. नाझिरने वाड्यातही फितूर पसरवला. गुलाम कादिर आणि इस्माईलबेगने बादशहाचे जे हाल केले त्याची ही अंगावर काटा आणणारी कहाणी. मुघलांच्या ३०० वर्षांच्या इतिहासात खुद्द मुघलांनी आणि त्यांच्या शत्रूंनीही असे हाल केले नव्हते.

राणेखानभाईंनी कादिर आणि बेगला पार यमुनेपार घालवलं तेव्हा दोघांनी ६००० फौज घेऊन दिल्ली गाठली. तुर्कमान दरवाजाबाहेर त्यांनी तळ ठोकला. आणि मग थेट दिल्लीवर हल्ला केला. २९ जुलैला कादिर राजवाड्यात आला. बादशाहाला निरोप पाठवला की किल्ल्याचा ताबा आमच्याकडे दे आणि फौजेच्या देण्यासाठी पैसा दे. बादशहाने लाचारीने ते मान्य केलं. मग कादिर आणि बेग राजवाड्यात पोचले. त्यांनी बादशहाला घेरुन ठेवलं. आपल्याजवळ पैसा नाही हे बादशहाने जीव तोडून सांगितलं तरी ३१ जुलैला त्याला आणि शाहजादांना कैद करुन मशिदीत ठेवलं. तेव्हा दोघे बादशहाच्या दिवाणखान्यात पोचले. बादशहाला घेरुन ठेवलं. आपल्याजवळ पैसा नाही असं जीव तोडून बादशहाने त्याला सांगितलं. तरीही १ ऑगस्टला महंमदशहाचा नातू बेदरशहा याला गादीवर बसवलं. नंतर दोघे सर्व महालांमधून धन गोळा करायला लागले. तेव्हा गुलाम कादीरने इस्माईल बेगला सर्व बेगमांचेही झाडे घ्यायला सांगितलं. पण इस्माईल बेग म्हणाला की हे होणार नाही. आजवर कधी असं झालं नाही. त्यावर दोघांची वादावादी झाल्यावर इस्माईलबेग किल्ल्याबाहेर निघून गेला. मग गुलाम कादिरने मलकाजमानी बेगम आणि साहेबमहल बेगमकडे पैसे मागितले तेव्हा त्यांनी १२ लाख देण्याचं कबूल केलं. नंतर एक दिवस गुलाम कादिरने शहजादे आणि बेगमांना गच्चीत उन्हात उभं केलं. १२ तास त्यांना पाणी पिऊ दिलं नाही. त्यांना बेदम मारहाण केली. आणि यांच्याकडून मिळेल तेवढा पैका काढला. मलकाजमानीने होतं नव्हतं ते सारं दिलं. १४ उंट भरुन पैसा निघाला तो कादिरने त्याच्या आईकडे घोसगडला पाठवला. शहरातील श्रीमंतांच्या घरातही खणत्या लावून भरपूर धन बाहेर काढून नेलं. दुसरे दिवशी सीतलदास नावाचा बादशहाचा खासगीचा

नोकर होता, त्याच्याकडून निरोप पाठवला की आम्ही मराठ्यांचा समाचार घेऊन येतो, त्यासाठी पैसा द्या. बादशहा म्हणाला की माझ्याकडे कवडीही नाही. मग गुलाम कादीरने सर्व राजवाडा पोखरुन काढला. राजवाड्याची सगळी वाताहात, नासधूस करुन टाकली. गुलाम कादीरमधे सैतान शिरला होता. त्याच्या फौजेने अत्याचाराचा लुटालुटीचा कळस गाठला.

दुसरे दिवशी परत बंडखोर राजवाड्यात घुसले. बादशहाला घेराव घालून त्याला सिंहासनावर बसवलं. दरबारातील राजपुत्रांना जनानखान्यात हाकललं. आणि बादशहाला गुलाम कादर म्हणाला की आता सिंहासनावरुन उतरा. तेव्हा बादशहाने आधी माझ्या पोटात खंजीर खुपसून माझा प्राण घे मग काय ते कर असं दुरुत्तर केलं म्हणून गुलाम कादीर त्याला मारायला धावला, तेवढ्यात बादशहाचा खोजा नाझीर पुढे धावला आणि त्याने बादशहाला खाली उतरायला लावलं. पुढे एक दिवस सर्व राजपुत्रांना दरबारात आणून आपल्यासमोर उभं केलं आणि त्यांना नाचायला लावलं. आपण स्वत: हुक्का ओढत समोर बसला. मग म्हाताऱ्या बादशहाला समोर आणून पैसा त्याकुठे आहे ते दाखव म्हणायला लागला. बादशहाला पुरलेलं द्रव्य माहीत असावं असं गुलाम कादिरला वाटलं. बादशहाला माहीत नाही हे कळल्याबरोबर गुलामाने तख्तावर उडी मारुन बादशहाला खाली पाडलं, त्याला चाबकाचे फटके मारले आणि त्याच्या छातीवर बसून त्याचे डोळे काढले. बादशहाचे सर्व नातेवाईक आक्रोश करत असतांना बादशहाला फरफटत नेऊन कैदेत टाकलं. तख्ताचा एवढा अपमान, आजवर मुघलांच्या शत्रूंनीही केला नव्हता. कोंडून ठेवलेल्या लोकांमधली अनेक मुलं अन्नपाण्यावाचून तडफडून मेली. त्या सर्वांना तिथल्या

तिथे गाडण्याचा हुकूम कादिरने दिला. हा सर्व प्रकार २७ जुलै ते २ ऑक्टोबर एवढ्या कालात झाला कारण त्या दिवसात किल्ला गुलाम कादिरकडे होता. दिल्लीत ह्या बातम्या पसरल्या आणि आपल्या हजरतांना अशी वागणूक मिळाल्यावर हाहा:कार माजला. गुलाम कादिरने तमाम तोफखानाही लुटला. शहरातही धाक, लूट केलीच होती.

महादजीबाबा तेव्हा मथुरेत होते. त्यांच्या कानावर बातम्या गेल्या. तेव्हा लगेच त्यांनी पलटणे पाठवली. गुलाम कादिर आपल्या धन्याशी इतक्या पराकोटीचं खुनशी वर्तन करेल असा कुणालाच अंदाजही नव्हता. राणेखानभाई, अंबूजी इंगळे, जीवबा बक्षी सारे रवाना दिल्लीकडे रवाना झाले. दिल्ली शहराभोवती त्यांनी वेढा घातला. यावेळी इस्माईल बेग आणि कादिरमधे सडकून वाकडं आलं. बेगला हा अमानुष प्रकार मानवला नाही. बाबांची फौज आल्यावर गुलाम कादिरने अंध बादशहा सोडून इतर १९ शहजादे आपल्याबरोबर घेऊन यमुना ओलांडली आणि घोसगडकडे जाऊ लागला. राजवाड्याच्या मागच्या दाराने तो यमुनेत उतरला. जातांना ज्या नाझीरने दगाबाजी केली त्याला ठार केलं. गुलाम कादिर पळाला ही बातमी आल्यावर मग बाबांची फौज घोसगडकडे कादिरच्या मागावर निघाली. गुलाम कादीरास जिवंत पकडून आणण्याची सक्ती सरदारांवर बाबांनी केली. कादिरच्या माणसांनी १५ दिवस दिल्लीचा किल्ला लढवला आणि नंतर गुलाम कादिरने दिलेल्या हुकूमाप्रमाणे सारा राजवाडा जाळून राख करुन टाकला. दारुची कोठारं पेटवली. त्यात कित्येक मेले. मग सर्व बाहेर पडले.

पाटीलबाबा तेव्हा खूप अडचणीत होते. पाटीलबाबांच्या मदतीसाठी पुण्याहून निघालेले अलिबहाद्दर आणि तुकोजी होळकर दिल्लीत पोचलेच नव्हते. सावकार कर्ज द्यायला तयार नव्हते. फौज पगाराशिवाय लढायला तयार नव्हती. त्यामुळे बाबांची ताकदही कमी होती. इकडे गुलाम कादिर घोसगडकडे जात असतांना मधल्या हिंडण नावाच्या नदीला मोठा पूर आला. त्याचा फायदा कादीरला झाला. त्याच्यामधे आणि मराठी फौजांमधे अंतर पडलं. शेवटी गुलाम कादीर मेरटमधे सापडला. बाबांच्या फौजेने त्याला तिथे कोंडून ठेवला. तेव्हा तिथेही गुलाम कादिर अंधाराचा फायदा घेऊन, आपली माणसे घेऊन बाहेर पळाला. जीवाजी बक्षींनी त्याचा पाठलाग चालवला. मेरठपासून २० कोसांवर-४० मैलावर शामली नावाचं गाव आहे. तिथे घोड्यावरुन उतरला आणि एका बोळात लपून बसला. तिथून थोड्या वेळाने निघाला आणि २ कोसांवर एका ब्राह्मणाच्या घरी गेला. आपलं नाव सांगून त्याच्याकडे दोन तट्टू मागितले, त्याबदल्यात तुला हवं ते देईन म्हणाला. तेव्हा त्या ब्राह्मणाने गुलाम कादिरला सांगितलं की बाहेर फौजा फिरत आहेत, म्हणून तू इथे स्वस्थ राहा. एकदोन दिवसात सगळे गेले की तुला तट्टू देईन. त्याला खोलीत बंद करुन लगेच ब्राह्मण राणेखानभाईंकडे आला आणि सगळं त्यांना सांगितलं. भाईंच्या फौजेने गुलाम कादीरला कैद केलं. ३१ डिसेंबरला मथुरेला महादजीबाबांकडे त्याला आणलं. बाबांनी त्याला कैदेत ठेवलं. १ मार्चला त्याला उंटावर बसवून सर्व छावणीत फिरवलं. मग नाक-कान-हात असे एकेक अवयव तोडत, ३ मार्चला मारुन टाकलं. त्याची ४ हजार फौजही कापून काढली. गुलाम कादिराचे डोळे काढून बादशहाकडे पाठवले. त्याची सर्व दौलत जप्त केली. हे प्रकरण संपेपर्यंत अलिबहाद्दर पाटीलबाबांजवळ पोचला होता.

दिल्ली आणि बादशहा यांच्या संरक्षणाची जबाबदारी पाटीलबाबांनी पूर्ण केली. मार्च १७८९ मधे गुलाम कादिर या राक्षसाचा शेवट झाला. त्याच उन्हाळयात महादजीबाबा एका विलक्षण आजारपणात अडकले. बरेच दिवस अशक्तपणामुळे अंथरुणाला खिळून राहिले. सर्व औषधी उपाय झाले तरी गुण येईना तेव्हा ज्योतिषांना पत्रिका दाखवली. त्यांनी हा शरीर रोग नसून कुणीतरी करणी केली आहे असं सांगितलं. मग तंत्र-मंत्र दानधर्म-पूजा अर्चा असे उपाय सुरु झाले. सगळीकडे तपास केल्यावर जयपूरच्या राजाने बाबांना दुखणं यावं म्हणून अनुष्ठान घातलं आहे असं समजलं. तेव्हा शिवाजी विठ्ठल याला बारकाईने चौकशी करायला सांगितलं. त्यात वृंदावनामधील एका बाईची माहिती उघड झाली. तिला पकडून आणलं. भरपूर चोप खाल्ल्यावर आणि दात पाडल्यावर तिने हिंमतगीर गोसावीचं नाव घेतलं. पाटील बाबांनी हिंमतगीरला शिक्षा करण्याचं काम अलिबहाद्दरवर सोपवलं. अलिबहाद्दरने गोसाव्याला अटक करुन कडक शिक्षा न देता, नुसतंच कैदेत टाकलं.

बाबांना पुण्याला यायचं होतं. पण या गोसाव्याने प्रचंड राजकारण तापवलं. पाटणच्या लढाईत बाबा परत गुंतले. जयपूर आणि जोधपूर, इस्माईलबेग, यांना नरम करण्यामुळे १७९० साल बाबांसाठी फार महत्त्वाचं ठरलं. अलिबहाद्दरकडे हिंमतगीर गोसावी असल्यामुळे, रजपूतांना पाटीलबाबांच्या हालचाली कळत होत्या. शिवाय जयपूरचे व्यापारी आणि बजाज म्हणजे कापडांचे व्यापारी, बाबांच्या जवळ होते. त्यांच्या या इंग्रजी शिलेदारांमुळे रजपूतांनी बाबांवर एक मारेकरी पाठवला पण तो पकडला गेला. बाबांनी जयपूरवाल्याकडून १५ लाख खंडणी वसूल केली. शिवाय तैमूर

दुराणीशी तह करुन पुढचे हल्ले वाचवले. त्यामुळे पाटीलबाबांना आता फक्त दोनच शत्रू राहिले. इस्माईल बेग आणि बिजासिंग. बाबांनी आता बिजासिंगशी लढाई निश्चित केली. हे युध्द जयपूरच्या उत्तरेला पाटण, नारनोळ, कानोड या गावात झाली. २४ मे या दिवशी दोन लढाया झाल्या. त्यात बाबांना अपूर्व यश मिळालं. बिजासिंग या मानहानीमुळे आत्महत्या करणार होता पण त्याच्या राणीने त्याला वाचवलं. इस्माईल बेग पळून गेला. हा पराभव सहन न झाल्यामुळे मेडतवर पटील बाबांवर ह झाला. मग राजपूत शरण आले. बाबांचा प्रभाव त्यांनी मान्य केला. पुढच्या स्वारीमधे बाबांनी चितोड जिंकलं

या सगळ्या धकाधकीत १७९१ साल उजाडलं. या वर्षातील सर्वात वाईट घटना म्हणजे राणेखान भाई यांचं निधन झालं. आता बाबांना पुण्याला जायचे वेध लागले होते. बादशहाची घडी बसवतांना आजवर हिंदुस्थानात त्यांनी बरेच कष्ट उपसले होते. त्यांना आता स्वदेश बघायचा होता, पेशव्यांना बघायचं होतं, जुन्या सहकाऱ्यांना भेटायचं होतं. नानांशी बोलायचं होतं..

## महादजी शिंदे - पुण्यात मुक्काम

उत्तर हिंदुस्थानातील कारभाराची घडी बसवून पाटीलबाबा पुण्याला यायला निघाले. उज्जयनीला २ आठवडे राहिले. तिथला कारभार मार्गी लावून पानीच्या घाटाने नर्मदा उतरले. मात्र अहिल्याबाईंची भेट त्यांनी घेतली नाही. नर्मदेच्या दक्षिणेस नेमावर प्रांत शिंदे-होळकरांचा सामाईकीतील मुलूख होता. बाजीरावांच्या काळापासून या जोडीने मुलूख जिंकायचा. खंडणी पुण्याच्या खजिन्यात पाठवायची आणि मुलूख वाटून घ्यायचा अशी शिस्त होती. पण या

मुलूख वाटणीवरुनच शिंदे -होळकरांमधे भांडणं सुरु व्हायला लागली. मल्हाररावांच्या नंतर अहिल्याबाई कारभारी बनल्या आणि तुकोजी होळकर लष्कर सांभाळायला लागले, अशी वाटणी झाल्यापासून ते वाढतच गेलं आणि द्वेषभाव निर्माण झाला होता. नेमावर प्रांतात सत्वास नावाची जागा खूप दिवस ओसाड पडली होती. तिथे अहिल्याबाईंनी आपलं ठाणं बसवलं आणि महादजींना त्यातला भाग दिला नाही. महादजीबाबांनी यावेळी ती जागा बळकावली. त्याच्या जागी दुसरी जागा दिली. त्यामुळे अहिल्याबाईंनी संतापून त्यांना शाप दिला अशी आख्यायिका आहे. त्यानंतर बाबा बऱ्हाणपूर-पैठणवरुन बीडला आले. तिथे आपल्या मनसूरशहा गुरुचं दर्शन घेतलं. तिथून तुळजापूराकडे निघाले. वाटेत त्यांची पत्नी आजारी पडली आणि वारली. तुळजापूराला पोचल्यावर देवीचे नवस फेडले. तिथेच त्यांनी तिथली भोपे घराण्यातील मुलीशी लग्न केलं आणि जांबगावास आले. यावेळी बाबांचं वय ६५ वर्षांच्या जवळपास होतं आणि दौलतरावांचं ही लग्न लावलं. दौलतराव होते फक्त १२ वर्षे. त्याकाळात मुलगे याच वयाचे असत आणि मुली ८ वर्षांच्या जवळपासच्या असत. दोघांची लग्ने झाली. आणि नवऱ्या होत्या ९ वर्षांच्या. दोन्ही लग्ने उरकून पाटीलबाबा पुण्यास पोचले आणि संगमावर उतरले. १२ जून ते १७९२ ते १२ फेब्रुवारी १७९४ अशी दोन वर्षे ते पुण्याला राहिले. १२ वर्षांनी ते पुणं पाहात होते. एकतर बादशहाची व्यवस्था लावणं, स्वराज्यासाठी बंदोबस्त आखणं यात ते सतत व्यस्त होते. पेशवा हा हुकूमाचा एक्का आणि सर्व कारभार नानांच्या हाती होता. दक्षिणेतील कारभार नानांच्या हाती आणि उत्तरेचा पाटीलबाबांच्या हाती अशी वाटणी झालीच होती. याचवेळी मराठे निजाम आणि इंग्रजांनी मिळून टिपू सुलतानाचा पराभव केला होता. पाटीलबाबा

आपली फौज घेऊन पुण्याकडे निघाले आहेत हे कळल्यावर पुण्यात शंकेचं वातावरण तयार झालं. पाटीलबाबा फौजेच्या जोरावर कारभारच ताब्यात घेतील अशी भीती नाना फडणीसांना वाटली म्हणून त्यांनी सेनापती कॉर्नवॉलिस याची पलटण नानांनी पुण्यात राहायला मागवली. पण महादजी शिंदे पुण्यात येत आहेत हे कळल्यावर कॉर्नवॉलिसने आपली कवायती फौज पुण्याला पाठवली नाही.

तिकडे पाटीलबाबांना इंग्रजांच्या हाती दक्षिण भारत जाऊ लागलेला दिसत होता, त्याला आवर घालणं महत्त्वाचं होतं. पहिल्या युध्दाप्रमाणे, निजाम-भोसले- पुणे यांनी परत एकदा एकत्र होऊन इंग्रजांना संपवायचा बाबांचा मानस होता. म्हणून ते नागपूरला गेले पण बाबांना घाबरुन भोसल्यांनी निरोप पाठवला की पेशव्यांशी बोला, त्याला आमची सहमती आहे. महादजीबाबांबरोबर आलेली त्यांची पलटणं पाहून पुण्यातील दरबारी तर घाबरुन गेले. नाना फडणीस आणि महादजीबाबांमधे सत्तासंघर्षाची त्यांना शक्यता वाटायला लागली. पुण्याचा कारभार स्वत:कडे घेण्याचा बाबांचा हेतू आहे की काय, याबद्दल महादजीबाबांचा मनातला हेतूही कुणाला कळेना. आपली पलटणे पाहून नानांनी इंग्रजी फौज मागितली आहे हे कळल्यावर बाबांनी थोडंच लष्कर बरोबर आणलं. महादजी शिंदे पुण्यात येणार हे कळल्याबरोबर इंग्रज-भोसले-नाना फडणीस-निजाम- वगैरे सर्वांच्या गोटात तर्क-कुतर्क सुरु झाले ते केवळ आजवर उत्तरेत त्यांनी जो दरारा इंग्रज आणि बादशहाच्यावर निर्माण केला होता त्याचा परिणाम होता. महादजीबाबांच्या कानावर या सगळ्या गोष्टी आल्या

तेव्हा पुणं ताब्यात घ्यायचा त्यांचा विचारच नसल्यामुळे त्यांनी बरीचशी फौज परत पाठवली.

महादजीबाबा पुण्यात आल्यावर तर नानांचे जे विरोधी होते, त्यांच्या तक्रारींचा पाऊस पडायला लागला. सगळं पुणं जिकडे तिकडे हेरांनी भरलं होतं. नानांविरुध्द बोलायची कुणाला छाती होत नव्हती इतका त्यांचा दरारा होता. पाटीलबाबा रोजच्या रोज दरबारात यायला लागले. रोजच्या रोज पुणे दरबारात बाबांनी आरोप करायचा आणि कारभारी आणि नानांनी त्याचे जबाब द्यायचे अशी अवस्था झाली ती बाहेर कळायला लागली. तुकोजी होळकरांचं आणि अलिबहाद्दर यांचं आपल्या मदतीला न येणं हे वागणं नानांमुळे घडलं असं बाबांनी स्पष्ट आरोप केला, त्याला उत्तर देतांना नानांची त्रेधा उडाली. या पुण्याच्या भेटीत पेशव्यांचा अंदाज घ्यायचा, जमलं तर पुण्याचा कारभार घ्यायचा हा हेतू पाटीलबाबांचा होताच. टिपूला संपवण्यात नानांनी इंग्रजांची मदत घेतली हे महादजीबाबांना पसंत पडलं नव्हतं. पण टिपू सुलतानाने नरगुंदकर भावे, पटवर्धन घराण्यांवर जे अत्याचार केले होते ते नाना फडणीसांनाच फेडायचे होते. टिपूला आवरणं महत्त्वाचं होतं. म्हणूनच नाना फडणीसांनी निजामाशी गुप्त करार केला होता की इंग्रजांच्या मदतीने टिपू सुलतानाची रग जिरवायची पण त्याला संपवायचं नाही. पाटीलबाबा पुण्यात आले आणि कारभारात लक्ष घालायला लागले, तेव्हा अनेकांचे अन्याय त्यांनी दूर केले. त्याचंच एक उदाहरण म्हणजे भोर संस्थानचे सचिव वयाने लहान होते म्हणून नानांनी आपला एक माणूस तिथे ठेवला. पण तो बाजी इतका माजला की त्याने शंकराजी सचिव यांना छळायला कमी केलं नाही. तेव्हा सचिवांची

माणसं बाबांकडे मदतीला गेली. आणि बाबांनीही नानांना जाब विचारुन सचिव प्रकरण नानांच्या हातून सोडवलं.

या सर्व परिस्थितीतून बादशहाने दिलेली पदे श्रीमंतांनी स्वीकारावी की नाहीत यावर दरबारात खल झाला आणि शेवटी ती स्वीकारायचं ठरलं कारण त्यामुळे दिल्लीच्या बादशहाचा रक्षणकर्ता पेशवा आहे हे जगाला कळणार होतं. त्यासाठी सातारहून परवानगी मागितली. १४ जूनला महादजीबाबा पुण्यात सरकारवाड्यात आले. मीरबक्षगिरीचा सन्मान घ्यावा अशी पेशव्यांना विनंती केली. त्याला होकार दिला. मग २२ जूनला हा भव्य सोहाळा पार पडला. त्यासाठी गारपिरावर खास शामियाना उभारला. श्रीमंत पेशवे संध्याकाळी डेऱ्यात आले. त्यांच्याबरोबर झाडून सारे दरबारी मुत्सद्दी आले. श्रीमंत अंबारीतून उतरुन डेऱ्यात गेले. मग मुन्शींनी बादशाही फर्मान वाचलं. त्यात लिहिलं होतं की गुलाम कादिरने बेअदबी केली, त्याचा शिंदे यांनी बंदोबस्त केला. याकरिता मीरबक्ष हे पद पुस्तदरपुस्त दिले आहे. मीरबक्ष हे पद म्हणजे साऱ्या लष्कराच्या कारभाराचं प्रमुखपण. नंतर श्रीमंतांनी बादशहाने पाठवलेला पोशाख घातला. मग मसनदीवर बसले. नंतर आणखी दो फर्माने- एक बहुमानाचं आणि दुसरं गोवधबंदीचं, ती पारसनीसांनी वाचली. पाटीलबाबांनी बादशहाकडून गोवध बंदीचा हुकूम काढवला होता. तोही पारसनीसांनी वाचला. मूळ शब्द आहे फर्शनवीस म्हणजे फारसी वाचणारा. त्यात महाराजाधिराज राव पंडित सवाई माधवराव बहादूर येणेप्रमाणे किताब व बहुमान असं लिहिलं होतं. मग तोफांची सरबत्ती झाली. शिंद्यांनी श्रीमंतांना ५१ मोहरा नजर केल्या. श्रीमंतांनी बादशहास १०१ मोहरा नजर केल्या. त्यानंतर श्रीमंतांनी शिंद्यांना, राजे

महाराज माधवराव सिंदे मदारुलमहा हा किताब दिला. २२ जूनला हा वकील मुतलिकचा दरबार झाला. महादजीबाबांनी अत्यंत शानदार भव्य प्रदर्शन करत आपल्या छावणीत सजवलेले राहुट्या, डेरे एका रांगेत उभारले. मुख्य शामियाना सजवला. त्यात एक उंच तख्त उभारलं. त्यावर बादशाही सनद ठेवली. बादशाही पध्दतीने ते सजवलं. मग श्रीमंत पेशव्यांना मिरवणूकीने डेऱ्यात नेलं. बादशहाला मराठ्यांनी संरक्षण देणं आणि बादशहाच्या सर्व कारभाराचं प्रमुखपण मिळवणं हा सर्वोच्च सन्मान महादजीबाबांमुळे मिळाला. श्रीमंत मग बादशहाने पाठवलेल्या नालखीतून वाड्यावर गेले. त्यावेळी महादजीबाबा स्वत: मोर्चेल - चवरी उडवत होते. मिरवणूकीने पेशवे गारपिरावरुन पुण्यात येईपर्यंत अत्यंत दिमाखदार मिरवणूक झाली. तोफांची सरबत्ती चालू होती. वाद्यं आणि फटाके वाजत होते. ही मिरवणूक आणि पेशवे यांना बघायला लोकांची गर्दी उसळली होती.

हा बादशाही भव्य कार्यक्रम झाल्यावर पाटीलबाबांनी उत्तर हिंदुस्थानातील पध्दतीने रंगपंचमी साजरी केली जी पुण्यातील लोकांना माहीतही नव्हती. पाटीलबाबांचं सारं आयुष्य उत्तर भारतात गेल्यामुळे आणि बादशाही दिमाख त्यांनी जवळून पाहिला असल्यामुळे बाबांना छानछोकीची ओळख होती. त्या रंगपंचमीला बाबांनी पेशव्यांना वानवडीला रंग खेळायला बोलावलं. होळीचे रंग घरी तयार केले. पुण्यातील लोकांना होळी खेळणं नवीन होतं. वानवडीहून रंग खेळत बाबा आणि सवाई माधवराव शनिवार वाड्यावर आले. पुण्यातील रस्ते रंगाच्या पाण्याने रंगले. पेशव्यांची स्वारी पुण्यात येत

असतांना फटाके वाजत होते, रंग उधळत होते. असा खेळ पुण्यात आजवर कधी रंगला नव्हता.

पुढे वर्षभर पाटीलबाबा पुण्यात राहिले. ते पेशव्यांना शिकारीला घेऊन जात. नाना फडणीसांच्या कडक शिस्तीतून बाबांनी पेशव्यांना बाजूला काढून राजव्यवहाराचे ४ धडे ऐकवत असत. पाटीलबाबा दरबारात हजर राहायला लागले. त्याचवेळी स्वराज्यासाठी अत्यंत घातक अशी घटना घडली. ती म्हणजे लाखेरीचा होळकर-शिंदे झगडा. स्वराज्याला खंबीरपणे सांभाळणारे महादजीबाबांचं वजन दिल्ली दरबारात वाढायला लागलं. ते होळकरांना सलायला लागलं. महादजीबाबा पुण्यात आल्यानंतर त्यांच्या अनुपस्थितीचा फायदा घेऊन शिंद्याचा वचपा काढायच्या हेतूने तुकोजींचे पुत्र मल्हारराव होळकर यांनी शिंद्यांच्या मुलखात दांडगाई सुरु केली, तिला नामोहरम करण्याचा थेट निरोप महादजीबाबांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिला. त्यातून निघाला तो लाखेरीचा शिंदे-होळकर संग्राम. त्यात महादजीबाबांच्या डी बायँने सरळ सरळ होळकरांचा पराभव केला. त्यामुळे स्वराज्याच्या या दोन शाखांमधे कडवटपणा आणखी वाढला. मल्हारराव होळकर दुसरे, यांच्यामुळे हे घडल्याने तुकोजी होळकर आणि महादजीबाबा या दोघांनाही अतिशय दु:ख झालं.

यातला पुण्यावर झालेला परिणाम आणखीनच वेगळा निघाला. तुकोजी होळकरांना महादजीबाबांचा शह म्हणून वापरणारे कारभारी आता महादजीबाबांशी सुतासारखे सरळ झाले. हे सगळं १ जून १७९३ मधे घडलं. महादजीबाबांचा दरबारातील वाढता जोर, नाना फडणीसांना महादजींच्या लष्कराची भीती असणं,आणि नाना फडणीस यांच्यातील कारभारावरील

नियंत्रणासाठी चाललेली चुरस ही आता कोणत्या थराला जाणार याचा अंदाज स्वराज्याचे शत्रू घ्यायला लागले. इंग्रज पोर्तुगीजांचे गुप्तहेर आपल्याला किती धोका आहे याचा अंदाज घ्यायला लागले. कॉर्नवॉलिसने लिहिलं की हिंदुस्थानच्या कोणत्याही भागात कंपनीला धोका नाही पण पुण्याची मात्र धास्ती आहे. तोपर्यंत १७९३ साल उजाडलं. नाना आणि महादजींमधील दुरावा वाढत गेला तेव्हा पेशवे सवाई माधवरावांनीच त्यात लक्ष घालून दोघांची समजूत करुन दिली. त्यामुळे दोघांच्यात समझोता झाला. दोघांची मनं साफ निवळली. याचा दूरगामी परिणाम शत्रुवरही झाला. निजाम फौज घेऊन बाहेर पडणार होता तो राज्यातच थांबला आणि इंग्रज नाखूष झाले. महादजीबाबांच्या सर्व मागण्या नाना फडणींसांनी कबूल केल्या त्यानंतर दरबार स्वच्छ मनाने कारभार करायला लागला. अर्थातच सगळे शत्रू हिरमुसले.

पाटीलबाबा रंगाने काळे आणि पायाच्या अधूपणामुळे स्थूल होते. मनाने स्वच्छ होते. डामडौलाच्या विरुध्द होते. मोहिमेवर असतांना

गावच्या चावडीवर जाऊन बसत आणि गावकऱ्यांशी गप्पा मारत बसत. गावचा पाटील हा गावाचा प्राण असं ते समजत म्हणूनच सरदार झाले तरी त्यांना पाटीलबाबा हीच ओळख अत्यंत प्रिय होती. पुण्यात वानवडीला त्यांचा मुक्काम असे. पुण्यात कामाला यायचं असेल राजेशाही थाटात न येता बरोबर ८-१० राऊत घेऊन घोड्यावरुन येत. पेशवे अनुभवाने आणि वयाने लहान असले तरी पाटीलबाबांनी त्यांचा मान ठेवला तसंच दिल्लीचा बादशहा पूर्णपणे त्यांच्यावर अवलंबून असला तरी बाबांनी कधी बादशहाचा अपमान केला नाही. बाबांच्या धाडस, मुत्सद्देगिरी आणि लष्करी सामर्थ्यामुळे इंग्रजही त्यांना

घाबरुन होते. बाबांकडे २०० पलटणी होत्या आणि तोफा ओतायचा कारखाना होता, हे इंग्रजांनी माहीत होतं. वडगावचा तह झाल्यावर इंग्रजांच्या युध्द कमिटीच्या दोघांनी, कर्नल हॅरिंग्टन आणि जॉन कर्नाक यांनी पाटीलबाबांचे उपकार फेडण्यासाठी त्यांना भडोच तालुका भेट दिला होता. वडगावचा तह झाल्यावर इंग्रजी फौजा मुंबईला सुखरुपपणे पोचल्या होत्या. या लढ्यात बाबांनी मध्यस्थाची भूमिकाही छान पार पाडली होती. म्हणून इंग्रज खूष होते त्यांच्यावर. मथुरेला त्यांनी मराठ्यांच्या राजधानीचं स्वरुप दिलं. पेशवे माधवरावांच्या अंतिम काळात, दिल्लीच्या बादशहाला गादीवर बसवणं आणि नजिबखानाचा सूड घेणं हेही कार्य महादजीबाबांनी केलं होतं. पानिपतावर आपल्या बंधूंचा प्राण घेणाऱ्या नजीबखानाच्या कबरीची मोडतोड केली, त्याने नेलेला पैसा, तोफा परत मिळवल्या. नजिबखानाचा सूड घेऊन ते शांत झाले होते.

१२ फेब्रुवारी १७९४ .... आता पाटीलबाबांच्या आयुष्यातील तिन्हीसांज उगवली होती. वयाला ६७ वर्षे झाली होती. अंधारमय रात्रीला उशीर नव्हता. पाटीलबाबांना जूनमधे ताप यायला लागला. ५ जूनला बातमी गेली की गेले ८ दिवस बाबांना खूप ताप येतो आहे. हरिपंत तात्या रोजच वानवडीस बाबांच्या दर्शनाला जात होते. पुढचे ७/८ महिने सतत ताप येत राहिला. तापातही ते काम करत राहिले. आपल्या मृत्यूची सावली त्यांना दिसली नाही. शेवटचे दोन दिवस अत्यवस्थ होते. त्यांचं बोलणंही बंद झालं. त्यांच्या प्रकृतीचं गंभीर वळण नाना फडणीसांना कळलं तेव्हा ते श्रीमंत पेशव्यांना घेऊन महादजीबाबांच्या दर्शनाला गेले. १२ फेब्रुवारीला त्याच रात्री ८ च्या सुमारास

बाबा या जगात राहिले नाहीत. बाबांना देवाज्ञा होईल याचा कुणाला अंदाजही नव्हता. खुद्द बाबांनाही आपला अंत जवळ आलाय हे कळलं नाही. बाबांचा कैलासवास म्हणजे जणू राष्ट्राचाच प्राण गेला. बाबांची थोरली बाई भागिरथीबाई आणि दौलतराव तुळजापूर यात्रेला गेले होते, तेही जवळ नव्हते. पाटीलबाबांना बरीच मुले झाली पण ती जगलीं नाहीत. पुत्र व्हावा म्हणून बाबांनी बरीच लग्ने केली. पण पुत्र झाला नाही. त्याही बाबतीत नाना फडणीस आणि बाबांचं दैव सारखंच म्हणायला पाहिजे. नाना फडणीसांनाही मुलं झाली पण जगली नाहीत, पण नानांच्या बायकाही अल्पायुषीच ठरल्या म्हणून त्यांनीही लग्ने केली. दोघांचे कुणी वारस राहिले नाहीत. महादजीबाबांची संसारात रमलेली एकच कन्या जिवंत राहिली ती म्हणजे बाळाबाई. ती लाडोजी शितोळे यांना दिली होती. पाटीलबाबांची आई चिमाबाई आणि त्यांना एक भाऊ होता तो तुकोजी. या तुकोजीचा मुलगा आनंदराव होता त्याचा मुलगा म्हणजे दौलतराव शिंदे. त्याची सरदारीवर स्थापना झाली. पाटीलबाबांच्या जाण्यानंतर दौलतराव शिंद्यांनी वानवडीला महादजींची छत्री उभारली. बाबांचा एक घोडा आणि एक तलवार त्यांच्या गुरुंनी त्यांना भेट दिलेली तलवार तिथे ठेवली. दौलतरावांनी तो घोडा बाबांच्या समाधीजवळ मोकळा ठेवला होता. तो कुठेही हिंडत गेला तरी संध्याकाळी समाधीपाशी येऊन उभा राहात असे.

पाटीलबाबा गेले. मराठ्यांच्या लौकिकाला भारतभर पसरवणारे बाबा गेले. इंग्रजांनी दबून राहावं असे बाबा गेले. विलायती फौज, धाडस, चतुराई, आणि कर्तृत्त्वाच्या जोरावर बादशहाला आपला आधार मराठेच हा सन्मान मिळवून देणारे बाबा जग सोडून गेले. पहिल्या बाजीरावांचं मूलेतु कुठार:,

दिल्लीवरच घाव घालून देश जिंकणं हे बादशाही उलथवून टाकण्याचं स्वप्न खरं करणारे आणि बादशहाला आपल्या लगामी घेणारे पाटीलबाबा आपला कार्यभाग उरकून अनंतात विलिन झाले. त्यांच्या जाण्याने राष्ट्राचा प्राणनाश झाला. स्वराज्याच्या मंदिराचा आधाराचा स्तंभच कोसळला. ते दशक स्वराज्याला संपवण्याचंच दशक होतं. मोठे मोठे आधारस्तंभ पाठोपाठ काळाच्या पडद्याआड गेले. १२ फेब्रुवारी १७९४ ला पाटीलबाबा गेले, महिन्याभरात १२ मार्चला आनंदीबाई गेल्या. पाटीलबाबांच्या पाठोपाठ सवाई माधवराव पेशव्यांचा २७ ऑक्टोबरला शनिवारवाड्यात अपघाती मृत्यू झाला. त्याच वर्षी १३ ऑगस्टला पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर वारल्या. १७९९ च्या सप्टेंबरमधे परशुराम भाऊ पटवर्धनांचा कैलासवास झाला. हरिपंत तात्या फडकेही वारले. आणि ते १७९० ते १८०० हे दशक संपता संपता १३ मार्च १८०० या दिवशी नाना फडणींसांचा काळ झाला. शिवप्रभूंनी उभारलेल्या स्वराज्याच्या साऱ्या भिंतीच जमिनीवर आल्या. मराठ्यांचं स्वराज्य हा खेळ संपला होता. ते मंदिर पूर्णपणे उध्वस्त करायला इंग्रजांच्या हाती सापडले ते दुसरे बाजीराव. सबंध भारत इंग्रज नावाच्या अंधाऱ्या काळोखात बुडाला.

स्वतंत्र भारतात हैदर-पेशवे-फडणीस-पवार-निजाम-वोडियार अशी अनेक ऐतिहासिक घराणी राजकारणातून नामशेष झाली. पण ग्वाल्हेर घराणं अजूनही दिल्लीच्या राजकारणात चमकत राहिलं आहे. इंग्रजांमुळे राणोजी शिंद्यांच्या वंशजांना आज ग्वाल्हेरचे सिंदिया या नावाने ओळखतात. पुण्यात वानवडीला महादजीबाबांची छत्री दिसते. तिथेच त्यांचा देह अग्नीत विलीन

झाला.. कधी गेलात तर भेटा जरुर त्या उमराव अलिजाबहाद्दर नावाच्या शूराला....

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

## नाना फडणीस.

## पुण्यातील चातुर्य संपलं.

## १३ मार्च १८००.



पुणे ही मराठ्यांची राजधानी. कारण बाजीरावांच्या वेळेपासून तिथे राजकीय कारभार, कचेरी, सुरु झाली. बाजीरावांनी पुण्याला कारभार हलवला कारण पुण्याहून दक्षिण, उत्तर, पूर्व, पश्चिम, कोकण, सर्व ठिकाणी जायला रस्ते फुटत होते. दरवेळी साताऱ्याहून पुण्याला यावं लागे ते त्रासाचं होतं. अनेकवेळा शाहूमहाराजांच्या दबावाखाली न येतील असे लष्करी निर्णय घ्यायचे तर त्याला मोकळीक होती. शिवाय मुळा मुठेचं पाणीही मुबलक होतं. रायगड हातून गेल्यामुळे राजाराममहाराजांनी सातारा ही राजधानी केली. सातारा हे शाहूमहाराजांपासून राजघराण्यांचं निवासस्थान बनलं. सर्व सरदारांचे वकील आणि प्रतिनिधी मात्र साताऱ्यातच राहात असत. शाहूमहाराजांच्यानंतर पुण्याला अपरंपार महत्त्व मिळालं.

शनिवारवाडा हे वर्दळीचं केंद्र झालं. स्वराज्याची सर्व सूत्रं इथूनच हलायला लागली. पुण्याच्या कारभारात साडेतीन राव आणि साडेतीन शहाणे

असा सन्मान मिळालेले दरबारी प्रसिध्द झाले. यात साडेतीन “राव” म्हणजे मुरारराव घोरपडे, गोपाळराव पटवर्धन, भवानराव प्रतिनिधी आणि अर्धे राव ते माधवराव. कारण ते अल्पायुषी ठरले. बाकी कुणीही राव ही उपाधी लावून घ्यायची नाही असा दंडक होता. स्वराज्यात साडेतीन शहाणे गाजले, ते ४ कारभारी, ज्यांच्या बुध्दिमत्तेचा लौकिक भारतभरच्या राज्यांमधे पसरला. ते साडेतीन शहाणे म्हणजे निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर. हा हिवरे गावचा कुलकर्णी आपल्या अंगभूत हुशारीवर निजामाचा दिवाण बनला. दुसरे शहाणे म्हणजे नागपूरकर भोसले यांचे दिवाण देवाजीपंत चोरघडे, तिसरे शहाणे सखारामबापू बोकील आणि अर्धे शहाणे होते ते नाना फडणीस. कारण हे लष्करी शिक्षणात कमी होते. या नाना फडणीसांची ही कहाणी.

१३ मार्च. १८००. बाळाजी जनार्दन भानू म्हणजेच नाना फडणीस. पुण्यातील त्यांच्या घरात अल्पशा आजाराने नानांचं निधन झालं. ही बातमी लगेच पुण्यातील कर्नल कलकत्त्याच्या गव्हर्नर जनरलला कळवली. नानांबरोबर मराठी राज्याचं शहाणपण आणि समतोलपणा सर्व लयाला गेला. With him has departed all the wisdom and the moderation of the Maratha Government.” सेनाधिकारी ब्राऊनिंग रिंग पटवर्धन सरदारांना म्हणाला की नाना गेले, तुमच्या राज्याचा आमच्यावरचा धाक गेला. साम्राज्यवादी इंग्रजांना खरं तर माधवराव पेशवे गेल्यावरच स्वराज्य गिळण्याची स्वप्नं पडायला लागली होती. पण नाना फडणीसांनी ती धुळीला मिळवली. पानिपताची लढाई फुटली तेव्हा अनेक लोक जीव घेऊन धावले. त्यात दोन जीव होते. एक नाना फडणीस, दुसरे राणोजी शिंद्यांचे चिरंजीव महादजी शिंदे, पाटीलबाबा…नाना

उंच गवतातून लपत बसत अफगाणी सैन्याच्या नजरेतून वाचले आणि पुण्यात पोचले. महादजीबाबा पायाच्या जखमेने रस्त्यावर पडले होते, राणाखान नावाच्या भिस्त्याने त्यांना वाचवलं, घरी आणलं, बरं केलं. त्यानंतर आयुष्यभर राणाखान पाटीलबाबांच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग बनले.

तसं बघितलं तर नानांच्या घराण्यात फडणीशी ही बाळाजी विश्वनाथांमुळे आली. फडणीशी म्हणजे राज्याचं सगळं अर्थखातं. फायनान्स डिपार्टमेंट. बाळाजी विश्वानाथांच्या जीवाला जंजिऱ्याच्या सिद्दीमुळे धोका निर्माण झाला तेव्हा बाळाजी विश्वनाथ श्रीवर्धनहून स्वराज्यात आले. त्यांच्या साथीला वेळासचे राम-हरि-बाळाजी हे तीन भानू बंधूही मदतीला म्हणून निघाले. जी भाकरी मिळेल ती चौघांनी वाटून खायची हाच सर्वांच्यात तोंडी करार झाला होता. बाळाजी विश्वनाथांना त्यांच्या राजकीय चातुर्यामुळे पेशवेपद मिळालं तेव्हाच भानू बंधूंमधल्या बाळाजीपंतांना फडणीशी मिळाली. शाहूमहाराजांना लष्करी शिक्षण नव्हतं. पण आपलं स्थान भक्कम करायला त्यांनी प्रत्येकाला त्याचं पद वंशपरंपरेने कायम केलं आणि आपली पाठिंबा देणारांची ताकद वाढवली. बादशहाकडून सनदा आणायला बाळाजी विश्वनाथ दिल्लीला गेले तेव्हा भानूही त्यांच्याबरोबर होते. पण तिथे झालेल्या दंगलीत बाळाजी भानू मारले गेले. त्यानंतर त्यांचं पद बाळाजीपंतांचे चिरंजीव जनार्दनपंतांना मिळालं. हे नाना फडणीसांचे वडील.

पानिपताच्या लढाईत रणांगणावरून जीव वाचवून नाना पुण्याला पोचले. माधवराव पेशवे झाले. पेशवेपदावरुन माधवराव आणि त्यांचे काका राघोबादादा यांच्यात फूट पडली. तेव्हा नाना माधवरावांच्या पक्षात आले.

बघता बघता माधवरावांनी कारभारावर आपला हक्क जमवला. राघोबा आणि सखारामबापू बोकील यांना घरी बसवलं. आपला विश्वासातील माणूस म्हणून नानांच्या हाती फडणीशी सोपवली. तेव्हापासून नाना " फडणीस " म्हणूनच हयातभर ओळखले गेले. इ. स. १७६३ मधे फडणीशी मिळाली तेव्हा नाना फक्त २० वर्षांचे होते. नाना स्वभावाने कडक, कारभाराला चोख, आणि मुत्सद्दीपणात कमालीचे चतुर होते. त्यांच्या मनातील हेतू कधीही कुणाला उमजत नसे. चेष्टा मस्करी त्यांना अजिबात खपत नसे. त्यांना हसतांनाही फार कमी वेळा लोकांनी पाहिलं. राघोबादादांचे दौलतीला घातक असे चाळे थांबेनात तेव्हा माधवरावांनी त्यांना कैदेत टाकलं आणि नानांवर पहारा ठेवण्याची जबाबदारी सोपवली. राघोबादादांचा कैदेतून पळून जाण्याचा प्रयत्न नानांच्या जागरुकपणामुळे फसला.

इंग्रजांनी कधीपासून राघोबांच्या घरी येणं जाणं सुरु केलं होतं. माधवरावांचे गुप्तहेर सर्व बातम्या पेशव्यांना पुरवत होते. पण माधवराव पेशवे १० वर्षांच्या कारभारानंतर वयाच्या २७ व्या वर्षी वारले. मग त्यांचे धाकटे बंधू नारायणराव पेशवे झाले. राघोबादादांचं स्वप्नं परत एकदा बुडून गेलं. आता मात्र राघोबादादा आणि सखारामबापूंची सहनशक्ती संपली. त्यांनी नारायणराव पेशव्यांना नजरकैदेत ठेवून सत्ता हातात घ्यायचं ठरवलं. पण शनिवारवाड्यातील पेशव्यांच्या खूनामुळे राघोबादांचे सर्व प्रयत्न फुकट गेले आणि त्यांना परत ते पद मिळवण्यासाठी इंग्रजांचा आश्रय घ्यावा लागला. बारभाईंच्या कारस्थानानंतर नाना फडणीस आणि सखारामबापू बोकील यांच्या हाती सगळा कारभार आला. नारायणराव पेशव्यांच्या पत्नीला पुत्र झाला. आणि त्याच्या

नावाने पेशवेपदाची वस्त्रे आणून नाना आणि सखारामबापूंनी कारभार सुरु केला. राघोबादादांना घेऊन इंग्रजांनी पुण्याला आणायचा दोन वेळा प्रयत्न केला पण वडगावला आणि गॉडर्डचा पराभव करुन मराठे संपलेले नाहीत हे नानांनी, तुकोजी होळकरांनी आणि महादजी शिंद्यांनी दाखवून दिलं. लवकरच सखारामबापूही राघोबादादांना सामील असल्याचे फितुरीचे कागद नानांनी पकडले आणि बापूंना कैदेत टाकून नानांच्या हाती सर्व कारभार आला.

सवाई माधवराव आणि पुणे दरबार हे त्यांच्या हाती आलं. महादजी शिंदे शूर सरदार आणि उत्तम कारभारीही. त्यांनी उत्तरेत पराक्रम गाजवायला सुरुवात केली. ते दिल्लीचं राजकारण खेळायला लागले. इंग्रजांच्या विरुध्द राजकारण खेळायला आता स्वराज्याचे दोन चालक नाना आणि महादजी शिंदे मैदानात उतरले. आणि मग झालं १७८० चं निजाम-हैदर आणि मराठ्यांचं इंग्रजांबरोबरचं युध्द. यावेळी महादजीबाबांनी सल्ला दिला की आधी तिघं एकत्र होऊन इंग्रजांशी लढू आणि मग हैदरशी लढू.. नानांनी ज्या गुप्तपणे दोघांशी बोलणी केली ती इंग्रजांच्या गुप्तहेरांनाही कळली नाहीत. इंग्रजांच्याविरुध्द पाटीलबाबांनी फ्रेंच अधिकारी हाताशी ठेवून आपली कवायती फौज तयार केली. हैदरअलीनेही फ्रेंचांना जवळ करुन त्यांच्याकडून युध्दसाहित्य घेऊन इंग्रजांशी युध्द केलं. नानांना मात्र राघोबांकडे पुण्यात घिरट्या घालणाऱ्या इंग्रजांमुळे त्यांच्याशीच सामना करावा लागला.

या इंग्रजांशी झालेल्या लढाईत इंग्रज नावाच्या तक्षकाच्या बळीचा जो यज्ञ मांडला त्यात त्यांचा बळी जाण्याऐवजी हैदरअलींचाच आजारपणाने मृत्यू झाला. १७८१-८२-८३ ही ३ वर्षे युध्दांचा कल्लोळ माजला. ग. जनरल वॉरन

हेस्टींग या लढ्यात पार दमला. मद्रासच्या इंग्रजांनाही हे त्रिकूट भारी पडलं. हैदरअलींचा मृत्यू मैसूरमधे नवीन राजकारण घेऊन आला. टिपू सुलतानच्या हाती सत्ता आली. अति शूर, अति धर्मवेडा, अति बुध्दिमान, अति संशयी आणि उग्रप्रकृती टिपूच्या या स्वभावामुळे त्याच्या अवतीभवतीचे,दरबारी, आणि निजाम-मराठे हेही शत्रू बनले. टिपूने नानांना वकिलांमार्फत बोलण्यात गुंतवून नरगुंदकर भाव्यांचे हाल केले, नरगुंद घेतलं, आपल्या सेनापतीलाही ठार मारलं. निजामालाही त्याने दुखावलं. निजाम आणि नानांना टिपूची रग कमी करायची होती. त्यातच मराठे आणि मैसूर जिंकायच्या जबाबदारीवर कॉर्नवॉलिसने भारतात पाऊल ठेवलं. आणि त्यातून घडलं ते १७९१ चं मैसूरचं रणकंदन. यातही नाना आणि निजामाचं गुप्तपणे ठरलं की यात टिपू सुलतानाची रग कमी करायची पण त्याला संपवायचं नाही कारण इंग्रजांशी लढायला तोच समर्थ होता. कॉर्नवॉलिसला निजामाची फौज, मराठ्याचं उत्कृष्ट घोडदळ हवं होतं. मराठ्यांना इंग्रजांचं युध्दसाहित्य आणि पैसा. त्यातून घडली ती १७९१ सालची मोठी टिपूसुलतानची लढाई ज्यात सुलतानाचं अर्ध राज्य नाना-निजाम-इंग्रजांनी वाटून घेतलं. कॉर्नवॉलिसनंतर कलकत्त्याला रिचर्ड वेलस्ली आला आणि ४ मे १७९९ टिपू सुलतानाचा श्रीरंगपट्टणला अंत झाला. मैसूरचा श्रीमंत घास इंग्रजांनी गिळला. नाना फडणीस बातमी ऐकून म्हणाले, आता स्वराज्यही संपलंच..

इकडे पुणे दरबारातही अनेक राजकारणं चालू होती. सवाई माधवराव नानांच्या नजरेखाली तयार होत होते. राघोबादादांचं नाशिकला आजारपणात सन १७८३ मधे निधन झालं. मरणापूर्वी त्यांनी ब्राह्मणांसमोर नारायणरावांच्या

खुनाचं प्रायश्चित्त घेऊन गोपिकाबाईंचं समाधान केलं. राघोबादादांच्यानंतर त्यांचे चिरंजीव दुसरे बाजीराव स्वराज्यात धुमाकूळ घालायला मोठे होत होते. महाराष्ट्राच्या दुर्दैवाने २० वर्षांच्या सवाई माधवरावांचं शनिवारवाड्याच्या पहिल्या मजल्यावरून खाली पडून १७९५ सालामधे निधन झालं. मग दुसरे बाजीराव आले. नानांचा कारभार आता सोपा राहिला नाही. एकीकडे खर्ड्याच्या लढाईत निजामाविरुध्द विजय मिळाला होता, पण दुसरीकडे पाटीलबाबांचा कैलासवास यांनी स्वराज्याचे भक्कम स्तंभ कमकुवत झाले. सवाई माधवराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर पुणे दरबारात जो अनाकलनीय गोंधळ माजला आणि दुसरा बाजीराव-नाना फडणीस-परशुरामभाऊ पटवर्धन -शिंदे-होळकर- या सर्वांची बुध्दी इतकी संपली की देशाचा ऱ्हासकाळ आल्यामुळे भलेभले बुध्दि भ्रष्ट झाले, अशी अंतर्गत यादवी माजली. नाना फडणीसांनी पुणे दरबारातील आणि इंग्रजांची बंडाळी, कपटकारस्थानं, जहागिरीच्या लबाड्या, जेवढ्या पाहिल्या तेवढं पाहणारा रियासतीत दुसरा माणूस नाही.

नानांचं शेवटचं कमालीचं मुत्सद्दीपणाचं राजकारण म्हणजे बाजीरावाविरुध्दचं महाडचं राजकारण. नानांची कैद हे राज्य घसरणीचं आणखी एक प्रकरण. सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर ७ महिने केवळ त्यांचा वारस शोधण्यात गेले इतका घोळ नाना फडणीस, बाजीराव, शिंदे, परशुरामभाऊ पटवर्धन यांच्यात झाला. बाजीरावांच्या वागणुकीचा एकूण अर्थ लगेच लक्षात आल्यामुळे त्यांना पेशवेपदावर नेमणं अत्यंत धोक्याचं आहे हे सर्वच दरबारी मंडळींना कळून चुकलं. अनेक शह-काटशह- कारस्थानांना वेग होऊन शेवटी बाजीरावांची कैद आणि त्यांचे १२ वर्षांचे लहान बंधू चिमाजीआपा यांची

पेशवेपदावर नेमणूक झाली. ती केवळ नावापुरतीच होती. या सर्व अंदाधुंदीच्या काळात नाना फडणीसांना कैद करण्याचं कारस्थान शिजलं. ते नानांच्या कानावर जाताच त्यांनी मेणवलीहून सरळ रायगड गाठलं. तिथे त्यांचे मेहूणे सावकार गद्रे ( खुन्या मुरलीधराचं देऊळ यांचं होतं ) अंमलदार होते. पुण्याच्या फौजा आपल्यावर येऊ नयेत म्हणून नानांनी वाटेतील झाडे आडवी पाडून रस्ते अडवले. रायगडावरची हवा त्यांना मानवेना म्हणून ते महाडला जाऊन राहिले. तिथून त्यांनी जी सूत्रं हलवली त्याला महाडचं राजकारण म्हणतात. हे नानांच्या अर्क बुध्दिमत्तेचं शेवटचं उदाहरण म्हणून गाजलं. १० जून ते १० नोव्हेंबर या सहा महिन्यात नानांनी प्रचंड उलाढाली केल्या. नवी कारस्थान रचून आपल्याविरुध्दच्या सर्वांचा फज्जा उडवला. त्यांना साथ मिळाली ती इंग्रजांची आणि निजामाची. आपल्या हातून गेलेली सत्ता परत मिळावी, दौलतराव शिंद्यावर मात करावी, चिमाजीआपाला पेशवेपदावरुन दूर करुन बाजीरावास आणावं हे सर्व राजकारण केलं ते केवळ आपल्या हातून सत्ता सुटू नये म्हणून.

महाडास बसून नानांनी आपल्या चाली खेळल्या. त्यांचा राग दौलतराव शिंद्यांवर होता. शिंद्यांकडे असलेली फ्रेंच फौज इंग्रजांना सलत होती. नानांचा दक्षिणेत कारभार होता तेव्हा त्यांचा इंग्रजांशी जास्त संबंध होता. म्हणून ते नानांच्या कारस्थानात मदतीला आले. नानांनी शिंद्यांच्या मुलखात इंग्रजांना हल्ले करण्याची सूचना केली. नानांची आणि निजामाची फार जुनी दोस्ती. निजामही त्यांच्या मदतीला आला. त्यामुळे शिंदे, परशुरामभाऊ पटवर्धन नानांवर संतप्त झाले. दौलतराव शिंदे राजकारणात अगदीच कच्चा होता. तो नानासारख्या अनेक बुध्दीबळं जिंकलेल्या चाणक्यासमोर टिकलाच नाही.

नानांच्या पैसे चारलेल्या लोकांनी दौलतरावांच्या कारभाऱ्याविरुध्द, बाळोबांविरुध्द मन दुषित केलं. महादजी शिंद्यांची केशर नावाची रखेल उज्जयनीला होती. तिच्यामार्फत नानांनी दौलतरावांचं,आपल्याला सामील होण्याचं मन वळवलं. त्यामुळे दौलतराव शिंदे नानांच्या हाती आला. नंतर निजामाचा वजीर मुशिर उन्मुल्क ह्याच्या मार्फत पुण्यात गुप्तपणे फौज उभारली. नाना फडणीसांनी टिपू सुलतान आणि नागपूरचे रघुजी भोसले यांनाही आपल्या गळाला लावलं.

या सर्व सूत्रं हलवण्यात नानांचा साथीदार होता तो गोविंदराव काळे. या सर्वांची मदत नानांनी एवढ्याचसाठी मिळवली की बाजीरावांना पेशवेपदावर नेमायचं आणि नानांना त्यांचा कारभारी करायचं. बाजीराव त्यांच्या मुठीत राहील आणि नानांची सत्ता चालू राहील. सगळा सत्तासंघर्षाचा हा खेळ झाला. नाना फडणीसांनी प्रचंड पैसा खेळवून सर्व महत्त्वाची माणसं आपल्या ताब्यात आणली आणि परशुरामभाऊ पटवर्धन आणि दौलतराव शिंद्यांचे कारभारी बाळकोबा यांना कैदेत घालायचं कारस्थान महाडमधे बसूनच रचलं. नानांचा खास माणूस नारोपंत चक्रदेव, निजामाचा कारभारी मुशिरउन्मुल्क आणि होळखरांच्या फौजांनी शनिवारवाड्यावर चाल केली. परशुरामभाऊ पेशवे चिमाजीआपांच्या रक्षणासाठी वाड्यावर होते. त्यांनी हा हल्ला आलेला पाहताच पेशव्यांना घोड्यावर घातलं आणि वाड्याबाहेर पडले. या झटापटीत परशुरामभाऊंचा पराभव झाला. चिमाजीआपास त्यांच्याकडून सोडवून परत पुण्यास आणलं. मग नानाही आले. बाजीराव आणि त्यांच्यात करार होऊन नानांच्या हाती परत कारभार आला. दौलतीच्या भल्याचा विचार न करता

प्रत्येकजण स्वार्थासाठी खपला ते केवळ सर्वांची बुध्दी भ्रष्ट झाली होती म्हणूनच. इंग्रजांच्या दृष्टीने मात्र नानांच्या या कारस्थानामुळे त्यांच्या हातून पुण्याला गिळण्याची संधी परत एकवार निसटली. ५ डिसेंबर १७९६ या दिवशी दुसऱ्या बाजीरावांची पेशवेपदावर स्थापना झाली. जे राघोबादादांना मिळालं नाही ते पद त्यांच्या मुलाला मिळालं. जे काम राघोबांच्या हातून झालं नाही ते इंग्रजांना पुण्यात आणण्याचं कार्य दुसऱ्या बाजीरावांनी पूर्ण केलं.

दुसरे बाजीराव पेशवे झाले. त्यांच्या वागण्याने तर दरबारातील प्रत्येकाची मति गुंग झाली. नानांचाही तोल राहिला नाही. याच वेळी नानांचे मेहूणे सावकार गद्रे यांनी मुरलीधराचं देऊळ बांधलं होतं त्याची प्राणप्रतिष्ठा होण्याच्या दिवशी १२ एप्रिल १७९७ या दिवशी डी बायॉंची पलटण आणि अरबांची फौज यांच्यात लढाई होऊन खून पडले. तेव्हापासून मुरलीधराच्या देवळाला खुन्या मुरलीधर अशी ओळख मिळाली ती अजूनही चालू आहे. नाना बाजीराव यांच्यातीन वैर वाढत गेलं त्याचा परिणाम म्हणजे बाजीरावाने नानांना कैद केलं. नाना हाच सर्वांना हाताळण्यास अवघड वाटणारा मुत्सद्दी होता. नानांना काढलं तरच पुणं आपल्या हाती याची प्रत्येकाला खात्री होती एवढा नानांचा दरारा आणि राजकारण खेळण्याची क्षमता होती. त्यामुळे नानांची कैद बाजीरावाला महत्त्वाची झाली. नानांनी तेही अनुभवलं. ४ मे १७९९ या दिवशी टिपू सुलतानाचा अंत झाला आणि मैसूर राज्य इंग्रजांच्या ताब्यात गेलं. नानांना स्वराज्यावरच्या संकटाची खात्री झाली. स्वराज्य संपणार हे त्यांना स्पष्ट दिसलं. नानांची कैद म्हणजे राज्य घसरणीला लागल्याची पावती होती.

१३ मार्च १८०० या दिवशी नाना गेले. स्वराज्यावर डोळा ठेवून बसलेल्या इंग्रजांना नानांच्या मृत्यूने आनंदाच्या उकळया फुटल्या. नाना गेल्यावर अवघ्या तिसऱ्या वर्षीचं सन १८०३ मधे दुसऱ्या बाजीरावांना इग्रजांनी पुण्यात आणून बसवलं. नानांच्या बायका जगल्या नाहीत म्हणून नानांनी ९ लग्ने केली. त्यांना दोन मुली आणि एक मुलगा झाला पण जगली नाही. नानांना काशीला जाण्याची फार इच्छा होती पण जमलं नाही म्हणून त्यांनी रेशमी कापडावर काशीचा नकाशा रंगवून घरात लावला.त्याचं रोज ते दर्शन घेत. काशीला पुण्यकर्म करावं म्हणून त्यांनी कर्मनाशी नदीवर लोकांच्या सोयीसाठी पूल बांधला. तो बांधतांना वाळू आणि पाणी यामुळे त्याचा पाया टिकेना. तेव्हा तिथल्या बांधकाम लोकांनी ब्राह्मण पूजेला बसवले. नानांना ही बातमी मिळाल्याबरोबर त्यांनी ते अनुष्ठान बंद करवलं. कलकत्त्याच्या बेकर नावाच्या इंजिनियरला काशीला पाठवलं. त्याने चुन्याचे बंब आणि इतर सामान आणून पूल पूर्ण केला. नानांच्या नंतर त्यांची पत्नी जिऊबाई हिने दत्तक घेऊन त्यांचा वंश चालू ठेवला.

अत्यंत कपटी कुटील इंग्रजांना, नानांनी १७७२ ते १८०० पर्यंत स्वराज्य गिळू दिलं नाही. कोलब्रूक नावाच्या इंग्रजाने लिहून ठेवलंय की नानांना लष्करी शिक्षण असतं तर त्यांनी आपला राजवंश चालू केला असता.. जगाला जिंकणाऱ्या इंग्रजांनी लिहिलेले हे शब्द नानांचं मुरब्बीपण दाखवायला पुरेसे आहेत..

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

# शहीद मंगल पांडे.

# ८ एप्रिल १८५७.



इ. स. १७९९, ४ मे या दिवशी, टिपू सुलतानने मैसूरच्या रक्षणासाठी इंग्रजांविरुध्द प्राणार्पण केलं. इंग्रजांशी हातमिळवणी करुन मैसूर गिळलं नाही. टिपू सुलतान हा देशरक्षणासाठी, इंग्रजांविरुध्द प्राणार्पण करून शहीद होणारा पहिला भारतीय. त्याने पेटवलेली मशाल नंतर कित्येक क्रांतीकारक तरुणांनी पेटती ठेवली. १९ वं शतक उजाडलं तेव्हा स्वराज्यासकट सर्व देश इंग्रजांच्या ताब्यात गेलेला होता. साम्राज्यवादाची आपली राक्षसी भूक शमवायला, इंग्रज मात्र क्रूर कपटी, कारस्थानी, लबाड, अशा दुर्गुणांनी भारताला लुटतच राहिले. भारताच्या संस्कृतीची, पारंपारिक ज्ञानभांडाराची मोडतोड करुन गेले. या सर्वांचा परिणाम म्हणजे राजापासून रंकापर्यंत झालेला १९ व्या शतकाच्या मध्यावरचा उद्रेक, १८५७ चं स्वातंत्र्य युध्द. नाकर्त्या दुसऱ्या बाजीरावाच्या नानासाहेब पेशवा या परम पराक्रमी पुत्राने या युध्दाची उभारणी अत्यंत गुप्तपणे केली. सारा भारत एक झाला. नानासाहेब पेशवा, तात्या टोपे, झांशीची राणी लक्ष्मीबाई, सातारचे रंगो बापूजी, कोल्हापूरचे महाराज असा अनेकांच्या मुठींनी तलावारी उपसल्या. या असंतोषात भर पडली ती लष्करी

पलटणींची. त्यांनीही इंग्रजांविरुध्द बंडाचा उठाव केला. त्याचा नायक होता मंगल पांडे. त्याच्या प्राणाची आहुती भारताला उजळवून गेली.

गोष्ट साधीच होती.... तीच.... जगभर चालणारी..अछूत असण्याची. बाहेरुन आलेल्या गोऱ्यांना काळे भारतीय वर्णद्वेषामुळे अछूत. भारतात फुकटात मिळालेल्या उच्च कुळामुळे, देशातले खालच्या वर्णांचे लोक अछूत...१९व्या शतकात सबंध भारत इंग्रजांनी गिळला. तुर्कांशी युरोपात क्रूरपणात आणि कपटीपणात बरोबरीने लढणाऱ्या साम्राज्यवादी म्हणजे इंपिरियॅलिस्टिक भारतीय इंग्रजांची बोचकारणारी लांब नखं आता बाहेर आली होती.

अवध-झांसी-अयोध्या-नागपूर-सातारा -संबलपूर, कितीतरी राज्ये हा कपटी भस्मासूर वारस नाही म्हणून, खालसा करत गिळायला लागला होता. गव्हर्नर जनरल डलहौसी हा या कल्पनेचा खलनायक होता. त्यांची दौलत इंग्लडमधले मूठभर लोक आपल्या देशात भोगत होते, क्रूरपणाने राजांना लुटत होते. मुजोर ब्रिटीशांनी सन १८३९ मधे सातारचे शिवाजी महाराजांचे वंशज प्रतापसिंह राजे यांना पदच्युत केलं आणि सातारा खालसा केलं. हा तर मराठी जनतेचा घोर अपमान होता. भारतीय संस्थानिकांची ही दुर्दशा तर इतर थरातील लोकांनाही या बेरकी मुजोर लोकांचा लुटारुपणा सोसावा लागला होता. भारतीय संस्कृतीमधे राजा आणि प्रजा यांचं प्रेमाचं नातं होतं. कधी सन्मान म्हणून तर कधी आधार म्हणून राजा भूमीदान म्हणून जमिनी देत असे.. इंग्रजांनी फतवा काढला आणि नोंद नसलेल्या कितीतरी जमिनी सरकार जमा केल्या. राजा आणि प्रजा यांच्यातील विश्वासामुळे नोंदी नसायच्याच त्या काळात..सामान्यांची अन्न देणारी ही काळी आई सरकारने एका फटक्यात

लुबाडून नेली. इंग्लंडमधून येणाऱ्या मिशनऱ्यांनी सरळ सरळ निंदा नालस्ती करुन हिंदू धर्माची चेष्टा चालवली तेव्हा धर्मभोळा हिंदू समाजही बिथरायला लागला. बळजबरीने किंवा फसवणूकीने धर्मांतराचा कहर केला. त्यातच दान जमिनींवर शेतसारा माफ असे, त्यावरही सारा लागला, सरकारने शेतसाराही वाढवला. बुंदेलखंडात मीठाचे खडक नव्हते, त्यामुळे त्यांना मीठ आयात करावं लागे. या प्रांतांसाठी मिठावर सरकारने कर लादला, मीठ ही जीवनावश्यक वस्तू, त्यावर कोणत्याही राजाने कधीच कर बसवला नव्हता. त्यात कठोरपणाचा कळस म्हणजे ह्या करवसूलीसाठी राईट नावाचा कस्टम ऑफिसर नेमण्यात आला. तो कोणत्याही दुकानात, घरात शिरून मीठ नाही ना हे तपासायला लागला आणि मुजोरपणे वागायला लागला. या प्रांतातील जनता यामुळे हैराण झाली आणि सूडाने पेटायला लागली. सैन्यातही हिंदी शिपाई आणि गोरा शिपाई यांच्यात पगाराचा भेद केला. गोऱ्या शिपायाला दोन चार वर्षात बढती आणि हिंदी नेटिव्हांना मात्र बढती नाही असं करुन हिंदी शिपायांना दुखावलं. त्यातच हिंदू-मुस्लिमांची धर्मावर आधारित जी न्यायव्यवस्था होती ती मोडून नवीन कायदे करण्यात आले. त्यामुळे धर्मभोळेही बिथरले. यातच धर्मांतरित लोकांच्या फायद्यासाठी नवीन प्रॉपर्टी टॅक्स लागू केला. त्यात ख्रिस्ती धर्म स्विकारल्यावरही त्याचा वडिलोपार्जित संपत्तीवरचा हक्क चालू ठेवला आणि घराघरात भांडणं लावली...आजवरच्या व्यवस्थेत जातपंचायतच गावातील भांडणांचा निकाल करत असे, त्यांना गावातील कुटुंबांची माहिती असे..त्यात वकील वगैरे खर्च नव्हते.. या नवीन कोर्टकचेरीमुळे लोकांचे हाल सुरु झाले आणि पैशाचा चुराडा होऊ लागला. त्यात भर पडली ती स्टँप ड्यूटीची. हे तर लोकांच्या आकलनापलिकडचं होतं. मिळून सारा भारत असंतोषाने इंग्रजी

अंमलाविरुध्द तापायला लागला. सगळी भारतीय समाज व्यवस्थाच त्यांनी मोडीत काढायला सुरुवात केली. सर्वच इंग्रज सर्वच भारतीयांना अत्यंत अपमानास्पद वागवत..

सर्व थरातील लोकांना अशा तऱ्हेने छळल्यावर, भिकेला लावल्यावर उठाव होणारच होता. त्यातच सातारचे राजे प्रतापसिंग यांनी वारसा मान्यतेसाठी रंगो बापूजी गुप्ते यांना आपली बाजू मांडण्यासाठी इंग्लंडला पाठवलं. रंगो बापूजींनी १४ वर्षे इंग्लंडमधे राहून खूप प्रयत्न केले. इंग्लंड सरकारकडे खूप खेटे घातले पण फायदा झाला नाही. राजापासून रंकापर्यंत सूडाने संतापलेल्या या जनतेला कुणीतरी नायक हवा होता. दुसऱ्या बाजीरावांचे पुत्र नानासाहेब पेशवा, झांशीची राणी, तात्या टोपे या तीन वीर नेत्यांच्या रुपात भारतीयांना नेते मिळाले. इंग्रजांनी नानासाहेब पेशव्यांचा वारस म्हणून हक्क नाकारला होता, तीच कथा झांशीच्या राणीची होती..हे तिघेही विठूरला एकत्र वाढले होते. दुसरीकडे, इंग्रजांना सामील असलेले संस्थानिकही कमी नव्हते.

त्याचवेळी डमडमच्या लष्करी छावणीमधे वेगळीच घटना घडली होती. शिपायांना ज्या बंदूका दिल्या जात त्यांची काडतुसं डमडम आणि मिरतच्या कारखान्यात बनत. डमडमच्या कारखान्यात काम करणाऱ्या एका मेहेतरने, ब्राह्मणाकडे त्याच्या लोट्यातील पाणी मागितलं. तुला पाणी दिलं तर लोटा विटाळेल असं तो शिपाई मेहेतरला म्हणाला तेव्हा मेहेतर म्हणाला की आता सर्वत्रच विटाळ माजणार आहे कारण तुम्ही जी काडतुसं दातांनी तोडता ती गायीच्या आणि डुकराच्या चरबीने लपटलेली असतात. मीच त्या कारखान्यात काम करतो म्हणून मला माहीत आहे. ती काडतुसे तुम्हाला दातांनी तोडावी

लागतील..तेव्हा तुमचा धर्म शिल्लक राहणार का ? त्यावरुन लष्करातील हिंदू आणि मुसलमान सैनिक सावध झाले. त्या ब्राह्मण शिपायांनी इतर सैनिकांना ही बातमी दिली. ही बातमी वणव्यासारखी छावणीत पसरली. खरंतर १८५३ सालापासूनच अशी चरबी वापरली जात होती पण इंग्रजांनी ते गुप्तपणे कुणाला कळू दिलं नव्हतं. ही बातमी वणव्यासारखी पसरली तेव्हा इंग्रजांनी साफ खोटं सांगितलं की असं आम्ही केलेलं नाही. हिंदूंना गाय पवित्र. ते दुखावले आणि डुकराच्या चरबीमुळे मुसलमान बिथरले.

इंग्लंडचा अनुभव घेऊन १४ वर्षांनी भारतात परतल्यावर रंगो बापूजी गुप्ते विठूरला नानासाहेब पेशव्यांना भेटले. तीन दिवस दोघांच्यात खलबतं झाली..ते नानासाहेब पेशव्यांना म्हणाले की पत्रापत्री पाठवून इंग्रजांचं काम होणार नाही. काशी ते रामेश्वर एकदम एक दिवस सबंध भारत उठेल तरच निभाव लागेल..त्यात सेनापतीपद कोण घेईल अशा प्रश्न निघाला तेव्हा आम्ही सर्व उत्तर हिंदुस्थानी एकत्र येऊन उठाव करु असा निर्वाळा पेशव्यांनी दिला आणि दक्षिणेतून तुमची काय मदत मिळेल असं रंगो बापूजींना विचारल्यावर ते म्हणाले की माझ्या मावळातील हजार गडी तयार करतो. उत्तर हिंदुस्थानात पंचारतीचा गजर झालेला ऐकला की आम्ही दक्षिणेत नौबतीवर टिपरी मारतो. नंतर रंगो बापूजी आणि अझीमुल्ला खान हे गुप्तपणे याअसंतोषाचं क्रांतीच्या उठावात रुपांतर करण्यासाठी योजना आखायला लागले. त्याचवेळी रशिया आणि इंग्लंड यांच्यामधे युध्द सुरु झालं आणि इंग्लंड त्यात गुंतलेला असतांना या संधीचा फायदा करुन घ्यायचा असा निर्णय गुप्तपणे ठरला. एकत्रित उठावासाठी आता फक्त दिवस ठरायचा होता. त्यासाठी एक गुप्त संघटनाही स्थापन झाली.

नानासाहेब पेशव्यांचे गुप्त संदेश घेऊन फकिराच्या वेषात लोक भारतभर फिरु लागले. क्रांतीची कल्पना सर्व संस्थानिकांमधे पसरवू लागले. सर्व भारत एकसंघ करण्याचा यज्ञ चेतवला जायला लागला. सर्व तीर्थ क्षेत्रे, मंदिरे, मठ, जिथे जिथे लोकसमुदाय गोळा होतात तिथे तिथे संदेश जाऊ लागला. या ठिकाणचे मठाधिपतीही राष्ट्रसेवेत महत्त्वाचं काम करु लागले. दिल्लीच्या बादशहाच्या महालामधेही गुप्त बैठका होऊ लागल्या कारण इंग्रजांनी बादशहाची बादशहा ही पदवीच काढून घेतली होती. साताऱ्यात रंगो बापूजी हेही उठावासाठी सैन्य भरती करायला लागले. मिरज आणि कोल्हापूर दरबारही दक्षिणेतील क्रांतीच्या उठावासाठी हातभार लावत होते. १८५७ सालच्या जानेवारीत मद्रासमधे जाहीरनामा फडकला, "उठा देशबंधूंनो, धर्मनिष्ठांनो उठा..या काफीर इंग्रजांना आपल्या देशातून पळवून लावण्यासाठी उठा." हा सर्व प्रसार अत्यंत गुप्तपणे चालू होता. लष्करी शिपाईसुध्दा आपल्या बंदूका साफ करुन ठेवत होते.

इंग्रजांना यातली काही खबर नव्हती हे या गुप्ततेचं मोठं यश होतं. पण मधेच झालेल्या या काडतुस प्रकरणाने सावधपणासाठी इंग्रज अधिकारी शिपायांची पत्रं फोडून वाचू लागले. आता क्रांतीच्या उठावाचा फक्त मुहूर्त ठरायचा होता. भारतभर तयारी पूर्ण झाली होती. नानासाहेब पेशवे, वजीर अल्ली नक्कीखान – सर्व हिंदू आणि मुसलमान एक झाले ही लाख मोलाची गोष्ट होती. पाचही बोटांची मूठ वळली तर काय साध्य होत नाही? त्यात सावकार-वकील- व्यापारी हरएकजण सामील होता. सर्व पलटणींपेक्षा बंगालमधली ३४ वी पलटण ही राज्यक्रांती करण्यास जास्त उतावीळ होती. या

पलटणीचं ठाणं बराकपूरला होतं. देशक्रांतीसाठी वजीर, अली नक्कीखान यांनी या पलटणीला आणि १९ व्या नेटिव्ह तुकडीला आपल्याकडे वळवून घेतलं होतं. इंग्रजांना राष्ट्रउठावाची गंधवार्ताही नसल्यामुळे योगायोगाने नवीन काडतुसं वापरण्यासाठी याच १९ व्या नेटीव्ह तुकडीला निवडलं. या पलटणीने ते सपशेल नाकारलं तेव्हा इंग्रज अधिकाऱ्यांनी ब्रह्मदेशातून नवीन फिरंगी तुकडी आणायचं ठरवलं आणि या पलटणीकडून शस्त्रं काढून घेतली आणि त्यांना बडतर्फ केलं.

हा आपल्या मित्रांचा अपमान सहन न झाल्याने जे शिपाई अधिर झाले त्यात होता मंगल पांडे. देशातील प्रमुख नेते सार्वत्रिक उठावाची तारीख ठरवत असतांना मंगलच्या धाडसाला लगाम नव्हता. त्याच्या प्रमुखाची परवानगी मिळाली नव्हती. मंगल पांडेला या अपमानासाठी कळ सोसण्याचा दम नव्हता. त्याने लगेच कृती करुन टाकण्याचं ठरवलं. आणि परेडच्या मैदानात उडी घेऊन आपल्या साथीदारांनाही आपल्याबरोबर सामील होण्याची साद घातली. हे पाहाताच सार्जंट मेजर ह्यूसन याने मंगलला धरायला शिपायांना पाठवलं. पण एकही शिपाई मंगलला पकडायला धावला नाही. इतकंच नव्हे तर मंगल पांडेच्या बंदूकीतून सुटलेल्या गोळीने सार्जंटच जमिनीवर कोसळला. इतका गोंधळ होत असतांनाच लेफ्टनंट बॉ हाही तिथे आला. मंगलच्या बंदूकीतून दुसरी गोळी सुटली ती थेट बॉच्या घोड्याच्या पोटात शिरली आणि घोडा कोसळला. बॉसुध्दा खाली पडला. मंगलने त्याच्यावर आपली गोळी झाडण्यापूर्वीच बॉ धुळीतून उठून उभा राहिला आणि त्याने पिस्तूल झाडलं. गोळीचा नेम चुकला तोपर्यंत मंगलने आपली तलवार काढली आणि त्याच्यावर

हाणली. बॉ परत जमिनीवर पडला. तोपर्यंत आणखी एक गोरा अधिकारी मंगलवर चालून येतो आहे हे पाहून दुसऱ्या सैनिकाने आपल्या बंदूकीच्या दस्त्याने त्याच्या हल्ला चढवला. त्याचं डोकं ठेचलं. आणि मंगलला कुणीही हात लावायचा नाही अशी गर्जना सर्व शिपायांनी केली. इतक्यात कर्नल व्हीलर तिथे आला आणि मंगल पांडेला पकडण्याचा हकूम देऊ लागला. तेव्हा परत सैनिकांनी एल्गार केला आणि मंगलच्या केसालाही धक्का आम्ही लावू देणार नाही असा आवाज मैदानात घुमला. कर्नल पळून गेला आणि मंगल पांडे रक्ताने भरलेल्या हाताने मर्दांनो उठा अशी गर्जना करत हिंडत होता. जनरल हीर्से याला ही बातमी मिळाली. त्याबरोबर तो युरोपियन सोल्जर्सना घेऊन मैदानात आला. आता मात्र आपण या युरोपियनांच्या हाती लागणार याचा अंदाज आल्याबरोबर मंगल पांडेने आपली बंदूक आपल्याच छातीकडे वळवली आणि क्षणात तो खाली कोसळला. जखमी मंगलला हॉस्पीटलमधे नेण्यात येऊन वाचवण्यात आलं.

ती तारीख होती २९ मार्च १८५७.....मंगल पांडेवर खटला भरला गेला आणि त्याच्या साथीदारांची नावं सांगण्यासाठी प्रयत्न झाले पण मंगलने काहीही बातमी लागू दिली नाही. मंगलला मग ८ एप्रिलला फाशी झाली. सबंध बराकपूरमधे मंगल पांडेला फाशी देण्यास एकही मारेकरी पुढे आला नाही शेवटी कलकत्त्याहून चार मारेकरी बोलावण्यात आले. मंगल पांडेने पहिलं रणशिंग फुंकलं. ब्युगल वाजवलं होतं. मग स्वातंत्र्याचा उठाव देशभर पसरला. उत्तर भारतातील उद्रेकावर शिपायांचं बंड नावाने पुस्तके लिहिली पण भारतात दक्षिण भारतात जे उठाव झाले त्यावर कुठेही लेखन नव्हतं. डॉक्टर वा. द. दिवेकरांनी

London Parliamentary records, दक्षिणेतील संस्थानिकांच्या दरबारात असलेली अर्काइवज् मधील कागदपत्रे, डेक्कन कॉलेज, भारत इतिहास संशोधक मंडळ, यांची ग्रंथालयं, सरकारी कागदपत्रांचा अभ्यास करुन South India In1857-War Of Independence हे अत्यंत मोलाचं पुस्तक लिहिलं आणि दक्षिण भारतातील स्वातंत्र्य युध्दाच्या सहभागावर प्रकाश टाकला. त्याचं २००२ साली मराठीतील भाषांतर वि.ग. कानिटकर यांनी '' १८५७ चे स्वातंत्र्य युध्द- पेटलेला दक्षिण भारत'' असं केलंय. त्यांच्यामुळे द. भारतातील सहभाग उघड झाला.

या उठावाला बंड, शिपाई गर्दी अशी नावे दिली गेली पण वीर सावरकरांनी ब्रिटीश लायब्ररीत अनेक तास घालवून अनेक कागदपत्रांच्या अभ्यासाने याला स्वातंत्र्य समर म्हणायचं धाडस इंग्रज राजवटीतच केलं. "१८५७ चे स्वातंत्र्यसमर" या पुस्तकाची जन्मकथाही त्यांच्यासारखीच वीराला शोभेशीच आहे. वयाच्या २४ व्या वर्षी विद्यार्थी दशेत असतांना सावरकरांनी हा इतिहास सन १९०७ साली मराठीत लिहिला. त्याचा मजकूर ते फ्री इंडियाच्या सभासदांना तोंडी सांगत. इंग्रज सरकारच्या कानावर ही बातमी पोचली. मग त्यांनी या पुस्तकातीन दोन प्रकरणं गुप्तहेरांकडून मिळवून पोलिसांकडे दिली. आपल्या पुस्तकातील दोन प्रकरणं गहाळ झाल्याचं कळल्याबरोबर हे पुस्तक ताबडतोब छापायला पाहिजे हे सावरकरांच्या लगेच लक्षात आलं. त्यांनी अत्यंत गुप्तपणे ते भारतात पाठवलं पण ते छापायला इथे कुणी तयार होईना. पण सोलापूरच्या स्वराज्य मासिकाचे लिमये हे तयार झाले. पण पोलिसांची धाड येणार ही बातमी कळल्याबरोबर त्यांनी अत्यंत सावधपणे

ते पॅरिसला सावरकरांकडे पोचवलं. सावरकरांनी ते जर्मनीत छापायला पाठवलं पण तिथे काम झालं नाही तेव्हा परत इंग्लंडमधे आलं. तिथे सावरकरांनी इंग्रजीत त्याचं भाषांतर केलं पण इंग्लंड सरकारने छापण्याआधीच त्यावर बंदी आणली. त्यानंतर हे पुस्तक हॉलंडमधे छपाईसाठी पोचलं. तिथे छापलं गेलं आणि भारतभरच्या क्रांतीकारक तरुणांमधे त्याचं वाचन झालं. सावरकरांच्या या पुस्तकावरील बंदी उठवली जावी म्हणून सतत मागणी भारतीयांकडून होत होती. पहिल्या प्रांतिक निवडणुकीनंतर १९३६ मधे काँग्रेस सरकारच्या मंत्रीमंडळानेदेखील ती बंदी उठवली नाही. दुसऱ्या महायुध्दानंतर मात्र बंदी मानायची नाही असंच जेव्हा जनतेने ठरवलं तेव्हा १९४६ सालामधे त्यावरची बंदी उठली. मग युध्दाचं खरं स्वरुप जनतेसमोर आलं.

संतापाने घुसमटणाऱ्या आणि खदखदणाऱ्या असंतोषाच्या राशीवर आपल्या आहुतीची ठिणगी मंगल पांडे या वीराने टाकली. तिने सारा भारत युध्दाने पेटला. १८५७ चं स्वातंत्र्यसमर मंगल पांडे आपल्या उष्ण रक्ताने शिंपडून गेला. प्राणाने पेटवून गेला. ती ज्योत मग पुढील शतकातही अनेक क्रांतीकारकांनी आपल्या देहातील स्निग्धतेने ज्वलंत ठेवली. झांशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे. पेशवे नानासाहेब अनेकांनी आपलं बलिदान दिलं. रंगोबापूजींचा ठिकाणा लागलाच नाही. खुर्दा तर कितीएक होऊन गेला त्याला गणतीच नाही.

ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss....ss

**झांशीची राणी लक्ष्मीबाई.**

**पराक्रमाची ज्योत.**

**१७ जून १८५८.**



१९ व्या शतकाच्या सुरुवातीपासूनच इंग्रजी लोखंडी पंजा भारतावर दाबला गेला. त्यात राव आणि रंक, राजा आणि प्रजा सगळेच सारखेच भरडले जायला लागले. भारतीय ज्ञानाची, संस्कृतीची, राजघराण्यांची, साहित्याची, सर्वच क्षेत्रांची मोडतोड व्हायला लागली. असंतोषाची बारीकशी ठिणगी घराघरात, राजवाड्यात येऊन थांबली. त्यातच डलहौसी गव्हर्नर जनरल बनून आला. साम्राज्यावादाची त्याची भूक तर राक्षसी होती. वारस नसलेली संस्थानं त्याने खालसा करुन आपल्या अधिकाराखाली आणायला सुरुवात केली. आपला अधिकार आणि दौलत गमावलेले अनेक राजे व्यथित झाले. आपल्या देशाची ही मानहानी अनेकांना असह्य होऊ लागली. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे १८५७ चं स्वातंत्र्य युध्द. दुसऱ्या बाजीरावांचे पुत्र नानासाहेब पेशवे, यांच्या नेतृत्वाखाली हे युध्द खेळलं गेलं. सबंध भारतभर त्याचा भडका उडाला. या स्वातंत्र्य युध्दातला एक

ओजस्वी तारा म्हणजे झांशीची राणी लक्ष्मीबाई. ग्वाल्हेरच्या समरांगणावर इंग्रजी फौजेशी लढतांना अवघ्या २७ व्या वर्षी तिने वीरमरण पत्करलं. काय घडलं तिच्या आयुष्यात त्याची ही कथा.

रे हिंद बांधवा, थांब या स्थळी । अश्रू दोन ढाळी ।
ही पराक्रमाची ज्योत मावळे इथे झांसीवाली।
तांबेकुल वीरश्री ती । नेवाळकरांची कीर्ती ।
हिंदभू ध्वजा जणू जळती । मर्दानी राणी लक्ष्मीबाई मूर्त महाकाली ।
घोड्यावर खंद्या स्वार । हाती नंगी तलवार । खणखणा करित ती वार ।
गोऱ्यांची कोंडीफोडीत पाडित वीर इथे आली ।

कडकडा थरारे बिजली । इंग्रजी लष्करे थिजली ।
मग कीर्तीरुप ती उरली । ती हिंदभूच्या पराक्रमाची इतिश्रीच झाली ।
मिळतील इथे शाहीर । लववितील माना थोर । तरु झरे ढाळतील नीर ।
या दगडा फुटतील कथाया कथा सकळ काळी ।

असंच घडलं होतं सारं १७ जून १८५८ या दिवशी. ग्वाल्हेर दरबारचे राजकवी भा. रा. तांबे हे राणी लक्ष्मीबाईंच्या स्मारकाला भेट द्यायला गेले. त्या सिध्दहस्त कवीने ५ कडव्यांमधे राणीचं सगळं चरित्रच सांगून टाकलं.

नियती सतत व्यस्त असते. ती कुणाला तरी कुठेतरी उचलून ठेवते. त्याला प्रवाही करते. काही वर्षांच्यानंतर तिचा हा कावा लक्षात येतो. पारोळ्याचा मोरेश्वर तांबे असाच नोकरीच्या शोधात पुण्यात आला. पेशव्यांच्या वाड्यात होमशाळेत त्याला काम मिळालं. त्याच्या दोन वेळच्या जेवणाची भ्रांत सुटली होती. पण तिथेही युनियन जॅक फडकला. दुसरे बाजीराव विठूरला स्थिरावले आणि त्यांचे धाकटे बंधू चिमाजीआपा, काशीला जाऊन राहिले. मोरोपंत चिमाजीआपांबरोबर काशीला गेले. तिथे त्यांचा विवाह, भागीरथीबाईंशी झाला आणि १८३० च्या सुमारास एक कन्याही झाली. भागीरथी बाईंच्या पोटी काशीत जन्मलेल्या या कन्येचं नाव तिथल्या सुप्रसिध्द घाटाचं नाव, मनकर्णिकाच असायला हवं. चिमाजीआपा इ. स. १८३२ मधे वारले तेव्हा मोरोपंत ३ वर्षांच्या मनुला घेऊन विठूरला बाजीरावांच्या आश्रयाला गेले. त्यांच्या पत्नीचंही तेव्हा निधन झालं होतं. विठूरलाही त्यांना होमशाळेचंच काम मिळालं. मनकर्णिका तिथे छान रमली. तिला सवंगडी मिळाले ते बाजीरावांचे दत्तक पुत्र नानासाहेब, आणि तात्या टोपे. तिघेही भरपूर दांडगाई करायचे. बाजीरावांची तर ती लाडकी छबिलीच झाली होती. त्यामुळे सारं गाव तिला छबिली म्हणायचे. छबिली या आपल्या दोन बालमित्रांबरोबर, पुण्याच्या बाळाजीपंत देवधरांनी शोधून काढलेला, मलखांब, दांडपट्टा,घोडेस्वारी, तलवारबाजी सगळं शिकली.

बघता बघता मनकर्णिका ९ वर्षांची झाली पण तिचं लग्न जुळेना. सर्वांनाच तिच्या लग्नाची काळजी लागली. ती १२ वर्षांची झाली तेव्हा झांशीच्या सुभेदार गंगाधरपंत नेवाळकरांचं स्थळ बाजीरावांना कळलं.

गंगाधरपंत ३५ वर्षांच्या उमरचे होते. त्यांना एक मुलगाही होता. त्यांच्या पत्नीचं आणि मुलाचं निधन झालं होतं. त्यामुळे त्यांना लग्न करायचं होतं. घराण्याला वारस हवा होता. तांबे आणि नेवाळकर दोघेही कऱ्हाडेच होते, त्यामुळे गंगाधरपंत खूष झाले. सन १८४२ च्या मे महिन्यात वैशाख शुध्द दशमी या दिवशी गोरज मुहूर्तावर विवाह सोहळा पार पडला. मोरोपंतांनी आपल्याही लग्नाची सोय त्याच लग्नात करुन घेतली. त्यांचंही लग्न झालं. गंगाधरपंतांनी त्यांनाही एक वाडा सरकार खर्चातून घेऊन दिला. ३०० रुपये तनखाही दिला. गंगाधरपंतांनी मनकर्णिकेचं नाव लक्ष्मीबाई ठेवलं. तिला १० हत्ती आणि १० गावं भेट दिली. गंगाधरपंत उत्तम कारभार सांभाळत होते. त्यांचे इंग्रजांशी संबंधही चांगले होते. छत्रसालाने बाजीरावांना बुंदेलखंडातील झांशीचा पट्टा भेट म्हणून दिल्यावर पेशव्यांनी नेवाळकरांना आपला सुभेदार म्हणून तिथे नेमलं. त्या नेवाळकर घराण्यातील गंगाधरपंत १८३५ मधे सुभेदार बनले. नेवाळकरांनी इंग्रजांची तैनाती फौज जवळ न करता, इंग्रजांना जमिनीचा एक तुकडा देऊन आपल्या कारभारातून दूर ठेवलं होतं.

राणी लक्ष्मीबाईला दरबारी कामात लक्ष घालण्याची परवानगीच नव्हती. त्यामुळे तिला दरबारी कामकाजाची काहीच माहिती नव्हती. पण राणी आपल्या वाड्यात स्वस्थ बसली नाही. तिने गावातील स्त्रियांना एकत्र करुन लष्करी शिक्षण, व्यायाम शिकवायला सुरुवात केली. राणीला सन १८५१मधे पुत्र झाला. दामोदर नाव ठेवलं. मोठ्या दणक्यात बारसं पार पडलं. पण दुर्दैवाने ३ महिन्यांमधेच तो वारला आणि गंगाधरपंतांना वारसासाठी दत्तक घेण्याशिवाय पर्याय उरला नाही. गंगाधरपंतांची तब्येतही ढासळायला लागली तेव्हा १८५३

सालात गंगाधरपंतांचा चुलत नातू आनंद हा नवीन मुलगा दत्तक घेतला. झांशीचे पोलिटिकल एजंट एलिस आणि इंग्रजी लष्करी तुकडीचे अधिकारी मेजर मार्टीन यांना मुद्दाम दत्तक समारंभाचं आमंत्रण दिलं गेलं. त्याचंही नाव दामोदरच ठेवलं. योगायोग असा विचित्र की दुसरे दिवशी २१ नोव्हेंबरला गंगाधरपंत वारले आणि पुढच्या संकट काळासाठी राणी लक्ष्मीबाई तयार झाली.

इंग्रजांनी राणीचा वारसा हक्क नाकारला. डलहौसीने वारस नसलेली संस्थानं खालसा करायला सुरुवात केली. राणीने इंग्रजांशी मान्यता मिळावी या हेतूने पत्रव्यवहार सुरु केला. पण एजंट एलिस हा एक दिवस ग्वाल्हेर-बुंदेलखंड आणि रेवा संस्थानांचा पोलिटिकल एजंट मेजर डी. ए. माल्कम याचा जाहीरनामा घेऊन राणीच्या दरबारात राजवाड्यात हजर झाला. त्याने राणीच्या कारभाऱ्याच्या हातात तो जाहीरनामा ठेवला. कारभाऱ्याने तो जाहीरनामा वाचून दाखवला. सर्व नागरिकांनी यापुढे स्वत:ला ब्रिटीश सरकारचे नागरिक मानावे आणि आपला वसूल एलिस यांना द्यावा. संस्थान जरी खालसा झालं असलं तरी कंपनी सरकार राणी सरकारला भरपूर तनखा देणार आहे असं त्यात लिहिलं होतं. दरबारचं वातावरण गंभीर झालं. जाहीरनाम्याचं वाचन झाल्यावर एलिस परत जायला निघाला तेव्हा दरबारात हजर असलेली राणी चिकाच्या पडद्याआडून त्वेषाने म्हणाली, “मेरी झांसी नही दूँगी ” त्याक्षणी तिच्या मुठी वळल्याच असतील, संतापाने चेहरा लाल झालाच असेल आणि मूठ तलवारीवर गेलीच असेल. डोक्याला मंदिल, कमरेला तलवार, पुरुषी वेषात रोज दरबारात येणारी लक्ष्मीबाई चिकाच्या पडद्यामागे होती एवढंच तिचं स्त्रीपण. पण राणीला आपला राजवाडा सोडून गावातील राजवाड्यात जावंच

लागलं. फार कठीण अंधारमय काळ आला होता. आता हक्कासाठी लढणं अटळ होतं. सन १५२६ मधे रुद्रप्रताप नावाच्या शूराने बुंदेलखंडाची स्थापना केली. त्याच्याच वंशातल्या जूदेवचंद्राने १६५३ मधे बळवंत नगरमधे बंगिरा टेकडीवर एक रंगमहाल बांधला. तीच झांसी आणि तोच महाल पुढे आणखीन बळकट होत गेला आणि किल्ला बनला..

सारा भारत ताब्यात आल्यावर इंग्रजांची दुष्ट नखं बाहेर आली. तंजावर-नागपूर-सातारा अशी अनेक संस्थाने खालसा करतांना इंग्रजांनी निर्दयीपणाचा, अमानुषपणाचा कळस केला होता. संस्थानिकांचे वारसा हक्कच इंग्रजांनी काढून घेतले तेव्हा राजापासून गरिबांपर्यंत सारी जनता पेटून उठली. बाजीरावांचे पुत्र नानासाहेब, सातारचे रंगोजीबापू, कोल्हापूरचे चिमासाहेब महाराज, अनेकानेक प्रमुख एकत्र आले आणि स्वातंत्र्य युध्दाचा उठाव करण्याचा गुप्त बेत आखू लागले. पण मंगल पांडेने घोटाळा केला आणि क्रांती उठावाला आधीच सुरुवात झाली. १९ सप्टेंबर १८५७ मधे सर ह्यू रोज मुंबई बंदरात उतरला. बुंदेलखंडाच्या कामगिरीवरच त्याची नेमणूक केली होती. १६ डिसेंबरला मुंबईहून निघाला आणि १० दिवसांमधे इंदूरला पोचला. तिथे ख्रिसमस साजरा करुन झांशीकडे निघाला. वाटेतील लहान मोठे संस्थानिक जिंकत १९ मार्चला झांशीच्या रस्त्याला लागला. आणि २० तारखेला झांशीपासून १४ मैलांवर चंचनपूरला आला. २१ तारखेला प्रचंड मोठी फौज घेऊन त्याने झांशी परिसरात प्रवेश केला. आजूबाजूची संस्थानं इंग्रजांच्या हाती जात आहेत हे राणीलाही कळत होतं. तिनेही हे संकट छातीवर घ्यायची तयारी पूर्ण केली होती. एखादं कार्य घरात निघावं तेव्हा त्या घरातील स्त्री ज्या तडफेने

सर्व तयारी करते तसं आव्हान राणीनेही झांशीच्या रक्षणासाठी स्वीकारलं. झांशीची राणी लक्ष्मीबाई युध्दाला तयार झाली.

## झांशीची घनघोर लढाई.

२१ मार्चला ह्यू रोजच्या फौजेने झांशी परिसर व्यापून गेला. ह्यू रोजने आल्याबरोबर एका टेकडीवर मनोरा बांधून त्यावर तारायंत्र बसवलं. मोठ्या दुर्बिणीतून तो झांशीच्या किल्ल्याची पहाणी करायला लागला. हा किल्ला सहज हाती पडणार नाही हे त्याच्या लगेच लक्षात आलं. ताबडतोब कामाक्षी टेकडी, जार पहाडी, जीवनसहाय टेकडीवर त्याने तोफा चढवल्या आणि दुसरे दिवशीपासून तोफा उडवायला सुरुवात केली. राणीकडे १० हजार बुंदेले फौज, अफगाणी फौज, १५०० पायदळाचे शिपाई, आणि ४०० घोडदळ होतं. घौसखान, खुदाबक्ष, आणि मोतीबाई, घनगर्ज-भवानीशंकर-कडकबिजली या तीन महाकाय तोफांवरून गोलंदाजी करायला तयार झाले. इंग्रजी फौज आपल्या टप्प्यात आलेली पहाताच पहिली तोफेची बत्ती राणीनेच झाडली. शत्रूचे तोफांचे गोळे शहरावर पडू लागले. घरात बसलेली माणसं छत कोसळून जखमी व्हायला लागली. परत तोच गोळा आणखी खाली जाऊन तिथेही सगळं जळून राख होऊन जात होतं. अंगात खिळे घुसून जखमी होऊ लागली. घरांना आगी लागल्या. गुरं मरायला लागली. दोन दिवसांमधेच लढाईने उग्र रुप धारण केलं. राणीने अन्नछत्राची जनतेसाठी सोय करुन ठेवली. देवळांमधे त्यांच्या राहण्याची सोय केली होती. जखमींवर उपचार करणं थांबत नव्हतं. तटावर पडणाऱ्या गोळयांमुळे भिंतींमधे भगदाड पडलं की रातोरात माणसं ते बांधून काढत. त्यांना

दगड विटा आणुन द्यायचं काम बायका करत होत्या. सर ह्यू रोजने एक दिवस दुर्बिणीतून पाहिलं की गावातील बायका तोफांची दारू भरण्याचं काम करत आहेत. तो थक्क झाला. ७ दिवसांनी काहीच फरक पडला नव्हता त्याचा ह्यू रोजवर ताण आला. त्यातच बातमी आली की तात्या टोपे मोठी फज घेऊन येतो आहे. राणीने पेशव्यांना मदतीला येण्याचं पत्र पाठवलं होतं. ३१ मार्चला तात्या टोपे १२०००, २८ तोफा, अनेक हत्ती घोडदळ अशी मोठी फौज घेऊन मदतीला आले पण ह्यू रोजने आपल्या घोडदळाच्या तीन तुकड्या केल्या आणि तात्यांची फौज आवळली. प्रचंड फौजेसमोर तात्या टोपेंचं काही चाललं नाही. ती मदतही वायाच गेली होती.

एक दिवस खबऱ्यांनी बातमी आणली आणि शहराच्या पाणीपुरवठ्याची एकच विहीर होती ती जागा त्याला कळली. कारण कावड घेऊन जाणारा माणूस दुर्बिणीतून त्याने पाहिला. इंग्रजी तोफा त्यावर चालल्या आणि पाण्यावर गोळा पडला. सगळीकडे चिखल झाला. तिथे उभी असलेली माणसंही मेली. शहराचा पाणीपुरवठाच बंद झाला. एक दिवस तोफांची दारू मणामणाने बनवली जात होती आणि साठवली जात होती ती जागा ह्यू रोजला कळली. त्याच्या तोफांनी नेमक्या जागेवर गोळा टाकला. प्रचंड मोठा भडका उडाला आणि राणीचा तोफखानाच कमकुवत झाला. राणीचे गोलंदाज खुदाबक्ष आणि घौसाखानही ठार झाले. राणी हताश झाली. त्यातच शहरात कुठून घुसता येईल याची माहिती खबऱ्यांनी आणली. रात्रीच्या प्रकाशात इंग्रजी फौज येतांना राणीला दिसली. तटबंदीला शिड्या लावून सैनिक आत चढत होते. त्यांच्यासाठी राणीच्याच एक फितूराने दरवाजा उघडला. राणीला बाणावरच्या

राजाने सावधानतेचा इशारा देऊन घरात कुणीतरी भेदी आहे त्याचा शोध घे असं सांगितलं होतं. तो तिचा सरदार दुलाजीसिंगच होता. इंग्रजी फौज शहराच्या रस्त्यावरून कापाकापी करत चालली. राणीची फौजही शत्रूला भिडली. गावातले लोकही संरक्षणाला सामील झाले. पुरुष मरायला लागले, बायकांनी अब्रूसाठी विहिरीत उड्या मारल्या. लहान बाळं रडायला लागली. प्रेतांचा गावात ढीग पडला. रक्ताचे पाट वाहायला लागले. शत्रू राजवाड्यासमोर आला. त्या सैनिकांनी राणीचं ग्रंथालय जाळलं. हजारो हजारो पुस्तकांची होळी झाली. राणीचे पागेतले घोडे उधळले गेले. शत्रू घरांना आगी लावत सुटला. राजवाड्यातील मौल्यवान वस्तूंची प्रचंड लूट झाली. गावातली जनावरं भेसूरपणे ओरडत घायाळ होऊन हंबरत होती. गाव सगळा भेसूर झाला. मरणकळेने काळवंडला.

राणी किल्ल्याच्या तटावरुन ते पाहात होती. तिची झांशी आगीत होरपळत होती. तिची जनता मरण सोसत होती.राणी संतापाने हातात निमुळती तलवार घेऊन घोड्यावरुन बाहेर पडली. राणीचा एवढा आवेश कुणी पाहिला नव्हता.. सपासप शत्रूला कापत शहरात घुसलेल्या गर्दीतून राणी पुढे पुढे निघाली. तो तिचा आवेश, तिची हिंमत, तिचं लढणं, तिची तलवारबाजी, तिचा सुंदर चेहरा, सर ह्यू रोज थक्क होऊन बघत होता. आता शत्रू पिस्तूलं चालवू लागला तेव्हा राणी एखाद्याच्या गोळीला बळी पडेल म्हणून तिच्याच वृध्द सरदाराने तिला विनवलं. आता संध्याकाळ झाली आहे. आपण परत फिरावं. झांशी नंतरही घेता येईल. आधी पेशव्यांकडे जावं, त्यांची मदत घेऊन परत झांशी जिंकावी. राणीने असहायपणे, नाईलाजाने होकार दिला. राणीने त्या

राक्त्री आपल्या देहाची विटंबना होऊ नये म्हणून सती जाण्याचा निर्णय घेतला. सर्वांना बोलावून आपापला निर्णय घेण्यास सांगितलं. पण तिच्या सहकाऱ्यांनी तिला वचन दिलं की मरणानंतरही तिच्या देहाची विटंबना आम्ही होऊ देणार नाही. आपण शत्रूशी लढत मरु. .रात्र झाली की किल्ल्यातून बाहेर पडून पेशव्यांकडे काल्पीला जाऊ. तिथे खूप फौज आणि शस्त्रास्त्रं आहेत.

राणीने ते मान्य केलं.तिने सर्वांना बोलावून काहीना काही वस्तू भेट देऊन त्यांचा निरोप घेतला. राणीचे वडील मोरोपंत एका हत्तीवर राहील एवढा खजिना घेऊन बाहेर पडणार असं ठरलं. राणीने गुप्त मार्गाने बाहेर पडायचं ठरवलं. ४ एप्रिलची रात्र गडद झाली. मध्यरात्री राणीने सर्व अंगाभोवती तारेचं वेटोळं घातलं. ती पांढऱ्या घोड्यावर बसली. मागे दामोदरला दुपट्ट्याने बांधलं. जमलेल्या सर्वांनी तिला भरल्या डोळ्यांनी निरोप दिला. फक्त एक चांदीचा पेला मुलासाठी घेतला. तिचा पोशाख पूर्ण पुरुषी होता. पायात बूट होते. कंबरेला जांबिया, खांद्याला तलवार लटकवली. २० २५ स्वार, काशी-सुंदर-मुंदर या जिवाला जीव देणाऱ्या दासी घेऊन ती उत्तरेच्या खंडेराव दरवाजाने बाहेर पडली. गस्त घालणारे आहोत असं सांगत सगळे बाहेर पडले. बरोबरचे लोक घेऊन बंदूकीचे आवाज काढत ती भरधाव निघाली. राणी, तिची दासी, आणि एक घोडेस्वार तिघंच काल्पीच्या रस्त्याला लागले. राणीच्या वाटाड्यांनी जंगलामधून आड वाटेने कठीण मार्गाने राणीला सुखरुप शहराबाहेर काढलं. ह्यू रोजला सकाळी राणी पसार झाली हे कळल्यावर कमालीचा धक्का बसला. एवढ्या कडक बंदोबस्तातही ती गेली कशी ते कुणालाच कळलं नाही. राणी निघून गेली. झांशी हातात आली. ह्यू रोजने लढाई सुरु होण्याआधीच शहरात

लढाई संपल्यावर विजन होणार असल्याची माहिती दिली होती. विजन म्हणजे, शहर जिंकल्यावर इंग्रज लोक, गावातील ५ वर्षांपासून ८० वर्षांपर्यंतच्या सर्व पुरुषांना कापून काढत असत. शहर हातात आल्यावर विजन सुरु झालं. आपली दहशत बसावी म्हणून हजारो लोकांना फाशी देऊन, झाडांना त्यांची प्रेतं लटकवत ठेवली. प्रचंड लूट झाली. हिंरे, माणकं, सोनं , गुरं, कपडा, चांदीची भांडी, सगळं सगळं ३ दिवस लुटलं गेलं.

इकडे राणी मध्यरात्री निघाली ती पहाटे २१ मैलांवर भांडेर गावात पोचली. तिथे आपल्या मुलाला खायला घालून आपले विधी उरकून परत निघाली. इतक्यात ह्यू रोजने पाठवलेला बौकर तिथे पोचला राणीने त्याच्या मांडीवर एवढ्या तडाख्याचा वार केला की मांडी तुटायची राहिली. कारण मांडीवर बंदूक लटकत होती. बौकर परत फिरला. राणी वेगाने काल्पीकडे निघाली ती मध्यरात्री काल्पीला पोचली. प्रचंड वेगाने आपल्या मालकिणीला घेऊन दौडत जाणारा तिचा लाडका घोडा राणी उतरल्याबरोबर धाडकन आडवा पडला. राणीने तिच्या लोकांना त्याचे सगळे स्नायू मालीश करायला सांगून ती घरात गेली. तिने पेशव्यांना निरोप पाठवला. राणीचा मासिक धर्म सुरु झाला होता आणि तिच्या अंगावरच्या कपड्यांशिवाय एक कापडही तिच्याजवळ नव्हतं. पेशव्यांनाही प्रश्न पडला लष्करी छावणीत बायका आणि साड्या कुठल्या असायला. पण राणीची सोय झाली आणि सगळे दुसरे दिवशी पुढच्या बेतांना लागले. ग्वाल्हेरला जायचा बेत निश्चित झाला. राणी निघून गेली म्हटल्यावर ह्यू रोजही सर्व फौज गोळा करुन काल्पीकडे निघाला. तिथेही मराठा

फौजेची आणि ह्यू रोजच्या फौजेची लढाई जुंपली. काल्पीची लढाईही हरल्यावर पेशवे, राणी तिथून निसटून ग्वाल्हेरच्या शहरात येऊन दाखल झाले.

झांशी शहरावर ताबा मिळवल्यावर राणीला फितूर झालेल्या दुलाजीसिंगला तिथल्या कमिशनरने बोलावून घेतलं. त्याची चौकशी केली. त्याच्या अनेक पिढ्यांनी या घराण्याची सेवा केली होती हे कळल्यावर दुलाजीसिंगचं डोकं उडवलं आणि त्याच्या भावांना गोळया घातल्या. झांशी हातून गेली.

झांशीची लढाई हा तेजस्वी राणीच्या बहादूरीचा आणि पराक्रमाचा तो पूर्वार्ध होता.

## १७ जून १८५८. अमर दिन.

राणी लक्ष्मीबाई काल्पीला पोचली. पाठोपाठ सर ह्यू रोजही काल्पीजवळ यायला लागला. त्याला अडवायला पेशव्यांची फौज पुढे आली. फिरंग्यांची पेशव्यांच्या फौजेशी काल्पीहून ४२ मैलांवर कुंच इथे गाठ पडली. राणीने इथेही पराक्रमाची कमाल केली. ह्यू रोजच्या तोफा पोचू नयेत म्हणून तिने रस्त्यात जागोजाग मोठे खड्डे खणून ठेवले. पण इंग्रजांचा विजय झाला तेव्हा राणी आणि पेशवे कुंचहून काल्पीला गेले. पाठोपाठ ह्यू रोजही तिथे पोचला. तिथेही घनघोर लढाई झाली. काल्पीमधे तर गावातील बायकाही शत्रूशी लढल्या. इथेही तिच्या अलौकिक शौर्याचं प्रदर्शन सैनिकांना पाहायला मिळालं. राणीने तर ह्यू रोजच्या तोफाच बंद पाडल्या. ते बघून तिची फौज जोराने इंग्रजी फौजेवर चालून गेली. राणीने सर्वांच्यात चैतन्यच निर्माण केलं होतं. राणीचा विजय होणारच होता पण एका जबरदस्त सेनानीचा वकूब पाहायला मिळाला.

त्याने कधी नव्हे ती आपली उंटांची तुकडी बाहेर काढली. उंटावर बसलेल्या त्याच्या सैनिकांनी बाणांचा मारा सुरु केला. पेशव्यांच्या तलवारी बंदूकांचा काहीही उपयोग झाला नाही. त्या बाणांनी सारं सैन्य पळायला लागलं. जखमी झालं. पराभव समोर दिसायला लागला आणि काल्पी सोडणं राणीला आणि पेशव्यांना भाग पडलं.

राणी, पेशवे, आणि मस्तानचा नातू अलिबहाद्दर यांनी ग्वाल्हेरला जायचा निर्णय घेतला कारण ते एकच शहर आसऱ्यासाठी शिल्लक राहिलं होतं, नाहीतर जायचं तरी कुठे? सगळीकडे इंग्रजांचंच राज्य होतं. इतके दिवस काल्पीत नसलेले तात्या टोपेही ग्वाल्हेरला या फौजेला येऊन मिळाले होते. शिंदे पूर्णपणे इंग्रजांच्या पक्षाचे होते. त्यांना ही फौज आपल्याकडे येते आहे हे आवडणारं नव्हतंच. ग्वाल्हेरचे राजे जयाजीरावांनी या लोकांना निघून जायला सांगितलं. आणि मग स्वत:च मोठी फौज घेऊन राणीच्या फौजेवर चालून गेले. राणीची फौज तोफांच्या माऱ्याने पळून जायला लागली तेव्हा परत राणी सर्वांसमोर आली आणि तिने त्यांना लढण्यासाठी चेतवलं. तेव्हा मात्र जयाजीराव शिंद्यांची फौज पूर्णपणे हरली. जयाजीराव इंग्रजांच्या आसऱ्याला आग्र्याला गेले. ग्वाल्हेर राणीच्या ताब्यात आलं. ज्या महादजी शिंद्यांनी इंग्रजांवर आपली दहशत बसवली होती, त्यांच्याच वंशजाने इंग्रजांचा आश्रय घेतला होता..

नानासाहेब पेशव्यांचे बंधू रावसाहेब, तात्या टोपे आणि राणीने शहरात प्रवेश केला तेव्हा पुरुषी वेषातल्या राणीला पाहून लोकांनी जयजयकार केला. नानासाहेब पेशव्यांच्या नावाने द्वाही फिरवून रावसाहेब राजवाड्यात राहायला

गेले पण राणी मात्र नवलखा बागेतील वाड्यात राहायला गेली. या तिघांच्या हाती खजिना आला, इतके दिवस मार्च-एप्रिल-मे च्या कडकडीत उन्हातान्हातून लढणाऱ्या फौजेला पोटभर खायला आणि स्वस्थपणे राहायला मिळालं. राणी मात्र दुसरे दिवशीपासून आपल्या ताब्यातील २५० फौजेची कवायत घ्यायला लागली. कारण तिला इंग्रजांच्या फौजेची शिस्त कळली होती. रावसाहेब पेशव्यांनी बायजाबाई शिंदे यांना दोन पत्रं पाठवली, ती बायजाबाईंनी गव्हर्नर जनरलकडे पाठवल्यामुळे. सर ह्यू रोजला आपोआप या फौजेचा ठावठिकाणा कळला. आता त्यांनीही ग्वाल्हेरचा रस्ता धरला. सकाळचा कडकडीत उन्हाचा मारा चुकवण्यासाठी त्याने रात्री प्रवास केला.

आता ह्यू रोजच्या मदतीला ५ जूनला ब्रिगेडियर स्मिथ आणि कर्नल रिडलही आले. ह्यू रोजने लगेच रणनीती आखली. पेशव्यांची फौज कोंडीत पकडण्यासाठी, आग्र्याच्या बाजूने रिडलला थांबायला सांगून, स्मिथला ग्वाल्हेरच्या कोटाकी सराईला ४ मैलांवर राहायला सांगितलं आणि दक्षिणेला हैद्राबादच्या निजामाची पलटण ठेवली. ह्यू रोजने ग्वाल्हेरच्या अशा तीन दिशा बंदिस्त केल्या. १६ जूनला ह्यू रोज ग्वाल्हेरपासून ९ मैलांवर, मोरार छावणीजवळ ५ मैलांवर येऊन थांबला. त्याने मोरार छावणीवर हल्ला करुन ती ताब्यात घेतली. त्याने राणीला पकडून देणाराला २०, ००० रुपयांचं बक्षिस जाहीर केलं. १७ जूनला ब्रिगेडियर स्मिथ कोटाकी सराईवर आला. तिथून ग्वाल्हेरकडे जाणारा रस्ता छोट्या टेकड्यांचा, लहान रस्त्यांचा होता. तो ताब्यात असणं महत्त्वाचं होतं. कोटाकी सराई ताब्यात घेऊन ब्रिगेडियर स्मिथ हल्ला करायला पेशव्यांच्या फौजेच्या दिशैने निघाला.

१७ जूनची सकाळ उजाडली होती.. राणीकडे इंग्रज जवळ आल्याची बातमी आलेलीच होती. आता कधीही हल्ला होण्याची शक्यता होती. राणी सकाळी आपल्या फुलबागेतील छावणीत आपला लाल रंगाचा लष्करी पोशाख घालून सकाळी सरबत पीत तयार बसली होती. एवढ्यात बातमी आली की स्मिथची फौज हल्ला करायला कोटाकी सराईवरुन निघाली आहे. राणीने दामोदरला रामचंद्रपंतांच्या ताब्यात दिलं. तिच्या सुंदर-मुंदर सख्या तिच्याबरोबर सावलीसारख्या होत्याच. सततच्या धावपळीने तिचा लाडका घोडा आज खूप थकल्यामुळे त्याला न घेता राणीने पागेतून नवीन देखणा घोडा घेतला आणि त्यावर स्वार होऊन ते तेजमय रुप, वेगाने आपल्या फौजेसकट शत्रूला जाऊन भिडलं.

फिरंग्यांवर तिच्या तलवारीचे सपासप वार सुरु झाले. एकेक फिरंगी जखमी व्हायला लागला नाहीतर कोसळायला लागला. तिच्या या आवेशाने ब्रिगेडियर स्मिथही थोडा मागे सरला. राणीची शूर फौज स्मिथच्या फौजेवर तुटून पडली. घनघोर युध्द माजलं. स्मिथला आपण पूर्णपणे मागे ढकलले जाणार हे लक्षात आल्याबरोबर स्मिथने मग आपला तोफखाना बाहेर काढला. तोफांचे गोळे, त्यांची आग, जून महिन्यातला ग्वाल्हेरचा सकाळचा कडक उन्हाळा, मरणारी, मारणारी, किंचाळणारी, जखमी होणारी फौज, यामुळे भीषण दृष्य पसरलं. राणीला मात्र कशाचंही भान नव्हतं. ती बेभानपणे, बेहोषीने सपासप वार करत लढत होती. मर्दांच्या गर्दीत आपला घोडा रेटत होती. आपल्या मांडीच्या दाबाने त्याला हवं तिथे नेत होती, वळवत होती. इतक्यात रिडलची फौज स्मिथच्या मदतीला आली. त्या नव्या दमाच्या फौजेने रणांगणावर प्रचंड

चेंगराचेंगरी झाली. या नवीन फौजेपुढे आपण टिकणार नाही हे राणीच्या लक्षात आलं. तिचे सैनिक या गर्दीत विखुरले गेले आणि राणीने तिथून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला., तिचे १० / १५स्वार आणि सुंदर मुंदर एवढे त्या गर्दीतून बाहेर पडले. तेवढ्यात राणीच्या सुंदरला गोळी लागली. बाई मी मेले असं ओरडत ती जमिनीवर कोसळली. राणी मागे फिरली. एका स्वाराला तिच्या देहाची काळजी घ्यायला सांगून पुढे निघाली.

धावता धावता मध्येच एक ओढा आला. राणीने घोड्याल टाच दिली. पण.....पण घोडा अडला. तो पुढे जाईचना. त्याला लांब छलांग मारता येईना. तो परत परत मागे जायला लागला. राणीच्या परिचयाचा तो नव्हता, त्यामुळे राणीची भाषा त्याला कळली नाही. इतक्यात इंग्रज स्वार तिथे येऊन पोचले. तिची आणि त्यांची तलवार भिडली. एका स्वाराने राणीवर मागच्या बाजूने वार केला. तो राणीच्या मस्तकावर पडला. राणीचा उजवा डोळा बाहेर आला आणि लोंबू लागला. मस्तकातून रक्ताची धार लागली पण राणीची तलवार चालूच होती. त्याचवेळी दुसऱ्या स्वाराने तिच्या कुशीत तलवार खुपसली. राणी घोड्यावरून खाली आली. त्या स्वारांनी तिच्या गळ्यातला मोत्याचा मौल्यवान कंठा काढून घेतला आणि ते पुढच्या स्वाराच्या मागे गेले. आपण राणीला मारलंय हे तिच्या पुरुषी वेषामुळे त्यांना कळलंच नाही. राणीचा देह तिच्या साथीदारांनी आणि रामचंद्रबाबांनी त्वरेने उचलला. जवळच्या गंगाधरबाबा नावाच्या संन्याशाची झोपडी दिसली. तिथे तिला नेलं आणि गवताच्या गंजीवर ठेवून अग्नी दिला. तेजाला तेज मिळालं. त्या अग्नीत राणी भस्म होऊन गेली. स्वर्गारोहणाला एका अग्निशलाकेला अग्निरथाशिवाय कोणता रथ मिळणार ?

राणी कशी गेली यावर निरनिराळे प्रवाद उठले. तिचा देह शत्रूच्या हाती लागला नाही, तिची मरणोत्तर विटंबना झाली नाही, ही भारतमातेची पुण्याई.

ग्वाल्हेरची लढाई मोडली. तात्या टोपे आणि रावसाहेब पेशवे रणांगणावरुन बाहेर पडले. इंग्रजांनी त्यांच्यासाठी १०,००० ची बक्षिसं लावली. दोघेही वेषांतर करुन भारतभर हिंडत राहिले. शेवटी रावसाहेब पेशवे जम्मूमधे असतांना एका भीमराव नावाच्या माणसाने इंग्रजांना फितूर होऊन रावसाहेब पेशव्यांचा पत्ता इंग्रजांना कळवला. रावसाहेबांना अटक झाली. खटला भरण्याचं नाटक झालं आणि रावसाहेब पेशव्यांना २० ऑगस्ट १८६२ विठूरला पेशव्यांच्या राजवाड्यासमोरच फाशी देण्यात आलं. तात्या टोपे अजून गुप्तपणे हिंडतच होते. त्यांची आणि नरवीरच्या राजा मानसिंगची ओळख झाली. या मानसिंगने इंग्रजांना तात्या टोपेंचा ठावठिकाणा सांगितला. ७ एप्रिल १८६९ या दिवशी इंग्रजांनी टोपेंना ते झोपलेले असतांना पकडलं. नंतर सिप्री गावात त्यांना फाशी देण्यात आलं. पण ते तात्या टोपेच होते की नाही यावरही प्रवाद उठले.

आणि वडील मोरोपंतांचं काय झालं? राणीबरोबर तेही बाहेर पडले. एका हत्तीवर मावेल एवढा खजिना त्यांनी बरोबर घेतला. त्यांची इंग्रजी शिपायांशी झुंज झाली. त्यात त्यांच्या मांडीला जबरदस्त जखम झाली. तरी त्यांनी प्रवास चालू ठेवला. पण मारेकऱ्यांना चुकवतांना ते रस्ता चुकले आणि दतिया राजाच्या हद्दीत शिरले. दतियाच्या राजाचं आणि झांशीचं महावैर. मोरोपंतांना मांडीच्या जखमेमुळे प्रवास अशक्य झाला तेव्हा ते एका गावात शिरले. तिथे विड्याची पाने विकणाऱ्या एका माणसाला पैसा देऊन आश्रय मागितला. मोरोपंतांजवळची माहिती राजाच्या दिवाणाला कळली. त्याने

मोरोपंतांना कैद करुन इंग्रजांकडे झांशीला पाठवलं. मोरोपंतांना फाशीची शिक्षा झाली. तेही संपले.

वीरांगना राणी, तिचे साथीदार, वडील साऱ्यांचा असा शेवट झाला. राणी लक्ष्मीबाईने १८५७-५८ चा हिंदुस्थानचा उठाव तेजस्वी केला. वडील दुसऱ्या बाजीरावांचे आश्रित, त्यातून राणी एक स्त्री, राज्य करण्याचा जराही अनुभव नाही, गंगाधरपंतांनी तो मिळूही दिला नाही, तरीही गंगाधरपंतांच्या जाण्यानंतर नेवाळकरांच्या घराण्याची कीर्ती अमर केली.. इ.स . १८५३ पासून सुरु झालेला राणीचा लढा थांबला. गंगाधरपंतांना स्त्रियांचा कपडे, दागिने घालण्याचा शौक होता. ते स्त्रियांसारखे सगळे सण, हळदीकंकू असे उत्सव साजरे करत. आणि राणी कायम पुरुषी वेशात वावरली. मर्दानी रानी लक्ष्मीबाई म्हणून गाजली. विचित्र योगायोग असा की आजही, पाठीमागे मुलाला बांधलेला तिचा अश्वारुढ पुतळा भर चौकात चैतन्य देत उभा आहे. आणि तिच्या मागेच हयातभर स्त्री वेषातील भूमिकेने गाजलेल्या एका महापुरुषाचा रंगमहाल साथीला उभा आहे.

जशी आपली, रे हिंद बांधवा कविता, तशी सुभद्राकुमारी चौहानची कविताही खूप गाजली. त्या म्हणतात,

**तेरा स्मारक तूही होगी। तू खुद अमिट निशानी थी। बुंदेले हरबोलोंके मुँह। हमने सुनी कहानी थी।**

**खूब लडी मर्दानी वह तो। झांसीवाली रानी थी।**

# समारोप

या खंडप्राय भारतात वीरांच्या तलवारी खणखणतच राहिल्या. बंदूकींचे बळी धारातीर्थी कोसळत राहिले. आक्रमण करणाऱ्या प्रत्येक अन्यायाविरुध्द आणि शत्रूविरुध्द भारतीयांचा आवाज उठतच राहिला. १८०० ते १९०० या शंभर वर्षांमधे भारतात आणि जगाच्या रंगमंचावर सत्तांधीशांच्या अनेक कठपुतळ्या नाचल्या. भारतात या शतकात महत्त्वाचे तीन बदल घडून आले. त्यात पहिला बदल म्हणजे इंग्रजी सत्तेचा अंमल सर्व देशभर सुरु झाला. त्यामुळे सबंध देश एकसंध झाला. इंग्रजांच्या एकाधिकारशाहीला सुरुवात झाली. त्यांच्या जुलूमांमुळे त्याच शतकाच्या मध्यावर, इंग्रजी सत्तेविरुध्द आवाज देशभर घुमला, त्यातून १८५७ सालचा स्वातंत्र्ययुध्दाचा वणवा पेटला. पण तो चिरडला गेला. दुसरा बदल म्हणजे १८८५ मधे सर ह्यूम यांनी नॅशनल कॉंग्रेसची स्थापना करुन राजेशाही आणखीनच कमकुवत केली आणि भावी लोकशाहीचं बीज रोवलं. त्यात अनेक भारतीय राजकारणी सामील झाले. आणि तिसरी घटना म्हणजे, लोकमान्य टिळकांसारख्या जहाल नेत्यांचा आणि अनेक क्रांतीकारकांचा उदय.

याचवेळी १८०० ते १९०० या कालखंडात जगाच्या राजकारणावर तर पृथ्वी उलटी फिरावी इतके बदल घडून आले. फ्रान्समधे नेपोलियनचा झालेला उदय हा सर्व युरोपियन राष्ट्रातील तरुणांना आणि विचारवंतांना नवीन दृष्टी देऊन गेला. त्याच्या रिपब्लिक आणि रिव्होल्युशन या शब्दांनी राजघराण्यांना घरघर लागली. नवविचारांचे वारे जगभर वाहू लागले. लोकसत्ताक विचार घराघरात

घुसळले गेले. तरुणांनी राजसत्ताक प्रस्थापितेविरुध्द बंड करायला सुरुवात केली. विचारवंतांचे विचार साहित्यातून नवीन दिशा देऊ लागले. दुसरा मोठा बदल म्हणजे औद्योगिक क्रांती. या विज्ञानाने तर जुनं होतं ते सर्वच धडाधडा कोसळायला लागलं. या औद्योगिक क्रांतीमुळे उद्योजक, कामगार, मध्यम वर्ग आणि मासिक वेतन हा चार शब्दांचा आणि वर्गांचा उदय झाला. त्यात उमराव, अमिर ही पदं विलयाला गेली. लष्कर हे आजवर अर्थार्जनाचं साधन होतं त्याचं महत्त्व कमी झालं. हे सर्व जगभर पसरायला लागलं. त्यातून राजसत्ता विरुध्द लोकसत्ता हा संघर्ष सुरु झाला. त्यातून लढाया होऊ लागल्या. युरोप, आफ्रिका आणि आशियात पसरललेल्या ऑटोमन साम्राज्यात, तुर्की सुलतानांविरुध्द उठाव झाला, संसद स्थापन झाली, यंग टर्क्स नावाची तरुण संस्था स्थापन झाली. युरोपियन देशांमधल्या राजघराण्यांनाही आपले हक्क सोडून देण्याची वेळ आली. भारतातही इंग्रजी एकाधिकाराविरुध्द आंदोलनं सुरु झाली.

या भरतभूमीत सतत काहीतरी घडत गेलं. स्त्री-संतती-संपत्ती-सत्ता या मोहाच्या धाग्यांना राग-लोभ-मोह-मद-मत्सर यांचे रंग चढले. पृथ्वीराज चौहान संयोगिता या स्त्रीमुळे संपला. संततीमुळे तर महाभारत घडलं. संपत्तीच्या मोहांनी परदेशी टोळ्या आल्या आणि इथल्या निसर्गदत्त सौंदर्याला ओरबाडून गेल्या. विश्वसम्राट होण्याची स्वप्नं घेऊन सिकंदरने या देशात पाऊल ठेवलं. त्यांच्यामुळे शवांच्या राशींनी समरांगणं विस्कटली. अतुल बाहूबल, अलोट मनोबल, अवर्णनीय शरीरबल, यांचं या संगरांमधून दर्शन घडलं. पण त्याच लोहपुरुषांचा पुत्रवियोगाने मृत्यू होणं हे अनाकलनीय कोडंही दिसलं. मंगोलांच्या वकिलांच्या स्वागतासाठी वेशीवर भुसा भरलेली प्रेतं टांगणारा आणि त्यांचं दहशतीने

स्वागत करणारा बलबन सुलतान आपला आवडता शहजादा मरण पावल्यावर पुत्रशोकाने प्राण सोडतो, आणि दुसरीकडे झांशीच्या रक्षणासाठी काल्पीला गुप्तपणे गेलेली राणी लक्ष्मीबाई आपल्या लहान पुत्रासाठी रुप्याचा पेला घ्यायला विसरत नाही, मग ती माता म्हणून थोर की पुरुषी सैन्याच्या विळख्यात त्यांच्याच दांडगाईने लढणारी राणी म्हणून ती थोर याचा निकाल करता येत नाही.

या हिरव्यागार भूमीत सतत येणाऱ्या परकीयांनी सत्तेचे दोर सांभाळले पण त्यांच्याही मानसिकतेत एक मोठा फरक होता. तुर्की, अफगाणी टोळ्या इथे आल्या आणि इथल्याच मातीत रुजल्या. या भूमीला त्यांनी मातृभूमी मानलं. शहाजहाँने आपल्या प्रिय पत्नीच्या स्मरणार्थ इथेच ताजमहाल बांधला. इथल्या दौलतीवर आपल्या देशात ते स्मारक उभारलं नाही. गोलघुमटही इथेच उभारला गेला. पण इंग्रज, फ्रेंच या लबाड बिलंदर निळया डोळयांच्या लोकांनी आपल्याला सर्वस्वी लुटून नेलं. आपले इंग्लंडमधले राजप्रासाद सजवले. आपल्या संस्कृतीची साहित्याची, ज्ञानाची मोडतोड केली. सक्तीची धर्मांतरं केली. आपलं नैसर्गिक साधनसंपत्तीचं नुकसान केलं. राजप्रासादातील दौलत लुटली. धर्मांमधे फूट पाडली. आपण या लोकांविरुध्द एक झालो नाही.

ज्या महावीरांचं तेज या लढायांमधे उजळलं, त्यातील काही संग्राम हे भारताच्या राजकारणाला कलाटणी देणारे घडले. मातृभूमीत वीरांचं एवढं पीक उभं असतांनाही आपण पारतंत्र्यात का पडलो, याचंही लक्षवेधी दर्शन या वीरकथा करुन देतात. भारतीय मानसिकता आणि त्यातून निघणारे दोष ठळकपणे दिसतात. आपली पहिली युध्दकथा सुरु होते ती रामायणाने.

कवीमनाच्या वाल्मिकी ऋषींनी लिहिलेली राजघराण्यातील कथा. जवळ फौज नाही, पैसा नाही, युध्दसाहित्य नाही. तरी श्रीलंकेतून विजय मिळवून प्रभू रामचंद्र अयोध्येला आले ते दशाननाच्या पुष्पक विमानातून. आजही प्रभू रामचंद्र वंदनीय आहेत, फक्त पुष्पक विमानाचं नाव राफेल आहे. या त्रेता युगानंतर महाभारत घडलं. दुर्योधनाच्या एका चलाख शकुनीमामा नावाच्या अफगाण्याने गांधार देशातून भारतात येऊन, कौरव पांडवांचं १०५ भावांचं घराणं फोडलं आणि संपवलं. परक्यांच्या हस्तक्षेपाने आपणच आपल्याला संपवून घेण्याची बुध्दी, इसवी सनाच्या हजार वर्षांच्यानंतर, महंमद घोरी नावाच्या अफगाण्याच्या वेळीही तशीच राहिली होती हे सत्य आहे. पृथ्वीराज चौहान आणि जयचंद एवढाच नावांमधे बदल झाला होता. अफगाणी सत्ता संपली, मुघल आले. काबूल ते गुजरातपर्यंत राज्य विस्ताराचा मालक सम्राट अकबर वेगळा होता. भारतीय सत्तेचे दोर आपल्या हाती घेऊन देशात नवीन विचार आणायचा त्याने प्रयत्न केला. त्यासाठी सर्वधर्म समावेशक असा नवीन दीन - ए - इलाही धर्म स्थापन करण्याची, भारतीय राजघराण्यांशी विवाह बंधनांनी संबंध जोडण्याची राजनीती त्याच्यानंतर संपली. सकाळी कुंकुमतिलक लावून सूर्योपासना करणारा, रात्री मौलवींशी धर्मचर्चा करणारा, अकबर सम्राट हा, इस्लामिक कट्टर धर्मभक्तांच्या दृष्टीने काफरच ठरेल.

या कालौघात झाली ती सिकंदर, ते बाबरपर्यंतची भारतावरील आक्रमणं. अद्ययावत युध्दसाहित्यावर यांनी इथल्या राजा महाराजांना जिंकलं. पण त्यांच्या तोफा पाहून कुणालाही सत्ताधीशाला आपणही तोफा घडवाव्यात असं वाटलं नाही. सिंध जिंकायला, मीर कासीमने कॅटापल्ट आणली, बाबरने

तोफा आणल्या, इंग्रजांनी बंदुकांनी रण जिंकलं. विज्ञानाचा मार्ग चोखाळला तो फक्त टिपू सुलतानाने..तो स्वत: रॉकेटचा कर्ता ठरला. युध्दसाहित्याचं श्रेष्ठत्त्व कळलंच नाही भारतीय सत्ताधीशांना. परकीयांनीच भारतीयांना युध्दसाहित्य पुरवलं. शिवाजीमहाराजांना मात्र या युध्दसाहित्याचं महत्त्व कळलं आणि राजकारणात घुसण्याची इंग्रजाची लालसा कळली होती, म्हणूनच पन्हाळगडावर आपल्या झेंड्यासकट आपल्या तोफा घेऊन उभ्या राहणाऱ्या इंग्रजांना त्यांनी धडा शिकवला. पण बाकी भारतीय कुठे होते ? हे परकीय येतात कुठून तेही जाणून घेण्याची बुध्दी भारतीयांना कधी झाली नाही.

आपले वीर शत्रूशी झुंजले पण त्याचवेळी आपल्याच लोकांनी त्यांना पराभूत केलं. राणी लक्ष्मीबाईला इंग्रजांनी युध्दात प्रत्यक्ष हरवलं पण तिचे खरे शत्रू कोण होते? तिचाच सरदार दुलाजीसिंग, ज्याने किल्ल्याचे दरवाजे इंग्रजांसाठी उघडले. दतियाचा राजा ज्याने राणीच्या जखमी वडिलांना-मोरोपंत तांब्यांना इंग्रजांच्या हवाली केलं, बायजाबाई शिंदे जिने राणीचा ग्वाल्हेरमधला मुक्काम इंग्रजांना कळवला. कुणाकुणाशी लढेल ती वीरांगना? तात्या टोपेंना इंग्रजांच्या हवाली केलं तो भारतीयच होता, इंग्रज नव्हता. महाराजांच्या अथक पराक्रमाने उभं राहिलेलं स्वराज्य सूर्याजी पिसाळने क्षुल्लक देशमुखीसाठी दान देऊन टाकलं. राजारामाला, महाराणी येसूबाईंना, ताराराणीला रायगड सोडायला लावणारा फितूर याच मातीतला. रायगड हा स्वराज्याचा आत्मा. दगडधोंड्यांचा असला तरी सुवर्णक्षणांनी भारलेला आणि भरलेला होता. तो मुघलांना सहज मिळाला. अशी फंद आणि फितूरीची कितीतरी उदाहरणं प्रत्येक राजवटीत झाली. त्यांच्यामुळेच आपल्या वीरांना मातीला मिळावं लागलं.

इंग्रजांविरुध्द त्यांच्यासारख्या शस्त्रास्त्रांनी सामर्थ्यवान होऊन, मैसूरच्या राज्यरक्षणासाठी शहीद होणारा पहिला वीर सत्ताधीश म्हणजे टिपू सुलतान. त्याने पेटवलेली मशाल मग अनेक भारतीय क्रांतीवीरांनी उचलून धरली. फितूरी ही भारतीय मनाची कीड वीरांच्या बाहूंना पोकळ करत राहिली.

देश एक असला, सीमा लागलेल्या असल्या तरी एक राष्ट्र कल्पनेचा, राष्ट्राभिमानाचा स्पर्शही नसलेली मानसिकता हा भारतीय राजकारण्यांचा मोठा दोष. त्यामुळे परकीय आक्रमण आपल्या देशावर आलं आहे, उद्या आपलाही बळी जाणार आहे, ही भावनाच जागृत झाली नाही. तो हल्ला शेजारच्या राज्यावर झाला आहे एवढंच आकलन राज्यकर्त्यांना झालं. त्यामुळे सर्व राजपूत, सर्व दक्षिणी एकत्र होऊन ना तुर्कांशी लढले, ना मुघलांशी लढले, ना इंग्रजांशी लढले. इंग्रजांनी त्यांच्या कारभारासाठी देश एकत्र आणला. तुर्कांनी दिल्ली जिंकल्यावर दिल्ली परत जिंकावी म्हणून सर्वजण एकत्र आलेच नाहीत. इंग्रजांच्यामुळे त्याकाळातील राजकीय पुढाऱ्यांच्या मनात देशाचं स्वातंत्र्य ही प्रखर भावना निर्माण झाली. त्यातून टिळक-गांधी-नेहरु-पटेलांसारखे राष्ट्रीय नेते आंदोलनात शिरले. पण राष्ट्रभावना आजच्या नेत्यांमधे आहे का की प्रांतीय भावना आहे ही गोष्ट विचार करायला लावणारी आहे.

या परकीयांनी कुणाच्या जीवावर लढाया जिंकल्या ? आपल्याच लोकांच्या बहादूरीवर अवलंबून होते ते सारे. ज्याची खावी भाकरी, त्याची करावी चाकरी ही मानसिकता असल्यामुळे आपल्या शूरांना मारणारे आपलेच लोक होते. सिंधच्या इतिहासात दाहिर राजाकडे अरबी फौज होती, पण मीर

कासीम सिंधवर चालून आल्यावर या तुकडीने स्वधर्मियांविरुध्द शस्त्र धरण्यास ठाम नकार दिला. भारतीय हिंदू असं कडवेपणाने कधीच वागले नाहीत. का?

भारतीय भूमीवर धर्मयुध्दंही घडलं. मुसलमानांनी आणि इंग्रजांनी सक्तीची धर्मांतरं घडवली. हिंदूंनी त्यावर काय उपाय योजला? काही नाही. शिवरायांनी जो मार्ग शोधला, अंमलात आणला, नेताजी पालकर, निंबाळकरांसारख्या आपल्या लोकांना लगेच हिंदू करुन घेतलं तोच मार्ग शाहूच्या काळात मुसलमान झालेल्या गुजर बंधूंच्याविरुध्द का नाही योजला गेला? आपल्या देशात परके येतात, आपला धर्म भ्रष्ट करतात, प्रजा भ्रष्ट करतात, पण हिंदू पंडित त्यावर काहीही मार्ग शोधत नाहीत यापरता विषाद किती बाळगावा? आज ख्रिश्चन आणि मुसलमान धर्मांतरितांमधे हिंदू पूर्वज असलेले कितीतरी असतील. पण ब्रिटिशांनी तोडा-फोडाचं राजकारण केलं ते आपण कधी सोडणार हाच मूळ प्रश्न आहे. जेवढे तुर्की क्रूर होते, तेवढेच इंग्रजही क्रूर होते, पण इंग्रजांच्या नावाने आपण बोटं मोडत नाही. हाही आपला मानसिक दोष. आपल्या देशाला एकसंध ठेवणारी एक भाषा अजूनही नाही, आपापल्या मातृभाषा संपण्याची खंत कुणालाही नाही, यापरती गुलामी वृत्ती कोणती ?

नुकतंच स्वातंत्र्य मिळालेला आपला देश अजून बाल्यावस्थेत आहे. देश सुजलाम आहे, सुफलाम आहे, वीरांचा आहे, विद्वानांचा आहे, विज्ञानाचा आहे, पण देश एकत्र आणणारा, धडाडीचा, जाणता राजा देशाला हवा आहे. जे घडत गेलं ते असं होतं. ते जे भविष्यात घडेल ते काळाच्या उदरात सुप्तावस्थेत आहे. पुढेही सतत काहीतरी घडत जाणारच आहे. जे घडत गेलं, त्यावरुन एकच लक्षात आलं. हे सगळे सुदर्शनधारी युगंधराचेच खेळ असतील का ?

शिवरायांचा अंत झाला की मग शंभूराजे- मग शाहूराजे - मग माधवराव पेशवे अल्पायुषीच व्हायला हवेत तरच इंग्रज येणार, - तरच क्रांतीकारक जन्म घेणार, स्वत:ची गीता परत म्हणवून घ्यायला लोकमान्यांना मंडालेत तोच बसवणार – जगाच्या रणभूमीवर हिटलर आला तरच भारत स्वतंत्र होणार. या वीरांसमोर प्रतिवीर येणार..ही सगळी साखळी तोच जगन्नियंता जगभर खेळवणार आणि ते मानवी जीवनात प्रत्येक क्षेत्रात होणार.. कुणाकडून किती कार्य करुन घ्यायचं आणि त्याला कधी उचलायचं हे सगळे नियतीचे खेळ.

**हा सगळा काल चितारण्यासाठी बहुमोल पुस्तकांचा आधार मिळाला.**

महाभारत

१८५७ चे स्वातंत्र्यसमर - सावरकर

Military History of India by Sir Jadunath Sarkar,

Military History of Marathas by Surendra Sen,

A comprehensive history of India - the Delhi Sultanat, vol. 5, by Mohammad Habib, Khaliq Ahmad Nizami,

मराठी रियासत- गो.स. सरदेसाई,

मुसलमानी अमदानीतील मराठे सरदार - पारसनीस,

शिंदे अलिजाबहादर घराण्याचा इतिहास - जगन्नाथ प्रभाकर सरंजामे,

मध्ययुगीन भारत, वैद्यांचे ऐतिहासिक निबंध, - चिंतामणराव वैद्य,

छत्रपती शिवाजीमहाराजांचे चरित्र - कृष्णराव केळुस्कर,

महाराष्ट्राचा इतिहास - संपादक अ. रा. कुलकर्णी, ग. ह. खरे, खंड २,


असे होते मोगल - मनुची,


माझा प्रवास – वरसईकर गोडसेभटजी,


या सर्वांनी आपापल्या संशोधनात्मक लेखनाने इतिहास उजळून टाकला. त्यांच्या संशोधनाने, जे घडत गेलं ते मांडता आलं. त्यांची अपार मदत झाली. त्यांचे न संपणारे ऋण आहेत.

ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss….ss…ss.








**ई साहित्य प्रतिष्ठानने प्रकाशित केलेली**

**डॉ. स्मिता दामले यांची इतर पुस्तके**


**ONE** click on cover


Book will **OPEN**









**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे १४ वे वर्ष.**

**डॉ. स्मिता दामले यांचे हे नववे पुस्तक.**

डॉ. स्मिता दामले या मध्ययुगीन इतिहासावरील सुप्रसिद्ध विद्वान आहेत. हल्लीच्या गुगगल पंडितांच्या काळात असे मूळ बखरी व दस्त वापरून इतिहास अभ्यासणारे विरळाच. त्याचबरोबर त्यांची इतिहासलेखनाची एक ओघवती शैली आहे. त्यांची अनेक पुस्तके वाचकांनी अभ्यासली आहेत. डॉ. दामले यांच्यासारख्या ज्येष्ठ साहित्यिका आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (७), अशोक कोठारे (५० खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(१९), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(५) स्वाती पाचपांडे(२),

साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।